श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य षड्दर्शनप्रमाण
पारावारपारीण चतुर्निगमशासनप्रत्याहार
ध्यानधारणासमाध्यङ्गयोगानुष्ठाननिष्ठ ता
श्रुतवर्त्मनाद्यविच्छिन्न गुरुपरंपराप्राप्त षड्दर्शन
स्थापनाचार्य व्याख्यानसिंहासनाधीश्वरसकल
निगमागमसारहृदय सारव्यप्रतिपादकदेशिक
मार्गप्रवर्तक सर्वतंत्रस्वतंत्रादिराजधानी विद्यानगर
राजधानी कर्णाटक सिंहासनप्रतिष्ठापनाचार्य श्रीम
द्राजाधिराज गुरुभूमंडलाचार्य ऋष्यशृंग पुरवरा
धीश्वर तुंगभद्रातीरवासि श्रीमद्विद्याशंकर पादपद्मा
राधक श्री जगद्गुरु श्रीमत्सच्चिदानंदशिवाभिनवनृसिंह
भारतिस्वामि गुरुकमलसंजात श्रीजगद्गुरु शृंगेरी पीठ
श्वरवरभारतिस्वामिनो चरणकमलयोः साष्टांगप्रण
तिपूर्वकं

श्रीमच्छंकरभगवत्पादीयगीताभाष्योपरि तदनभिज्ञ
टिळकोल्लसित दोषधूलिसंमार्जकं संजीविनी भेदकं
(गीता धर्मः) नाम ग्रंथं श्रीशंकर सेवात्मकं तत्कृपा
सनिधौ यथामति विरच्य श्रीचरणनिकटे प्राहैषं.
अल्पज्ञत्वान्नेऽति गांभीर्याच्च भाष्यस्य कृत्यमारब्धेत
त्सरि श्रीमत्पूर्वकेणावलोकनेनानुगृह्णंतु पूज्यपादा
आर्यधे.

विनेयः कोल्हटकरोपनामको
यत्रावंतनधर्मा

॥ श्री ॥

गीताधर्म

अथवा

रहस्य-खंडन.

लेखकः

यशवंत व्यंकटेश कोल्हटकर, बी. ए., एल् एल्. बी.

॥ सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥

श्री० भ० गी०

पुणें:

हें पुस्तक पुणें येथें, आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१६.

किंमत दीड रुपाया.

अर्पणपत्रिका.



निरस्तः श्रीमदाचार्यैर्ज्ञानकर्मसमुच्चयः ।
"संजीवनी" प्रयोगेण ह्युत्थितोऽहिमही यथा ॥ १ ॥
"गीताधर्म" प्रयत्नेन रामेणेव धनुर्भृता ।
संप्रपिष्य पुनश्चामुं देवविप्रप्रसादतः ॥ २ ॥
आधिभौतिकशास्त्राद्यैः श्रुतिस्मृतिपुरःसरैः ।
गीतोक्तिभिश्च विलयं नीतोऽसौ बलवानपि ॥ ३ ॥
यशःशर्मा वेंकटेशिः कोल्हट्करकुलोद्भवः ।
नैकवासी दत्तदासः कौशिको गोत्रतस्त्वहम् ॥ ४ ॥
शाके वस्वग्निवसुभू सम्मिते शालिवाहने ।
संप्रदायमनुसृत्य सद्गुरोश्च वचः स्मरन् ॥ ५ ॥
समर्पये ग्रंथमिमं विश्वौदुंबरवासिने ।
अनेन प्रीयतां देवो दत्तात्रेयो वरप्रदः ॥ ६ ॥

प्रकाशकाचे दोन शब्द.

ज्ञानप्रकाशच्या संपादकांकडे रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं 'गीतारहस्य' प्रसिद्ध होतांच त्याची एक प्रत अभिप्रायाकरितां पाठविली होती. रा. टिळक यांचें 'गीते' वर पुस्तक प्रसिद्ध होणार आहे अशी बरींच वर्षे लोकप्रसिद्धी असल्यामुळें सदरसारख्या पुस्तकावर अभिप्राय प्रसिद्ध व्हावा तो तज्ज्ञ अशा विद्वान् लेखकांनीं लिहिलेला असा असावा या हेतूनें ज्ञानप्रकाशच्या संपादकानीं प्रो. भाटे, प्रो. रानडे, डॉ. गुणे, रा. रा. कोल्हटकर वगैरे सारख्या बऱ्याच विद्वान् सद्गृहस्थांस सदर पुस्तकावर अभिप्राय लिहून देणेबद्दल विनंति केली होती. या विद्वान् गृहस्थांचे अभिप्राय एकत्र संकलित करून पुस्तकरूपानें छापून ज्ञानप्रकाशबरोबर प्रसिद्ध करावे असा प्रथम हेतु होता. परंतु तो हेतु अनेक अडचणींमुळें सफल झाला नाहीं. रा. रा. यशवंतराव कोल्हटकर यांनीं सदर विनंतीस मान देऊन 'परीक्षण' लेख लिहिण्यास सुरुवात केली. परंतु 'परीक्षण-लेखा'च्या घालून दिलेले मर्यादेचें अतिक्रमण होऊं लागल्यामुळें त्यांनीं सदर परीक्षण पुस्तकरूपानेंच प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. रा. कोल्हटकर हे तत्त्वज्ञानविषयाचे विवेचक विद्यार्थी आहेत. त्यांनीं 'विश्ववृत्त' वगैरे मासिकांत पूर्वी तत्त्वज्ञानविषयक लेख लिहिले आहेत. त्यांचा सदर विषयाचा व्यासंग आजकालपर्यंत अन्य उपाधि संभाळूनही चालू आहे. रा. कोल्हटकर यांनीं प्रस्तुतच्या पुस्तकांत विषयाचें विवेचन उत्तम तऱ्हेनें केलेलें आहे. सर्वच वाचकांस त्यांची विचारसरणी सांगंत पसंत पडेल असें नाहीं. परंतु 'गीताधर्मा' सारख्या महत्त्वाच्या विषयासंबंधानें अंधश्रद्धेस बळी पडून लोकमतास वळण लागणें श्रेयस्कर नाहीं म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत येत आहे. या विषयासंबंधानें अन्य लेखकांचे लेख अथवा पुस्तकें प्रसिद्ध करण्याची उमेद आणणें महाराष्ट्रवाचकवृंदाकडे आहे. जुन्या अथवा नव्या 'संप्रदाया' चे अंधभक्त न बनतां लोकांनीं प्रत्येक विषयाचा सांगोपांग विचार करावा व मग आपलीं मतें बनवावीं अशा इच्छेनें प्रस्तुतचा प्रकाशनाचा प्रयत्न केला आहे. तो कितपत सिद्धीस जातो हें पहाणें आहे.

प्रकाशक.

प्रस्तावना.

राजसाः कलिमाश्रित्य जायन्ते ब्रह्मयोनिषु ।
राष्ट्रभक्तिविशेषैस्ते घ्नन्ति धर्मान्सनातनान् ॥ १ ॥
जन्मान्तरीयसुकृतेन कुशाग्रबुद्धिर्देशोपकारकरणे दृढबद्धदीक्षः ।
तस्यापि बुद्धिमत ईदृश मोहयोगो हा हन्त हन्त गहनः खलु कर्मपाकः॥२॥

आजमितीपावेतों " जहाल " व " नेमस्त " ही शब्दयोजना व तल्लक्षित पक्षभेद फक्त राजकीय विषयांपुरतेच दिसून येत; परंतु 'गीतारहस्य'स्फोट झाल्यापासून धर्मविषयांत सुद्धां हा पक्षभेद लोकांना स्पष्ट भासूं लागला आहे. ज्ञानोत्तरदशेंत कर्मे करीत रहाणारे विक्रमशाली, धृतिमान्, प्रवृत्तिपर, नरपुंगव हे 'जहाल' अथवा क्षणक्षणीत वेदान्ती व ज्ञानोत्तरदशेंत हतबल, निरुत्साही, कर्तव्यशून्य, निवृत्तिपर, संन्यासमार्गीय हे "नेमस्त" अथवा मळमळीत वेदान्ती असा पक्षभेद धर्मबाबतींत आतां उघड उघड उत्पन्न झाला आहे; या अचाट शोधाचें सर्व श्रेय 'रहस्य'कारांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व दीर्घ परिश्रमानें मिळविलें आहे याबद्दल कोणीही त्यांचा हेवा करण्याचें प्रयोजन नाहीं. अवाढव्य लोकसंग्रह, लोकोत्तर धृति, अलोट बाणेदारपणा, अनावर अहंकारवृत्ति, अतुल बुद्धिसामर्थ्य व सदैव चरणरत गणसमुदाय इतक्या गोष्टींची अनुकूलता मिळून, त्यांतच देशांतील धर्मग्लानीची भर पडल्यावर मग 'गीतारहस्या'चा सर्व देशभर बोलबाला व्हावा यांत नवल काय आहे ? एका देशभक्तीच्या अद्वितीय गुणानें केवढें कार्य होऊं शकतें याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अशा मनुष्याच्या विचारास जनता किती लोलुप असते हें ग्रंथाच्या विक्रयावरून दिसून येईल. ग्रंथ समजो वा न समजो, ग्रंथ समग्र वाचून होवो वा न होवो, या ग्रंथावर जनतेच्या उड्या कशा पडल्या व पडत आहेत हें पाहिलें म्हणजे स्वसुखनिरभिलाषता व लोकाराधनतत्परता या दोन गुणांच्यामुळें होणाऱ्या अजब व अपूर्व कार्याची चांगली साक्ष पटते, यांत जनतेचा दोष मुळींच नाहीं. 'गीतारहस्य' हा ग्रंथ त्यामुळेंच आम्ही अत्यंत उत्सुकतेनें वाचला; परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, यांतील सिद्धान्त वाचून मनानें पूर्ण माघार घेतली व " जें सारें नुसतें चकाकित दिसे तें सर्व सोनें नसे " या उक्तीची सत्यता स्पष्ट दिसूं लागली.

या ग्रंथावर अनुकूल, प्रतिकूल अशा पुष्कळच टीका येऊं लागल्याच आहेत. अनुकूल टीकाकारांत धर्मशास्त्र व तत्वज्ञान यांचा परिचय असलेले गृहस्थ कोणी नजरेस आले नाहींत. रावबहादुरी, अथवा वकीलीकौशल्य हीं धर्मशास्त्राच्या

निर्णयांत कवडीमोलाचीं आहेत. राजकीय पक्षभेदांतील दोस्ती या धार्मिक पक्षभेदांत अनायासेंच शिरून, तिनें नुसतें "अहो रूपमहो ध्वनिः" या वृत्तीचा अवलंब केला आहे, यापेक्षां जास्त कांहीं केलें नाहीं. वा राजकीय पक्षांतील प्रमुख परंतु धर्मनभिज्ञ मंडळींनीं 'कर्मयोग' पक्षाच्या या नवीन निशाणाखालीं जाऊन तो पक्ष फुगवून टाकावा हें साहजिक व अनिवार्यही आहे. याचमुळें 'रहस्य'कारांचे अनेकविध गट भराभर या निशाणाखालीं जाऊं लागले आहेत व प्रत्यक्ष 'रहस्य'-कारांनीं मुद्देसूद उत्तर देण्याच्या आधींच या पुरुषस्त्रीगणांनें प्रतिकूल टीकाकारांवर अपशब्दांचा भडिमार चालविला आहे. या लोकांना 'रहस्यकारां'नीं काय लिहिलें आहे हेंही कळत नाहीं, श्रीशंकराचार्य काय म्हणतात हेंही त्यांना ठाऊक नाहीं; पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या अनुभवशून्यतेचीही त्यांना जाणीव नाहीं व प्रतिकूल टीकाकारांच्या विचारसरणीचें आकलनही त्यांना करतां येत नाहीं. तेव्हां अशा अज्ञ लोकांनीं मुद्देसूद हल्ला प्रतिपक्षावर करण्याऐवजीं आपापल्या शक्त्यनुरूप व लिंग-भेदानुरूप शाप द्यावेत अगर अंगुलीभेद करावा यांत आश्चर्य नाहीं. या न्यायानेंच "चमकशास्त्री, नमकशास्त्री" इत्यादि चमत्कृतिजनक विशेषणें प्रतिकूल टीकाकारांस देण्यापलीकडे विवेकपूर्वक खण्डनात्मक उत्तर कोणींही दिलेलें नाहीं व हेंही ठीकच झालें. स्वतः 'रहस्य'कार या सर्व प्रतिकूल टीकाकारांना उत्तरें देतील तेव्हां पुन्हां या लोकांचा हलकल्लोळ–अर्थात् अनुवादात्मक–सुरूं होईलच. परंतु एका व्यक्तीच्या बुद्धीस आपलें जीवित सर्वस्वी अर्पण करणाऱ्या व पर-विचारपुष्ट अशा दासदासी–जनांची उपेक्षा करणें हेंच चांगलें. या "गीता-धर्मा"चें कोणी विवेकपूर्वक व न्यायसिद्ध खंडन केल्यास तें मोठ्या आनंदानें मान्य करण्यांत येईल; परंतु दीन व मूढ अपशब्दांप्रमाणेंच विवेकशून्य मंडनही विचारार्ह नाहीं हें सांगून ठेवणें अवश्य आहे.

आमच्या इकडील देशभक्तीच्या आड, जशी धनाशेची कल्पना येऊं शकत नाहीं, तसेंच, धर्मपरायणतेच्या आड व्यवहाररति येऊं शकत नाहीं असा सध्यां काल आला आहे. खरें म्हटलें तर देशभक्ति व देवभक्ति दोहींतही **"तन मन धन"** अर्पण केल्याशिवाय ती पराभक्ति होऊं शकत नाहीं. देशभक्तींत प्रसंग पडल्यास ज्याप्रमाणें धनाचा, सुखाचा, पोराबाळांचा किंबहुना प्राणाचाही त्याग करावा लागतो, तद्वतच देवभक्तींतही प्रसंगवशात् आपल्या प्रपंचावर किंबहुना प्राणावरही बेतल्यास मागें घेतां कामा नये. तुष्टि, पुष्टि व मुक्ति या तिन्ही मिळाल्या तरच ती बिचारी मुक्ति येईन असा 'रहस्यकारां'चा हट्ट इतर ठिकाणीं व्यवहारांत चालो, परंतु धर्मबाबतींत मात्र तो साफ चालणार नाहीं असें अनेक विद्वानांनीं त्यांना निक्षून सांगण्याची प्रस्तुत वेळ आलेली आहे. "निष्काम–कर्मयोग–" रूपी सूत्र हल्लीं अनेकांच्या तोंडीं झालेलें दृष्टीस पडत आहे. वकीलानें आपला धंदा निष्काम वृत्तीनें करावा, देशभक्तांनीं आपल्या परिषदा निष्काम कर्ममार्गानें

भरवाल्या, भिक्षेकऱ्यांनीं निष्काम कर्ममार्गानें भिक्षा मागावी, एका पक्षानें प्रतिपक्षांस शिव्या द्याव्या त्या निष्काम मनानें द्याव्या, कामीजनांनीं आपली विषयतृप्ति निष्काम-वृत्तीनें करावी. सारांश सुशिक्षितापासून अशिक्षितापर्यंत जो उठला तो "निष्काम कर्मयोगाचें" सूत्र पोपटाप्रमाणें पठण करूं लागला आहे. खाजगी पत्रांतून, चव्हाट्यांतील गप्पांतून, चहापानादि ऐषआरामाच्या प्रसंगीं, लग्नकार्यांतील सुग्रास भोजनाचे वेळीं, भटाभिक्षुकांच्या वादविवादांतून जिकडे तिकडे निष्काम कर्ममार्गाचा उच्चार-आचार नव्हे-अनेकदां ऐकण्यांत येऊं लागला आहे. हा "निष्काम कर्मयोग" आणखी पुढें कोणत्या थरास जाणार आहे हें कळत नाहीं. तेव्हां हें अरिष्ट टाळण्याकरितां व सनातन वैदिकधर्माची धर्मजिज्ञासूंना वेळींच ओळख करून देण्याकरितां हा अल्प यत्न केला आहे. ब्रह्मज्ञानानंतर साधनसंपत्ति सांगणाऱ्या व ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं हें पाश्चिमात्य तत्त्वविदांस विचारणाऱ्या 'रहस्यकारां'ना वेदान्तशास्त्र मुळींच समजलें नाहीं असें म्हणावें लागतें व जे कोणी हा "गीताधर्म" शांतचित्तानें वाचतील त्यांचीही अशीच खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं.

जन्मभर प्रपंच करणाऱ्या (देशभक्तीला प्रपंचच समजलें पाहिजे.) इसमाला धर्मबाबतींत ऋषींचा अधिकार येत नाहीं; तसेंच जन्मभर परमार्थ करणाऱ्याला व्यवहारांत अगर प्रपंचशास्त्रांत बोलण्याचा अधिकार नाहीं. आपल्या पूज्यतेचा फायदा घेऊन आचार्यांनीं जर प्रपंचशास्त्रासंबंधानें विधानें केलीं असतीं तर तींही विधानें 'गीतारहस्यां'तील परमार्थासंबंधाच्या विधानाइतकींच अप्रमाण ठरलीं असतीं. परंतु आचार्यांचें अंगीं विशेष तारतम्य होतें. वादांत, कामशास्त्रासंबंधानें आपला बोलण्याचा अधिकार नाहीं हें जाणून त्यांनीं योगसामर्थ्यानें देहांतर केलें हें सुप्रसिद्ध आहे. देशकार्यांत ज्याप्रमाणें एखादा उपटसुंभ नामदार झाला अगर एखादा तोतया देशभक्तीचें कातडें पांघरून एकाएकीं गर्जना करूं लागला म्हणजे विचारी लोक त्याची पूर्वपीठिका पाहतात, तद्वतच धर्मविषयांत एकाएकीं चमकूं पहाणाऱ्या इसमाच्या, योगाभ्यासानें येणाऱ्या अन्तरनुभवाचें स्वारस्य, अनन्य गुरुभक्तीनें होणारी स्फूर्ति व बोध, उपास्यदेवतेच्या उपासनेंत प्राप्त होणारें तपस्तेज, वेदाभ्यासानें येणारी प्रसन्नता व शास्त्रोक्त कर्माचरणानें येणारी चित्तशुद्धि, शांति व ओज, इत्यादी गुणात्मक पूर्वपीठिकेकडे विचारी लोक पाहूं लागल्यास त्यांत विशेष आश्चर्य नाहीं; इतकेंच नव्हे तर तुकाराम, रामदास, एकनाथ इत्यादि वंद्यनीय पुरुष हे सुद्धां धर्मकार नव्हत. त्यांना धर्मकार, आचार्य असें कोणीं नांव दिलें असतें तर त्यांना सुद्धां तें खपलें नसतें. धर्मकारांचा मान केवल ऋषींचाच आहे. आर्षवचनें हींच धर्मविषयांत प्रमाण होत, हें धर्मजिज्ञासूंनीं चांगलें लक्षांत ठेवावें.

आतां हेंही सांगणें अवश्य आहे कीं, हा ग्रंथ जसा 'रहस्यकारां'च्या अनुया-

यांना रुचणार नाहीं तसाच पण तो प्रागतिक राजकीय पक्षांयांसही आवडणार नाहीं. त्या पक्षांतील मंडळींना हा निवृत्तिमार्ग कटु व त्याज्य वाटणार व रानडे तेलंग प्रभृतींचा " धर्मकथनाचा" अधिकार नाकबूल केल्याबद्दल तेही आम्हांवर रुसणार; तसेंच आमचे ऋषिप्रणीत ग्रंथ वाचण्याची कुवत नसणारे, कर्मयोगाचें खरें महात्म्य व प्रभाव ठाऊक नसणारे, आचार्यांसारख्या तत्त्वविदांची न्यायघटित धर्ममीमांसा न समजणारे, व निरर्गल अशा रीतीनें समाजांत वागूं पाहाणारे, परंतु मृत्यूनंतरची कांहीं तरी तरतूद केली पाहिजे या भ्याड वृत्तीनें गौरकायाधिष्ठित धर्मपंथांतून अचानक शिरणारे महात्मे यांनाही हा प्रयत्न शल्यवत् होणार आहे, परंतु त्यास उपाय नाहीं. भगवद्गीतेंत श्रीकृष्ण काय म्हणतात हें सांगावयाचें झाल्यास तें यथार्थ सांगणें हेंच खरें कर्तव्य आहे. गीतेंत हीनजातींशीं विवाह सहभोजन, इत्यादि प्रागतिक विचार श्रीकृष्णांनीं सांगितले नाहींत त्यास इलाज नाहीं. भगवद्गीता हें सनातन धर्माचें सारभूत संक्षिप्त कथन आहे, तेव्हां वर्णसंकराबद्दल या ग्रंथांत जो स्पष्ट व जोराचा निषेध व्यक्त केला आहे; तोच निषेध वैदिक धर्माचें स्वरूप आहे. कोणास हें मत ग्राह्य नसल्यास त्यांनीं पाहिजे तर गीताच अप्रमाण मानावी; त्यास आड येण्याची कोणाची या मन्वंतरांत प्राज्ञा नाहीं. प्रपंचच खरा असल्यास तो खुशाल करा, परंतु खरा प्रपंच करूनही "कल्पनामय मोक्षाच्या" नादीं कां लागतां? तो राहूं दे बिचारा त्या दुर्भागी विरक्ताकडेच. आपण कां पुन्हां तिकडे मिटक्या मारीत पाहतां ? बरें प्रपंच साधूनच परमार्थ पाहिजे असल्यास तो ऋषिप्रणीत धर्मांत पहा व भगवद्गीतेंतील "स्वधर्मे निधनं श्रेयः" व " तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ " या वाक्यांवर विश्वास ठेवून धर्मरत व्हा. वेदान्तांतील अन्तिम सिद्धान्त व आधिभौतिक आचार-स्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य यांची सांगड कदापि जुळावयाची नाहीं.

इतक्या लोकांचा असंतोष करण्याचा उपद्व्याप तरी कां करावा हा एक साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो. परंतु इतक्या लोकांचा असंतोष झाला तरी त्याची किंमत दोन चार धर्मजिज्ञासूंना आलेल्या सावधगिरीच्या किंमतीहून फारच कमी आहे.

या ज्ञानोत्तर कर्मयोगानें अनादिसिद्ध अद्वैतसिद्धान्तावर जबरदस्त घाला पडला आहे हें सूज्ञ व तज्ज्ञ यांना सांगणें नकोच आहे.

न जायते न म्रियते क्वचित्किंचित्कदाचन ।
जगद्विवर्तरूपेण केवलं ब्रह्म जृंभते ॥

योगवासिष्ठ वै० प्र०.

या महासिद्धान्ताशीं कर्मयोगाचा अत्यंत विरोध आहे हें अतज्ज्ञ परंतु श्रद्धालु जनांस स्पष्टपणें सांगणें भाग आहे.

अद्वैतशास्त्रावर प्रचंड ग्रंथोदधि पूर्वीच उपलब्ध असतां या शास्त्रावर नव्यानें कांहीं लिहिण्याचें प्रयोजनच नव्हतें. परंतु या 'कर्मयोग' पूर्वपक्षानें पुन्हां हा वाद उचल खाणार आहे असें दिसून येतें. आतां पुन्हां कोणी " नैष्कर्म्यसिद्धि " नवीन तऱ्हेनें लिहूं लागल्यास त्याचा प्रयत्न अनाठायीं होणार नाहीं. आतां एक पिढी अगर दोन पिढ्या पुन्हां या अद्वैतशास्त्रावर काथ्याकूट करणें अगदीं क्षम्य इतकेंच नव्हे तर अवश्यक झालें आहे.

'रहस्यकारां'चा हा अलौकिक शोध सतत त्रेचाळीस वर्षांच्या परिश्रमाचा आहे. तेव्हां या दीर्घकालीन परिश्रमानें निर्माण केलेले विचार निर्मूल करण्यास त्रेचाळीस वर्षांपेक्षां जास्त अवधि पाहिजे व रहस्यकारांच्या बुद्धीसारखी किंवहुना जास्त मोठी बुद्धि पाहिजे हें खरें, तथापि " अकरणान्मंदकरणं श्रेयः " या न्यायानें हा प्रबंध निःपक्षपाती व विवेकशील लोकांपुढें मांडला आहे. याचा लोकांनीं समचित्तानें पूर्ण विचार करावा. वास्तविक हें एक जन्माचेंच काम होऊन बसलें आहे. परंतु राहिलेला भाग जरी अद्याप पुष्कळच आहे तथापि आजमित्तीस झालें एवढ्यावरच संतुष्ट राहाणें भाग आलें आहे. पुढील इष्टकार्यास अनुकूल परिस्थिति आणणें अगर न आणणें हें त्या गोपाळकृष्णाच्याच इच्छेवर अवलंबून आहे.

गीतारहस्य वाचून श्रीशंकरसेवा अगर अद्वैतसेवा करण्याची मनीषा झाली परंतु ती फलद्रूप होणें हें केवळ एकट्याचे हातांत थोडेंच होतें. या कामीं रा. रा. अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन यांनीं जें प्रोत्साहन दिलें व आपल्या छापखान्याची मदत दिली त्यामुळें त्या मनीषेस हें मूर्त स्वरूप प्राप्त झालें. एरव्हीं तें होतें ना, इतकेंच नव्हे परंतु हा प्रबंध लिहिण्याची इच्छा दृढमूल होण्यासही हेच गृहस्थ प्रधानतः कारणीभूत झाले आहेत. तसेंच येथील व्याकरणपाठशाळेचे अध्यापक वे. शा. सं. कृष्णशास्त्री गोटखिंडी यांनींही चार पांच महत्त्वाच्या सूचना आम्हांस केल्या याबद्दल कृतज्ञता दर्शविणें अवश्य आहे.

शेवटीं व्यवहार-दृष्ट्या अत्यंत सन्माननीय अशा ' रहस्यकारां 'नां नम्रपणें विनंति करितों कीं, अद्वैतशास्त्रावरील प्रेमातिरेकानें, श्रीमदाचार्यचरणावरील श्रद्धेनें व सच्छास्त्रविवेचनाच्या औत्सुक्याच्या भरांत, 'रहस्यकारा'संबंधीं कांहीं उपमर्दकारक शब्द चुकून लिहिले गेले असल्यास त्याबद्दल त्यांनीं क्षमा करावी. व्यक्तिबद्दल व्यवहारांत पूज्यभाव परंतु ग्रंथाबद्दल परमार्थदृष्ट्या शून्यभाव असा विलक्षण पेंच पडला होता परंतु शेवटीं परमार्थदृष्टीनेंच जास्त ओढ खाल्ली निरुपाय आहे.

शेवटीं ज्या जगन्नियन्त्या परमेश्वराचे प्रेरणेनें व प्रसादानें हें काम पूर्ण तडीस गेलें त्याचें मनःपूर्वक चिंतन करून त्याचेच चरणकमलीं ही लेखणी तूर्त ठेऊन वाचकांची रजा घेतों.

रामदुर्ग,
वैशाख शु॥ १५
शके १८३८.

यशवंत व्यंकटेश कोल्हटकर.

श्री.

गीताधर्म

अथवा

रहस्य- खंडन.

१ अधिकारयोग.

नारायणं पद्मभवं वसिष्ठं शक्तिं च तत्पुत्रपराशरं च ।
व्यासं शुकं गौडपदं महान्तं गोविंदयोगींद्रमथास्य शिष्यम् ॥
श्रीशंकराचार्यमथास्य पद्मपादं च हस्तामलकं च शिष्यं ।
तं त्रोटकं वार्तिककारमन्यान् अस्मद्गुरून्संततमानतोऽस्मि ॥

श्रीगीताधर्माबद्दल चर्चा करण्याची संधि श्रीईशकृपेनें प्राप्त झाली आहे, त्या संधीचा याग्य उपयोग करण्याचे प्रारंभीं वरील मंगलाचरण मनोभावें करून मीं स्वेच्छेनें स्वीकारलेल्या कामास आरंभ करतों.

अखिल भरतखंडांत अधर्मप्रवृत्ति होऊन वैदिकमार्गाचा पूर्ण लोप होण्याचीं चिन्हें जेव्हां स्पष्ट दिसूं लागलीं, गौतमबुद्धासारख्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या व निस्पृहतायुक्त पुरुषानें सनातन वैदिकमार्गावर जेव्हां वाटमारेपणा सुरू केला, वेदनिष्ठ व वेदबाह्य अशा अनेक महा पुरुषांनीं नानाविध मतें, तर्क व पंथ काढून खऱ्या वैदिकधर्माचें रूपांतर अथवा विटंबना केली, व यामुळें जनता वेदविन्मुख होऊन धर्मभ्रष्ट होण्याचा समय आला, तेव्हां श्रीभगवत्पादाचार्य या भरतखंडांत निर्माण झाले, व या बालरवीच्या देदीप्यमान तेजानें वर सांगितलेलीं सर्व अरिष्टें लयास जाऊन वैदिकधर्ममार्तंड पुन्हां तीव्रतर किरणांनीं भरतखंडावर तपूं लागला. प्रपंचरूपी सुखदुःखात्मक प्रासादाच्या पहिल्याच उंबरठ्यावर ज्यांनीं प्रव्रज्यायोगाची दीक्षा घेतली, साधारण मानवकोटींत ज्या वयांत पुरती लंगोटी कशी घालावी, अथवा गुरुजींनीं मौंजीबंधनांत सांगितलेला गायत्रीमंत्र कसा म्हणावा, अगर आपल्यास जेऊं घालणारे अगर शिक्षा करणारे इसमाशिवाय बाहेर कांहीं विश्व आहे हेंसुद्धां कळण्याचें बुद्धिसामर्थ्य नसतें, अशा वयांत ज्या महात्म्यानें सर्व

प्रस्थानत्रयीवर भाष्यें करून वैदिकधर्मांतील सामर्थ्य, ओज व निर्बाध सत्य सर्व जगाचे प्रत्ययास आणून दिलीं, व वयोवृद्ध अशा महाधुरंधर भक्तवेष्टित अहंमन्यांचें श्रुति, स्मृति, न्याय व युक्ति या चारही दिशांनीं पूर्ण खंडन करून धर्मध्वज भरत-खंडावर फडकावीत ठेविला, ज्या महात्म्याची ग्रंथमाला वेदतुल्य अजरामर राहील असा अनेक सन्मार्गीयांचा भरंवसा आहे, ज्यांची सामर्थ्यपूर्ण वाणी सांप्रतच्या पदार्थविज्ञान-सिद्धान्ताच्या प्रखर तेजानें मुळींच दबून न जातां त्याला उलट पोषकच झाली आहे, ज्यांचे विचार वाचतांना असा अलौकिक तत्त्वज्ञानी व बुद्धिमान् पुरुष जगांत झालाच नाहीं अशी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या वॅ ॲरिस्टाटल, प्लेटो, साक्रेतीस, कोंट, कॉंट, हेगेल, लीबनिट्झ, स्पेन्सर, अर्न्स्टहेकेल प्रभृति युक्तिवादी तत्त्वज्ञांचे विचारांनीं तयार झालेल्या वाचकांची मनःपूर्वक खात्री होते अशी निदान आमची श्रद्धायुक्त भावना आहे; त्या साक्षात् अपरोक्षात् ब्रह्म झालेल्या अथवा असलेल्या श्रीशंकराचार्यांच्या नव्हे प्रत्यक्ष शंकराच्या सत्य-निष्ठ, निरपेक्ष व अधिकारयुक्त कृतीवर सांप्रदायिक हटवादीपणाचा डांबराचा हात मारला जाऊन त्यायोगें उत्पन्न झालेला कलंक हा खरोखरीच त्या उज्ज्वल कृतींतील प्रधान व्यंग असावें असा अनेकांचा तर्क व्हावा ही कल्पना सुद्धां असंभवनीय वाटत होती परंतु निरुपायानें व दुर्दैवानें ती खरी होऊं पाहत आहे तस्मात् हें कालमाहात्म्यच समजलें पाहिजे.

हा किळसवाणा प्रयत्न एखाद्या उदरंभर, क्षुद्र व अविद्वान् लेखकाच्या हातून झाला असता तर त्याचें विशेष कांहीं वाटलें नसतें, किंबहुना हा प्रयत्न आमच्या दृष्टीसमोर सुद्धां आला नसता. परंतु रहस्य-संजीवनीकारांची तशी गोष्ट नाहीं. ज्या "परपुरुषास" त्यांनीं ग्रंथ समर्पण केला आहे तो "जनतात्मा" आहे. या जनतात्म्याची त्यांनीं आजन्म अखंड, निरपेक्ष व निःसीम सेवा केलेली असून त्या देवतेस त्यांनीं संतुष्ट करून तिजकडून वरप्रदान घेतलेलें आहे. त्यांनीं विद्यार्थी-दशा, प्रौढदशा व वार्धक्य या तिन्ही अवस्थांत लोकसंग्रहाचें कार्य अव्याहत केलें असून तेंच यज्ञयाग, तींच तपश्चर्या, तींच शमदमादि साधनसंपत्ति, तोच स्वाध्याय, तेंच वैराग्य, तेंच श्रवण, मनन, निदिध्यास अशा लोहकाष्ठभक्षण व देहदंडनमय साधनांनीं लोकसंग्रहाचें अजब व अपूर्व महत्कार्य केलें आहे. त्यांनीं आधुनिक पांडित्यांत श्रेष्ठत्व मिळवून राजकारणांत उत्साह व धैर्य यांचें बीजारोपण केलेलें आहे. त्यांची बुद्धिमत्ता अतिविशाल असून निश्चय, बाणेदारपणा, दीर्घोद्योग हीं अगदीं अलौकिक आहेत. त्यांचें ग्रंथनिरीक्षण एवढें विस्तृत व प्रचंड आहे कीं, त्यांच्या तोडीचे विद्वान् आधुनिकांत फारच थोडे सांपडतील. प्रतिभा व भाषाशैली हीं तर अगदीं अवर्णनीय आहेत. हा व अनेक इतर गुणांनीं रहस्य-संजीवनी-कारांना व त्यांच्या विचारांस अत्यंत महत्व आलेल आहे. कोणत्याही विषयावर त्यांनीं प्रकट केलेले विचार जनतेनें सिद्धान्तवत् मानावेत यांत कांहीं नवल नाहीं.

इतकेंच नव्हे तर प्रसंगोपात्त वेद अथवा श्रुति पौरुषेय आहेत अथवा श्रीशंकराचार्य प्रभृतींना खरा मार्ग ठाऊक नव्हता असें जरी त्यांनीं प्रतिपादिलें तथापि धर्माभिमानी, भक्तिपरायण व श्रद्धावन्त यांना सुद्धां रहस्यकारांना कांहीं दोष लावण्यापेक्षां वर सांगितलेली आपत्ति पत्करेल अशी वस्तुस्थिति आहे. अशा जनतांतःकरण-निवासी पुरुषानें केलेली कृति पूर्ण निर्दोष दिसावी, यांत आश्चर्य तें काय ! साधारण जनता ही आपल्या इष्टदेवतेच्या उपासनेंत अंध झालेली असल्यामुळें त्या देवतेच्या आचार, विचार व उच्चारांत कोणताही दोष पहात नाहीं. आजपर्यंत रहस्यकारांनीं धर्मविषयांत आपलें आचार्यत्व पत्करलें नव्हतें, त्यांनीं कधीं गुरुगृहीं राहून ब्रह्मचर्यव्रत पाळून वेदाभ्यास केला नव्हता, प्रत्यक्ष ब्रह्मदेवापासून अगर नारायणापासून आलेला गुरुशिष्यपरंपरागत श्रौतस्मार्त धर्म अवलोकन केला नाहीं, कोठें गिरिकंदरांत श्रीसमर्थ रामदासाप्रमाणें तपश्चर्याही केलेली ऐकिवांत नाहीं, कधीं श्रौत अगर स्मार्त अग्नीवरील अग्निकार्यें केलेलीं कोणास ठाऊक नाहींत, अथवा पातंजल योगाचें अभ्यासपूर्वक ज्ञान त्यांना असलेलेंही श्रुत नाहीं. अथवा आणखी एका प्रसिद्ध देशभक्तासारखें यांना श्रीकृष्णदर्शनही झालेलें कोठें उपलब्ध नाहीं. इतकेंही असलें तरी यांना श्रीमद्भगवद्गीतेवर धर्मस्थापना—नव्हे सत्यधर्मसंजीवनपर ग्रंथ लिहिण्याचा अधिकार आहे असें अज्ञ व श्रद्धालु जनतेस वाटावें हें स्वाभाविक आहे. त्यांनीं हा अव्यापारेषु व्यापार केला आहे हें समजण्याइतकी जनतेची बुद्धि तीव्र असणें शक्य नाहीं. हा गीतारहस्यस्फोट झाल्यापासून हिंदुसमाजावर कसा परिणाम झाला आहे याची कल्पना खालील सहज ऐकिलेल्या आगगाडींतील संवादावरून दिसून येईलः—

एक ब्राह्मण जातीचे अजमासें चाळिशीच्या वयाचे गृहस्थ (हे बहुधा इंग्रजी शाळेंत मास्तर असावेत) म्हणालेः—

" कायहो, असा अद्वितीय ग्रंथ आजपर्यंत निर्माण झाला नाहीं व पुढेंही कधीं होईल असें वाटत नाहीं. आम्हीं आजपर्यंत समजत होतों कीं, लोकमान्य बाळ गंगाधर हे कट्टे देशाभिमानी व मार्मिक लेखक व समाजधुरीण आहेत म्हणजे व्यवहारनिपुण आहेत; परंतु आतां तर असें स्पष्ट सिद्ध झालें कीं, हा महात्मा ब्रह्मनिष्ठ मुनि आहे अथवा आम्हांस आतांपर्यंत जी शंका होती कीं, हा कोणी तरी अवतारी पुरुष आहे ती अगदीं आतां खरी ठरली. "

दुसरे गृहस्थ बांकाच्या टोंकास खिडकीजवळ बसलेले होते (हे बहुतेक रेव्हिन्यु खात्यांत नोकर असावेत असें त्यांच्याकडील पट्टेवाल्यांच्या खेपांवरून दिसत होतें) ते म्हणाले, " अहो, या गृहस्थाचें तुम्हांस पूर्ण स्वारस्य समजलें आहे काय ! मला वाटतें समजलें नसेल. पहा मोठा कोणास म्हणावयाचें ! जो जनतेस बरोबर घेऊन आपण तरून जाईल तो मोठा, असें मला वाटतें. आजपर्यंत

परमार्थ म्हणजे एक मोठें अगम्य व अप्राप्य असें गूढ करून ठेविलेलें होतें. तें हातीं येण्यास अग्निविद्या प्राप्त करून घ्यावी लागे, सर्वसंग परित्याग करून एकाग्र चित्तानें तपाचरण करावें लागे, शमदमादि संपत्तीचें साहाय्य अवश्य लागे, नित्यानित्यविवेक असावा लागे, इतकें सर्व असूनही श्रद्धा अगर भक्ति हीं पाहिजेतच. नंतर पुन्हां गुरूची अपेक्षा ! सारांश, अशा गुह्याद्गुह्यतम विद्येचा अशा सोप्या रीतीनें सर्वांस लाभ करून देणारा प्राणी आजपर्यंत कोणीही झाला नाहीं. मुक्तिद्वाराच्या किल्ल्या आजपर्यंत सांप्रदायिक लोकांच्या हातीं होत्या, त्या फक्त विशिष्ट अशा अल्पसंख्याकांसच मिळत, इतरांना त्याची नुसती कल्पनाही होणें दुर्लभ ! "

गाडीच्या कोंपऱ्यांत बसलेला व पेहरावावरून सहज ओळखतां येण्याजोगा असा एक गांवढळ मनुष्य या पीयुषवत् वाणीनें चेहरा सतेज होऊन म्हणाला:—

'महाराज, तुमच कसबी व्हईल. पण आह्मास्नी काय हे गुपित दिलया काय ? तुकोबा सांगतोय "न मिळो सावया न वाढो संतान, परि हा नारायण कृपा करो" " साधकाची दशा उदास असावी उपाधि नसावा अंतर्बाह्य " तवा आमच्यासारख्यास्नीं असल खडतर तप कसल व्हणार ! तवा आह्मास्नी कांहीं टिळक महाराजांनीं सांगितलंया का ? '

दुसरे गृहस्थ म्हणतात:—" अरे बाबा, तुला त्या साधु पुरुषाची खरी योग्यता ठाऊक नाहीं. अरे त्यानें एकाच जातीला, वर्णाला अगर धंद्यास अगर देशास, कालास असा आपला दिव्य मार्ग उपदेशिला नाहीं. मुक्तीचें द्वार मोठ्या प्रयासानें सर्व वर्णांस खुलें करून ठाकलें आहे. शूद्र असो, ह्मार असो, चांभार असो, खाटिक असो, मुसलमान असो यहुदी असो, ख्रिस्ती असो किंबहुना मनुष्यप्राणी असो वा नसो (हें मात्र मी आपल्या पदरचें घालतों हां. पण मला वाटतें, त्यांचा हेतु अशा शब्दांनीं जरी व्यक्त झाला नाहीं तथापि त्यांच्या औदार्यबुद्धीकडे पाहिलें म्हणजे मनुष्येतर प्राणीसुद्धां घेतले पाहिजेत) सर्वांना मोक्ष सुलभ करून ठाकला आहे. "

गांवढळ म्हणतोः—काय महाराज ! तर मग लयी थ्वार माणूस ! आमास्नी काय कराय सांगितलय ?

दु० गृ०:—अरे साधनाचा खटाटोप कांहीं नको. तूं शेतकरी आहेस ना ! जा आपलाच उद्योग करीत रहा. त्यांत किमपि अंतर करूं नको.

गां०:—म्हणजे महाराज. पोरं बाळं समदीं संभाळून कोर्टात दाव्याचं काम करूनशान शेतकीचं काम करूं ?

दु० गृ०:—अरे वेड्या ! इतकेंसें काय पण जें जें ज्या वेळीं करावंसं वाटेल तें तें कर. पण मात्र एक ! हें मी करतों असा अभिमान धरूं नकों व जें करशील त्याचें

फल आपणास मिळालें पाहिजे अशी आशा धरूं नको. तुझें काम झालें. तुला मोक्ष खात्रीनें मिळेल.

प्रफुल्लित वदन झालेला तो धोंगड्या डोळ्यांत आनंदाचीं आसवें आणून म्हणतोः-" टिळक महाराजांच्या नांवानं चांगभलं ! " पण महाराज, मधी आपण काय म्हणाला ? शेतकीचं काम कर, पण फलाची आशा धरूं नको ह्ये कसं जमावं दादा ?

प० गृ०:-अरे धोंगड्या, आणखी हा मार्ग किती सुलभ करावा म्हणतोस ? एवढें सुद्धां हातून होत नसलें तर तूं मोक्षास अपात्र आहेस. हें पहा, वेळेवर जमिनीची कशमशागत करीत जा, बीं पेरीत जा, परंतु त्यापासून फलाची अपेक्षा करूं नकोस, पिक आलें बरें झालें न आलें तरी बरेंच,

गां०:- बेश दादा. ह्ये चांगलं झालं ! श्यात नांगराव, कुळवावं, बी पेरादं आनू पीक आलं तर आलं न्हाई तर न्हाई म्हणावं ? ह्यो मारग लयी बेश दिसतुया. असं व्हईल कसं ?

प० गृ०:-अरे मूर्खा, माझें उदाहरण सांगतों. मी वर्गात यापुढें बरोबर अकरा वाजतां जाईन. तेथें मुलांना पांच तास शिकवीन. पुढें तीं पास होवोत अगर नापास होवोत, त्याबद्दल मी त्याचा अभिमान धरणार नाहीं.

गां०:—हां तुमचं ठीक हाय. पोरं दुसऱ्याचीं फास झालीं तरीबी बरं नाफास झालीं, तरी बी बरं. आमचं तसं न्हाई. पीक आल नाहीं म्हणजे पहिली काळजी चावडीची मग पोटाची. पिकाची आशा सोडून कसं भागल दादा ?

दु० गृ०:—अरे मूर्खा, काळजी कसली करतोस. सारा दिला नाहीं तर सरकार जमीन विकील एवढंच ना ? त्यांत काय झालं ? दुसरें कांहीं तरी करावें व पोट भरावें. मोलमजुरी करावी. सारांश प्राप्तकर्म निरभिमानानें व आकांक्षारहित करावें. यापेक्षां कोणतेंही साधन जास्त सोपें सांपडणार नाहीं.

गां०:—दादा पाखरं तरी हाकावीं का !

दु० गृ०:-काय बेटा कुतर्क काढूं लागला आहे ! (प० गृ०स उद्देशून) काय ह्यो याबद्दल कांहीं रहस्यांत खुलासा आहे काहो ?

प० गृ०-मी खरें सांगूं, इतका खोल मी त्यांत गेलों नाहीं. मला सर्व ग्रंथ कळला आहे असें म्हणवत नाहीं. अहो, त्या ग्रंथांत प्रमेयें फार मोठीं आहेत. आणखी पांच चार वेळ वाचल्यास मी याचें उत्तर सांगेन.

दु० गृ०:—अहो कर्तव्याकर्तव्यतेचा जेव्हां जेव्हां मोह उत्पन्न होईल तेव्हां तेव्हां या ग्रंथाकडे धांव घ्यावी म्हणजे मोहाचा ध्वंस झाल्याविना रहाणार

नाहीं अशी तर आमची बोवा खात्री आहे. आतां पीक पोटरीस आल्यानंतर त्याचें पांखरांपासून संरक्षण करणें हाही शेतकीचा धर्म असल्यामुळें तोही निरपेक्षतेनें केला पाहिजे असेंच रहस्यग्रंथावरून सिद्ध होतें. समजा, धान्य पूर्ण झालेलें पीक एखादा चोर घेऊन जाऊं लागला तर "शठे शाठ्यमाचरेत्" हा न्याय लागू करण्यास रहस्यकारांची मुळींच हरकत नाहीं. तुकारामबुवासारखे पांखरांकडून पीक खाऊं द्यावें अगर येशू ख्रिस्ताप्रमाणें एका थोबाडींत मारल्यास दुसरा गाल पुढें करावा असें हें नवीन शास्त्र सांगत नाहीं. तेव्हां माझ्या मतें ह्या मनुष्यानें पक्षांचा प्रतिकार करणें गैर नाहीं.

गां०:—महाराज, हे समदं ठीक हाय. पण बघा आमच्या शेजारच्या शेतवाल्यानं एक कुरी आमच रान रेटून घेतलं तर मग आम्ही काय करावं ? सरकारदरबार करायला पाहिजे कीं नको. ह्या कुरी जमनीपायीं समदं शेत ह्या खटल्यांत जावं तवा दावा कुणासारखा तरी व्हईल तवा म्हणतो कसं ?

आतांपर्यंत हा चाललेला संवाद तटस्थरूपानें ऐकत बसलेले एक गृहस्थ मध्येंच म्हणालेः—" अरे बाबा, ह्यांत तुला एवढें कोडें कसलें पडलें आहे ! हा तत्त्वाचा प्रश्न आहे, दारिद्र्य आलें तरी पत्करलें परंतु तत्त्वहानि करावयाची नाहीं हा तर ह्या प्रवृत्तिमार्गाचा मुख्य धर्म आहे.

इतक्यांत एक नुकताच क्रिकेटचा सामना खेळून आलेले गृहस्थ म्हणालेः—

" अहो हें सर्व ठीकच आहे. पण माझा लहानपणापासून क्रिकेटचाच व्यासंग आहे. यावरच माझी लहानशी नांवाची नोकरी अवलंबून आहे. तेव्हां मला कसा मोक्ष मिळेल ! पूर्वीच्या शास्त्रांत क्रिकेटचें नुसतें नांव देखील नाहीं. "

नवे गृहस्थः—वः ! यांतच तर गीतारहस्याचें रहस्य व महत्व आहे. प्राप्त झालेलें कर्म मग ते कांहीं असो, कौशल्यानें केलें म्हणजे त्याचा दोष कर्त्यास लागत नाहीं. तेव्हां तुमचें क्रिकेट कर्म तुम्ही असेंच चालू ठेवा म्हणजे तुम्हांसही मोक्ष सुलभ होइल.

क्रिकेटपटुः—पण हा खेळ मोठा अभिमानाचा आहे. समजा, फल निरपेक्षतेनें मी फील्डिंग करण्यास उभा राहिलों. जीव तोडून पळाल्याशिवाय व मध्यें हात घालण्याचें साहस केल्याशिवाय चेंडू धरतां येत नाहीं. तेव्हां मी जर समदृष्टि करून जयापजयाची पर्वा न करिता केवळ प्राप्तकर्म ह्मणून स्थाणूसारखा उभा राहिलों तर खेळ कसा होईल ?

न० गृ०:—बरोबर आहे. पण गीतारहस्य काळजीपूर्वक वाचलें म्हणजे हेंही गूढ उकलतें. हें पहा क्रिकेटकर्म प्राप्त झालें म्हणजे तें " कौशल्यानें " ह्मणजे रहस्यकारांचे भाषेंत बोलावयाचें ह्मणजे " योग " युक्त केलें पाहिजे. क्रिकेट-

मध्यें जितकी सावधगिरी ठेवली पाहिजे तितकी ठेवावी, अगदीं कसून खेळावें परंतु आपला जय झाला ह्मणून हर्ष अगर अपजय झाला म्हणून विषाद मानला कीं बंधन आलेंच. तेव्हां असें करा म्हणजे झालें."

प० गृः–अहो मला वाटतें हें सर्वच अगदीं अप्रस्तुत आहे. अहो गीतारहस्यांतील हें कर्मकौशल्य आम्हांतुम्हांसाठीं नाहीं, हें ब्रह्मज्ञानी जो मनुष्य आहे त्याचेकरितां आहे हें विसरलांत वाटतें !

हें ऐकून सर्वच बुचकळ्यांत पडले. कांहीं वेळ सर्वच वाद थांबला. तेव्हां दुसरे गृहस्थ म्हणालेः—

'अहो हा ग्रंथ पुन्हा एकदां चांगला वाचला पाहिजे. ग्रंथ फारच गहन असल्यामुळें त्यांतील सिद्धान्त समजणें शक्य नाहीं. सर्वांनाच ही गोष्ट मान्य झाली व इतक्यांत स्टेशन आल्यामुळें मुख्य वावदूकांची फाटाफूट झाली.

या वरील संवादावरून जनतेंत या नव्या धर्मशोधानें कशी हुरूप, आशा व जागृति हीं उत्पन्न झालीं आहेत हें सहज दिसून येईल.

ग्रंथकारांचें ग्रंथालोचन कुशाग्रबुद्धि, भाषाशैली, अगाधस्मृति या सर्व गुणांबद्दल आम्हांसही अत्यंत आदर व पूज्यबुद्धि असल्यामुळें हा नवीन ग्रंथ आम्हीं मोठ्या आवडीनें व शक्य त्या तांतडीनें वाचला; परंतु या धर्मविषयांत मन सतत लोलुप असल्यामुळें पूर्वी झालेल्या ज्ञानसंस्कारांस एकाएकीं या वाचनानें धक्का बसल्यामुळें मन अत्यंत उद्विग्न झालें व

तर्कोप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम् ।
कर्मावरं ज्ञानमवृत्तिगम्यं अनिश्चितात्वागमधर्मलक्षणम् ॥

अशा सन्देहची नैराश्यवृत्ति उत्पन्न झाली. तथापि विचारांतीं मनानें असा निश्चय केला कीं, धर्मशास्त्राचीं वचनें प्रमाण मानावींत असा या नवीन ग्रंथकारांचा अधिकार नाहीं. रहस्यकारांच्या निर्लोभतेबद्दल आम्हांस तिळप्राय संशय नाहीं, त्यांच्या उज्ज्वल देशभक्तीबद्दल लवमात्र संदेह आमचे मनांत वसत नाहीं. त्यांचें संस्कृत व इंग्रजी ग्रंथावलोकन अद्वितीय आहे याबद्दलही विवाद नाहीं. परंतु कोणत्याही प्रकारचें चित्तशुद्धिकारक तप यांनीं केलें नाहीं; अथवा यांना सगुण अथवा निर्गुण साक्षात्कार झाल्याचा बोभाटा नाहीं. अशा स्थितींत समाजधारणेचा धर्ममार्ग घालून देण्याचा यांना यत्किंचित् अधिकार नाहीं. हें विधान बहुतेक आधुनिक पंडितांना अक्षम्य व हास्यास्पद् होईल हें आम्ही जाणून आहों. परंतु वैदिकधर्माचें पायाशुद्ध ज्ञान ज्यास झालें आहे तो, हजारों पाश्चात्य पदव्यांची सुगंधयुक्त माळ गळ्यांत बाळगणाऱ्या पंडितास धर्मकार म्हणणार नाहीं. डॉ० भांडारकर, ना० तेलंग, न्या० रानडे, मिसेस आनि बिझांट अशा सहस्रावधि पंडितंमन्यांनीं धर्माचे कामांत केलेली

ढवळाढवळ जरी अनेक मूढ व वेदानभिज्ञ लोकांनीं मान्य केली तथापि सनातन धर्मावर अधिकारयुक्तवाणीनें बोलण्याचा त्यांपैकीं एकासही अधिकार पोंचत नाहीं.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुधाश्रुतेन ।
यमैवेष वृणुते तेनलभ्यस्तस्यैष आत्मा वृणुते तनूस्वाम् ॥ कठोपनिषद् ॥

या श्रुतीमधील पहिल्या दोन्ही चरणांतील गुणांचें वास्तव्य परिपूर्णरीतीनें रहस्यकारांचे ठिकाणीं आहे हें आम्ही जाणून आहों; परंतु शेवटच्या दोन चरणातील गुणांनीं युक्त असलेला पुरुष या आधुनिक पंडितमालेंत सांपडणार नाहीं हें आम्हीं निश्चयपूर्वक सांगतों. वाचकहो, एकदम कोधवश होऊं नका. वैदिकधर्मावर मोठा अनर्थ गुदरत चालला आहे. हा काल वैदिकधर्मांचें पूर्ण अवनतीचा आहे. विनाशकाल आला म्हणजे मित्र, शत्रु, भाईबंद, आप्तेष्ट सर्वच मर्मभेद करूं लागतात. घरभेदे लोकांनीं परपक्षांस मिळून घात करण्यास सुरुवात केल्यावर मग विनाश होण्यास वेळ काय ? या पाश्चात्य उत्क्रांतिवादानें भूमंडलांतील अखिल पंडितांच्या मनावर हल्लीं असा कांहीं जबरदस्त परिणाम झाला आहे कीं, तो नाहींसा करणें फार कठीण अथवा अशक्य झालें आहे. " एकपेशी गोल पिंडकापासून उत्क्रांति होत होत या ईशमंदिररूपी मनुष्यदेहापर्यंत प्रगति जशी होत आली तशीच इतर प्राण्यांत, वनस्पतींत, आचारांत व विचारांत सर्वत्र प्रगति दिसून येत आहे. " या वादाच्या विरुद्ध कोणी ब्र काढिल्यास आधुनिक त्यास पंडितमंडळांतून बहिष्कार घालतील अथवा वैदिकांत श्रुतिप्रमाण न मानणारा जसा अधम अथवा पतित ठरेल तसाच उत्क्रांतिवाद खरा न मानणारा आधुनिकांत ठरेल यांत मुळींच शंका नाहीं. असो. या उत्क्रांतिवादानें आमच्या वैदिकधर्मावर सुद्धां परिणाम झाला आहे. उत्तरमीमांसेतील सिद्धान्त त्रिकाल अबाधित असल्यामुळें त्या सिद्धान्तांत या वादामुळें पालट होणें शक्य नाहीं. तथापि त्याही सिद्धान्तांचीं हल्लीं थिअासफीचे द्वारें कालानुरूप स्थित्यंतरें व रूपांतरें अधिकारयुक्त वाणींनें होऊं लागलीं आहेत. कसेंही असो, सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, या उत्क्रांतिवादानें धर्मविषयाससुद्धां सोडलें नाहीं. या विषयांत दिवसेंदिवस प्रगतीच होत जाणार व उत्तरोत्तर पूर्वीच्या तत्त्वज्ञानांत भरच पडत जाणार, या मताचा पूर्ण पगडा रहस्यकारांच्या मनावर बसला असल्यामुळें त्यांचे हातून वेदप्रामाण्यास मोठा धक्का बसला यांत नवल नाहीं. मंत्र, ब्राह्मण व उपनिषदें यांचा उत्क्रांतितत्त्वानुरूप कालशः क्रम व भेद लाविल्यामुळें इतिहासदृष्ट्या या त्रयींकडे पाहाणें सर्वांनी च सम्मत झालें आहे. यामुळें वेदांचें अनादित्व अर्थातच जाऊन त्यांचें स्वतःसिद्ध प्रामाण्य नष्ट झालें. श्रुतिप्रामाण्य नष्ट झाल्यावर धर्मांत तरी प्रामाण्य काय राहिलें ? मग वाटेल त्यानें वाटेल तें लिहावें. पुष्कळ वाचन व मनन असलें

म्हणजे स्वानुभवाची जरूर नाहीं. अशा तऱ्हेच्या कालांत रहस्यकारांना "आचार्य-" पदवी आमच्यांतील पंडितांनीं द्यावी हेंही स्वाभाविकच आहे. जैमिनीप्रणीत पूर्व-मीमांसेंत धर्माची व्याख्या " चोदनालक्षणोऽर्थो धर्मः " अशी केली आहे. व हेंच धर्माचें लक्षण निर्दोष आहे. वेद घ्या, बायबल घ्या, कुराण घ्या, धम्मपद घ्या, झेंदावेस्त घ्या, त्या त्या ग्रंथांत त्या त्या ग्रंथास प्रमाण मानणाऱ्या लोकांस केलेली आज्ञा हाच धर्म. या लक्षणापुढें कोणतेंही लक्षण निर्दोष दिसत नाहीं. मार्टिनो साहेबांनीं आपल्या " धर्माभ्यास " Study of Religion नामक ग्रंथांत धर्माचें लक्षण असें केलें आहें " By religion I understand the believer's worship of Supreme mind and Will directing the Universe and holding moral relations with human life. " (विश्वाचें धारणपोषण करणाऱ्या व जीवास नीतिनियमांनीं बद्ध करणाऱ्या अशा परमश्रेष्ठ चिच्छक्तिवरील भक्तांचा आदरयुक्त विश्वास अथवा श्रद्धा म्हणजे धर्म.) हें लक्षण मीमांसक व बुद्ध यांना लागू पडत नाहीं. तसेंच Spencer साहेब धर्म शब्दाचें व्याख्यान असें करितातः-"The Belief in a mode of life and power other than our own and a sense of the ultimate mystery of the universe " (भूतलावर प्रसिद्ध असलेल्या जीवकोटीहून व शक्तीहून भिन्न अशा उच्च जीवकोटीच्या व शक्तीच्या अस्तित्वावर श्रद्धा व विश्वाच्या गूढत्वा-विषयीं भावना) हें धर्माचें लक्षण व वर निर्दिष्ट केलेलें लक्षण व अशाच तऱ्हेच्या पाश्चात्य पंडितांनीं केलेलीं लक्षणेंही कदाचित् थिआसफीस मान्य होतील; परंतु तीं सर्व अप्रमाण मानणें भाग आहे. ह्या लक्षणांचा स्वीकार केल्यास धर्मास प्रमाण ग्रंथ मानण्याचें कारण रहात नाहीं. प्रत्येक व्यक्तीची भावना व श्रद्धा ही स्वतः-सिद्ध धर्म होऊं शकतील. मग सदर धर्माचें प्रतिपादन करण्यास प्रेषितांची अगर ऋषींची जरूरी नाहीं. सामान्यतः श्रेष्ठबुद्धीच्या व विचाराच्या मनुष्यास धर्म-मतांचा विचार करण्यास कांहीं हरकत रहाणार नाहीं. अगम्य व अतर्क्य अशा वस्तूविषयीं कल्पनेच्या जोरावर अनुभवशून्य वाटेल तीं प्रमेयें कोणा हवी त्यानें करण्यास सुभा झाल्यावर प्रत्येकजण धर्ममार्तंडच होऊन बसेल. अशी अनवस्था होणें केव्हांही रास्त नाहीं.

धर्म शब्दाचे रहस्यकारांनीं दोन भेद केले आहेत. एक व्यवहार अगर नीति व दुसरा अध्यात्म अगर मोक्ष. असे दोन विभाग करून मग श्रीभगवद्गीतेंत व्यव-हार व मोक्ष यांची सांगड कशी लाविली आहे हें दाखविलें आहे. व्यवहार व मोक्ष या दोहींचें कथन करणारा तो धर्म असें रहस्यकारांचें मत आहे. किंवा समाजाचें जो धारण करतो तो धर्म. आतां या लक्षणान्वयें पृथ्वी, अग्नि, वायु, इत्यादि पंचमहाभूतें इंडियन पोलुनकोडासारखे न्यायग्रंथ व एरवड्यासारखे तुरुंग हे सुद्धां

समाजाचें धारण पोषण करणारे असल्यामुळें त्यांसही धर्म म्हणण्यास प्रत्यवाय येणार नाहीं. असो, ज्यायोगें इहपर कल्याण होईल असा आचार मानवास घालून देणारी जी वेदाज्ञा ती धर्म होय असें आमचें नव्हे-सनातन वैदिक धर्मीयांचें मत आहे. भारतधर्म घ्या, भागवतधर्म घ्या, नारायणीयधर्म घ्या, वैष्णवधर्म घ्या, कोणताही भक्तिधर्म घ्या, त्यास आधार वेदाचाच धरलेला दिसून येईल. श्रीभगवद्गीतेवर आजपर्यंत झालेले टीकाकार पाहिले तरी सर्व वेदप्रमाण मानीत होते. वामनासारखे पंडित, मधुसूदनकारासारखें भक्तशिरोमणी, ज्ञानेश्वरासारखे महाज्ञानी अशा पुरुषांनीं या ग्रंथावर आपल्या वाणीचा यथाशक्ति प्रकाश पाडला हें ठीकच झालें. कारण त्या सर्वांची वेदावर अढळ श्रद्धा असून त्यांचे हातून जन्मांत परमार्थाशिवाय दुसरें कांहीं घडलेंच नव्हतें. अशांचे स्वैर आलाप हें सुद्धां उपदेशपर होतात असें योगवासिष्ठकारांचें मत आहे. आतां गणितशास्त्राचा अभ्यास, संस्कृत व इंग्रजी भाषेचा अभ्यास, ज्योतिषविद्येचा अभ्यास, कायद्याचा अभ्यास, वर्तमानपत्रें वाचणें व लिहिणें, राजकीय विषयांत पीठावर उभें राहून अस्खलित ताशेरा झाडणें इ० इ० गुण अथवा कृत्यें हीच जर वाचकांचे मतें परमार्थसाधनें संपत्ति असेल तर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. ती रहस्यकारांनीं जवळ जवळ पूर्णतेस पोंचविलीं आहेत. परंतु आमचे मतें ह्या विद्येचा " एकेन विज्ञातेन सर्वं विज्ञातं भवति " असा मुळींच प्रभाव नाहीं. यायोगें उलट अहंता, परमतासहिष्णुता, राग, द्वेष इत्यादि गुणांचा अथवा दुर्गुणांचा परिपोषच होतो हें सर्वांस सहज कळण्यासारखें आहे. रहस्यसंजीवनी ग्रंथ वाचतांना या गुणांचा ठिकठिकाणीं विकास झालेला वाचकांच्या लक्षांत आल्यांवाचून रहात नाहीं, याबद्दल यथावसर यथशक्ति पुढें विवेचन करण्यांत येईलच. मोक्षशास्त्र हें केवळ अनुभवात्मक शास्त्र आहे. याचे सिद्धान्त कोणत्याही प्रयोगशाळेंतील सामुग्रीनें पहातां येण्याजोगे नाहींत. सूक्ष्मतमदर्शक यंत्रानेंसुद्धां यांतील सत्यवस्तूचें परीक्षण करतां येण्यासारखें नाहीं. तर्कट विद्येचा या ठिकाणीं कांहीं उपयोग नाहीं. देहबुद्धीचा पूर्ण निरास होऊन, सर्व विश्व व तदन्तर्गत नानाविध वस्तू यांचा, मिथ्यात्वभासानें सर्वांशीं लय होऊनच मग अखण्डैकरस भूमास्वरूपाची ओळख पटते. त्याविना पटत नाहीं. आजपर्यंत झालेल्या टीकाकारांत कोणी द्वैती झाले, कोणी अद्वैती झाले, परंतु त्या प्रत्येकांस प्रत्येकांनीं केलेल्या विवेचनाप्रमाणें अपरोक्ष साक्षात्कार झालेला होता हें मशहूर आहे. श्रीकृष्णपरमात्मा हा उपास्य व आपण उपासक ही द्वैतभावना सोडण्याची कांहीं भक्तशिरोमणींची इच्छा नसल्यामुळें नानात्वनिरास करूनही भक्तिरसाचा आस्वाद सदैव घेण्याची या महाभक्तांची उत्कट वासना असल्यामुळें, फक्त सेव्यसेवकद्वयाशिवाय बाकी कोठेंही द्वैत पाहण्याची त्यांची स्थिति नव्हती. यामुळें द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, केवलाद्वैत, वगैरे पंथांत वस्तुतः भेद नसून तो आभासात्मक आहे, किंबहुना अधिकारपरत्वें मुमुक्षूस

क्रमशः नानात्वनिरास करण्याची सोपानपरंपराच या प्रकारभेदाचे मिषानें उत्पन्न केली आहे, असें विचारांतीं दिसून येतें. श्रीमधुसूदनसरस्वती या भेदांविषयीं म्हणतातः-

सर्वेषां प्रस्थानकर्तृणां मुनीनां विवर्तवाद-पर्यवसानेनाद्वितीये परमेश्वर एव प्रतिपाद्ये तात्पर्यम् । न हिते मुनयो भ्रान्ताः सर्वज्ञत्वात्तेषाम् । किन्तु बहिर्विषय-प्रवणानापाततः पुरुषार्थे प्रवेशो न संभवति इति नास्तिक्य-वारणाय तैः प्रकारभेदाः प्रदर्शिताः । तत्र तेषां तात्पर्यमबुद्ध्वा वेद-विरुद्धेऽप्यर्थे तात्पर्यमुत्प्रेक्ष्यमाणास्तन्मतमेवो-पादेयत्वेन गृण्हन्तो जना नानापथजुषो भवन्तीति सर्वमनवद्यम् ॥

वैदिकधर्मीतील नानामतमतांतरांविषयीं ही जी संगति श्रीमधुसूदनांनीं लाविली आहे ती किती यथार्थ व सहिष्णुतेची आहे हें सहज लक्षांत येईल.

या टीकाकारांच्या समूहाकडे पाहून या शर्यतींत आपणही पडावें असें रहस्यकारांना वाटलें, यांत त्यांची महत्वाकांक्षा स्पष्ट दिसते. यावर कांहीं लोक म्हणतील कीं, " ज्या पुरुषानें चारी वेदांचें भाष्य व भाषान्तरें वाचलीं आहेत, ब्राह्मण, उपनिषदें, श्रौतस्मार्तसूत्रें सार्थ समजून घेतलीं आहेत, त्या पुरुषास ह्या टीकाकारांशीं स्पर्धा करण्यास काय प्रत्यवाय आहे " या आक्षेपास एवढेंच उत्तर आहे, कीं, " आपण सूक्ष्मविचार करा. नीतिनियम, समाजाचें कल्याण, अकल्याण, अमुक प्रसंगीं व्यवहारांत कसें वागावें, नवीन उद्योगधंदे कोठें कसे काढावे, सरकारपाशीं काय दाद मागावी ह्या प्रश्नाबद्दल जेव्हां " जनते "स कोडें पडेल तेव्हां रहस्यकारांची वाणी पूर्ण अधिकारयुक्त म्हणून खुशाल लोक ऐकोत; परंतु ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं, या प्रश्नाचें कोणास गूढ पडल्यास त्यानें ब्रह्मनिष्ठाशिवाय कोणाकडे जाऊं नये " हें सर्वांना संमत होण्याजोगें आहे. ज्ञान म्हणजे ब्रह्मावगति; हें ज्ञान ज्यास झालें, तोच तदुत्तरकालीन मार्गाचा खरा दर्शक होय. ह्याबद्दलही आम्हांस वाटतें कोणी वाद करणार नाहीं. आतां प्रश्न एवढाच रहातो कीं, " रहस्यकारांना हें ज्ञान झालें आहे किंवा नाहीं. " हा स्वतःच्या अनुभवाचा प्रश्न असल्यामुळें त्याचें कोणासच उत्तर देतां येणार नाहीं. तें स्वतः रहस्यकारांनींच प्राजंलपणें सांगितलें पाहिजे. परंतु " ब्रह्म मला कळलें असें जो मनुष्य म्हणतो त्यास तें कळलें नाहीं. " अशा अर्थाची श्रुति आहे. एवढ्याच कारणावरून ते जर तसें प्रांजलपणें कबूल न करतील तर ती गोष्ट निराळी. आमचे मतें ब्रह्मविद्येंत अधिकार येण्यास नुसत्या वाचाळतेनें अगर मृतात्म्याशीं संवाद करण्याची कला साधली म्हणून काम भागत नाहीं, स्थूलसूक्ष्म देहाभिमानाचा सर्व प्रपंचासह विराम म्हणजे ब्रह्मविद्या अगर ज्ञानाचा उदय, असा त्या द्वयीचा संबंध आहे. धर्मजिज्ञासेच्या पूर्वी वेदाध्ययन अवश्य आहे असें " अथातो धर्मजिज्ञासा " या जैमिनीसूत्राच्या " अथ " शब्दावरून निष्पन्न होतें असें भाष्यकार

म्हणतात. " अथातो ब्रह्मजिज्ञासा " या बादरायणसूत्रांतील " अथ " शब्द साधनसंपत्तीनंतर असा घ्यावयाचा असें भाष्यकार म्हणतात.

आचार्य कोणास म्हणावें, याबद्दल स्वतः आचार्य सांगतातः-"आचार्यस्तूहापोह-ग्रहण-धारणशमदमदयानुग्रहादिसंपन्नो लब्धागमो दृष्टादृष्ट-भोगेष्वनासक्तः त्यक्त-सर्व-कर्मसाधनो ब्रह्मवित् ब्रह्मणि स्थितोऽभिन्नवृत्तो दम्भदर्प-कुहक-शाठ्य-माया-मात्सर्यानृताहंकार ममत्वादि दोषवर्जितः केवल परानुग्रहप्रयोजनो विद्योपयोगार्थी", (उपदेशसाहस्री) अर्थ स्पष्टच आहे. तथापि प्रतिपक्षस्थानभूत आचार्यांचें हें लक्षण अर्थात्च रहस्यकारांना मान्य नसणार. परंतु ब्रह्मविद्या कोणाकडून ग्रहण करावी, अशाबद्दल श्रुति आहे, " श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ अशा पुरुषाकडे समित्पाणी होऊन जावें " असा श्रुतीचा संकल्प आहे. एकंदरींत ब्रह्मनिष्ठासच हा अधिकार पोंचतो असें दिसून येतें. जर्मन कैसर, नेपोलियन, हँपडन, ग्लॅडस्टन, वॉशींगटन, हे केवढेही माठे पुरुष असले व कितीही लोकमान्य झाले तरी योगशास्त्रावरील अगर मीमांसाशास्त्रावरील त्यांचीं व्याख्यानें त्यांच्या अंधभक्तांखेरीज इतरांना श्रुतिवत् वाटणार नाहींत.

या ठिकाणीं कोणी शंका घेतील कीं, रहस्यकार हिंदु आहेत, साहेब नाहींत. अगाध विद्वत्तेच्या जोरावर त्यांना या विषयांत बोलण्याचा अधिकार आहेच. आम्ही असें म्हणतों कीं, होय. त्यांनीं आचार्य व ज्ञानेश्वर काय म्हणतात एवढंच तुलनात्मक विवेचन केलें असतें तर तें सर्वमान्य झालें असतें. अथवा भाषांतर करावयाचें अगर नवनीतमंथनाचें काम केलें असतें तरी तें उपलब्ध लेखकांत सरस ठरलें असतें. परंतु एवढ्याच " आयत्या बिळांत नागोबा " सारखें दुय्यमप्रतीचें कृत्य त्यांना नको आहे. स्वतंत्ररीत्या खननक्रिया करून नवीन भूमि शोधून काढल्याचें श्रेय घेण्याचें त्यांनीं मनांत आणिल्यामुळें हा " अधिकारयोग " उपस्थित करणें भाग आलें. या संग्रामांत त्यांनीं ब्रह्मनिष्ठांशीं चार हात करून त्यांना चित करण्याचा जो आव घातला आहे, त्यायोगें समर्पणपात्रिकेंत रहस्यकारांनीं विनयानें म्हटलेल्या " चापल " दोषास ते खरोखर अक्षरशः पात्र झाले आहेत.

मनुस्मृतींत धर्मकारांचा अधिकार वर्णन केलेला आहे.

तपो विद्या च विप्रस्य निश्रेयस-करं परम् ।
तपसा किल्मिषं हन्ति विद्ययाऽमृतमश्नुते ॥

अ० १२, श्लोक १०४.

प्रत्यक्षं चानुमानं च शास्त्रं च विविधा-गमम् ।
त्रयं सुविदितं कार्यं धर्म-शुद्धिमभीप्सता ॥ १०५ ॥

आर्षं धर्मोपदेशं च वेदशास्त्राविरोधिना ।
यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः ॥ १०६ ॥

.....

धर्मेणाधिगतो यैस्तु वेदः स-परिबृंहणः ।
ते शिष्टा ब्राह्मणा ज्ञेयाः श्रुतिप्रत्यक्ष-हेतवः ॥ १०९ ॥

—मनस्मृति. अ० १२.

वरील श्लोकांत वेदाध्ययन **धर्मानें** झालेलें पाहिजे हें लक्षांत घेण्याजोगें आहे. या श्लोकांवरील कुल्लूक भट्टांची टीका अशी आहे:—

ब्रह्मचर्यादियुक्त-धर्मेण यैरंगमीमांसा-धर्मशास्त्रपुराणाद्युपबृंहितो वेदोऽधिगतस्ते ब्राह्मणाः श्रुतेः प्रत्यक्षीकरणे हेतवः ये श्रुतिं पठित्वा तदर्थमुपदिशंति ते शिष्टा विज्ञेयाः ॥

अशा शिष्टांनीं सांगितलेला धर्म तोच श्रुतिस्मृतीचे आधाराभावीं धर्म होतो. परंतु अनधिकाऱ्यांनीं केलेला धर्मोपदेश मनूच्या मतें

यं वदंति तमोभूता मूर्खा धर्ममतद्विदः
तत्पापं शतधाभूत्वा तद्वक्तृननुगच्छति ॥ ११५ ॥

—अ० १२.

अशा तऱ्हेचा आहे इतकें जरी जुन्या धर्माभिमान्यांच्या मतें आग्रहाचें म्हणणें आहे, तथापि रहस्यकारांच्या हातून अनभिज्ञतेनें ज्या चुका झाल्या आहेत, त्या क्रमशः योगाधिकरणांत स्पष्ट करून दाखविणार आहोंत. त्यावरून तरी आधुनिकांना अधिकाराभावाची साक्ष पटण्याजोगी आहे. रहस्यकारांचा शोध चेचाळीस वर्षांच्या श्रमाचा आहे. सन्यासमार्गीयांचा अनंतकालाचा आहे. रहस्यकारांना बाळपणीं सुचलेली कल्पना तारुण्यांत वृद्धिंगत होत होत वार्धक्यांत पक्वतेस आली. संन्यास-मार्गीयांची बाळपणाची विश्वभ्रान्ति पूर्ण लयास जाऊन तूर्यावस्थेंत स्थिर झाल्या-वर त्या अवस्थेंतील स्वानुभवाचीं प्रमेयें श्रुत्यनुसार वाचेचें ऋण फेडण्यासाठीं म्हणून जगापुढें मांडण्यांत आलीं. नवीन शोध म्हणून नव्हेत.

ग्रंथलेखनाचें काम फारच झपाट्यानें झालें आहे, हें ग्रंथकारांच्या अद्वितीय बुद्धीचें व अविरत श्रमाचें द्योतक आहे. कार्तिक शु० १ ते फाल्गुन व० ३० पर्यंत ग्रंथाचा खर्डा पूर्ण झाला. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, अधिकाराभावामुळें

कलौ वेदान्तिनो भान्ति " **फाल्गुने बालका** " इव ।

—विद्यारण्य.

अशांतील अवस्था झाली आहे.

२ प्रयोजनयोग.

" प्रयोजनमनुद्दिश्य न मंदोपि प्रवर्तते ॥ "

आजपर्यंत गीतारहस्य संन्यासपक्षीय भाष्यांनीं नष्टप्राय झालेलें होतें. त्या रहस्याचें संजीवन करण्याचा जो हा द्रोणागिरीवहन प्रयत्न करण्यांत आला आहे त्याचें प्रयोजन पाहाण्याचें या अधिकरणांत योजिलें आहे. कोणतेंही प्रयोजन अभीष्ट नसतां मंदबुद्धि पुरुषसुद्धां कार्यास प्रवृत्त होत नाहीं, मग सुबुद्ध, विचारी व विद्वान् पुरुष प्रयोजनाबांचून एवढा खटाटोप कां करील ? हें रहस्यकारांचें प्रयोजन काय असावें हें ग्रंथांतच पाहूं गेलें असतां असें दिसून येतें कीं, ते लहानपणीं आपल्या वडिलांचे आज्ञेवरून भगवद्गीता वाचीत असतां त्यांना शंका आली कीं, अर्जुन हा ऐन संग्रामाच्या समयास म्हणजे दोन्ही पक्षाकडील दलें एकवटलीं असतां व शस्त्रास्त्रांची योजना अरिपक्षावर करण्याच्या तयारीस प्रत्येक वीर लागला असतां मध्येंच केविलवाण्या दीन स्वरानें अर्जुनानें श्रीकृष्णास विचारलें, " हे कृष्णा, ह्या पापमय युद्धापेक्षां मला भिक्षावृत्ति प्रत्करली, मला त्रैलोक्याचें राज्य नको, भोग नकोत, कांहीं नको. मी युद्ध करीत नाहीं" अशा भ्याड व अनार्यवृत्तीस आपल्या उपदेशामृतवाणीनें श्रीकृष्णांनीं नाहींसें करून अर्जुनास युद्ध करावयास लाविलें म्हणजे युद्धनिवृत्ति घालवून युद्धप्रवृत्ति उत्पन्न केली असें असतां जो उठतो तो गीता निवृत्तिपर व संन्यासपर आहे असें म्हणतो तेव्हां हें आहे तरी काय ! उपक्रम व उपसंहार या दोहींवरून अर्जुनाची संन्यासदीक्षेच्या अजागलस्तनवृत्तीपासून सुटका करून प्रवृत्तिपर बेडी त्याचे पायांत अडकविली असतां संन्यासपक्षीयांनीं उपटसुलासारखें श्रीकृष्णाचे माथीं निवृत्तिधर्मव्याख्यान कसें मारलें, ही शंका उत्पन्न झाल्यावर उत्तरोत्तर तीच वृद्धिंगत होऊन भगवद्गीतेचीं स्वतंत्ररीत्या पारायणें सुरूं केलीं. तेव्हां स्पष्ट दिसून आलें कीं, आचार्य व त्यांचे पाठीमागून झालेले सर्व भाष्यकार यांना व्यामोह होऊन उत्तानार्थ व उपक्रमोपसंहारसंगति यांचा विसर पडून भलतेंच निरूपण त्यांचे हातून झालें. ह्यापैकीं एकाही शाहाण्यास असें सुचलें नाहीं कीं, गीता सांगण्यापूर्वी अर्जुनाची स्थिति काय होती व पुढें ती सांगून झाल्यावर कशी झाली ? प्रत्येक जण उठला तो गतानुगतिक होऊन भाष्यकारांनाच वाट विचारीत जाऊं लागला. झालें ! आज बाराशें तेराशें वर्षें हाच क्रम चालू राहिल्यामुळें तोच प्रशुण्णमार्ग होऊन बसला व वडिलांनीं वार्धक्यदशेंत निवृत्तिपर हेतुच मनांत धरून गीता वाचण्यास आज्ञा केली, परंतु ह्या सर्व अंधपरंपरेस रहस्यसंजीवनीनें एकदम दिव्यज्ञानदृष्टि देऊन सिंहावलोकन

करण्यास लाविलें व हीं गेलेलीं बाराशें वर्षें धार्मिक इतिहासांत अंधकारयुगाचीं गेलीं असें भासविण्यास लाविलें, हेंच ह्या ग्रंथाचें प्रयोजन म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्यास बालपणीं सुचलेली कल्पनाच शेवटीं खरी ठरली व मोठमोठ्या पंडितांचीही दिशाभूल होऊन त्यांना गीतारहस्य समजलें नाहीं, हें दाखविण्याचा या ग्रंथाचा हेतु आहे. त्यांना समजलें नाहीं तर हा त्यांचा अज्ञानदोष होय. परंतु हा लहानसा दोष काढण्यांत तात्पर्य नाहीं. त्यांना समजलें होतें. परंतु त्यांच्या सांप्रदायास ही विचारसरणी प्रतिकूल असल्यामुळें त्यांनीं बुद्ध्या ती सोडून देऊन हटवादीपणानें निवृत्तिपर अर्थ गीतेंतून काढला म्हणजे श्रीकृष्णास असंबद्धता व अर्जुनास विपरीतग्रहण व स्वतःस जीवन्मुक्त दर्शक कमीपणा आणणारा हटवाद् या तीन दोषांचें खापर त्यांचे माथीं फोडलें, हें काय या ग्रंथानें सामान्य कार्य केलें!

आतां येथें साहजिकच असा प्रश्न उद्भवतो कीं, हें प्रयोजन व्यक्तिपर नसून समाजपर आहे. स्वर्गप्रयोजन मनांत धरून केलेले यज्ञयाग यज्ञकर्त्यास स्वर्गफल मिळवून देतात, इतरांशीं त्यांचा कांहीं संबंध असत नाहीं. यज्ञकर्त्याची भावनाच यज्ञकर्मांत पाहावयाची असते. परंतु हें वर दाखविलेलें प्रयोजन केवळ व्यक्तिगत नव्हे. या प्रयोजनाचा संबंध जनतेकडे असल्यामुळें जनतेची स्थिति कशी आहे हें पाहणें अवश्य आहे. हल्लींच्या ह्या आमच्या हिंदुसमाजांत लोकांचे धर्मदृष्ट्या सामान्यतः पांच वर्ग करतां येतील. आधुनिक पद्धतीनें शिक्षण मिळून भौतिकशास्त्रांतील अनुल्लंघ्य नियमांचें ज्ञान मिळून सारासारविचारानें "श्रुतिस्मृतिइतिहासपुराण यांतील विचित्र, काल्पनिक, कार्यकारणभावातीत, व अतिशयोक्तिपर वर्णनें, कथानकें, व्रतें, जप इत्यादि अज्ञानयुगांतील लोकांच्या विचारांचीं व आचारांचीं दर्शक आहेत, खरा धर्म हा नव्हे. अन्स्ट हेकेलसारख्या भौतिक शास्त्रज्ञानें जडाद्वैतपंथ काढला तोच खरा दिसतो अथवा दृश्य जगाच्या बुडाशीं बुद्धि अथवा चैतन्य आहे; परंतु तें चैतन्य जडवस्तूच्या आधाराशिवाय कधींच इंद्रियगोचर होणार नाहीं, अतएव तें अज्ञेय (Agnosticism) आहे. म्हणून मनुष्यानें या मृगजलाच्या पाठीमागें न लागतां समाज सुयंत्र चालण्यास जीं नीतिबंधनें अवश्य आहेत तीं सर्व पाळून सर्व मानवजातीच्या वट्ट सुखांत जेणेंकरून भर पडेल व दुःखसंबंध जेणेंकरून कमी करतां येईल त्या साधनांचा अवलंब करणें हेंच मनुष्याचें इहलोकीं कर्तव्य आहे. नहून आत्मज्ञान, निवृत्ति वगैरेसारखीं धर्ममूलक ध्येयें अजिबाद् सोडून देऊन उद्योगशीलता पत्करून संसार सुखमय करावा हा परमोच्च पुरुषार्थ आहे," असें मानणारा एक वर्ग आहे. या वर्गांत बहुतेक सुशिक्षितांचा समावेश होतो. आतां दुसरा वर्ग अर्धवट शिकलेल्या लोकांचा. धर्मग्रंथ अनेक असून ते अनेकपंथी आहेत. धर्मग्रंथांत आचरटपणा असून त्यांतील प्रवृत्तिपर व निवृत्तिपर दोन्ही मार्ग विचारशून्य आहेत, एवढेंच कळण्याइतकी

ज्यांची भौतिकशास्त्रनियमांची ओळख आहे अशांचा वर्ग. कोठें साधारण धर्म-विषयांची चर्चा सुरू झाली कीं, काय तुमच्या व्यासाचें भूगोलज्ञान, खगोलज्ञान, काय तुमच्या स्मृतिकारांची दिनचर्या ठेवण्याची आज्ञा, काय शुष्कव्रताची फल-श्रुति वगैरे वगैरेसारखीं निंदाप्रचुर उत्तरें देण्याइतकी ज्यांची विद्वत्ता अशांचा वर्ग. यांना विश्वाचें मिथ्यात्व व चैतन्यसत्यत्व याची कधीं कल्पना येण्याजोगें भौतिकशास्त्राचें अध्ययन मिळालेलें नसतें. आपल्या साधारण इंग्रजी ज्ञानाच्या भांडवलावर कोठें तरी नोकरी अगर धंदा करून अहोरात्र प्रपंच करून पोरा-बाळांचा व आपला गुजारा करण्याइतकेंच यांना शहाणपण असतें. सुशिक्षित वर्गांत अशांचाच भरणा अधिक. कर्मकांड समजण्याची अंगांत कुवत नाहीं, भक्तिरसाचा जिव्हाळा नाहीं, ज्ञानाचा तर गंधसुद्धां नाहीं, अशी या वर्गाची धर्म-शून्यवृत्ति बनलेली असते. तिसरा वर्ग म्हटला म्हणजे अशिक्षितांचा. हा वर्ग बहु-संख्याक असून परंपरागत देशाचार, कुलाचार, ग्रामाचार इत्यादि कसें तरी उरकून घेणारा असतो. दुःख किंवा अरिष्टनिवारण व्हावें, या हेतूनें देवाचें आरा-धन, देवास कांहीं तरी जीवदान अगर असेंच तामस, राजस दान करीत असतो. या वर्गास आपले चरितार्थाचे धंदे करून ज्ञानार्जन करणें दुरापास्त असतें. यांना जुनें खोटें वाटत नाहीं; परंतु नव्याचाही तसा संस्कार झालेला नसतो. चवथा वर्ग म्हटला म्हणजे जुन्या पद्धतीनें शास्त्राध्ययन केलेल्यांचा. यांना सर्व श्रुतिस्मृतीबद्दल आदरयुक्त अभिमान असून चालचलाऊ कर्में करण्यांत त्यांचे-कडून बहुधा कसूर होत नाहीं. परंतु त्यांना आधुनिक सुशिक्षितांना धर्मतत्त्वें समजून देण्याची शक्ति नसते. पांचवा वर्ग म्हटला म्हणजे ब्रह्मनिष्ठांचा. कलि-युगांत हिंदुस्थानांत असे पुरुष किती असतील, हें खानेसुमारीवरून ठरवितां येणार नाहीं. परंतु हा वर्ग इतका अल्पसंख्याक असावा कीं त्याची संख्या मोजण्यास एक किंवा फार झालें तर दोन हाताचीं बोटें पुरे होतील. ही वर्गवारी ठोकळ मानानें दिलेली आहे. आस्था, अनास्था, औदासीन्य या तिन्हींचा या पांच वर्गांत कमजास्त मानानें समावेश करतां येईल. एकंदरींत विचार करतां असें दिसून येतें कीं, हल्लींच्या मन्वंतरांत कोणता एखादा पंथ विशेष त्यांतल्यात्यांत जोरांत असेल तर तो भक्तिपंथ होय श्रीक्षेत्र काशी, प्रयाग, द्वारका, रामेश्वर, पंढरपूर वगैरे ठिकाणीं पाहिल्यास याची सत्यता सहज पटण्याजोगी आहे. परमेश्वराचें नाम-स्मरण, पादसेवन, वंदन इत्यादि भक्तीचे मार्ग विशेष जोरावले आहेत. याचें कारण वस्तुतः श्रीतुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ वगैरे संतमंडळीचा उपदेश हे होय. या भक्तमंडळींतसुद्धां ज्ञानार्थी सात्विक भक्त लाखांत एखादा. बाकीचे " आर्त किंवा अर्थार्थी " या वर्गातीलच असतात हें महशूर आहे. देवा-लयें बांधणें, धर्मशाळा बांधणें, विहिरी काढणें, अन्नछत्रें ठेवणें वगैरेसारखीं लोको-पयोगी कामें आपलें परत्र कल्याण व्हावें या हेतूनें अगर लोकांत वाजागाजा

व्हावा या हेतूनें म्हणजे लोकसंग्रहार्थ करणारे फार. व्रतें, वैकल्यें हीं फारकरून वृद्ध विधवा बायका करीत असतात. पुरुषवर्गात हल्लीं व्रतांचा, उपवासांचा, चांद्रायणांचा बहुतेक अभावच आहे म्हटलें तरी चालेल. पूर्वकालीन आश्रमधर्माची अगर वर्णानुचित कर्मे सर्व वर्णांनीं पूर्ण टाकलीं आहेत असें म्हणण्यास नड नाहीं. शहरांतील तर गोष्टच सोडा. कारण सुशिक्षितांचा भरणा तेथें फार असतो. परंतु खेड्यापाड्यांत जरी गेलें तरीसुद्धां कर्ममार्गाचा पूर्ण लोप झाल्याचें स्पष्ट दिसून येतें. स्नानसंध्यादि नित्यकर्म करणारे ब्राह्मण दृष्टीं पडत नाहींत. कोठें असल्यास संध्यावंदन–कर्माचें खरें रहस्य त्यांना अगदीं पारखें झालेलें. जिकडे पहावें तिकडे धर्मबाबतींत पूर्ण अनास्था दिसून येत आहे. कर्माची अशी स्थिति असतां ज्ञानाची अगर कर्मसंन्यासाची वार्ता तरी कोठून येणार ? चित्तशुद्धि काय पदार्थ आहे, स्वर्गापवर्ग हें काय बंड आहे, ब्रह्मदृश हीं काय चीज आहे या व अशा तऱ्हेची जिज्ञासा असणारे प्राणी प्रस्तुत कालीं फार थोडे सांपडतील. मिसेस ॲनि बिझांटबाई, विवेकानंद, ब्रह्मसमाजस्थापक अशांच्या इंग्रजी पद्धतीवर लिहिलेल्या तात्त्विक ग्रंथांतील सिद्धान्त वाचावयास मिळाल्यामुळें वर्णाश्रमधर्म हें थोतांड असून " ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः " एवढेंच काय तें सत्य आहे. जातिधर्म, वर्णधर्म, हे कृत्रिम बंध असून यज्ञयागादि कर्मे हीं मूढ, बंधकारक अतएव त्याज्य साधनें आहेत. त्यांचे नादीं लागणें म्हणजे कालाचा अपव्यय करणें होय, असें मानणारा अलीकडे सुशिक्षितांत बराच मोठा वर्ग आहे. पूर्वीच्या ऋषींनीं ही ब्रह्मविद्या फार गुप्त ठेविली होती, व सच्छिष्य मिळाल्याशिवाय तिचा त्यांनीं स्फोट केला नाहीं. अशिष्य, अश्रद्धावान् अशांस ही विद्या दिल्यास ती देणारा महापातकी समजला जात असे. नचिकेतास तिन्ही लोकांत दुर्लभ अशा सौख्यांचा लाभ एका क्षणांत करून देण्यास यमराज तयार असतां, त्या सर्व अनुपम सौख्यगणांचे ठिकाणीं नचिकेतानें पूर्ण निरिच्छता दाखविली, तेव्हांच यमराजांनीं त्यास ही ब्रह्मविद्या सांगितली एरव्हीं सांगितली नाहीं. इंद्रविरोचनांस गुरुजींनीं ही ब्रह्मविद्या सांगण्यापूर्वी दग्धकिल्बिषत्व येण्यास अथवा चित्तशुद्धि होण्यास अनेकदां तप करण्यास आज्ञा केली. पुन्हां पुन्हां असें घोर व दीर्घकालीन तपाचरण करण्यास शिष्यास लाविल्याचें हें श्रुतींतील उदाहरण वाचून आमचे नवीन ब्रह्मज्ञानी लोक संतापून जातील व समता, अप्रतिबद्ध व्यापार, विचारस्वातंत्र्य इत्यादि प्रगल्भ, उच्चतर अशा पाश्चात्य तत्त्वांचा विघात झाला म्हणून शिव्याशाप देऊं लागतील. दीपकशिष्याची कथा ऐकून तर या आधुनिक ब्रह्मवाद्यांच्या अंगावर कांटाच उभा राहील. असली अमानुष सेवा करवून घेणारा गुरु व तशी सेवा करणारा शिष्य हे दोघेही या ब्रह्म बोलणाऱ्या मंडळीस चतुष्पादकोटींतील असावेत असें वाटेल. सारांश, आयासाशिवाय खेळत खेळत व हांसत हांसत जर ब्रह्मैक्यभाव मिळूं शकतो तर देहदंडन, मनोदंडन करण्याचे श्रम कां

ध्यावेत, अशी भावना इतकी बळावली आहे कीं, वेदाज्ञा, वेदान्त, उपासना, मंत्रज्ञान, कडकडीत तपश्चरण, प्राणायाम, धारणा, समाधि इत्यादिकांचें शास्त्ररीत्या सद्गुरूकडून सेवन करून त्याप्रमाणें नैष्ठिक आचरण करून अपरोक्ष साक्षात्कार करून घेण्याइतका खटाटोप कोणास नको आहे. वेदांतील अन्तिम सिद्धान्त तेवढे खरे आहेत; परंतु बाकीचें सर्व झूट आहे, आपमतलबी पुरुषांचें वृथा अवडंबर आहे, असें समजणारा वर्ग दिवसेंदिवस वाढत चालला आहे. या पंडितांना मोक्ष किती सुलभ झाला आहे व यांत तूर्यावस्थेस किती लोक पोंचले आहेत हें समजणें कठीण आहे. परंतु आचरणांत मात्र वर्णभेद, आश्रमभेद, लिंगभेद यांचा निरास करण्याचे प्रयत्न अहोरात्र त्यांचेकडून चाललेले दृष्टीस पडतात. परंतु मानापमान, लहानथोर, लोभ, दंभ, अनृत, यांचा अभाव व अस्तेय व ब्रह्मचर्य इत्यादि ब्रह्मनिष्ठांचे अगर स्थितप्रज्ञ माणसांचे गुण ह्यांच्यांत दिसून येत नाहींत असें आम्हांस वाटतें. या बोकळलेल्या ब्रह्मज्ञानाशिवाय व सवंग झालेल्या गुरुशिष्यसंप्रदायाखेरीज ब्रह्मजिज्ञासा समाजांत कोठें उपलब्ध नाहीं. सोमयागासारखे याग पांच चार वर्षांनीं कोठें तरी विरळा झालेले ऐकूं येतात. श्रौताग्नि राहो, पण स्मार्ताग्नि घरीं ठेवून साधारण नित्यकर्में व स्मार्ताग्नीवरील कर्में करणारे ब्राह्मण नामशेष होऊं लागले आहेत. संध्याकर्मांतील प्रणवव्याहृति, मंत्राचमन, अघमर्षण, अर्घ्यप्रदान, न्यास, दिग्बंध, जप, गायत्रीमंत्र, उपस्थान इत्यादि साधारण विधि अर्थासह व मर्मासह अगर वर्मासह कोणास ठाऊक नाहींत. भूतशुद्धि, आसनविधि, प्राणायाम वगैरे बाबींचें तर नांवच नको. यायोगें संध्येचें खरें महत्व म्हणजे ब्रह्मचिंतन हें कोणास कसें समजणार ! ही एक नुसती कर्मठांनीं मनुष्याचे पाठीं कवाईत लावलेली आहे व ती विचारशील मनुष्यानें न केल्यास प्रत्यवाय नाहीं, अशी सररहा समजूत झाली आहे. संध्याकर्मासच मुळीं थांग नाहीं, तर भग गृह्याग्नीवरील सप्तसंस्था अथवा श्रौताग्नीवरील होम, इष्टि, यज्ञ वगैरेचें कोणास मुळींच ज्ञान नसल्यास नवल नाहीं. लौकिकाग्निकर्मांतील अग्न्याधान, आज्यसंस्कार, प्रणीताप्रणयन वगैरे साधे विधि व त्यांचीं नावें हीं वनस्पतिशास्त्रांतील वनस्पतिवर्गांच्या लॅटिन नांवासारखी अगर इंग्रजी औषधांच्या नांवासारखीं विचित्र वाटावीं यांत आश्चर्य तें काय ! ही नित्यकर्मांची दशा; मग नैमित्तिक, प्रायश्चित्त, काम्य यांची काय धडगत लागणार ! धर्मास नैमित्तिक कर्में अद्याप कांहीं अंशानें चालू आहेत ! परंतु तींसुद्धां वरवर पाहाणाऱ्यास देखील कवाइतीपेक्षां जास्त नीरस व जीवविहीन दिसून येतील. उपाध्यायें लक्ष असल्यास व यजमानाची तब्बेत असल्यास " आतां अपसव्य करावें " असा इशारा आल्याबरोबर त्याची बजावणी कशी तरी करण्यांत येते. परंतु हीं कर्में श्रद्धेपेक्षां रूढीच्या बलानेंच नुसतीं चाललेलीं आहेत व तीं कांहीं काल चालत रहातील असें वाटतें. सोळा संस्कारांपैकीं बरेचसे संस्कार नुसते स्मृतिगतसुद्धां नाहींत. अशा तऱ्हेच्या धर्मग्लानीच्या कालांत हा

धर्मादर्श रहस्यसंजीवनीमिषानें बाहेर आलेला आहे. ह्या धर्मग्लानीवर या ग्रंथाचे परिणाम काय होतील हें पाहावयास पाहिजे म्हणजे ग्रंथाचें समाजाशीं प्रयोजन काय आहे हें बरोबर लक्षांत येईल.

सद्गुरूंनीं कोणासही वाटेल कीं, हें " कर्मयोगशास्त्र " सद्यःकालीन धर्मग्लानीवर एक रामबाण उपाय निघाला आहे. कारण या ग्रंथांत कर्मयोगाचें सांगोपांग, यथाशास्त्र व नवीन शास्त्रानुसार विवेचन केलेलें असून, हें कर्मयोगशास्त्र श्रीभगवंताच्या प्रत्यक्ष मुखांतून निघालेलें असल्यामुळें व त्यावर लोकमान्य विद्वानासारख्या परम कुशल कारागिरानें कोंदण केल्यामुळें जनतेवर ह्या बहुमूल्य जडावाचा फार अनुकूल परिणाम झाला पाहिजे, म्हणजे अर्थात् कर्मविन्मुखता जाऊन जनतेचे ठिकाणीं कर्मपरायणता यावयास पाहिजे. कारण एक ठिकाणीं नव्हे, परंतु जेव्हां जेव्हां प्रसंग आला आहे तेव्हां तेव्हां " शास्त्रोक्त कर्में " "शास्त्रविहित कर्में " असा बिनचूक उल्लेख या ग्रंथांत केला आहे. चुकूनसुद्धां कोठें शास्त्रनिषिद्ध किंवा शास्त्रबाह्यकर्में निरपेक्षबुद्धीनें करावीं असें न म्हणण्याबद्दल खबरदारी घेतलेली आहे. परंतु कर्माभिमान्यांनो, हा तुमचा निव्वळ भ्रम आहे. तुम्हीं या ग्रंथावरून अशी अटकळ केली असेल कीं, लोकमान्यांनीं शास्त्रसम्मत कर्में फलाशेविरहित करण्यास आपल्या गंभीर वाणीनें सांगून कुमारिल भट्टासारखें अवतारकृत्य करून जगावर महदुपकार केले, परंतु वेदाभ्यासजडांनो, तुम्ही सर्वथैव फसलां बरें. कदाचित् तुमच्या कृतज्ञतेच्या भरांत लोकमान्यांनीं एक दोन ठिकाणीं स्पष्ट केलेले कर्माविष्करण तुमच्या चित्तांत रुजलें नसेल. कर्मयोगशास्त्र पहा. पान ५५ मध्यें शेवटच्या वाक्यांत पहा. " पण गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय याहून जास्त व्यापक असल्यामुळें गीताप्रतिपादनांत ' कर्म ' शब्दाचा अर्थ केवळ श्रौत अगर स्मार्तकर्में एवढाच संकुचित न समजतां त्याहून जास्त व्यापक घेतला पाहिजे. मनुष्य जें जें कांहीं करतो–त्याचें खाणेंपिणें, खेळणें, बसणें, उठणें, रहाणें, श्वासोच्छ्वास करणें, हंसणें, रडणें, वास घेणें ... ... इ० इ० (क्रियापदसमुच्चय) ... ... त्या सर्वांचा कर्म या शब्दांत भगवद्गीतेंत समावेश झालेला आहे. ... ... किंबहुना देहाचें जिवंत रहाणें व मरणें हींसुद्धां कर्मेंच आहेत. " पुन्हां " उपसंहार " पान ४८७ पहा. त्यांत " अर्जुनाप्रमाणेंच शेतकरी, सोनार, सुतार, लोहार, वाणी, उर्दाम, व्यापारी, ब्राह्मण, कारकून वगैरे सर्वांनींच आपापल्या अधिकारानुरूप आपले व्यवहार परमेश्वरार्पणबुद्धीनें चालू ठेवून जगाचें धारणपोषण केलें पाहिजे. ज्याला जो धंदा नैसर्गतः प्राप्त झाला तो त्यानें अशा प्रकारें निष्कामबुद्धीनें चालू ठेविला म्हणजे कर्त्याला त्याचें कांहीं पाप लागत नाहीं; कर्में तेथून सर्व सारखींच. दोष कर्त्याचे बुद्धींत आहे. " पुढें पान ४९१ पहा: " पण तेवढ्यावरून गीतेंतील नीतितत्त्वें चातुर्वर्ण्यरूपी समाजव्यवस्थेवरच अवलंबून आहेत असें कोणीं समजूं नये. "

याहीपेक्षां स्पष्टता पाहिजे असल्यास पान ४९२ पहा. " म्हणून तें सांगण्यास तत्कालीं लागूं पडणारें साहजिक उदाहरण या नात्यानें चातुर्वर्ण्याचा गीतेंत उल्लेख केलेला आहे. पण हा गीतेचा मुख्य भाग नसून चातुर्वर्ण्यव्यवस्था जर कोठें चालू नसेल किंवा लंगडी पडली असेल तर तेथेंसुद्धां तत्कालीं अमलांत असलेल्या समाजव्यवस्थेप्रमाणें समाजधारणपोषणाचीं जीं जीं कामें आपणास प्राप्त होतील तीं तीं लोकसंग्रहार्थ धैर्योत्साहानें व निष्कामबुद्धीनें कर्तव्य म्हणून करण्यासाठीं मनुष्य जन्मास आला आहे. " हें ४९२ पान समग्र वाचण्याविषयीं कर्मलोलुपांना आमची शिफारस आहे. हें विधान भगवद्गीतेस किती मान्य आहे याचा स्वतंत्र प्रकरणांत आम्ही विचार करणार आहों. येथें एवढेंच सांगणें जरूर आहे कीं, रहस्यकारांचें मते भगवद्गीतेंतील कर्मयोगशास्त्र हें नुसत्या हिंदूकरितां नसून सर्व जातीकरितां आहे. शास्त्रविहित कर्में याचा अर्थ निसर्गतः प्राप्त झालेलीं कर्में. मग तें कर्म कसलेंही असो. वर्णाश्रमधर्म हा एककालीन तत्कालोचित एक समाजव्यवस्थेचा प्रकार होता. तो सदैव चाललाच पाहिजे असा गीतेचा आग्रह नाहीं. कर्मवाद्यांनो, आतां झाली ना तुमची खात्री ! तुम्हीं जें कर्म म्हणून उराशीं बांधून घेऊन बसलां होतां व ठिकठिकाणच्या शास्त्रविहित कर्मनिर्देशानें भुलून गेलां होतां त्या काळजीपूर्वक जतन केलेल्या भावनेस यायोगें चांगला धक्का बसला कीं नाहीं ! लोकमान्य प्रस्तुत कालच्या धर्मग्लानीबद्दल खेदपर एक शब्दसुद्धां कोठें काढीत नाहींत. इतकेंच नव्हे, तर चालू असलेल्या समाजव्यवस्थेंतच ते आनंद मानून आपला कार्यभाग उरकून घेत आहेत. इतकेंच नव्हे, तर अशा निराशाजनक अश्रद्धाकालांतसुद्धां आशाकिरणांचा एक प्रचंडसमूह जनतेच्या अंतःकरणावर पाडून ते सर्वांस धीर देत आहेत. तेव्हां आतां अर्थातच हा ग्रंथ जुन्या कर्मठांकरितां अगर त्या जुन्यापुराण्या जैमिनीय कर्मकांडाकरितां नव्हे, हें निराळें सांगणें नको.

आतां कदाचित् संन्यासमार्गीय टीकाकारांचे निवृत्तिपर व्याख्यानामुळें समाज खाणेंपिणें बंद ठेवून बसला आहे, अगर श्वासनिःश्वासनिरोध करून बसला आहे. जगावें किंवा मरावें या विचारांत हॅम्लेटसारखा गढून बसला आहे. लोहारांनीं आपलें काम टाकलें आहे, कारकुनांनीं आपलें लेखणीरूपी गाण्डीव खालीं ठेविलें आहे म्हणून ह्या रुग्णरूपी माहात्म्यानें हजार बाराशें वर्षें खंड पडलेल्या प्रवृत्तिपर धर्माचें पुनरुज्जीवन अथवा संजीवन केलें म्हणावें ? परंतु वरच्यासारखी स्थिति कोठें दिसून येत नाहीं. मुलें रडत आहेत, हांसत आहेत, पाणी निम्न प्रदेशाकडे धांव घेतेंच आहे, पुष्पांचा वास येण्याची क्रिया अद्याप सुरूच आहे, यूरोपांत लढाई चालूच आहे, बारा वाहत आहे, मूढ गप्प बसतच आहे, सारांश संन्यासमार्गीयांच्या निवृत्तिपर भगवद्गीतेस न जुमानतां अथवा निवृत्तिपर गीतेची जाणीवही नसतांना लोकमान्यांनीं नमूद केलेल्या सर्व क्रिया यथाशास्त्र (According

to Laws of Science) अव्याहत चालू असतां हा ग्रंथ निर्माण करण्याचें प्रयोजन काय होतें ! बरें हीं कर्में राहूं देत. शास्त्रीय कर्में तरी या टीकाकारांनीं बंद पाडिलीं आहेत असें म्हणावें तर सर्व-स्वरूप-संन्यास घेतलेले आचार्य मुद्दां स्वतः आपल्या आश्रमधर्मांत रत असून जगास कित्ता घालून देत होते. शिवाय त्यांनीं ज्ञानोत्तर कर्मसंन्यास सांगितला म्हणून तत्पूर्वी म्हणजे ज्ञानप्राप्तीपूर्वी सर्वांनीं कर्म-त्याग केला अशी तरी वस्तुस्थिति आहे ! अशी जरी असती तरी तो दोष संन्यासमार्गीयाकडे नसून लोकांचा ग्रंथधारणशक्तीचा अभाव हाच दोषार्ह होईल. कारण त्यांनीं ज्ञानोत्तर कर्मत्याग सांगितला, परंतु तो लोकांनीं ज्ञानपूर्वकालीं केला, म्हणजे आचार्यमताच्या पूर्ण प्रतिकूल वागणूक झाली. तेव्हां अशा स्थितीचा प्रतिकार करण्याकरितां ही ग्रंथनिष्पत्ति नसावी असें वाटतें.

बरें सांख्यशास्त्र व वेदान्तशास्त्र लोकांस समजून सांगण्याकरितां ग्रंथप्रवृत्ति मानावी तर हें काम कित्येक धुरंधरांनीं केलेलें आहे, तथापि " आमुक्तेरामृतेः कालं नयेद्वेदान्त-चिन्तया " या स्मृत्युक्ति-अन्वयें केवल कर्तव्य म्हणून हा वेदान्त-विचार झालेला असेल असें समजून आम्ही प्रयोजनशोधनाच्या इतके पाठीं लागलों नसतों. परंतु मागें अधिकारयोगांत सांगितल्याप्रमाणें " शाब्दे परे च निष्णाते " अशासारखी ग्रंथकारांची स्थिति नसल्यामुळें त्यांचे आजपर्यंत रूढ असलेल्या सिद्धान्ताशीं विरोध आणणारे विचार अर्थात् कोणास मान्य होणार नाहींत हें ग्रंथकारासही मान्य असलें पाहिजे म्हणून नुसतें विहितकर्म म्हणून हा वेदान्त-विचार आहे हें संभवत नाहीं. शिवाय या वेदान्तविषयांत Free Thinking पूर्ण विचारस्वातंत्र्य ग्राह्य नाहीं. श्रुतिप्रमाण धरून, सर्व श्रुतींचा एक ब्रह्मपर समन्वय करून व तदनुसार स्मृतींचाही समन्वय लावून व दृश्यजग सदसद्-विलक्षण मायेचें आभासात्मक रूप आहे असा वेदान्तमार्ग आचार्यांनीं इहलोकीं स्थापून कायमचा बखेडा मोडून टाकला असतां पुन्हां हा नवीन वेदान्तविचार स्वतंत्ररीतीनें करण्याचें प्रयोजन नव्हतें.

हा ग्रंथ बहुजनसमाजाचे कल्याणार्थ आहे म्हणावें तर वर्तमानपत्रांतील चर-चरीत लेख जसें समाजास कळतील, तसाही हा ग्रंथ सर्वांना समजण्याजोगा नाहीं. आम्हांस वाटतें हा ग्रंथ फार थोड्या लोकांस पूर्णपणें समजेल. यांत तात्विक विचार बरेचसे पारिभाषिक संज्ञेंत असल्यामुळें, जरी ग्रंथ रसाळवाणीनें लि-हिला आहे, तथापि बहुजनसमाजास त्याची साकल्यैंकरून धारणा होणार नाहीं त्यांनीं हा ग्रंथांतील एवढेंच तात्पर्य समजेल कीं, आजपर्यंत मोठमोठ्या पंडितांनीं न केलेला शोध लोकमान्यांनीं केला, त्यांत फार ग्रंथांचे उतारे आहेत. पाश्चात्य तत्त्ववेत्तेमुद्दां यांत सोडलेले नाहींत. मोक्षमार्ग सर्वांस सारखा सुलभ करून दिला आहे; व मोक्षमार्गातील अवघट अडचणी दूर करून तो गोरगरीबांस, दीनपंगूस, पापी-

चांडालांस अगदीं निष्कंटक करून दिला आहे; हेंच जर ग्रंथाचें प्रयोजन असेल, तर तें मात्र चांगलें साधलें आहे खास ! यांत शंका नाहीं. परंतु ग्रंथकारांचे विद्याव्यासंग, अमोघ वक्तृत्व व सत्यजिज्ञासा इत्यादि गुण सर्वविश्रुत असल्यामुळें अशा अज्ञजनांच्या मान तुकावण्यानें ते अर्थांतच समाधान पावणारे नाहींत, हें उघड आहे.

बरें, जो मार्ग म्हणजे ज्ञानकर्मसमुच्चय आचार्यांचे मतें त्याज्य ठरला व बाराशें वर्षें ज्या मार्गाचें नांवसुद्धां निघालें नव्हतें, तो मार्ग पुन्हां रहाटीचा करण्याचें एवढें नडलें होतें तरी काय ? आचार्यांनीं गीताभाष्याचे प्रारंभींच म्हटलें आहेः—

तदिदं गीताशास्त्रं समस्तवेदार्थसारसंग्रहभूतं दुर्विज्ञेयार्थम् । तदर्थाविष्करणायानेकैर्विवृतपदपदार्थवाक्यार्थन्यायमप्यत्यंतविरुद्धानेकार्थत्वेन लौकिकैर्गृह्यमाणमुपलभ्याहं विवेकतोऽर्थनिर्धारणार्थं संपेक्षतो विवरणं करिष्यामि ॥

भावार्थः—हें गीताशास्त्र समस्त वेदार्थांचें सार आहे. याचा अर्थ समजण्यास फार कठीण आहे. याचा अर्थ अनेकांनीं पद-पदार्थ-विग्रह, वाक्ययोजना व आक्षेप-समाधान अशा लक्षणांनीं युक्त असा केला आहे, परंतु शास्त्रांचा दृढपरिचय नसलेले समुच्चयवादी गीताशास्त्राचा विरुद्ध व अनेक तऱ्हेनें अर्थ करीत असतात व तो अर्थ लोक खरा समजतात म्हणून मी पूर्ण विवेकपूर्वक गीताशास्त्राचें अर्थविवरण करणार आहें.

हे वृत्तिकार आतां उपलब्ध नाहींत, म्हणजे त्यांच्या वृत्ति हल्लीं कोठें उपलब्ध नाहींत, असें रहस्यकारही स्वतः सांगत आहेत. व याचें कारणही उघड आहे कीं, आचार्यांचें भाष्य झाल्यावर त्या जुन्या वृत्तींचें पूर्ण खंडन झाल्यामुळें त्या नामशेष झाल्या. तेव्हां या गतसंग्रामभूमीवर जाऊन गतासूंच्या अस्थि उकरून काढून त्यांत संजीवनीमंत्रानें जीवारोपण करून पुन्हां समुच्चयवादाचें फाटून नाहींसें झालेलें निशाण हातांत घेऊन नाचावयास लागण्याचें प्रयोजन आम्हांस तरी समजत नाहीं. बरें, हे मृतात्मे सजीव करून नाचवयास लावल्यानें परिणाम काय होणार ? त्यांचे प्रतिपक्ष-भूत वेदान्त-केसरी भूमास्वरूपांत निद्रिस्त असतां या नाचाचा काय उपयोग अथवा त्यांचे अनुयायी या आव्हानामुळें जरी बद्धपरिकर झाले तरी ह्या पिष्टपेषणरूपी वादाचा उपयोग काय ? आम्हांस वाटतें पराजितवीरांच्या श्वानांनीं संग्रामांतील प्रतिपक्षाच्या पवित्र अस्थि काढून त्यांची विटंबना करून शेवटीं आपल्याच पक्षानें जिंकली, असें समाधान मानून घेण्याइतकेंच हें आसुरी कृत्य आहे. असो.

हा ज्ञानकर्मसमुच्चय वाद तरी पूर्ववृत्तिकारासारखा आहे ? तोही नाहीं. कारण कर्मांचें व्याख्यान विस्तृतरूपानें वर दिलेल्या उताऱ्यांत दिलेंच आहे. अशा कर्मांचे वाली पूर्ववृत्तिकार खास असणार नाहींत. कारण त्या वेळची समाज-परिस्थिति चातुर्वर्ण्यात्मक होती. तेव्हां त्या संकुचित मर्यादेच्या बाहेर ते खास गेले नसले पाहिजेत. कारण आचार्य म्हणतात कीं, " त्या लोकांनीं केलेले अर्थ जनास मान्य होऊं लागले आहेत असें मला आढळून आलें आहे " तेव्हां यावरून तत्कालीन वर्णाश्रमविहित कर्मांचाच त्यांनीं अनुवाद केला असला पाहिजे. एरव्हीं तो अर्थ तत्कालीन लोकांस ग्राह्य झाला नसता. तेव्हां हा जास्त विस्तृत असा ज्ञानकर्मसमुच्चयवाद पुन्हां अहिमहींसारखा अधिक बलान्वित असा सजीव झाल्यामुळें तो अगदीं अनावर होणार हें उघड आहे.

कसाही विचार केला तरी या ग्रंथाचें समर्पक प्रयोजन काय आहे तें आम्हांस कळत नाहीं, असेंच म्हणणें भाग आहे. कोणी म्हणेल कीं, येशू ख्रिस्त हा ऐतिहासिक पुरुष होता कीं नाहीं, बायबल आधीं झालें कीं गीता आधीं झाली, ज्ञानदेव व ज्ञानेश्वर एकच असावेत, कां निरानिराळे असावेत, अशा तऱ्हेची वाङ्मयात्मक चिकित्सा व शोधकबुद्धि दाखविण्यास काय हरकत आहे ? होय, कांहीं हरकत नाहीं, परंतु हा वाद जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीनच अवस्थांतील प्रत्यक्ष व अनुमान यांचे साहाय्यानें जोंपर्यंत चालला आहे तोंपर्यंत आमचीही त्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु यापेक्षां निराळी अशी चवथी अवस्था प्राप्त झाल्यानंतर कम शिल्लक रहातें किंवा नाहीं, याबद्दल विधानें नुसत्या पूर्वग्रहास बळी पडून भाषाचातुर्यानें ठोकून देणें हें आमचे मतें साहस आहे. या प्रयत्नानें आचार्यांनीं निःशेष केलेला समुच्चयवाद पुन्हां उपस्थित करून, व आचार्यांनीं केलेल्या प्रयत्नास निष्फलता आणण्याचा यत्न करून, विनाकारण गुरुद्रोह पदरीं बांधून घेण्यासारखें आहे. आचार्यांशीं आपला मुळींच विरोध नाहीं, असें जरी त्यांनीं कितीही कंठरवानें सांगितलें तरी हा विरोध गीतारहस्य ग्रंथ हजारों मुखांनीं स्पष्ट वदत आहे तेव्हां त्याबद्दल शब्दच्छल करण्यांत आतां अर्थ नाहीं.

आतां पाश्चात्य धर्तीवर लिहिलेल्या नीतिग्रंथाची जर संस्कृतवाङ्मयांत उणीव होती ती भरून काढली पाहिजे अशी रहस्यकारांना चिंता पडली होती, तर तीं फार थोड्या श्रमानें भरून काढतां आली असती. " पुष्कळांचें पुष्कळ सुख " अथवा " सदसद्विवेक-देवता " अथवा " स्वार्थ साधून परमार्थ " अशा तऱ्हेच्या पाश्चात्य नीतिमूलतत्त्वापेक्षां आत्मसमतेचें तत्त्व उच्चतर आहे व हा आमच्या नीतिशास्त्राचा पाया आहे, हें एवढेंच निरूपण केलें असतें, तर तें आमचे मतें मुळींच गैर नव्हतें. आम्हांस वाटतें आमचा वेदान्तच अशा सर्व उज्ज्वल तत्त्वांचा सांठा आहे, हें दाखवितां येईल. भगवद्गीता हा वेदान्ताचाच आदर्श आहे.

बरें, हें नीतिनिरूपण तरी या ग्रंथांत कितीसें आहे ! या नीतिनिरूपणाचें सर्व सार वर निर्दिष्ट केलेल्या वाक्यांत आहे. या नीतिनिरूपणाकरितां एवढा ग्रंथ लिहिण्याचें कारण नव्हतें. आम्हांस वाटतें या नीतिग्रंथाची उणीव भरून काढण्याकरितांच कर्म शब्दाची एवढी विटंबना व ओढाताण केली आहे. कर्म म्हणजे सर्व व्यवहार व क्रिया असा अर्थ घेतल्याशिवाय पाश्चात्य नीतिमीमांसा या गीताशास्त्रांत अथवा मोक्षशास्त्रांत कशी मिळावी ? व तशी मीमांसा मिळाली तरच या देशाची या बाबतीतील काळीमा धुवून जाईल, एरव्हीं जाणार नाहीं. असा पक्का ग्रह रहस्यकारांचा झाल्यामुळें त्या ग्रहास अनुलक्षून ते अर्थ हुडकूं लागले व तशीं पदें त्यांना गीतेंत सांपडलींही. रडवा मोक्ष कांहीं उपयोगी नाहीं; तो खरमरीत असेल तरच उपयोगी, आमच्यांत मोक्षानंतर सुद्धां कर्तृत्व ठेवलें आहे हें पाश्चात्यांस दाखविण्याचा त्यांचा इरादा असावा. मोक्ष निवृत्तिपर नसून तो प्रवृत्तिपर आहे असें जगाचे निदर्शनास आणून देण्याचें या ग्रंथाचें प्रयोजन असावें. पण तेंही संभवत नाहीं. कारण आपल्या सात्विक मुलाच्या अंगांत द्वाडपणा नाहीं, याची दुसऱ्याचीं द्वाड मुलें पाहून व आपल्या स्वतःचा द्वाडपणाचा अभिमान जागृत होऊन कोणी एखादा बाप आपल्या गरीब मुलास बळेंच दारू पाजून त्याचेकडून द्वाडपणा करवील हें संभवत नाहीं.

परंतु ह्या ग्रंथाचें मर्म एवढा वेळपावेतों बाजूसच राहिलें. तें हें कीं, हा ग्रंथ बहुजनसमाजाकरितां नव्हे, अल्पसंख्यात्मक सुशिक्षितांकरितां नव्हे, पाश्चात्य पंडितांकरितां नव्हे किंबहुना सामान्य अगर श्रेष्ठ जनांकरितां नसून केवळ ज्ञान्यांकरितां आहे. भगवद्गीतेचा उपदेश अथवा नीति ज्ञानी झालेल्या पुरुषांकरितां सांगितली आहे. अज्ञजनांकरितां नव्हे. अर्जुन हा ज्ञानी होता, तो अज्ञानी असता तर भगवंतांनीं त्याला तसें स्पष्ट म्हटलें असतें. परंतु तसें कोठें भगवंतांनीं त्यास म्हटलेलें नाहीं. कर्मयोगशास्त्रांतील पान ३५१ मधील साधनवृक्षाचें मूळ पहा. तेथें आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर तुलनात्मक साधनविचार दिला आहे. त्यावरून हा गीतार्थ ज्ञानप्राप्तीनंतर लागू पडतो असें दिसतें. यावरून हा ग्रंथ इतरांचे उपयोगाचाच नाहीं. कारण समता झाल्याशिवाय फलाशा सुटणें शक्य नाहीं ब्रह्मज्ञानाशिवाय समता उत्पन्न होणार नाहीं. ह्याही दृष्टीनें या ग्रंथाचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण देशांत अशा खऱ्या ब्रह्मज्ञान्यांचा इतका सुळसुळाट तरी कोठें आहे कीं, जे आपल्या निषिद्ध निवृत्तिमार्गानें जगांत निवृत्तीचें खूळ पेरतील! बरें, असें जरी कोणी पुरुष रहस्यकारांना दिसून आले असतील तरी त्यांचे अध्ययनापुरत्या या ग्रंथाच्या थोड्या प्रती काढल्या असत्या तरी चालले असतें. अनधिकाऱ्यांच्या हातीं ग्रंथ जाण्याचें कारणच नव्हतें व उद्दिष्ट जनांसच तो देण्याची व्यवस्था झाली असती.

इतक्या जरी आमच्या प्रयोजनासंबंधीं शंका असल्या तथापि या ग्रंथानें सत्कार्य मुळींच केलें नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. कारण या ग्रंथाचे द्वारें पाश्चात्य तत्त्वज्ञानाशीं व इकडील तत्त्वज्ञानाशीं वाचकांचा चांगला परिचय झाल्याविना रहाणार नाहीं. ज्यांनीं वेदान्त अगर पाश्चात्य तत्त्वज्ञान मुळींच पाहिलें नाहीं त्यांना या एका ग्रंथांत अनेक तत्त्वांचा संग्रह केला असल्याचें दृष्टीस पडेल. अनेक सुविचारांचा व भाषासौंदर्याचा हा ग्रंथ एक निधिच बनून राहिला आहे, हें निर्विवाद आहे. या कृतीचा हा परिणाम झाला आहे म्हणून हेंच ह्या ग्रंथाचें प्रयोजन आहे असें म्हणणें अप्रशस्त आहे.

सारांश, ह्या ग्रंथानें सनातन धर्मसमजुतीचें पूर्ण उच्चाटन व्हावें असें ह्या ग्रंथाचें प्रयोजन नसलें तरी कार्य होईल हें निर्विवाद आहे म्हणून ही कृति सुंदर असली तरी सोन्याच्या सुरीकडून घात करून घ्यावयाचें मनांत नसल्यामुळें सुरी सोन्याची आहे हें जाणूनही तिचा प्रतिकार करणें हेंच रास्त आहे.

२ गुरुशिष्ययोग.

वाचकहो, आजपर्यंत अनेकदां तुम्हीं या भारतसंग्रामभूमीवर कल्पनेनें चार केला असेल, परंतु पुन्हां एकदां आपणास त्याच रणक्षेत्रावर नेणें भाग पडत आहे. साहजिकच आहे, त्या रणक्षेत्रावर अनेक वीरांच्या आहुति पडलेल्या असल्यामुळें त्या वीरांच्या वंशजांना पुन्हां पुन्हां तेथें जाऊन निरीक्षण करण्याचा मोह पडावा, अथवा जरूरी पडावी यांत नवल नाहीं. अर्जुन आपल्या सर्व सैन्यासह युद्धास सिद्ध झाला आहे, कौरव वीरही आपल्या दोस्तांसह सशस्त्र होऊन युद्धास उभे आहेत अशा प्रसंगीं एकाएकीं अर्जुन कावराबावरा होऊन शोकमोहांत चूर होऊन, आरब्ध कर्म टाकून देण्यास प्रवृत्त होतो, अथवा प्राप्तकर्मनिवृत्त होऊं पहातो व श्रीकृष्णास ज्ञानाच्या गोष्टी सांगूं लागतो. थोडक्यांत श्रीभगवद्गीतेचा हाच प्रसंग आहे. उपक्रम उपसंहार हे दोन्हीं नीट लक्षांत घ्या. युद्धापासून पराङ्मुख झालेल्या अर्जुनास युद्धोन्मुख करण्यांत आलें हें फल आहे. अथवा उपसंहार आहे असें असतां भगवद्गीता ही निवृत्तिपर कशी म्हणावी ! ही शंका. वाचकहो, प्रसंग फार सूक्ष्मबुद्धीनें निरखून पहा. शत्रुपक्षीयांनीं आपापल्या मुत्सद्देगिरीची, कर्तबगारीची व साहित्याची कमाल करून अमूल्य काल, संपत्ति व शांतता यांचा व्यय करून युद्धाची जय्यत तयारी केली. तसेंच आपणही मित्र राष्ट्रांस एकत्र करून जगड्व्याळ संभाराची कडेकोट तयारी करून समोर उभे राहिलों. शत्रूंनीं सतत बारा तेरा वर्षें कुरापत काढून आपली भूमितृष्णा व दायाद्द्रोह ह्यांची ज्योत प्रज्वलित करून नाना तऱ्हेनें उपमर्द व छल केला, विटंबना केली, मायावी रीतीनें घात करण्याचा प्रयत्न केला, सारांश शक्य तेवढ्या उपायांनीं वैराग्नीनें सारखा पेट घेण्याइतकीं कारणें उपस्थित केलीं व शेवटीं शिष्टाईस न जुमानतां उघड उघड युद्धास आव्हान केलें. अशा परिस्थितींत श्रीकृष्णांनीं अर्जुनाची निर्भर्त्सना करावी व अनार्य क्लैब्य पत्करल्यामुळें उपहास करून ज्ञानामृत पाजावें व त्याला ताळ्यावर आणावें याशिवाय दुसरा उपायच नव्हता. व कोणीही सूज्ञानें या वेळीं असेंच केलें असतें. आतां अर्जुनास हें क्लैब्य कां आलें यांचें अर्जुनाच्याच भाषेंत परीक्षण करूं.

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ॥

अ. १, श्लो. २७.

परम कृपाकुल होऊन खिन्नतेनें म्हणाला.

नच श्रेयोनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥

श्लो० ३१.

आपल्या बांधवांस रणांत मारून मला श्रेय मिळणार नाहीं असें दिसतें.

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्य-राज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५

मला हे मारणार आहेत, तथापि मी यांना मारण्याची इच्छा करीत नाहीं. त्रैलोक्याचें राज्य मिळणार असलें तरीही मारणार नाहीं. मग एका पृथ्वीच्या राज्याची गोष्ट कशास पाहिजे ?

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षय-कृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९

(प्रत्यक्ष) कुलक्षय करण्याचा दोष आम्हांस उघड दिसत असतां या पापापासून निवृत्त होण्याचें आम्हांस कां समजूं नये ?

बरें पुढें,

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४०
अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१
संकरो नरकायैव.....

कुलक्षय झाल्यास सनातन कुलधर्म नाहींसे होतात, धर्म नष्ट झाले म्हणजे सर्व कुलांत अधर्म माजतो, अधर्माचें साम्राज्य झालें म्हणजे कुलस्त्रिया दुष्ट होतात. स्त्रिया दुष्ट झाल्या म्हणजे वर्णसंकर होतो, वर्णसंकरानें नरकप्राप्ति होते इ०. वाचकहो सावधान असा. चित्तवृत्तींत खंड पडूं देऊं नका. कारण या ठिकाणींच प्रस्तुत वादाचें मुख्य वर्म आहे. एकदां शिष्यभूमिका व शिष्यजिज्ञासा चित्तांत पूर्ण दृढ झाली, म्हणजे मागला व पुढला संदर्भ म्हणजे उपक्रमोपसंहार तुमच्या बरोबर ध्यानांत येईल. अर्जुन स्वतःच या शिष्यवृत्तीचें वर्णन करीत आहेः—

कार्पण्य-दोषोऽपहत-स्वभावः ।
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ॥
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे ।
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं ॥

अः २ श्लो० ७.

आत्मज्ञानविहीन असल्यामुळें मी दीन व धर्माज्ञानमूढ होत्साता तुला शिष्य-वृत्तीनें शरण आलों आहें; तस्मात् मला उपदेश कर व निश्चितपणें माझें श्रेय कशांत आहे हें मला सांग.

(या श्लोकाचा रहस्यकारांचा अर्थ चुकीचा आहे म्हणून तो आम्ही घेत नाहीं. कार्पण्य या शब्दाचा अर्थ रहस्यकारांनीं दैन्य असा केला आहे. तरी बरेंच म्हणावयाचें. "कृपणस्य भावः कार्पण्यं" असा उत्तान्नार्थ करून कद्रूपणा, चिक्कुपणा असा अर्थ केला नाहीं हें भाग्यच समजावयाचें. कार्पण्य म्हणजे अक्षराज्ञान. या शब्दाची स्वतः श्रुतीनेंच व्याख्या केली आहे, तेव्हां ती पाहून तरी रहस्यकार शांत होतील असें वाटतें. परंतु तशीही खात्री नाहीं, कारण गीतेचा अगदीं स्वतंत्र-रीत्या अर्थ करण्याचा त्यांचा आग्रह असल्यामुळें हाच अर्थ त्यांना सम्मत होईल असें नाहीं. असो; श्रुति सांगते कीं—

" यो वा एतदक्षरं गार्ग्य विदित्वास्माल्लोकात्प्रैति स कृपणः "

बृहदारण्यकोपनिषद् ब्रा० ८ श्लो. १०.

अर्थ—हे गार्गि जो या अक्षरास (अक्षर-प्रभाव-वर्णनांत ही श्रुति पठित आहे) न जाणतां हा लोक सोडून जातो त्याला कृपण म्हणतात.

तेव्हां अर्जुन स्वतः म्हणतो कीं, मी अनात्मवित् आहें, मी धर्मसंमूढ झालों आहें मला शिकीव. श्रीकृष्णही त्यास तसेंच समजत आहेत. कारण ते म्हणतात–

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञा-वादांश्च भाषसे ।

ज्याबद्दल दुःख करण्याचें नाहीं, त्याबद्दल दुःख करीत आहेस व पंडिताच्या गप्पा मारीत आहे. या पंक्तीवरील शांकरभाष्यांत म्हटलें आहे.

" मौढ्य च पांडित्यं विरुद्धमात्मनि दर्शयसि । पंडिता नाम पण्डात्मविषयाबुद्धिर्येषां ते नानुशोचन्ति तस्मादर्जुनोऽपण्डित एव

मौर्ख्य व पांडित्य या दोहींचें एकाच काळीं अर्जुन आविष्करण करीत आहे. कृतींत मौर्ख्य म्हणजे अशोच्याविषयीं शोक, व उक्तींत पांडित्य धर्मवाद सांगत आहे. परंतु अर्जुनानें केलेली शोकाची कृति पंडित कधींही करणार नाहींत. म्हणून अर्जुनाच्या बडबडींतील पांडित्य खरें नसून कृतींतील मौर्ख्यच खरें असें न्यायसिद्ध अनुमान आचार्य करीत आहेत.

पुढील विचार करण्यापूर्वी येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, श्रीकृष्ण परमात्मा हा स्वतः नारायण व अर्जुन हा स्वतः नर असतां हे गुरुशिष्यपण अथवा ज्ञाना-

ज्ञान कसलें? अशी शंका येऊं देतां कामा नये. व्यासांनीं एकास शिष्य व दुसऱ्यास गुरु केलें आहे. व्यवहारदृशेंत अर्जुन हा इतर व्यावहारिकाप्रमाणें शोकमोह व्याकुल होत आहे व श्रीकृष्ण त्यास उपदेश करीत आहे. वास्तविक पाहिलें असतां या नरनारायणास इतकाही उपद्व्याप करण्याचें प्रयोजन नव्हतें. लीलामात्रेंकरून कौरव क्षणांत नष्ट करून अभीष्ट त्यांना साधतां आलें असतें. तेव्हां या ठिकाणीं नरनारायणांचें मूळ स्वरूप विवक्षित नाहीं. आत्मा जसा मूळ ब्रह्मस्वरूपीच आहे तथापि मायावश होऊन भ्रमिष्ट होतो व आपणास किंचिज्ज्ञ व मर्त्य जीव असें मानितो तद्वत् हा नर या अर्जुनावतारांत इतर देहवानांसारखा अनेक वेळां शोकमोह पावतो, क्रोधवश होतो, कामवश होतो तेव्हां त्याच उपाधिगत अर्जुनास या वेळीं अज्ञानी म्हणणें हेंच रास्त आहे. शिवाय ज्या भूमिका त्यांनीं घेतलेल्या आहेत, त्या भूमिकेच्या चरित्राकडे लक्ष देणें हेच शिष्टाचारास धरून आहे. पुढें अर्जुन काय म्हणतो पहाः—

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥

अ० २ श्लो० ५४.

केशवा, स्थितप्रज्ञ कोणास म्हणावें ? समाधिस्थ कसा ओळखावयाचा ? स्थितधीचें लक्षण काय ? तो कसा बोलतो, बसतो व चालतो ?

ह्या प्रश्नांवरून अर्जुनाचा अधिकार अथवा पत्करलेली भूमिका काय आहे ती पहा. कसें एखाद्या अज्ञजनाप्रमाणें प्रश्न करून त्याचीं उत्तरें श्रीकृष्णापाशीं अर्जुन मागत आहे. तसेंच पुढेंः—

व्यामिश्रेणैव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोहमाप्नुयाम् ॥

अ० ३ श्लो० २.

"असल्या दुटप्पी बोलण्यानें माझ्या बुद्धीस मोह पाडीत आहेस (हें चांगलें नाहीं) याकरितां श्रेयस्कर असें निश्चयेंकरून काय तें एक सांग" या ठिकाणीं अर्जुन अगदीं इतर अज्ञानी जीवाप्रमाणें जिज्ञासु, तीव्र जिज्ञासु होऊन विचारीत आहे हें उघड आहे. पुढेंः—

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥

अ० ३ श्लो० ३६.

कोणाच्या प्रेरणेनें पुरुष पापाचरणास इच्छा नसतांही बळेंच प्रवृत्त होतो, तें मला सांगा. तसेंच पुढें:—

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन् ।
केषु केषु च भावेषु चिन्त्योसि भगवन्मया ॥
विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥

"तुझें सदा चिंतन घडून तुला मी कसा ओळखीन. तुझें ध्यान कोणत्या भावानें केलें पाहिजे. स्वतःचा योग व विभूति हीं मला विस्तारें करून सांग. पुनः पुनः ही अमृतवाणी ऐकली तरी तृप्ति होत नाहीं."

या व अशा साधारण संसाररत अज्ञानी जनाप्रमाणें जर अर्जुन प्रश्न विचारीत आहे तर त्यानें लावलेला रंग व घेतलेला वेष बाजूस सारून त्याला त्याच्या मूळ स्वरूपांत पाहणें हें नाट्यशास्त्राचे विरुद्ध असून अरसिकतेचें द्योतक आहे.

भगवानही त्यास मूढशिष्यभावानेंच जाणीत असतात. ते म्हणतातः—

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९
स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६०

अ० १८.

मी युद्ध करीत नाहीं असें तुझ्या बुद्धीनें घेतलें हें तुझ्यामधील अहंकाराचें फल आहे. हा तुझा निश्चय वृथा आहे. तुझा स्वभावच तुला तें युद्ध करावयास लावील, आपल्या स्वभावजन्य कर्मानें तूं बांधला गेला आहेस. मोहानें जें तूं करीत नाहीं म्हणतोस तें तुला परवश होऊन (प्रकृतिवश होऊन) करावें लागेल.

या ठिकाणीं भगवानांनीं अर्जुनाचेठायीं, अहंकार, प्रकृतिवशता व मोह हे तिन्ही दोष मानिले आहेत. याशिवाय अ० ६।३४ वगैरे पुष्कळ आधार देतां येतील. परंतु रहस्यकार तसें समजत नाहींत. गीतारहस्य पा० ३०८ पहा. "कित्येक किरकोळ संन्यासमार्गीयांचें यांवर असें म्हणणें आहे कीं, गांतेंत अर्जुनास कर्में करण्याचा उपदेश आहे हें खरें; पण हा उपदेश अर्जुन अज्ञानी असल्यामुळें चित्त-शुद्धिकारक कर्में करण्याचा त्याचा अधिकार होता ही गोष्ट लक्षांत ठेऊन भगवंतांनीं केलेला आहे. सिद्धावस्थेंत भगवंताचे मतें कर्मत्यागच श्रेष्ठ होय" असा उपन्यास करून पुढें म्हटलें आहे.

" परंतु सामान्य लोक असल्या भ्रामक युक्तिवादानें फसून जाऊं नयेत ह्मणून येवढेंच सांगतों कीं " तूं अज्ञानी आहेस ह्मणून तूं कर्में कर " असें अर्जुनास स्वच्छ शब्दांनीं सांगण्यास श्रीकृष्णास कोणतीही भीति बाळगण्याचें कारण नव्हतें....."

वाचकहो, आपणच विचार करून पहा कीं भगवंतानीं ठिकठिकाणीं अज्ञानीपणा अर्जुनाचे पदरांत स्पष्ट बांधला असतां तो " कर्मण्येवाधिकारस्ते " य वाक्यापूर्वीच भगवंतानीं कां घातला नाहीं हें म्हणणें सयुक्तिक आहे काय ? असो. अर्जुनाचा अधिकार काय होता हें वरील श्लोकांचे अवतरणावरून स्पष्ट व सहज लक्षांत येईल.

आतां अर्जुन आधींच युद्धास प्रवृत्त झाला होता. आपल्यास कौरवांशीं संग्राम करणें नको अशा तऱ्हेची भ्याड व भागुबाईपणाची त्याची वृत्ति कायमची नव्हती. तसें असतें तर इतका अठरा अक्षौहिणी संख्याक सैन्याचा जमाव जमण्याचें कारण नव्हतें. सर्व तऱ्हेचे लष्करी उपाय योजून झाल्यानंतर सर्वांच्या पूर्ण विचारांतीं युद्ध करण्याचें ठरलें. अर्जुन युद्धास कधींच कचरणारा नव्हता. तेव्हां युद्ध करूं का नको करूं हा प्रश्न केव्हांच सुटून गेला होता व म्हणूनच दोन्हीं दळें एकवटलीं होतीं. इतकेंच नव्हे परंतु अर्जुनाचें युद्धौत्सुक्य इतकें तीव्र झालें होतें कीं त्यानें भगवंतास रणांगणांत सांगितलें:—

.....

सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१
यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मयासह योद्धव्यमस्मिन् रण-समुद्यमे ॥ २२
योत्स्यमानानवेक्षेहं य एतेऽत्र समागताः ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३

अ० १.

हे अच्युता, माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्याभागीं नेऊन उभा कर (म्हणजे आमचे सैन्याच्या अघाडीस ने). एकदां मला युद्धकाम होऊन सज्ज झालेल्यांस पाहूं दे. मला या रणांत कोणकोणाशीं लढावयाचें आहे तें जमलेल्या योद्ध्यांत पाहून ठेवतों. दुर्बुद्धि धार्तराष्ट्राचें कल्याण करण्यास तयार असलेल्यांना एकदां पाहतों.

पहा अर्जुनाच्या मनाची स्थिति कशा प्रकारची झाली आहे ! बाहु स्फुरण पावूं लागले आहेत. भावि रणयज्ञांतील वध्य वीरांना एकदां डोळाभर पाहून घेण्यास नेत्र अगदीं विस्फारित झालेले आहेत, व " दुर्बुद्धि दुर्यो-

धनाचे " दुष्ट स्नेही म्हणण्याइतकी धार्तराष्ट्रपक्षाची चीड मनांत जागरूक असून त्या वृत्तींत धडाक्यानें रथ समोर नेऊन उभा केला आहे. यावरून युद्धाचा बेत आतां नवीन नाहीं हें सांगण्याचें कारण नाहीं. पूर्ण विचारांतीं युद्धाची द्वाही दिल्यानंतरच हें क्षणमात्र टिकणारें मनोयुद्ध अर्जुनाचे हृदयांत उत्पन्न झालें आहे. म्हणजे युद्धप्रवृत्ति झाली असतां त्या प्रवृत्तीस प्रतिबंधक शोकमोह उत्पन्न झाल्यामुळें त्या प्रतिबंधाचें श्रीकृष्णांनीं निवारण केलें असें आचार्य म्हणतात व तें किती सयुक्तिक आहे हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईलच. हीच भगवद्गीता जर युद्धाचे तयारीच्या आधीं अर्जुनास मोह पडून सांगितली असती व त्याबोगें अर्जुन युद्धास प्रवृत्त झाला असता व लढाईची तयारी केली असती तर हे गीताशास्त्र प्रवृत्तिपर आहे असें निर्विवाद झालें असतें. ज्यापासून धड प्रेय (ऐहिक सुख) नाहीं, श्रेय (कैवल्य) नाहीं अशा क्षुद्र हृदयदौर्बल्याचा त्याग करवून प्रवृत्तिप्रतिबंध दूर केला हेंच गीतेचें प्रयोजन आहे.

शिवाय समजा कीं, दोन मल्लांचें मल्लयुद्ध ठरून दोघांनाही खुराक मिळून बरेच दिवसांची तयारी करून गांवोगांव मल्लयुद्धाचीं प्रसिद्धिपत्रकें जाऊन प्रेक्षकांची गर्दी जमली आहे; भव्य लक्षडकोट उभारला असून प्रेक्षकजन मल्लयुद्ध पाहण्यास उत्सुक झाला आहे; परंतु एका मल्लानें आपल्या वस्ताद्दास सांगितलें:-" वस्ताद्जी मला ही कुस्ती नको. त्या मल्लास मीं पाडलें तरी इतक्या प्रचंड जनसमूहांत त्याची अपकीर्ति होणार. शिवाय कदाचित् मी पडलों तरी माझी होणार. तेव्हां मी ही कुस्ती करीत नाहीं." अर्थात् अशा वेळीं वस्ताद् काय सांगेल ? आपल्या कपाळावर हात मारील व म्हणेलः- " अरे बेटा हें मला आधीं कां सांगितलें नाहींस ? म्हणजे मीं इतकी तयारी तरी केली नसती. आतां असें करणें चांगलें नाहीं. मर्दांचा हा धर्म नव्हे. असें करूं नको. " अथवा अशी कल्पना करा कीं लग्नसमारंभाची सर्व तयारी होऊन हजारों वऱ्हाडमंडळ जमलेलें आहे. लग्नघटिका जवळ आली आहे. परंतु नवरदेव म्हणाले कीं, " मुलगी कुरूप आहे. मी करून घेत नाहीं. अथवा सासऱ्यानें माझी अमुक हौस पुरवावी तर मी लग्नास उठेन; नाहीं तर नाहीं. " तर अशा वेळीं वृद्ध पोक्त माणसें म्हणतील कीं " बाबा, ही तुझी अक्कल लग्न ठरवितांना कोठें होती ? त्या वेळीं तूं मुलीस पाहिलीस, वरदक्षिणा ठरविलीस, आणि आतां हें काय मौर्ख्य आरंभिलें आहेस. चल ऊठ लग्नास तयार हो. " या दोन्ही दाखल्यांत मल्लयुद्ध व लग्न दोन्ही गोष्टींची तयारी पूर्वीच झालेली होती. क्षणेक विरोधात्मक वृत्ति मध्येंच उठली होती तिचा निरास फक्त करावयाचा होता.

रहस्यकारांचा मुख्य कटाक्ष उपक्रमोपसंहारावर आहे. तो अगदीं दक्षतेनें निरखून पाहून त्याजवर कर्मयोगाची इमारत त्यानीं उभारली आहे. वरील विवेचनावरून सिद्ध झालें कीं उपक्रम लढाईचा आहे. लढाई न करण्याचा नाहीं. उपसंहारही लढाईचा आहे.

मध्यंतरींचा शोकमोह खऱ्या प्रारब्धकर्मास अथवा क्षत्रियधर्मास विघातक होता. तो, खरा धर्म–विचार पटवून श्रीकृष्णांनीं दूर केला; याशिवाय वस्तुतः कांहीं नाहीं. शिवाय अशा तऱ्हेच्या प्रसंगाची न्यायशास्त्रांच्या कसोटीस लावून फार छाननी करतां येत नाहीं. महाभारत हा इतिहास ग्रंथ आहे. त्यांतील मुख्य विषय इतिवृत्तकथन हा होय. अध्यात्मविद्येचा उपदेश मधून मधून कथाप्रसंगानुरूप घातलेला आहे. उपमा जशी सर्वांशीं घेतां येत नाहीं तसे असले प्रसंग त्यास अनुलक्षून केलेल्या उपदेशाच्या स्वरूपाशीं सर्वतोपरी तोलून पाहणें चांगलें नाहीं असें आमचें मत आहे. तथापि रहस्यकारांना जर तसाच निष्कर्ष लावावयाचा असेल तर त्यांना आम्ही विचारतोंः– "अर्जुनास शोकमोह उत्पन्न होऊन तो संन्यास घेऊं लागला परंतु श्रीकृष्णांनीं त्याला प्रवृत्तिपर उपदेश करून युद्धास तयार केलें; तर मग अशा आणीबाणीच्या प्रसंगीं प्रवृत्तिपर योग तिसऱ्या अध्यायांत सांगितल्यानंतर पुन्हां पुन्हां हें मला सांग, तें मला सांग, असें हावऱ्यासारखें अर्जुनानें हें काय केलें? मला योग सांग, विभूति सांग, भक्तियोग सांग, स्थितप्रज्ञ कोण सांग, मनुष्य पाप कां करतो सांग, योगभ्रष्टाची काय गति होते, अधियज्ञ म्हणजे काय, अधिभूत म्हणजे काय, मरतांना तुला कसें जाणावें हें सर्व सांग, मला विश्वरूप दाखीव असे एकना दोन हजारों प्रश्न, अर्जुन युद्धवार्ता, शोकमोह, सन्मुख, चापासह सज्ज असलेले वीर, या सर्वांना विसरून जाऊन श्रीकृष्णास विचारीत सुटला आहे हें तरी प्रसंगास जुळूनच आहे काय! अर्जुन तर वीराचा पक्का शिष्य बनून श्रुतिस्मृतींतील सर्व धर्मांचें ज्ञान करून घेऊं लागलेला दिसतो. प्रवृत्तिपर कर्मयोग ऐकल्याबरोबर उपसंहार त्यानें हातीं न घेतां बावळटासारखा योगभ्रष्टाची काय दशा होते व मला विश्वरूप दाखीव अशासारखी उपक्रम व उपसंहारास न जुळणारी विचित्र व असंबद्ध जिज्ञासा करीत सुटला आहे. याला आपण काय म्हणाल!"

आमचें म्हणणें असें आहे कीं, ओघानें जसजसा विषय आला तसतसा कर्मयोग, सांख्ययोग, भक्तियोग भगवान् सांगत गेले आहेत. मोक्षाचे बहुतेक सर्व मार्ग अर्जुनाच्या प्रश्नानुरूप भगवंतानीं कथन केले. आहेत. त्यांत अमुकच मार्ग मुख्यत्वें सांगितला आहे असें म्हणणें बरोबर नाहीं. अधिकारपरत्वें प्रत्येकानें आपल्यास हवा तो मार्ग स्वीकारला पाहिजे. "यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत्" या श्रुतिअन्वयें जगाचा पूर्ण वीट आल्यावर, इहपर औपाधिक सुखांचेठायीं निःसीम वैराग्यवृत्ति बाणल्यावर ताबडतोब सांख्य मार्ग स्वीकारावा. वाचकहो, हें अधिकारतत्व हृदयांत वज्रलेप ठेवा; यत्किंचित् चळूं देऊं नका. हल्लींच्या काळांत या अधिकारविचारास कोणी मान देत नाहींत; परंतु आपणांस खरें तत्व जाणण्याची इच्छा असल्यास अधिकारपरत्वें साधनांचा उपयोग करावयाचा आहे. मोटारगाडी खरी पण ती दरिद्री व अनभिज्ञ मनुष्याचे हातीं निरुपयोगी आहे. नुसतें वाचिक

पंडित व्हावयाचें असल्यास आमची हरकत नाहीं. तसेंच शिष्याचीं इहलोक व परलोकचीं सौख्यें भोगण्याची वासना कायम आहे, परंतु जिज्ञासा आहे तर त्यानें कर्ममार्ग स्वीकारला पाहिजे. इहपर सौख्याची चाड नाहीं, जिज्ञासाही तीव्र आहे, परंतु जगांत मोठा परिवार आहे अगर महत्कार्य आरंभिलेलें आहे, कोट्यवधि प्राण्यांचें सुखदुःख आपल्या शिरावर घेतलेलें आहे, अगर एखाद्या समाजास अगर व्यक्तीस वाचादत्त झाला आहे अशा शिष्यानें निष्कामकर्मयोगच करीत राहून आजन्म काळ काढला पाहिजे. विश्वाचें केव्हां सत्यत्व वाटतें; केव्हां असत्यत्व वाटतें, सुखें हवीं वाटतात; परंतु तीं नश्वर आहेत असेंही वाटतें, ईश्वर आहे असें बुद्धीस खात्रीनें वाटतें; परंतु त्याची आपल्या अनुभवांत खात्री व्हावी अशी इच्छा असते, त्यानें कर्म व उपासना दोन्हीं करावींत. ईश्वरास्तित्वाबद्दल तशी खात्री नाहीं, बुद्धि कुशाग्र आहे, तत्व जाणण्याची इच्छा आहे, निश्चय आहे अशा शिष्यानें पातंजलयोगाचा आश्रय करून काम भागवावें. स्वाध्याय झालेला नाहीं, होणें शक्य नाहीं, शास्त्रोचित कर्में करण्याची संधि मिळत नाहीं, ईश्वराचे ठिकाणीं श्रद्धा असून जिज्ञासा आहे तर त्यानें अनन्य भक्तियोगाचा आश्रय करून जीवितसाफल्य करून घ्यावें. श्रद्धा आहे, वाचनाची हौस आहे, जिज्ञासा आहे, बुद्धि आहे, परंतु यज्ञयागादि करण्यास वगैरे इतर व्यवसायामुळें फुरसत नाहीं त्यांनीं स्वाध्याय, श्रवण, मनन, निदिध्यास इत्यादि मार्ग स्वीकारावा अमुक शिष्यास अमुक मार्ग सोइस्कर होईल हें गुरु ठरवितातच.

आतां रहस्यकारांच्या कोटिक्रमाकडे वळूं. " उपक्रम म्हणजे युद्धनिवृत्ति व उपसंहार म्हणजे युद्धप्रवृत्ति. सर्व ज्ञान शिकविल्यावर " तस्मायुध्यस्व भारत " असें सांगितलें असल्यामुळें गीता प्रधानतः प्रवृत्तिपरच आहे. " त्यांच्या इतर प्रमाणांचा क्रमशः विचार पुढें होईलच. परंतु या मूळ गुरुशिष्यभावाच्या उगमस्थानाशींच हा वाद असल्यामुळें त्याबद्दल विवेचन करणें भाग आहे. आमचे मतें उपक्रम व उपसंहार वर दिलेलेच आहेत. आमचे मतें हा गीता सांगितली नसती व जिवलग सखा श्रीकृष्णही जवळ नसता तरीही थोड्याबहुत वेळानें त्याचा त्यानेंच विचारानें हा क्षणभंगुर मनाचा शोक व मोह अर्जुनानें स्वतःच नाहींसे केले असते, अशी आमची खात्री आहे. कोणाही विचारी माणसाच्या हातून रणांगणावर असें मौर्ख्य व आचरटपणा कृतींत घडून आला नसता; मग अर्जुनासारख्याची कथा काय ! तेव्हां आमचें म्हणणें एवढेंच कीं, हा प्रसंग अक्षरशः ताणताणून योजणें चांगलें नाहीं. वाचकहो अशा तऱ्हेचे उपदेशाचे प्रसंग वारंवार व्यवहारांत येत असतात हें विसरूं नका. समजा घरचा कर्ता पुरुष मेला, अगर गुणवान् मुलगा मेला तर स्नेही, आप्त इष्ट हे वेदांत सांगण्यास सुरुवात करतात " अहो, हा देह अनित्य आहे. बुडबुड्यासारखा आहे. या जगीं चिरंजीव असा कोण राहिला आहे ! प्रारब्धकर्मानुसार जेवढें आयुष्य प्राणी घेऊन येतो तेवढेंच त्याचें आयुष्य. अहो हा

जीवसंबंध निव्वळ भ्रम आहे; विश्व खोटें आहे; हा सर्व मायेचा पसारा आहे, ब्रह्मादिकांस सुद्धां मायेनें सोडलें नाहीं तेथें मनुष्याचा काय पाड ! शोक करणें हें मूढपणाचें लक्षण आहे." अशा तऱ्हेचा वेदान्त सांगतात. परंतु याचा हेतु शोकनिवृत्तीपुरताच असतो. चालू असलेला प्रपंच तसाच पुढें चालला पाहिजे. क्षणभर उत्पन्न झालेली स्मशानवैराग्याची लाट निघून जावी एवढाच त्या उपदेशाचा हेतु असतो. नहून शोकमग्नानें संन्यास घ्यावा हा नसतो. असा शोक, मोह अगर वैराग्य ह्यांचा आश्रय तत्वज्ञानकथनाचे वेळीं सामान्यतः करण्यांत येत असतो. श्रीरामचंद्रास लहानपणींच वैराग्य झाल्याचा प्रसंग आणून त्या वेळीं मखरक्षणाकरितां विश्वामित्राची स्वारी आमंत्रणास आली असतां, वसिष्ठानीं या अकालीं झालेल्या वैराग्यास उद्देशून बोध केला आहे, तो सर्व अद्वैतपर असून पूर्ण संन्यासमार्गी आहे. आतां कदाचित् तोही ग्रंथ उपक्रमोपसंहाराच्या कसोटीनें प्रवृत्तिपरच आहे असें रहस्यकारांनीं सिद्ध केलें तर त्यास उत्तर आम्ही आमचे मतें देऊंच. परंतु तूर्त तरी तो ग्रंथ तसा असल्याचें कोणीं म्हटलें नाहीं. शिवाय अर्जुन हा लगेच आपलें युद्धाचें बोलणें विसरून जाऊन धर्मविषयांतच तल्लीन होतो व एका मागून एक हजारों प्रश्न विचारतो याचेंही रहस्य हेंच आहे कीं, एका प्रसंगाचे निमित्तें श्रीकृष्ण व अर्जुन अशा नामनेदार गुरुशिष्यद्वयाच्या मिषानें सर्व जिज्ञासूंस तत्वज्ञान करून देऊन, मोहनिरास म्हणजेच दुःखनिवारण करावें व अज्ञांस सुबुद्ध करावें हा महर्षि व्यासांचा हेतु आहे. नहून केवळ कर्मयोगशास्त्राकरितांच गीता प्रवृत्त झाली असून त्या कर्मयोगाचे केवळ अनुषंगानें संन्यास, भक्ति, पातंजलयोग यांचें विवरण केलेलें आहे असें दिसत नाहीं.

रहस्यकारांनीं सर्व गीताग्रंथ मंथन करून त्यांतील नवनीत एका श्लोकाचे रूपानें बाहेर काढलें आहे. तो श्लोक म्हणजे भगवद्गीतेची चतुःसूत्रीच होय असें त्यांचें म्हणणें आहे. स्वपक्षसमर्थनार्थ त्यांनीं जो युक्तिवाद व कोटिक्रम लढविला आहे तो खरोखरीच त्यांचे विशालबुद्धीस साजेसाच आहे. ह्या नवीन निष्कामकर्म संप्रदायास हा श्लोक अत्यंत अनुकूल असा असून त्यांत त्यांच्या संप्रदायाचीं तत्त्वें कोंदकोंदून भरलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. तो श्लोक हा:—

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूः मा ते संगोस्त्वकर्मणि ॥

हा श्लोक दुसऱ्या अध्यायांत पडित आहे. दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं संकल्प असा आहेः— "इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योग-शास्त्रे श्रीकृष्णार्जुन-संवादे **सांख्य-योगो** नाम द्वितीयोऽध्यायः ॥" तिसऱ्या अध्यायाच्या प्रारंभींच अर्जुन म्हणतोः—

" ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १

कर्मयोगापेक्षां बुद्धियोग श्रेष्ठ असें जर, जनार्दना तुझ्या मनास येतें तर मग या घोर कर्मास मला कां प्रवृत्त करीत आहेस ? जर दुसऱ्या अध्यायांत रहस्यकारांचा कर्मयोगच सांगितला असता तर मग हा अर्जुनाचा प्रश्नच मुळीं असंबद्ध झाला असता. भगवंतांनींही पण ह्या प्रश्नाबद्दल आश्चर्य दर्शविलें नाहीं. म्हणजे दुसऱ्या अध्यायांत कर्मयोगापेक्षां बुद्धियोग श्रेष्ठ असें स्पष्ट गुरुशिष्यांचेच भाषणावरून स्पष्ट होत आहे. यांत तिसऱ्या कोणाचे व्याख्यानाची जरूरी नाहीं. तेव्हां मीमांसाशास्त्रांतील नियमाप्रमाणें सांख्ययोगप्रकरणांत पठित असलेला श्लोक आपल्या चतुःसूत्रीच्या आधारास रहस्यकारांनीं कसा घेतला कोण जाणें. बरें हाहीं श्लोक त्या प्रकरणांतून काढून पुढच्या प्रकरणांत वाचला; तथापि रहस्यकारांच्या कर्मास हा कसा लागतो ? " कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन " ह्या महासूत्राच्या अर्थाचा विचार करूं. समजा शरसंधान हें कर्म आहे. शत्रूचा शिरच्छेद हें त्याचें फल, मीं फक्त बाणच सोडावा. शत्रूचें डोकें त्यानें खालीं पाडलें किंवा नाहीं हें मीं पहावयाचें नाहीं, पडल्यास बरेंच; न पडल्यास बरेंच. जेवावयास लागावें, तृप्ति हें फल पाहूं नये. पळावयास लागावें, परंतु मी पळतों आहें कीं लोळतों आहें हें पाहूं नये. आपल्याकडून तुळई करण्यास आरंभ करावा, मग खुंटीच पदरांत पडली तरी हरकत नाहीं. सर्व क्रियापदांच्या फलांकडे लक्ष न दिल्यास या निष्कर्मयोगानें जगांत मोठे अनर्थ उद्भवतील.

आम्हांस तर वाटतें कीं भगवद्गीतेचा जर निष्कर्षरूपी श्लोक काढावयाचा असेल तर पुन्हां या गुरुशिष्ययोगाच्या प्रसंगाकडे बारकाईनें पाहिलें पाहिजे. अर्जुनानें क्षणैक युद्धपराङ्मुखता दर्शविली; यांत त्यानें वास्तविक काय केलें असा विचार केल्यास अथवा त्यानें शास्त्रदृष्ट्या काय दोष केला हें पाहूं गेल्यास असें दिसून येईल कीं, त्यानें क्षत्रियास उचित असें जें युद्धकर्म त्यापासून निवृत्त होण्याची इच्छा धारण केली व ब्राह्मणवर्णास उचित अशा भिक्षावृत्तीचा अवलंब करण्याची वासना धरली, हा दोष "स्वधर्मत्याग व परधर्मसेवन" या सदरांत पडतो असें " चातुर्वर्ण्य कालीन " शास्त्रनियमानें होतें. "श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके" हा भिक्षावृत्तीचा धर्म ब्राह्मणाचा आहे; क्षत्रियाचा नव्हे. अर्जुन क्षत्रिय आहे व तो रणांत " सेनयोरुभयोर्मध्ये " उभा आहे. त्यानें युद्धच केलें पाहिजे हा त्याचा खरा धर्म आहे. तो सोडून देऊन ब्राह्मणाचा दिसण्यांत सुकर असा धर्म स्वीकारण्यास अर्जुनाची तयारी झाली. म्हणून ही गीता भगवंतास सांगणें भाग पडलें. म्हणजे अर्थात् भगवद्गीतेचें कार्य **स्वधर्मस्थापन** व **परधर्मवारण** होय हें. भगदीं उघड आहे. आचार्य म्हणतातः—

शोकमोहाभ्यां ह्यभिभूतविवेकविज्ञानः स्वतः एव क्षत्रधर्मे युद्धे प्रवृत्तोऽपि तस्माद्युद्धादुपरराम । परधर्मं च भिक्षाजीवनादिकं कर्तुं प्रववृते ॥

(शोक व मोह या दोन दोषांनीं ज्याचा विवेक नष्ट झाला आहे असा अर्जुन स्वतःच क्षत्रियांचा धर्म जें युद्ध त्यास प्रवृत्त झाला असतांही त्या युद्धापासून परावृत्त झाला व भिक्षा-जीवनादिक परधर्मवृत्तीस तयार झाला) तेव्हां आचार्य म्हणतातः—

तथाच सर्वप्राणिनां शोकमोहादि दोषाविष्टचेतसां स्वभावत एव स्वधर्मपरित्यागः प्रतिषिद्धसेवा च स्यात्। स्वधर्मे प्रवृत्तानामपि तेषां वाङ्मनःकायादीनां प्रवृत्तिः फलाभिसंधिपूर्विका एव साहंकारा च भवति । तत्रैवं सति धर्माधर्मोपचयादिष्टानिष्टजन्मसुखदुःखसंप्राप्ति-लक्षणः संसारोनुपरतो भवति इत्यतः संसारबीजभूतौ शोकमोहौ ।

(तेव्हां सर्व प्राणी शोकमोहादि दोषांनीं व्याप्त होऊन स्वभावतःच आपल्या धर्माचा त्याग करतील व परमार्थाचा अवलंब करतील. तसेंच स्वधर्माचरणांत असतांनाही (या दोन दोषांमुळें) वाचेनें, मनानें व शरीरानें फलाची आकांक्षा धरून व अहंकारयुक्त प्रवृत्त होतील व असें झालें म्हणजे (अशा साहंकार कर्माचरणानें) इष्ट व अनिष्ट अशीं जन्म, सुख, दुःखरूपी कर्माचीं फलें उत्पन्न होतील व त्यामुळें प्रपंचाचा कधींही उपरम होणें शक्य नाहीं. (अशी स्थिति येऊं नये म्हणून) संसाराचें जें बीज शोकमोह तें (नाहींसें करण्याकरितां) पुढें आचार्य म्हणतातः—

तयोश्च सर्वकर्मसंन्यासपूर्वकादात्मज्ञानान्नान्यतो निवृत्तिरिति तदुपदिदिक्षुः सर्वलोकानुग्रहार्थं अर्जुनं निमित्तीकृत्याह भगवान्वासुदेवः॥

(त्या शोकमोहाची निवृत्ति फक्त सर्वकर्मसंन्यासपूर्वक आत्मज्ञानानेंच होणार आहे, अन्य कशानेंही होणार नाहीं, हें सांगण्याकरितां लोकोपकारार्थ अर्जुनास पुढें करून भगवान् वासुदेव गीता सांगण्यास प्रवृत्त झाले.)

या आचार्यांच्या भाष्याच्या अवतरणावरून त्यांचे मतें गीतेचें प्रयोजन काय म्हणजे शिष्यास काय पाहिजे आहे व गुरु त्यास कोणती विद्या देण्यास तयार झाला ह्या गोष्टींचा उलगडा स्पष्ट झालाच असेल. तेव्हां अर्जुनानें युद्धाची तयारी गीतोपदेशानें केली हेंही खोटें आहे व श्रीकृष्णानें अर्जुनास केवळ कर्मयोगच मुख्यतः सांगितला हेंही खोटें आहे व भगवद्गीतेचा सारांश " कर्मण्येवाधिकारस्ते " इ० हा मुळींच नसून तो सारांश आमचे मतें खालील श्लोकांत आहेः—

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥

अध्याय ३, श्लोक ३५.

हा श्लोक आमचे मतें भगवद्गीतेची चतुःसूत्री आहे. उपक्रमोपसंहारावरून हाच निष्कर्ष निघतो, हें विचारांतीं सर्वांचे ध्यानांत येईल. वाल्मीकि-रामायण जसें एका सुप्रसिद्ध श्लोकांत म्हणण्याचा परिपाठ आहे अगर वेदान्त जसा अर्ध-श्लोकांत पठित आहे तसें भगवद्गीता ही या श्लोकानें पठित होते. श्रीकृष्ण स्वतः गुरुस्थानावरून सांगतात कीं (१) आपल्या धर्मांत जरी थोडें वैगुण्य आहे असें वाटलें तरी तोच पाळण्यांत मनुष्याचें इहपर कल्याण आहे, (२) परधर्म दिसण्यांत जरी आचरण्यास सुलभ दिसला तरी त्याचा आश्रय करूं नये, (३) स्वधर्माचरणांत जरी मरण आलें तथापि मोक्ष मिळेल, (४) परंतु परधर्म स्वीकारल्यास तो मोठा अनर्थकारक होईल.

ही उपक्रमोपसंहारोचित न्यायसिद्ध व समर्पक चतुःसूत्री प्रत्येक मुमुक्षु आपल्या हृत्कमलांत सदैव जागृत ठेवून तत्पर वागेल तर त्यास चारी पुरुषार्थांचा लाभ होईल यांत संदेह नाहीं.

आमचेंही सर्वांस आग्रहाचें सांगणें आहे कीं, हें नवीन गीतारहस्य क्षणभर विसरून जाऊन स्वतंत्ररीत्या भगवद्गीता मनन करून वाचा म्हणजे तुम्हांसही वाटेल कीं, " श्रेयान्स्वधर्मो विगुणः इ० " हाच श्लोक गीतेचा सारभूत असून " कर्मण्येवाधिकारस्ते " इ० हा केवळ इतर श्लोकांपैकींच एक असून त्यास महत्व केवळ कर्मयोगसांप्रदायदृष्टीनें आलेलें आहे.

आतां कदाचित् रहस्यकार या ठिकाणीं म्हणतील कीं, " कां होईना चतुःसूत्री आम्हीं कबूल केली तरी त्यांतही कर्मयोगच आहे. ज्ञानयोग नाहीं. तेव्हां ही आम्हांस इष्टापत्तिच आहे. " परंतु यास आमचें असें उत्तर आहे कीं " कर्मण्येवाधिकारस्ते " या श्लोकांत ज्ञानाचा मुळींच बोध होत नाहीं, परंतु धर्म-शब्दांत कर्मापासून जीवन्मुक्ताच्या सप्तम भूमिकेपर्यंतच्या अवस्थेचा समावेश होतो. धर्म-शब्दांत कर्मकांड व ज्ञानकांड या दोहींचाही अन्तर्भाव होतो. गीता हें धर्म-शास्त्र आहे. अर्जुनास धर्मज्ञानच पाहिजे होतें व तें धर्मज्ञान कर्म, उपासना व ज्ञान या तिन्ही प्रकारांनीं भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें आहे. यामुळेंच गीतेस महत्व आलें आहे.

शिवाय या गुरुशिष्यसंवादांत प्रत्येक अध्यायाचे शेवटीं निरनिराळा संकल्प असतां सर्वांतून कर्मयोगच प्रतिपाद्य आहे असें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. शिष्याच्या सर्व शंकांचें निरसन श्रीकृष्णांनीं करून धर्मांतील अनेक विषयांचा

ऊहापोह केला आहे. आतां अर्जुन हा क्षत्रियवर्णाचा असल्यामुळें त्याच्या धर्मावर म्हणजे क्षत्रियाचे प्राप्तकर्मावर जोर दिलेला आहे, नाहीं असें नाहीं. परंतु इत्यर्थ मात्र तो नव्हे हें खरें आहे. साहाजिकच आहे. अर्जुन क्षत्रिय असल्यामुळें त्याला ' तस्मादुत्तिष्ठ भारत ' असा उपदेश केला आहे. तसेंच अर्जुनाच्या हातून बरींच कार्यें व्हावयाचीं असल्यामुळें व त्याच्या हातांत युद्धकंकण आधींच बांधलें गेलें असल्यामुळें " कर्मण्येवाधिकारस्ते " असा उपदेश श्रीकृष्णास करणें भाग पडलें यांत रहस्यकारांना इतका विषाद कां वाटावा, हें समजणें कठीण आहे. ते म्हणतात, अर्जुनास एवढें फसविण्याचें कारण श्रीकृष्णास नव्हतें. खरा खरा संन्यासमार्ग त्यास सांगावयाचा सोडून या भलत्या कर्मयोगांतच त्यास भगवंतांनीं कां प्रवृत्त केलें ! तेव्हां त्यांचे मतें हा अर्जुनास सांगितलेला कर्ममार्गच श्रेष्ठ मार्ग होय. परंतु अर्जुनाची परिस्थिति रहस्यकारांनीं लक्षांत घेतली तर त्यांसही वाटेल कीं भगवंताचा किती आवडता अर्जुन असला तरी अशा प्रसंगीं त्याला कर्म करण्यास सांगण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. आतां हा निष्कामकर्मयोग वस्तुतः सर्व कर्मसंन्यासच आहे. व म्हणून आचार्यांनीं जी प्रतिज्ञा भाष्याचे आरंभीं केली कीं आत्मज्ञान व सर्व कर्मसंन्यास यानेंच मोक्ष मिळतो एरव्हीं नाहीं, हाच सिद्धान्त कसा खरा ठरतो व संन्यास शब्दाचा रहस्यकारांनीं कसा गोंधळ उडवून दिला आहे हें क्रमशः पुढें सांगण्यांत येईल.

४ 'योग' शब्दयोग.

आत्मप्रयत्नसापेक्षा विशिष्टा या मनोगतिः ।
तस्यां ब्रह्मणि संयोगे योग इत्यभिधीयते ॥

श्रीविष्णुपुराण, अंश ६, अ० ७, श्लोक ३१.

भगवद्गीतेचे एकंदर अध्याय अठरा आहेत. प्रत्येक अध्यायाचे शेवटीं संकल्प आहे. "इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां भीष्मपर्वणि श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्य (अगर कर्म अगर अमुक) योगो नाम द्वितीयोऽ (अगर अमुको) ध्यायः" हा एवढा संकल्प सर्वच गीतेच्या पुस्तकांतून असतो असें नाहीं. बऱ्याचशा प्रतींतून "इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु" पासून पुढील सर्व संकल्प तेवढाच दिलेला असतो. आतां हा संकल्प मूळ भारतांत नाहीं परंतु ही गीता जेव्हां भारतांतून निराळी काढण्यांत आली तेव्हां म्हणजे गीतेवर टीका होण्यापूर्वी हा संकल्प प्रचारांत आल्यामुळें ग्रंथाचें अर्थनिरीक्षण करण्यास हा संकल्प फार उपयोगाचा आहे, असें रहस्यसंजीवनकार म्हणतात व आमचाही तोच अभिप्राय आहे. तेव्हां आतां संकल्पाच्या शब्दांची निरानिराळी चिकित्सा करणें अगदीं अवश्य आहे. 'इति' हा शब्द समाप्तिवाचक आहे. "अथ" शब्द जसा आरंभवाचक आहे तसा "इति" हा शब्द समाप्तिदर्शक आहे. प्रचारांत सुद्धां "अथपासून इतिपर्यंत" असें आरंभापासून समाप्तीपर्यंत अथवा "आमूलाग्र" याअर्थी योजण्यांत येतें. "इति" या शब्दाचा संबंध अमुकयोगो नाम अमुकोऽध्यायः इकडे आहे हेंही उघड आहे. "श्रीमद्भगवतद्गीतासूपनिषत्सु" या पदांसंबंधीं रहस्यसंजीवनीकारांचें म्हणणें आहे कीं, हा शब्द अनेकवचनी मानार्थी घातलेला आहे. वास्तविक पाहिलें असतां हें एक भगवंतांनीं गाइलेलें उपनिषत् असा अर्थ असतां ह्या स्वतंत्र उपनिषदास बहुमानार्थी अनेकवचनाचा प्रयोग करण्यांत आला आहे; असें लोकमान्य म्हणतात. हा "मानालंकार" मानण्याचें कारण उघडच आहे कीं, रहस्यकारांच्या मनांत भगवद्गीता हें एक स्वतंत्र उपनिषत् करावयाचें आहे कारण उपनिषदें सर्व पडलीं संन्यास-मार्गी ! एखादें "ईशावास्या" सारखें उपनिषत भगवद्गीतेच्या "कर्मयोगास" जुळतें खरें, परंतु सर्वांचा तसा विनियोग लावणें रहस्यकारांना शक्य नाहीं. आतां "ईशावास्य" तरी खरें कितपत कर्मयोगपोषक आहे हें पुढें पाहूंच. असो. तेव्हां "कठोपनिषत्" "मुंडकोपनिषत्" "ऐतरेयोपनिषत्" अशीं जशीं निरनिराळीं उपनिषदें आहेत तसेंच हें एक

" भगवद्गीतोपनिषत् " वेगळें करण्याचा रहस्यकारांचा संकल्प असल्यामुळें त्यांना ही लक्षणा करावी लागली आहे हें कोणाच्याही लक्षांत येईल. परंतु प्रत्येक उपनिषत् काढून पाहिल्यास त्यांतील संकल्प एकवचनींच बहुधा आढळून येईल.

" इति छांदोग्योपनिषद्यष्टमोऽध्यायः " " इति बृहदारण्यकोनिषद् " अथवा जेव्हां जेव्हां उपनिषदांतील अवतरणें देण्याचा प्रसंग येतो तेव्हां तेव्हांही " काठके " " मुण्डके " " छांदोग्ये " असाच एकवचनी निर्देश असतो.

" योगविधानं श्वेताश्वतरोपनिषदि दृश्यते "

ब्रह्म० भा० अ० २ पा० १ ० ३.

" छांदोग्ये पुनर्द्यौः सुतेजस्त्वगुणा समाम्नायत "

ब्रह्म० भा० अ० १ पा० २ सू० ३१.

" वाजसनयक ' तेहदेवा ' तथा छांदोग्येऽपि "

ब्र० भा० अ० ३ पा० ३ सू० ६.

परंतु कदाचित् रहस्यकारांच्या मतें हें उपनिषद् सर्वांत श्रेष्ठ असल्यामुळें त्यासच हा बहुमान देण्यांत आलेला असावा असें दिसतें. वास्तविक पाहिलें असतां " भगवद्गीतासूपनिषत्सु " याचा अर्थ भगवंतांनीं गाइलेल्या उपनिषदांतील असा आहे म्हणजे भगवंतांनीं अर्जुनास सांगितलेल्या उपनिषद्विद्येंतील असा अर्थ आहे. असा अर्थ घेतल्यास अनेकवचन बहुमानार्थी मानण्याचें कारण न पडतां अर्थानुसारेंच त्याची संगति लागते. असा " उपनिषदान्तर्गत ब्रह्मविद्येमधील " हा अर्थ " श्रीमद्भगवगीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां " या पदांचा निर्णीत होतो व गीतामाहात्म्यांत " सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः " (सर्व उपनिषदें ह्या धेनु व गोपालनंदन श्रीकृष्ण हा धेनूंचा दोग्धा) म्हटल्याप्रमाणें बरोबर संगति जुळते. " भगवद्गीतासूपनिषत्सु " याचा अर्थ भगवंतांनीं दोहन केलेल्या उपनिषद्धेनु असा होतो. असो. यांतील मुख्य विषय ब्रह्मविद्या हा होय. ब्रह्मविद्या अथवा पराविद्या हा उपनिषदांचा मुख्य विषय होय. संहिता, ब्राह्मणें यांचा ब्रह्मविद्या हा विषय नव्हे. त्या दोन्हींचा मुख्य विषय म्हणजे यज्ञयागादि कर्म. उपनिषदांतून कर्म, उपासना वगैरेंचा उल्लेख येतो परंतु तो गौणत्वानें येतो, तसेंच संहिता, ब्राह्मणांत ब्रह्मविद्या येते, परंतु प्रमुखत्वानें तिचा निर्देश त्यांत नसतो. गीतेंत मुख्यतः ब्रह्मविद्या सांगितली आहे हें संकल्पाच्या प्रथम पदावरूनच सिद्ध आहे. " ब्रह्मविद्यायां " या पदावरून गीतेंत केवळ ब्रह्मच प्रतिपाद्य असल्यामुळें तिला प्रस्थानत्रयींत आजपर्यंत घालण्यांत आलेलें आहे. आतां पुढील पद " योगशास्त्रे " हें होय. हें पद मोठें रणस्थान होऊन बसलें आहे. रहस्यकारांची सर्व भिस्त या पदावर आहे. त्यांचें म्हणणें " योगशास्त्रे " म्हणजे " कर्मयोग-

शास्त्रे." परंतु हा अर्थ त्यांनीं कसा काढला आहे तें पाहिलें म्हणजे वकिली कोट्या कशा असतात हें चांगलें समजेल. त्यांनीं प्रथम योग शब्दाचें लक्षण भगवद्गीतेंतीलच घेतलें. तें लक्षण असें:-" समत्वं योग उच्यते." आमचे मतेंही हेंच योगाचें लक्षण होय. " उच्यते " या पदावरून लक्षणाचा बोध स्पष्ट होतो. येथपर्यंत ठीक आहे. परंतु असें लक्षण घेत घेत हळुहळू वाचकांची नजरबंद करून त्यांचे गळ्यांत " योगः कर्मसु कौशलम् " हीं पदें अथवा वाक्य, लक्षण म्हणून बांधलें आहे. व हें दुसरें लक्षण जरा शब्दावडंबरानें खुलवून व पक्कें करून वाचकांना सररहा हेंच योगाचें लक्षण म्हणून म्हणावयास लाविलें आहे. यालाच म्हणतात " लिहिण्याचें कौशल " ! मग त्या " कौशल " शब्दाचे विविध अर्थ व पर्याय करून अचूक शिक्क्याचें माप म्हणून " योग " म्हणजे " कर्मसु कौशलम् " असा सर्व ग्रंथभर डांगोरा पिटविला आहे; व जेथें जेथें ' योग ' शब्द येईल तेथें तेथें ' कर्मसु कौशलम् ' असा अर्थ एकदां अन्वयव्यतिरेकानें सिद्ध झाल्यावर मग ' योग ' व " कर्म " हे पर्यायशब्द होण्यास विलंब काय ? वाचकहो, एकदां कर्मयोग गीतेंतून काढावयाचा असा एखाद्या हुषार पंडितानें आग्रह धरला तर त्याचें " कौशल्य " कोणत्या थरास जातें यार्चे हें एक उत्कृष्ट उदाहरण होय. भगवद्गीतेंतील मूळ " उच्यते " या पदानें दिलेलें लक्षण म्हणजे " समत्वं योग उच्यते " हें होय. योग म्हणजे समत्व हेंच भगवंतांनीं स्पष्ट शब्दांनीं सांगितलेलें लक्षण सर्व ठिकाणीं योग्य लागू पडतें. " योगः कर्मसु कौशलम् " हें योगशब्दाचें लक्षण नसून योगाच्या अनेक गुणांपैकीं एक गुणाचें कथन आहे. जसें " मनुष्य मर्त्य आहे." " यागः कर्मसु कौशलम् " असें लक्षण म्हणून सांगण्याचें भगवंतांस कारणच नव्हतें. कारण एकदां लक्षण केल्यावर पुन्हां त्याच शब्दाचें दुसरें लक्षण अन्यार्थी करणें हा भगवंतांचे ठिकाणीं दोष झाला असता. शिवाय " समत्वं " व " कर्मसु कौशलं " हे दोन्ही अर्थ समान तरी आहेत ? समत्व कोणीकडे व कर्मसु कौशलं हें कोणीकडे ! दुसरें लक्षण धरल्यास अव्याप्ति व अतिव्याप्ति हे दोन्ही दोष या लक्षणास लागतील. ज्या योगांत कर्माचा कार्डाइतका संबंध नाहीं अशा समाधियोगाचा अन्तर्भाव यांत होणार नाहीं. तसेंच उत्तम रंगारी, भडभुंज्या, गोलंदाज, चित्रकार यांचा त्यांत समावेश होईल. योगयुक्तास कर्म कौशल्यानें करतां येतें हा त्यांतील भावार्थ अथवा योगगुणैककथन असतां तोच शब्दसमूह घेऊन रहस्यकार धांवत सुटले आहेत. नाइलाज आहे. पहिलें समत्वाचें स्पष्ट शब्दांनीं सांगितलेलें योग-लक्षण घेऊन रहस्यकारांचें काम भागत नव्हतें म्हणून हा नवीन मंत्र त्यांनीं जपला आहे. आम्हांस वाटतें साधारण लक्षण व लक्षणदोष कळण्याइतकें ज्यांचें संस्कृत ज्ञान आहे त्यालासुद्धां ही लपंडावी सहज समजेल. आमचे मतें याबद्दल जास्त विवेचन करणें म्हणजे दिवाकरास दिव्यानें दाखविण्याचा प्रयत्न करणें

होय. परंतु अशा महापंडितानें आग्रहानें " योगः कर्मसु कौशलं " असेंच लक्षण आहे म्हणून वारंवार सांगितल्यामुळें सर्वांची तीच भावना होईल. म्हणून हा वृथा परंतु सकारण प्रयत्न करावा लागत आहे. या लक्षणावरच सर्व कर्मयोगाची भव्य इमारत उभारली आहे. तेव्हां लक्षण व गुणानिरूपण ज्या श्लोकांत आलेलें आहे ते तिन्ही श्लोक खालीं देत आहों.

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥
दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥

अ० २, श्लोक ४८,४९,५०.

अर्थ--हे अर्जुना, संग म्हणजे अहंकार सोडून योगस्थ, कर्में कर. सिद्धि मिळो अथवा न मिळो दोन्ही समानच मान. (बुद्धीचें) समत्व म्हणजेच योग.

नुसतें कर्म हें बुद्धियोगापेक्षां फारच कनिष्ठ प्रकारचें आहे. तस्मात् तूं बुद्धि-समत्व संपादन कर म्हणजे योगरूढ हो. फलाची आकांक्षा केलीस कीं अज्ञानी रहाशील. एकदां हा बुद्धियोग तुला साध्य झाला म्हणजे पुण्यपापांचा तुला संपर्क होणार नाहीं. कारण योगाचे योगें कर्म करण्यांत कौशल्य येतें. (म्हणजे बंधन-रहित कर्म करतां येतें.)

हे तिन्ही श्लोक काळजीपूर्वक वाचा. यांत योग शब्दांऐवजीं पर्यायशब्द " कर्मसु कौशलं " हा घालून पहा, म्हणजे पहिल्याच श्लोकांत कोण घोंटाळा होतो पहा. योगस्थः=कर्मसु कौशलम्. कर्मकौशल्य मिळवून. कुरु कर्माणि=कर्म कर. म्हणजे कोणत्याही कामांत प्रावीण्य मिळविल्यावर मग कर्म करूं लाग. संग सोड. जयापजयाची वार्ता सोड. समत्व शब्दासच " कर्मसु कौशलम् " म्हणतात. आम्हांस वाटतें एवढ्यानें तरी वाचकांची खात्री होईल. सर्व श्लोकांचा असा विपर्यास करणें नलगे.

तेव्हां आतांपर्यंत जें विवेचन झालें त्यावरून " इति भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे " इतक्या पदांचा अर्थ " भगवंतांनीं सांगितलेल्या उपनिषद्विद्येंतील ब्रह्मविद्यान्तर्गत बुद्धिसाम्य (योगाचे) शास्त्रांतील " असा होतो याबद्दल विशेष विस्तार करण्याचें प्रयोजन नाहीं.

आतां " योगशास्त्रे " यापुढील संकल्प प्रत्येक अध्यायांत निरनिराळा आलेला आहे. त्या प्रत्येकास "योग" हीच संज्ञा आहे. ते योग अनुक्रमें खालीं लिहिल्याप्रमाणें

आहेत. " श्रीकृष्णार्जुन संवादे " हा संकल्पभागही सर्वसाधारण आहे, परंतु त्या भागाबद्दल संशय अथवा वाद नाहीं, म्हणून त्याबद्दल विचार करण्याचें कारण नाहीं.

१ पहिला अध्याय " अर्जुनविषादयोग " नांवाचा आहे.
२ दुसरा " सांख्ययोग " नांवाचा.
३ तिसरा " कर्मयोग " नांवाचा.
४ चवथा " ज्ञानकर्मसंन्यासयोग " नांवाचा.
५ पांचवा " संन्यासयोग " नांवाचा.
६ सहावा " अध्यात्मयोग " नांवाचा.
७ सातवा " ज्ञानविज्ञानयोग " नांवाचा.
८ आठवा " अक्षरब्रह्मयोग " नांवाचा.
९ नववा " राजविद्याराजगुह्ययोग " नांवाचा.
१० दहावा " विभूतियोग " नांवाचा.
११ अकरावा " विश्वरूपदर्शन " नांवाचा.
१२ बारावा " भक्तियोग " नांवाचा.
१३ तेरावा " क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग " नांवाचा.
१४ चवदावा " गुणत्रयविभागयोग " नांवाचा.
१५ पंधरावा " पुरुषोत्तमयोग " नांवाचा.
१६ सोळावा " दैवासुरसंपद्विभागयोग " नांवाचा.
१७ सतरावा " श्रद्धात्रयविभागयोग " नांवाचा.
१८ अठरावा " मोक्षसंन्यासयोग " नांवाचा.

या वरील अठरा अध्यायांतील विशिष्ट संकल्पावरून फक्त अकराव्या अध्यायाखेरीज बाकी सर्वत्र योग शब्द वापरलेला आहे. अकराव्या अध्यायांत अर्जुनास उपदेश केलेला नसून विश्वरूपदर्शन दिलेलें असल्यामुळें त्या अध्यायास योग ही संज्ञा दिलेली नाहीं.

आतां " योगशास्त्रे " म्हणजे " कर्मयोगशास्त्रे " असा रहस्यकारांसारखा अर्थ केल्यास तिसऱ्या अध्यायाशिवाय कोणता अध्याय " कर्मयोगशास्त्रा " चे उपांग अथवा प्रकरण होऊं शकेल हें वाचकांनींच विचार करून पहावें. दुसरा, चवथा, पांचवा, सहावा, सातवा, आठवा व अठरावा हे सर्व अध्याय तर नामनिर्देशावरूनच कर्मयोगशास्त्राचे विरुद्ध आहेत. बाकीचे अध्याय स्वतंत्र विषय प्रतिपादन करीत आहेत. फक्त राहतां राहिला तिसरा अध्याय. तो मात्र उघडच " कर्मयोग " या नांवानें सुप्रसिद्ध आहे. सर्वच ग्रंथ जर " कर्मयोग " शास्त्रपर आहे तर मग एक स्वतंत्र अध्याय " कर्मयोग " विवेचनास देण्याचें कारण नव्हतें. तिसऱ्या अध्यायाचे नांवावरून हें स्पष्ट होतें कीं, " योगशास्त्रे " म्हणजे

"कर्मयोगशास्त्रे" असें नव्हे. "कर्मयोगामध्यें कर्मयोग" ही द्विरुक्ति होते. अठराही अध्याय जर कर्मयोगशास्त्रांतील प्रकरणें करावयाचीं भगवंताचे मनांत होतें तर मग हा मध्येंच "कर्मयोग" अध्याय घालून सर्वांच्या मतींचा विपर्यास करण्याचें भगवंतास प्रयोजन नव्हतें. असो.

आतां "योग" शब्दाचें भगवद्गीतेंत खरें लक्षण काय केलेलें आहे हें वर सांगितलेलेंच आहे, परंतु अन्य ठिकाणीं योग शब्दानें काय समजलें जातें तें पाहूं. कठोपनिषदांत द्वितीयाध्याचे शेवटीं असें म्हटलें आहेः--

यदा पञ्चावतिष्ठंते ज्ञानानि मनसा सह ।
बुद्धिश्च न विचेष्टति तामाहुः परमां गतिम् ॥ १०
तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम् ।
अप्रमत्तस्तदा भवति योगोहि प्रभवाप्ययौ ॥ ११

भावार्थः--जेव्हां पंच ज्ञानेंद्रियें कार्यासह (बाह्य ज्ञानासह) व मनासह (आत्म्याचे ठिकाणीं) स्थिर होतात व बुद्धि (आत्मस्वरूपी) निश्चल होते तेव्हां ती स्थिति परम श्रेष्ठ अशी समजली जाते. या स्थिर झालेल्या इंद्रियधारणेच्या स्थितीस योग असें म्हणतात, अशा स्थितींतच प्रमादरहितत्व येतें, कारण योग हा उपायापाय-धर्मक आहे.

हा उपदेश नाचिकेतास यमानें केला आहे. कठोपनिषदाचे उपसंहारांत श्रुति स्वतः सिंहावलोकनानें नाचिकेतास काय काय सांगितलें याचें वर्णन करीत आहे.

मृत्युप्रोक्तान्नाचिकेतोऽथ लब्ध्वा विद्यामेतां योगविधिं च कृत्स्नं ।
ब्रह्मप्राप्तो विरजोऽभूद्विमृत्युरन्योऽप्येवं यो विदध्यात्ममेव ॥ १८

यमानें नाचिकेतास सांगितलेलें ब्रह्मज्ञान व उपदेशिलेला योग या दोन्हीच्या योगानें नाचिकेतास ब्रह्मसाक्षात्कार झाला, वैराग्यनिष्ठा झाली व अमृतत्व मिळालें. अन्य कोणी जरी अशा मार्गाचें (नाचिकेताच्या) अवलंबन करील तरी तोही असाच तरून जाईल.

यावरून सांख्य व योग ह्या दोन्ही निष्ठांचा उपदेश यमानेंही नाचिकेतास केल्याचें दिसून येईल. भगवंतांनींही हेंच सांख्यज्ञान व योग अर्जुनास सांगितलीं आहेत. गीता ही स्मृति आहे, कठोपनिषद् ही श्रुति आहे. श्रुति-स्मृतीचा विरोध येऊं नये, आल्यास स्मृति त्याज्य होय असा वेदधर्माचा अभिप्राय आहे हें जाणूनच भगवंतांनीं श्रुतीचाच अनुवाद करून तेच दोन मार्ग अर्जुनास सांगितले आहेत. भगवंतांनीं उपनिषद्वियेचाच अनुवाद केला आहे, इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणीं श्रुतीचीं वाक्यें जशींच्या तशीं अगर थोड्याबहुत फरकानें गीतेंत घेतलीं आहेत. कठश्रुती तर भगवानाचे नजरेसमोर होती असें स्पष्ट दिसतें.

हन्ताचेन्मन्यते हंतुं हतश्चेन्मन्यते हतं ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ १९

कठोपनिषद्.

ह्या श्रुतीचेरहुकूम स्मृति पहाः—

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ १९

भगवद्गीता, अ० २, श्लोक १९.

तसेंच

न जायते म्रियते वा विपश्चिन्ना-यं कुतश्चिन्न बभूव कश्चित् ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥१८

कठश्रुति.

स्मृति पहाः—

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥

अ० २, श्लो० २०.

श्रुतिः—

इंद्रियेभ्यः पराह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान्परः ॥ १० ॥

स्मृति पहाः—

इंद्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥

भ० अ० ३, श्लो० ४२.

श्रुतिः—

श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः शृण्वन्तोपि बहवो यन्न विद्युः ।
आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धाश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः ॥ ७

स्मृतिः—

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥

अ० २, श्लो० २९.

तसेंच पंधराव्या अध्यायांतील अश्वत्थ वृक्षाची कल्पना पहा व कठश्रुतींतील सहाव्या वल्लीचा पहिला श्लोक पहा.

सारांश कठश्रुतींतील सांख्य व योगच येथें पूर्ण अभिप्रेत आहेत असें दिसतें. असो.

आतां भगवद्गीतेंत ठिकठिकाणीं "योग" व "योगी" या शब्दाबद्दल काय म्हटलें आहे पाहूं. भगवंतांनीं स्वतः "उच्यते" असे स्पष्ट, असंदिग्ध, व अव्यभिचारि असें पद मुद्दाम घालून योग शब्दाचें लक्षण दुसऱ्या अध्यायांत अठ्ठेचाळिसाव्या श्लोकांत दिलें आहे. पुढें तें प्रकरण संपण्यापूर्वीच चार श्लोक सोडून ५३ श्लोकांत भगवान् म्हणतातः-

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३

भावार्थः—समाधीचे ठिकाणीं जेव्हां तुझी वेदवाक्यांनीं चल झालेली बुद्धि स्थिर होईल तेव्हांच तुला योगाची प्राप्ति होईल.

वाचकहो "योग" शब्दाच्या लक्षणानंतरच पांचवे श्लोकांत सांगितलेला "योग" व वर दिलेल्या कठश्रुतींतील योग यांत आपणांस कांहीं अंतर दिसतें आहे काय ? पित्तोपहत दृष्टि झाल्यावर सर्वच पिवळें दिसावें यांत नवल नाहीं, परंतु आपण मात्र पित्तोपहत होऊं नका. "योग" शब्दाचा उलगडा स्पष्ट शब्दांनीं मिळाला असतां उगाच "कर्मसु कौशलम्" हासणें, रडणें गप्प बसणें, जगणें, मरणें ह्या क्रियेंतील युक्ति, कौशल्य अथवा पटुता अगर सौकर्य हाच त्याचा अर्थ म्हणून व योग म्हणजे "कर्मयोग" असा पर्याय करून वांग्याचें भूत करून ना भावयास आपणही लागल्यास कालमाहात्म्य व दुर्धर दुर्दैवच म्हणावयाचें ! दुसरें काय ! एवढ्यानेंच ही योगमामांसा पूर्ण झाली नाही. पुढेंही भगवद्गीतेंत "योगी" 'युक्त' हे शब्द भगवंतास कसे अभिप्रेत आहेत याचा विचार करूं. वरील

समाधावचलाबुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥

हा श्लोक संपल्याबरोबरच अर्जुन विचारीत आहेः—

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४

अर्थ पूर्वी दिलाच आहे. याच प्रश्नास उत्तर देतांना भगवंतांनीं म्हटलें आहेः-

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥ ६०
तानि सर्वाणि संयम्य "युक्त" आसीत मत्परः ॥
वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१

भावार्थः—यत्न करीत असूनही शहाण्यांचीं सुद्धां इंद्रियें अनावर होतात व मनास परवश करतात तेव्हां त्या इंद्रियांचा संयम करून माझे ठिकाणीं स्थिर होऊन ज्यास इंद्रिये वश झालीं तो स्थितप्रज्ञ झाला (म्हणजे त्याला योग प्राप्त झाला). पुढें पांचव्या अध्यायांतः—

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।
सर्वभूतात्म-भूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७

(ज्यानें बुद्धि व इंद्रियें यांचा पराजय केला व सर्वांतर्यामीं आपलेंच रूप जो पाहूं लागला असा शुद्धसत्व जो योगी त्यानें कर्में केलीं तरी त्यांस तीं बंधक होत नाहींत.) या ठिकाणीं कोणता योग विवक्षित आहे बरें ? जर कर्मयोग असेल तर " कुर्वन्नपि " असें म्हणावयास नको होतें. कारण कर्मयोगीच तो ! त्याचा कर्म हाच नित्यधर्म अथवा अव्यभिचरित धर्म असल्यामुळें " त्यानें कर्में केलीं तरी " असें म्हणणें युक्त होणार नाहीं, हें उघड आहे. कर्म हें योगाचें एक अंग आहे.

तपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोगः ॥ १

योः सू० साधनपाद.

रहस्यकारांची दृष्टि पूर्ण कर्मपर झाल्यामुळें हें अंगच प्रधान धरून ' योगास ' कर्मान्यव्यावृत्ति त्यांनीं आणली आहे. पुढें याच अध्यायांत भगवान् म्हणतातः–

शक्नोति इहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३
योन्तः सुखोऽन्तरारामस्तथांतर्ज्योतिरेव यः ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥ २४

काम व क्रोध (मागें तिसऱ्या अध्यायांत सांगितलेले "काम एष क्रोध एष"इ.नें) यांचा वेग ज्यानें देहवान् असतांनाच सहन करण्याचें सामर्थ्य मिळविलें आहे; त्याला ' युक्त ' व सुखी म्हणतात. जो अंतःसुख, अंतराराम व अंतर्ज्योति झाला असा ' योगी ' ब्रह्मभूत होऊन निर्वाणपदाप्रत जातो.

पुढें अध्याय सहावा श्लोक ८ पहाः—

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ।
'युक्त' इत्युच्यते ' योगी' समलोष्टाश्मकांचनः ॥ ८

.....

'योगी' युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १०

ज्ञानविज्ञानांनीं ज्याचें मन तृप्त झालें आहे, जितेंद्रिय होऊन जो कूटस्थ झाला आहे म्हणजे ब्रह्मीभूत झाला आहे त्या योग्यास युक्त असें म्हणतात व तो माती, दगड व सुवर्ण एकसारखेंच पहातो.

पहा या ठिकाणीं पूर्वी भगवानांनीं दिलेलें " समत्वं योग उच्यते " हें लक्षण बरोबर लागतें कीं नाहीं. भगवंतांनीं हा शब्द ठिकठिकाणीं स्पष्ट केला आहे.

वरील दहाव्या श्लोकांत तर पातञ्जलयोगच स्पष्टपणें दिसत आहे. येथें रहस्यकार व त्यांचे अनुयायी म्हणतील कीं, हा सहावा अध्याय पातंजलयोगपर आहे हें आम्हींच म्हटलें आहे. हें बरोबर आहे, परंतु आमचे मतें " योगशास्त्रे " हा संकल्प सर्व ठिकाणीं केवल पातंजलयोगासच लाविला आहे. आपणास तर जेथें तेथें कर्मच दिसत आहे. आमचा नाइलाज आहे. आपलें कर्म, दुसरें काय!

वाचकहो पुन्हां, आपण याचे स्पष्टीकरणार्थ श्रीकृष्णाकडेच धांव घेऊं, अथवा अर्जुन, श्रीकृष्णाचें सांगणें कशा स्वरूपाचें समजतो तें पाहूं.

अर्जुन उवाचः--

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः ' साम्येन ' मधुसूदन ।
एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥ ३३

याच सहाव्या अध्यायांत या श्लोकांत अर्जुन म्हणतो, जो हा साम्याचा योग कृष्णा, तूं मला सांगितलास तो मी चंचल असल्यामुळें माझेठायीं स्थिर होणार नाहीं, यावरून तरी दुसऱ्या अध्यायांत " समत्वं योग उच्यते " या लक्षणानें लक्षित असा जो योग तोच या ठिकाणीं म्हणजे सहाव्या अध्यायांत " साम्येन " शब्दानें विवक्षित आहे याबद्दल कोणाही निःपक्षपाती मनुष्याची खात्री होईल, असें आम्हांस वाटतें.

अध्यायाचे शेवटीं " कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन " असें म्हटलें आहे. तेव्हां योग व कर्म हे पर्यायशब्द आहेत असें म्हणतां येईल काय ? असो. सातव्या अध्यायाच्या आरंभीं,

मय्यासक्त-मनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १

माझ्या ठिकाणीं मन आसक्त करून योग माझ्या आश्रयानें लाव म्हणजे निश्चयेंकरून माझें सर्व ज्ञान तुला कसें होईल तें सांगतों, ऐक. यापुढें भक्तियोग सांगण्यांत आला आहे. परंतु रहस्यकारांचे मतें अशी योजना लावणें इष्ट नाहीं. त्यांचा हा शोध अपूर्व आहे खरा ! भक्तियोगाबद्दल पुढें स्वतंत्र विवेचन होईलच. येथें एवढेंच सांगणें इष्ट आहे कीं

" ईश्वरप्रणिधानाद्वा " ॥ २३ ॥

असें पातंजल सूत्र आहे त्यास धरून हा भक्तियोग गीतेंत सांगितला आहे हें उघड आहे. कारण दहाव्या अध्यायाचे दहावे श्लोकांत भगवान् म्हणतातः-

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकं ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥ २०

या ठिकाणीं वरील सूत्र किती सोपपत्तिक लागू पडत आहे याचा विचार करा. व आतां तरी योग म्हणजे बुद्धीचें समत्व याशिवाय दुसरें कांहीं नाहीं असें चित्तांत दृढ करा.

दहाव्या अध्यायांतीलच सातवा श्लोक पहाः—

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्वतः।
सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्रसंशयः ॥ ७

हा श्लोकही " ईश्वरप्रणिधानाद्वा " या सूत्रानुरूपच असून त्या सूत्राचाच अनुवाद आहे असें असतां ' योग ' शब्द आल्याबरोबर रहस्यकारांना " कर्मसु कौशलम् " याची कशी भ्रान्ति होते तें पहा. या श्लोकांचें भाषांतर करतांनां त्यांना ' युक्ति ' शब्द घालण्याचा मोह पडतो व " योगेन युज्यते " म्हणजे " त्याला स्थिर कर्मयोग प्राप्त होतो " असें भाषांतर करण्याची हौस वाटते, याला संस्कृतज्ञ व समचित्त वाचक काय म्हणतील याचा विचार करा. केव्हां केव्हां अगदींच न जुळेल तेथें " समत्वयोग " असें ते घालतात परंतु "युक्ति," "कौशल्य" हे शब्द त्यांचे फार प्यारे आहेत.

सर्व योगांत भक्तियोग श्रेष्ठ असें भगवानच सांगतातः—

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २

अ० १२.

सर्व योग्यांमध्यें ईश्वरप्रणिधानानें सिद्ध झालेला योगीच भगवानास सर्वापेक्षां प्रिय आहे असा या श्लोकाचा भाव आहे. रहस्यकारांनीं "कर्मफलत्याग" "समत्व" व ' कर्मसु कौशलम् ' अशा तिन्हीहि शब्दांचा निरनिराळ्या वेळीं आश्रय केल्यामुळें त्यांना मधून मधून त्यांचे मतें पळण्यास वाट राहिली आहे.

वाचकहो, तुमचा कर्मफलत्याग म्हणजेच योग नव्हे हे भगवान् श्रीकृष्णांचेच वचनावरून पहाः—

अभ्यासेऽप्यसमर्थोसि मत्कर्मपरमो भव।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १०
अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११

(माझ्या योगाचा अभ्यास करण्यास तूं जर असमर्थ असलास तर जें जें करशील तें तें माझ्याकरितां करीत जा. हेंही करण्यास तूं असमर्थ असलास तर मग निदान सर्व कर्मफलत्याग तरी कर.) तेव्हां ह्या श्लोकांत रहस्यकारांची

"युक्ति" अथवा "कर्मफलत्याग" हे शब्द योगाचे ठिकाणीं घालून पहा व अर्थ लावा म्हणजे भ्रांति दूर झाल्यास होईल.

भगवंतांनीं आपल्याकडून ' योगी ' ' युक्त ' ' योग ' अशा शब्दांची ठिकठिकाणीं चांगली छाननी केली असतां " बीचमे मेरा चांदभाई " सारखें युक्ति, कर्में करण्याची युक्ति जेथें तेथें घुसडून देऊन जो गीतार्थात रहस्यकारांनीं गोंधळ माजवून टाकला आहे तो इतरांचे ठिकाणीं कोणास रुचला नसता.

आमचे मतें "योगशास्त्रे" याचा अर्थ "बुद्धियोगशास्त्रे" "बुद्धिसाम्यावस्थाशास्त्रे" असा निश्चयेंकरून आहे. वर " योग व युक्त " वगैरे शब्दांविषयीं भगवद्गीतेंतील जे जे उतारे दिले आहेत त्यांवरून हें सिद्ध होत आहे. कोठेंही झालें तरी साम्यावस्थेशिवाय सिद्धि नाहीं. कर्म घ्या, उपासना (भक्ति) घ्या अथवा ज्ञान घ्या, सर्वांत सिद्धि मिळावयाची ती बुद्धियोगानेंच मिळत असते. हें समत्व आल्याशिवाय ज्ञान स्थिर होत नाहीं, भक्ति अनन्य होत नाहीं, कर्म अबंधक होत नाहीं. " तस्मात् योगी भवार्जुन " असा भगवंतांनीं वारंवार याकरितांच अर्जुनास बोध केला आहे. कर्म, उपासना, ज्ञान या तिहींचें योगयुक्त मनानें व योगसिद्ध मार्गानें भगवंतांनीं विवेचन केलें आहे. म्हणूनच "योगशास्त्रे" असें पद दर संकल्पांत पठित आहे; व हा योग म्हणजे सहाव्या अध्यायांत सांगितलेला पातंजल योगच होय.

योगः चित्तवृत्तिनिरोधः ॥ २ ॥
तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ॥ ३ ॥

या दोन्ही सूत्रांत जो विवक्षित योग तोच भगवद्गीतान्तर्गत योग होय, हें वरील उताऱ्यावरून व विवेचनावरून समजून आलेंच असेल. आतां येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, नुसता चित्तवृत्तींचा निरोधच योग शब्दानें घ्यावयाचा नसून चित्तवृत्तिनिरोध करून ती चित्तवृत्ति अन्तर्मुख करून आत्म्याचेठायीं लावणे व प्रमादरहित तेथें स्थिर करणें असें समजावयाचें आहे. " तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् " ह्या सूत्रांतील अर्थही त्यांत पूर्ण अभिप्रेत आहे.

याच योगानें स्वाराज्य मिळतें म्हणजे स्वरूपप्राप्ति होते असें मनु म्हणतो.

सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
समं पश्यन्नात्मयाजी स्वाराज्यमधिगच्छति ॥

अ० १२, श्लो० ९१.

भावार्थः—सर्व भूतांचे ठिकाणीं आपलें स्वरूप व सर्व भूतें आपले स्वरूपांत पाहतो अशी ज्याची समबुद्धि झाली तो आत्म्याचें यजन करणारा मनुष्य मुक्त होतो.

महाभारतान्तार्गत शांतिपर्वांत स्वतः व्यासांनीं आपल्या पुत्रास म्हणजे शुकास ज्ञानोपदेश केला आहे. अध्याय २३७ यांत सांख्ययोग सांगून योगापासून तो

कसा निराळा नाहीं हें दर्शविलें आहे. सांख्ययोग व योग हीं दोन्ही दर्शनें वास्तविक एकच आहेत. दोहींतही पंचवीस तत्वेंच आहेत. पुरुष, प्रकृति, महत्, अहंकार, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, मन, पंचतन्मात्रा (महाभूतांचे सूक्ष्म बीजांश) व पंचमहाभूतें मिळून हीं पंचवीस तत्वें. या सांख्ययोगाचें सविस्तर वर्णन या अध्यायांत आलेलें आहे. स्थलसंकोचास्तव व विषयांतरभीतीमुळें तें येथें देतां येत नाहीं. तथापि येथें एवढें सांगणें अवश्य आहे कीं, भगवद्गीतेंत जे सांख्य व योग सांगितले आहेत तेच या अध्यायांत महर्षि व्यासांनीं शुकास सांगितले आहेत. भगवद्गीता लिहिणारा व्यास ऋषि व हा सांख्ययोग सांगितलेला ऋषि एकच असें रहस्यकारांना वाटत असल्यास हा अध्याय पुन्हां एकदां त्यांनीं सटीक वाचावा. म्हणजे भगवद्गीतेंत योग शब्दाचा अर्थ काय करावयाचा याचा त्यांना संदेह राहणार नाहीं.

छिन्नदोषो मुनिर्योगान्मुक्तो युंजीत द्वादश।
देशकर्मानुरागार्थोपायापायनिश्चयः ॥ २
चक्षुराहारसंहारैर्मनसा दर्शनेन च ।
यच्छेद्वाङ्मनसी बुद्ध्या य इच्छेज्ज्ञानमुत्तमम् ॥ ४
ज्ञानेन यच्छेदात्मानं य इच्छेच्छांतिमात्मनः ।
.....

हा द्वादश प्रकारचा योग (देश, कर्म, अनुराग, अर्थ, उपाय, अपाय, निश्चय, चक्षु, आहार, संहार, मन आणि दर्शन) सांख्याचा योग होय. " यच्छेद्वाङ्..... आत्मनः " पर्यंत चवथ्या श्लोकाचा उत्तरार्ध व पांचव्याचा पूर्वार्ध यांत " यच्छेद्वाङ्मनसि प्राज्ञः " इ० कठश्रुतींतील सांख्ययोगाचाच अनुवाद आहे. आतां सांख्यनिष्ठाची स्थिति वर्णन करितात.

निर्ममश्चानहंकारो निर्द्वंद्व-च्छिन्नसंशयः ।
नैव क्रुध्यति न द्वेष्टि नानृता भाषते गिरः ॥ ३४
.....
सर्व-भूतसदृङ्मैत्रः समलोष्टाश्मकांचनः ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ ३८

ह्या दोन्हीं श्लोकांतील सांख्यनिष्ठाचें वर्णन व भगवद्गीतेंतील वर्णन हीं वाचकांनीं ताडून पाहावीत. पुढें " एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति " या गीतोक्तिपुष्ट्यर्थच जणूं काय व्यास ह्या अध्यायांत म्हणतातः—

यथा योगाद्विमुच्यंते कारणैर्यैर्निबोध तत् ।
योगैश्वर्यमतिक्रांतो यो निष्क्रामति मुच्यते ॥ ४०

इत्येषा भावजा बुद्धिः कथिता ते न संशयः ।
एवं भवति निर्द्वंदो ब्रह्माणं चाधिगच्छति ॥ ४१

योगसामर्थ्यानें ज्या अणिमादि सिद्धि प्राप्त होतात त्यांचा अव्हेर करून परम वैराग्यानें जो पलीकडे जातो तोही मुक्त होतो. सांख्य व योग यांमधील भेद वास्तविक नसून शास्त्रकाराचे भाषनेचा फक्त भेद आहे. दोहींचें फल एकच आहे. (यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते) सांख्यास व योगास योगसाधनांची अपेक्षा आहेच हें वर दिलेल्या सांख्ययोगप्रकारावरून लक्षांत आलेंच असेल. कार्यांचा कारणांत लय करीत करीत अखेर सर्वोपाधींचा लय झाल्यावर अभेदानें जें उरतें तेथें योगी स्थिर होतो. प्रकृति व तिचा पसारा यांचा प्रत्येक उत्क्रांतिरूपानें बनलेला कार्यसंभार स्क्रूच्या पेचाप्रमाणें उलट दिशेनें फिरवीत मागें मागें अथवा वरवर गेलें पाहिजे. मिथ्यात्वदृष्टीनें या सर्वांचा लय करावयाचा आहे, याला धारणा साधण्यास योगाचा आश्रय करावाच लागतो. योगांत बाह्यवृत्ति, चित्तवृत्ति ह्या सत्य मानिल्या आहेत. वृत्तींची विषयाकारता सत्य मानिली आहे, एवढाच भेद आहे. म्हणूनच योगशास्त्रांत योगलक्षण ' चित्तवृत्तिनिरोधः ' असें केलें आहे. वृत्तींचा निरोध झाला म्हणजे बाह्यविषयापासून वृत्ति पराङ्मुख होऊन व ती प्रत्यङ्मुख बनली म्हणजे तीच वृत्ति साक्षिरूप बनते. एवंच दोहींचें कार्य एकच आहे. चित्त हेंच जगद्रूपी वृत्तीचें कारण आहे अथवा चिदचिद्ग्रंथींचेंच चित्त झालेलें आहे. ह्यालाच अचिद्वस्तूपासून निवृत्त करणें व चिद्रूप करणें हेंच साध्य आहे विषयांचा मिथ्यात्वभासानें निरास होवो अगर कारणरूपी चित्ताचा साक्षींत लय होऊन निरास होवो, कसेंही असलें तरी प्रपंच-निरास व परप्राप्ति दोहींतही समानच आहेत. " योग " हा ब्रह्मप्राप्तीस साधनीभूत आहे हें निर्विवाद आहे. ब्रह्मसूत्रांत " एतेन योगः प्रत्युक्तः " (अ० २ अधि० २ सू० ३) या सूत्रानें व्यास महर्षीनीं सांख्ययोगाचें खंडन केल्यावर त्याच खंडनाचा योगावर अतिदेश केला म्हणजे सांख्यविचारांत योग गतार्थ झाला असें म्हटलें आहे. या सूत्रावरील शांकरभाष्य पाहिल्यास सांख्य व योग हे बहुंशीं एकच आहेत असें दिसून येईल. दोन्हीही योग तत्वदर्शनाचे कामीं उपकारकच आहेत. म्हणून सांख्य शब्दापुढें सुद्धां ' योग ' हा शब्द श्रुतींत आढळतो.

" तत्कारणं सांख्ययोगाभिपन्नं ज्ञात्वादेवं मुच्यते सर्वपाशैः
श्वेताश्वे० उ० ६।१३.

तसेंच भगवद्गीतेंतहीः—

ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २४

(पातंजलयोगानें, कोणी साधक आत्म्यास ध्यानानें आपल्या ठिकाणीं पाहातो, कोणी सांख्ययोगानें पाहातो. कोणी कर्मयोगानें पाहातो,) असें म्हटलें आहे. ' योग ' शब्द सांख्यास मुद्दाम भगवंतानीं लाविला आहे.

इतक्याउप्परही ' योग ' म्हणजे ' कर्मकौशल्य ' योगशास्त्र म्हणजे ' कर्मयोगशास्त्र ' असें आग्रहानें घट्ट धरून बसण्याचा हट्ट रहस्यकार करीत असतील तर खुशाल करोत. परंतु पुन्हांही त्यांना आमची आग्रहपूर्वक विनंति आहे कीं, त्यांनीं महाभारतान्तर्गत शांतिपर्वांतील अध्याय ३०० व ३०१ पाहावे व तेथें योग व सांख्य-योग यांचें सविस्तर भेदकथन धर्माचे विचारण्यावरून भीष्मांनीं सांगितलें आहे. हेच दोन मार्ग त्याच भारतकार व्यासांनीं गीतेंतही घातलेले आहेत, या व्यासविवेचनावरून तरी " योग म्हणजे बुद्धीचा आत्म्याशीं योग " म्हणजे पातंजल योग होय हें त्यांना स्पष्ट समजून येईल.

५ सुखदुःखविवेक योग.

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥

अ० २ श्लोक १४.

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं ज्ञानमुत्तमं ।
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥
युञ्जन्नेवं सदाऽत्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥

अ० ६ श्लोक २७-२८.

या नूतन कर्मयोगशास्त्राच्या भव्य इमारतीच्या चार दिशेचा पाया झटला ह्मणजे उपक्रमोपसंहार, योग–शब्दवाच्य कर्मे करण्याची युक्ति, सुखदुःखविवेक व वर्णाश्रमधर्माचें गौणत्व असा चतुर्विध आहे. याशिवाय इमारतीच्या बळकटीचीं उपांगें आहेत; परंतु त्यांचा विचार स्वतंत्र प्रकरणांत न करितां मधूनमधून यथावकाश करण्यांत येईल. आतां 'सुखदुःखविवेक' योगानें रहस्यकारानीं आपल्या उद्दिष्ट कर्मयोगशास्त्रास कशाप्रकारें पुष्टि आणण्याचा प्रयत्न केला आहे याबद्दल विचार करूं या. त्यांच्या सुखदुःखविवेकरूपी गुटिकेचें अनभिज्ञ जिज्ञासूनीं सेवन केल्याबरोबर त्यांच्या शरीरस्थ दोषांचें निरसन होऊन पुढील कषाय, चूर्ण, पाक, भस्में त्यांच्या चांगलीं पचनीं पडतील अशी रहस्यकारांची योजना आहे. या सुखदुःखविवेकास आरंभ केल्याबरोबर श्रुति, स्मृति व स्वतः भारतकार या सर्वांना त्यांनीं पूर्व–पक्षकार करून त्यांचे तोंडून पूर्वपक्ष वदविला आहे. नंतर क्रमाक्रमानें हा पूर्वपक्ष अगदीं फेंटाळून लावून पूर्वपक्षकारांना चित केल आहे व या काल्पनिक जयाचे भरांत अथवा डौलांत आपला उत्तर–पक्ष अथवा सिद्धान्त मोठ्या गौरवानें मांडला आहे. या प्रकरणांत त्यांच्या अभीष्टास विघातक असे जे जे ऋषि अगर श्रुतिभाग आले त्या त्या सर्वांना त्यांनीं अर्धचंद्र दिला आहे, मग ते प्रत्यक्ष महाभारतकार अगर गीताकार श्रीव्यास असेनात ! त्यांची त्यांनीं करुणा केली नाहीं. असो. याच शैलीस अनुसरून महाभारतान्तर्गत सुखदुःखलक्षण दोषार्ह असल्याचें त्यांनीं दाखविलें आहे. "यदिष्टं तत्सुखं प्राहुर्द्वेष्यं दुःखमिहेष्यते" (जें इष्ट तें सुख व द्वेष्य तें दुःख) ह्या लक्षणांत इष्टवस्तूंचा समावेश होईल, परंतु तें इष्ट नाहीं, असा अतिव्याप्तीचा दोष या लक्षणावर बसवून नंतर नैया-

यिकांचें सुखदुःखलक्षण सांगितलें आहे व या लक्षणापेक्षां निर्दोष असें दुसरें लक्षण देतां येणार नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे. " अनुकूलवेदनीयं सुखं प्रतिकूलवेदनीयं दुःखं " हेंच तें लक्षण होय. यापैकीं पहिलें लक्षण व दुसरें लक्षण या दोहींत रहस्यकारांना काय अंतर दिसलें असेल ते असो. ' यदिष्टं तत्सुखं ' यांत जर गोड पाण्याचा समावेश होतो असें रहस्यकारांना वाटतें तर मग ' अनुकूलवेदनीयं ' मध्यें पुष्पशय्येचा अगर अत्तरांचा समावेश कां होऊं नये ? वेदनीय ह्मणजे वेदना नव्हे. वेदनीय ह्मणजे वेद्य. वेत्ता, वेद्य व वेदना अशा प्रकारचे ज्ञानाचे तीन प्रकार होतात. अनुकूल असें जें वेदनीय तें सुख. वेदनीय म्हणजे वेदनेचा विषय. असें असतां रहस्यकारांनीं त्याचा अर्थ वेदना असा केला आहे तों चुकीचा आहे. 'गुणत्वे सति' हें पद या लक्षणाच्या पाठीमागें अध्याहृत घेतलें पाहिजे. कारण न्यायशास्त्रांत सुखदुःख हे गुण समजण्यांत आले आहेत. तीं द्रव्यें नव्हत. हींच पदें वरील भारतकारांचे लक्षणांत अध्याहृत ध्यावयाचीं आहेत. तशीं घेतलीं म्हणजे दोन्ही लक्षणें निर्दोषच आहेत असें दिसेल. पुढें आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक असें सुखदुःखांचें त्रिधा वर्गीकरण अमान्य करून मग आध्यात्मिक व आधिभौतिक असें द्विधा वर्गीकरण केलेलें आहे. सुखदुःखलक्षणांत व वर्गीकरणांत हा जो रहस्यकारांनीं भेद केला आहे त्याबद्दल आमचें कांहीं फारसें म्हणणें नाहीं ! कारण या प्रक्रियाभेदांमुळें मूळ सिद्धान्तांत कांहीं फरक होत नाहीं. पूर्वपक्ष म्हणून जो रहस्यकारांनीं मांडला आहे तो भर्तृहरीच्या शब्दांनीं असा आहेः—

प्रतीकारो व्याधेः सुखमिति विपर्यस्यति जनः।

तान्ह लागणें, भूक लागणें, कामासक्त होणें इ० व्याधींचें उपशमन केल्यामुळें जी वेदना (वेदनः या शब्दाचा रूढ्यर्थ 'कळ' 'दुःख' असा आहे तो येथें विवक्षित नाहीं) उत्पन्न होतें तें सुख असा लोक सुखाचा विपर्यास करितात.

तसेंच महाभारतांतीलः—

तृष्णार्तिप्रभवं दुःखं दुःखार्तिप्रभव सुखम्

ह्या पंक्ति पूर्वपक्षांत ढकलून रहस्यकारांनीं स्वतः आपल्या शब्दांनीं पूवपक्षाची मांडणी केली आहे. ते म्हणतातः—" सारांश मनांत प्रथमतः एखादी आशा, वासना, अगर तृष्णा उत्पन्न होऊन तीपासून दुःख होऊं लागल्यावर मग सदर दुःखाचें जें निवारण होतें तें सुख होय. किंबहुना मनुष्याच्या संसारांतील सर्व प्रवृत्ति वासनात्मक किंवा तृष्णात्मकच असून सर्व सांसारिक कर्मांचा त्याग केल्याखेरीज तृष्णेचा पुरा बीमोड होत नाहीं व तृष्णेचा पुरा बीमोड झाल्याखेरीज खऱ्या व नित्य सुखाची प्राप्ति होणें शक्य नाहीं, असें यापुढें दुसरेंही अनुमान या पंथांतील लोकांनीं काढलेलें आहे. "

पुढें बृहदारण्यकश्रुति, जाबालश्रुति, अष्टावक्रगीता, अवधूतगीता यांचा या पूर्वपक्षसमूहांत नामनिर्देश करून गीताकार व्यासाच्या महाभारतान्तर्गत मंकिगीतेंतील एक अवतरण पूर्वपक्षसूत्रभूत देऊन मग सिद्धान्तावतरण केलें आहे.

यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् ।
तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ॥

हा मंकिगीतेंतील श्लोक आपल्या कर्मयोगशास्त्रास प्रतिकूल आहे म्हणूनच त्याची मांडणी त्यांनीं पूर्वपक्षांत केली आहे. अर्थात् जैन बौध या धर्मांसमुद्धां पूर्वपक्षांत ढकलणें त्यांना भाग आलें.

पुढें हा पूर्वपक्ष खोटा आहे, असा निर्देश केला आहे. " सर्व सुख तृष्णादि दुःखांच्या निवारणापासूनच उत्पन्न होतें हें संन्यासमार्गीयांचें म्हणणेंच आधीं सर्वस्वी खरें मानितां येत नाहीं " असा पूर्वपक्ष निरास करून पुढें १०८ पानांत सिद्धान्त केला आहे.

" पण आपणांस प्राप्त झालेल्या स्थितींतच कुजत न राहतां तींत यथाशक्ति शान्त व समचित्तानें उत्तरोत्तर अधिकाधिक सुधारणा करीत राहून ती शक्य तेवढ्या उत्तमावस्थेस आणण्याची जी इच्छा तिला मूलभूत हेणारा जो असंतोष तो कधींच गर्ह्य मानितां येत नाहीं " " सारांश असंतोष हा सर्व भावि उत्कर्षाचें, प्रयत्नाचें, ऐश्वर्याचें व मोक्षाचेंही बीज आहे. "

रहस्यकारांनीं पूर्वपक्षाचा निरास कोणत्या उपायांनीं केला आहे हें आतां पाहूं. ३। उपाय इतर ग्रंथविस्ताराचे मानानें फारच त्रोटक आहे. या प्रकरणावर स्वतंत्र लांबलचक व पुनरुक्तिप्रचुर असें त्यांनीं कांहीं भारूड लिहिलेलें नाहीं. साधारण अभ्यासमुद्धां समजेल अशा खडीसाखरेसारख्या गोड दृष्टांतांनीं सदर पूर्वपक्ष नाहींसा केला आहे, हे दृष्टांत खालीं दिल्याप्रमाणें आहेतः—

१ रोज जेवणापूर्वी मनुष्यास दुःख होतेंच असें नाहीं.

२ एका लहान मुलाच्या तोंडांत अकस्मात् खडीसाखरेचा एक खडा घातला, तर त्यापासून त्याला जें सुख होईल तें तृष्णाक्षयानें झालें असें म्हणतां येणार नाहीं.

३ वाटेनें चालत असतां मध्येंच एखादी रमणीय बाग लागून कोकिळेचा मंजुळ शब्द कानीं पडला तर त्यापासून झालेला आनंद हा पूर्वेच्छाजन्य नव्हे.

४ कित्येकदां मनुष्याचे हातून प्रयोजनाखेरीज नुसता बडबडीसारखा इंद्रियव्यापार घडत असतो त्यांतच त्यास सुख वाटत असतें.

५. लहान मुलें प्रथम चालावयास शिकतात त्या वेळीं त्यांना उगीच इकडे तिकडे हिंडण्यांत मौज वाटत असते.

या पांच दृष्टान्तांनीं पूर्वपक्षाचें खंडन करण्यांत आलेलें आहे. क्रमशः प्रत्येक दृष्टान्त आतां आपण पाहूं.

एखादा मनुष्य जेवणास बसण्याचे पूर्वी त्याला क्षुधा असली पाहिजे अगर नसली पाहिजे असे दोन पक्ष संभवतात. पहिल्या पक्षांत तीव्र व मंद् क्षुधा असे दोन पक्ष होतील. क्षुधा तीव्र असो वा मंद् असो ती एक जठरांतील अथवा शरीर-यंत्राचें चुलवणांतील अग्नीप्रमाणें आहे. त्या अग्नीस इंधनाची आवश्यकता अस-ल्यामुळें इंधनाशिवाय आगगाडीचें एंजिन जसें कांहीं करूं शकणार नाहीं तसें अन्नाशिवाय शरीरयात्रा चालणार नाहीं हें उघड आहे. आतां आगगाडीच्या एंजि-नाची भूक अथवा गरज बघण्यास जशा स्वतंत्र व्यक्तीची योजना केलेली असते तद्वतच प्राणिमात्राचे ठिकाणीं ही गरज दर्शविणारी योजना म्हणजे भूक करून ठेविलेली आहे. प्राणी आपल्या उद्दिष्ट कामांत कितीही गढून गेलेला असला तरी त्यास जागें करणारी ही भुकेची घंटा ठेवली आहे म्हणूनच ठीक आहे. ही भूक नसती तर प्राणी जेवले नसते. भूक ही अन्नाची गरज सांगणारी दूत होय. गर-जेच्या कमी अधिक प्रमाणानें हिचा उपद्रव प्राणिमात्रास सारखा होत असतो. ही शरीरयंत्रांतील गरज अथवा उणीव अगर इच्छा नाहींशी करणें अगर तिचा उप-शम करणें म्हणणें जेवणें. समजा, क्षुधा तीव्रतम लागलेली आहे म्हणजे शरीरास अन्नाचा गोळा अगदीं घालावयासच पाहिजे आहे, अशा वेळीं मोठ्या श्रीमंतास सुद्धां चटणीभाकर पक्कान्नाप्रमाणें स्वादिष्ट लागेल. हा अनुभवात्मक विषय असल्या-मुळें यांत मतभेद रहाणें शक्य नाहीं. समजा, क्षुधा विशेष तीव्र नाहीं. रोजची वेळ आहे. तर त्यावेळीं रोज खात असलेलें अन्न प्रिय लागतें. याला कारण अर्थात् पोटांत असलेली मंद भूक अथवा गरज हीच होय. आतां दुसऱ्या पक्षाचा विचार करूं. समजा भूक मुळींच नाहीं. अशी स्थिति घ्यावयाची म्हणजे एका रोग्याची अगर आकंठ पक्कान्न भोजन करून लोळत असलेल्या ढेरवऱ्या ब्राह्मणाची घेऊं. समजा, विषमतापानें लोळत असलेल्या रोग्यापुढें पक्कान्नाचें ताट ठेविलें व त्यास त्यांतील जिन्नस बळेंच खाऊं घातले तर त्या रुग्णास आनंद अगर सुख वाटेल काय ? जठरांतील अग्नि जेथें मंदावला तेथें क्षुधारूपी गरज नाहीं व गरज अगर इच्छा नाहीं तेथें ती नाहींशी करण्यांत सुखही नाहीं. तसेंच लोळत पडलेल्या ब्राह्मणापुढें अगर ब्राह्मणाचे तोंडांत बळेंच जिलबी घातली तर त्यापासून त्या ब्राह्मणाला सुख न होतां उलट उलटी होण्याचे क्लेश मात्र होतील. तेव्हां अन्नाचे सेवनांत स्वतंत्र सुख नसून तें भुकेंत किंवा देहाचे गरजेंतच आहे हें कोणासही सम-जण्यासारखें आहे.

आतां दुसऱ्या दृष्टान्ताकडे वळूं. एका लहानशा मुलाचे तोंडांत खडीसाखरेचा खडा घालूं. लहानशा मुलालाच काय, वृद्ध मनुष्याला सुद्धां खडी साखरेच्या खड्यानें थोडा संतोष होईल. पण या संतोषांतील बीज काय हें आपण सूक्ष्म विचारानें पहा. खडी साखर, मध, आपूस अगर पायरी आंब्याची स्वादिष्ट फोड ह्या स्वभावतः मोहक पदार्थांनीं जिव्हेंत अनुकूल वेदना होते ही गोष्ट खरी आहे. परंतु या अन-

कूल वेदनेच्या बुडाशीं पाहूं गेलें असतां सूक्ष्म, बीजरूप (latent) इच्छाच आहे हें कळून येईल. समजा, असे खडीसाखरेचे खडे एक गोणीभर तोंडांत आधीं घातले, अगर पायरी आंब्याचा रस परात भरून घोट्यानें एखाद्यास पाजून मग त्या धटिंगणापुढें खडी साखरेचा एक नाजूक खडा अगर पायरी आंब्याची चाकूनें काढलेली बारीकशी फोड ठेवली तर परिणाम काय होईल पहा ! अर्थातच त्यांची दोघांचीही पूर्ण तृप्ति अगर इच्छाशून्यत्व झालें असल्यामुळें त्यांना आतां सुख होणार नाहीं. जर खडी-साखर अगर मध ह्यांमधील सुख-गोडी नव्हे—इच्छेवर अवलंबून नसतें तर तें सदैव सुखकारकच झालें असतें. आतां साखर गोड केव्हांही लागेल. परंतु ही नुसती चव झाली. गोड चवीपासून सदैव सुखच होतें असें नाहीं. कित्येक वेळां ती शिसारीही उत्पन्न करते. सारांश बीजरूपानें इच्छा असल्याशिवाय पदार्था-पासून सुख व्हावयाचें नाहीं, हा सिद्धान्त अबाधित आहे. मनुष्यांत अगर इतर प्राण्यांत सर्वकाळीं सर्वच इच्छा सारख्या उद्भवत नसतात. कामेच्छा, भूक, तहान, निद्रावशता, पुत्र अगर कन्याभेटीची इच्छा, गायनलुब्धता, शिकारीची इच्छा, खेळण्याची इच्छा इ० इ० सर्व इच्छा जर मनुष्यांत एक-कालींच प्रादुर्भूत होतील तर मनुष्याचा जन्म दुःसह होऊन बसेल. भूक अगर तहान असल्यावेळीं कामेच्छा असणार नाहीं म्हणजे प्रादुर्भूत असणार नाहीं, निद्रावशतेंत खेळण्याची इच्छा व्यक्त असणार नाहीं, असाच सर्व प्रकार आहे. सर्व इच्छासमूह मनुष्यांत असतोच. परंतु अनुकूल काल, देश, परिस्थिति, नैसर्गिक शरीरस्थिति वगैरे बाह्य व अंतःपरिस्थितीस अनुसरून एखादी वासना व्यक्तत्वास पोंचते. व्यक्त वासनेपुरताच जर विचार करावयाचा झाला तर प्रत्येक मनुष्याच्या दिवसांतून अनेक वेळां येणाऱ्या औदासीन्य (म्हणजे अमुक इच्छा बलवान् अगर व्यक्त नसलेली दशा) वृत्तिवरून प्रत्येकजण साधुच होऊं पाहील. व्यक्तेच्छे(Kinetic desire)-वरूनच नुसती प्राण्याच्या इच्छासंघाची कल्पना करणें अशास्त्रीय होय. प्रत्येक प्राण्यांत सूक्ष्म अथवा क्षणैक निद्रिस्त अशा किती वासना असतात याची कल्पना प्रत्येकास आहेच. या वासना त्या त्या इंद्रियगोलकांत लीन (latent) असतात. म्हणजे त्या देहांत नाहींतच असें म्हणणें शहाणपणाचें नव्हे. रहस्यकारांनींसुद्धां ही अशास्त्रीय पद्धति कां स्वीकारली हें समजणें कठीण आहे. आतां ते कदाचित् म्हणतील, "यासाठींच आह्मी लहान मुलाच्या तोंडांत खडीसाखर घातली होती. तान्ह्या मुलानें कधीं गोड पदार्थ खाल्ला नसतां व त्याची त्यास मळींसुद्धां कल्पना नसतां मधाचें बोट तोंडास लावल्याबरोबर तें चोखूं लागतें. तेव्हां जो पदार्थ मुलानें खाऊन पाहिला नाहीं त्याची अर्थात् मुलांस कल्पना नाहीं म्हणजेच इच्छेचा संभव नाहीं. असें असतां सुख कां होतें ?" हा प्रश्न तर अगदीं अडाणी मनुष्या-च्या प्रश्नासारखा दिसतो. ज्यानें उत्क्रान्तिवादाचीं पारायणें केलीं आहेत त्या मनु-

व्यास हा प्रश्न अगदीं शोभत नाहीं. उत्क्रांतिवाद (Evolution theory) ज्यानें वाचला आहे त्यास शरीर, प्राण, मन, बुद्धि, आत्मा, इच्छा, स्वभाव हीं सर्व बऱ्याच अंशीं वंशपरंपरागत आहेत हें पूर्ण माहीत असतें. कोंबड्याचे पिलांस उडतां कसें येतें, मांजराच्या पिलांस उंदरावर झाप कशी घालतां येते, मनुष्यास पायावर चालण्याची बुद्धि कां होते वगैरे जिज्ञासेचीं सोपपत्तिक उत्तरें हा उत्क्रांतिवाद देत असतां असें आडरानांत शिरण्याचें कारण काय ! इच्छा हा वंशानुगत (Hereditary acquisition) धर्म आहे हें रहस्यकार या वेळीं अगदीं साफ कसे विसरले ! गाण्याची, सुंदर पदार्थ पाहाण्याची, चांगल्या पदार्थांची चव घेण्याची, कामेच्छा तृप्त करण्याची इ० सर्व वासना प्राणी आपल्या पूर्वजांच्या पिंडांतूनच घेतो असा उक्रांतिवादात्मक पक्ष घ्या अगर पुनर्जन्मावर श्रद्धा असल्यास पूर्वजन्मार्जित वासनारूपी देह जशाचा तसाच या देहांत असतो हें मत घ्या, प्रत्येक प्राण्यांत व्यक्त व अव्यक्त अनंत वासना असतात हें पूर्ण सिद्ध होतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं रहस्यकारांना, तृष्णोपशम म्हणजे सुख नव्हे हें सिद्ध करावयाचें असल्यामुळें हा उत्क्रांतिवाद अगर पुनर्जन्मवाद त्यांचे स्मरणांतून अजिबात घसरून गेला. निद्रितास कोणीही जागें करील परंतु बुध्या निद्रेचें सोंग घेणारास कोण जागें करील ! असो.

उत्क्रान्तितत्वाप्रमाणें इंद्रियें कशीं निर्माण झालीं हें पाहूं. एकपेशी प्राण्यास निरनिराळ्या इंद्रियांचा असा भेद नसतो. पंचेंद्रियांची फोड वेगळी नसल्यामुळें एकाच अवयवाकडून दोन दोन तीन तीन इंद्रियांचीं कामें त्यांस करून घ्यावीं लागतात. उदाहरणार्थ आमीबा ह्या एकपेशी प्राण्याचें भक्ष्य धरण्याचें-इंद्रिय व तें भक्ष्य पचविण्याचेंही इंद्रिय एकच आहे. भक्ष्य धरण्याचे वेळीं पोटच जरा विस्तृत होतें व तें भक्ष्य मिळाल्यावर पुन्हां संकुचित होतें. तोंडाची व दांताची निराळी क्रिया नसते. अशी क्रिया अनंतकालापर्यंत हा प्राणी करीत असला पाहिजे. पुढें प्रकृतिस्वभावानें, गरजेच्या तीव्रतेनें व भावनेच्या अखंड धारणेनें हळुहळू इंद्रियांचा विकास होत गेला. बाह्य परिस्थितीशीं मेळ घालणें (adaptation). अनुवंशिक संस्कार (Heredity) व गरज (Necessity) या तिन्ही प्रकारांनीं इंद्रियांचा विस्तार व विभेद होत जाऊन शरीरबांध्यांतही कालांतरानें विलक्षण फेर होऊन गेला. गरज फार कालपर्यंत भासत गेल्यामुळें ती गरज भागविण्याचें साधन मिळविण्याची भावना तीव्रतम झाल्याबरोबर म्हणजे आमच्या शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे अनंत कालपर्यंत तपश्चर्या झाल्यावर मग एखादें इंद्रिय प्राप्त व्हावें असा क्रम होत आला आहे.जसा नवें इंद्रिय उत्पन्न होण्यास अनंत काल लोटावा लागतो तसेंच एखादें निरुपयोगी इंद्रिय नष्ट होण्यासही तितकाच काल लोटावा लागतो. जसें मानवांचें शेंपूट. सारांश हा कीं, इंद्रियांची वाढ गरजेनें म्हणजे इच्छेनें उत्पन्न झालेली आहे. पर्यायानें हेंच सांगावयाचें म्हणजे

इंद्रियें हीं इच्छाजन्य आहेत. इच्छा हें कारण व इंद्रियें हीं कार्य. एका त्वचेपासून क्रमाक्रमानें हीं इंद्रियें आविर्भूत झालेलीं आहेत. या इंद्रियांचें इच्छाजन्यत्व हरहमेश त्यांचे कार्यावरून दिसून येत आहे. इच्छा नसल्यास इंद्रियें कुचकामाचीं होत. इच्छेची अम्मलबजावणी करणें व इच्छेस अनुकूल प्राप्ति करून देणें हें इंद्रियांचें काम आहे. इंद्रिय हें प्राण्याच्या अनंत कालाच्या इतिवृत्तांतील इच्छांचें एक दर्शकच होय. प्राण्याचे त्वचेनें स्पर्श होऊन वस्तु समजण्यापेक्षां ती वस्तु लांब अंतरावरून समजावी अशी इच्छा झाल्यावर त्या इच्छेनुरूप दीर्घकालीन तपानें नेत्राची योजना झाली असावी. या वादाचा विस्तार करण्याचें प्रयोजन येथें नाहीं. तात्पर्य एपढेंच कीं, इंद्रियें, त्यांच्या बुडाशीं असलेली इच्छा व इंद्रियांचे विषय यांचें अनंत कालाचें तादात्म्य आहे हें रहस्यकार कसें विसरले कोण जाणे.

आतां पुनर्जन्मवाद घेतला तरी स्थूल शरीरांतून लिंगदेह बाहेर पडल्यावर तो आपल्यास अनुकूल अशा परिस्थितींत जातो. लिंगदेह वासनात्मक आहे. मनुष्य अगर कोणताही प्राणी जिवंत असेपर्यंत ह्या लिंगदेहान्वयें म्हणजे वासनात्मक देहाचेअन्वयें स्थूल देह रहाटत असतो. वासना ह्या व्यक्त अगर अव्यक्त रूपानें प्राण्यांत सदोदित असतातच. ज्या वेळीं एक वासना व्यक्त होते व तदनुरूप देहास चेष्टा करण्यास लाविते, (Kinetic) तेव्हां बाकीच्या वासना अव्यक्त असतात हें उघड आहे. सर्व वासना एकदम व्यक्त झाल्यास देहाची चेष्टा सर्वानुकूल होणार नाहीं. या पुनर्जन्मतत्वानें विचार केला तरी वासना,तृष्णा अगर इच्छा हीं प्राण्यांत अव्यक्त असतेच हें कबूल करावें लागते. इच्छेनुरूप विषय मिळाल्याबरोबर इंद्रियगोलकांतून अनुकूल संवेदना उत्पन्न होते व शेवटीं अन्तर्यामी सुखानुभवरूपी बौद्धिक परिणाम होतो, सुख वास्तविक पहातां इंद्रियांत नाहीं, विषयांत नाहीं, तें इच्छातृप्तींत आहे. इच्छातृप्ति झाल्यानंतर सुद्धां तें केवल स्वसंवेद्य आहे. तृप्ति म्हणजे चंचल वृत्तीचा स्थिरपणा. वृत्तीचा क्षोभ नाहींसा करणें हेंच सुख. इंद्रियें जात्याच बहिर्मुख आहेत. " पराचि खानि व्यतृणत्स्वयंभूः " (ब्रह्मदेवानें इंद्रियें हीं बाह्यवृत्ति केलीं आहेत) या श्रुत्यनुरूप स्वभावतः इंद्रियांची वृत्ति बाह्य आहे. बाह्य पदार्थापासून अनुकूल अगर प्रतिकूल वेदना होत असते. यावरून अमुक पदार्थ सुखात्मक अमुक दुःखात्मक अशी भावना होऊन सुखात्मक वस्तूंचें अर्जन व दुःखात्मक वस्तूंचें निरसन प्राणी करीत असतो. जीवास अनुकूल अगर शुद्ध शास्त्रीय परिभाषेनें बोलावयाचें म्हणजे जीवनक्रियेस अनुकूल असे जे बाह्य पदार्थांचे आघात इंद्रियांवर होतात त्या आघातांची गरज जीवास भासते, हीच गरज इच्छारूपानें देहांत परिणत होते. जीवनक्रियेस प्रतिकूल असे जे बाह्य पदार्थांचे इंद्रियावर झालेले आघात ते टाळण्याकडे इंद्रियांची स्वभावतःच प्रवृत्ति असते. सुखाची सूक्ष्म विचारानें मीमांसा करून वेदान्त्यांनीं असें ठरविलें आहे कीं, सुख हें बाह्य

वस्तूंत नसून आत्म्याचे स्वरूपांत आहे. बाह्य पदार्थांत जर सुख असतें तर तें सर्वदा अव्यभिचारित्वानें बाह्य वस्तूनेंच झालें असतें. परंतु तसा अनुभव नाहीं. बाह्य वस्तु ही केवळ सुखोद्बोधक आहे. सुख अंतर्यामीच आहे. मनुष्य सुखाचा बाह्य वस्तूंवर मिथ्या आरोप करून उगाच बाह्य वस्तूंच्या अर्जनाच्या नादीं लागत असतो. पाश्चात्य विचारी कवीमुद्धां असेंच विधान करीत असतात. मिल्टन कवीचें " Mind is its own place " हें वाक्य सुप्रसिद्ध आहे. तसेंच Burns (बर्न्स) कवि म्हणतोः—

" It is no in riches or in rank
It's no in wealth like London Bank.
To bring content and rest
If happiness has no its seat
And centre in the breast,
We may be rich, or wise, or great,
But never can be blest. "

गौतमबुद्धास राज्याचें वैभव, कुलीन व सुशील अर्धांगी, सुंदर सुकुमार पुत्र इत्यादि साधारणतः ऐहिक ऐश्वर्यांत गणल्या जाणाऱ्या वस्तूपासून सुखोत्पत्ति न होतां या सर्व ऐश्वर्याविषयीं पूर्ण वैराग्य कां बाणलें याचें उत्तर त्याचीं तृष्णाशांति हेंच, दुसरें काय सांगतां येईल ? ऐहिक सुखें हीं सर्व औपाधिक अतएव अनित्य आहेत. हें सुख आपल्या स्वरूपांत आहे, बाहेर नाहीं, अशी मनाची स्वानुभवानें व श्रीकृष्ण योगेश्वरांनीं उपदेशिलेल्या योगानें खात्री झाली म्हणजे ब्रह्मानंदाच्या सुखाचा एकलक्षांश अगर कोट्यंश या ऐहिक सुखांत नाहीं अशी भावना दृढ होते व अर्थांतच बाह्यार्जनापासून अधिकारी परावृत्त होतो. हें ब्रह्मविद्येंतील आदि-तत्वच रहस्यकारांना न समजल्यामुळें त्यांच्या हातून व्यास, मनु, शंकराचार्य यांचा विनाकारण उपमर्द घडला आहे. मनु म्हणतो,

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥

हें मनूनें कंठरवानें सांगितलेलें तत्व त्रिकालाबाधित आहे. तें लोकायतिकास अगर देहात्मवाद्यास अगर बहिर्मुखास सोसण्याजोगें अगर पचनीं पडण्याजोगेंच नाहीं. म्हणूनच आम्हीं प्रथमारंभीं अधिकारयोग घातला आहे. तृष्णेचा बींमोड झाल्यावर अधिकारी स्वराज्याचा कसा स्वामी होतो अथवा त्रैलोक्यस्वामित्व त्यास कसें मिळतें याचा गंध मुद्धां बहिर्मुखास असावयाचा नाहीं. ययाती राजानें या तृष्णातृप्तीसाठीं आपलें तारुण्य खर्ची घालून आपल्या पुत्राचेंही तारुण्य मागून घेतलें तरी विषयतृप्ति झाली नाहीं. रहस्यकार म्हणतात कीं, युक्तीनें दुःख पर्यंव-

सायी वासना सोडाव्या व सुखपर्यवसायी तेवढ्या ठेवाव्या. शांत चित्तानें व समतेनें व युक्तीनें, कौशल्यानें सुखोपभोग घ्यावा. खाशी आहे युक्ति ! ही अजब युक्ति त्यांना व त्यांच्या अंधभक्तांनाच सांपडली, इतरांना ती सांपडणें कठीणच. " सुख दुःख सारखें समजत जा. " " सुखापासून हर्ष पावूं नकोस व दुःखामुळें उद्विग्न होऊं नकोस " असा उपदेश भगवान् वारंवार करीत आहेत. तिकडे लक्ष्य दिलें म्हणजे सुखाच्या वस्तू मिळविण्याची खटपट कशाला हवी आहे असें वाटतें व तें खरेंच आहे. कारण ज्या इष्ट वस्तुप्राप्तीपासून हर्ष मानावयाचा नाहीं, त्या वस्तूचे प्राप्तीसाठीं धडपड तरी कोण करणार ? बागबगीचा अथवा सुंदर राजवाडा तयार करणारे तुरंगांतील कैदी ज्याप्रमाणें बगीचा अथवा वाडा कर्तव्य म्हणूनच तयार करीत असतात, त्याच भावनेनें कोणतेंही कार्य जगांत घडूं लागेल. ही नवीन युक्ति रहस्यकारांना सांपडल्यामुळें हा नवीन ग्रंथ उदयास आल्यास त्यांना सुखही होणार नाहीं व हा ग्रंथ अस्तास गेला तरी त्याचा विषादही वाटणार नाहीं. तसेंच प्रस्तुत टीकेनें त्यांच्या मनावर कांहीं परिणाम होणारा नसल्यामुळें ही कृति त्यांचेकरितां नसून ज्यांना ही नवीन युक्ति अगर गुरुकिल्ली साध्य झाली नाहीं त्यांचेकरितां आहे असें आम्हांस वाटल्यास त्यांत नवल नाहीं. हंस पक्षाप्रमाणें क्षीर तेवढें घेऊन पाणी तसेंच तळीं ठेवण्याचा ही जी अतुल युक्ति अथवा कौशल्य भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें त्याची प्राप्ति स्वतः रहस्यकारांना तरी पूर्ण झाली आहे काय ! झाली असल्यास तिचा पूर्ण स्फोट या ग्रंथांत नसल्यामुळें तिची कल्पना आम्हांस तर येत नाहीं, आमचे मतें भगवंतांनीं बुद्धियोग साधण्यास सांगितलें आहे. हा योग प्रथम साध्य करून घेतला पाहिजे असें त्यांचें आग्रहाचें सांगणें आहे. हा योग म्हणजे बुद्धीचा आत्म्याच्या ठिकाणीं लय करणें. हा योग साध्य झाल्यावर मग बुद्धीस समत्व येतें.-बुद्धीस समत्व आलें व मनुष्य द्वंद्वातीत झाला म्हणजे त्याला कर्में बंधक होत नाहींत हा भगवंताच्या उपदेशाचा इत्यर्थ. तेव्हां हा योग प्रत्येकास म्हणजे लोहार, सुतार, माळी, घिसाडी, फिटर, एंजिन ड्रायव्हर, खाटिक, कारकून, मास्तर वगैरे माणसांना कसा साध्य होणार ? या सर्वांनीं या नवीन आचार्यांची प्रेमभावें शुश्रूषा करून हा योग त्यांचेकडून मिळवावा असें आमचें त्यांना आग्रहाचें सांगणें आहे. मुमुक्षुत्व व वैराग्य व इतर साधनसंपत्ति यांची जरूरच नसल्यामुळें आतां कोणास या दरबारांत मज्जाव नाहीं. असो. आतां रहस्यकारांनीं हा तृष्णायोग गीतेंत कशा प्रकारचा आहे असें वर्णिलें आहे तें पाहूं. ते म्हणतातः-(पा० ९९) " तृष्णेचे वर सांगितलेले दुष्परिणाम भगवद्गीतेस मान्य नाहींत असें नाहीं. तथापि ते टाळण्यास कर्माचा सर्वस्वी त्याग करणें उचित नाहीं. असा गीतेचा सिद्धान्त असल्यामुळें..... "

वाचकहो ! ही रहस्यकारांची लिहिण्याची युक्ति पहा ! " मान्य नाहीं असें नाहीं. " दोन निषेधप्रयोग पूर्ण लक्षांत घ्या. किती जुलमानें निघालेलें वाक्य

दिसत आहे ! भगवद्गीतेसही संन्यासमार्गीयांचेंच तृष्णातत्व पूर्ण मान्य आहे अशी गीतेतील अवतरणें देऊन कोणी खंडन करील म्हणून निषेधद्वयाची योजना वरील वाक्यांत केली आहे. भगवान् म्हणतातः—

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यंतवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥

अ० ५ श्लो० २२

(इंद्रियविषयसंनिकर्षानें झालेले भोग दुःखजनकच आहेत, त्यांना आदि व अन्त असल्यामुळें त्या ठिकाणीं विद्वान् अगर ज्ञानी रममाण होत नाहींत.) या श्लोकांत भगवान् तृष्णावादी आहेत अगर तृष्णानाशवादी आहेत हें वाचकांनींच पहावें.

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३
भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसां ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४

अ० २.

या श्लोकांतून भगवंतांनीं काम (इच्छा), ऐश्वर्य, भोग यांबद्दल काय उद्गार काढले आहेत तें पहा. रहस्यकार म्हणतात कीं, बाकी कोणत्याही ग्रंथांत तृष्णेचा बीमोड करावयास सांगितलेलें असलें तरी भगवद्गीतेंत तसें सांगितलें नाहीं. भगवद्गीता ही एक स्वतंत्र उपनिषद् आहे व श्रुतिपरंपरेस या उपनिषदांतील प्रमेयें सर्व जुळत नाहींत असा त्यांचा अभिप्राय आहे. यहुदी लोकांच्या कर्मप्रधान धर्माबद्दल जी भावना अर्थात् प्रतिकूल भावना येशू ख्रिस्त प्रकट करीत असे अथवा मार्टिन ल्यूथरनें ज्याप्रमाणें रोमन कॅथोलिक धर्मास त्याज्य करून नवीन उदात्त व विचारशील प्रॉटेस्टंट धर्म अमलांत आणून धर्मक्रांति केली तशाच श्रीकृष्णांनीं या बाबतींत उपनिषदन्तर्गत विचारांना निराळें स्वरूप दिलें असें रहस्यकारांचें मत आहे. परंतु श्रीकृष्ण पहावें तों हें श्रेय घेण्यास अगदीं नाकबूल असल्याचें दिसतें. तृष्णात्याग अथवा संतोष अगर शांति हीं रहस्यकारांचे मतें प्रगतीस बाधक आहेत म्हणून प्राण्यांचे ठिकाणीं असंतोष पाहिजे तरच संसार बरोबर चालणार, असें ते म्हणतात. बरोबर आहे, प्रपंच जोंपर्यंत सत्य आहे, त्यांतील सुखदुःखें जोंपर्यंत खरीं वाटत आहेत, ऐश्वर्य, भोग यांतच चित्त रमत आहे तोंपर्यंत हा असंतोष दारिद्र्याचें मूळच होय. परंतु मोक्षमार्गांत असंतोष ही मोठी विघातक वस्तु आहे. ऐश्वर्य, प्रेय वगैरे इष्ट प्राप्तीकरितां सतत झटावें व परिस्थितींत वारंवार सुधारणा करीत असावें असें रहस्यकार म्हणतात, परंतु भगवान् म्हणतातः—

" इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥
.....
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥

अ० १६, श्लोक १३, १६.

आज अमुक मिळविलें, उद्यां अमुक मिळवीन; आज अमुक मजपाशीं आहे, उद्यां अमुक धन मिळेल अशा तऱ्हेचे कामासक्त (इच्छाधीन) झालेले पुरुष नरकास जातात. तेव्हां भगवान् म्हणतात, अशी इच्छा धरणारा नरकास जातो, परंतु रहस्यकार म्हणतात तो मोक्षाचा धनी होतो.

भगवान् म्हणतात,

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शान्तिरशांतस्य कुतः सुखम् ॥

अ० २, श्लो० ६६.

योगारूढ जो नाहीं त्यास बुद्धियोग नसतो व श्रद्धा नसते, अश्रद्धावानास शांति नसते. शांति नाहीं त्यास सुख नाहीं. रहस्यकारांना हा श्लोक माहीत नसेल हें हें संभवत नाहीं. त्यांना जीं जीं प्रमेयें करावयाचीं आहेत अथवा जे जे सिद्धान्त स्थापित करावयाचे आहेत ते ते सर्व गीतेंत आहेत किंवा नाहींत हें पहाण्याचें सुद्धां ते विसरून जातात. महाभारतकारांना तर ते प्रसंगवशात् अग्राह्य ठरवितात. उदाहरणार्थ महाभारतांतील ' असंतोषस्य नास्त्यन्तस्तुष्टिस्तु परमं सुखम् ' हें वाक्य त्यांच्या कर्मयोगास प्रतिकूल असल्यामुळें तें त्यांनीं अग्राह्य मानिलें. उलटपक्षीं प्रल्हाद व इंद्र यांचें आख्यान खरें मानून त्याचा आपल्या पुष्ट्यर्थ त्यांनीं विनियोग केला आहे. धर्मानीं भीष्मास प्रश्न केला कीं, धर्माचे आधीं मनुष्याचे ठिकाणीं शील असावें लागतें तें कसें मिळेल ? तेव्हां भीष्मानीं हें जुनें आख्यान धर्मास सांगितलें आहे. इंद्राचें राज्य हरण झालें होतें. त्यामुळें तो अस्वस्थ होता. बृहस्पतीनें त्याला ज्ञानाचा उपदेश केला, परंतु तो त्यास पटला नाहीं. म्हणून तो बृहस्पतीच्या सांगण्यावरून दैत्यगुरूकडे गेला, तेथेंही ज्ञानोपदेशानें त्याचें समाधान झालें नाहीं. मग तो प्रल्हादाकडे गेला तेथें कापट्यवेषानें जाऊन त्यानें प्रल्हादापासून त्याचे शीलाचें हरण केलें व आपलें पूर्वैश्वर्य मिळविलें. रहस्यकारांनीं ही कथा ज्ञानापेक्षां शील व ऐश्वर्य अधिक महत्वाचीं आहेत हें दर्शविण्याकरितां सांगितली आहे. धर्माचे आचरणाचे आधीं लागणारें जें शील त्याची प्रशंसा त्या वेळीं कवीस करणें भागच आहे. गृहस्थाश्रमाचे वर्णनांत गृहस्थाश्रमास गौरव देणें हें कवींच्या शीलास अनुसरूनच आहे. इंद्रास बोध झाला होता हें खरें आहे, इतकेंच नव्हे तर इंद्र हा स्वतः ब्रह्मरूपच होता. ' इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयत '

या श्रुतीवरून ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु कथानकाकरितां अगर लीलेकरितां जेव्हां असले देव इतर मर्त्यांसारखे विकारवश होतात तेव्हां त्यांचें मूळ स्वरूप लक्षांत घेतां नये असें मागें सांगितलेंच आहे. इंद्र व विरोचन हे ब्रह्मविद्या शिकण्याकरितां गुरूकडे गेल्याची कथा सुप्रसिद्ध आहे. इंद्रास ही विद्या सुलभ होण्यापूर्वी शेंकडों वेळां उग्र तपश्चर्या करावी लागली आहे. हें रहस्यकारांनाही माहीत आहे. असें असतां इंद्रास ज्ञान झालें होतें तरी त्यानें ऐश्वर्याची इच्छा केली असें ते म्हणतात, याला काय म्हणावें! ही कथा इंद्रास ज्ञानप्राप्ति होण्यापूर्वीची असली पाहिजे हें उघड आहे. त्याशिवाय संगति लागत नाहीं. असो. पुन्हां श्रीकृष्ण काय म्हणतात पहाः—

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥ ७१

अ० २.

(सर्व काम म्हणजे सर्व इच्छा. या ठिकाणीं 'सर्व' शब्द फार महत्वाचा आहे, कारण रहस्यकार म्हणतात कीं, श्रीकृष्णांनीं सर्व इच्छा सोडण्यास सांगितलेलें नाहीं. ज्यानें सर्व इच्छा सोडून निस्पृहदशा मिळविली व ज्यानें ममत्वाचा व अहंकाराचा सर्वथैव त्याग केला त्याला शांति मिळते.)

या श्लोकांत तर भगवानांनीं तृष्णानाश-वादाची कमालच करून सोडली आहे. असें असतांही रहस्यकारांना हें कसें दिसलें नाहीं! आम्हांस वाटतें कीं, हा कर्मयोग त्यांनीं गीतेस सोडून केला असता तर फार बरें झालें असतें. स्वतः रहस्यकारांचे बरेच हाल वांचले असते व स्वतः श्रीकृष्ण या ओढाताणीच्या पेंचांतून सुटले असते व संन्यासमार्गी आपल्या अरण्यांत एकलकोंडे स्वस्थ बसले असते.

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥

अ० ५ श्लोक २१.

या ठिकाणीं भगवानांनीं बाह्यस्पर्शजन्य सुखांचा त्याग व आत्मविषयक सुखाचा स्वीकार अशी दोन्ही सांगून आत्मसुख हें अक्षय सुख आहे असें सांगितलें आहे. यांत व उपनिषदांतील सिद्धान्तांत विरोध कोठें आहे हें आम्हांस तर समजत नाहीं. इतकेंच नव्हे तर " न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन " (सर्व संकल्पांचा संन्यास केल्याशिवाय योग मिळत नाहीं,) असें श्रीकृष्ण म्हणतात.

" तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् "

येथें तर भगवान् स्वतःच म्हणतात कीं, दुःखसंयोगवियोगरूपी योग म्हणजेच आत्यंतिक सुख. अद्यापही रहस्यकारांना दुःखाभाव म्हणजे सुख असें गीतेंत म्हटलें आहे हें स्पष्ट दिसूं लागलें नसल्यास उपाय थकला. रहस्यकारांचें स्वतःचें तसें

मत नसेल हें आम्ही कबूल करितों, परंतु श्रीकृष्णानें भगवद्गीतेंत आपलेंच म्हणणें सांगितलें आहे असा जो त्यांचा आग्रह आहे तो अगदीं निराधार आहे हें स्पष्टपणें सांगणें भाग आहे. आणखीसुद्धां प्रमाणें देतां येतील; परंतु स्थलसंकोचास्तव आवरतें घेतों.

आतां रहस्यकारांनीं या विवेकांत जो विलक्षण कोटिक्रम केला आहे त्याचें वर्णन केल्याशिवाय रहावत नाहीं. तो हाः-"पहा, तृप्ति अर्जुनास सुद्धां मान्य नाहीं. कारण कृष्णाच्या उपदेशानें त्याची तृप्ति न होतां तो म्हणतो, अमृत पिऊन माझी तृप्ति होत नाहीं. तेव्हां असंतोष भगवद्गीतेस मान्य आहे कीं नाहीं पहा!!" ही कोटि किती बालिश आहे हें निराळें सांगावयास नको. यास आमचें एवढेंच उत्तर आहे कीं, अर्जुन या वेळीं अज्ञानीच होता. त्याचा मोह नष्ट होण्यापूर्वी तो असाच रहस्यकारांसारखा अतृप्तिवादी होता, परंतु पुढें जेव्हां त्याचा मोह नष्ट झाला तेव्हां तो पुन्हां असंतोषवादी न राहतां शान्त झाला व म्हणालाः-

"**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
स्थितो स्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव॥"

अ० १८ श्लोक ७३.

यानंतर अर्जुनानें पुन्हां असंतोष दाखविला नाहीं तेव्हां ज्ञानदृष्टींत अर्जुनहीं संतोषवादी बनला, हेंच उत्तर वरील कोटीस समर्पक आहे.

६ वर्णाश्रमयोग.

" ब्राह्मण त्या (पुरुषा) चें मुख होत (म्हणजे मुखापासून उत्पन्न झाले), क्षत्रिय त्याचे दोन्ही बाहू होत, वैश्य त्याचे ऊरु म्हणजे मांड्या होत, त्याचे पायापासून शूद्र उत्पन्न झाले " ॥ १२ ॥

ऋग्वेद अष्टक ८, अ० ४, व० १९.

हा वर दिलेला उतारा ऋग्वेद संहितेंतील आहे, ऋग्वेदापेक्षां जुना ग्रंथ ह्या भूतलावर नसल्यामुळें त्यांतील उतारा देणें अर्थातच अशक्य आहे. परंतु हा उतारा झाला तरी कोणाकरितां आहे याचें विवेचन प्रथम केलें पाहिजे. पुराणग्रंथांतील शेंकडों उतारे देतां आले असते, परंतु त्यांचें प्रामाण्य मानणारे हल्लींच्या मन्वंतरांत फारच थोडे पुरुष निघतील. स्मृतींतील आधार द्यावेत तर ते, स्मृति-ही श्रुतिनंतर झाली असल्यामुळें ती प्रमाण मानतां येत नाहीं, असें म्हणणारे लोक फार असल्यामुळें ग्राह्य होणार नाहींत. बरें श्रुतींतील उपनिषद्भागांतील आधार द्यावयास जावें तों, उपनिषदें हीं मंत्र व ब्राह्मण यांचे मागून झालीं असल्यामुळें त्यांचें प्रामाण्य मंत्राइतकें नाहीं असें प्रतिपादन करणारेही अनेक लोक आहेत, म्हणून मंत्राचाच आधार वर देण्यांत आलेला आहे. आतां याहीपुढें आणखी एक कोटिक्रम लढविण्यांत येत असतो, तो हा कीं, सर्व मंत्र एके कालींच झाले नसल्यानें त्यांतही प्रामाण्याचें तारतम्य आहे. तेव्हां मंत्रांची अशी कालवारी अनुक्रमणिका कोणीं लाविल्याशिवाय मंत्रांतील आधार कांहीं जणांस मान्य होणार नाहीं. हा अनुक्रम निर्विवाद रीतीनें लावतां येणें शक्य नाहीं. तेव्हां अर्थातच अशा लोकांकरितां वरील उतारा निरर्थकच आहे हें उघड आहे. ज्या लोकांना आधिभौतिक शास्त्रांचे नियम चांगले माहीत झाले आहेत, भूतलावरील अनेक देशांचे व धर्माचे इतिहास अवगत झाले आहेत व पाश्चात्य समतेचीं व न्यायाचीं तत्त्वें ठाऊक झालीं आहेत, त्यांना ही वर्णभेदरचना मुळींच संमत नाहीं. हा त्यांचा समज निराधार असो वा साधार असो, त्यांनीं वर्णविचार आपल्यास मान्य नाहीं असें खुशाल उघड रीतीनें प्रतिपादन करावें, त्याला आमची हरकत नाहीं; परंतु त्याकरितां वेद अगर श्रुति यांतील आधार पाहाण्याच्या मात्र त्यांनीं भरीस पडूं नये हें चांगलें. कारण असें करण्यांत त्यांचे हातून दोन दोष घडतात. एक तर त्यांना स्वतःला श्रुतीचें प्रामाण्य मनापासून कबूल नसतें व तसें तें नसूनही ते श्रुतीचा आश्रय विनाकारण घेऊं लागतात. दुसरें असें कीं, असा एखादा त्यांचे मताविरुद्ध आधार दिसला कीं, " तो प्रक्षिप्तच आहे " " भाषाशैलीवरून नवा असावा असें

दिसतें " अशा तऱ्हेच्या शुष्क तक्रारी माजवितात. आतां हे श्रुतीचे आधार ते स्वतःकरितां घेत नसून पुराणप्रिय लोकांना आपल्या मताकडे वळवून घेण्याकरितां घेत असतील तर अशा प्रयत्नानें त्यांचें उद्दिष्ट साधावयाचें नाहीं. कारण " वेद अपौरुषेय असून अनंत व अनादि आहेत. त्यांतील कांहीं थोडा भाग मानवाच्या हातीं आला आहे. सर्व वेद सर्वांशीं उपलब्ध नाहींत. ही उणीव भरून काढण्याकरितां स्मृति, इतिहास, पुराणें वगैरे उपवेदांची योजना ऋषींनीं केलेली आहे. तेव्हां वेद जेथें कांहीं सांगत नाहीं तेथें स्मृतीचें प्रामाण्य अबाधित आहे. स्मृति कांहीं बोलत नाहीं, तेथें इतिहास, पुराणें हीं प्रमाण धरलीं पाहिजेत. प्रत्यक्ष विषयाकरितां हीं प्रमाणें नसून आचारविषय व ज्ञानविषय यांपुरतींच तीं प्रमाण मानावयाचीं आहेत " अशी ज्यांची परंपरागत दीर्घकालीन दृढ समजूत झालेली आहे, त्यांना मंत्र आधीं झाले मग ब्राह्मणें झालीं मग उपनिषदें झालीं हा इतिहासदृष्टीचा कालक्रम कसा पटणार ? " नंतर झालीं " या शब्दांनीं तीं एककालीं नव्हतीं असें होतें, म्हणजे वेदाचें अनादित्व अर्थांतच गेलें. अनंतत्व व अपौरुषेयत्वही तसेंच अग्राह्य ठरतें. तेव्हां त्यांत प्रामाण्याप्रामाण्य तरी कोठून येणार ? स्पष्ट बोलावयाचें म्हणजे आधुनिक पंडितांचें असें मत आहे कीं, वेद हे निरनिराळ्या कालीं निरनिराळ्या कवींनीं केलेली काव्यरचना होय. रहस्यकारांचेंही हेंच मत आहे हें निराळें सांगावयास नको. होमर, चॉसर, मिल्टन, शेक्सपियर इत्यादि कवींच्या काव्यरचनेंत व वेदरचनेंत जर कांहीं फरक असेल तर तो फक्त कालाचाच होय. साधारण काव्यांत ज्याप्रमाणें सुंदर व मनोहर कल्पना, चटकदार वर्णनें, प्रगल्भविचार वाचकांचे आदरास व विस्मयास पात्र होतात तद्वतच वेदांतील सुंदर विचार व कल्पना आदरणीय आहेत. वेदाचा जर कांहीं विचार कर्तव्य असेल तर काव्य व इतिहास ह्या दृष्टीनेंच केला पाहिजे असें रहस्यकारांसह सर्वच आधुनिकांचें नव्हे पण बऱ्याचशा आधुनिकांचें मत आहे. हें मत कोणत्याही कारणांनीं झालेलें असो व तें प्रामाणिकपणाचें व सत्य असो अथवा त्याचे उलट असो, मुख्य मुद्दा एवढाच कीं, ह्या लोकांना श्रुति प्रमाण नाहीं, स्मृति प्रमाण नाहीं; मग इतिहास-पुराणांची तेथें कोठें डाळ शिजणार ? ह्या लोकांना श्रुतिस्मृतींचा आधार बघण्याचें प्रयोजन म्हणजे जुन्या लोकांची कशीतरी समजूत घालण्याचा यत्न करणें हेंच होय. यापेक्षां संभावितपणाचा व सरळ मार्ग म्हटला म्हणजे श्रुति, स्मृति वगैरे धर्मग्रंथांचें अप्रामाण्य सिद्ध करून मग आधुनिक शास्त्रसिद्धान्त, समाजघटना, बदललेली परिस्थिति व नवीन विचारक्रांति या सर्वांचा न्याय व प्रमाणें यांच्या अनुरोधानें ऊहापोह करून इष्ट सुधारणा म्हणजे वर्णसंकर, विधवाविवाह, इ. यांचें स्वैर उघड प्रतिपादन करावें. त्याबद्दल कोणासच कांहीं वाटण्याचें कारण नाहीं. परंतु जुन्या समाजास इतक्या उघड रीतीनें दुखविण्याचें सामर्थ्य अथवा धैर्य 'जनतात्मभक्ताचे' हृदयांत कोठून

असणार ! वाटेल त्या प्रस्तुतच्या सुधारणेस वेदांतील अगर श्रुतींतील दाखला काढीत बसण्याचा जो हा कांहीं पंडितांचा आग्रह आहे तो मोठा हास्यास्पद आहे. अशी एक गोष्ट सांगतात कीं, मोहिते सरदार आपल्या पोष्यांच्या दरबारांत बसले असतां त्यानीं आपल्या कुळाच्या पुराणत्वाबद्दल जमलेल्या पंडितांस आधार काढण्यास आज्ञा केली. दरबार पंडितांत एक दीर्घपंडित होते ते ह्मणाले " महाराज, याला इतकी यातायात कशास हवी. हा आधार मी आतां येथेंच सांगतों. महाराज आपलें कुळ पांडवकौरवांचे युद्धाचे वेळीं होतें. कारण भगवद्गीतेंतच म्हटलें आहेः—

" किंकर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ॥ "

कर्म कोणतें व अकर्म कोणतें हें सांगण्यांत सुद्धां मोहिते हे शाहाणे होते.

या आधारावरून, महाराज, आपलें कुल नुसतें जुनें नव्हे तर वेदोक्त कर्माकर्माचा निर्णय सांगणारें होतें ! !

या गोष्टीसारखाच कित्येक वेळीं हा मूढ यत्न करण्यांत येत असतो. कदाचित् श्रुतींत एखादा समर्पक आधार दिसला ह्मणून हा आधार चालू काळास व परिस्थितीस कोणत्या न्यायशास्त्राचे आधारें जुळवितां येईल ? नुसता वेदांत आधार आहे ह्मणून लोक कोणी तो आधार घेऊन तसें वर्तन करण्यास तयार होणार नाहींत. ऐतरेय ब्राह्मणाचे तृतीयपंचिकेंतील " प्रजापतिर्वै स्वां दुहितरमभ्यध्यायत् " हा आधार घेऊन कोणी समंजस पुरुष तसें वर्तन करणार नाहीं, कारण " न देवानां चरितं चरेत् " हा न्याय आहे अथवा " ऋग्वेद संहितेच्या आठव्या अष्टकांत सहाव्या अध्यायांत एक ब्राम्हणाची औरत पळवून नेल्याची कथा आहे ह्मणून त्या प्रकारास कोणी गर्ह्य समजणार नाहींत असें नाहीं. अथवा उलट पक्षी " न वै खेणानि सख्यानि सन्ति सालावृकाणां हृदयान्येता " अशा सारखी श्रुति पुढें मांडिल्यास आधुनिक खेणपणा टाकण्यास तयार होतील असेंही नाहीं. वेदांचा कांहीं भाग हिंदुस्थानांत झाला, कांहीं उत्तरध्रुवाकडे पूर्वीच झालेला होता, सुमारें पांचदहा हजार वर्षांपूर्वी वेद झालेले असल्यानें त्यांना अनादि ह्मणण्यांत आलेलें आहे. अशा तऱ्हेनें जुन्या वेदभक्तांस न दुखवितां वेदाचें आदिमत्व स्थापन करण्याचें मनोदौर्बल्य दाखविणारेच पंडित फार झालेले आहेत. थिऑसफी, आर्यसमाज वगैरे पंथांतून सुद्धां वेदप्रामाण्य उघड रीतीनें फेंटाळून न देतां वरवर त्या वेदाचें, पुराणाचें यथास्थित स्तोम करून रुतींत व आचरणांत मात्र वेदाचा सर्वांग संपूर्ण धिक्कार करण्यांत जो दुटप्पीपणा दिसून येतो तो अत्यंत अश्लाघ्य होय. वेदप्रणीत धर्मावर विश्वास नसेल तर त्यांतील आधाराचे नादीं न लागतां जुन्या लोकांना हळुहळू वेदविन्मुख करण्यास लागावें हाच मार्ग आधुनिक वेदनिंदकांनीं स्वीकारल्यास त्यांचे अंगीं

प्रत्यक्ष प्रमाणापासून आलेली सत्यनिष्ठा तरी कांहीं अंशीं जागृत आहे असें म्हणतां येईल. असो. तात्पर्य इतकेंच कीं, ऋग्वेदासारख्या आद्य ग्रंथांतील आधारसुद्धां ज्यांना पटत नाहींत अगर किंबहुना ज्यांना वेद प्रमाण नाहींत त्यांचेकरितां भगवद्गीता नाहीं व भागवतधर्मही नाहीं हें निराळें सांगणें नको. "पुरुषसूक्त मागाहून म्हणजे वर्णाश्रमधर्म सुरू झाल्यावर झालेलें असलें पाहिजे. कारण त्यांत चार वर्णांचा स्पष्ट निर्देश आलेला आहे" हा कोटिक्रम करणारास वेद व वेदांगें यांचें व तदन्तर्गत विषयाचें खरें पायाशुद्ध ज्ञानच झालें नाहीं असें आम्ही खात्रीनें सांगतों. आधीं मुळीं मंत्र हे यज्ञार्थ आहेत. यज्ञकर्म हाच मंत्राचा विषय असल्यामुळें त्यांचा विनियोग त्यांतच होत असतो. हे यज्ञयाग मुळीं ब्राह्मण करीत असत. म्हणजे क्षत्रिय करीत नव्हते असें नव्हे, तर यज्ञांत होता, अध्वर्यु वगैरे कामें केवळ ब्राह्मणच करीत असत. तो अधिकार क्षत्रियांस नव्हता. " तस्माद्याप्ये तर्हि यज्ञः सयुग्भूत्वा देवेभ्यो हव्यं वहति ब्राह्मणेन च छंदोभिश्च ॥ "

ऐ० ब्रा० तृ० पं. ४५

(ब्राह्मण व छंद यांनीं युक्त होत्साता यज्ञच देवांप्रत हवि पोंचवितो.) ब्राह्मणाशिवाय यज्ञांतील याज्ञिक करण्यास दुसऱ्या जातीस अधिकार नव्हता. म्हणूनच ब्राह्मणासच षट्कर्में करण्याचा अधिकार असतो, इतरांस नाहीं असें म्हणतात. यजन-याजन, अध्ययन-अध्यापन, दान-प्रतिग्रह ह्या सर्व कर्मांचे अधिकारी एकटे ब्राह्मणच होत. बाकीचे दोन वर्ण क्षत्रिय व वैश्य यांना फक्त यजन, अध्ययन व दान यांचाच अधिकार आहे. तेव्हां ऋग्वेदांतील इतर मंत्रांत जरी वर्णरचना कशी झाली याचा उल्लेख नसला तथापि यज्ञाचें कामच मुळीं ब्राह्मणाशिवाय चालत नसे. ऋग्वेदाच्या प्रथम सूक्तांत पहिल्या ऋचेंतच ' पुरोहित ' ' ऋत्विज ' ' होता ' वगैरे शब्द आलेले आहेत. ' ब्राह्मण, ' ' क्षत्रिय ' असे शब्दही निरनिराळ्या मंत्रांतून आलेले आहेत. इतकेंच नव्हे तर ते एका सूक्तांत एकाच ऋचेंत आलेले आहेत. उदाहरणार्थ अ० ८ अ० ६ व० ७ ऋ. ३ पहा. यावरून यज्ञयागादि कालांत ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे वर्णभेद प्रचलित होते इतकेंच नव्हे तर ब्राह्मणाशिवाय यज्ञाचें काम सांगच होत नसे असें दिसतें. असें असतां अमुक वेळीं वर्णभेद नव्हता व तो अमुक वेळीं झाला हें म्हणणें अत्यंत साहसाचें दिसतें. बरें क्षणभर अशीही कल्पना केली कीं, मंत्राचे कांहीं कालांत ही वर्णव्यवस्था नव्हती परंतु पुढें पुढें ती मंत्रकालींच उदयास आली; तथापि ही व्यवस्था वेदास मान्य नव्हती असें म्हणतां येत नाहीं. वेदांत आहे तेव्हां ती ग्राह्य धरली पाहिजे अशी तरी बुद्धीची बळकटी कोठें आहे ? आपले मनास न जुळणारी कल्पना वेदांत निघाल्यास तेवढा वेदाचा भाग उत्तरकालीन अतएव त्याज्य ठरवून आपलें मत स्थापित करण्याचा हा प्रयत्न अत्यंत निंद्य व भ्याडपणाचा आहे. असो, तात्पर्य

हें कीं, मंत्रकालापासून तों थेट भगवद्गीतेचे कालापर्यंत जी वर्णव्यवस्था अमलांत होती तिच्याबद्दल भगवान् स्वतः म्हणतातः—

" चातुर्वर्ण्यं मयासृष्टं गुणकर्मविभागशः " ह्या ठिकाणीं ' सृष्ट ' हें पद हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. तेथें " कृतं " असें पद नाहीं. या ठिकाणीं भगवानानीं या योगाचे शिरोभागीं दिलेल्या श्रुतीच्या अवतरणाचाच पूर्ण अनुवाद केला आहे. भगवानाचे सांगण्याचा आशय स्पष्ट असा आहे कीं, सृष्टीची उत्पत्ति केली त्यावेळीं मीं हें चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें. माझ्या मुखांतूनच ब्राह्मण उत्पन्न झाले व इतर वर्ण निरनिराळ्या अवयवांतून उत्पन्न झाले. सारांश वर्णपद्धति मंत्रकालापासून गीताकालापर्यंत इतकी अबाधित चालत आलेली असली पाहिजे कीं, ही रचना ' केलेली ' आहे असें न म्हणतां ती ' सृष्ट ' आहे, निसर्गतःच आहे असें भगवद्गीतेंत म्हणावें लागलें आहे. असें असतां नुसत्या उत्क्रांतिशास्त्रांतील तर्कानें मनुष्यप्राणि हा एकदम आयता तयार न होतां क्रमाक्रमानें रूपांतर होत होत या द्विपाद, द्विहस्त दशेस आला आहे, यामुळें केव्हां तरी गुणाचे व धंद्याचे वैचित्र्यामुळें ही समाजव्यवस्था मध्यंतरीं करण्यांत आली असली पाहिजे असें पाहिजे तर खुशाल ठरवावें, त्यास कोणाची हरकत नाहीं. परंतु या तर्कास पुष्टि म्हणून ह्या पवित्र ग्रंथांतील अर्थांची ओढाताण करणें इष्ट नाहीं इतकेंच नव्हे तर अशास्त्रीय आहे.

शिवाय ही वर्णव्यवस्था हल्लीं कोणत्या स्थितींत आहे हें पाहिलें म्हणजे आतां त्याबद्दल फारशी काळजी करण्याचेंही कारण राहिलेलें नाहीं असें दिसून येईल. पूर्वीच्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्गांपैकीं आतां ब्राह्मण वर्गाशिवाय निर्भेळ अशी जाति कोठें सांपडणारही नाहीं. ब्राह्मणवर्गांत सुद्धां हल्लीं तसा पूर्वी सारखा निर्बंध राहिलेला नाहीं हें ही सहज कोणाच्याही लक्षांत येईल. लक्षावधि वर्षें तपश्चर्येनें, अध्ययनानें, योगानें, वैवाहिक बंधनांनीं ब्रह्मविद्येस तयार केलेले पिंड आपण होऊन हे निर्बंध मोडून " शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः " अशा तत्त्वेच्या समत्वभावनेचा जाणून बुजून स्वीकार करूं लागल्यास खुशाल करोत. आमचें त्यांना एवढेंच सांगणें आहे कीं, हा आत्मघात तुम्ही स्वतः करून घेण्यापूर्वी आजपर्यंत पाळून ठेवलेल्या तुमच्या शीलाचा विचार करा. आधुनिक प्राणिशास्त्र, उत्क्रांतिशास्त्र व मानसशास्त्र यांच्या सिद्धान्तांचें चांगलें मनन करा, या शास्त्रांचें अध्ययनावरून तुम्हांस समजेल कीं, Selection (निवड) तत्वाचा आश्रय हल्लींच्या सुद्धां मनूंत सार्वत्रिक करण्यांत येत असतो. उद्यानशास्त्र Horticulture घ्या, जीवशास्त्र घ्या, शेतकी घ्या. उत्तम बीं,बीज, व युग्म (स्त्री-पुरुष)यांचे निवडीवर फुलझाडें, जीव व पिकें यांची उत्तम वाढ होत असते. पिंडांतील शारीरिक (Physical cells) पिंडच नुसते आनुवंशिक क्रमानें प्रजेंत उत्पन्न होतात असें नसून मानसिक पिंड (Psychic cells) सुद्धां त्याच रीतीनें प्रजेंत येतात ही गोष्ट

आतां इतकी जीवनशास्त्रयांस ग्राह्य झालेली आहे कीं. त्याबद्दल कोणी वाद करीत बसणार नाहीं. तेव्हां जगांतील सहस्रावधि जाति ह्या उपलब्ध अशा इतिहास-कालांत उदयास आल्या व नामशेष झाल्या. परंतु ब्राह्मणजाति मात्र कोट्यवधि वर्षे जशीच्या तशीच जोमांत आहे. याचें इंगित धर्मशास्त्रांतच आहे हें विसरतां कामा नये. ब्रह्मविद्येचें जर आजपर्यंत कोणीं पालन केलें असेल तर तें याच वर्गानें. आपल्या कडकडीत तपानें, निर्लोभतेनें, भूतदयेनें, ब्रह्मचर्यानें व ध्यान-समाधीनें प्रपंचांतील व स्वर्गांतील सुखें औपाधिक अतेव अनित्य अशी शास्त्र-साह्याच्यानें व अनुभवानें पक्की खात्री करून या ब्रह्मविद्येंत त्यांनीं नैपुण्य मिळवून सर्व जगाचें गुरुत्व मिळविलें. त्यांच्या विद्येस आधुनिक शास्त्रज्ञ (आधिभौतिक शास्त्रज्ञ) मुद्दां आतां निरभिमानानें माना डोलवूं लागले आहेत. अशा जगाच्या उपसर्गापासून नियमांनीं दूर राखलेल्या या ब्रह्मपिंडास एकदां नेऊन प्रपंचरतांच्या साईत टाकलें म्हणजे सुधारणेचा कळस झाला अशी मूढ कल्पना डोक्यांत शिरूं देणें म्हणजे अवनतीचीं लक्षणें म्हणावयाचें दुसरें कांहीं नाहीं. यावर कोणी म्हणेल, ही जी ब्राह्मणवर्गाची उच्च स्थिति आपण वर्णिली ती काल्पनिक असून खरी नव्हे. कारण चांडालाचीं कर्मे करणारे ब्राह्मण काय कमी आहेत! तसेंच चांडालांत ब्राह्मणाची अहिंसा, अस्तेय गुण अंगांत असलेले काय कमी चांडाल मिळतील ! यावर आमचें एवढेंच उत्तर आहे कीं, असें जरी आहे तरी साधारण ठोकळ मानानें अद्यापही ब्राह्मणवर्गात तद्गुणविशिष्ट गुण इतरांपेक्षां जास्त मानानें मिळतील. परंतु एकदां जर का रक्ताची सरभेसळ सुरू केली कीं, हा राखून ठेवलेला वर्ग अथवा ब्रह्मविद्येस योग्य केलेला वर्ग अजिबात नाहींसा होण्यास वेळच लागणार नाहीं. ब्राह्मणाच्या अध्ययनाचा, तपाचा वगैरे जरी हल्लीं पुष्कळ लोप झाला आहे तथापि अद्याप ब्रह्मतेजाचा अग्नि पूर्ण नष्ट झालेला नाहीं. निदान अपेयपान, हिंसा, अभक्ष्य भक्षण, बुद्धिमांद्य, जिव्हाजाड्य यांचा ब्रह्मवृंदांत बराच अभाव आहे असें दिसून येईल. असो. हें स्थल चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा सांगोपांग विचार करण्याचें नव्हे म्हणून आटपतें घेतों. या विचारास स्वतंत्र एक मोठा प्रबंध लिहावा लागेल. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, भगवद्गीतेंत चातुर्वर्ण्यव्यवस्था पूर्ण मान्य धरलेली आहे. रहस्यकारांच्या मतें वर्णसंकर होऊन ब्राह्मणजाति नष्ट झाल्यास हरकत नाहीं, परंतु यथादैव प्राप्त झालेलीं शास्त्रीय व सांसारिक कर्मे निष्काम भावानें जग करीत राहिलें म्हणजे त्यांचे मतें जग मोक्षास जाईल. त्यांचे मतें भगवंताची चातुर्वर्ण्यव्यवस्था कायम ठेवलीच पाहिजे असा आशय नाहीं. कोण-तीही व्यवस्था भगवंतास मान्य होईल. परंतु भगवंताचा नवा कर्मयोग अमलांत असला म्हणजे भगवंतास पुरे आहे. हें रहस्यकारांचें विधान किती निराधार आहे हें दाखविण्याचा आमचा उद्देश आहे. हा कर्मयोग लिहीत असतां आपण भग-

वद्गीतान्तर्गत ' कर्मयोग ' प्रतिपादित आहों हें ते अजिबात विसरून जातात व आपलीं मतें श्रीकृष्णावर जबरदस्तीनें लादीत असतात.

आतां आपणांस पुन्हां मागें अर्जुनविषाद-योगांत गेलें पाहिजे. अर्जुन लढाई करण्यास कां कचरला हें पहाः-तो ह्मणतो, " बांधवांस मारून मला पाप लागेल. एक कुलक्षय व दुसरा मित्रद्रोह अशा दोन पातकांचा मी धनी होणार. कुलक्षय झाल्याबरोबर सनातन कुलधर्म नष्ट होणार, नंतर अधर्मप्रवृत्ति होईल. असें झालें ह्मणजे कुलस्त्रिया भ्रष्ट होतील. नंतर अर्थातच " वर्णसंकर " होईल. " वर्णसंकराचें फळ आहे " ही अर्जुनाची भीति ' वर्णसंकर ' मूलक आहे हें सांगण्यास वाचकहो, तुम्हांस मोठीं भाष्यें पाहाण्याचें कारण नाहीं. भगवद्गीता वाचतांना सहजीं ही गोष्ट तुमच्या लक्षांत येण्याजोगी आहे. वरें ही नुसती अर्जुनाच्या मनाची धर्मासंबंधीं व वर्णसंकरासंबंधीं तळमळ झाली. भगवान् तरी सुधारक आहेत का पहा. वर्णसंकर म्हटला कीं त्यांचे सुद्धां अंगावर कांटा येतो असें दिसतें. कारण तिसऱ्या अध्यायांत ते स्वतःच ह्मणतातः-

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४

अर्जुना, मीं जर कर्म केलें नाहीं तर प्रजेचा नाश होईल इतकेंच नव्हे तर " वर्णसंकरा " चें पाप मीं केल्यासारखें होईल व वर्णसंकर झाल्यानें प्रजा नष्ट होतील. या श्लोकाचा अर्थ वाटेल त्या भाष्याच्या आधारानें जरी पाहिला तरी भगवानास वर्णसंकर मान्य नाहीं इतकेंच नव्हे तर ते स्वतः सुद्धां वर्णसंकराचें पाप आपल्या माथीं घेण्यास तयार नाहींत, त्यापेक्षां कनिष्ट कर्मयोग पत्करलेला बरा. मी आपला कर्मे करीत राहीन, पण वर्णसंकर करणें नको. इतका भगवानांचा वर्णसंकरावर कटाक्ष असतां रहस्यकार तिकडे हटवादीपणानें दुर्लक्ष करीत आहेत हें सांगण्यास नको. कदाचित् हा आपला नवा आशय भगवंतांनीं मंडालेंत येऊन गुप्तरीतीनें रहस्यकारांना सांगितला असल्यास नकळे. असो. पुढें नवव्या अध्यायांत भगवान् ह्मणतातः—

मांहि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिं ॥
किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।
.....

अ० ९ श्लो० ३२।३३

या श्लोकांत भगवानांना सर्व चार वर्णांत ब्राह्मणच श्रेष्ठ भासत आहेत. तसेंच भक्तशिरोमणि राजर्षीही श्रेष्ठ दिसत आहेत. शूद्र व वैश्य त्यांचेपेक्षां कनिष्ठ पाय-

रीवरचे आहेत. तसेंच स्त्रियाही त्याच वर्गात येतात. हें पाहून पुष्कळ समाजसुधारकांना वाईट वाटेल. परंतु आमचा नाइलाज आहे. वाटल्यास "अनंतकोटि ब्रह्मांडनायक असा पक्षपात करणार नाहीं तेव्हां हें भगवंताचें वाक्य नव्हे, ब्राह्मणकवीचें आहे" असें म्हणा; त्याला आमचा हरकत नाहीं. परंतु श्रीकृष्णाबद्दल व त्यांचे वचनाबद्दल ठिकठिकाणीं अत्यंत आदर व पूज्यबुद्धि स्पष्ट व गंभीर शब्दांनीं व्यक्त करून त्यांच्या आश्रयछत्राखालीं या कर्मयोगाची उभारणी करावयाची व त्याच श्रीकृष्णाच्या अन्य व स्पष्ट वचनाकडे दुर्लक्ष करावयाचें हें चांगलें नाहीं. पुढें अठराव्या अध्यायांत:—

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥

(ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चारही वर्णांचीं कर्में त्यांच्या त्यांच्या प्रकृतिसिद्ध गुणानुरूप अगदीं स्पष्ट विभागलेलीं आहेत) असें सांगून प्रत्येक वर्णाचीं कर्में व गुण भगवंतांनीं सांगितलीं आहेत व लागलींच:—

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।
स्वकर्म निरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥
यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥
श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥

अ० १८, श्लो० ४५।४६।४७.

चातुर्वर्ण्यव्यवस्था, कर्में व गुण सांगून लगेच भगवान् म्हणतात कीं, वर्णांनीं आपापलीं स्वभावजन्य कर्में करूनच सिद्धि मिळवावयाची आहे. परमेश्वराच कृपा संपादावयाचा तीही स्वकर्माचरणानेंच. आपल्या वर्णधर्मांत जरी वैगुण्य असलें तथापि दुसऱ्या वर्णाच्या चांगल्या सुकर दिसणाऱ्या धर्माचा अवलंब करावयाचा नाहीं, असें भगवान् स्पष्ट सांगत असतां रहस्यकार म्हणतात:—

"अशा रीतीनें सर्वतोपरी निर्भय व व्यापक असून सम म्हणजे वर्णाचा, ज्ञातीचा, देशाचा किंवा दुसरा कोणताच भेद न ठेवितां सर्वांस एकाच मापानें एकच सद्गति देणारा व इतर धर्मांबद्दल योग्य सहिष्णुता दाखविणारा ज्ञानभक्तिकर्मयुक्त गीताधर्म सनातन वैदिक धर्मवृक्षाचें अत्यंत मधुर अमृतफल आहे."

गीतारहस्य पा० ५०३.

"समाजव्यवस्था कोणतीही असो त्यांत यथाधिकार प्राप्त झालेलें कर्म उत्साहानें करून सर्वभूतहितरूप आत्मश्रेय साधा हें गीताशास्त्राचें तात्पर्य आहे."

गी० र० पा० ४९३.

याहीपेक्षां स्पष्ट शब्दांचीं अवतरणें मागेंच दिलीं आहेत (अधिकार योग पहा) तीं पुन्हां वाचकांनीं पाहावीं व खात्री करून घ्यावी. रहस्यकारांनीं भगवंताचा हा आशय कोणत्या वचनावरून काढला हें पुन्हां एकदां सांगण्याची कृपा ते करतील काय ! नीतिशास्त्रांचीं तत्वें गीतेंतून काढावयाचीं असतीं म्हणून भगवानास हा निराळा वेष घालण्याचें रहस्यकारांना प्रयोजन नव्हतें. " श्रेयान्स्वधर्मो विगुणः " वगैरे सारख्या तत्वांनीं भगवानांनीं प्रत्येकास आपापल्या धर्माप्रमाणें वागण्यास सांगितलें आहे. हा धर्म म्हणजे ज्यांच्या त्यांच्या शास्त्रानें विहित केलेला धर्म होय. ख्रिस्ती लोकांना (New testament) नवा करार, यहुदींना जुना करार, मुसलमानांना कुराण हींच मान्य होत. धर्मांतर करण्यापासून सिद्धि न मिळतां नरकप्राप्ति होते. शास्त्रांत सांगितलेलीं कर्में करण्यापासून मोक्ष मिळतो. अशास्त्र विहित म्हणजे रहस्यकारांचीं प्राप्त झालेलीं सांसारिक कर्में करण्यापासून मोक्ष नाहीं असें भगवान् स्पष्ट सांगत आहेत.

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिं ॥ २३
तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४

अ० १६

शास्त्रविधि सोडून जे तुमत्या मनाप्रमाणें अगर इच्छेस येईल तसें (म्हणजे ब्राह्मण धिसाड्याचें काम करूं लागल्यास) वागतील त्यांना सिद्धि नाहीं, सुख नाहीं व उत्तम गति नाहीं. कार्याकार्य विचाराचे वेळीं शास्त्राज्ञा हींच प्रमाण आहे. तेव्हां आपल्या शास्त्रांत काय विधि सांगितले आहेत त्याचा आधीं नीट विचार कर म्हणजे धर्मविचार, धर्मजिज्ञासा कर मग ब्रह्मजिज्ञासेस पात्र होशील. शास्त्रविचार सोडून वागणाऱ्या लोकांची गति काय होते हें भगवंतानीं पुढील अध्यायांत विस्तारानें सांगितलें आहे. रहस्यकारांनीं जो " कर्मयोग " मनूनें इक्ष्वाकूस सांगितला असें म्हटलें आहे तोच कर्मयोग सांगणारा मनु काय म्हणतो पहाः—

वरं स्वधर्मो विगुणो न पारक्यः स्वनुष्ठितः ।
परधर्मेण जीवन्हि सद्यः पतति जातितः ॥

अ० १० श्लो० ९७.

ह्या श्लोकांत मनूनें त्याच भगवंताच्या शब्दांनीं तोच आशय सांगितलेला आहे. याविषयीं शंका राहात नाहीं. सारांश आम्हीं मागें भगवद्गीतेंतील आमची चतुःसूत्री दिली आहे तिचा भगवंतानीं अठराव्या अध्यायांत त्याच शब्दांनीं अनुवाद केला आहे. मनूनें सुद्धां त्याच शब्दांनीं तोच आशय सांगितला आहे. उपक्रम व

उपसंहार यावरूनही हाच सिद्धान्त दृढ होत आहे. भगवान् स्वधर्माचरण करण्यास उपदेश करूं लागल्यावर मग कर्मयोग, सांख्ययोग, भक्तियोग वगैरे विषयांचें क्रमाक्रमानें विवेचन करूं लागले हें साहाजिकच आहे.

आतां रहस्यकारांना इतर आश्रमांपेक्षां गृहस्थाश्रमच कां आवडतो याबद्दल भगवद्गीतेंत कांहीं प्रमाणें आहेत कीं नाहीं हें पाहूं गेलें असतां आश्रमधर्मांची फोड गीतेंत केलेली नाहीं हेंच म्हणावें लागतें. संन्यासाश्रमापेक्षां गृहस्थाश्रम श्रेष्ठ असें स्पष्ट शब्दांनीं भगवंतांनीं कोठें सांगितलेलें नाहीं. तसेंच शंकराचार्यांनींही कोणास आपणासारखा वेष व दीक्षा घेण्यास सांगितलें नसतां जेथें तेथें या चतुर्थाश्रमावर रहस्यकार कां घसरले आहेत हें समजत नाहीं. जेव्हां जेव्हां संन्यास हा शब्द येतो तेव्हां तेव्हां रहस्यकारांना भगवीं वस्त्रें परिधान केलेला, हातांत दण्डकमंडलू घेतलेला, मुंडन केलेला, भिक्षा मागत असलेला, असा एखादा मूर्तिमंत संन्यासी डोळ्यांपुढें दिसावा व तो दिसल्याबरोबर त्यांचे पायाची आग मस्तकास जावी व त्यांच्या तोंडून " एकलकोंडे " " गेंड्यासारखे " (गी० पा० ४९६) " तृतीयप्रकृति " (गी० पा० ४९८) सारख्या निवडक बीभत्स अपशब्दांचा त्यांनीं भडिमार करीत सुटावें याला अर्थी काय प्रक्षोभपर कारणें असावींत याचा आम्हांस तर अंदाज होत नाहीं. भगवानांनीं स्वतः " एकाकी " " अपरिग्रहः " " सर्वारंभपरित्यागी " " सर्वसंन्यस्तसंकल्पः " " विविक्तदेशसेवी " " अरतः जनसंसदि " अशा तऱ्हेच्या गौरवयुक्त शब्दांनीं योग्याची प्रशंसा केली त्याच अर्थाच्या निंदापर शब्दांनीं संन्याशांची रहस्यकारांनीं टर उडविली आहे हें ' समत्व ' योगाचेंच लक्षण आहे काय ? हें वाचकांनींच पाहून घ्यावें. आश्रमधर्म हा भगवद्गीतेचा विषय नव्हे. क्षत्रिय आपला स्वभावनियत धर्म सोडून ब्राह्मणाचा भिक्षावृत्ति धर्म पत्करूं लागला तेव्हां " वर्णधर्म " च मुख्यतः भगवानांचा विषय होता, त्यांना आश्रमत्यागाचा प्रसंग पुढें नसल्यानें आश्रमधर्मांचें विवेचन करून त्यांत तारतम्यभाव दाखवावयाचा नव्हता हें उघड आहे. हा आश्रमधर्म स्मृतींच निराळा विषय आहे व तेथें त्या धर्मांचें सविस्तर निरूपण आहे. भगवानांनीं संन्यास म्हणजे काय हें अर्जुनाचे विज्ञप्तीवरून सांगितलें आहे तेंही पण संन्यासाश्रमास म्हणजे स्वरूपतः संन्यासास अगर भगवीं वस्त्रें घेणाऱ्या स्वामीस अनुलक्षून सांगितलें नाहीं. अर्जुन गृहस्थाश्रमीच होता. त्याला स्वरूप संन्यास सांगण्याची तीं वेळही नव्हती. त्याला ' संन्यास ' शब्दाची तात्त्विक मीमांसा भगवंतानीं सांगितली.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥

अ० १८ श्लो० २.

काम्य कर्मांचा न्यास म्हणजे संन्यास असें ज्ञाते लोक म्हणतात. सर्व कर्म-फलांच्या त्यागास विद्वान् लोक त्याग म्हणतात. येथें संन्यास शब्दानें परिव्राड् वेष घ्यावयाचा नाहीं. कर्में चार प्रकारचीं आहेत. नित्य, नैमित्तिक, काम्य व प्राय-श्चित्त. नित्य कर्में केलींच पाहिजेत. नैमित्तिक व प्रायाश्चित्त यांचाही त्याग करणें शास्त्रदृष्ट्या अनुचित आहे.

" नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।

अ० १८ श्लो० ७.

नित्य, नैमित्तिक व प्रायश्चित्त हीं कर्में चित्तशुध्यर्थ अवश्य केलींच पाहिजेत. राहातां राहिलीं काम्य. त्या कर्मांचा त्याग विहित आहे. आत्मज्ञानाची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें काम्यकर्मांचा त्याग केला पाहिजे. संन्यास शब्दानें एवढेंच अभिप्रेत आहे असें दिसतें. अर्जुनास सुद्धां नियत कर्म करण्यास भगवंतानीं उपदेश केला आहे. युद्ध हें क्षत्रियांचें नियत कर्म आहे तें त्यांस केलेंच पाहिजे. शिवाय अर्जुन हा अनात्मवित् आहे त्यामुळें नुसती ज्ञाननिष्ठा सर्वकर्मसंन्यास त्यास सांगणें भगवंतास इष्टही नव्हतें. नियत कर्म चित्तशुद्धीकरितां जिज्ञासूस केलेंच पाहिजे " योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वात्म-शुद्धये " योगी अहंकार वर्जित कर्में चित्त-शुद्धीकरितां करीत असतात, असें भगवानच सांगतात. श्रीमच्छंकराचार्यांनीं सुद्धां भगवानाचा आशय न सोडितां हेंच साधन प्रतिपादिलें आहे. आचार्यांचें म्हणणें एवढेंच कीं, कर्म हें साक्षात् मोक्षास कारण नसून ज्ञानप्राप्तिद्वारा कारण होतें. ज्ञान व कर्म यांचा समुच्चय अशक्य आहे. कर्मांनेंच मोक्षप्राप्ति होत नाहीं तीं ज्ञानानेंच होते. ज्ञानी पुरुषानें जरी प्रारब्धवशात् अगर लोकसंग्रहार्थ कर्म केलें तरी तें कर्मा-सारखें बंधक होत नसून दग्धबीजासारखें असतें. अशा ज्ञानी पुरुषानें केलेलें कर्म कर्मच नव्हे. व अशा कर्माचा व ज्ञानाचा समुच्चयही कधीं होत नाहीं.

यस्य त्वज्ञानाद्रागादि दोषतो वा कर्मणि प्रवृत्तस्य यज्ञेन दानेन तपसा वा विशुद्धसत्वस्य ज्ञानमुत्पन्नं परमार्थतत्वविषयमेकमेवेदं सर्वं ब्रह्माकर्तृचेति, तस्य कर्मणि कर्मप्रयोजने च निवृत्तेऽपि लोकसंग्रहार्थं यत्नपूर्वं यथाप्रवृत्तस्तथैव कर्मणि प्रवृत्तस्य यत्प्रवृत्तिरूपं दृश्यते न तत्कर्म येन बुद्धेः समुच्चयः स्यात् । यथा भगवतो वासुदेवस्य क्षात्रकर्मचेष्टितं न ज्ञानेन समुच्चीयते पुरुषार्थसिद्धये तद्वत्तत्फलाभिसंध्यहंकाराभावस्य तुल्यत्वाद्विदुषः । तत्ववित्तु नाहं करोमीति मन्यते नच तत्फलमभिसंधत्ते । यथाच स्वर्गादि कामार्थिनोऽग्निहोत्रादि कामसाधनानुष्ठानायाऽहिताग्नेः काम्य एव अग्निहोत्रादौ प्रवृत्तस्य सामिरुते विनष्टेऽपि कामे तदेवाग्निहोत्राद्यनुनिष्ठनोऽपि न तत्काम्यमग्निहोत्रादि भवति ॥ असें आचार्य लिहितात. याचा भावार्थ असाः—जो कोणी अज्ञानानें किंवा रागादि दोषांनीं कर्मांस प्रवृत्त होतो व पुढें यज्ञ, दान व तप यांनीं चित्तशुद्धि मिळवून अकर्तृ असें ब्रह्मैक्यज्ञान मिळवितो त्यास

या ज्ञानप्राप्तीनंतर जरी कर्म करण्याचें प्रयोजन राहिलेलें नसतें, तथापि लोकसंग्रहाकरितां पूर्वीसारखाच त्या कर्मांत प्रवृत्त दिसला तथापि तो त्याचा केवळ कर्माभास होय. ह्या कर्माभासामुळें त्यांच्या ज्ञानाशीं त्या कर्मांचा समुच्चय होणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ, वासुदेवानीं स्वतः क्षात्रकर्मचेष्टा केली त्या कर्मांचा ज्ञानाशीं समुच्चय होत नाहीं. पुरुषार्थसिद्धीकरितां समुच्चय धरावयाचा आहे. परंतु भगवंताचे ठिकाणीं पुरुषार्थसिद्धि होण्याची राहिलेली नाहीं. तेव्हां त्यांचे ठिकाणीं व ज्ञान्याचे ठिकाणीं ज्ञानकर्मसमुच्चय स्वभावतःच संभवत नाहीं. एखाद्यानें स्वर्गादि-कामवश होऊन एखादें अग्निहोत्रकर्म सुरू केलें असें समजा व मध्यंतरीं कांहीं कारणानें ती इच्छा नष्ट झाली तर त्यानें पुढें चालू ठेवलेलें अग्निहोत्र काम्य कर्म होत नाहीं.

आचार्यांचें ज्ञान-कर्मसंबंधीं विवेचन पूर्ण तात्विक व न्यायघटित आहे, असें असतां हा त्यांचा अभिप्राय न जाणून " संन्यास " " सर्वकर्मसंन्यास " संन्यासदीक्षा " " एकलकोंडेपणा " " भगवींवस्त्रें " या सर्वांचा एकच गोंधळ रहस्यकारांनीं उडवून दिला आहे. बरें ज्या भगव्या संन्याशांवर रहस्यकार इतके क्रुद्ध होत आहेत, त्यांच्यामध्यें व इतर साधकांमध्यें त्यांना काय विशेष फरक दिसून येतो ? कोणत्याही आश्रमांत झालें तरी, धृति, क्षमा, दम, अस्तेय, शौच, इंद्रियनिग्रह, धी, विद्या, सत्य, अक्रोध हेच दहा लक्षणांचे धर्म सांगितले आहेत (मनुस्मृति अ० ७ श्लो- ९२). शिवाय संन्यासाश्रमांतही कर्मेंही आहेतच. त्यांतही विधिनिषेध आहेत. त्यांतही योगधारणा सांगितलेली आहे. चतुर्थाश्रम घेतलेले म्हणजे ज्ञानी असा अर्थ नव्हे. तेही साधकच आहेत. गृहस्थाश्रमांतही म्हणजे चतुर्थाश्रम घेण्याचें पूर्वीही ज्ञान होणें अशक्य नाहीं. बरें संन्यास घेतल्याबरोबर ज्ञान होतें असेंही नाहीं, प्रपंच व प्रपंचांतील सर्व सुखदुःखें यांचा मिथ्यात्वज्ञानानें वीट आल्यावर व मनुष्य पूर्ण अनृण (म्हणजे देव, ऋषि व पितर यांच्या ऋणांतून मुक्त झाल्यावर) झाल्यावर त्यानें चतुर्थाश्रम घेतला तर या आश्रमस्वीकारापासून रहस्यकारांना काय उपद्रव होतो कोण जाणें ? तो भिक्षा मागेल, एकलकोंडा राहील, सर्वारंभपरित्यागी होईल, ' यतवाक्कायमानस ' होईल, किंवा सदैव समाधियुक्त होऊन राहील त्याबद्दल रहस्यकारांना एवढा राग कां यावा? बरें हीं सर्व लक्षणें त्यांच्या समाजधारणेस पोषक नाहींत म्हणून त्यांना तीं पसंत नाहींत असें म्हणावें तर श्रीकृष्णांनीं अर्जुनास संन्यास न देतांही त्याला उपदेशिलीं आहेत. तेव्हां त्याबद्दल हा रोष खास नसावा. बरें शंकराचार्य स्वतः चतुर्थाश्रमी असून त्यांनीं स्वतःही लोकसंग्रहाचें कार्य इतकें चिरकालीन स्वरूपाचें केलें कीं, तें रहस्यकारांना अनेक जन्मांत करतां येणार नाहीं, श्रीनृसिंहसरस्वतींचें उदाहरण तर सर्वांना ठाऊकच आहे. अशीं शेंकडों उदाहरणें असतां रहस्यकार संन्यासाश्रमावर इतके कां चिडले आहेत याचें कारण अगम्य आहे. कदाचित् आपला काल आश्रमाचा आला असून आपणांस तो घ्यावयाचा नाहीं कारण त्यांत ' एकलकोंडे-

पणा ' आहे असें त्यांना वाटत असेल तर वाटो, त्यांनीं आश्रम घेऊं नये. उलट आपल्या भक्तजनांचे मेळ्यांत सदैव राहून व प्रपंच सत्य मानून त्या प्रपंचाभिवृद्धी-करितां झटावें यांतच आम्हां हिंदुस्थानवासीयांचें ऐहिक कल्याण आहे. रहस्यकारांनीं एकांत स्वीकारून धड आपल्यास समाधिसुख नाहीं व समाजास नेतृत्वलाभ नाहीं असा दुहेरी नाश करणें चांगलें नाहीं. परंतु खऱ्या मुमुक्षूस व वैराग्यशीलास आश्रम घेणें इष्ट वाटल्यास त्यास त्यांनीं खुशाल तसें करूं द्यावें असें आमचें सांगणें आहे

७ नीतियोग.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

रहस्यसंजीवनीकारांची देशभक्ति इतकी निःसीम व निर्व्याज आहे कीं, ती भक्ति शास्त्रीय शब्दांनीं वर्णन करणें झाल्यास तिला 'अनन्य' असें सुद्धां म्हणत येईल. अनन्य भक्ति, अनन्य प्रेम म्हणजे त्या भक्तीस अगर प्रेमास एकाशिवाय दुसरी वस्तु नाहीं. अनन्यभक्ति झाल्याशिवाय देवही सिद्धि देत नाहीं, तसेंच अनन्यभक्ति झाल्याविना देशकार्यही पण हातून होत नाहीं संजीवनीकार हे कट्टे अनन्य देशभक्त आहेत. ही भक्ति अनन्य असल्यामुळें तिला देव हें आश्रयस्थान होणें शक्य नाहीं. देश व देव या दोहीं ठिकाणीं भक्ति एकसारखीच रहाणें शक्य नाहीं; झाल्यास तिला अनन्य म्हणणें शोभणार नाहीं, हें न्यायतःच प्राप्त आहे. साराश, रहस्यकार हे देशभक्त आहेत व देवभक्त नाहींत. या देशभक्तीची त्यांचे ठिकाणी इतकी पराकाष्ठा झालेली आहे कीं, त्यांना या देशांत कोणी कांहीं वैगुण्य काढिल्यास संताप येतो. कोणीं अमुक अमुक या देशांत नाहीं म्हटलें तर तें त्यांना शल्यवत् टोंचतें. हिंदुस्थानांत सर्व कांहीं होतें, असें कोणीं म्हटल्यास त्यांना आनंदयुक्त कौतुक वाटतें. सहाजिकच आहे. भक्तिरसाच्या वर्णनांत सुद्धां हीच तऱ्हा दाखविण्यांत येत असते. हा देश अद्याप पूर्ण स्वातंत्र्यास पात्र नाहीं असें म्हटलें तर ते चिडतात. सारांश हा देश त्यांच्या पूर्ण व अनन्य प्रेमाचें आस्पद झाल्यामुळें या देशांत पाश्चात्य देशांतील नीतिशास्त्रासारखीं शास्त्रें निर्माण झालीं नव्हतीं असा कोणी दोष काढूं लागल्यास तें त्यांना तिळप्राय खपणार नाहीं हें उघड आहे. व तशीं शास्त्रें आमच्या या देशांत होतीं हें सिद्ध करून देण्याकरितां ते बद्धपरिकर झाले हेंही पण त्यांच्या देशप्रेमास पूर्ण साजेसेंच झालें आहे. परंतु ह्या प्रकारानें त्यांच्या देशास कोणीं व केव्हां हिणविलें हें समजत नाहीं. त्यांच्या लिहिण्यांत मात्र वारंवार ह्या व्यंगाचा उल्लेख येत असतो व त्याचें खंडन करण्यास ते अत्यंत उत्सुक झालेले दिसून येतात. वाचकहो, यालाच अनुपम व अलोट भक्ति म्हणतात. श्रीकृष्ण सुद्धां आपल्या ठिकाणीं अशीच अनन्य भक्ति ठेवण्यास वारंवार सांगत असतात. त्रेचाळीस वर्षें सतत भगवद्गीतेचीं पारायणें नीतिशास्त्रभावनेनें संपूर्ण केल्यावर ती भावना फलद्रूप व्हावी यांत आश्चर्य नाहीं. सतत भावनेनें किड्याची कुंभारीण होते, भक्ताचा देव होतो, किंबहुना सर्व दृश्यजात भावनेचेंच फल आहे. तेव्हां त्या न्यायानें या नीति-

भावनेचें कार्य व्हावयाचें तसेंच झालें. रहस्यकार एकदां एखाद्या भावनेच्या पिच्छेस लागले ह्मणजे त्या भावनेला मूर्त किंवा स्थूल रूप दिल्याविना राहात नाहींत. मात्र आधीं भावना उत्पन्न होते मग अभ्यास सुरू होतो. भूगर्भशास्त्र व खगोलशास्त्र यांचें अध्ययन चालल्यावेळीं त्यांना भावना झाली कीं, हे पाश्चात्य शास्त्रज्ञ ह्मणतात कीं, उत्तरध्रुव एके कालीं वस्तीस योग्य होता व तेथें त्याकालीं वस्ती होती, तेव्हां जुन्यांत जुने लोक आमच्या देशाचे, जुन्यांत जुने ग्रंथ आमचे वेद. आतां या पाश्चात्य सिद्धान्ताप्रमाणें वेदांत कोठें प्रमाणें मिळतात का पाहावें. ही भावना झाल्याबरोबर वेदार्थ पहाण्यास सुरुवात झाली. शेवटीं वेदांत तशीं प्रमाणें मिळालीं. तसेंच पुढें नीतिशास्त्राच्या अभ्यासाचे वेळीं त्या तऱ्हेनें लिहिलेले ग्रंथ आमच्यांत नाहींत ते असलेच पाहिजेत या भावनेनें गीतेच्या अभ्यासास सुरुवात झाली व ती फलद्रूप झालीही. साक्रेतिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, लॉक, ह्यूम, बेंथाम, मिल्ल, स्पेन्सर, कान्ट, हेगेल सारखे बडे नीतिशास्त्रकार ग्रीस, इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत होऊन गेले. मग हिंदुस्थानांतच ही उणीव कां असावी ? इतर ठिकाणीं धर्म व नीति यांची जर फारखत होते तर ती येथेंच कां न व्हावी ? शुद्ध व्यवहाररीत्या नीतीची मीमांसा इकडे कां उपलब्ध असूं नये ? ह्या प्रश्नास उत्तरें द्यावयाचीं असा पूर्ण संकल्प ठरूनच भगवद्गीतेच्या पारायणास त्यांनीं आरंभ केला आहे. भगवद्गीतेचीं पारायणें फुकट जावयाचीं नाहींत हा सिद्धान्तच. तेव्हां ज्या फलाकांक्षेनें पारायण-रूपी तप झालें त्या आकांक्षेप्रमाणें फल मिळणारच. असो. तात्पर्य हें कीं, रहस्यकारांची ही जिज्ञासा कशी तृप्त झाली याचें वर्णन त्यांचेच शब्दांनीं करणें चांगलें.

" यामुळें असल्या पाश्चात्य पंडितांचे ग्रंथ ज्यांनीं वाचले आहेत त्यांपैकीं पुष्कळांची अशी समजूत होते कीं, संस्कृत वाङ्मयांत सदाचरणाच्या किंवा नीतीच्या मूलतत्त्वांचा कोणींही ऊहापोह केलेला नाहीं, आमच्याकडील गहन तत्त्वज्ञान म्हटलें ह्मणजे वेदान्त; आणि सध्यांचे आमचे वेदान्त ग्रंथ पहावे तर सांसारिक कर्मांबद्दल ते प्रायः उदासीन असतात असें आढळून येतें. मग कर्मयोग-शास्त्राचा किंवा नीतीचा विचार कोठें सांपडणार ! व्याकरण किंवा न्याय यांवरील ग्रंथांत हा विचार येणें शक्य नाहीं; आणि स्मृतिग्रंथांत धर्माज्ञेच्या संग्रहापलीकडे कांहीं जास्त मिळत नाहीं. तेव्हां आमचे प्राचीन शास्त्रकार मोक्षाच्या गहन विचारांत गढून गेल्यामुळें सदाचरणाच्या किंवा नीतिधर्माच्या मूलतत्त्वांचें विवेचन करण्यास विसरले, अशी बऱ्याच लोकांची समजूत झालेली आहे. पण महाभारत अति विस्तीर्ण असल्यामुळें तें सबंध वाचून त्यांतील विषयांचें मनन करण्यास अवघड; आणि गीता लहान असली तरी सांप्रदायिक टीकाकारांच्या अभिप्रायाप्रमाणें तींत केवळ मोक्षप्राप्तीचेंच ज्ञान सांगितलेलें आहे अशी दृढ समजूत झालेली. परंतु कोणी असें मनांत आणीना कीं, संन्यास व कर्मयोग हे दोन्ही मार्ग आमच्याकडे वैदिक कालापासून प्रचलित असून संन्यासमार्गांतील लोकांपेक्षां

केव्हांही झालें तरी कर्मयोगमार्गाच्याच अनुयायांची संख्या सहस्रपट अधिक असून पुराणेतिहासांतून ज्या कर्त्या महापुरुषांचीं वर्णनें येतात ते सर्व कर्मयोगमार्गाचेच पुरस्कर्ते होते..... "

(गीतारहस्य पा. ४६९।४७०.)

भगवद्गीतेंतील या नीतिशास्त्राची मीमांसा आजपर्यंत कोणाच्याही लक्षांत आली नाहीं. परंतु ती रहस्यकारांच्याच ध्यानांत आली या गोष्टीस केवळ त्यांची दृढ भावना हेंच कारण होय. अद्यापही रहस्यकारांचा ग्रंथ वाचूनही जर ही मीमांसा कोणाच्या लक्षांत आली नाहीं तर तो रहस्यकारांचे मतें मोठा स्थूलबुद्धि अगर मोठा दगडच म्हणावयाचा ! सर व्हँटिस नामक स्पानिश ग्रंथकारानें डॉन क्विगझोट नांवाची एक कादंबरी लिहिलेली आहे. त्यांतील मुख्य नायक स्वतः डॉन क्विगझोट हेच होत. त्यांना आपण पुराणकालीं प्रसिद्ध असलेल्या आर्थर राजाच्या बारा सरदारांपैकीं आहों अशी दृढ भावना झाली होती. या भावनेचा इतका विलक्षण परिणाम या राजेश्रीवर झाला कीं, जिकडे जिकडे ते पाहतील तिकडे त्यांना विक्राळ दैत्य, अन्याय वगैरे सारखे शत्रू दिसू लागले. हरदासासारख्यांचें मागील पायांनीं विठ्ठल विठ्ठल भजन करणारें तट्टू त्यांना किंग आर्थरच्या घोड्याप्रमाणें दिसूं लागलें. शेवग्याच्या शेंगा काढण्याची आकडीची काठी त्याला मोठ्या भाल्यासारखी वाटूं लागली. लोमान्तकाची शस्त्रकंदुक त्याला शिरस्त्राण म्हणून वापरण्याची दिक्कत वाटेनाशी झाली. पुढें पवनचक्की येवो, तलाव येवो, मेंढ्यांचा कळप येवो त्याला शत्रूचें सैन्य आलेंसें वाटून त्यांचेवर भाला बोथाटी करण्यास तो सारखा तयार होई. ह्या कथानकाची या समयास आठवण झाल्याविना रहात नाहीं. या कथानकांत जगांतील इतर प्रेक्षकांना ही भावना झाली नसल्यामुळें त्यांना हें त्याचें करणें अत्यंत हास्यास्पद वाटत होतें यांत नवल नाहीं. परंतु एका भावनेनें पछाडलेल्या डॉन क्विगझोटास तरी दोष कां द्यावा हें आह्मांस समजत नाहीं. कारण तो अगदीं परवश झालेला होता. कोणींही कितीही सांगितलें तरी तें ऐकून घेण्याची त्याची मनःस्थिति नव्हती. त्याप्रमाणेंच रहस्यकारांची मनःस्थिति झाल्यामुळें त्यांना भगवद्गीतेंत प्राधान्यतः नीतिशास्त्र अगर व्यवहारशास्त्रमीमांसा दिसूं लागली आहे. स्वतः भगवान् सांगत आहे कीं, " तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ " परंतु रहस्यकारांनीं ' शास्त्र ' तेवढें " युक्तीनें काढून टाकून त्याचे ठिकाणीं " प्राप्त अगर सांसारिक अगर व्यावहारिक कर्म " असें घालून नीतिशास्त्राचा पाया बसवून टाकिला आहे. श्रुति, स्मृति, योगशास्त्र इत्यादींमध्यें जें विवेचन आहे तेंच या गीताशास्त्रांत आहे, त्याचे बाहेर काडीमात्र दुसरें नाहीं हें कोणासही सहज समजण्याजोगें आहे. परंतु डॉन क्विगझोटच्या एस्कायर सांकोपांझासारखें मात्र अंधानुकरण कोणी करतां कामा नये. भगवद्गीतेंत वर्णाश्रमधर्मास मुळींच सोडलेलें नाहीं तर उलट वारंवार वर्णधर्मच श्रेष्ठ, संकर नरकावह आहे असें भगवान् सांगत असतां

तिकडे आमचे रहस्यकार मुळींच लक्ष देत नाहींत. इतकेंच नव्हे, तर भगवद्गीतेस जबरदस्तीनें त्यांनीं सन्यासमार्गी श्रुतिस्मृतींतून वेगळी काढली आहे व बळेंच तिला सांसारिक व्यावहारिक स्वरूप देऊन टाकलें आहे. बिचारा श्रीव्यास इतर ठिकाणींही "अहो मी तो नव्हे" असा कंठशोष करीत असतांही "तूं तसाच आहेस, तुला भ्रम झाला आहे" अशा तर्कटानें त्यास बळेंच ॲरिस्टॉटल, बेंथाम, कौंट यांचे पंक्तीस बसविण्यांत आलें आहे. असो. असा हा पाश्चात्य नीतिविचार तरी काय आहे याचें कित्येकांस मोठें गूढ पडलें असेल. परंतु आम्ही स्पष्ट सांगतों कीं, आमच्या इकडील तात्विक विचाराइतका तात्विक विचार कोणत्याही खंडांत झालेला नाहीं. या सिद्धान्ताचे निर्णयाकरितां पाश्चात्य पंडितांकडे धांव घेण्याचें मुळींच कारण नव्हतें. हें नीतितत्वाचें बाळकडू जन्मादारभ्यच या वैदिक धर्मीयांस पाजलें जातें. नीतितत्वांचें पालन केल्याखेरीज कोणतेंहि कर्म, उपासना, ज्ञान सिद्धीस जात नाहीं व आम्हां वैदिक धर्मीयांस उपजत बुद्धीचाच नुसता आश्रय करावयास सांगितलेलें नाहीं. उपजतबुद्धीचा पक्ष सर्वांत गौण सांगितला आहे. श्रुति, स्मृति, सदाचार सांगितल्यावर चवथा पक्ष " मनःपूतं समाचरेत् " असें सांगितलें आहे. तसेंच पुष्कळांचें पुष्कळ सुख कशांत आहे हें महत्वमापनाचें उदाहरणही प्रत्येक व्यवहाराचे वेळीं मोडवीत बसण्याचा द्राविडी प्राणायाम करावयास नको आहे. कारण " परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् " सारखीं उज्ज्वल तत्त्वें अनादि कालापासून नुसतीं पठित होत आलीं आहेत असें नसून पदोपदीं आचरणांत व्यक्त होत आलीं आहेत. प्रत्यक्ष सृष्टीचे पूर्वी नारायणानें मोठें उग्र तप केलें; त्या आचरिलेल्या तपापासून प्रथमच " ऋत " व " सत्य " यांची उत्पत्ति झालेली आहे, असें रोजच्या रोज तीन तीन वेळां संध्यासमयीं प्रत्येक वेदधर्मीयाकडून उच्चारलें जात असतें. शम, दम, दया, तितिक्षा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अहिंसा, तप, निरभिमान इत्यादि नियमांचा अहर्निश सर्व शास्त्रें डांगोरा पिटवीत असतां नीति म्हणून कांहीं निराळा पदार्थ आहे ही कल्पना चुकीची आहे. आतां रहस्यकारांना पाश्चात्य पंडितांच्या मीमांसेबद्दल इतकी आदरबुद्धि कां वाटते याचें कारण हें आहे कां, त्यांनीं अमुक गोष्ट चांगली आहे, अमुक वाईट आहे, हें ठरविण्यास कारण काय आहे याचा विचार तात्विकदृष्ट्या करण्याचा प्रयत्न केला आहे. " खरें बोलावें " अशा धार्मिक आज्ञेनें या लोकांचें समाधान होत नाहीं. " बायबाक्यं प्रमाणं " अशा प्रकारची मूढश्रद्धा त्यांना नको असते. खरें कां बोलावें याची मीमांसा ते करूं लागतात, तेव्हां निरनिराळे नीतिशास्त्रकार निरनिराळीं उत्तरें देतात. प्रत्येकाची मति भिन्न असल्यामुळें प्रत्येकाचे विचारही भिन्न असावयाचेच. एक म्हणतो जो गोष्ट अंतरात्म्यानें पसंत केली ती चांगली. प्रत्येक मनुष्याचे ठिकाणीं ही विवेकबुद्धि परमेश्वरानें ठेविलीच आहे. साव असो, चोर असो, सज्जन असो, दुर्जन असो, प्रत्येकाचे हृदयांत ही शक्ति ठेवलेलीच

असते. दोन असामींच्या प्रकृतिभेदामुळें जरी दोघांच्या कृतींत अत्यंत अंतर असलें, तथापि त्यांपैकीं प्रत्येकास आपल्या कृत्याचें चांगुलपण अथवा ओंगळपण मनांत बाणलेलेंच असतें. ह्या अशा तऱ्हेच्या मीमांसकास " विवेकबुद्धि " पक्षीय (Intuitionists) ह्मणतात. साक्रेतिस म्हणतो, मनुष्यास खरें ज्ञान झालें म्हणजे मनुष्याचे हातून वाईट आचरण होणारच नाहीं. शहाणपण व न्याय काय आहे हें समजल्यास मनुष्य न्यायप्रिय झालाच पाहिजे. सत्य काय आहे हें समजत नाहीं तोंपर्यंतच असत्याचरण घडत असतें. प्लेटो म्हणतो, खरें ज्ञान व्हावयाचें तें येथें ह्या नामरूपात्मक जगांत होणारच नाहीं. एक नमुनेबाज कल्पनामय जग या दृश्य जगाच्या मागें आहे त्यांनच खरें ज्ञान होत असतें. साक्रेतिस, प्लेटो, ॲरिस्टाटल यांच्या या मीमांसेस धर्माचा अथवा धर्माज्ञेचा बिलकुल आधार नाहीं. केवळ व्यवहारांतील प्रत्यक्ष व अनुमान या दोन प्रमाणांच्या अनुरोधानें त्यांनीं हीं अनुमानें काढलेलीं आहेत. परंतु या ग्रीक तत्त्ववेत्यानंतर " उपयुक्तावादी " नीतिमीमांसक उत्पन्न झाले. यांना इंग्रजींत Utilitarians म्हणतात. " पुष्कळांचे पुष्कळ सुख " वादी ते हेच लोक. यांनीं याच प्रत्यक्ष व अनुमान याच लौकिक प्रमाणांनीं या " बुद्धिदेवता " पक्षीयांचें खंडन करून आपलें मत स्थापित करण्याचा यत्न केला. जगाचे पाठीवरील निरनिराळ्या देशांचें इतिहासज्ञान जसजसें जास्त वाढूं लागलें तसतसा प्रत्यक्ष प्रमाणाचा प्रांत वाढतच गेला व प्रत्यक्षावलंबी अनुमानाची कक्षाही तशीच वाढली. त्यामुळें एका देशांत जी वागणूक अत्यंत श्लाघ्य समजली जाते, अगर उत्तम सद्गुणांत गणली जाते तीच वागणूक भिन्न देशांत अत्यंत निंद्य समजली जाते, (त्याबद्दलचीं उदाहरणें स्पेन्सरसाहेबांच्या Data of Ethics नामक ग्रंथांत पहा) यावरून सर्वांचे हृदयांत चांगलें वाईट सांगणारी देवता एकच आहे, ह्या सिद्धान्तास हरताळ लागली. कारण दोन परस्परविरुद्ध कौल एकच देवता एकाच वेळीं देणार नाहीं, हें " उपयुक्तावादी " लोक सदसद्विवेकाचें रहस्य कार्यावरून अथवा प्रयोजनावरून ताडीत असतात. अमुक कृतीपासून अमुक सुख झालें अथवा अमुक दुःख झालें, ह्या दोहींत सुख अधिक कीं दुःख अधिक हा विचार करून सुखाधिक्याची बाजू झुकल्यास ती कृति चांगली असें समजूं लागले. यांतून ' पुष्कळांचें पुष्कळ सुख ' (Positivism) हा विवेक उत्पन्न झाला. यांत बेंथाम, मिल्ल, स्पेन्सर या लोकांची गणना होते. या दोन पंथांमध्यें मोठा वाद माजून राहिला होता. " स्वयंस्फूर्ति " पक्षीय (Intuitionists) ह्मणत आपला पक्ष खरा; व ' उपयुक्तता पक्षीय ' म्हणत आपला खरा. हें रण दोन्ही पक्षांत सारखें माजून राहिलें होतें. पहिल्या पक्षांत धार्मिक लोकांचाही वर्ग मिसळला होता. या दोन पक्षांतील तंटा पूर्ण संपला नव्हता, तोंच उत्क्रांतिवादी नीतिकार पुढें सरसावले, व दोन्ही पूर्वपक्षकारांचे कान बळकट धरून त्यांच्या चुका त्यांचे

नजरेस आणून देऊं लागले. या उत्क्रांतिपक्षीयांचें म्हणणें कीं, " स्वयंस्फूर्ति " पक्षही अंशतः खरा आहे व " उपयुक्तता पक्ष " ही अंशतः खरा आहे. प्राण्यांत उपजतबुद्धि असते, हें उत्क्रांतिवादानें खरेंच आहे. कारण मनुष्यप्राण्याच्या उत्क्रांतीच्या कालाकडे लक्ष दिलें असतां, असें दिसून येईल कीं, या प्राण्याच्या अनेक स्थित्यंतरांत एक प्रकारचें वर्तन सुखकारक आहे असें व्यवहारांत कळून आल्यानंतर पुन्हां पुन्हां तेंच वर्तन ठेवण्याचा प्रसंग आल्यामुळें त्या वर्तनास संवयीचें रूप प्राप्त झालें. संवय कालांतरानें इतकी दृढ झाली कीं, तो एक प्राण्याचा स्वभाव बनून राहिला. उत्क्रांतिनियमांनीं हा स्वभाव वंशपरंपरेनें संततींत उतरत गेला व तो ' उपजतबुद्धि ' ' सहजबुद्धि ' या दर्शेत परिणत झाला. या तत्त्वाचे दृष्टीनें प्रत्येक जीवाचें वर्तन प्रथम बुद्धिप्रेरित म्हणजे परिणाम अगर प्रयोजनदृष्टीनेंच होत असतें. पुढें पुढें दीर्घकाल तीच कृति घडत गेली म्हणजे त्या कृतीची बद्धिपूर्वकता जाऊन ती कृति सहजगत्या प्राणी करूं लागतो. यालाच Instinct सहजबुद्धि हें नांव प्राप्त होतें. या जगांत एकदम आयतें तयार असें कांहीं उत्पन्न होत नसतें. तसेंच उपयुक्तावादी जें म्हणत असतात कीं, मनुष्य कार्यावरून कृतीच्या बरेवाईटपणाबद्दल अनुमानें काढीत असतो तेंही अंशतः खरें आहे; कारण ज्या कृतीस प्राणी आरंभ करून पुढें ती वरचेवर करितो, ती कृति प्रथम कार्याचें तारतम्य पाहूनच करीत असतो. नंतर ती कृति संवय होऊन बसते. उत्क्रांतिवाद्यांनीं असा हा दोन्ही पक्षांत समेट करून टाकिला आहे. या पक्षांत स्पेन्सर, अन्स्ट, हेकेल वगैरे बडे बडे लोक आहेत.

रहस्यकारांना अशा तऱ्हेची नीतिमीमांसा संस्कृत वाङ्मयांत केलेली पाहिजे होती. ती त्यांना गीताग्रंथांत मिळाली असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांचे मत ' स्वयंस्फूर्ति ' पक्षही त्याज्य आहे व " उपयुक्तता " पक्षही त्याज्य आहे. कारण बुद्धिदेवता सर्वांचे ठिकाणीं एकच अभिप्राय देत नाहीं व तसेंच प्रत्येक कार्याकार्याचे वेळीं सुखदुःखाचें महत्त्वमापनाचें उदाहरण सोडवीत बसणें शक्य नाहीं. तिसऱ्या उत्क्रांतिपक्षाबद्दल त्यांनीं फारसा ऊहापोह केला नाहीं, तथापि त्या पक्षासही ते एकंदरींत महत्त्व देत नाहींत, असें गीतान्तर्गत नीतितत्त्वास त्यांनीं जें श्रेष्ठत्व दिलें आहे त्यावरून म्हणतां येईल. आतां भगवद्गीतेंतील नीतिमीमांसा कोणत्या तऱ्हेची आहे तें पहाण्यास जेव्हां रहस्यकार लागले तेव्हां त्यांना ' व्यवसायात्मिकाबुद्धि " " साम्यबुद्धि " " सर्वभूतहितेरता ' सारखीं अत्युच्च तत्त्वें सांपडलीं व या तत्त्वांचे जोरावर त्यांनीं शेवटीं पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञांना पादाक्रांत केलें. प्रत्येक कर्मांचें स्वरूप कर्त्याचे बुद्धीवरून ओळखावयाचें, कार्यावरून ओळखावयाचें नाहीं, हें तत्त्व सर्वांत अत्यंत श्रेष्ठ आहे. बुद्धि सम केल्यानंतर मनुष्याचे हातून कदापि पापाचरण घडणार नाहीं. तसेंच प्राणिमात्राचे ठिकाणीं एकच चैतन्य वास करीत असल्यामुळें असूया, द्वेष, मत्सर इत्यादि दुष्ट विकारांस थाराच मिळत नाहीं.

बरोबर आहे. याबद्दल आमचा मुळींच वाद नाहीं. परंतु या तीन पदांवरून सर्व नीतिमीमांसा संपली का ! बरें हीं तीन तत्त्वें गीतेशिवाय अन्य ठिकाणीं नाहींत काय ! " कर्मयोगशास्त्र " हा प्रचंड ग्रंथ धुंडाळून पाहिल्यास व्यावहारिक नीतिशास्त्राची मीमांसा भगवद्गीतेनील उतारे घेऊन विस्तृत रीतीनें एखाद्या स्वतंत्र प्रकरणांत कोठें केलेली आढळत नाहीं. ज्या दोन तीन पदांच्या आधारानें त्यांनीं ही मीमांसा बसविली आहे तीं पदें सहस्रशः गीतेव्यतिरिक्त हजारों लाखों ग्रंथांत सांपडतील, मग ह्या ग्रंथासच नीतिग्रंथ ठरविण्याचें काय कारण होतें, ह्याचा विचार रहस्यकारांनींच फैलून एकदां करून पाहावा. भगवद्गीतेंतील कर्में पाहावीं तीं शास्त्रविहित कर्मेंच जेथें तेथें प्रतिपादिलीं आहेत. रहस्यसंजीवनीकारही ग्रंथांत प्रत्येक ठिकाणीं "शास्त्रविहित कर्में" असाच उल्लेख करीत असतात. इतकेंच नव्हे तर, कर्में म्हणजे शास्त्रविहित कर्में असा अनपवाद अर्थ वाचकांच्या लक्षांत भरण्याजोगा "शास्त्रविहित" शब्दाचा अनुवाद करीत असतात. असें असतां या नीतियुद्धीच्या भरांत त्यांनीं जें उड्डाण केलें त्यासरसीं ते पार शास्त्रसमुद्राचे पलीकडे जाऊन बसले व त्या ठिकाणीं प्राप्त कर्में, सांसारिक कर्में, व्यावहारिक कर्में इत्यादि सरसकट ते घेऊं लागले. ह्या उड्डाणामुळें साधारण वाचकांची दिशाभूल झाली आहे. "शास्त्रविहित" पद कोणत्या आधारानें एकदम उडवून टाकून दिलें हें आम्हांस तर समजत नाहीं. गीता हें शास्त्र आहे. येथें नुसती शब्दाची लटपट उपयोगी नाहीं, तर श्रीकृष्णांनीं व्यवहारांतील प्राप्तकर्म कसें करावें याबद्दल उल्लेख किती ठिकाणीं केला आहे हें लोकमान्यांनीं श्लोक देऊन सांगावयास हवें होतें. 'रागप्राप्त" कर्माबद्दल शास्त्रांत विधि नाहीं, हें पूर्वमीमांसातत्त्व रहस्यकारांना अवगत आहे. तेव्हां रागप्राप्तकर्माबद्दल श्रीकृष्णांनीं जर वाटाघाट केलेली असेल तर ती स्पष्टपणें श्रीकृष्णाचे शब्दांनींच करावयास पाहिजे होती. तेथें आपल्या कल्पनातरंगास स्वैर नाचूं द्यावयाचें नव्हे. श्रीकृष्ण तर म्हणतात व तेंही उपसंहारांत म्हणतात कीं, " शास्त्रविधीस बाजूस गुंडाळून ठेवून वाटेल तें काम करण्यास जर मनुष्य लागेल तर त्यास सिद्धि मिळत नाहीं, सुख नाहीं, श्रेष्ठ गति नाहीं. " (अ० १६, श्लो० २३) अशी भगवंतांचीं अनेक वचनें देतां येतील. " सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः " " कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् " " ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि " या व अशाच तऱ्हेच्या वचनांनीं भगवंतांनीं शास्त्रोक्त कर्मांबद्दल उल्लेख केलेला असतां नसतेंच भगवंतांच्या गळ्यांत व्यावहारिक कर्में लोकमान्यांनीं बांधलीं आहेत. आम्हांस वाटतें, पाश्चात्य नीतिशास्त्रास भुलून जाऊन रहस्यकारांनीं ही कर्म शब्दाची ओढाताण केलेली आहे असें मागें सांगितलेंच आहे. यास गीतेंत कोठेंही आधार नाहीं. आतां कदाचित् " नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् " "तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर" "शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः" या व अशा तऱ्हेच्या पांच चार वचनांचा विपर्यास करून रहस्यकार व्यावहारिक

कर्मास कर्मांत ओढूं पहात असल्यास कोण जाणे ! पण हा त्यांचा प्रयत्न अगदीं वृथा आहे. कारण या वचनांचें प्रकरण कोणतें आहे तें पहा. " लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ । ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥" असा श्रीकृष्णांनीं प्रारंभ केला आहे. लोकांमध्यें दोन निष्ठा आहेत. ज्ञानयोग व कर्मयोग. दोन्ही निष्ठांचा आश्रय एक असणें अशक्य आहे म्हणून भगवंतांनीं ह्या दोन निष्ठा आहेत असें सांगितलें आहे. ज्ञान व कर्म यांचा समुच्चय भगवंतांस अभिप्रेत असता तर निराळ्या दोन निष्ठा आहेत हें सांगणें अप्रयोजक झालें असतें. असो. ज्ञाननिष्ठेनेंही मोक्ष मिळतो व कर्मनिष्ठेनेंही चित्तशुद्धिद्वारां ज्ञान होऊन मोक्ष मिळतो. " ज्ञानादेव तु कैवल्यं " हा सिद्धान्त अबाधित असल्यामुळें कर्मांचा मोक्षाशीं दूरान्वय होत असतो याबद्दल विस्तृत विवेचन पुढील प्रकरणांत करणारच आहोंत. येथें एवढेंच सांगणें जरूर आहे कीं, ही कर्मनिष्ठा म्हणजे "लोहारांचीं, सुतारांचीं, घिसाड्यांचीं, चांभारांचीं" अशीं वाटतील तीं कर्में भगवंतांस मान्य नाहींत. घिसाडी जन्माचाच असेल, त्याच कुलांत जन्मास येऊन स्वभावतःच त्यास घिसाड्याचेंच कर्म प्राप्त असेल तर त्यानें त्या कर्मांतच भक्तीनें, समतेनें अथवा योगानें काल काढला पाहिजे. ब्राह्मणजन्मांत येऊन त्यानें शास्त्रविहित कर्म सोडून भलतेंच कर्म केल्यास त्यास अधोगति आहे, असें भगवद्गीता आग्रहानें सांगत आहे. "श्रेयान्स्वधर्मो विगुणः" ही मागें दिलेली चतुःसूत्री याच अध्यायांत म्हणजे कर्मयोगांत पठित आहे. परंतु रहस्यकारांची यावरील वृत्ति फार गमतीची आहे. ते म्हणतात. " म्हणून कोणताही धंदा एकदां स्वीकारला मग तो चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळें स्वीकारा किंवा खुषीनें स्वीकारा. म्हणजे तो धर्म झाला. " पा. ६६१ पहा. येथें मात्र रहस्यकारांनीं आपलें खरें धर्ममार्तंडस्वरूप प्रगट केलें आहे. रहस्यकारांचा धर्म काय आहे हेंच यावरून आम्हांस समजत नाहीं. धंदा म्हणजे धर्म ! ठीक आहे ! रहस्यकार, आपल्या अगाध धर्मीभ्यासाची परमावधि झाली खास ! बालभक्तांनो आपल्यास अद्यापही हे रहस्यकार " धर्मसिंधु " भासत असल्यास गुरु व शिष्य यांना मोक्षप्राप्तीचेऐवजीं कशाची प्राप्ति होईल हें आपण सांगाल काय ? आम्हांला तर वाटतें याचें दृश्यफल धंदेशिक्षण व देशोन्नति हेंच होय. शिवाय वर्णसंकर हें फल तर नियतच आहे. परंतु अदृष्ट फल भगवद्गीतेचे मतें " संकरो नरकायैव " हें आहे. असो. तात्पर्य हें आहे कीं, " वर्णसंकर " अगर " चाहील तो धंदा " हीं दोन्ही तत्त्वें प्रस्तुत कालास अवश्य असल्यास त्यांचा राजकीय दृष्ट्या वाटेल तितका उपदेश करा, परंतु भगवद्गीतेस असें आधुनिक प्रागतिक, रूप देऊं नका, एवढीच आमची विनंति आहे.

आतां ही नीति म्हणजे भगवद्गीतेंतील नीतिरहस्यकारांचे मतें कोणाकरितां आहे याचा विचार करूं. ते म्हणतात कीं, एकदां प्रथम "कर्मकौशल्य" म्हणजे योग साध्य करा. चित्त अथवा बुद्धि सम करा. फलाची आशा सोडा. सर्वभूतांचें

हित करण्यांत रत व्हा. हीं इतकीं साधनें तुम्हांजवळ झालीं म्हणजे काम झालें. पण वाचकहो, विचार करा, हीं साधनें स्वतः रहस्यकारांना तरी साध्य झालीं आहेत काय ? तुमची गोष्ट तर लांबच राहो. स्थितप्रज्ञ व्हा म्हणजे सर्व कार्य आटोपलें ! हा नीतीचा उपदेश चव्हाट्यावर उभा राहून बाह्या पसरून मोठ्या कळकळीनें कोणी करूं लागल्यास तो जनतेच्या घशांत उतरेल काय ? आपणच विचार करा. हा नीत्युपदेश त्यांना रुचत असल्यास व त्यांचे हातून रुतींत घडत असल्यास रहस्यकारांनीं सर्वांनाः मोक्ष प्राप्त करून दिल्याचें श्रेय त्यांना आजच आलें म्हणावयाचें. परंतु इतकें जगाचें भाग्य नाहीं. साधारण जनतेस आज्ञा, शिक्षा, पाश्चात्य नीतितत्त्वासारखा उपदेश, आमटीभाकरीसारखे दृष्टान्त हेच जास्त पटतात. सर्व जनता मुमुक्षु झाल्यास एका पिढींतच सृष्टीचें सर्व कार्य आटपून जाईल. "समत्व, बुद्धियोग, निरपेक्षता" हीं तत्त्वें अत्यंत मोहक आहेत खरीं, परंतु तीं बहुजनसमाजास साध्य कशीं होणार हें उपदेशकानें पाहावयास पाहिजे. भगवंतांनीं आपल्याकडून सांगून टाकिलें आहे.

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
नचाशुश्रूषवे वाच्यं नच मां योभ्यसूयति ॥ ६७ ॥

अ० १८.

हा भगवद्गीतेचा उपदेश ज्यानें तप केलेलें नाहीं, जो भक्तिमान् नाहीं, ज्यानें देवगुरुशुश्रूषा केलेली नाहीं किंवा जो माझा निंदक आहे अशा मनुष्यास करावयाचा नाहीं असा स्वतः भगवानांनीं निर्बंध घातला असतां रहस्यकारांनीं हा निर्बंध मोठ्या 'चापलानें' मोडून टाकून जाति, देश, काल, अधिकार यांची कांहीं अपेक्षा न ठेवितां ॲरिस्टॉटलच्या ग्रंथांचे श्रेणींत भर बाजारांत याही ग्रंथाची मांडणी केली आहे. श्रीकृष्णांनीं गीतेवर टाकलेल्या या पवित्र वस्त्राचें हरण करण्याचें दुःशासनचरित विनाकारण रहस्यकार आचरित आहेत. असो. या उच्चतम नीतीचा उपयोग समाजावर किती होईल याची आह्मांस खात्री आहे. एकदां कांहीं जिज्ञासु विद्यार्थी प्रेमळपणानें आपल्या खुल्या दिलाच्या गुरुजीकडे जाऊन त्यांनीं पृच्छा केली, "गुरुजी, तोफ कशी तयार करतात हो ?" तेव्हां गुरूंनीं निरालस्यपणें उत्तर केलें, "वत्सांनो, यांत इतकें तुम्हांस अवघड तें काय वाटलें ! हें पहा, एक हात अगर दोन हात लांब एक पोकळी घ्यावी व तिच्या भोंवतीं पितळेचा अगर आपल्यास हव्या त्या धातूचा रस ओतावा म्हणजे तोफ तयार होते !!!" अर्थातच या उत्तरानें बऱ्याच मूढ अशा शिष्यजनांचें समाधान झाल्यासारखें दिसलें, परंतु थोड्या विचारशील शिष्यांचें अर्थातच समाधान झालें नाहीं. त्यांपैकीं हा प्रस्तुत प्रकार झालेला आहे. मोक्ष कशानें सर्वांस सुकर होईल अशी पृच्छा भक्त जनांनीं केल्यावर महात्म्यांनीं उत्तर केलें, "बाळांनो, यांत काय आहे ! संन्यास

मार्गीयांनीं विनाकारण भलतेंच स्तोम माजवून टाकलें आहे त्यांत कांहीं अर्थ नाहीं. हें पहा. एक समत्व घ्या आणि त्याचे भोंवतीं फलनिरपेक्षतापूर्वक कर्मरस ओता म्हणजे मोक्षरूपी तोफ तयार होईल ! ! ! " धन्य ते शिष्य व धन्य ते गुरू ! ! आजपर्यंत चित्तशुद्धीकरितां यज्ञयाग, स्नानसंध्या, जपतप, पुरश्चरणें इत्यादि शास्त्रीय खटाटोप शिष्यास हवा लागे, यापुढें गीतारहस्यानें त्यांची गरजच ठेविली नाहीं. गीतारहस्यांतील सर्व प्रकरणें प्रथम समजून घ्यावींत. एकदां जगाच्या बुडाशीं एकतत्व आहे हें समजून घ्यावें, मग समत्वयोगानें कर्मे अगर पडतील ते धंदे करूं लागावें. अमुक धंद्यांत अमुक फायदा होईल, ही इच्छा मनांत ठेवं नये. कापड विणण्यांत अगर जोडे तयार करण्यांत आपण सर्व देशास मागें हटवूं अथवा पुष्कळ पैसा मिळवूं हें मनांत न आणतां धंदे करूं लागावें. झाला फायदा ठीक आहे न झाला तरी वाहवा ! ! केवढी अजब व सोपी युक्ति ही ! समत्व ठेवा, पण वेळ पडल्यास असमत्वही पत्करा नाहीं तर येशू ख्रिस्तासारखे गालिप्रदानास दुसरा गाल पुढें कराल ! तुमचा धर्म येशूख्रिस्तासारखा मेंगट अगर पुळपुळीत नसून महंमद पैगंबरासारखा खणखणीत व दंडमय पाहिजे.

" Fight in the way of God with those who fight with you but transgress not 190. Wherever you find them, fight with them and expel them from where they have expelled you 191.

Chapter II, Kuran by Mahamad A. Hakim.

भगवद्गीतेंत " समलोष्टाश्म कांचनः " " सुखदुःखे समे कृत्वा " " एकाकी " " समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः " " तुल्यानिंदास्तुतिर्मौनी " अशा तऱ्हेचीं वचनें आहेत, आज्ञा आहेत स्पष्ट निःशंक उपदेश आहे, हाही अर्थात् या धंदेशिक्षणांत पाळला पाहिजे. वाचकहो, हा गोंधळ अथवा धर्माचें हें अवचट चाप वीस भुजांनीं उचलून उरःस्थलावर घेतलेलें आहे, यांतून रहस्यकारांची कोणता ' समानधर्मा ' सुटका करील तो करो, आम्हांस तर त्यांच्या उघड उघड भ्रमाची अथवा अत्यंत विरोधात्मक विवेचनाची कींव येत आहे, याचें कारण गुरुशिष्यपरंपरागत आलेलें पायाशुद्ध ज्ञान रहस्यकारांना मिळालें नाहीं त्याचें हें फल. त्यामुळें ही समत्वांत असमता, एकाकीपणांत लोकसंग्रह, मानापमान-तुल्यतेंत राग, क्रोध व पौरुष वगैरे सारखी परस्परविरुद्ध द्वंद्वांची एकसारखी खिचडीच बनून गेली आहे, व हा परिणाम कशाचा म्हणाल तर पाश्चात्यनीति गीतेंत पाहण्यास लागण्याचा. या सर्व परस्परविरोधी वचनांची सुसंगति योग्य मार्गानें कशी लागते, हें आम्ही पुढें दाखविणार आहों. परंतु रहस्यकारांच्या या प्रागतिक प्रवृत्तिपर धर्मांची कशी त्रेधा झाली आहे, याचा नीट विचार झाल्याशिवाय निवृत्तिधर्म नीट

ठसणार नाहीं, म्हणून तो विचार प्रथम करणें भाग पडलें; असो, रहस्यकारांना नीतीचा एवढा कां घोंटाळा पडला हेंच आम्हांस समजत नाहीं. वेदांत, ब्राह्मणांत, उपनिषदांत पदोपदीं नीतिच भरलेली असतां तिला एका गीतेंतच कां रहस्यकारांनीं कोंबून ठेविली हें कळत नाहीं. प्रत्यक्ष सृष्टीची उत्पत्तिच मुळीं वेदानें सत्यांत व तपांत केली आहे. सृष्टीची धारणाही सत्यानेंच होत असते. "सत्येनोत्तभिता भूमिः" हा ऋग्वेद संहितेंतील मंत्र पहा, त्यांत ऋत व सत्य (Invariable law of truth) या दोहींनीं विश्वाचें धारण केलेलें आहे असें दिसून येईल. तसेंच प्राण्यांचा इतिहास पुनर्जन्माचे नियमांत बसवून टाकल्यामुळें नीतीची निराळी मीमांसा करण्याचें कारणच राहिलें नाहीं. वेदांत सुबंधुसूक्त पाहिलें असतां पुनर्जन्माचा सिद्धान्त आमच्या धर्मांत अनादिकालापासून आहे ही खात्री होईल. "जसें करावें तसें भरावें, जसें पेरावें तसें कापावें" हा न्याय सर्वत्र लागू असल्यानें "उपजत बुद्धि" अगर "सुखदुःखमहत्वमापन" याचें कारण उरत नाहीं. क्रिया केल्यावर तिच्या लाटा बाह्यप्रदेशीं पसरून अपेक्षित स्थलीं पोंचल्यावर तेथून पुन्हां प्रतिक्रिये (Reaction)च्या नियमानें त्या लाटा पुन्हां कर्त्याकडे फिरतात, व कर्मफळ या स्वरूपानें त्या जीवास भोगाव्या लागतात हा सिद्धान्त त्रिकालाबाधित आहे. यामुळेंच छादोग्योपनिषदांत म्हटलें आहे "तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन् ब्राह्मणयोनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वाथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरन् श्वयोनिं वा सूकरयोनिं वा चंडालयोनिं वा" ॥ ७ ॥ नवमखंड. अ० ५.

भावार्थ:-' या लोकीं जे पुण्यकर्मे करितात त्यांना लागलीच पुनः ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य असा चांगला जन्म प्राप्त होतो, परंतु जे पापकर्मे करितात त्यांना कुत्रें, सूकर अथवा चांडाळ यांचा पापी जन्म येतो." असें श्रुतीचें प्रमाण आहे. हल्लीं थिऑसफीची नवीन झालेली सुधारणा घ्यावयाची नाहीं; कारण त्यांत माणसांना पुन्हां कुत्र्याचा अगर अन्य नीचयोनीचा जन्म यावयाचा नाहीं असा सुधारलेला वेदान्त सिद्धान्त प्रतिपादिला आहे. श्रुतींची सुधारणा हे शब्द अस्सल वैदिक धर्मीयांस कसेसेच लागतील पण निरुपाय आहे. मागें महातपस्वी ऋषींनीं सुद्धां श्रुतींत सुधारणा केली नाहीं, म्हणजे श्रुति अपौरुषेय असल्यामुळें त्यांत सुधारणा करण्याचा त्यांचाही अधिकार नव्हता; परंतु हल्लीं 'ब्रह्म' शब्दसुद्धां स्पष्ट उच्चारतां येत नसलेल्या, वेदानधिकारी व संस्कृतानभिज्ञ अशा एका गौरकाय बाईच्या वाणीस श्रुतितुल्य समजून माना डोलावून तिच्या चरणीं हा ब्रह्मपिंड मिलिंदायमान करणाऱ्या भेकड, अज्ञानी, नष्टतप ब्रह्मबंधूंना काय म्हणावें समजत नाहीं. या बाईनें श्रुतींत केलेली ढवळाढवळ न घेतां पाहिलें म्हणजे कर्माचें फल पुन्हां पुन्हां उच्च-नीच योनींत जन्म हें कायमचें आहे. हा चौऱ्यांशीं लक्ष योनींचा फेरा पुनः पुनः फिरण्याचा अनादिकालापासून जीवाचा क्रम चालू आहे, यापेक्षां

नीतीची दुसरी निर्विवाद उपपत्ति कोठून मिळेल ? ' जसें कर्म तसें फल ' म्हट-ल्यावर कर्माचें फल या जन्मीं नाहीं तर अन्य जन्मीं कोठें तरी केव्हां तरी भोगल्या-शिवाय गत्यंतर नाहीं हा आदिसिद्धान्त असल्यामुळें मनुष्य, कर्माचें फल कसें मिळेल याचा विचार करून कर्म करूं लागेल यांत नवल नाहीं. परदुःखास आपण कारण झाल्यास आपल्यावर त्याची प्रतिक्रिया खास होणार, हें तत्व वेदधर्मीयांच्या हृत्पटलावर वज्रलेप कोरलेलें आहे. हिंदु बायकासुद्धां असें म्हणतांना आपण ऐकतों कीं, " कोण्याजन्मीं केलं होतं तें इथं निस्तरतें. आतां इथं असं करून कुठं निस्त-रावं ? मला कांहीं तसं गैर करायचं नाहीं. " अहाहा ! अशा सत्य नियमांचा प्रकाश हिंदुमनावर पडलेला असतां पाश्चात्य नीतिविवेचनांतील वितंडवाद ' बुद्धि ' " महत्वमापन " " उत्क्रांति " हास्यास्पद दिसूं लागावींत हेंच योग्य असतां रहस्यकारांची अशी कां तारांबळ झाली समजत नाहीं. हें आमच्याकडील ' कर्म-तत्व ' अथवा ' पुनर्जन्म ' तत्व पाश्चात्यांस माहीतच नाहीं. त्यामुळें हा स्थूलबुद्धि-वाद तिकडे उत्पन्न झाला. रहस्यकारांनीं स्वतः या पुनर्जन्म प्रकरणाचें सविस्तर वर्णन करून आपली त्याजवरील श्रद्धाही व्यक्त केली आहे,असें असतां नीतिशास्त्र आमच्यांत नाहीं असा विषाद त्यांना कां व्हावा ! महंमदी व ख्रिस्तीधर्मास आत्म्याचें अमरत्व मान्य होतें, परंतु इकडील पुनर्जन्मवाद दोन्ही धर्मांतही नाहीं येथील जन्मानंतर स्वर्गअपवर्ग याशिवाय कांहीं निरनिराळ्या जन्माची भानगड त्यांना अवगत नाहीं, यामुळें त्यांच्याही नीतीस पक्का पाया नाहीं. " पुष्कळांचें पुष्कळ सुख " घडण्याचें प्राण्यास कारण नाहीं. आपलें कर्म इहपर आपल्या सुखा-सच कारण व्हावें असें जरी जीवानें म्हटलें तरी बस्स आहे.त्याचे हातून वाईट कर्म होणार नाहीं. करावें तर तसें त्यासच पुढें मागें भोगावें लागणार,या दूरच्या दृष्टीनें हिंदु हा नीतिमीमांसा करीत असतो. Sidgwick अगर Martineu च्या ग्रंथांची त्याला अवश्यकता भासत नाहीं. हे ग्रंथ केवळ ऐहिक दृष्टीचे-अतएव स्थूल दृष्टीचे आहेत म्हणून ते सन्माननीय नव्हेत, असें खरा व जाणता हिंदु म्हणेल. ज्याचा पुनर्जन्मावर विश्वास नाहीं त्यानें खुशाल त्यांचें स्तोम माजवावें,त्याची तो फिकीर करीत नाहीं. रहस्यकारांनीं जी नीतिमीमांसा भगवद्गीतेंतून मंथन करून काढलेली आहे ती मीमांसा प्रत्येक धर्मग्रंथांत आढळून येईल. प्रत्येक स्मृतींत, प्रत्येक उप-निषदांत, पुराणांत, इतिहासांत नीतीचेंच विवरण दिसून येईल. मोठमोठे अवतारी पुरुष हे तर नीतिशास्त्रसिद्धान्तांचे मूर्तिमंत पुतळेच होते. रामचंद्र, हरिश्चंद्र, नल, हनुमान, सीतादेवी, भीष्म, धर्म एक कां दोन हजारों विभूतींनीं ह्या देशांत आपल्या चरित्रांचे जिवंत नीतिग्रंथच तयार करून ठेविलेले आहेत. असो. ज्या तन्हेची नीतिमीमांसा गीतेंत आहे असें रहस्यकार म्हणतात ती मीमांसा गीतेंत मुळींच नाहीं. कदाचित् या योगाचे अव्वलीस दिलेला श्लोक रहस्यकारांचे उपयोगी पडेल म्हणून तो आम्हीं प्रथम घातला आहे.

८ बाह्याध्यास योग.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥

भ. गी. अ. १३ श्लोक १९.

प्रपंचाची उत्पत्ति, स्थिति व लय या तिन्ही अवस्थांची सोपपत्तिक मांडणी करण्यास सांख्यशास्त्राचा उपयोग वेदान्तशास्त्रांत करीत असतात हें सर्वांस महशूरच आहे. सांख्यशास्त्र जरी वेदान्तास सर्वतोपरी मान्य नसलें तरी त्या शास्त्राची प्रक्रिया फार सोईची असल्यानें वेदान्तशास्त्रांत त्या प्रक्रियेचा उपयोग निरभिमानपणानें करण्यांत येत असतो. रहस्यकारांनीं सांख्यशास्त्राचें विस्तृत व मार्मिक वर्णन आपल्या ग्रंथांत केलें आहे इतकेंच नव्हे तर विश्वाची उभारणी व संहारणी याच शास्त्राचे आधारानें त्यांनीं विशद केली आहे. नंतर त्यांनीं अध्यात्म विषय सांगून एकदोन प्रकरणांनंतर ज्ञानोत्तर कर्मयोगाचें प्रकरण हातीं घेतलें आहे. ज्ञान झाल्यानंतर कर्म करावें कीं नाहीं हा विषय मुळीं अज्ञानी विरुद्ध अज्ञानी या दोन पक्षांत संभवत नाहीं. कारण दोघांचे ठिकाणीं ज्ञानाची वार्ताच नसल्यानें ज्ञानोत्तर कर्मांचा मुद्दाच त्यांच्या वादांत अगर दाव्यांत संभवत नाहीं. तसेंच अज्ञानी विरुद्ध ज्ञानी या दोघांचे दरम्यानही हा वाद उत्पन्न होत नाहीं. कारण दोघांचे अधिकार निराळे पडले. दोघांत वादाचा विषय निघावयाचा प्रसंगच संभवत नाहीं. ज्ञानी विरुद्ध ज्ञानी यांचे दरम्यान मात्र ह्या वादास अवसर आहे. परंतु ज्ञानी विरुद्ध ज्ञानी या दोन पक्षांपैकीं कोणाचें वकीलपत्र, सध्यां रहस्यकारांकडे आलें होतें हें समजणें कठीण आहे. ज्ञानी लोकांतील हा दावा रहस्यकारांनीं हातीं घेऊन त्यांतील एका पक्षाची म्हणजे ज्ञानोत्तरकर्मयोग्याची बाजू त्यांनीं जनतेसमोर मांडली. या दाव्यांतील पुरावा ऐकणारे अज्ञानी, वकिली करणारे अज्ञानी, न्याय देणारेही अज्ञानी ! तेव्हां ज्ञानी लोकांच्या ह्या दाव्याचा निकाल योग्य कसा लागावा ? असो. ज्ञानोत्तर कर्में करावीं कीं करूं नये या भव्य सिद्धान्तास हात घालण्यापूर्वी वाचकांचा विषयप्रवेश झाला पाहिजे म्हणून कांहीं "योग" अथवा ' प्रकरणें ' उपस्थित करणें भाग आलें आहे. हीं प्रकरणें क्रमशः सूक्ष्म विचारानें अवगत केल्यानंतर वादाचा विषय व मुद्दे वाचकांच्या नीट लक्षांत येतील, एरव्हीं येणार नाहींत. हीं प्रकरणें आधुनिक पद्धतीनें शिकलेल्या वाचकांस सहज समजावींत अशा तऱ्हेनें त्यांचें प्रतिपादन करावें असा आमचा इरादा आहे. पूर्ण करणार जगदीश समर्थ आहे.

सामान्य वाचकांस ' गीतारहस्य ' हें कायमचें रहस्यच रहाणार आहे ही गोष्ट खरी; परंतु ज्यांना या विषयाची थोडी गोडी आहे अथवा ज्यांचा या विषयांत किंचित् प्रवेश झालेला आहे अशा वाचकांची जी श्रीशंकराचार्यांचे ठिकाणीं अगर तसेच जे दुसरे वेदान्तकेसरी जगद्गुरु (अर्थात् वैदिक-जगत्-गुरु) होऊन गेले त्यांचे ठिकाणीं आजपर्यंत बसलेली भक्ति एकदम नाहींशी होऊं नये म्हणून या वेदान्तविषयाचें विवेचन करण्याचें योजिलें आहे. हें विवेचन लक्षपूर्वक पाहिल्यास वादविषयक प्रश्न वाचकांपुढें स्वच्छ दिसूं लागेल. विनंति एवढीच आहे कीं, कोणत्याही पक्षाभिमानानें पुढील प्रकरणें वाचूं नका. शास्त्रीय परिभाषा न वापरण्याची-अर्थात् होतां होईल तों-खबरदारी घेतली जाईल, इकडे आम्ही लक्ष देऊं.

हल्लीं या विसाव्या शतकांत भौतिक शास्त्रांची इतकी भयंकर वाढ झाली आहे कीं, शंभर दोनशें वर्षांच्या पाठीमागील एखादा मृत जीव जर अमृतसिंचनानें सजीव केला तर तो आपणास कोणत्या तरी नवीन सृष्टींत आणलें आहे असें खास म्हणेल. पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश या सर्वांना मानवानें बंदिवान करून सोडल्यामुळें व अघटित कार्यें या पंचमहाभूतांकरवीं मनुष्य करून घेऊं लागल्यामुळें त्या पुनर्भूत जीवास ही मानव कोटी नसून कोणती तरी यक्ष-गंधर्व-देवकोटी असावी असें वाटेल. हीं सर्व आधिभौतिक शास्त्रें पृथ्वीवरील सर्व देशांत मान्य झालीं असून जगांतील सुखाची अभिवृद्धि व दुःखांचा नाश याकडे या शास्त्रांचा उपयोग करण्यांत सर्व देश अहर्निश प्रयत्न करीत आहेत. शंभर दोनशें वर्षांपूर्वीची आमच्या लोकांतील श्रद्धा, धर्मभोळेपणा, आप्तवाक्यावरील विश्वास वगैरे पार नाहींसे झालेले दिसतील. आधिभौतिक उन्नतीस पोंचलेल्या राष्ट्रांशीं संबंध जडल्यामुळें पूर्वीची संकुचित व वैयक्तिक जीवनपद्धति जाऊन तिचे ठिकाणीं संकलित, सामाजिक जीवनपद्धतीस प्रारंभ झालेला आहे. पूर्वीच्या मंत्रयुगांत मंत्रांचें गोपन अत्यंत काळजीनें केलें जात असे कारण तो मंत्र षट्कर्णी झाल्यास त्याचें महत्व जात असे. तंत्रयुगांत सुद्धां तंत्रगोपन तितक्याच-प्रायः जास्त काळजीनें-करीत असत. हल्लींच्या या यंत्रयुगांत मंत्र उघडे झाले, तंत्रांचीं भाषांतरें झालीं, खुल्या व्यापाराचीं तत्वें व समतेचीं तत्वें निरनिराळ्या तऱ्हांनीं प्रतिपादण्यांत येऊं लागलीं. अमुक विद्येस अमुकच अधिकारी असा निर्बंध राहिला नाहीं, परंतु कोठें तरी असमता असल्याशिवाय अथवा रहस्यगोपन असल्याशिवाय सृष्टीची धारणाच व्हावयाची नाहीं. प्रकृतीची साम्यावस्था बिघडेल म्हणजे असमता होईल तेव्हांच विश्वाचें अस्तित्व संभवतें. असो. तात्पर्य हें कीं, या यंत्रकालांत ' यंत्रगोपना ' शिवाय इतर कोणत्याही विद्येस गोप्यगोपन प्रकार नाहीं. हें ' यंत्रगोपन ' अथवा Trade-secret प्रागतिक राष्ट्रांतही अवश्य मानिलें जातें. तेव्हां हें कालमहात्म्य अथवा युगमहात्म्य आहे, तेव्हां या युगांत आमचें लक्ष या यंत्रशास्त्राकडे वेधावें यांत नवल नाहीं. कोणत्याही समाजांत चला तेथें प्रगति, सुधारणा, उन्नति, उद्यो-

गधंदे इत्यादि व्यवहारांचें चर्चेशिवाय फारशी चर्चा मिळणार नाहीं. तात्विक विचाराची चर्चा करण्याची कोणाची इच्छाही नसते. कोठें अशी चर्चा होत असल्यास ती विधवाश्रोतृवृंदाचे पुढें एखाद्या पुराणिकाची अथवा अशा तऱ्हेच्या भटभिक्षुकांची व त्यांतीलही बरीचशी चर्चा उदरनिर्वाहाकरितां असते हेंही सांगावयास नको. तत्त्वजिज्ञासु प्राणी जगांत आधीं विरळाच. कोणी असल्यास त्यास खरें तत्त्वज्ञान होणें फार कठीण झालें आहे. कारण जिज्ञासूंच्या संख्येपेक्षां उपदेशक फार झाले. यंत्रशास्त्राचे पाठीमागें सर्वजण लागल्यामुळें मंत्रशास्त्राकडे कोणाचें लक्ष जात नाहीं. कोणाचें गेल्यास तो हास्यास्पद ठरतो. परंतु या लोकनिंदेची पर्वा न करितां सत्यान्वेषण केलेंच पाहिजे या बुद्धीनें आपण तत्वविचारास लागूं.

आपण आपल्या जुन्या लोकांच्या तोंडून नेहमीं ऐकत असतों, " जग हें नश्वर आहे. परमेश्वर खरा आहे. तेव्हां अहर्निश त्याचें भजन पूजन करा. " हा वृद्धोपदेश माहीत नसणारा इसम हिंदु समाजांत सांपडणें कठीण. परंतु " प्रपंच मिथ्या आहे " हें शब्द ऐकिल्याबरोबर आमच्या " सुशिक्षित " स्नेहीमंडळींत एक प्रकारचा तिरस्कार, राग, औदासीन्य अथवा अनुकंपा इत्यादि विकारांचा प्रकृतिभेदानुरूप प्रादुर्भाव झालेला दिसेल, " ह्या मूर्खांनींच प्रपंच मिथ्या म्हणून आमच्या देशास अवनति आणली " असें कांहीं म्हणतील. कांहीं म्हणतील, " अहो प्रपंच मिथ्या आहे ना ? मग तुह्मांस खाण्यास जेवण्यास कशाला पाहिजे ? " कोणी म्हणेल " अहो प्रपंच मिथ्या तर तो खरा कसा दिसतो ? " तर कोणी ह्मणेल " अहो त्याचें डोकें फिरलें आहे. त्याचेकडे दोष नाहीं. " तेव्हां अशा स्थितींत ' प्रपंच मिथ्या ' म्हणणाराचें डोकें फिरलें आहे कीं प्रपंच सत्य म्हणणाराचें फिरलें आहे, हें आतां पाहावयाचें आहे.

श्रीमदाचार्यांनीं ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहिण्यापूर्वी प्रपंच अध्यासात्मक आहे हें प्रथम विशद करून मग " अथातो ब्रह्मजिज्ञासा " या सूत्राचें अवतरण केलें आहे. या आचार्याचे प्रस्तावनेस अध्यासभाष्य असें म्हणतात. प्रपंच मिथ्या आहे ही भावना दृढ झाल्याशिवाय ब्रह्मजिज्ञासा संभवत नाहीं. ह्याकरितांच आचार्यांनीं ही पद्धति स्वीकारली हें योग्यच केलें. त्याच पद्धतीचा अवलंब आपणही करूं ह्मणजे ज्ञानोत्तरदशेंत कर्मास अवसर किती मिळतो याचें ज्ञान चांगलें होईल.

प्रथम आपण व्यवहारदृष्ट्या प्रपंचज्ञानाचा विचार करूं. प्रपंच नित्य नसून नैमित्तिक आहे या सिद्धान्तांबद्दल फारशीं प्रमाणें द्यावयास नकोत. हें सत्य प्रत्येक मनुष्यांत पूर्ण ठसलेलेंच असतें. आजचा मनुष्य उद्यां नसतो. आजची स्थिति उद्यां असेलच ह्मणण्याचा नियम नाहीं. मोठमोठ्या सागरांचे ठिकाणीं कालांतरानें उत्तुंग शैलशिखरें निर्माण होतात. मोठमोठे गिरिवर नाहींसे होऊन तेथें अस्मान् खोल सरोवरें होतात. पृथ्वीच्या एका लहानशा आंदोलनानें मानवी कृतीचीं भव्य शहरें एका क्षणांत नामशेष होतात. फारकशाला, नदीचा प्रवाह जसा सतत वाहात

असल्यानें अगर दिव्याची ज्योत प्रदीप्त असल्यानें जसें एका क्षणांतील पाणी दुसऱ्या क्षणांत तेथें नसतें अगर एका क्षणांत ज्या अग्नीनें आपलें बोट भाजतें त्याच अग्नीनें दुसऱ्या क्षणांत बोट भाजलें असें म्हणणें शास्त्रीयदृष्ट्या चुकीचें होईल. तसेंच क्षणाचे मागील जग क्षणानंतर तेंच आहे असें म्हणतां येणार नाहीं. प्रतिक्षणीं पृथ्वीचशी काय पण सर्व सूर्यमालिकाही एका मोठ्या जबरदस्त आकर्षणशक्तीच्या योगानें अंतरिक्षांत कितीतरी मैल दूर जात असते. आपल्या देहांतील पेशी (cells) सुद्धां क्षणोक्षणीं पालटत असतात. सारांश प्रपंचाची क्षणभंगुरता सर्वांस सारखीच महशूर आहे. ही क्षणभंगुरता सर्वांस अवगत असली तरी नित्य व्यवहारांत तिचा कांहीं बाध येत नाहीं. यामुळें प्रपंचांत मनुष्याची आसक्ति फारशी कमी होण्याचें कारण नसतें. परंतु जग हें खोटें आहे हें सत्य मनुष्यास एकदां पटलें म्हणजे त्याची प्रपंचावरील श्रद्धा उडून जाऊं लागते व सत्य काय आहे हें जाणण्याची त्याला उत्कंठा लागते. तेव्हां प्रथम आपण याबद्दल अगदीं स्थूलदृष्ट्या विचार करूं. आपणांस ज्ञान होतें याची मीमांसा प्रत्येकास माहीत आहेच. पंचज्ञानेंद्रियें, मन व बुद्धी या साधनांनीं आपणांस बाह्यसृष्टिचें ज्ञान होत असतें. द्रष्टा व दृश्य (subject व object) असे सृष्टीचे प्रथम दोन भाग कल्पूं. मी (subject) पाहाणारा व मजव्यतिरिक्त सर्व कांहीं दिसणारे अगर समजले जाणारे पदार्थ मग ते जीव असोत अगर निर्जीव पदार्थ असोत यच्चयावत् दृश्य कोटींत येतात. पर्यायानें हेंच सांगावयाचें म्हणजे विषयी व विषय असे जगाचे दोन विभाग पडतात. विषयी हा जन्मास आल्यापासून आपल्या ज्ञानसाधनांनीं बाह्य विश्वांतील पदार्थांचें निरीक्षण करितो. त्यांचा आकार, वास, चव, आवाज वगैरे इंद्रियांनीं अजमाऊन घेऊन आपले सर्व अनुभव काल व देश (Time & space) या दोन तत्त्वांच्या बंधनांत बसवून ठेवितो. एखादा बघितलेला डोंगर, चाखलेला आंबा, ऐकलेला सूर, भाजणारा अग्नि या सर्वांच्या आकृति ते ते पदार्थ पुन्हां जवळ नसतानांही जसेच्या तसेंच मनांत (स्मृतींत) ठेवितो. ही ज्ञानाची प्रक्रिया आपण नेहमीं करीत असतो परंतु याच प्रक्रियेचा तात्विक दृष्ट्या पुन्हां आपण ऊहापोह करूं. उदाहरणार्थ आपण एखादा स्थूल पदार्थ घेऊं. आंब्यासारखा मधुर पदार्थच आपण घेऊं. आंबा पुढें ठेवून त्याचेकडे पहा. तो साधारण वाटोळ्या आकाराचा दिसतो, पिकलेला असेल तर पिंवळ्या वर्णाचा दिसतो. हात लावून पाहिल्यास मऊ अगर घट्ट लागतो, त्याचेवर टिचकी मारून पाहिल्यास बदबद् आवाज करतो. चाखून पाहिल्यास विचारावयासच नको. आपलें मिष्ट स्वरूप मनुष्यास कळवितो. पुन्हां एकदां हीच क्रिया करा व काय पाहिलें तें सांगा. आपण म्हणाल " आंबा पाहिला." आम्हीं म्हणतों चूक आहे. आपण "आंबा" पाहिला नाहीं, कसें तें पहा. आपण नेत्रांनीं रूप अगर आकार पाहिला.आकार, रूप,वर्ण हे गुण आहेत, पदार्थ नव्हेत. चाखून गोडी पाहिलीत म्हणजे गुणच पाहिलात. हातांत घेऊन

पाहिला तरी घट्टपणा, मऊपणा इत्यादि गुणच पाहिलेत. हें उत्तर आपणास चमत्कारिक वाटेल. परंतु विचारांतीं आपणास तेव्हांच ध्यानांत येईल. समजा, कोणी एखाद्यानें आंबा कधीं पाहिला अगर चाखला नाहीं. अशा माणसाला आपण आंब्याची कल्पना कशी आणून द्याल ? आपण म्हणाल, आंबा लांबट, वाटोळा असतो, पिंवळसर असतो, मिष्ट अगर आंबटगोड असतो, मऊ असतो. आपल्या सांगण्यावरून तो मनुष्य हे सर्व गुण एके ठिकाणीं करूं लागेल व त्यावरून आंब्याची कल्पना करूं लागेल. साहजिकच आहे. आपणही त्याला सर्व गुणच सांगितले व त्यानेंही गुणांचीच बेरीज केली. आपण तरी कांहीं सांगावयाचें मागें ठेविलें काय ! (आंबा हा एकजिनसी म्हणजे साल, रस, कोय इत्यादि विरहित आहे अशी या उदाहरणांत कल्पना केली पाहिजे, नाहींतर साल, रस वगैरे जिनसांची याच पद्धतीनें वाट लावावी लागेल) आपला आंब्याचा सर्व अनुभव त्याला सांगा. सर्व गुणांचीच मालिका आपल्याला सांगावी लागेल. खरेंच पाहिलें असतां आपणही इंद्रियांकरवीं फक्त गुणच घेतले होते असें असतां खोटेंच पदार्थ घेतला असें म्हणतां आहां. जें आपण घेतलें होतें तेंच दुसऱ्यास देत आहां. कोणतीही वस्तु घ्या. ती बाह्यप्रदेशीं आहे असें ह्मणण्याबद्दल तुमच्याजवळ काय पुरावा आहे ? त्याचा गुणसमुच्चय यापेक्षां कांहीं नाहीं. वस्तूची वाटेल तितकी परीक्षा करून घ्या, आपल्या पदरीं केवळ कमजास्त गुणच येतील. आपला अनुभव केवळ गुणात्मक असून आपण त्या गुणसमुच्चयास वस्तु असें नांव देतां. वाचकहो, या ठिकाणीं आपणास नेहमीं असलेली संवय क्षणभर बाजूस ठेवून सूक्ष्म विचार करा. तूर्त आपण या पंचेंद्रियांस विषयींचीं साधनें अथवा पहाणाऱ्याचीं उपकरणें अतएव द्रष्ट्याचाच एक भाग असें समजून चालूं. पंचेंद्रियांच्या तारांवर बाह्य प्रदेशांतून आघात होतात व ते आघात आंत द्रष्ट्यास पोंचतात, याबद्दल आपण वाद करणार नाहीं. तेव्हां ज्या वेळीं आपण पदार्थ बाह्य सृष्टींत पहातों त्या त्या वेळीं आपण त्यांतील गुण तेवढे पहातों. आपण म्हणाल कीं " अहो हें शास्त्रीय विवेचन अमळसें विलक्षण दिसतें. कां म्हणाल तर ही पहा मीं एक वस्तु हातांत घेतली आहे. ही सोन्याची चीप आहे. ही मी येथून दुसरीकडे नेईन म्हणजे येथील नाहींशी करीन; तसेंच हिला आटवून तिचा द्रव करीन, नंतर एखादी दागिन्याची आकृति हिला देईन असें असतां आपल्या म्हणण्याप्रमाणें ही वस्तु नसून गुणसमुच्चय आहे असें म्हटल्यास आम्हांस कसें पटकरेल ! " आम्ही म्हणतों, " ही बाह्य वस्तु आपण हातांत घेतलीत. आपल्या हातांत ती वस्तु जड लागत आहे, ती वजन आहे, ती चतुष्कोण आहे. या हातांतून त्या हातांत तिला घेतां येतें, ही सर्व गोष्ट खरी आहे; परंतु हें वजन जें आपल्या हातास भासत आहे, तें काय आहे ? पदार्थास वजन कशानें येतें ? आपण साधारण आधुनिक शास्त्रांचा अभ्यास केला असल्यास आपल्यास कळतेंच आहे कीं, हें वजन

म्हणजे गुरुत्वाकर्षण. पृथ्वीचें आकर्षण पदार्थास असल्यामुळें पदार्थ पृथ्वीकडे ओढला जातो हेंच पदार्थाचें वजन. ह्याबद्दल कोणी आतां वाद घालणार नाहीं, आपल्या हातांतील सोन्याच्या चिपेस जें वजन आहे व आपल्या हातास तें भासत आहे तें गुरुत्वाकर्षण. हें आकर्षण नसतें तर सोन्याची चीप आपल्या हातांत देऊन डोळे मिटण्यास सांगितलें असतें तर आपल्या हातांत कांहीं दिलें आहे हा भास सुद्धां आपणास झाला नसता. ही चीप आपण रागानें कोणाच्या तरी डोक्यांत मारल्यास त्याचा परिणाम दुसऱ्याचें डोकें फुटेल; परंतु त्यायोगें ही वस्तु होय असें सिद्ध होणार नाहीं. तेव्हां " शेषं कोपेन पूरयेत् " या न्यायाचा आश्रय करूं नका, आपण आपल्या स्थूल हातास गति दिलीत व हातांतील वस्तु फेंकलीत यांत सुद्धां हाताची शक्ति (+) अधिक त्या वस्तूची शक्ति या दोन शक्तींची बेरीज दुसऱ्याचे कपाळाच्या कवटीच्या शक्तीपेक्षां जास्त झाल्यामुळें तिची गति सरस ठरली. गुरुत्वाकर्षण ही तरी कांहीं वस्तु आहे काय ? व्यवहारांत आपण " मीं गुरुत्वाकर्षण हातांत धरलें आहे " असें कधीं म्हणत नाहीं हें खरें व असें म्हणूं लागल्यास व्यवहार घोंटाळ्याचा होईल हें खरें. परंतु तत्वजिज्ञासु असा स्वस्थ बसत नाहीं तो वस्तूच्या बुडाशीं काय आहे हें पाहाण्याचा प्रयत्न करणारच. पुन्हां एकदां त्या सोन्याच्या चिपेकडे पहा व काय पाहिलें तें सर्व झाडून दुसऱ्यास सांगा. वस्तु खरी कीं आपलें ज्ञान खरें ? अर्थात् ज्ञान खरें. मग ज्ञान जसें झालें तसें सांगा पाहूं. जड, चकाकीत, पिवळें, चौकोनी, विशिष्ट आवाजाचें असें सोनें आहे असें आपण म्हणाल. यांतील ' सोनें ' हें सांकेतिक नाम काढून घ्या. कारण इतक्या गुणसमुच्चयास सर्वांनीं सोयीकरितां 'सोनें' हें नाम दिलें आहे. पुन्हां आपण आपलें ज्ञान अथवा वस्तूचा खरा परिणाम जो आपल्यावर झाला, तो सांगा. आपण आंत घेतांना गुणच घेतले, कारण वस्तु कांहीं आपल्यामध्यें शरीरानें शिरली नाहीं ती बाहेरच आहे. ज्ञान झालें तें गुणाचेंच. सांगतांनाही गुणच सांगत आहां. यांत लबाडी कोठेंच नाहीं. आपली वाणी ज्ञानास अनुकूल आहे, इंद्रियें गुणग्रहण बरोबर करीत आहेत. अशा स्थितींत वस्तु पाहिली म्हणजे एके ठिकाणीं असलेले गुण पाहिले याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पांच गुण आहेत. हे गुणच इंद्रियें घेत असतात, वस्तु घेत नाहींत. नैयायिकांनीं या पांचांस गुणांत घातलें आहे. या गुणांशिवाय वस्तु अगर द्रव्य कांहीं निराळें नाहीं. जर असेल तर तें इंद्रियगम्य नाहीं. म्हणूनच Kant कॉंट जर्मन तत्त्ववेत्ता म्हणतो, आपणास जें दिसतें तें नुसतें Phenomenal (इंद्रियगोचर) जग अथवा वस्तु दिसते. परंतु खरी अगर सत्यवस्तु (Thing-in-itself) कधीं गोचर होत नाहीं. बर्क ले साहेब (Berkeley) ह्याच सिद्धान्ताचें अनुकरण करतो. या तत्त्ववेत्त्यास (Idealist) भावनावादी तत्ववेत्ता म्हणतात. गुणाशिवाय वस्तु नाहीं हें जसें खरें आहे तसेंच वस्तूशिवाय गुण तरी कोठें रहा-

तील हा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. गुण असो वा शक्ति असो तिला आधार म्हणून कांहीं तरी असलाच पाहिजे. प्रकृति त्रिगुणात्मक आहे असें म्हणतात. प्रपंचाचा पसारा हीच करीत असते. गुण हे प्रकृतीच्या आधीन आहेत. " विकारांश्च गुणांश्चैव विधिप्रकृतिसंभवान् " असें भगवान् म्हणत आहेत. पुरुष व प्रकृति हीं दोन्ही अनादि आहेत. विकार व गुण हीं कार्यें कारणें आहेत. पुरुष हीं वस्तु (Thing-in-itself) आहे. विकार व गुण (Sensations and Properties) ही कृति आहे. इंद्रियें हीं प्रकृतीचींच बनलेलीं आहेत. विकार व गुण हे पालटणारे आहेत. तशींच इंद्रियेंही अस्थिर व वृद्धिक्षय पावणारीं आहेत. वस्तु अचल आहे, आधार सत्य व स्थिर आहे. द्रष्ट्यामधील ज्ञाता व दृश्यामधील भूमास्वरूप अथवा गुणांचा आधार हे दोन्ही पुरुषात्मक आहेत. गुण व विकार हे क्षणक्षणीं बदलणारे असल्यामुळें इंद्रियें व बाह्य गुण व विकार हीं फोल आहेत. यांचा तात्विक विचारानें लय केला पाहिजे.

तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।
गुणा गुणेषु वर्तन्ते इति मत्वा न सज्जते ॥ २८

अ० ३.

तत्ववित् ह्या इंद्रियजन्य ज्ञानास व तज्जन्य विकारास भुलून जात नाहीं. गुणांचा गुणांचे ठिकाणीं खेळ चालला आहे असें पक्कें ओळखून तो कर्मांस प्रवृत्त होत नाहीं. साहजिक आहे. बाह्य वस्तु विकारवंत व गुणवंत आहे व इंद्रियेंही तशींच आहेत, परंतु दोहींमधील म्हणजे द्रष्ट्यांतील व दृश्यांतील चैतन्य एकच वस्तु आहे असा त्याला बोध असल्यामुळें द्रव्यार्जनासाठीं तो धडपड करीत नाहीं. व्यवहार अगर स्थूलदृष्ट्या आपण पाहिलें कीं, द्रव्याचा आपणास अनुभव येतो तो केवळ गुणात्मक आहे. आतां आपण रसायनशास्त्रदृष्ट्या या स्थूल ज्ञानाचा विचार करूं. रसायनशास्त्रांत कांहीं मूलतत्वें मानिलीं आहेत. त्या मूलतत्वांच्या भिन्न भिन्न मिश्रणानें सर्व दृश्यजात आपल्यापुढें दिसत आहे. हीं मूलतत्त्वें जड सृष्टीचें उगम स्थान होय. या तत्त्वांपैकीं कोणतेंही तत्त्व आपण घेऊं त्यास वजन, रूप वगैरे गुण आहेतच. सर्व मूलतत्वांचा विचार केल्यास असें दिसून येतें कीं, या तत्त्वांचे गुणांत ही (Properties) कांहीं विवक्षित प्रमाण आहे. या प्रमाणावरूनच रसायनशास्त्रज्ञांना शंका आली कीं, हें गुणवैचित्र्य आपाततः मूलतत्वांत आलेलें नसून त्यास कांहीं तरी नियम असावा. अशी शंका आलेली शोधांतीं खरी ठरून हीं मूलतत्त्वें खरीं " मूल " तत्त्वें नसून तींही विकारात्मक व गुणात्मक कार्यैच आहेत असें ठरविण्यांत आलें. विद्युत्कण (Electrons) व त्यांचे निरनिराळे संयोग म्हणजेच मूलतत्त्वें (Elements) असा सिद्धान्त ठाम झाला. ज्या मानानें हे विद्युत्कण संकलित होतात त्यामानानें त्या संयोगाचें स्वरूप, गुण व वजनें (Properties

and atomic weights) बनत असतात असा सिद्धान्त ठाम ठरला व या नाना-विध दिसणाऱ्या सृष्टीच्या बुडाशीं विद्युत् आहे असें या आधिभौतिक शास्त्रानें कायम ठरविलें आहे. प्रथम अणुवाद निघून मग अणुही अंतिम पदार्थ नसून विद्युत् अंतिम पदार्थ आहे असें निश्चित ठरलें. विचारी लोक तत्त्वजिज्ञासेच्या पायीं किती श्रम करतात तें पहा. प्रथम अष्टयाहत्तर मूलतत्त्वें निघालीं व इतकींच तत्त्वें ह्मणजे जग असें ठरलें. नंतर या तत्त्वांचें साम्य वैधर्म्य निरीक्षणानें एक नियम निघाला. त्या नियमास Periodic Law असें म्हणतात. ह्या नियमाचें सत्यत्व रसायन शास्त्रज्ञांना पूर्ण बिंबल्यावर मग Electricity विद्युत् ही दृश्याच्या बुडाशीं आहे अशी खात्री झाली. हा Periodic Law अथवा क्रमनियम कसा निघाला हें सांगण्याचें हें स्थल नव्हे तथापि या नियमाचें सत्यत्व शास्त्रज्ञांनीं प्रत्यक्ष प्रमाणांनीं ताडून पाहिलें व नंतर त्यावरून आपलीं अनुमानें ठाम केलीं. खगोलशास्त्रांत ज्या-प्रमाणें हरशेल व नेपच्यून हे दोन ग्रह ते प्रत्यक्ष दिसण्यापूर्वी बरींच वर्षें गणित-शास्त्राचे आधारें आहेत असें ठरविलें होतें. तसेंच या Periodical Law नें Scandium, Gallium व Germanium ही मूलतत्त्वें तीं प्रत्यक्ष सांपड-ण्यापूर्वी त्यांच्या अस्तित्वाबद्दल सिद्धान्त ठरविला होता. यायोगें त्या नियमासही बळकटी आली व विद्युद्वादही उत्पन्न होण्यास अवसर मिळाला. कसेही असो बाह्य वस्तु वास्तविक नानात्मक नसून ती electrons ची झालेली आहे. हा आधिभौतिक प्रत्यक्ष व प्रत्यक्षोपजीवी अनुमान या दोन प्रमाणांनीं सिद्ध झालेला सिद्धान्त घेण्यास आपणांस कोणताही प्रत्यवाय नाहीं. तेव्हां या दृष्टीनें पाहिलें तरी द्रव्य म्हणून कांहीं नानात्मक वस्तु आहे हें खरें नसून तें द्रव्य विद्युत्कणांच्या विशेष संयोगानें बनलेलें एक कार्य आहे एवढें खरें मानण्यास नड नाहीं. याही पुढील सिद्धान्त कांहीं शास्त्रज्ञ करीत असतात; परंतु तो अद्याप तितक्या प्रमाणांनीं सिद्ध करून देण्यास पुरेशी सामुग्री मिळाली नाहीं. तो सिद्धान्त ह्मणजे हे विद्युत्कण आकाशाचा (ether) परिणाम होय. वाचकहो, पहा या व आमच्या इकडील " आकाशाद्वायुः वायोरग्निः अग्नेरापः अद्भ्यः पृथिवी " ह्या सिद्धान्ताचा कसा मेळ बसत आहे. असो. तात्पर्य हें कीं, आकाशापर्यंत आधुनिक शास्त्राची मजल पोंचली, पुढें ती जात नाहीं. तेव्हां आपला पदार्थही मूलस्वरूपास म्हणजे आकाशापर्यंत पोंचला म्हणजे अव्यक्तदशेपर्यंत पोंचला असें ह्मणण्यास नड नाहीं. एवंच ह्या दृष्टीनेंही पदार्थ म्हणजे सूक्ष्म आकाशाचेंच कार्य आहे हें ठरलें म्हणजे कार्य खोटें म्हणजे क्षणिक असून त्याचें कारण आकाश हें खरें व अविनाशी आहे असें ठरतें. रसायनशास्त्रांतील अणु (atom) जरी घेतला तरी तो आतां स्थिर मानितां येत नाहीं. त्यांत सुद्धां सूर्यमालिकेच्या धर्तीवर मध्यवर्ती बिंदु व परिघवर्ती अणु यांचें परिभ्रमण सारखें सुरू असतें. विद्यु-त्कणांचें हें परिभ्रमण अनादिकालापासून चालत आलें असल्यामुळें तें एके ठिकाणीं

नष्ट झालेसें दिसलें तरी तें अन्य ठिकाणीं सुरू होतें. ह्या अणूंच्या अखंड व प्रचंड थेमालास जग अथवा विश्व ही सज्ञा मिळाली आहे. प्रत्येक पदार्थाचें पृथक्करण शास्त्रीयरीत्या केलें असतां त्या पदार्थाचे घटकावयव शेवटीं विद्युद्रूपीच आहेत अथवा एकजिनसीच आहे असें आढळून येतें. आपला देह व इंद्रियें हीं याच घटकावयवांचीं बनलेलीं आहेत.

जगांत द्रव्य जसें तीन रूपांत दिसतें म्हणजे वायुरूप, द्रवरूप व घनरूप या तीन अवस्थांपैकीं कोणत्या तरी अवस्थेंत असतें त्याप्रमाणें ह्या विश्वाच्या तीन अवस्था दिसून येतात. जडस्वरूप, गतिस्वरूप व चैतन्यस्वरूप (Matter, motion & mind) अशीं विश्वाचीं तीन स्वरूपें आहेत. हीं तीन स्वरूपें ह्मणजे कांहीं अंशीं प्रकृतीचे तीन गुणच होत. तमोगुण म्हणजे साधारणतः matter होय. रजोगुण म्हणजे motion होय व सत्वगुण म्हणजे mind होय असें म्हणतां येईल. या तिन्ही गुणांची साम्यावस्था म्हणजे प्रकृतीचा लय होय. साम्यावस्था बिघडून एखादा गुण जास्त झाला ह्मणजे प्रकृतीचा नाच अथवा व्यक्तता सुरू होतें. तमोगुणाचें प्राधान्य ह्मणजे अज्ञान अथवा जडता. रजोगुण ह्मणजे गति अथवा कर्म व सत्व गुण म्हणजे ज्ञान. दगड, माती, लोह, सुवर्ण हे सर्व पदार्थ तम, प्रधान आहेत: म्हणजे matter (स्थूल) आहेत. गुरुत्वाकर्षण, रासायनिक स्नेह (Chemical affinity), अणुस्पंदन, वगैरे (motion) रजोगुणात्मक आहेत. force अथवा motion यांचेयोगेंच क्रिया घडते. धृति, उत्साह, शौर्य, पराक्रम वगैरे गुण रजोधिक्याचे दर्शक आहेत म्हणजे (vital force) या गुणांना एक प्रकारचा जोम असावा लागतो. ज्ञान, दया, शांति, विवेक इत्यादि गुण सत्वाचे आहेत. बुद्धि सत्वप्रधान आहे. जगांतील तिसरें तत्व जें mind तें हेंच होय. या तिन्ही गुणांत मौज ही आहे कीं, हे एकमेकांपासून भिन्न असे कधीं दृग्गोचर होत नाहींत म्हणजे यांपैकीं पृथक् एकाचीच अशी कल्पना होत नाहीं. जड द्रव्याशिवाय गति निराळी दिसत नाहीं. गतीशिवाय जड द्रव्य कोठें उपलब्ध होत नाहीं. बरें, बुद्धि (mind) ही जड (matter) व गति (motion) या दोन्हींशिवाय कोठें दिसून येत नाहीं. अशा या तिन्ही गुणांची विलक्षण सांगड आहे. असो.

आतां आपण पदार्थज्ञानाचें शरीरशास्त्रदृष्ट्या विवेचन करूं. आपण हिमालयासारखा प्रचंड पर्वत पुढें पहातो. आपल्या नेत्राचें गवाक्ष वास्तविक किती तरी पटींनें हिमालयापेक्षां लहान असतां हिमालयाचा एक मोठा भाग अथवा आकाशाचा भव्य तुटवा आम्हांस दिसतो. या ज्ञानाचें सहज निरीक्षण केल्यास दिसून येईल कीं, हिमालय पर्वत हा आमचे डोळ्यांतून आंत गेला नाहीं खास. मग तो इतक्या अंतरावरून आम्हांस समजला कसा! डोळा येथें, पर्वत किती तरी मैल अंतरावर ! ह्या दोघांची भेट झाली कशी ! कोण कोणीकडे गेला ! हें गूढ आहे तरी काय !

वाचकहो, आपण पाहतों, परंतु आपण कसें पहातों काय पहातों याबद्दल कोणी विशेष चौकशी करीत बसत नाहीं, परंतु चौकशी केल्यास मोठें आश्चर्य वाटण्याजोगी स्थिति दिसून येईल. पहा, हें डोळा व पर्वत यांमधील अंतर पोकळीनें भरलेलें आहे, यांतून पर्वत डोळ्यांत येणें शक्य नाहीं. शरीरांतून उठून डोळा पर्वताकडे गेला म्हणावें तर तेंही संभवत नाहीं. पर्वताचें ज्ञान झालें ही गोष्ट खरी. परंतु हें कसें झालें ? तेव्हां मध्यंतरींच्या अवकाशांतून पर्वत इकडे आला असेंच म्हटलें पाहिजे आमचे वेदान्ती म्हणतात कीं चैतन्यवृत्ति नेत्रावाटे बाहेर जाऊन विषयाकार होते म्हणून त्या विषयाचें ज्ञान होतें. असें म्हणा अगर विज्ञानशास्त्राचे नियमानें पर्वतावर पडलेल्या सूर्यरश्मींतील कांहीं रश्मी नेत्रद्वारें आंत शिरून नेत्रगोलक म्हणून अंतरिंद्रिय आहे (अथवा optic nerve) त्यावर आघात करितात, ते आघात आंत बुध्युपाधि चैतन्यावर गेले म्हणजे तेथें रूपज्ञान होत असतें आतां पहा, हिमालय व द्रष्टा यांमध्यें किती व्यवधानें झालीं ! मध्यंतरीं असलेली पोकळी, नेत्राच्या घटनेंतील अनेक द्रव्यें, सूक्ष्म नेत्रेंद्रिय (optic nerve) व मेंदूंतील पेशी (cerebral cells) इतक्या व्यवधानांतून हिमालय आला तेव्हां तो जशाचा तसाच आंत आला हेंही आधीं संशयात्मक आहे. असो. जें आपणांस हिमालयाचें ज्ञान झालें तेंही गतिद्वारां झालें. म्हणजे हिमालयावरील सूर्यरश्मि परावर्तन पावले म्हणजे आकाश आंदोलनात्मक झालें. आपल्या नेत्राकडे जें कांहीं आलें तें आंदोलनात्मक आकाशच आलें. पुढें हीं आंदोलनें नेत्राच्या पृष्ठ भागावर आदळलीं. तेथून तीं आंदोलनें नेत्रतंतूवर आदळून त्यांनीं मेंदूमध्यें संक्षोभ उत्पन्न केला व तो संक्षोभ स्मृति, विचार, तुलना इत्यादि क्रियांनीं हिमालयरूपी ज्ञानांत परिणाम पावला. तसेंच आपल्यास सोन्याच्या चिपेचें स्पर्शरूपी ज्ञान कसें झालें तें ही पहा. चिपेंत व मेंदूंतही असें अंतर आहेच. प्रत्यक्ष द्रष्ट्यामध्यें व दृश्यामध्यें शरीर व इंद्रिय यांचें अंतर आहे. पदार्थ आपण हातांत घेतला खरा; परंतु तो द्रष्ट्यापासून लांबच आहे. आपल्या त्वचेवर वेष्टन करून असलेले ज्ञानतंतु या सोन्याच्या चिपेनें प्रक्षुब्ध झाले; म्हणजे त्यांच्यांत आंदोलनें उत्पन्न झालीं. तीं आंदोलनें मेंदूपर्यंत जाऊन तेथें त्यांचें पृथक्करण होऊन स्पर्शज्ञान उत्पन्न झालें. कानानें जें आपण ज्ञान मिळवितों तेंही आंदोलनात्मकच आहे हें याच पद्धतीनें सिद्ध करतां येतें. जिव्हेवर मधुर पदार्थ ठेवल्याबरोबर जिव्हेंद्रियावर (glands) एकप्रकारचीं आंदोलनें उत्पन्न होतात व तीं ' अमुक चव ' अशी मेंदूत नोंदलीं जातात. मधुर पदार्थ प्रत्यक्ष मेंदूस जाऊन कधींच पोंचत नाहीं. मेंदूंतील सर्व ज्ञानव्यापार या वीचिरूपानेंच चालत असतात. तारायंत्रांत ज्याप्रमाणें संदेश हे सांकेतिक असतात म्हणजे कडकट या दोन आवाजांच्या निरनिराळ्या संयोगानें जशी तारायंत्री सर्व भाषा बसविली जाते, तद्वतच ह्या आंदोलनाच्या निरनिराळ्या स्वरूपांनीं निरनिराळें ज्ञान होत असतें. सर्व ज्ञान आंदोलनात्मक आहे म्हणजे

विशिष्ट गतियुक्त आहे. पदार्थही शास्त्रीयदृष्ट्या गतिमानच आहेत. विद्युत्संचयाच्या (Battery) मार्गे जसा तारमास्तर असतो व त्याचे मदतीशिवाय ह्या कडकट्ट आंदोलनांचा कांहीं उपयोग नाहीं, त्याप्रमाणेंच या गतीच्यामार्गे मनोरूपी तारमास्तर असल्याशिवाय या ज्ञानवीचींचा कांहींएक उपयोग व्हावयाचा नाहीं. जशा हिमालय पर्वताच्या ज्ञानवीचि मध्यंतरींच्या अवकाशांतून आल्या तशा त्या आसमंतात् मार्गी सर्वत्र पसरतच असतात. मनोरूपी तारमास्तर जेथें भेटेल तेथें त्यास ज्ञान ही संज्ञा प्राप्त होते एवढेंच काय तें. जगांतील प्रत्येक वस्तु गतिमान् आहे. गतीशिवाय स्थिति नाहीं, हा सिद्धांन्त विरोधात्मक भासेल परंतु द्वैतांत जसें अद्वैत तसेंच गतिमत्तेंत स्थिरता हा सिद्धान्त खरा आहे. सूर्य आपल्याभोंवतीं फिरतो, ग्रह सूर्याभोंवतीं फिरतात, उपग्रह ग्रहांभोंवतीं फिरतात, ग्रह त्यांतल्यात्यांत आपल्या भोंवतींही फिरत असतात. ही सर्व सूर्यमालिका आणखी एक तिसरीकडेच पळत आहे.

By strenuous motion, all that is, subsists,
Constant rotation of the unwearied wheel
That Nature rides upon, maintains her health
Her beauty, her fertility. She dreads
An instants pause, and lives but while she moves
Its own revolvency up-holds the world.

—*William Cowper.*

काउपर कवीचे वरील उद्गार शास्त्रदृष्ट्या अगदीं यथार्थ आहेत. ही स्थूलसृष्टीची गतिमत्ता झाली. आतां सूक्ष्मसृष्टींत पहा. एक लहानसा खडा अथवा त्याहीपेक्षां लहान नुसत्या डोळ्यांनीं न दिसणारा लहान पदार्थ घ्या. त्यांतही निरनिराळ्या अणूंमध्यें विलक्षण व अतर्क्य गतिमत्ता आहे असें दिसून येईल. प्रत्येक अणूसुद्धां एक लहानशी सूर्यमालिकाच आहे असें दिसून येईल. सारांश, गति हीच स्थिरता अथवा विश्वाचें स्वरूप आहे असें म्हटल्यास शास्त्रविरुद्ध नाहीं. जडवस्तु अशी आह्मांस कोठेंच अनुभवास येत नसून फक्त गतिरूपताच अनुभवास येते, हें यावरून सिद्ध झालें. आतां कोणी ह्मणेल ही गति कशाच्या आश्रयानें राहतें ! गति शब्द सापेक्ष आहे. कांहीं तरी गतिमत् असल्याशिवाय गति सिद्ध होत नाहीं, हें व्यवहारदृष्ट्या खरें आहे. परंतु तत्त्वज्ञानाचा विचार करतांना जडाचा आधार गतीस मानल्यास ज्ञानाची उपपत्ति लागत नाहीं. परंतु आधीं गतीस अगर शक्तीस जडाचा आधार लागतो हें तरी खरें कशावरून ? गुरुत्वाकर्षण, लोहचुंबकत्व, रासायनिक स्नेह, ऋणधनविजांचे राग (प्रीति), द्वेष हे दोन वस्तूंच्या मध्यंतरीं आपला प्रभाव चालावितात ना ! पृथ्वी ही लांबून झाडाच्या

फळास आपल्याकडे ओढीत असते. लीबनिट्झ पंडित यामुळें मोठा गोंधळून गेला. तो म्हणतोः—

"It is also a supernatural thing that bodies should attract one another at a distance without any intermediate means."

मागें आपण पाहिलेंच आहे कीं, स्थूलदृष्ट्यासुद्धां पदार्थ गुणमयच दिसतो. पदार्थाचें ज्ञानही गुणमयच होतें. तेव्हां सांख्याच्या प्रकृतीचे जे तीन गुण सत्व, रज, तम हेच गुण पुरुषास व्यक्तदृशेस आणितात. वास्तविक या तिन्ही अवस्थेंत पुरुष thing-in-itself हा अविकार्य जशास तसाच असतो. गुणास आधार हाच, ज्ञानास आधार हाच. आकाश ज्याप्रमाणें प्रत्येक पदार्थाचे आंत बाहेर सारखें व्यापून आहे तसाच पुरुष हा गुणांनीं जरी व्यक्ततेस आला, तथापि त्याचे मूळ स्वरूपांत थोडाबहुद्धां फरक पडत नाहीं. तमोगुणांत व्याप्त असतां हा पुरुष जडात्मक दिसतो, रजोगुणाचे उपाधींत गतिमान् दिसतो व सत्वगुणांत बुद्धीच्या अगर मनाच्या रूपानें दिसतो. दृश्यासही चैतन्याचा आधार आहे. द्रष्टाही चैतन्यरूप आहे. दोन्ही ठिकाणीं व मध्यंतरीं चैतन्य अथवा ज्ञान असल्याशिवाय द्रष्टा दृश्यरूप होणार नाहीं. द्रष्ट्याची वृत्ति दृश्याकार होण्यास दोहींतील चैतन्याचीच गांठ पडली पाहिजे. जडानें चैतन्यास अगर चैतन्यानें जडास ओळखणें शक्य नाहीं. बरें, बाह्य देशी पदार्थ आहेत त्यांचें आपणास ज्ञान होत असतें, असें तरी आपणास खात्रीनें म्हणतां येईल काय ? आपण एवढें म्हणूं शकूं कीं, आपल्या अनुभवास अमुक आलें. प्रत्येक ज्ञानाचें पर्यवसान शेवटीं मनोवृत्तींत होत असतें. बाहेरून आघात येऊन आंत गेले व त्यांनीं आंत आंदोलनें उत्पन्न केलीं हेंसुद्धां आह्मी स्थूल दिसणाऱ्या क्रियेवरून म्हणतों. परंतु शास्त्रीय अनुभवास व ज्ञानास अनुसरून अथवा शास्त्रीय प्रमानानें बोलावयाचें झणजे आपल्या मेंदूच्या ज्ञानपेशींत विकार झाले येवढेंच बाह्यवस्तूच्या ज्ञानाबद्दल फार तर म्हणतां येईल.

हेल विश्वविद्यालयांतील प्रोफेसर Bernstein यांनीं आपल्या "पंचेंद्रियें" (Five senses of man) नामक ग्रंथांत म्हटलें आहेः—

"Sensation can only take place in the sensorium. The excited condition of the sensorium is the material fact which corresponds to a sensation, and it is unnecessary that the sensory nerve concerned should have caused the irritation ; for in dreams we have distinct sensations which are not caused by the specific excitement of the nerves, but only by the action of some internal excitement within

the sensorium. From these remarks it is clear that we really have no sensations of objects of the external world themselves, but only of the changes which occur in the sensorium."

या उतार्‍यांतील शेवटचें वाक्य फारच महत्वाचें आहे. Berntein हे जीवन-शास्त्राचे प्रोफेसर होते. त्यांना पौर्वात्य ब्रह्मज्ञानाचा अगर प्रपंच मिथ्यात्वाचा गंधहि नव्हता असें असतां केवळ भौतिक शास्त्राचे प्रमाणानें त्यांनीं हा सिद्धान्त काढला आहे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

आतांपर्यंत आपण " विषय " या विश्वाच्या भागाबद्दल जो विचार केला त्याचें सिंहालोकनानें निरीक्षण करूं.

स्थूल दृष्ट्या पाहिलें तरी पदार्थ अगर बाह्य विषय याचें ज्ञान आपल्यास कधीं होत नसून गुणांचेच होत असतें. असें असतां आपण या गुणासच विषय समजत असतों. रसायन शास्त्रदृष्ट्या विषय (object) असें कांहीं विचारांतीं शिल्लक रहात नाहीं. अति सूक्ष्म असे विद्युत्कण एके ठिकाणीं (म्हणजे अगदीं चिकटून नव्हे त्यांच्यांत सुद्धां एकमेकांत अंतर असतेंच) आले म्हणजे त्यास स्थूलता अगर व्यक्तता येत असते. विद्युत्कण हेही खरें नसून ether चें व्यक्त रूप आहे. शरीरशास्त्रदृष्ट्याही विषयाचें ज्ञान जें आपणास होत असतें तें motion च्या रूपानें होत असतें असें सिद्ध आहे. विषयही गतिरूप आहेत. ज्ञानही गतिरूपानेंच होत असतें. पदार्थ हे गतीचेंच व्यक्त स्वरूप आहे. गति हा गुण आहे. जडता हाही गुण आहे एकाच पदार्थाच्या परमाणूंतील गति बदलली असतां त्या पदार्थास द्रव घन व अव्यक्त वायुरूप येत असतें हें आपण हरहमेश पहातों. अग्नि हा एक विशिष्ट गति आहे. त्याच गतीचें निराळें स्वरूप विद्युत आहे. तिचाच म्हणजे गतीचा थोडाबहुत फरक केल्यास लोहचुंबक शक्ति होते. आणखी असाच गतीचा फरक केल्यास स्फोटही ऐकूं येतो. सारांश विषय हे गुणरूप आहेत. क्रिया अगर कर्म हें रजोगुणात्मक आहे. गतीमुळें कर्म होतें. या सर्व उपपत्तीवरून बाह्य विषय जसे आपणांस दिसतात तसे नसून प्रकृतीचे गुण आहेत व त्या सर्वांना आधार (Thing-in-itself) अगर भूमास्वरूप अखण्डैकरस परमात्मा आहे हें सिद्ध आहे.

९ अन्तरध्यास योग.



इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः । .
मनसस्तु पराबुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥

भ० गी० अ० ३, श्लो० ४२.

मागील प्रकरणांत विषय हा मिथ्या असून त्यांतील भूमास्वरूप जो पुरुष तोच खरा आहे हें आपण पाहिलें. आतां ' विषयी ' हा आपण विश्वाचा दुसरा भाग असें म्हटलें आहे त्याबद्दल विचार करूं. याविषयींचा विचार करण्यापूर्वी विषयी हा कशाचा बनलेला आहे हें आधीं पाहूं. चैतन्य, बुद्धि, अहंकार, मन, पंचेंद्रियें व शरीर इतक्यांचा समुच्चय साधारणपणें या विषयींत आहे. विषयाच्या चैतन्यावरील आकार, द्रवता, रंग इ० गुण ज्याप्रमाणें मिथ्या असून आधारभूत वस्तु (The thing-in-itself) खरी असते त्याप्रमाणें देहादि विकार हे चैतन्यावरील विवर्त होत. ज्याप्रमाणें बाह्य पदार्थ इंद्रियास गोचर होतात त्याप्रमाणें शरीर ही आपल्या इंद्रियास गोचर होत असतें. हात, पाय, पोट इ० अवयव आपल्यास इतर द्रव्याप्रमाणेंच दिसतात. स्पर्शास कळतात. विषय गतिरूप अथवा गुणरूप असतात त्याप्रमाणें हेही अवयव त्याच कोटींत पडतात. ह्या शरीराचा जेवढा भाग आपणांस अगर दुसऱ्यास इंद्रियगोचर आहे तेवढा भाग मिथ्या आहे असें म्हटल्यास मुळींच हरकत नाहीं. जड प्रकृति (matter) मध्यें जीं रासायनिक मूलतत्वें आहेत त्यांपैकीं कांहीं मूलतत्त्वें शरीरांतही आहेत. देहाचें, त्यांतील अवयवाचें. शिरांचें, मज्जातंतूंचें नेत्रांनीं अगर सूक्ष्मदर्शक यंत्रासहित नेत्रांनीं निरीक्षण करतां येतें. त्यांचें पृथक्करण करतां येतें. सारांश स्थूलदेह हा प्रत्यक्ष विषयकोटीमध्यें घालणेंच इष्ट आहे. येथपर्यंत जडप्रकृति (matter) व गति (motion) या दोहींची ग्रंथि प्रत्यक्ष गोचर आहे, हें आपण पाहिलें. ही ग्रंथि अथवा तमोगुण व रजोगुण यांची सांगड आहे हें ज्ञान सत्वगुणा (mind) शिवाय मात्र समजत नाहीं, समजा, या विश्वांत मन तेवढें नाहीं,बाकी सर्व आहे. म्हणजे नुसती गति आहे तर ती गति आहे असें तरी कोणीं म्हणावें ? मति असल्यास गति सिद्ध होणार. गति समजण्यास तरी मनावरील गतीचे आघातच कारण आहेत. अथवा अगदीं शुद्ध भाषा वापरावयाची झाल्यास मनाचे निरनिराळे विकार हीच बाह्य भासणारी गति. स्थूल शरीरांत जीं सूक्ष्म इंद्रियें ठेविलीं आहेत, तेच मनाचे सोबती. या सोबत्यांचे साह्यानें मन हें विश्वाकार होत असतें. हे प्रकृतीचे दूत होत, अथवा हेर होत म्हटल्यास जास्त सयुक्तिक होईल. प्रकृतीनें हे आपले हेर पुरुषाच्या इतके सन्निध ठेविले

आहेत कीं, हे हेर या पुरुषाचीं अगदीं आत्मीय माणसें होऊन बसलीं आहेत. यांच्याशिवाय तो कांहीं व्यवहार करीत नसतो. यांच्या साहाय्याशिवाय तो पाणी-सुद्धां पीत नाहीं. त्याला यांनींच भरवावें लागतें. यांच्याशिवाय तो अगदीं पंगू होऊन बसला आहे. हे सोबती प्रकृतिमयच आहेत, परंतु पुरुषाच्या संगतींत राहण्यासारखे त्यांच्यांत गुण आहेत. हे सत्वप्रधान असल्यामुळें पुरुषाचेही जवळचे आहेत. म्हणून यांची संगति पुरुषास आवडीची झाली आहे. हे भामटे प्रकृतीचेच दूत असल्यामुळें अगर एजंट असल्यामुळें प्रकृतीचे मालाचाच खप करण्यांत ते सदैव दंग झालेले असतात. साहजिकच आहे. ज्याची पोळी खातात त्याचींच ते टाळी वाजवीत असतात. तेव्हां अशा टवाळ मंडळीच्या नादीं लागून हा पुरुष अगदीं प्राकृतिक (materialist) म्हणजे प्रकृतीचा बंदा दास होऊन गेल्यासारखा दिसत आहे. प्रकृतिही मोठी लबाड आहे. तिनें तरी आपलें सर्व गुह्य ह्या एजंटांना सांगितलें आहे म्हणावें तर तसेंही नाहीं. तसें सांगावयाची निचीही सोय नाहीं. कारण तिचें तरी सर्व भांडवल पुरुषच होय. तिला आधारच मुळीं पुरुषाचा आहे. हें गुह्य [Trade secret] जर ती ह्या हेरांना फोडून सांगेल, तर त्यांना पुरुषाचें खरें महत्व समजून ते पुरुषाची वंचना करण्याचें कृत्य सोडून देतील व प्रकृतीचा नादही सोडतील म्हणजे इंद्रियांची बाह्यवृत्ति कमी होऊन तीं अंतर्मुख होतील. या भीतीनें प्रकृतीही त्यांना विशेष मर्यादेच्या बाहेर जाऊं देत नाहीं. हा प्रकृतीचा व्यापार कसा चालला आहे हें शास्त्रीयदृष्ट्या पहा, म्हणजे याची बरोबर कल्पना होईल. बाहेरून (बाहेरून हा शब्द सापेक्ष आहे. अतएव मिथ्या आहे हें पुढें पाहूं.) आपल्या गुणांचे आघात ही प्रकृति इंद्रियांवर करीत असते. आघात अगर आंदोलनें यांचे स्वरूपांत कांहीं फरक नाहीं. ते सर्व एकस्वरूपीच आहेत; परंतु त्या आघातांच्या कमजास्त गतिभेदामुळें इंद्रियांचे तंतूंवर निरनिराळे जोराचे आघात होतात. त्यायोगें आवाज, रंग, चव, स्पर्श इत्यादि निरनिराळे भासतात. प्रकृतीच्या दोन वीणा आहेत. बाह्य विश्वाची वीणा ही अनंत तारांची अनेक सुरांची आहे. जीवाजवळ ठेवलेली वीणा ही पांच तारांचीच आहे. परंतु ही पांच तारांची वीणा व विश्ववीणा ह्यांचें स्वरतादात्म्य पूर्ण झालेलें असल्यामुळें विश्व-वीण्याच्या तारेंतील आंदोलनें या जीववीणेच्या तारांवर आदळलीं कीं ही वीणा ध्वनित होते. परंतु बाह्यवीणेच्या सर्व तारांचीं आंदोलनें या लहान वीणेच्या तारांत उमटत नाहींत. ही वीणा मर्यादित स्वरांचाच प्रतिध्वनि करीत असते. उदाहरणार्थ, विश्वांत अनंत आवाज उत्पन्न होत आहेत;परंतु आम्हांस कांहीं अंशां-च्या खालील आवाज व कांहीं अंशांच्या वरील आवाज ऐकूं येत नाहींत. तसेंच नेत्रांसही कांहीं प्रकाशात्मक आंदोलनें समजत नाहींत. नाकास कांहीं गंधात्मक वीचींचा उमज पडत नाहीं. तसेंच स्पर्शाचेंही आहे. हीं इंद्रियें सर्व प्राण्यांत सार-ख्या प्रकारचीं तीक्ष्ण असत नाहींत. गरुड, काक इत्यादि पक्षांची दृष्टी आमच्या,

पेक्षां सूक्ष्म असते. कुत्र्याचें घ्राणेंद्रिय माणसाचे घ्राणेंद्रियापेक्षां फार तीव्र असतें. कांहीं वन्य सस्तन प्राण्यांचें कर्णेंद्रिय मानवी कर्णापेक्षां तीक्ष्ण असतें. सारांश हीं इंद्रियेंही अगदीं कमकुवत व बिनभरंवशाचीं आहेत असें पदोपदीं दिसून येत असतें. परंतु आपल्या ऐहिक ज्ञानाची सर्व भिस्त या पंचकडीवरच सर्वस्वी आहे. हीं इंद्रियें जात्याच जड असल्यामुळें तीं चैतन्यसंवेदनाच्या कामीं उपयोगी पडत नाहींत. अनंत कालाच्या संवयीनें यांना वीचिरूपी संवेदना करून घेण्याचें अंगवळणीं पडल्यामुळें त्या वीचींत जरा घोंटाळा झाला कीं त्यांचे संदेश सर्व चुकूं लागतात. चंद्रावर अभ्रें येऊन पक्षें लागलीं कीं चंद्र पळतोसा यांना दिसलाच. आगगाडींत बसून ती स्टेशनवर स्थिर असतां दुसऱ्या रुळावरून वेगांत जात असलेल्या गाडीकडे पाहिलें कीं आपली गाडी पळत आहे असा खोटा भास यांना झालाच. एक लहानसा खडा हातांत घेऊन त्यावरून तर्जनी व मध्यमिका यांचीं टोंकें फिरविल्यास एकाच खड्याची प्रतीति होते, परंतु या नेहमींच्या संवयींत फेरबदल करून पहा म्हणजे तर्जनीचें टोंक मध्यमिकेच्या ठिकाणीं व मध्यमिकेचें तर्जनीचे ठिकाणीं एकावरूनएक बोटें नेऊन करून पहा म्हणजे स्पर्शेंद्रिय पक्कें चकलेंसें दिसेल. एका खड्याच्या ऐवजीं दोन खडे असावेत असा भास होईल. शस्त्रक्रियेच्या योगानें गुडघ्याखालील पायाचा भाग कापून टाकिल्यास रोग्यास विचारावें "तुला वेदना कोठें होत आहेत." तो म्हणेल "पायाच्या बोटांत!!" इतकें लांब सुद्धां जावयास नको. ही इंद्रियांची कुवत हरहमेश आम्हांस दृष्टीस पडते. पहा नेत्राचे योगानें आम्हांस जें आकार मानाचें ज्ञान होतें तें तरी बरोबर आहे काय! उदाहरणार्थ, आपण एक पाण्याचा थेंब घेऊं. हा थेंब आम्हांस केवढा दिसतो हें सर्वांना ठाऊक आहे. परंतु तो सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं घाला कीं त्यांत लहानसें एक सरोवरच दिसेल. त्यांत शेंकडों जलचरेंही आपला योगक्षेम सुखरूप चालवीत आहेत असें दिसून येईल. तेव्हां थेंबाचा आकार पहिल्या डोळ्यांनीं पाहिलेला खरा कीं दुसऱ्या डोळ्यांनीं पाहिलेला खरा! इंद्रियांवर विश्वास ठेवावा तर त्यापैकीं कोणता आकार खरा हें सांगतां येत नाहीं. पदार्थ आहे त्याच्यापेक्षां मोठा करणें हें काम काचेचें नव्हे. तसेंच तें डोळ्यांचेंही नव्हे. बरें आपण म्हणाल ही भूल फार वेळ टिकणारी नव्हे, कारण स्पर्शेंद्रियानें हा भ्रम ताबडतोब दूर होईल; परंतु स्पर्श तरी कोठें बिचारा धडधाकड आहे! त्यासही असेंच एखादें सूक्ष्मस्पर्शज्ञयंत्र जोडून दिल्यास तोही तसेंच भकूं लागेल. आकाराची गोष्ट असूंद्या. रूपाची अगर रंगाची तरी संवेदना इंद्रियें जशीच्या तशी देतात म्हणावें तरी तेंही खरें नाहीं. कसें तें पहा. आधीं मुळीं पदार्थास रंगच नाहीं. सूर्यरश्मि पदार्थावर अगर गतिसमुच्चयावर पडले असतां त्यांतील कांहीं रश्मि तो पदार्थ आपण घेत असतो, उरलेल्या परत करीत असतो. अथवा शुद्ध शास्त्रीय भाषेनें बोलावयाचें म्हणजे सूर्याच्या पृष्ठभागावरून निघालेलीं आंदोलनें आकाशावर आपटून त्या आकाशाचीं आंदोलनें

पदार्थावर पडतात. पदार्थाच्या स्वगत आंदोलनांशीं यांतील कांहीं आंदोलनें साम्य पावून बाकीचीं प्रतिक्रियेच्या जोरानें नेत्रांवर पडतात. तेथें ज्ञानतंतूंवर तीं पडून तेथें रंगाचें ज्ञान होत असतें. एका सेकंदांत चार जलधि, पांच शंकू किंवा पंचेचाळीस कोटि (गुणिले) × तीसलक्ष इतकीं आंदोलनें आकाशांत उत्पन्न झालीं कीं नेत्रांतील ज्ञानतंतूवर तांबड्या रंगाची प्रतीति होते. हीं आंदोलनें जसजशीं सेकंडास वाढत जातील तसतशीं नेत्रतंतूमध्यें अनुक्रमें नारिंगी, पिंवळा, हिरवा, निळा, जांभळा इ० रंगांची प्रतीति होत असतें. रिलंड नामक ग्रंथकारानें " The story of thought and feeling " नामक ग्रंथ केला आहे त्यांत त्यानें डोळ्याच्या आंत रंग असून तें बाह्यदेशीं नाहींत, प्रकाश अंतरात्म्यांत असून तो सूर्यांत नाहीं अथवा अग्नींत नाहीं असें सप्रमाण सिद्ध केलें आहे. गायन बाहेर नसून आंत आहे. तालसुराचा मेळ बाहेर नसून तो आंत आहे. प्रकाश, सौंदर्य, माधुर्य, मान, यांपैकीं बाहेर कांहीं नसून तीं सर्व अंतर आहेत. Arthur Balfour यांनीं आपल्या " Foundation of Belief " नामक पुस्तकांत नेत्रेंद्रियाविषयीं म्हटलें आहे.

" These perceptions as psychological results and as sources of information are not merely occasionally mendacious; nine-tenths of our immediate experiences of objects are visual, and all our visual experiences without exception are according to science erroneous "

यांत बालफरसाहेब म्हणतात कीं, आमचें नेत्रेंद्रियांचें ज्ञान शास्त्रदृष्ट्या अगदीं भ्रामक आहे. जॉन टिंडाल (John Tyndal) या भौतिकशास्त्र विशारदाचें नांव तर सर्वांना माहीतच झालेलें आहे तें म्हणतातः—

जॉन टिंडाल (John Tyndall) या भौतिक शास्त्रविशारदाचें नांव तर सर्वांना माहीतच झालेलें आहे. ते म्हणतातः—

"And it is by no means easy to combat such notions. For when I say "I see you" and that there is not the least doubt about it, the obvious reply is, that what I am really conscious of is an affection of my own retina. And if I urge that my sight can be checked by touchig you, the retort would be that I am equally transgressing the limits of fact ; For what I am really conscious of is, not that you are there, but that the nerves of my hand have undergone a change. All we hear, and see and touch and taste and

smell are, it would be urged mere variations of our own conditions, beyond which, even to the extent of a hair's breadth, we cannot go. That anything answering to our impressions exists outside of ourselves is not a fact but an inference." (*The Belfast address*).

हें एवढें अवतरण घेण्याचें कारण कीं, यांत मागील पंचेंद्रियविवरणाच्या व विषयाच्या विवेचनाचें सार या अवतरणांत आलेलें आहे. टिंडालसाहेबांचे स्वतःचे हे विचार स्वतंत्रपणानें सांगितलेले नाहींत. मिल्ल, कँट, फिच, बर्कले, ह्यूम इत्यादि तत्त्वज्ञांचे विचाराचाच अनुवाद यांत आहे. परंतु या अवतरणांतील पहिल्या वाक्यावरून टिंडाल साहेबास हे विचार खोडण्यास अशक्य आहेत असें वाटत आहे. असो. एकंदरीत बाह्यविश्व खरें आहे कीं नाहीं, याबद्दल शास्त्रज्ञ फार साशंक आहेत. परंतु मनोविकार तरी आहेत असें ते मानितात. आपण वरील विवेचनांत ते विकारसुद्धां एकमेकांस विरुद्ध आहेत व ते स्थूल व सूक्ष्म इंद्रियांचे विकारांवर अवलंबून आहेत व स्थूल सूक्ष्मइंद्रियें हींही स्वतः विषयात्मक असल्यामुळें तींही खरीं नाहींत, अशा विचारसरणीनें चाललों आहों तेव्हां " विषयी " पैकीं विकारमय व गुणमय भाग मिथ्या आहे असें ह्मणण्यापर्यंत आपली तयारी झाली आहे.

मनाचीं सामान्यतः नवीन मानसिक शास्त्रदृष्ट्या तीन स्वरूपें आहेत. Perception म्हणजे संवेदना, Feeling म्हणजे विकार व Thought ह्मणजे विचार. आतांपर्यंत आपण फक्त संवेदनेपुरता विचार केला. विश्वांतील पदार्थांचें निरीक्षण इंद्रियद्वारें शेवटीं मनानें होत असतें. मन जागीं असल्यासच संवेदनात्मक ज्ञान होत असतें. परंतु जगांत नुसतें संवेदनात्मक ज्ञानानें काम होत नाहीं. नुसतें पदार्थ पाहाण्याचेंच प्रपंचांत काम असतें तर प्रपंचांत कोणीं इतकें रमलें नसतें. त्या संवेदनेप्रमाणें सुखदुःखादि विकारजात उत्पन्न झालें नसतें अगर बाह्यविषयांत हेयोपादेयता नसती तर प्रपंच कंटाळवाणा झाला असता. त्या त्या पदार्थांत सुखरूपता अगर दुःखरूपता भासत असते त्यामुळें सुखार्जन करणें व दुःखपरिमार्जन करणें हीं कामें जीवाचे पाठीस लागलीं आहेत. Perception अगर संवेदना ही जशी गतिरूप आहे तशींच सुखदुःखांचीं द्वंद्वें हीं गत्यात्मक असून सत्यस्वरूप नाहींत. आंबा मधुर खरा पण तो पूर्ण तृप्तीनंतर वीट आणतो. पुष्पशय्या सुखकारक खरीच, पण ती विरही अगर कामी जनास तापदच होते. जर ह्या वस्तु खऱ्याच सुखरूप असत्या तर त्या सर्व कालीं तशाच असत्या. अन्वयव्यतिरेकानीं जेव्हां एका वस्तूचें दुसऱ्याशीं साहचर्य दाखवितां येईल तेव्हांच त्या वस्तूंची व्याप्ति खरी मानावयास पाहिजे. तसेंच भिन्न भिन्न व्यक्तींत सुखदुःखाची कल्पना भिन्न भिन्न असते. एखाद्यास लढाईतील तोफखान्याच्या भयंकर

आवाजांनीं सुख होईल तर दुसऱ्यास कामिनी सहवासांत तें मिळेल. एखाद्यास तेंच सुख खाण्यापिण्यांत आढळेल तर एखाद्यास ते विद्याव्यासंगांत आहे असें वाटेल. सारांश सुखाची कल्पना तरी सर्वांच्या मतें एक अशी कोठें आहे ! तसेंच सर्वांस एकाच गोष्टीपासून दुःख होतें असें तरी कोठें आहे ! किंबहुना एकाच व्यक्तीस भिन्न परिस्थितींत एकाच गोष्टीपासून सारखेंच दुःख होत नाहीं. थंड रक्तावर बसलेले घाव जितके दुःखद् होतात तितके ते आपल्या रक्तावर दुःखद् होत नाहींत. हा अनुभव सर्वांस आहे. एखाद्या प्रबल मनोविकाराच्या तावडींत सांपडलेल्या जीवास कोणत्याही शारीरिक दुःखाची पर्वा वाटत नाहीं. सुख व दुःख हीं पुष्कळ अंशीं परस्पर सापेक्ष आहेत. एक सिद्ध झाल्याशिवाय दुसरें होत नाहीं. उष्ण व थंड हे दोन अनुभव जसे सापेक्ष आहेत तद्वतच सुखदुःखद्वंद्व सापेक्ष आहे. शरीराची उष्णता विशेष असेल व बाहेरील वातावरणांतील कमी असेल तर शीतता अथवा थंडी वाजूं लागेल. शरीरापेक्षां वातावरणांतील उष्णता जास्त असेल तर उकडूं लागेल. तेव्हां हे विकार खरे कसे म्हणावे ? उष्ण व थंड या दोन्ही विकारांचे अनुभव केवळ आमच्या शरीराच्या उष्णतेवर अवलंबून आहेत. उष्णता अगर थंडी मोजण्याचें माप म्हणजे आमचें शरीर. हें माप बदलेल त्या मानानें ते विकारही बदलणार. भीति, प्रेम, हर्ष, लोभ, मत्सर, आश्चर्य, मोह, गर्व, लज्जा, क्रोध, काम इत्यादि सर्व विकार होत. हे सर्व विकार जीवक्रियेच्या पोषणाकरितां निर्माण झाले आहेत असें उत्क्रांतिवाद् म्हणतो. भीति आहे म्हणून जीव आपलें रक्षण करण्याचे उपाय करीत असतो. हा प्राण्यांतील प्रथम उत्पन्न झालेला विकार असें म्हणतात. नंतर प्रेमविकार. हा जीवाकडून आपल्या संततीचें संरक्षण करवीत असतो. हर्षानें जीवाचें आयुष्य वाढतें. लोभानें प्रपंच वाढतो, आश्चर्यानें ज्ञान वाढतें. या प्रकारानें विकारजात हा प्रपंचास पोषकच आहे. परंतु हे सर्व विकार एका मनाचींच निरनिराळीं रूपें आहेत. जशीं एकच गति निरनिराळ्या प्रकारांनीं प्रकाश, उष्णता, वीज, लोहचुंबकत्व, आवाज इत्यादि शक्ति उत्पन्न करते त्याप्रमाणेंच मनांत निरनिराळ्या प्रसंगांनीं निरनिराळी वृत्ति उत्पन्न झाली कीं त्या त्या वेळीं त्या त्या विकारात्मक मन होत असतें. विषयाचें ध्यान सुरूं झाल्याबरोबर त्या विषयांत संग उत्पन्न होतो. संग झाला कीं, काम उत्पन्न होतो. कामापासून क्रोध होतो. क्रोधापासून संमोह इत्यादि उत्पन्न होतात, असें भगवद्गीता सांगते. ह्मणजे मनांतल्या मनांतच बाह्यस्फुरणाशिवाय हे विकार मनाच्या संक्षोभामुळें होत असतात. ह्या वृत्तीसुद्धां आंदोलनात्मक आहेत असें दिसतें. पाश्चात्य मानसशास्त्रवेत्ते या मनाचें स्थान मेंदूंत आहे असें मानितात. व मनाचीं निरनिराळीं स्वरूपें मेंदूंतील पेशींच्या आंदोलनावरून पाहात असतात. त्यांचे मतें या पेशींच्या संक्षोभावरच मनाच्या वृत्ति अवलंबून आहेत. कसेंही असो मन हें जड आहे ह्मणजे विषयस्वरूपींच आहे हें

आम्हांस दाखवावयाचें आहे. पहा मन अगर बुद्धि हीं दोन्हीं वृद्धिक्षय पावणाऱ्या वस्तु आहेत. अफूसारख्या जड पदार्थाच्या थोड्याशा कणांनीं सुद्धां या मनास, मांद्य येतें. तसेंच उत्तम सात्विक अन्नसेवनानें अगर सोमरसानें तें प्रफुल्लित होतें अथवा मन व विषय यांचा अन्योन्य संबंध काय आहे हें पहा. मागें सांगितलेंच आहे कीं, प्रकृतीनें आपलीं माणसें पुरुषाचें संन्निध ठेविलीं आहेत. त्यांपैकीं मन व बुद्धि हीं फार वरच्या दर्जाचीं माणसें आहेत. पंचेंद्रियें हीं पुरुषापासून बऱ्याच अंतरावर असतात अथवा तीं देवडीवर असतात. पुरुषांचे सन्मुख उभीं असणारीं अशीं हीं तीनच माणसें अहंकार, बुद्धि व मन. हीं तिन्हीं प्रकृतीचींच माणसें होत. विषयांचे सूक्ष्म संस्कार ह्मणजे मन. मन, बुद्धि हीं सत्वगुण प्रधान असल्यामुळें पुरुषाजवळ राहण्यास तीं योग्य अशीं आहेत. मनाचे विकार, विचार, संवेदना, वृत्ति या तरी सर्व विषयांच्याच ना ! विषयांच्या संवेदनेवरूनच विकार, स्मृति वगैरे वृत्ति उत्पन्न होतात ना ! मनावरील संस्कार तरी बाह्यविषयाचेच. लोभ, प्रेम, आश्चर्य, हर्ष वगैरे सर्व विकार व अनंत विचार हे तरी बाह्य विश्वाबद्दलचेच ना ! मग विश्व खोटें ठरल्यावर यांना तरी आधार कोणाचा ! ह्यांना विषयाच्या सत्यतेएवढीच सत्यता मानिली पाहिजे. बाह्यसृष्टि ही स्थूलसृष्टि व अंतःसृष्टि ही सूक्ष्मसृष्टि होय. स्थूल शरीरासुद्धां बाह्य सृष्टि ही गुणात्मक असून तमःप्रधान आहे. मनोरूपी सृष्टि गुणात्मक (गत्यात्मकच) असून सत्वप्रधान आहे. हा येथपर्यंत जो आपण बाह्य व अंतःसृष्टीबद्दल विचार केला तो मनुष्याच्या जागृतावस्थेतील होय. याशिवाय मनुष्यास आणखी दोन अवस्था आहेत. ह्या अवस्था खोट्या आहेत असें मात्र कोणास म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांचा अनुभव व्यवहारांत रोजच्या रोज प्रत्येकास आहे. त्या अवस्था ह्मणजे स्वप्न व सुषुप्ति. आतां स्वप्नस्थितीचा विचार करतां आपणांस दिसून येईल कीं, साडेतीन हात लांबीचा देह सुखशय्येवर पडला असतां इंग्लंड, अमेरिका, पाताल, स्वर्ग इत्यादि ठिकाणीं कोण भटकत असतो ! नसत्याच भीतिप्रद संकटांनीं कोण बावरून जात असतो ! अगर अप्सरेसारख्या सुंदर कामिनीशीं कामचेष्टा कोण करीत असतो ! वास्तविक अवकाश, काल, कारण, कार्य, विषय, प्रकाश इत्यादि ज्ञानसाधनें त्या वेळीं कोठेंही उपलब्ध नसतां स्वप्नजन्य अनुभव मात्र दिक्कालपरिच्छिन्न असे भासत असतात. सूर्य पृथ्वीच्या मागील बाजूस असतांही आम्हांस पदार्थ सूर्यप्रकाशाच्या साहाय्यानें दिसत असतात. पाणी प्रत्यक्ष नसतां आपण पाण्यांत पोहलोंसें वाटून शैत्य होतें. भय, कंप आदिकरून विकार होतात. या वेळीं बाह्यसृष्टि निमाली असून केवळ अंतःसृष्टीचेच व्यापार चालूं असतात. स्वप्नसृष्टींत आहें तोंपर्यंत जर कोणी शाहण्या तत्त्ववेत्त्यानें आपली स्वतःची डोकेफोड करून प्रमाणसिद्ध रीतीनें "हें स्वप्न आहे, हें खोटें आहे. जागृतींत आपणास हें खोटें वाटेल" असें अट्टहासानें स्वप्नांतच येऊन सांगितलें, तथापि आपण त्या पंडिताचा सन्मान कर-

णार नाहीं. जागृतींत आल्यावर मात्र ही सृष्टि खोटी अशी भावना करूं. परंतु त्या स्थितींत असतांना मात्र वास्तविक पांच मिनिटांत (बाह्य व्यावहारिक पांच मिनिटांत) आपण मुंबईस जाऊं, तेथें भाषणें करूं, तंटे करूं, एकदम पुन्हां परत येऊं, पुन्हां जाऊं, या व अशा अनंत अघटित गोष्टी करूं, परंतु या अघटित आहेत ही कल्पना मात्र स्वप्नांत येत नाहीं. आल्यास तिची वाट त्या वेळेपुरती आम्ही कशी तरी लावून टाकतों. या स्वप्नसृष्टीचा सोपपत्तिक उलगडा अद्याप कोणासच लागलेला नाहीं. कोणी म्हणतो हा मेंदूंतील पेशींचा संक्षोभ आहे. कोणी म्हणतो वासनात्मक लिंगदेह बाहेर खरोखरीच जात असतो व अनुभव घेत असतो. कोणताही पक्ष घेतला तरी स्थूल इंद्रियें व बाह्यसृष्टि हीं त्या वेळीं नसतांना विचार विकार व क्रिया सर्व यथास्थित चाललेल्या असतात. अशाच तऱ्हेनें पाहिल्यास मनाचा कांहीं भाग बाह्यसृष्टींतील फोटोग्राफिक प्लेट अथवा ग्रामोफोन प्लेट आहे असें म्हणावें लागतें, म्हणजे जग मिथ्या ठरल्यावर तेंही मिथ्याच ठरतें. मनानें जग जाणावयाचें आहे. बरें, जग आहे म्हणूनच मन आहे. कोठल्याही गुप्त खोलींत जाऊन बसा. सूर्यकिरणांचा तेथें यत्किंचित् सुद्धां प्रवेश होऊं देऊं नका व अशा स्थितींत स्वस्थ मन करून आपल्या वृत्ति आपणच पहा. तेथें वृत्ति अगर मनोव्यापार विश्वांतील घडामोडीसंबंधानेंच चाललेले दिसतील. मन व सृष्टि यांचा अन्योन्य संबंध कसा आहे पहा. एक दुसऱ्याचें अंशतः कारण व अंशतः कार्य आहे. हा परस्पर अथवा अन्योन्य कार्यकारणभाव दोहींत असल्यामुळेंच प्रपंचाची उभारणी सत्य भासत आहे. परंतु हा संबंध जीवाचे लक्षांत येत नाहीं. विषयींतील चैतन्य व विषयांतील चैतन्य एकच आहे. आंत बाहेर दुसरें असें कांहीं वास्तविक नाहीं असें असतां ही द्वैताची व नानात्वाची उभारणी या अनादि प्रकृतीनें अथवा वैष्णवी मायेनें केलेली आहे. असो. जागृतींतील ज्ञानाचे दृष्टीनें स्वप्न ज्याप्रमाणें मिथ्या ठरलें, तद्वतच मनुष्यास एक चवथी अवस्था असतें तिला तूर्यावस्था म्हणतात, त्या अवस्थेंतील अनुभवानें जागृतींतील नानात्व-ज्ञानही मिथ्या ठरतें. परंतु ही अवस्था सर्वांच्या प्रारब्धीं ठेवलेली नाहीं. ज्या कांहीं थोड्या महात्म्यांत ती प्राप्त होते त्यांनीं त्या अवस्थेंत प्रपंच मिथ्या आहे व ब्रह्मच केवळ खरें आहे असा आपला अनुभव जगास सांगितला आहे. ह्या अनुभवांत निरनिराळीं मतमतांतरें नाहींत. मतांतरें आहेत तीं तुर्यावस्थेच्या अलीकडील म्हणजे संप्रज्ञात समाधि व तिच्याही अलीकडील अवस्थांत असणारे साधक व असंप्रज्ञात समाधिदशेप्रत पोंचलेले सिद्ध यांचेमध्यें आहेत. सारांश, आजन्म सत्यव्रत पाळून तपोबळानें व योगसामर्थ्यानें ज्यांनीं ही अवस्था प्राप्त करून घेऊन आपल्या अपरोक्ष ज्ञानाचा जगास फायदा करून दिला त्यांचा अनुभव व सत्यवाणी व्यवहारदर्शीतील भौतिक शास्त्रज्ञांच्या सिद्धान्ताइतकी अगर किंबहुना जास्त विश्वसनीय मानिली पाहिजे.

आतां आपण मनुष्याच्या नेहमींच्या तिसऱ्या अवस्थेचा विचार करूं. ती अवस्था म्हणजे झोंप. गाढ झोंप. मोठा विक्रमशाली बादशहा असो, मोठा गणिती पंडित असो, तसेंच मोठा मानसशास्त्रवेत्ता असो त्यालाही अज्ञानावस्था सोडीत नाहीं. ह्या स्थितींत विश्व, इंद्रियें, वासना, मन या सर्वांचाच लय होतो. आतां पहा, या ठिकाणीं मनाचा खोटेपणा प्रत्यक्ष गोचर होतो. एका काळीं म्हणजे या अवस्थेंत मनास अस्तित्व नाहीं. जर ही मनाची वस्तु सत्य असती अगर ती आत्म्याचा एक अवश्य अंश म्हणून असती तर ती या वेळीं आत्म्याबरोबर असावयास पाहिजे होती. दोन अवस्थेंत जिचा संचार पूर्ण होता तिचा या अवस्थेंत लय झाला. या दृष्टीनेंही मनाची असत्यता सहज कळून येईल.

आतां कोणी म्हणेल कीं, " अहो, बाह्य सृष्टी गत्यात्मक आहे व अंतःसृष्टीही गत्यात्मक आहे असें जरी मानलें तरी आंत व बाहेर गति आहे असें तरी मानणें भाग आहे ना ? मग त्यांत तरी आमची काय हानि झाली ? " परंतु सूक्ष्म विचारांतीं असें दिसून येईल कीं, ही गति आहे हें तरी मनाशिवाय कोणास प्रतीत होणार ? मनाशिवाय या गतीसही आधार नाहीं. विश्वात्म्याच्या मनांतील संक्षोभ हीच गति. विश्वात्म्यास ' बहुरूप व्हावें ' अशी वासनेची लाट झाल्याबरोबर तीच लाट स्वरूपावर गतिरूपानें पसरली. सत्वगुणी मनाचा प्रथम प्रारंभ झाला. मग रजोगुणात्मक गति निर्माण झाली. त्याच गतीचा तमोगुणात्मक परिणाम म्हणजे जडाभास (matter). जीवात्म्यांचीही हीच अवस्था. मनाची जागृति म्हणजे प्रपंचाचा पसारा. लय म्हणजे प्रपंचाचा नाश. शरीरास गति देणें अगर कार्योन्मुख करणें हें मनाच्याच स्वाधीन आहे. जगाचे सर्व देश पादाक्रांत करण्यासाठीं केलेलीं अचाट कृत्यें तरी मनाचींच कार्यें आहेत. नेपोलियन अगर कैसर यांच्या केवळ एका भावनेनें लक्षावधि जीवांचे संहार होऊन केवढाले अनर्थपात होतात हे पाहिल्यास मनाचें कर्तृत्व सहजीं लक्षांत येईल. तोच नेपोलियन गतासु झाल्याबरोबर सर्व शरीर व तदन्तर्गत स्नायु व तंतु सर्व जसेच्या तसेच असतां

" Can honor's voice provoke the silent dust
Or flattery soothe the dull cold ear of death "–*Gray.*

अशी अवस्था व्हावी याला काय म्हणावें ! तेव्हां मनाशिवाय (या ठिकाणीं Will हा शब्द आधुनिकांनीं योजावा) कार्य नाहीं म्हणजे गति नाहीं. मनच गत्यात्मक होत असतें, तेंच जडात्मक होत असते व हेंच मन शेवटीं आपला लटकेपणा दाखविण्याकरितांच जणूं काय सुषुप्तींत नाहींसें होतें.

आतां " आंत व बाहेर " ह्या कल्पना तरी कोणत्या स्वरूपाच्या आहेत हें पाहूं. " आंत " " बाहेर " हे शब्द शरीरांस उद्देशून आहेत हें सहज समजण्याजोगें आहे. समजा कीं, स्थूल शरीराचे ऐवजीं आमचीं शरीरें ether चीं अथवा

आकाशाचीं केलेलीं असतीं तर मग 'आंत' 'बाहेर' ह्या शब्दाची उत्पत्तीच झाली नसती. हिमालय पर्वत अगर स्वतः पृथ्वीही आम्हांस जड वाटली नसती. ह्यांचा आमच्या गतीस प्रतिबंध झाला नसतां अथवा जगांत कांहीं स्थूल आहे असें आम्हांस भासलेंही नसतें, कारण आकाश ज्यांत ओतप्रोत नाहीं असा पदार्थच मुळीं नाहीं. तसेंच 'खालीं' व 'वर' हेही शब्द या पायाखालील पृथ्वीच्या अपेक्षेनेंच अगर आपल्या डोक्याच्या अपेक्षेनेंच योजण्यांत येत असतात. आम्हीं दिवसा सूर्य वर आहे असें म्हणतों. रात्रौ चंद्र व चांदण्या वर आहेत. असें म्हणतों. वास्तविक रात्रौ आपण सूर्याच्या उलट दिशेस उलटे टांगल्यासारखे असून खालीं असतों. असें असतां भावना मात्र विपरीत करीत असतो. तेव्हां वरील उत्तरांतील "आंत बाहेर गति तरी आहेना ?" ह्या पदांची सत्यता कशी जमेंत धरावयाची ? आंत कोण, बाहेर कोण, हें शरीर विषयकोटींत ढकलून देऊन मग पाहूं लागा. काय उरलें त्याचा विचार करा. माझा मीच उरलों. सर्व ब्रह्माण्डांत माझा मीच उरलों. मला माप नाहीं, मर्यादा नाहीं, आंत, बाहेर, खालीं, वर, मागें, पुढें ह्या कल्पनांचें वारें सुद्धां नाहीं. माझीच भावना जगद्रूप झाली. तीच भावना विरल्यावर जग व मी एकच एक राहिलों. अथवा दुसरी वस्तु मुळींच नसतां माझा मी एकच असें तरी कोणीं म्हणावें ! एक शब्द तरी सापेक्षच आहे. वाचकहो, हा विचार फार गहन आहे हें खरें परंतु या दृष्टीनें विचार करूं लागल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हा विचार आपण नवीन तऱ्हेनें म्हणजे केवळ आधिभौतिक शास्त्रांच्या प्रमेयांच्या साहाय्यानें केला आहे. या प्रकरणांत दर्शविलेले विचार आम्हीं पूर्वी "विश्वाध्यास" या नांवाच्या लेखांत "ग्रंथमाला" मासिक पुस्तकांत प्रसिद्ध केले आहेत. तेथें पाश्चात्य पंडितांचीं शेंकडों वचनें व प्रमाणें देऊन हा अध्यास आम्हीं विस्तारपूर्वक सिद्ध केला आहे. सवड असल्यास तो आपण पाहावा.

आतां ज्ञानाचीं जीं दोन मुख्यांगें काल व दिक् (Time and Space) हींही बाह्य नसून केवळ बुद्धिगत स्वतःसिद्ध धर्म आहेत (a priori forms), हें जर्मन तत्त्ववेत्ता Kant यानें सप्रमाण सिद्ध केलें आहे. हीं प्रमाणें आम्हीं पूर्वी "विश्वाध्यासां"त दिलेलीं आहेत. स्थलाभावामुळें व कालाभावामुळें तीं येथें देण्याचें कारण नाहीं. ह्या दोन्ही प्रकरणांतील विचार केवळ पाश्चात्य भौतिक शास्त्रविशारदांच्याच आधारानें सिद्ध केलेले आहेत. स्वकपोलकल्पित असें यांत कांहीं नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवा.

पाश्चात्य कवींचे विचार सुद्धां केव्हां केव्हां या विश्वाध्यासासंबंधीं अगदीं आमच्या वेदांतमतासारखे निघालेले दिसतात. Shakespeare, Wordsworth, Longfellow, Cowper, Tennyson इत्यादी कवींचे ग्रंथांतून अशा तऱ्हेचे विचार पुष्कळ आलेले आहेत. शोपेनहार तत्त्ववेत्ता तर पूर्ण उपनिषदाभिमानीच होता. Carlyle Thomas ह्याचे ग्रंथ ज्यानें वाचले आहेत त्याला तर असल्या

विचारांचा त्यांत मुकाळच दिसून येईल. त्याला हें जग आत्माकार Spiritual आहे असें भासतें व पदोपदीं इकडील वेदांत्याचीं वाक्यें त्याच्या तोंडून बाहेर पडत असतात. तसेंच अमेरिकन ग्रंथकार Emerson (एमरसन) हाही नेहमीं वेदांत्यासारखें बरळत सुटतो. या दोन्ही ग्रंथकारांचे असे उद्गार पुष्कळ देतां येतील. सारांश हा कीं, हें जग अथवा प्रपंच मिथ्या असून त्या जगाच्या दृश्य गुणांच्या अथवा गतीच्या मागें जो पदार्थ आहे, व जो काँटसाहेबांस अगदीं दुर्गम भासत आहे तो स्वतः पुरुष आहे; तसेंच जीवात्म्याचे भोंवतालचें जें आवरण आहे तें मिथ्या असून त्यांतील कूटस्थ खरा आहे. कूटस्थ व विश्वस्थ एकच आहेत, त्यांची अखंड भेटच चाललेली आहे, परंतु ह्या प्रकृतीच्या हेतूंनीं जीवात्म्यास पछाडल्यामुळें स्वतःच्या आंतीलच सूर्य पहात असतां बाहेर प्राकृतिक सूर्य पहात आहों अशी खोटीच भावना जीव करूं लागला. उत्तम आंबा अगर उत्तम रूपवती कामिनी यांचा उपभोग घेत असतां, स्वतःचाच आनंद स्वतः चाखीत असतां, बाह्य विषयावर, त्या आनंदाचा आरोप करूं लागून आपल्या अमर्याद सुखास औपाधिक, नैमित्तिक अथवा मर्यादित व अनित्यरूप देऊं लागला. चैतन्यानंदलहरींच्या अखंड व संतत चाललेल्या कल्लोळांत सदैव स्नान करण्याचें विसरून हा जीव विनाकारण बावरून जाऊन पराधीन होत असतो. असो. आतां आणखी एका बड्या जीवनशास्त्रवेत्त्याच्या वचनाचें अवतरण देऊन हा योग आटपता घेतों.

हेन्री ड्रूमंड म्हणतातः—

" Are we even quite sure that what we call a physical world is, after all, a physical world? The preponderating view of science at present is that it is not. The very term " Material world " we are told is a misnomer, that the world is a spiritual world, merely employing matter " for its manifestations "— *Ascent of Man P. 420.*

(ज्यास आपण दृश्य जग म्हणतो, तें तसें बाह्यजग आहे अशी आपली पक्की खात्री आहे काय ! भौतिकशास्त्राचे हल्लींचें मत बहुतांशीं हें जग नाहीं असें आहे. 'जडसृष्टि' हा शब्दसुद्धां अन्वर्थक नाहीं, असें शास्त्रांचें सांगणें आहे. जग हें चैतन्यात्मक आहे व जडता ही चैतन्य व्यक्तीस आणण्यास उपयोगांत आलेली आहे.

पाश्चात्य तत्त्ववेत्ते ह्या बाह्यसृष्टीविषयीं इतके साशंक झालेले आहेत, परंतु पुढें त्यांची गति चालत नाहीं. तुरीय अवस्था प्राप्त करून घेण्याचीं साधनें त्यांना ठाऊक नसल्यानें खरें ब्रह्मज्ञान त्यांपैकीं कोणासच झालें नाहीं. असो. त्यांच्या प्रक्रियेचा आपण येथवर आश्रय केला तो फक्त हा अध्यास दाखविण्यापुरताच

होय. आतां आमचे संन्यासमार्गीय ब्रह्मनिष्ठ ज्ञानेश्वरमहाराज यांनीं आपला अनुभव कसा सांगितला आहे पाहूं. ते ह्मणतातः—

सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाइला केला पुरुषु ॥
जिये दादुलेनि सत्ताविशेषु । शक्तीचा झाला ॥

(सर्व शबल ब्रह्माचा निरास करून अवशिष्ट रहाणारा जो पुरुष त्याला प्रकृतीनें आपला दादला केला. त्याचे सत्तेमुळें तिलाही अस्तित्व आलें.)

पतीचेनि अरूपपणें । लाजोनि अंगाचें मिरवणें ।
केलें जगाएवढें लेणें । नामरूपाचें ॥

(आपल्या पुरुषास हस्तपादादि अवयव नाहींत असें पाहून जिला लज्जा उत्पन्न झाली, व त्यायोगें तिनें स्वतः आपल्या अंगाचे अलंकार करून त्यास घातले.)

जिये पहावयाच्या लोभा । चढे द्रष्टृत्वाचिया क्षोभा ।
जियेतें न देखत उभा । अंगचि सांडी ॥

(त्या प्रकृतीला पहाण्याकरितां जागृत अवस्थेंत जो द्रष्टा होतो परंतु तुर्यावस्थेंत तिला पूर्ण विसरून स्वतःचें शरीरच टाकून देतो.)

कांतेचिया भिडा । अवगला होय दृश्याएवढा ।
अंगविला उघडा । जियेवीण ॥

(निजांग ब्रह्मस्वरूपत्वेंकरून तो देशकालपरिच्छेदरहित असा असतां बायकोच्या भिडेस्तव दृश्याएवढा भासूं लागतो.)

निदेलेनि भातारें । जे वियाली चराचरें ।
जियेचा विसवला नुरे । आपलेपणाही ॥

(आपला भ्रतार जो पुरुष तो निद्रिस्त असतां जी प्रकृति चराचर विश्व प्रसवली आहे तिनें ही गोष्ट आपल्या भतारास कळविली म्हणावें तर तिच्या ठिकाणीं विसांवा घेणाऱ्या पुरुषास आपलेपणाची वार्ताही नाहीं.)

हे उतारे अनुभवामृतांतील आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपला स्वतःचा तुरीया अवस्थेंतील अनुभव आपले गुरु श्रीनिवृत्तिनाथ यांना सांगितला आहे. श्रीज्ञानेश्वराची प्रासादिक वाणी कितीही श्रवण केली तरी मनुष्यास तृप्ति होणार नाहीं. परंतु स्थलाभावास्तव तो मोह वा जूस ठेवणें भाग आहे. या दोन्ही योगांचें अथवा प्रकरणांचें प्रयोजन एवढेंच आहे कीं, जग हें वास्तविक नसून अध्यासात्मक आहे असा अपरोक्ष अनुभव आल्यानंतर " उघडा डोळा सैर समाधि " अशी ज्या अधिकारी पुरुषाची स्थिति झाली त्यास वेद, ईश्वर, शास्त्रें सर्व अविद्यामय वाटल्यास त्यांत

गैर काय आहे ! रहस्यकारांनीं जरी एवढा मोठा तात्विक ग्रंथ लिहिला आहे तरी त्यांना या अपरोक्षानुभवाचें खरें मर्म मुळींच समजून आलें नाहीं. ह्यामुळें ज्ञानोत्तर कर्मांचा अट्टाहास त्यांनीं केला आहे. गुरुप्रसादानें ज्याला हा अपरोक्षबोध झाला व ज्याला देह, सृष्टि वगैरे सर्व चैतन्यमय दिसूं लागलें त्याला विधि, निषेध यांची जरूर लागते असें म्हणणें म्हणजे रहस्यकारांसारख्या पंडितानें रोज रूपावली ह्मटलीच पाहिजे असा निर्बंध घालणें होय. ज्या अवस्थेंत शाखेमुद्दां फोल झालीं किंबहुना ईश्वरच ज्यास मिथ्या वाटूं लागला त्यास बंधन कोणाचें ! तो विधिनिषेधातीत झाल्यामुळें त्यानें समाधिविरहित स्थितींत कर्में केलीं काय व न केलीं काय दोन्हींचाही त्यास प्रत्यवाय नाहीं. परंतु रहस्यकारांची जबरदस्तीची आज्ञा त्यांना आहे कीं, त्यांनींही कर्में केलींच पाहिजेत. आम्ही साफ म्हणतों कीं, रहस्यकारांना वेदांत समजलाच नाहीं. वाचकहो, आपण त्यांचे मूढभक्त नसाल तर गीतारहस्य पान ३५१ पहा. त्यांतील तुलनात्मक साधनपरंपरा पहा. आरंभींच " आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर " अशीं अक्षरें वाचा. आत्मज्ञान झाल्यावर साधनें कसलीं ? हें ब्रह्मज्ञान कसें बोकाळलें आहे पहा !! खऱ्या जाणत्यानें एवढा तुलनात्मक वृक्ष पाहिला तरी तो ग्रंथच हातीं धरणार नाहीं. (अवगतिपर्यंतं हि ज्ञानं. ब्रह्मावगतिर्हि पुरुषार्थः) ब्रह्मज्ञान झाल्यावर मग रहस्यकार चित्तशुद्धि करण्यास सांगत आहेत ! ! पुन्हां म्हणतात आत्मज्ञान होण्यास बुद्धि स्थिर पाहिजे !! मग "आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर" हें आरंभींचें सूत्र कशास पाहिजे ? पौर्वात्य व पाश्चात्य दोन्ही न्यायशास्त्रांच्या विरुद्ध रहस्यकार बरळूं लागले आहेत. हा त्यांचा ब्रह्मज्ञानोपदेश व साधनसंपत्ति त्यांचे भक्त खुशाल शिरोभागीं घेऊन नाचोत. आमची व कोणाही खऱ्या वेदांतज्ञांची या अज्ञानमूलक ज्ञानावडंबरामुळें पूर्ण खेदयुक्त निराशा झाली आहे. ज्ञानोत्तर कर्मयोगाचा विधि सिद्ध करण्याच्या ईर्षेंत रहस्यकारांनीं केवढे प्रमाद केले आहेत पहा !!!

असो. भगवंताचे मतें इंद्रियापेक्षां मन श्रेष्ठ, मनापेक्षां बुद्धि, बुद्धीपेक्षां आत्मा श्रेष्ठ असें आहे. ज्यानें इंद्रियांचा लय मनांत केला, मनाचा बुद्धींत व बुद्धीचा आत्म्यांत केला त्यास " तस्य कार्यं न विद्यते " कर्तव्य रहात नाहीं. रहस्यकार तर या खोट्या प्रकृतीसच ज्ञानोत्तर दर्शेंतही कवटाळण्यास उपदेश करितात. वाचकहो, आपणच आतां सत्यासत्याची निवड करा. आम्ही तर म्हणतों विश्व (प्रकृति) हें नुसतें अलंकारिक भाषेनें नव्हे तर परमार्थतः झूट आहे.

१० सिद्धावस्थाव्यवहारयोग.

ज्ञानामृतेन तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिनः ।
नैवास्ति किंचित्कर्तव्यं अस्तिचेन्न स तत्त्ववित् ॥

(ज्ञानामृत पिऊन तृप्त झालेल्या व कृतकृत्य बनलेल्या योग्यास कोणतेंच कर्म कर्तव्य उरत नाहीं, उरत असल्यास तो तत्वविद् ह्मणजे ज्ञानीच नव्हे.)

विश्व हें तात्विकदृष्ट्या व पाश्चात्य आधिभौतिक शास्त्रदृष्ट्या खोटें आहे. त्या विश्वांतील विषय व विषयी या दोहींमधील चैतन्यच तेवढें खरें आहे. बाकी विषयामधील व विषयीमधील दिसून येणारा स्थूलपणा हा इंद्रियांचा आभास आहे. इंद्रियें हींही स्थूल असून प्रकृतीचीं आहेत. प्रकृति त्रिगुणात्मक असून ती matter, motion व mind या तीन स्वरूपांत नेहमीं दिसून येते. नामरूपात्मक अनेकविधता या त्रिगुणांचाच पसारा असून या सर्वांना आधार सच्चिदानंद स्वरूपाचा आहे. एका पातळीवर काढलेला वनश्रीचा देखावा स्थूलाभासयंत्रानें (Stereoscope) पाहिल्यास जसें त्या देखाव्यांतील लांबी, रुंदी, उंची इत्यादि त्रिगुणात्मकता त्या पातळीवर वस्तुतः नसूनही प्रत्यक्ष अनुभवास येते तद्वतच देश, काल, कार्यकारण या बुद्धिगत त्रिगुणसामर्थ्यानें व लांबी, रुंदी व उंची या बुद्धिगत व द्रव्यगत तीन परिमाणांनीं चैतन्यस्वरूपाच्या एकाच पातळीवर या प्राकृतिक गुणांनीं नसताच विविधाकृति देखावा दिसूं लागला आहे. अथवा चैतन्यस्वरूपाची प्राज्ञता कळून येण्याकरितां किंवा एकत्वाचा कंटाळा घालविण्याकरितां किंवा याहीपेक्षां सत्यप्लुत अलंकार करावयाचा झाल्यास, आपलें ऐक्य दृढ करण्याकरितां हा प्रपंचाचा डोंबारी खेळ उभारलासा झाला आहे.

वाचकहो, मागील प्रकरणाच्या प्रारंभींच सांगितलें आहे कीं, हीं प्रकरणें सूक्ष्मबुद्धीनें समजून घेतल्यास वादाचा विषय चांगला लक्षांत येईल, त्याशिवाय येणार नाहीं. कारण प्रपंच मिथ्या हें आपण नेहमीं ऐकत असतों. ऐकत असून त्यापासून कधीं पराङ्मुख होत नाहीं. जर खराच तो मिथ्या आहे तर मिथ्या वस्तूबद्दल आम्ही एवढा अट्टाहास कां करीत असतों ? मिथ्यात्वाचें ज्ञान पूर्ण झाल्यावर त्याबद्दल रात्रंदिवस प्रयत्न करण्यांत वृथा कालक्षेप कोण शहाणा करील ? मृगजलांच्या पाठीमागें धांवणारा हरिण एकदां फसून सुद्धां पुन्हां त्याच मृगजलाच्या पाठीमागें धांवत सुटतो; याचें कारण, मृगजल हा सूर्यकिरणांचा खेळ आहे हें ज्ञान त्यास होत नसतें हेंच होय. चित्रांतील सुंदर वनितेस भुलून जाऊन जर एखादा शहाणा कामाविष्ट होऊन विव्हळ होऊं लागला तर त्यास औषध ह्मणजे त्या

वनितेचें खरें ज्ञान करून देणें हेंच होय. पित्ताचा विकार झाल्यास अगर ज्वरांत वात (delirium) झाल्यास रोग्यास पिवळा रंग अथवा नसतीं माणसें व देखावे पूर्ण जागृतावस्थेंतही दिसूं लागतात व ते असंबद्ध प्रलाप करूं लागतात. या प्रलापाच्या असंबद्धेतचा दोष रोग्याकडे नसतो; रोगी जें काय बोलतो तें सर्व त्याच्या अनुभवाचेंच फल असतें. मेंदूंत विकार झाल्यामुळें अथवा मेंदूच्या पेशींत थोडा फेरबदल झाल्यामुळें त्यास निराळेंच जग दिसूं लागतें; त्यास उपाय म्हटला ह्मणजे त्यास पूर्ववत् करणें अथवा वातविकार कमी करून मेंदूंतील पेशींचे व्यापार नेहमींच्या क्रमानें कराबयास लावणें. वाताचा झटका वातविध्वंस मात्रेच्या वळशांनीं उतरल्याबरोबर कार्यकारणभावात्मक देशकालपरिच्छिन्न अशा स्वरूपाचें व्यावहारिक जग रोग्यास दिसूं लागतें. मग तो पुन्हां त्या पूर्वीच्या भ्रमांतील अनुभवाची इच्छा करीत नाहींसा होतो. तद्वतच या प्रपंचाचा भ्रम झाल्याबरोबर नसतेंच जग दिसूं लागतें. ज्ञानमात्रेचा वळसा मिळाल्याबरोबर मायेचा अथवा अज्ञानाचा अथवा प्रकृतीच्या त्रिदोषात्मक विकारांचा विराम होऊन शुद्ध स्वरूपाचा अपरोक्ष बोध या रोग्यास होत असतो. ही भवबाधा दूर झाल्यावर मग तो प्रपंच कधींही खरा म्हणणार नाहीं. अथवा या भ्रमनिरास-दशेंत व्यवहाराचा त्याचे ठिकाणीं पूर्ण विराम झाल्यामुळें त्यास अखण्डैकरस चिद्घन स्वरूपानंदाशिवाय आंतबाहेर कांहीं उरत नाहीं. अशा मनुष्यास पुन्हां विधिनिषेधरूपी बंधनें रहस्यकारांनीं बांधण्याचा यत्न केला आहे, हा किती हास्यास्पद आहे हें आतां वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. रहस्यकार " शाब्दज्ञान " व " अपरोक्षज्ञान " यामध्यें असलेला भेद जाणीतच नाहींत. अपरोक्षानुभवाचें वर्म त्यांना मुळींच समजलें नाहीं. " ज्ञान " " ज्ञान " असें जें ते नेहमीं ह्मणतात तें " ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः " ह्यासारखें शाब्दिक ज्ञानच ते समजत असतात. आमची एका अशाच रहस्यकारांसारख्या पंडितांची गांठ पडली असतां त्यांनीं प्रश्न केला, "अहो ब्रह्म काय आहे हें आम्हां तुम्हां सर्वांना समजलें आहे; एक प्रकारचा 'attenuated consciousness' (अति सूक्ष्म विरल ज्ञान) ह्मणजे ब्रह्म. ही कल्पना आमचे व्यवहारास काय उपयोगी आहे ! कदाचित् आधुनिक शास्त्रदृष्ट्या आम्ही कबूल करूं कीं, दृश्याच्या बुडाशीं अशी " Intelligence " (बुद्धि) आहे व तिचींच ही सर्व उभारणी आहे, परंतु त्यायोगें व्यवहारास कांहीं बाध येत नाहीं. " करतलभिक्षा तरुतलवासः " या प्रकारचा संन्यास आम्ही लोकांनीं स्वीकारल्यामुळें आमची किती अवनति झाली आहे पहा. ताकभात झाला ह्मणजे पुरे. यापुढें जास्त गरजेची मर्यादा वाढविणें हें धर्मविरुद्ध आहे, अशा तऱ्हेची आम्ही समजूत करून घेतल्यामुळें प्रपंचांत आम्हीं फार घात करून घेतला आहे " इ० इ० अशा प्रकारचा प्रश्न व गीतारहस्यांतील रहस्य अगदीं तंतोतंत एकच प्रकारचीं आहेत. जग नश्वर आहे इतकेंच नव्हे तर तें मिथ्या आहे हें ज्ञान नुसत्या विद्वत्तेपुरतें अगर विश्वविद्यालयांतील मोठमोठ्या

पदव्या पटकावण्याकरितां नव्हे अगर पुन्हां त्याच मायारूपी जगांतील खोटीं कर्में युक्तीनें करीत रहाण्याकरितां नव्हे हें ह्या आधुनिक वेदान्त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. रहस्यकार म्हणतात–दृश्याच्या बुडाशीं एक तत्त्व आहे व सर्वांतर्यामी आत्मा एकच आहे अशी मनुष्याची एकदां खात्री झाली म्हणजे त्याची बुद्धि सम होते व बुद्धि सम झाली म्हणजे त्याचे हातून पापाचरण होत नाहीं. त्याची वर्तणूक हींच जगास कर्तव्याकर्तव्याचे बिकट प्रसंगीं नीतिदर्शक होत असते. आतां रहस्यकारांनीं स्वतःस कसें कोड्यांत पाडून घेतलें आहे पहा ! विश्वाची मिथ्या दृष्टि बाणल्यानंतर, चिद्घनस्वरूपाची ओळख पटल्यानंतर ह्मणजे ब्रह्मज्ञान झाल्यानंतर त्याचा विनियोग त्याच मिथ्या व भ्रामक विश्वांतील भातुकलीचे लटके खेळ खेळण्यांत करावयाचा, हा सिद्धान्त किती वेडगळ आहे याची कल्पना कोणासही होईल. मोठ्या कष्टानें नाना दिव्य वनौषधि मिळवून त्यांच्या साहाय्यानें दुर्धर रोग घालविल्यानंतर पुन्हां तसेंच अंथरुणावर पडून मिथ्याच अगर कपटानें रोग्याचा आविर्भाव करीत रहावयाचें याचें तात्पर्य काय ? विश्वयोषितेच्या कपट जालांतून एखाद्याची महत्प्रयासानें सुटका झाल्यावर पुन्हां आपल्या प्रिय संवगड्यास खूष करण्याकरितां (लोकसंग्रहाकरितां) आपले दोन पाय " युक्तीनें " त्याच जाळ्यांत अडकवन घ्यावयाचें याला मुज्ञांनीं काय म्हणावें ! तुरुंगवासांतून मुक्तता झाल्यावर व लोहशृंखलेचा पूर्ण वियोग झाल्यावरही पुन्हां तशाच बंदिवासांत बळेंच " युक्तीनें " काळ कंठण्याचा उपदेश अगर शास्त्रविधि रहस्यकारांशिवाय अगर त्यांच्याचसारख्या धर्मानभिज्ञ पंडितंमन्याखेरीज अन्य कोणी करणारच नाहीं, अशी आमची खात्री आहे. भगवद्गीतेंत हा विधि कशा स्वरूपाचा आहे हें पुढें " ज्ञानयोग " प्रकरणांत आम्हीं सांगतच आहों, परंतु युक्तिवादानें हा पंथ किती पोंचट व बालिश आहे हें त्या प्रकरणांत पहावयाचें आहे. अद्वैतज्ञान ह्मणजे ब्रह्मच एक जगांत आहे, बाकी कांहीं नाहीं,–ह्या ज्ञानाची सीमा अथवा परमावधि म्हणजे ' असें युक्तीनें व शास्त्रानें कळणें ' यापलीकडची " अनुभवात्मक अगर अपरोक्षानुभूति " या सीमेचा गंधही रहस्यकारांचे ध्यानांत आलेला नाहीं. एरव्हीं त्यांचे हातून अशीं भलभलतीं विधानें झालींच नसतीं. हें अद्वैतज्ञानाचें रहस्य नुसत्या ग्रंथावलोकनानें मिळत असतें तर जर्मनी, फ्रान्स, अमेरिका येथील ग्रंथसमूहालयें केव्हांच उद्धरून गेलीं असतीं. रहस्यकारांच्या देशकार्यव्यवसायांत एखाद्या अधिकारी साधुपुरुषाची गांठ जरी पडती तरी ते बरेच ताळ्यावर येते. परंतु तसा योग घडून आला नसावा असें या ग्रंथावरून उघड दिसतें. पाश्चात्य तत्त्ववेत्ते व शास्त्रपंडित ज्या आदिवस्तूचें विवरण करतात त्यासारखी आदिवस्तु म्हणजे ब्रह्म. त्या ब्रह्मज्ञानापासून व्यवहारास कोणताच बाध येत नाहीं. ती वस्तु समजून घेणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. एवढ्याच शाब्दज्ञानावर रहस्यकार संतुष्ट झालेले आहेत.

"मनोदृश्यमिदं सर्वं यत्किंचित् स-चराचरम् ।
मनसो ह्युन्मनीभावात् द्वैतं नैवोपलभ्यते ॥

योगवासिष्ठ निर्वाण प्र०.

ह्यासारख्या उन्मनी अगर चतुर्थावस्थेसारख्या अपरोक्षवृत्तीचा रहस्यकारांना अस्पष्ट सुद्धां विचार ठसलेला दिसत नाहीं. त्यामुळें त्यांचें गीतारहस्यशास्त्र अविद्यावत् झालें आहे हें सांगण्यास आमचें मन यत्किंचित्ही कचरत नाहीं. ज्या ब्रह्मज्ञानानंतर विश्व, व तदन्तर्गत सर्व जड विद्या अथवा अपरा विद्या, जिला परमपूज्य श्रुति असें संबोधण्यांत येत असतें ती, इंद्रचंद्रादि देवता, जपजाप्य, यज्ञयाग, नीतिशास्त्रें, शिल्पशास्त्रें यच्चयावत् झाडून सर्व जें कांहीं स्थावर, जंगम, मानासिक, अहंकारात्मक नानाविध प्रपंच व किंबहुना प्रत्यक्ष षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वरसुद्धां ज्या परमपदीं पोंचल्यावर लटके पडतात, किंवा

"एवं दशोपनिषदें । पुढारी न ढाळितीं पदें ॥
देखोनि बुडी बोधें । दिधली तेथें ॥

श्रीज्ञानेश्वर अनुभवामृत.

अशा बोधरूपी समुद्राशीं एकतानता झाल्यावर लोकमान्यांनीं आपला नीतिग्रंथ घेऊन आपला हा चरम उपदेश करीत सुटावें ह्यासारखें हास्यास्पद दुसरें काय आहे ? वेदान्तकेसरी आपल्या तुर्यावस्थेंत स्वैरसंचार करूं लागल्यावर ग्रामकेसरीनें त्याला आपल्या भुंकण्यानें नीति अगर व्यवहारशास्त्राचा गुरूपदेश दण्याचा प्रयत्न करावा अशासारखाच हा प्रयत्न झालेला आहे. ज्ञान्याच्या अवस्थेचें अनुभवात्मक वर्णन ज्ञानोबाराय करितात कीं:—

पसरूनि वृत्तीचीं वावें । दिठीरूपातें दे खेवे ॥
परि दृश्याचेनि नांवें । कांहींच न देखे ॥

प्रकरण ९, ओ० २२.

अर्थः—ज्ञानियाची दृष्टि वृत्तीची वावे पसरूनि म्हणजे नेत्रेंद्रियवृत्ति प्रशस्त करून रूपातें खेंव म्हणजे भेटी देते, परंतु दृश्याचे नामरूपेंकरून ती कांहींच पहात नाहीं.

तमातें ध्यावया । उचलिल्या जरि सहस्र बाह्या ॥
परि शेवटीं रवि यया । हाचि जैसा ॥

अर्थः—तमाचें ग्रहण करण्याकरितां सूर्यानें जरी आपले सहस्रबाहू उचलून प्रयत्न केला तरी शेवटीं सूर्याशिवाय कांहींच नाहीं म्हणजे तमाची वार्ताच त्याचे ठिकाणीं मिळणार नाहीं. तसें प्रयत्न केल्यासही ज्ञानियास अज्ञान गिवसणार नाहीं.

कां स्वप्नींचिया विलासा । भेटेन इया आशा ॥
उठला तंव जैसा । तोचि तोकीं ॥

अर्थः--जागा झाल्यावर स्वप्नींच्या विलासाप्रीत्यर्थ कोणी खटपट करूं लागल्यास स्वतःशिवाय त्याचे हातास कांहीं लागणार नाहीं. तशीच ज्ञानी संसाराची उठाठेव करूं म्हणेल तर त्याची स्थिति होईल.

श्रीज्ञानेश्वर हे रहस्यकारांचे मतें पूर्ण संन्यासमार्गीच होते. असोत. परंतु त्यांचा अनुभव तर रहस्यकार खोटा म्हणत नसतील असें वाटतें. अनुभव हा बुद्धिगम्य असून स्वसंवेद्य आहे. ज्ञानेश्वरमहाराजांसारखे योगी असत्य भाषण व मिथ्या उपदेश करतील असें मानणें म्हणजे जगांत खरें सत्यच कोठें मिळणार नाहीं असें मानण्यासारखें होईल. त्यांनीं ह्या अनुभवामृत ग्रंथांत बोधाशिवाय दुसरें कांहींच सांगितलें नाहीं. हा बोध त्यांनीं आपल्या स्वतःच्या गुरूस अर्पण केला आहे व त्या गुरूंनींच आपणास असें जीवन्मुक्त करून सोडल्याचें वर्णन या ग्रंथांत केलें आहे. हा बोध केवलाद्वैताचा आहे. श्रीशंकराचार्य हे अद्वैतशास्त्राचें मंडन युक्तिवादानें व श्रुतिस्मृतिग्रंथांचे आधारानें करून अज्ञ जनांस सुज्ञ करण्याकरितां अहर्निश प्रयत्न करीत असल्यामुळें त्यांना मायावादाचा अंगिकार करावा लागे. वादविवाद करण्याकरितां व द्वैतस्थ जनाचे सुलभ बोधाकरितां सदसद्विलक्षण व अनिर्वचनीय मायेचा ते अंगिकार करीत असत. न होऊन त्यांनाही केवलाद्वैतच पूर्ण मान्य होतें. श्रीज्ञानेश्वरांनीं केवल तुर्यावस्थेंतील अनुभव सांगितल्यामुळें त्यांना त्या दशेंत जो अनुभव आला तोच जशाचा तसा योग्य शब्दांनीं त्यांनीं वर्णिला आहे. त्यामुळें 'माया' शब्दाची व्युत्पत्ति त्यांनीं "या" "मा" (जी खोटी) अशी करून दाखवून त्रिकालीं जग झालेंच नाहीं, परमार्थतः जग अगर विश्व हें झालेंच नाहीं, होत नाहीं व होणार नाहीं, असा महासिद्धान्त स्थापित केला. वाचकहो, हा सिद्धान्त रहस्यकारांना मुळींच अवगत नाहीं. असता तर ते ज्ञानोत्तर कर्मविधीच्या उठाठेवीस लागलेच नसते. हा महासिद्धान्त खोटा आहे असें देखील म्हणण्यास ते मागें पुढें पहाणार नाहींत. कारण हें जग झालेंच नाहीं असें म्हटलें म्हणजे त्यांचा "कर्मयोग" सर्व ढांसळला जाईल. त्यांचे त्रेचाळीस वर्षांचे सर्व श्रम फुकट जातील व एवढें पांढऱ्यावर काळें करण्याचे सायास वायुताडनाप्रमाणें व्यर्थ होतील. तेव्हां हा सिद्धान्त त्यांना मान्य करण्याची सोयच नाहीं. परंतु आम्ही म्हणतों परमार्थतः हाच सिद्धान्त अबाधित आहे. सर्व वेदान्त शास्त्रांचा निष्कर्ष हाच आहे.

न निरोधो न चोत्पत्तिर्न बन्धो न च साधकः ।
न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ॥

गौडपादकारिका-३२.

जागृतींतील पंचेंद्रियांचे अनुभव जसे त्या अवस्थेपुरते खरेच भासतात अगर स्वप्नसृष्टि त्या अवस्थेंत तेव्हांपुरती सत्यच भासते तद्वतच या चतुर्थावस्थेंत या दोन्ही अवस्था मिथ्या ठरून केवलाद्वैतबोध होत असतो. फक्त व्यावहारिक दशा तेवढी खरी धरून चालल्यास अद्वैतबोध होणें शक्य नाहीं. अध्यासभाष्यांत आचार्यांनींही व्यवहार व शास्त्रें हीं मिथ्या आहेत असें म्हटलें आहेः—

प्राक् च तथा-भूतात्मविज्ञानात् प्रवर्तमानं शास्त्रमविद्यावद्विषयत्वं नातिवर्तते तथाहि "ब्राह्मणो यजेत्" इत्यादीनि शास्त्राणि आत्मनि वर्णाश्रमवयोवस्थादि विशेषाध्यासमाश्रित्य प्रवर्तन्ते.

भावार्थः-आत्मज्ञान होण्याचे पूर्वकालीं, प्रमाण असलेलीं शास्त्रें सुद्धां अध्यासात्मक अतएव मिथ्याच होत. कारण "ब्राह्मणांनीं यज्ञ करावा" हा विधीसुद्धां आत्म्याचे ठिकाणीं वर्ण, आश्रम, वय, अवस्था इत्यादिकांचा अध्यास करूनच प्रवृत्त झाला आहे. तसेंचः—

तमेतमविद्याख्यमात्मानात्मनोरितरेतराध्यासं पुरस्कृत्य सर्वे प्रमाणप्रमेयव्यवहारा लौकिका वैदिकाश्च प्रवृत्ताः सर्वाणि च शास्त्राणि विधिप्रतिषेधमोक्षपराणि ॥

आत्मवस्तु व अनात्मवस्तु या दोहींचा म्हणजे चित् व जड या दोहींचा अध्यास करूनच लौकिक व शास्त्रीय प्रमाण-प्रमेय-व्यवहार चाललेले आहेत. शास्त्रेंही सर्व या अविद्यामय अध्यासास धरूनच प्रवृत्त झालेलीं आहेत. नुसतीं विधिनिषेधपर म्हणजे कर्मकाण्डात्मकच नव्हे तर मोक्षपर शास्त्रेंसुद्धां हाच अध्यास पुढें करून चाललीं आहेत. या सिद्धान्तांतील अनुभवात्मक रहस्य रहस्यकारांना मुळींच कळलेलें नाहीं. हीं शास्त्रेंसुद्धां ज्या अवस्थेंत लटकीं ठरलीं तेथें रहस्यकारांचे पोंचट विधिनिषेधांना कोठला थारा राहील !

कदाचित् रहस्यकार म्हणतील कीं, हा जो तुर्यावस्थेचा अपरोक्षानुभव आपण सांगतां हा अनुभव व ही अवस्था ज्ञान्यास सदैव असत नाहीं. चोवीस तासांपैकीं कांहीं किंबहुना बरेचसे तास याखालील म्हणजे जागृतावस्थेंत ज्ञान्यासही काढावे लागतात. तेव्हां या अवस्थेंत त्यांनीं कसें वागावें ! कर्म सोडून देऊन शास्त्रबाह्य वर्तन करावें कीं, आजपर्यंत शास्त्रशुद्ध वागणूक केली तशीच ती पुढें त्यांनीं चालवावी ! हा प्रश्न अगदीं योग्य आहे, व या प्रश्नाचें समर्पक उत्तर तज्ज्ञांनीं दिलेलें आहे.

ज्ञानिनोऽज्ञानिनश्चात्र समे प्रारब्धकर्मणी ।
न क्लेशो ज्ञानिनो धैर्यान्मूढः क्लिश्यत्यधैर्यतः ॥३३

विद्यारण्य. पंचदशी. तृप्तिदीप प्र०

ज्ञानी असो किंवा अज्ञानी असो दोघांनाही प्रारब्धकर्मांनें सोडलेलें नाहीं. ज्ञानी मनुष्याचें संचित व क्रियमाण हीं दोन्ही जरी नाश पावलीं तरी प्रारब्धकर्म त्याला

सोडीत नाहीं, तें त्याच्या देहपातापर्यंत पाठीस असतें. या प्रारब्धकर्माचे जोरानें ज्ञानी कर्म करीत असतो. वास्तविक हीं कर्मे तो कर्तव्यें म्हणून करीत नाहीं. ज्ञान्याचीं कर्मे सहजगत्या चाललेलीं असतात. तो ज्ञानी साधकदशेंत जीं कर्मे अनंत काल करीत करीत ज्ञानी दशेप्रत पोंचला, तींच कर्मे दृढाभ्यासानें जरी तो करीत राहिला तरी त्या कर्मापासून त्याला पुढें कांहीं मिळवावयाचें नसल्यामुळें तें कर्म निष्फलच होय. ज्ञानप्राप्ति हें परमध्येय असल्यामुळें व तें त्यास अपरोक्ष प्राप्त झाल्यामुळें त्यास या जगांत अगर स्वर्गादि लोकांत ध्येय कांहीं रहात नाहीं. तो संध्यावंदन करील, जपजाप्य करील, यज्ञयाग करील,म्हणून त्या संध्यावंदनानें अगर यज्ञयागादिकांनीं इतर जनांसारखें चित्तशुद्धि हें फल त्यास साधावयाचें राहिलेलें नसतें. कर्म, उपासना वगैरे सर्व कांहीं ब्रह्ममयच असल्यामुळें व चित्त वासनारहित असल्यामुळें या सात्विक शास्त्रोक्त कर्मांत अगर उपासनेंत त्याची ब्रह्मबुद्धि नष्ट होत नाहीं. यामुळें ज्ञानी लोकांचें कर्म खरें नसून निष्कर्म सदरांतच घातलें जातें. " कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः" ह्या वाक्यांतील तात्पर्य तरी हेंच होय. कर्म करीत असला तरी तो परमार्थतः कर्म करीतच नसल्यासारखा आहे. कारण त्या कर्मांचें कांहींएक फल त्यास मिळवावयाचें नसतें. बरें, जरी त्यानें कांहीं कर्मे केलीं नाहींत तरीही तो कर्मभ्रष्ट होत नाहीं, म्हणजे शास्त्रविधींचें उल्लंघन त्याचे हातून झालें असें होत नाहीं, म्हणजे शास्त्रविहित कर्मे न केल्याचा दोष त्यास लागत नाहीं. त्या ज्ञान्या-या कर्मास दग्ध बीजांचा दृष्टांत देण्यांत येत असतो. बीजांतील वाढणारा अंकुर जाळून टाकल्यानंतर तें बीज ज्याप्रमाणें पीक तयार करण्यास उपयोगी पडत नाहीं, त्याप्रमाणेंच ज्ञानी लोकांचें कर्म फलोन्मुख होत नाहीं. त्यानें कर्म केलें तरी वाहवा, न केलें तरी वाहवा. ज्ञान दृढ नसल्यामुळें समाधिसुखाचा आस्वाद सदैव घेणें त्यास अशक्य असल्यास ब्रह्मचिंतनास अनुकूल अशीं कर्मे त्यानें केल्यास चांगलेंच. त्यायोगें ब्रह्मबोधास खं न पडतां त्यांतच लोकसंग्रहाचें कार्य सहजगत्या घडून येतें. परंतु या ठिकाणीं एवढें मात्र नीट लक्षांत ठेवावें कीं, या ज्ञानी लोकांस विधिनिषेधाच्या कह्यांत ओढण्याचा रहस्यकारांनीं जो यत्न केला आहे, तो मात्र भ्रममूलक आहे. सौवीर देशाच्या राजानें मदोन्मत्तपणें त्या बिचाऱ्या ज्ञानी जडभरतास आपली पालखी वाहून नेण्यास लाविलें व त्याचा तो पुष्ट देह पाहून त्यास वरचेवर लवकर पाय उचलण्यास तो अधिकारयुक्त वाणीनें आज्ञा करीत सुटला; त्याप्रमाणेंच आमच्या रहस्यकारांनीं आपल्या ज्ञानलवदुर्विदग्धतेनें ज्ञानीजनास आपली कर्मयोगरूपी पालखी उचलण्यास जबरदस्तीनें लाविलें आहे. सौवीर राजानें ज्याप्रमाणें जडभरतास संबोधून म्हटलें " किं श्रान्तः स्वल्पमध्वान त्वयोढा शिबिका मम । किमायाससहो न त्व पीवानसि निरीक्ष्यसे ॥ " (अरे तूं माझी पालखी थोड्याच अंतरावर वाहिलीस असें असून तूं थकलास वाटतें. दिसतोस तर लठ्ठ; परंतु हे श्रम तला सहन करतां यत

नाहींत वाटतें !) तद्वतच रहस्यकारांनीं आमच्या निवृत्तिमार्गी संन्याशांस विचारलें आहे " अहो तुम्ही चांगले धष्टपुष्ट दिसतां. खातां जेवतां. मग असें "गेंड्या" सारखें वनांत कां काळ काढतां ! चला या गाड्यास तुम्हांस जुंपून टाकतों. पाय उचलण्यास कसूर केलीत तर तुम्हांस चाबकाचे रट्टे बसतील समजलात ! समाजानें तुमचें आजपर्यंत रक्षण केलें आहे. त्या समाजास रक्षण करण्याची जबाबदारी तुम्हांवर असतां ती अशा तऱ्हेनें टाळणें चांगलें नव्हे. तुम्हांस मुक्ति मिळाली आहे; परंतु अशा निवृत्तिमार्गानें तुम्ही गेल्यास ती तुमची मुक्ति काढून घेण्यांत येईल. भगवंतांनीं सांगितलें आहे कीं, ' पहा, मीं सुद्धां कर्मत्याग केला नाहीं. अर्जुनाचें सारथ्य करीत बसलों आहें. ' " आत्मज्ञानी मनुष्य झाला म्हणजे त्यास कर्म रहात नाहीं ही गोष्ट खरी; परंतु लोकसंग्रह करण्याचें कर्तव्य त्यास सुटत नाहीं. तस्मात् उठा आणि या गाड्यास मुकाट्यानें मान द्या." धन्य ह्या रहस्यकारांच्या अलोट वेदान्तज्ञानाची ! ! विचारे अशा प्रकारचे जडभरतासारखे लोक रहस्यकारांच्या कालांत राहिले नाहींत हें एक त्यांचें सुदैवच समजावयाचें ! नाहींतर त्यांना वेठीस धरून त्यांचेकडून काम करून घेण्याबद्दल कायदा सुद्धां रहस्यकारांनीं सरकारापाशीं मागितला असता ! या निवृत्तिमार्गी लोकांबद्दल लोकमान्यांना एवढी चीड आहे कीं, त्यांचा नामनिर्देश करतांना त्यांनीं आपल्या मनाची अत्यंत असमता केलेली आहे. आमच्या मराठींत म्हण आहे " विधवेस (येथें प्रचारांत ' मुण्डिता ' या शब्दाचा पर्याय शब्द योजित असतात) कुंकवाची उठाठेव कशास पाहिजे ! " याही अश्लील म्हणीचा अंशतः लो० बळवंतरावांनीं उपयोग केला आहे. " " गार्हस्थ धर्मांतील कर्माकर्मविवेचनरूपी कुंकवाच्या जास्त उठाठेवींत संन्यासमार्गांतील पंडित कधींही पडत नाहींत. " हें वाक्य वाचून " xxxस कुंकवाची उठाठेव कशास पाहिजे ! " या म्हणीची कोणास आठवण होणार नाहीं ! हें वाक्य वाचून कोणता धर्माभिमानी पुरुष खिन्न झाल्याशिवाय राहील ! बळवंतरावजी, आपलें आतां या मोहरूपी जगाच्या रंगभूमीवरील जवळजवळ शेवटचें कार्य चाललेलें आहे. आपली प्रचंड केसरीची गर्जना ऐकून आजपर्यंत कित्येकांना अभिमानपूर्वक कौतुक वाटलें असेल, परंतु आपल्या या " कृतान्तकटकामलध्वज जरा दिसों लागली । पुरःसर गदांसवें झगडतां तनू भागली ॥ " अशासारख्या वृद्धावस्थेंतील ही आपली कर्णकटु, बेसूर व कंपित कंठाची गर्जना ऐकून त्यांपैकीं पुष्कळशा विचारशील लोकांच्या मनांत आपल्याविषयीं अनुकंपा व तिरस्कार वाटूं लागल्यास आपणास खेद वाटण्याचें कारण नाहीं. आपण आजपर्यंत मोठमोठ्या विद्वानांचीं व्यंगें निर्भीडपणानें चव्हाट्यावर मांडण्यांत व सरकारी अधिकाऱ्यांच्या कृत्यांवर आपल्या खरमरीत वाणीनें टीका करण्यांत जें मनोधैर्य दाखवून अनेक मर्मभेद वाणी आवडणाऱ्या लोकांस आपले दास करून सोडलेत त्यांपैकीं बरेचसे लोक या ज्ञानीजनसत्रास आपण

आरंभ केल्याबरोबर कचरले असतील. आपल्या मर्मभेदक वाणीचा आजपर्यंत जो आपण व्यावहारिकांवर उपयोग केलांत तोच आपण आतां त्या बिचाऱ्या ज्ञानी लोकांवर करूं लागलांत. आपणांस, आह्मां सर्वांपूर्वी पाश्चात्यविद्येचा संस्कार झाला आहे. पाश्चात्य इतिहासांतील भव्य विभूतींचीं चरित्रें आपले मनांत पूर्ण ठसलीं जाऊन व आपली बुद्धि व यत्न अगाध असल्यामुळें देशभक्तीचें नवें रोपडें आपण या देशांत लावण्यास सुरुवात केल्यामुळें लोक आपले ऋणी झाले आहेत ही गोष्ट आपण विसरूं नका. आपल्या लोकप्रियतेचें मुख्य वर्म यांतच आहे हें विसरून त्या लोकप्रियतेच्या भरांत आपण आमच्या अत्यंत पूज्य व वंदनीय विभूतींना असे वाक्प्रहार करूं लागलांत तर आपली अत्यंत कष्टानें मिळविलेली लोकप्रियता लयास जाईल; आपल्या बुद्धिचापल्यानें जरी आपण आतां वारंवार म्हटलें कीं, संन्यासमार्गी आम्हांस वंदनीय आहेत तरी या सरस्वतीच्या हावभावानें कोणी फसणार नाहीं. "गेंडे," "तृतीयप्रकृति" "कुंकवाच्या उठाठेवा" इत्यादि पदांची योजना ही वंदनपर अगर स्तुतिमय आहे असें म्हणत असाल तर त्यावर कोणाचा विश्वास बसेल! आम्ही तर ह्या प्रयत्नास एकप्रकारचें चळ असें समजतों व त्याचा दोष आपल्याकडे नसून तो त्या कृतान्तकटकांतील सैनिक वार्धक्य याचेकडे आहे. असो. बळवंतरावजी, आपण असें पहा कीं, संसार एकदां मिथ्या ठरला म्हणजे मग त्या मिथ्यारूप प्रपंचास पुन्हां मिठी मारण्यास आपण उपदेश कसा करतां! कोठला लोकसंग्रह, कोठला श्रीकृष्ण, कोठला अर्जुन, कोठली भगवद्गीता, कोठले आपण, कोठली आपली कर्मयोगमीमांसा! "ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी" अशा अवस्थेंत ह्या वर निर्दिष्ट केलेल्या वस्तूंचा पसारा लहान पोरींच्या भातुकलांच्या खेळांतील पसाऱ्याप्रमाणें खोटा ठरल्यावर कोणाचा उपदेश व कोणाचा उपदेष्टा व कोणता उपदिष्ट! बळवंतरावजी, काय मांडलें आहेत हें? अनंतकोटि ब्रह्माण्डनायकाच्या हृदयाचा ठाव मिळाल्यानंतर त्रिभुवनसुद्धां ज्यास "थोकडें" झालें, त्यास आपली आज्ञा कोठून लागू होणार! रोजच्यारोज सहस्रकर आपल्या किरणांनीं जगाचें धारणपोषण प्रारब्धकर्मानुसार करीत आहे म्हणून त्यास आपण "असेंच रोज उगवत रहा व मावळत रहा, असेंच जगाचें पोषण तुला केलें पाहिजे" अशा तऱ्हेचा हुकूम करीत सुटलां आहां याला काय म्हणावें? लहान मुलें एकमेकांशीं वाद करीत असतांना चेष्टेनें म्हणत असतात, "ही पहा आगगाडी माझे हुकमानें चालू झाली." थांबूं लागल्यास "अगे थांब" असें म्हणून "पहा थांबली" अशी स्वतःची पोकळ शेखी मिरवितांना दिसतात त्यापैकींच हा प्रकार आहे. ज्ञानी मनुष्य स्वैर वर्तन करीत असतांना रहस्यकारांनीं त्यांना फर्मावावें, "हां. खबरदार कर्में सोडाल तर! भगवानाची तुम्हांस कर्में करण्याबद्दल आज्ञा आहे." अशांतील प्रकार झालेला आहे. ज्या स्थितींत चतुर्भुज शंखचक्र-

गदाधारी श्रीकृष्णसुद्धां मायास्वरूपी होऊन जातो त्या स्थितींत त्याच्या अनुज्ञेची सुद्धां सिद्धास पर्वा रहात नाहीं हें रहस्य रहस्यकारांना मुळींच समजलें नाहीं; त्याचा हा परिणाम होय. साधुसंतांचा जसा परिचय व्हावयास पाहिजे होता तसा रहस्यकारांना झालेला नसल्यामुळें ही मोठी उणीव त्यांचे ज्ञानांत राहून गेली. अप्रसिद्ध परंतु निःसंशय अपरोक्ष साक्षात्कार झालेले श्रीनिरंजनमहाराज यांनीं "आत्मप्रतीति" व "साक्षात्कार" असे दोन महाप्रासादिक ग्रंथ केलेले आहेत. त्यांच्या छापील प्रती कोठें उपलब्ध नाहींत. परंतु त्यांची सत्यवाणी व प्रतिभा अवर्णनीय आहेत. त्यांना "आत्मप्रतीति" नाशिक मुक्कामीं एका महान् योग्याच्या प्रसादानें झाल्यानंतर प्रारब्धवशात् "सगुण साक्षात्कार" आपणांस झाला पाहिजे अशी जबर इच्छा त्यांना झाली. याचें कारण आत्मप्रतीति होण्यापूर्वी साधकदशेंत ते बाचादत्त झाले होते. पुढें या सिद्धदशेंतच त्यांनीं सगुणसाक्षात्काराबद्दल अनुष्ठान करून तेंही गुरुप्रसादानें प्राप्त करून घेतलें. त्या सगुणभेटींत स्वतः भगवानांनीं त्यांना सांगितलें आहे:-

"क्षणैक होतो मी सगुण। परी अक्षयीपणें निर्गुण॥
माझें सत्यस्वरूप जाण। निराकार सर्वही॥
सगुणरूपाचा विचार। अवघा मायिक हा प्रकार॥
वोडंबरी हे साचार। ज्ञानियासि समजली॥
अरे तुजमज नाहीं भेद। स्वरूपीं पाहरे निर्द्वंद्व॥
सोडोनिया द्वैतभेद। देवमानवीपणाचा॥

साक्षात्कार, अध्या० ६ वा.

या साक्षात्कार ग्रंथांत प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या मुखानें सांगतो कीं, "बाबा, हा सगुण साक्षात्काराचा अट्टहास करण्याचें तुला कारण नव्हतें. कारण तुला निर्गुणरूपाचें ज्ञान झालें असल्यानें ह्या मिथ्यास्वरूपाची तुला अपेक्षा नको होती." हा व आणखी एक दोन अप्रसिद्ध ग्रंथ आमचेपाशीं हस्तलिपींत आहेत. या व अशासारख्या अनेक साधुपुरुषांचे अनुभव धडधडीत याचसारखे कंठरवानें सांगत असतां रहस्यकार आडरानांत कां शिरत आहेत हें सांगणें कठीण आहे.

श्रीरंगनाथ स्वामी म्हणतात कीं, वसिष्ठांनीं बोध केल्यावरोबर श्रीरामाची स्थिति कशी झाली म्हणाल तरः—

ऐसे निरूपिता वसिष्ठमुनि। तव श्रीरामब्रह्मपणीं॥
सर्वत्र पाहे ज्ञानी नयनीं। न देखे जनीं दुजें कांहीं॥
तेणें सुखें सुखावोनि। तटस्थ राहिला कोंदोनि॥
आन न देखे जनींवनीं। ब्रह्मांड भरोनि पूर्णानंदू॥
न देखे शरीर इंद्रियादिक। न देखे मन बुद्ध्यादि आणिक॥

अहंकार प्रमाता एकानेक । न देखे लोक आपणेंवीण ॥
न देखे सकलविश्वरचना । धरा पर्वत गिरि द्रोणि नाना ।
आकाशादि भूतें नयना । न देखे मनापासूनिया ॥
आत्मस्वरूपाव्यतिरिक्त । न देखे कांहीं पदार्थजात ।
ब्रह्मानंदें उचंबळत । राहे तटस्थ निर्विकल्पें ॥

अशा स्थितींत कर्मांची वार्ता कोठून राहील याचा रहस्यकारानींच विचार करावा. म्हणूनच या प्रकरणाचे आरंभीं जो श्लोक दिला आहे त्याचें तात्पर्य असें आहे कीं, ज्ञानोत्तर काळीं जो 'कर्म' विहित आहे असें मानतो त्याला वेदान्त समजला नाहीं. ज्या ब्रह्मानुभवस्थितींत भूत-दया, अनुकंपा इत्यादि गुण सुद्धां विकारच मानले जातात त्या स्थितींची नुसती कल्पना देखील रहस्यकारांना नाहीं हें आम्हांस मोठ्या कष्टानें म्हणावें लागत आहे त्यास आमचा निरुपाय आहे. जेथें विश्वाची वार्ता मावळली तेथें देशाची अगर व्यक्तीची वार्ता कोठून येणार ! रहस्यकारांची कोती कल्पना कूपमंडूक-न्यायाची असल्यामुळें त्यांना व त्यांच्यासारख्या देशभक्तांना ही रुचणार नाहीं; परंतु ही प्रखर व जालिम मात्रा देशभक्ताकरितां नसून ती देवभक्ताकरितां अथवा खऱ्या मुमुक्षूकरितां आहे हें विसरतां कामा नये. व्यावहारिक दशेंत ही देशभक्ति, भूतदया वगैरे सर्व खरे आहेत हें पुन्हां एकवार निक्षून सांगणें भाग आहे. नाहींतर भलताच आशय आमचे पदरीं बांधण्यांत येईल. विषय सुरू आहे ज्ञानी लोकांचा-ज्ञानी म्हणजे आधिभौतिक शास्त्रज्ञानी नव्हे, ब्रह्मज्ञानी, अपरोक्ष ज्ञानी असा अर्थ घ्यावयाचा आहे, हें विसरतां कामा नये. या ज्ञानी लोकांच्या कर्मबद्दलचा मुद्दा निर्णयाकरितां पुढें ठेविला असतां जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्था गैर लागू (Irrelevant) होतात. केवळ तुर्यावस्था या निर्णयाचे कामीं लागू पडते. असो. या अवस्थेंत सर्व शास्त्रें लटकीं असल्यामुळें रहस्यकारांचे हुकूम तेथें अगदीं अनवसर होतात इतकेंच नव्हे तर आगंतुक होतात. आतां हे ज्ञानी लोक व्यावहारिक दशेंत आल्यावर टिळकाचार्यांचे तावडींत सांपडतील म्हणावें तर तेंही संभवत नाहीं. कारण त्यांना विधिनिषेधरूपी चक्रांत सांपडून कांहीं मिळवावयाचें राहिलेलें नसतें. प्रारब्धवशात् स्वेच्छेनें जर ते समाजांत शास्त्रानुरूप वागत असतील तर जगाचें सुदैवच म्हणावयाचें. कारण त्यांच्या शास्त्रसिद्ध वर्तनाचा लाभ सहजगत्या जगास झाला असें म्हटलें पाहिजे. परंतु जर ते विधिनिषेधास न जुमानतां हवे तसे वागूं लागले तरी पण त्यांची कांहीं एक हानि होत नाहीं. कायद्यांत ज्याप्रमाणें आज्ञेच्या पाठीमागें शिक्षा असल्याशिवाय त्या आज्ञेस कोणी जुमानणार नाहीं तसेंच विधिनिषेधांच्या पाठीमागें इहपर बरीं वाईट फलें लाविलेलीं असतात. अमुक कर्म केलें असतां पुण्य अगर पाप लागतें, अगर

न केल्यास पातक लागतें, अगर चित्तशुद्धि होते, वगैरे फलें कर्माचे पाठीं आहेत. परंतु ज्ञान्यास यापैकीं कशाचीच पर्वा नसल्यामुळें त्यास अर्थात् कर्मांचीही जरूरी नाहीं. त्यास स्वर्गाची चाड नसल्यामुळें त्यांना यज्ञयागादि कर्में करण्याची अवश्यकता नाहीं त्यांना लोकेषणा, वित्तेषणा व पुत्रेषणा नसल्यामुळें व्यावहारिक कर्मांनींही ते बांधलेले नाहींत. दुष्ट कर्में केलीं नसल्यामुळें प्रायश्चित्तकर्मेंही त्यांचे ठिकाणीं निरर्थक होत. नित्यादि कर्में चित्तशुद्धिकारक होत परंतु त्यांच्या चित्ताची शुद्धि झालेली असल्यामुळें त्याही कर्माची त्यांना गरज रहात नाहीं. म्हणूनच जनकाच्या प्रश्नास उत्तर देतांना श्रीदत्तात्रेयमहाराजांनीं उत्तर दिलें आहेः—

हृदाकाशे चिदादित्यो वर्तते च निरंतरम् ।
नास्तमेति न चोदेति कथं संध्यामुपास्महे ॥
मृता मातामही माया जातो विज्ञान-बालकः ।
सूतके मृतके चैव कथं संध्यामुपास्महे ॥

(हृदयाकाशांत चित्सूर्य सदैव तळपत असल्यामुळें त्याचा उदय व अस्त हीं दोन्हीही संभवत नाहींत. तसेंच आमची आजीबाई माया ही मेली आहे व विज्ञान नांवाचें बालक जन्मास आलें आहे, तेव्हां मृतक व जातक या दोन्ही अवस्थेंत संध्या करतां येत नाहीं.)

रहस्यकारांनीं या अवस्थेस आपलें कर्मांचें जूं लावतांना तारतम्य विचारास अगदीं धाब्यावर बसविलें आहे. आम्ही त्यांना विचारतों कीं, ही रहस्यकारांची आज्ञा जर ज्ञानी लोकांनीं ऐकिली नाहीं तर त्याबद्दल त्यांना रहस्यकार काय शिक्षा फर्माविणार आहेत ? अगर या आज्ञाभंगाबद्दल त्यांचें पारिपत्य कशा तऱ्हेनें करणार आहेत ? त्यांचें झालेलें ज्ञान त्यांचेकडून हिसकावून तर घेणार नाहींत ना ? कोणास ठाऊक हा नवा अधिकार रहस्यकारांना मिळाला असल्यास ! ! बरें ते विधिनिषेध पाळीत नसले म्हणून शास्त्र तरी त्यांचें काय करूं शकेल ? गवताच्या काड्यांनीं अग्नीस बांधूं पाहणाऱ्या इसमाप्रमाणें या ठिकाणीं रहस्यकारांची स्थिति झाली असतां ती त्यांच्या अद्याप लक्षांत येत नाहीं तेव्हां त्यांची स्थूलबुद्धि अगर देहात्मवादबुद्धि त्यांचे ठिकाणीं जबर असून शाब्दपाण्डित्यानें त्यांचे मनावर वेदान्ताचा सूक्ष्म संस्कार झालेला नाहीं हें इतकें उघड आहे कीं, त्याबद्दल जास्त विचार करणें नलगे. आतां मोठमोठे ज्ञानी लोक ज्ञानोत्तर कर्में करीत आलेले आहेत हें खरें; परंतु ते तसें करीत आले ही आमच्यावर मोठी मेहेरबानी झाली आहे. कारण त्यांना तसें करणें भाग नसून केवल प्रारब्धवशात् त्यांचे हातून तसें वर्तन घडलें हें त्यांच्या कर्मांतील रहस्य आहे. देहपातानंतर अगर देहपातापर्यंत ज्ञानी लोकांच्या हातून कर्म केव्हां केव्हां घडतें, परंतु

तें केवळ ईश्वराच्या संकल्पानें अगर त्यांच्या प्रारब्धकर्माचा शेवट होईपर्यंत घडत असतें; त्यास विधि अगर निषेध हे कारण असत नाहींत.

अद्वैते स्थैर्यमायाते चित्ते च प्रशमं गते ।
योगिनः कर्म कुर्वन्ति पश्यंति स्वप्नवज्जगत् ॥

अशा तऱ्हेचें कर्म योग्याचे हातून होतें म्हणजे त्याला केलेंच पाहिजे असें मात्र म्हणावयाचें नाहीं. कारण अशा तऱ्हेचा कायदा करणारा व त्यांच्यावर हुकमत चालविणारा कोणी नाहीं.

योगवासिष्ठांत एकंदर ज्ञानाच्या सात भूमिका सांगितल्या आहेत. त्यांतल्या पहिल्या तीन म्हणजे शुभेच्छा, विचारणा, व तनुमानसा ह्या साधक दर्शेतील असून प्रत्यक्ष ज्ञानदर्शेतील नव्हत. या तिन्ही अवस्थांत रहस्यकारांचें कर्मयोग-शास्त्र संभवतें परंतु चवथ्या भूमिकेपासून म्हणजे सत्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी व तुर्यगा ह्या चारही भूमिकांस हें शास्त्र मुळींच लागू पडत नाहीं. हें त्या त्या भूमिकेचें सविस्तर वर्णन योगवासिष्ठांत पाहिल्यास सहजीं लक्षांत येईल.

आतां या प्रकरणाचे शेवटीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं, रहस्यकारांना गीतेचें रहस्य तेवढें सांपडलें नाहीं हें जें आम्ही वारंवार म्हणतों त्याचा आणखी एक पुरावा दाखविण्याचा आहे. ज्ञानोत्तर कर्म विहित आहे हें दर्शविण्याकरितां त्यानीं पाश्चात्य पंडितांच्या वचनाचा आधार देऊन आपलें पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञानाचें मोठेंच प्रदर्शन केलें आहे. पाश्चात्यांना ह्या सम्यग्ज्ञानदर्शेचा गंधही नाहीं हें स्वतंत्र प्रकरणांत आम्ही दाखविणारच आहों; परंतु या ठिकाणीं एवढेंच सांगावयाचें कीं, या पंडितांच्या वचनांचा आधार घेणाऱ्या पंडितास पौर्वात्य ज्ञानदर्शेचा गंधही नाहीं म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. रहस्यकारमहाराज, या आधारांनीं मात्र आपण आपल्या दीर्घज्ञानाचा अगदीं कळस करून सोडलात ! काम्य-प्रायश्चित्तादि कर्मावद्दल शास्त्रार्थ आपण कान्त-हेगेलादिकांस विचारूं लागलां अगर ज्ञानदर्शेनंतर कर्में करणें अगर न करणें याबद्दलचा शास्त्रार्थ जर आपण स्पेन्सर साहेबास विचारूं लागलां तर साच्छिष्यास गुरुप्रसादानें होणाऱ्या व ज्याची कल्पनाही पाश्चात्य तत्वविदांस नाहीं अशा अपरोक्ष ज्ञानाची आपणास काडीइतकी सुद्धां कल्पना झालेली नाहीं हें आम्ही निश्चयानें सांगतों. एरव्हीं आपण या पवित्र, असाधारण, अत्युच्च, केवल अधिकारिगम्य, केवल अनुभवगत व केवल आगमोक्त अशा ज्ञानदर्शेबद्दल आधार देण्यास त्या तर्कट, पोकळ शाब्द, अनुभवशून्य व अनुमानमात्र पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांकडे खास गेला नसतां. असो. आपले चेले अगर भक्त इतकें असूनही आपणास आचार्य पदवी देत आहेत तेव्हां आपलें भाग्यच म्हणावयाचें.

११ कर्मविपाकयोग.



सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥

भ. गी. अ० ३ श्लो० ३३.

(विद्वान मनुष्य असला तरी तो आपल्या प्रकृतिप्रमाणें चेष्टा करीत असतो, सर्व प्राणि प्रकृतीसच अनुसरून वागतात. निग्रह व्यर्थ आहे)

वेदान्तशास्त्रांत तीन प्रकारच्या सत्ता मानिलेल्या आहेत. व्यावहारिक सत्ता, प्रातिभासिक सत्ता व पारमार्थिक सत्ता. इंद्रियादिकांनीं गोचर होणारी सत्ता ती व्यावहारिक सत्ता होय. उदाहरणार्थ "झाड आहे" हें जें आम्ही व्यवहारांत म्हणतों व हें सत्यवचन आहे असें म्हणतों, तें प्रत्यक्ष प्रमाणांनीं ग्रहण करून म्हणत असतों. शिंपीच्या ठिकाणीं रजताचा (रुप्याचा) भास होतो व अमुक ठिकाणीं रजत म्हणजे रुपें आहे असें म्हणतों तें ज्ञान प्रातिभासिक होय. हें ज्ञान अथवा सत्ता व्यावहारिक प्रमाणांनीं मिथ्या आहे असें आपण ठरवितों. म्हणजे व्यावहारिक प्रमाणानें त्या सत्तेचें मिथ्यात्व ठरवीपर्यंत तें ज्ञान सत्यच असतें. दोरी अंधुक उजेडांत पडली असतां तिच्या ठिकाणीं सर्पाचा भास केव्हां केव्हां होत असतो हा सार्वत्रिक अनुभव आहे. व या भासात्मक सर्पानें भ्रान्ताचे ठिकाणीं भयकंपादि विकार उत्पन्न होत असतात, परंतु दिवा पुढें धरून दोरीकडे नीट न्याहाळून पाहूं लागल्यास त्या ठिकाणीं दोरी असून सर्प नाहीं हें ज्ञान होतें म्हणजे प्रातिभासिक सत्ता व्यावहारिक प्रमाणांनीं बाधित होते. वास्तविक व्यवहारदृष्ट्या त्या ठिकाणीं सर्प त्रिकालीं नाहींच; परंतु दोरीवरच सर्पाचा अध्यास होऊन त्या अध्यासास तात्पुरतें सत्यत्वही येत असतें. ही भ्रान्ति असेपर्यंत ती भ्रान्ति असल्याची कल्पना मनांत येत नाहीं. सम्यग्ज्ञान झाल्यावरच तिचा लय होतो. तें होईपर्यंत त्या मिथ्या सर्पापासून भयादि विकार अगर तन्नाशसाधनप्राप्ति व्यक्तिस्वभावानुरूप मनुष्य करीत असतो. तीच भ्रान्ति नष्ट झाल्यावर मग कोणी त्या मिथ्या सर्पास मारण्याचा यत्न करण्यांत कालक्षेप करीत नाहीं. तसें कोणी करूं लागल्यास तो मूर्खकोटींत गणला जाईल. याचप्रमाणें व्यावहारिक सत्ता ही व्यवहारदृशेंत जरी सत्य असली तथापि तीही अध्यासात्मक असल्यामुळें तिचाही पारमार्थिक ज्ञानानें बोध होत असतो. ही पारमार्थिक सत्ता मात्र सर्वांना प्रतीत होत नसते. ती अत्यल्प संख्याक अशा अधिकारी लोकांसच

प्राप्त होते. त्या सत्तेंतील सम्यक्प्रमाणांनीं ज्ञानी हा व्यवहारांतील भ्रान्तीचा निरास करीत असतो. ही पारमार्थिक सत्ता म्हणजे आत्मसत्ता होय. ह्या सत्तेंत नानाविधता नाहीं. प्रमाण-प्रमेय व्यवहार नाहीं. एकच एक बोधरूप चिद्वनवस्तु सदैव स्फुरत असते. या दशेंत व्यावहारिक सत्ता मिथ्या ठरल्यामुळें पुन्हां ही व्यावहारिक दशा जरी समाधिव्यतिरिक्त कालांत प्रतीत झाली तथापि परमार्थतः ही सत्ता खोटी आहे असें सम्यग्ज्ञान झाल्यामुळें त्या प्रतीतीपासून ज्ञान्यांस बाधा होत नाहीं. वेद, शास्त्रें, कायदे, समाजव्यवस्था, नीतिनियम, स्वदेशसेवा इत्यादि सर्व व्यावहारिक सत्तेंतील विषय होत. हें विधान देशभक्तांस रुचणार नाहीं, परंतु सत्य व रुचि ह्या दोहींत मेळ न पडल्यास आमचा निरुपाय आहे. तात्विक विषयांत मनधरणी करूं गेल्यास तत्वहानि होण्याचा संभव असतो. विधिनिषेध, प्राप्तकर्में, सांसारिक कर्में, समाजाच्या धारणपोषणाचीं कामें इत्यादि रहस्यकारांचीं सर्व नीतिसूत्रें व्यावहारिक सत्तेंतील होत. पारमार्थिक सत्तेंत यांना थारा नाहीं. या तिन्ही सत्ता परस्पर भिन्न असून त्यांचें सामानाधिकरण्य संभवतच नाहीं. व्यावहारिक दशेंत म्हणजे ज्ञानापूर्वी अगर पारमार्थिकसत्तेच्या ज्ञानापूर्वी व्यवहार खोटा म्हणणें धाष्ट्यांचें होईल. अगर शास्त्र, नीति, देशभक्ति यांचा त्याग करणें महदपराध होईल, तद्वतच परमार्थज्ञानानंतर व्यवहारास कवटाळणें वेडगळपणाचें होईल, हें समजण्यास फार विद्वत्ता नको आहे. या तिन्ही सत्तांपैकीं कोणतीही एक सत्ताच एकाकाळीं खरी असणार. दोन्ही असणार नाहींत. आमच्यांतील व्यावहारिक विद्वानांना आमचा वेदान्त व्यवहारास उपयुक्त करण्याची हांव लागल्यामुळें वेदान्तांतील शमदमादि साधनांच्या उपयोगावरच समाधान न होतां त्यांतील अद्वैत तत्वांस सुद्धां व्यवहारदशेंत आणण्यांत शेखी मिरवूं लागण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. वेदान्ताचा व्यवहारास जेवढा उपयोग अबाधित होत असेल तेवढा खुशाल ते करोत. परंतु त्या व्यवहाराचे पायीं वेदान्तासही व्यवहाराचा पेहराव सर्वांशीं चढविणें म्हणजे वेदान्ताचा विपर्यास करणें होय. वेदान्तशास्त्र हें बहुजनाकरितां केलेलें शास्त्र नव्हे हें अगदीं विसरतां कामा नये. विशिष्ट अधिकारी जनाकरितां तें शास्त्र आहे. विरक्त व मुमुक्षु लोकांकरितां केलेलें शास्त्र पूर्ण व्यवहारांत व स्थूलदृष्टि जनाकरितां उपयोगांत आणल्यास तें अप्रयोजक होईल हें उघड आहे. उपनिषदें अथवा आरण्यकें म्हणजे जीं केवल अरण्यांत म्हणावयाचीं असत त्यांचें तर नांवच नको. परंतु भगवद्गीतेसारखी स्मृतीसुद्धां ह्या त्या धर्मनष्टाकरितां रचलेली नाहीः-

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥

अ० १८ श्लोक० ६७.

" हें शास्त्र (गुह्य) तपोहीन, भक्तिहीन, गुरुसेवाहीन (येथें रहस्यकारांनीं ऐकण्याचीं इच्छा नाहीं असा अर्थ केला आहे तो चुकीचा आहे) व मद्द्वेषी अशा

लोकांस सांगू नको." असा भगवंतानीं निषेध केलेला आहे. उपनिषदांतून तर या वेदान्त "व्यापारस्थातंच्या" वर फार कटाक्ष आहे. ही वेदान्तविद्या म्हणजे फार प्रखर मात्रा आहे. भवरोगाची बाधा खरी झाल्याशिवाय तिचा उपयोग न होतां उलट अपकार मात्र होण्याचा संभव आहे. प्रपंचोपरम म्हणजे ब्रह्मज्ञानोदयाची वेळ. प्रपंचाचें मरणें हें परमार्थाचें जगणें होय. प्राकृतिक प्रपंचांत पूर्ण आसक्ति ठेवून त्याची सदैव अभिवृद्धि करूं पाहणाऱ्याकरितां हें शास्त्र नव्हे हें पुनः पुनः सांगणें भाग आहे. ह्या शास्त्राचे अभ्यासानें अशा लोकांवर भलताच परिणाम होत असतो. वर्णाश्रम, वयावस्था, ज्ञानावस्था, अधिकारभेद, सांपत्तिकभेद, नैतिकभेद, अशातऱ्हेचे हजारों भेद या व्यवहारांत अनेक कारणांनीं उत्पन्न झालेले आहेत. ते ते भेद व्यवहारांत पाळल्याशिवाय समाजधारणा सुरळीत चालणार नाहीं. परंतु या अनधिकारी ब्रह्मज्ञानी लोकांस भेदाभेद पाळणें गैर वाटूं लागतें. "त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन" अशासारखी त्रिगुणातीत स्थिति मनोविकारांत नव्हे तर आचारांत आणावी अशी इच्छा त्यांना होऊं लागते. देव, ब्राह्मण, श्रुति, स्मृति, शास्त्रें हीं मायोपाधींतीलच कार्यें होत, हा परम सिद्धान्त वाचून ही मंडळी त्या सर्वांचे ठिकाणीं अनादर करूं लागतात व इहपर कल्याणास आंचवतात. ह्या वेदान्तविद्येचा असा दुरुपयोग होईल म्हणूनच ठिकठिकाणीं या विद्येला अत्यंत गूढ ठेवण्यांत आलेलें होतें. आतां पाहावें तों ही विद्या चोहोंकडे इतकी बोकळली आहे कीं, वय, वर्ण, विद्या, वैराग्य, विवेक इत्यादि गोष्टींची अवश्यकता न पाहातां सर्वांना या विद्येचा सारखाच लाभ होऊं लागला आहे. परंतु ईश्वरानें गुरुकिल्ली आपल्याकडे ठेविली आहे हें भाग्यच म्हणावयाचें. नाहींतर महावाक्यें आतां सर्वांनाच ठाऊक झालीं आहेत, त्यामुळें सर्वच उद्धरून गेले असते व ईश्वराचें ईशित्वही गेलें असतें. असो, ही विद्या नुसता चावटपणा करण्यापुरतीच अशा तऱ्हेनें प्राप्त होते, नव्हून तिचा परमार्थदृष्ट्या उपयोग तितपतच. अपरोक्ष ज्ञान होऊन मोक्ष मिळण्यास "शाब्दे परे च निष्णाते" अशा सद्गुरुचरणाचा आश्रय केल्याविना या विद्येंतील खरें इंगित अवगत होत नाहीं हा ठाम सिद्धान्त आहे. असो.

व्यावहारिक सत्ता व्यवहारदृष्ट्या पूर्ण सत्य आहे हें विसरतां कामा नये. म्हणून प्रपंच सत्य, कर्तृत्व सत्य, देशकार्य व देशाभिमान सत्य, औद्योगिक, सामाजिक प्रगति सत्य, सारांश आधुनिक आधिभौतिक शास्त्रसिद्धान्त व तदनुसार येणारी पंचमहाभूतांवरील सत्ता सत्य मानणाऱ्या लोकांनीं अवश्य व्यवहारपालन करावें इतकेंच नव्हे, तर व्यवहारत्याग केल्यास त्यांना महत्पाप लागेल हा सिद्धान्त सत्य आहे हें अगदीं विसरतां कामा नये. व्यवहार व परमार्थ अशा दोन्ही दरडींवर दोन हात ठेवून शरीरयात्रा करूं म्हटल्यास तापत्रय हेंच फल शेवटीं पदरीं येणार. आतां हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, व्यवहार सत्य मानणारे लोक व व्यवहार पूर्ण मिथ्या मानणारे लोक (ब्रह्मज्ञानी) या दोन लोकांचे मध्यंतरीं मुमुक्षु लोकांचा

एक वर्ग आहे. ह्मणजे या लोकांना व्यवहाराची क्षणभंगुरता व त्यांतील सुखदुःखांची अनित्यता व औपाधिकता हीं हरहमेष दृष्टीस पडत असल्यामुळें व श्रवणमननादि साधनांनीं परमार्थ—सत्य खरें वाटूं लागल्यामुळें हे लोक व्यवहार व परमार्थ या दोहींच्या संधीवर आलेले असतात. या लोकांचा वर्ग अर्थातच फार लहान आहे. याच लोकांकरितां व्यवहार व परमार्थ यांची शास्त्रयुक्त सांगड घालावयाची आहे, इतरांकरितां नाहीं. निवृत्तिपर कर्मयोग या लोकांकरितांच आहे.

अर्थकामेष्वसक्तानां धर्म ज्ञानं निधीयत ।
धर्म जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ॥

मनु० अ० २, श्लो० १३.

अर्थः—अर्थ व काम यांत ज्यांची आसक्ति नाहीं अशा लोकांनाच धर्मशास्त्राचा उपदेश आहे. व धर्मजिज्ञासा ज्यांना आहे त्यांनीं श्रुति ही प्रमाण मानली पाहिजे.

या मनूच्या वचनाकडे आतां कोण लक्ष देतो आहे ! जो उठतो तो प्रपंच व परमार्थ यांची जबरदस्तीनें गांठ घालून टाकूं पाहात आहे. असो. तात्पर्य हें आहे कीं, ज्या त्या अवस्थेंत त्या त्या अवस्थेंतील व्यवहार पाळले पाहिजेत हा न्याय दुर्निवार आहे. नाहीं तर पाण्यांत आगगाडी व जमिनीवर आगबोट चालावयास लाविल्यासारखें मौर्ख्य पदरीं घेतल्यासारखें होईल.

व्यावहारिक सत्तेंतील सर्व सिद्धान्त तरी आपणास कोठें अवगत आहेत ? पंचेंद्रियांनीं भासणाऱ्या वस्तूपलीकडे ज्या वस्तु अस्तित्वांत आहेत, असें त्याच इंद्रियाच्या, यांत्रिक साह्याच्यानें वाढविलेल्या शक्तीस दिसून येतें त्या वस्तु तशा नाहींत असेंच आपण जगांतील व्यवहारांत धरून चालतों. उदाहरणार्थ, सूर्य उदय व अस्त पावत असतो, हें सर्वांच्या प्रत्यहीं प्रत्ययास येत असतें व हा प्रत्यय खरा मानून चालल्यास व्यवहारांस बाधही पण येत नाहीं. शरीराच्या त्वचेकडे सूक्ष्मदर्शक यंत्राच्या मदतीनें पाहिल्यास प्रत्यक्ष अप्सरेची त्वचा सुद्धां एखाद्या खडकाळ प्रदेशाप्रमाणें दिसूं लागली म्हणून व्यवहारांत सुंदर वनितेच्या त्वचेची अशी मीमांसा कोणी करीत नाहीं. आम्ही सर्वजण पृथ्वीला उलटें टांगून राहिलों आहों, हें जरी शास्त्रतः खरें आहे तथापि व्यवहारांत आपण तशी भावना कायम ठेवीत नाहीं. रंग ही वस्तु सत्य नाहीं हें जरी शास्त्रसिद्ध आहे तरी काळा, गोरा, पिंवळा हे रंग आहेत असा व्यवहार मोठमोठे शास्त्रवेत्तेसुद्धां करीत असतात. अशा तऱ्हेचीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. ज्या किंमतीचीं व कुवतीचीं इंद्रियें आपणांस प्राप्त झालीं आहेत त्या इंद्रियांस व तज्जन्य विकारांस ज्या भावना अनुकूल होत आल्या आहेत, त्यांचाच अवलंब आपण सर्वदा करीत असतों. तसें न केल्यास व्यवहारांत अत्यंत गोंधळ माजून राहील. या प्रकरणांत ज्या प्रारब्धवादाचा

विचार कर्तव्य आहे तो वाद मुद्दां अशाच प्रकारचा आहे. शास्त्रदृष्ट्या हा वाद निःसंशय खरा आहे, हें सिद्ध झालें आहे, परंतु व्यवहारशास्त्री या वादाचें सत्यत्व स्वीकारीत नाहींत. शास्त्रनियमांनीं हें सत्य अचुक गळ्यांत पडूं लागल्यास या लोकांना तें सहन होईनासें होतें. याचें कारणही तसेंच महत्वाचें आहे. प्रारब्धवाद खरा मानिल्यास पुरुषांचें स्वतंत्र कर्तृत्व राहात नाहीं, चांगल्या—वाईट गोष्टींतील भेद नाहींसा होतो, व नीतिशास्त्रें, कायदेकानू इत्यादि सर्व लुलां पडल्यासारखीं किंबहुना वृथा होऊं पाहातात, हें ह्या पंडितांना आवडत नाहीं. न आवडो बिचारें. सत्य असून आवडत नसल्यास फिकीर नाहीं.

ह्या प्रारब्धयोगास इतकी प्रस्तावना करणें अगदीं जरूर पडलें, कारण हा वाद-मुद्दा समजण्यास अवघड असून वेदान्तशास्त्रास तो अगदीं आधारभूत आहे. ह्या वादाचें सामान्य स्वरूप असें आहे कीं, या जगांत " प्रारब्ध खरें " कीं, " प्रयत्न खरा ! " या वादाची चर्चा अनादिकालापासून चालू आहे. कोणी म्हणतो " प्रारब्धच खरें, " कोणी म्हणतो " प्रयत्न खरा आहे. " कोणी म्हणतात " कांहीं अंशीं प्रारब्धही खरें, कांहीं अंशीं प्रयत्नही खरा आहे. " परंतु ही शेवटची निव्वळ तोडजोड आहे. प्रयत्न खरा म्हटल्यास प्रारब्ध खोटें पडतें व प्रारब्ध खरें म्हटल्यास प्रयत्न निष्फल होतो. तेव्हां दोन्हीही अंशतः खरीं आहेत अशी एखादी तोड काढली ह्मणजे हा वाद मिटणार आहे असें जाणून कांहीं लोक या वादाची वाट लावीत असतात. हा वाद इकडेच नव्हे तर युरोपांतही किंबहुना जगांत सर्व ठिकाणीं चालूच आहे. प्रारब्धवादास Fatalism किंवा Determinism असें म्हणतात व प्रयत्नवादास Free-will चा वाद ह्मणतात. ह्या दोन वाद्यांत मोठीं रणें झालेलीं आहेत. तथापि हा वाद आधुनिक आधिभौतिक शास्त्राचे सिद्धान्त-प्रकाशानें जरी पूर्ण शांत झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं तरी अद्याप बऱ्याच लोकांना तो पसंत नाहीं. वास्तविक पाहातां मनुष्यास अगर जीवास स्वातंत्र्य असें मुळींच नाहीं. प्रकृतीच्या अफाट घडामोडींत अंशभूत झालेला हा जीव अगदीं परतंत्र आहे हें शास्त्रीय रीत्या सहज सिद्ध करितां येतें. पहा, कर्तृत्वास लागणारी सामग्री अथवा साधनें यांचा आपण प्रथम विचार करूं. प्रथम बुद्धि, नंतर इच्छा, नंतर हस्तपादादि अवयव, नंतर आरोग्यादि अनुकूलता, सांपत्तिक स्थिति, देशकालादि परिस्थिति इत्यादि अनेक साधनांचा विचार केल्याशिवाय कर्तृत्वाचा विचार पूर्णपणें केल्यासारखें होणार नाहीं. या सर्व साधनांत शिरोभागीं असणारें साधन ह्मणजे बुद्धि होय. या प्रपंचव्यापारांतील मुख्य भांडवल ही बुद्धिच होय. इतर प्राण्यांपेक्षां हा मनुष्यांत असलेला विशेष गुण होय. ह्या भांडवलाचे जोरावरच मनुष्याच्या सर्व उड्या चाललेल्या आहेत. जगांत कर्तृत्व ह्मणून ज्यास नांव देण्यांत येतें तें शेंकडा नव्याण्णव हिश्शांनीं ह्या बुद्धीचेंच कार्य होय. व्यापाराचें धाडस असो, यांत्रिक कलेंतील प्रावीण्य असो, औद्योगिक साहस असो, सामा-

जिक धुरीणत्व असो, धार्मिक गुरुत्व असो, राजकीय नेतृत्व असो, समरांगणांतील सेनानायकत्व असो अथवा कोणत्याही विद्येंतील नैपुण्य असो या सर्व गुणांस बुद्धीची अत्यंत जरूर आहे. एखाद्या ठोंब्याचा हातून हीं कार्यें कदापि व्हावयाचीं नाहींत. बुद्धि या शब्दानें नैसर्गिक मेंदूची शक्ति अगर मानसिक शक्ति हा अर्थ घ्यावयाचा आहे हें विसरतां कामा नये. नुसत्या विश्वविद्यालयांतील परिक्षा पास होऊन पदवीधर झालेले लोकच तेवढे बुद्धिमान् असा अर्थ घ्यावयाचा नाहीं. परंतु ही बुद्धि सर्वांत एकसारखी असत नाहीं याबद्दल कोणी वाद करीत बसेल असें वाटत नाहीं. बरें, ती सर्वांत सारखी नसो, परंतु ती अमुक शक्तीची बुद्धि आपणांस मिळाली आहे, याबद्दल तरी मनुष्यांस घमेंड करण्यास कारण कोठें आहे ? ही बुद्धि मिळविण्यांत त्याचें स्वतःचें कर्तृत्व कितीसें होतें ? " ब्रह्मदेवाबरोबर भांडून मीं अमुक तऱ्हेची बुद्धि मिळविली आहे " अथवा " मला ही मिळविण्यास अमुक अमुक प्रयत्न करावे लागले. " अशी शेखी मिरवावयास तरी त्यांस कोठें अवसर आहे ! कोणीतरी व कशीतरी दिलेली ही बुद्धि घेऊन मनुष्य सर्व व्यापार करीत असतो, परंतु ह्या बुद्धीच्या संपत्तिप्रीत्यर्थ या मनुष्याचें यत्किंचितही कर्तृत्व नसतें हें मनुष्य जाणीत असून पदोपदीं विसरत असतो. तसेंच इच्छा-हस्तपादादि अवयव या साधनांच्या प्राप्त्यर्थ त्याचे यत्न कधींही दृष्ट नाहींत, असें असतां हीं साधनें त्याला सहज आयतीं मिळालेलीं असतात. ह्यांत जीं जीं व्यंगें जन्मतःच राहून जातात तीं तीं व्यंगें घेऊनच मनुष्य या संसाराच्या शर्यतीं पडलेला आहे. या शर्यतींत घुसलेल्या उमेदवारांची साधनसमता पाहूं गेल्यास तिचा पूर्ण अभाव असल्याचें सहजीं दिसून येईल. कोणास बुद्धि जास्त, कोणांस तिचा अंशतः अभाव, कोणाची शरीरप्रकृति सुदृढ व निरोगी तर कोणाची सूक्ष्म व रोग-ग्रस्त, कोणी जन्मतःच लक्ष्मीपुत्र तर कोणी जन्मादारभ्य कंगाल, अशा तऱ्हेचें अनेकविध वैषम्य या संसारांत दिसून येतें. या शर्यतीच्या आरंभास हें वैषम्य असल्यामुळें पुढें पुढें शिक्षण, अभ्यास, परिस्थिति यांनीं जरी थोडाबहुत या वैष, म्यांत फरक पडला तथापि हें वैषम्य अगदीं नाहींसें होत नाहीं. आतां कोणी म्हणेल कीं, हें वैषम्य या जन्मांतील नसून मागील जन्मीं केलेल्या कर्मांचें फल आहे तेव्हां ही साधनसामुग्री सुद्धां जीवरूपच आहे. परंतु त्यावर आमचें असें उत्तर आहें कीं, मागील जन्मींची बुद्धि सुद्धां त्याचें मागील कर्मांचें फल आहे. असें मागें जात जात अनादित्वाला मनुष्य पोंचतो व " न कर्माविभागादिति चेन्न अनादित्वात् " (ब्रह्मसूत्रें अ० २ पा. १ सू. ३५) या सिद्धान्ताचा आश्रय करावा लागतो. एतावता सुद्धां जीवाचें स्वतंत्र कोठें कर्तृत्व दाखवितां येत नाहीं. आधीं मुळीं मनुष्य जन्मास येतो तो स्वतःच्या इच्छेनें येत नाहीं (ही सर्व प्रक्रिया या दृष्ट जन्मापुरतीच समजावयाची आहे.)–पित्याचें रेत व मातेचें शोणित यांचा संयोग होऊन कांहीं काल एकपेशी, दोनपेशी, अशी गर्भाची वाढ होत होत पिंड जन्मास

आल्यानंतर त्या पिंडाच्या स्वतंत्र इच्छेस सुरुवात होते. अमुकच कुलांत, देशांत अगर कालांत मी जन्म घेईन ही वार्ताच मुळीं जन्म घेणाऱ्या मनुष्याचे ठिकाणीं रहात नाहीं. मनुष्यप्राण्याच्या उत्क्रांतीचा इतिहास ज्यांनीं चांगला पाहिला आहे त्यांना हें कळून चुकलें आहे कीं, पित्याचे रेतांतील सर्पाच्या आकाराचे जंतु (Sperm) मातेच्या शोणितांतील वर्तुलाकार (Ovum) बीजाशीं संयोग पावल्यानंतर भावी जीवाचें बीज (Stem-cell) तयार होत असतें. नुसत्या Sperm नेंही कार्य होत नाहीं. किंवा नुसत्या Ovum नेंही तें होत नाहीं. त्या दोहींचा संयोग होऊन एकीकरण झाल्याशिवाय गर्भधारणा संभवत नाहीं. पित्याचे रेतांतील असे सर्पाकार जंतु कितीतरी शोणितगत पेशीशीं मिलाफ झाल्याशिवाय फुकट मरून जात असतात. ओव्हम (Ovum) कडे धांव घेण्याची स्पर्म (Sperm)ची धडपड असते ती अगदीं अनिवार असते; परंतु ती भेट अशी एखाद्या भाग्यशाली पुंबीजालाच मिळत असते. स्त्रीबीजांत पुंबीजाचा प्रवेश झाल्याबरोबर त्या दोहींचा अगदीं एकजीव होऊन जातो व तो अगदीं स्वतंत्र असा एकपेशी पिंड बनून रहातो. हें सम्मेलन मातापित्यांचे करारान्वयें थोडेंच होत असतें. स्त्रीपुरुषांची मैथुनाकांक्षा ही सुद्धां त्यांचें स्वतंत्र कर्तृत्व नसून प्रकृतीनें संततिनिर्माणासाठीं ही आकांक्षा मनुष्यमात्राचे ठिकाणीं ठेवलेली आहे. हिच्या-योगें स्त्री व पुरुष बीजें एके ठिकाणीं येत असतात. फुलझाडांत पुंकेसर फुलपाखरांच्या शरीरांस लागून स्त्रीबीजांत जाऊन पडत असतात. ह्या फुलपाखरांची क्षुधा अथवा स्वैरसंचार हीच फुलांची मैथुनाकांक्षा होय. कित्येक वनस्पतींत हें मैथुनसंगमाचें काम वायु स्वतः करीत असतो. फार कशाला, कांहीं वनस्पतींचा हा मैथुनप्रकार प्रत्यक्ष या श्रेष्ठ बुद्धिमान् अशा मनुष्यप्राण्याकडून न कळत होत असतो. सारांश ही प्रकृति आपलें कार्य घडवून आणण्यास वाटेल ती योजना अमलांत आणीत असते. या मैथुनप्रकारांत जर प्रकृतीनें दुःखच ठेविलें असतें (मैथुनांतील सुख-अगर दुःख ही मनुष्यप्रकृतीचीं नव्हत.) अगर नुसता सुखाभाव जरी ठेविला असता तर प्रजोत्पत्तीकडे कोणाचें इतकें लक्ष वेधलें नसतें. शरीरांतील पुंकेसर संगमोत्सुक झालें कीं, या मनुष्यांसही कामवासना होत असते व त्या स्त्री-पुरुष बीजसंग-मास कारणीभूत असा स्त्रीसमागम पुरुष करीत असतो. गर्भधारणेच्या वेळीं Ovum च्या उघड्या मुखांतून Sperm चा प्रवेश झाल्याबरोबर तें उघडें मुख आपोआप क्षणदिशीं मिटून जातें व त्याचे तोंडावर जाड पदराचा बूच बसून इतर Sperms नां आंत जाण्यास मज्जाव होतो. ही क्रिया व तदनंतरच्या सर्व क्रिया मातेच्या इच्छेच्या सहायाशिवाच नैसर्गतः होऊं लागतात. पुढें नवमासानंतर प्रसू-तिकाल आल्याबरोबर दुग्ध व प्रेम मातेच्या हृदयांत उत्पन्न होत असतें. ह्या नैसर्गिक प्रेमामुळें अगर प्रकृतीच्या दूतामुळें अपत्यसंगोपन होत जातें. कोणी येथें असें म्हणेल कीं, एखाद्यास आपलें मूल उपजल्याबरोबर मारावें असें वाटून

तें मारलें जातांना आपण पाहातों, या ठिकाणीं तरी स्वतंत्र कर्तृत्व असतेंच ना ? हा निसर्गतः साधारण नियम नसून अपवादात्मक आहे. ह्यांसही अनेक कारणें होतें असतात. समजा कीं, जारकर्मानें झालेलें मूल आहे. जारिणी व जार दोन्ही चांगल्या कुलांतील म्हणजे अब्रूदार कुलांतील माणसें आहेत. या ठिकाणीं एक बाजूस मोठी अपकीर्ति व एका बाजूस हत्या, ह्या दोहींच्या कचाट्यांत ज्याची सरशी अधिक होईल त्याप्रकारचा परिणाम घडून येत असतो. तो सर्व ठिकाणीं सारखाच होईल असें नाहीं. अनुकंपा, प्रेम, धैर्य, शरम, शिक्षण, समाजभीति, बुद्धि, सांपत्तिक स्थिति, मनुष्याची म्हणजे अधिकारी-वर्गाची अगर घातकांची अनुकूलता इत्यादि हजारों गोष्टींच्या अस्तित्वावर हत्येचें कार्य अवलंबून राहील. असो. बीजरूपी (Stem-cell) बुद्बुदांत ज्या शारीरिक (Physical) व मानसिक (Psychic) पेशी मातापित्याच्या शोणित-रेतांतून पडतील त्या मानानें भावी प्रजेची शारीरिक व मानसिक शक्ति रहाणार. त्यांत प्रत्यक्ष मातापित्याचें अगर अर्भकाचें कर्तृत्व असें असत नाहीं. अर्भक जन्मास आल्यानंतर परिस्थिति व शिक्षण ह्याही गोष्टी अर्भकाच्या स्वतंत्र बुद्धिवर अवलंबून असतात, असें म्हणावें तर तेंही खरें नाहीं. सुशिक्षित मातापितरें, सुबुद्ध आप्तइष्ट, सच्छील स्नेही, निरोगी हवापाणी इत्यादि अनुकूल गोष्टी जमवून आणणें हें अर्भकाकडे सोंपवूनही उपयोग नाहीं; कारण त्या अर्भकास स्वतंत्र कर्तृत्व नसतें, परिस्थिति व शिक्षण या दोन उपायांनीं देहगत स्वभाव पालटतो, तेव्हां स्वातंत्र्य-बुद्धि मनुष्यास आहे असें स्वातंत्र्यवादी लोक म्हणतात; परंतु ते, ही गोष्ट विसरतात कीं, हे दोन उपाय जमून येणेंही पुष्कळ ठिकाणीं शक्य नसतें. बाह्य परिस्थिति अनुकूल असणें हीसुद्धां अर्भकाच्या इच्छेबाहेरची गोष्ट आहे त्याच्या पालकाच्या स्वतंत्रबुद्धीची कमाई त्यांत चालते म्हणावें तर ते पालकही परतंत्र असतात. त्यांनाही तशी परिस्थिति जुळवून आणणें सर्वदा शक्य नसतें. तेव्हां या अशा आयत्या तयार झालेल्या भांडवलावर मनुष्य जो व्यापार करणार तो सर्व अर्थात् त्या भांडवलाच्या स्वरूपावर अवलंबून असणार. या तत्त्वाचे अनुरोधानेंच आपण नेहमीं वैयक्तिक, आनुवंशिक, सामाजिक व राष्ट्रीय स्वभाव (Individual, hereditary, social, national characteristics) ठरवीत असतों. भूगोल प्रदेशानुरूप लोकांचे रूपस्वभाव साधारणतः आपण ठरवून ठेवलेले आहेत. पृथ्वीचशी काय पण प्रत्यक्ष सूर्यमालिका ही एका प्रचंड बाह्य-शक्तीच्या आकर्षणांत सांपडलेली असल्यानें तिलाही स्वतंत्र अशी गति नाहीं. त्या सर्व अफाट विश्वरचनेंत सूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय न दिसणारी जी पृथ्वी त्यावरील आम्ही जंतु आहोंत, त्या आमचें स्वतंत्र कर्तृत्व कोठून येणार ?

यथा वै पांचाली नटति कुहकेच्छानुसरणं
कुलालेन भ्रान्तं भ्रमति च सकुच्चक्रमनिशं।

तथा विश्वं सर्वं भवति मनवश्चानुगुणिताः ।
स्वतंत्रः को वास्ते वद परसुरेश त्रिभुवने ॥

दलादन ऋषि.

दलादन ऋषि म्हणतातः—

" खेळकरी ज्याप्रमाणें हस्तिदंती बाहुल्या आपल्या इच्छेप्रमाणें नाचवीत असतो अगर कुंभारानें गति दिलेलें चाक जसें कांहीं काळ फिरत रहातें, तद्वतच हें विश्व व मन्वादि विश्वपालक परतंत्र आहेत. हे परमेशा, ह्या विश्वांत स्वतंत्र कोण आहे हें सांग पाहूं. "

ह्या ऋषींनीं दिलेला हा सिद्धान्त त्रिकालाबाधित व अत्यंत सत्य आहे हें रहस्यकारांनींच काय पण कोणीही वेदान्तजिज्ञासूनें विसरतां कामा नये. श्रीकृष्णांनीं या सिद्धान्ताचा वारंवार अर्जुनास बोध केला असून रहस्यकार तो विसरत आहेत.

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥
स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥
ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥

अ० १८, श्लो० ५९।६०।६१.

तसेंच अक्षराव्या अध्यायांत भगवानांनीं विश्वरूपदर्शन देऊन अर्जुनास प्रत्यक्ष प्रयोगदर्शनानें याच तत्वाचा उपदेश केला आहे.

" मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् "
द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मयाहतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युद्ध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥

(मींच या सर्वांना पूर्वीच मारून ठेविलेलें आहे, तूं आतां नुसता निमित्ताचा मारणारा आहेस. द्रोण, भीष्म, जयद्रथ व कर्ण व तसेच इतर योद्धे हे मीं मारलेलेच आहेत. तूं हा शोक-मोह सोडून दे व जय मिळव ह्मणजे झालें. "

अशा तऱ्हेनें परमार्थतत्व भगवान् स्वतः सांगत असतां व आधिभौतिक शास्त्रांनीं हाच सिद्धान्त खरा आहे असा प्रत्यक्ष प्रमाणांनीं अनुवाद केला असतां रहस्यकार आपल्या कर्मविपाक प्रकरणांत हा सिद्धान्त खरा मानीत नाहींत. व्यवहार खरा मानणारे पंडित व रहस्यकार या दोघांचीही भीति एकाच प्रकारची आहे. ती ही कीं, हा सिद्धान्त खरा मानिल्यास जगांतील सर्व नीतिवाङ्मय निरर्थक होईल

वाचकहो, जिज्ञासु वाचकहो, अथवा वेदधर्माभिमानी वाचकहो, प्रारब्ध व प्रयत्न या वादांतील खरें रहस्य अगर मर्म आपणास जाणण्याची इच्छा असल्यास आम्ही सांगतों तें नीट लक्ष देऊन ऐका, त्याचें मनन करा व चित्तांत वज्रलेप

करून ठेवा म्हणजे वेदान्तशास्त्र वाचतांना आपल्या चित्तांत रिकामा नसता गोंधळ कधींही माजणार नाहीं. जीवाचें स्वतंत्र कर्तव्य नाहीं.एका प्रचंड जगड्व्याळ शक्तीच्या फेऱ्यांत सांपडून प्रत्येक जीव परतंत्र झालेला आहे. विश्वांत यःकश्चित् झाडाचें पान देंखील विश्वात्म्याचे सत्तेखेरीज हालत नाहीं, हाच सिद्धान्त खरा आहे. व याच भावनेनें मनुष्य सतत वागेल तर त्याचा मोक्ष सिद्धच आहे. या खऱ्या तत्वाची ज्याला ओळख पटली आहे व ह्यातून अघटित पराक्रमाचें कार्य घडलें अगर कांहीं न घडलें अथवा त्याचें ह्यातून एखादा खून घडला तरी मुद्धां आपलें हें स्वतंत्र कर्तृत्व नव्हे हें तो पक्कें ओळखीत असल्यामुळें हें कृत्य आपण केलें ही भावनाच त्याचे ठिकाणीं नसते. त्यालाच स्थितप्रज्ञ म्हणतात. " हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हनम् " हें वाक्य भगवंतांनीं अशा लोकांना उद्देशूनच घातलेलें आहे. हें जरी खरें आहे तरी अहंकार मध्यंतरीं आल्यानें बद्ध व मुक्त हा भेद उत्पन्न झाला. " अमुक मीं केलें अगर करणार " असा अहंकाराचा प्रादुर्भाव झाल्याबरोबर स्वतंत्र कर्तृत्वाचा नसताच आरोप जीवावर येऊन लादला गेला. या अहंकाराचे उपाधीमुळें जन्ममरणाचे फेरे, कर्मविपाक शास्त्रें, कर्मरहस्ययोग, आत्मस्वातंत्र्य इत्यादि भ्रामक व बद्धक गोष्टी निर्माण झाल्या. रहस्यकार म्हणतात कीं, आधिभौतिक शास्त्रांचा प्रारब्धवाद आपणास मान्य नाहीं म्हणजे जीवाचें स्वतंत्र कर्तृत्व नाहीं हा पक्ष मान्य नाहीं. ते ह्मणतात," पण ज्ञानवान् मनुष्याच्या कर्तव्याकर्तव्याचें ज्या कर्मयोगशास्त्रांत विवेचन करावयाचें त्यांत हा प्रश्न महत्वाचा होऊन त्यास उत्तर देणें जरूर पडतें. कारण मनुष्यांस प्रवृत्तिस्वातंत्र्य नाहीं, असें एकदां कायमचें ठरलें तर अमुक प्रकारें बुद्धि शुद्ध ठेवावी किंवा अमुक गोष्ट करावी आणि अमुक करूं नये, अमुक धर्म्य अमुक अधर्म्य इत्यादि विधिनिषेधशास्त्राची सर्व भानगडच आपोआप नाहींशी होईल. " गी० र० पा. २६७. ही रहस्यकारांची भीति वेदान्तशास्त्रदृष्ट्या किती अज्ञानमूलक आहे हें आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून सहजीं ध्यानांत येईल. एक सोडून अनेक मोहारगाड्या अगर आकाशयानें प्राप्त झाल्यावरही आपला खटारगाडा कोणी काढून नाहींसा करूं लागल्यास त्याचा प्रतिकार करूं लागणें अथवा चिंधींतील सोनें काढून घेतल्यावरही त्या चिंधीस उराशीं बांधून बसणाऱ्या कद्रूप्रमाणें हा त्यांचा शोक वृथा होय. रहस्यकारांनीं या आपल्या विचारसरणीस आधार वेदान्तसूत्राचा घेतला आहे. " जीवकर्तृत्वाधिकरण " ब्रह्मसूत्रांत पठित आहे परंतु रहस्यकारांना वेदान्तरहस्य कळलें नाहीं असें जें आम्हांस वारंवार म्हणावें लागत आहे त्याचेंच हें एक उदाहरण होय. शास्त्रांस अर्थवत्त्व येण्याकरितां जीवांस कर्तृत्व मानिलें आहे हें अगदीं खरें आहे त्याबद्दल वादच नाहीं. परंतु " जीव " शब्दाचा अर्थ रहस्यकारांना कळला नाहीं. शास्त्रें जीवाकरितांच आहेत. कर्में जीवाकरितांच आहेत. कर्मफलें जीवाकरितांच आहेत. विधिनिषेध, प्रायश्चित्तें, यज्ञयाग, व्रतें, वैकल्य,

गीतारहस्य इत्यादि सर्व उठाठेवी "जीवा" करितांच आहेत. आत्म्याकरितां नाहींत. या ठिकाणीं अनभिज्ञांना शंका येईल कीं, "म्हणजे काय! जीव तो कोण व आत्मा तो कोण! हें काय गौडबंगाल आहे ह्या वेदान्ताचें!" परंतु या शंकेस उत्तर असें आहे कीं, देह-बुद्ध्यादिकांचे 'कोंडींत' जो चिदंश सांपडलेला तो "जीव," व या उपाधींच्या पलीकडील ह्मणजे तोच वस्तुतः उपाधिविष्ट नसलेला तोच चिदंश ह्मणजे "आत्मा"-बिंबरूपी आत्मा, बुद्धिदर्पणांत प्रतिबिंबित झालेला तो जीव. "जीव" हा कर्तृत्व-भोक्तृत्ववान् आहे, "आत्मा" हा कर्ता नसून भोक्ताही नव्हे. "जीव" हा अहंकारादिकांनीं बद्ध आहे, परंतु 'आत्मा' हा सदैव मुक्त आहे. शास्त्रें हीं जीवाचे कल्याणाकरितां निर्माण झालेलीं आहेत, परंतु "आत्म्या" करितां त्यांचा कांहीं-एक उपयोग नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याचे पुढें तीं मिथ्या आहेत. तेव्हां अहंकारयुक्त जीवाचें व्यवहारदशेंत कर्तृत्व मानूनच सर्व शास्त्रें प्रवृत्त झालीं आहेत. व्यावहारिक सत्तेंत पारमार्थिक सत्ता-प्रमेयें उपयोगांत आणावयाचीं नाहींत, या दृष्टीनें व्यवहारदशेंत अहंकारयुक्त जीवानें कर्तृत्व ओढून घेतल्यानें भोक्तृत्वही त्याचेकडे अर्थातच आलें, यामुळें या ठिकाणीं इच्छा-स्वातंत्र्य नाहीं असें ह्मणावयाचें नाहीं. "करावें तसें भोगावें" हा नियमच या ठिकाणीं लावणें जरूर आहे. परंतु रहस्यकार हे नुसत्या व्यवहाराबद्दल बोलत असते तर आम्हीं त्याबद्दल वादही केला नसता. परंतु ते व्यवहारातीत होऊन ब्रह्मज्ञानाच्या नव्हे प्रत्यक्ष ब्रह्मज्ञान्याच्या गोष्टी सांगूं लागल्यामुळें प्रथम उत्पन्न झालेली अज्ञानाबद्दलची कींव नाहींशी होऊन त्यांच्या संन्यासमार्गीयावरील अन्यायाच्या घाल्यानें त्वेष उत्पन्न होऊं लागला आहे. तेव्हां रहस्यकारांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, जें कांहीं ते कर्तृत्वाबद्दल लिहितात तें केवळ अज्ञानावस्थेंतील जीवाबद्दलचें होय. त्यांचीं विधिनिषेधादि शास्त्रें व त्यांचें कर्मयोगशास्त्र हें याच अज्ञानावस्थेंतील "जीवा" साठींच होय. स्वानंदसाम्राज्याची प्राप्ति झालेल्या आत्म्यास कर्तृत्व-भोक्तृत्व नाहीं, बंध नाहीं, मोक्ष नाहीं, कांहीं नाहीं. असो.

यावर कोणी म्हणेल कीं, व्यवहारांत आपण नेहमीं स्वतंत्रपणानें वागत असतांना घटकोघटकीं किंवा पावलोपावलीं दिसून येत असतों.-मी आतां हा माझा हात वर उचलीन किंवा खालीं करूं शकेन. मी हा धोंडा फेंकीन किंवा फेंकणार नाहीं. दोन्हींपैकीं कोणताही मार्ग पत्करणें माझे आधीन आहे असें असतां प्रवृत्ति-स्वातंत्र्य मला नाहीं असें कसें म्हणतां? आम्ही म्हणतों, "होय, बरोबर आहे. आपण कांहीं तरी एक गोष्ट करूं शकाल. परंतु धोंडा फेंकणें व तो हातांत ठेवणें ह्या दोन्ही क्रिया एकाच समयास तुम्ही करणार नाहीं. तसेंच एकाच समयास हात खालीं व वर करणार नाहीं. कोणतीही गोष्ट केलींत तर त्यांत आपलें प्रवृत्ति-स्वातंत्र्य काय आहे? हातांतील स्नायू, आनुवंशिक जीवान्तर्गत शक्ति, इच्छा

रुधिराभिसरण इत्यादि अनेक क्रिया सुयंत्र चालण्यावरच ना आपली ही कर्तृत्व-शक्ति ! बरें धोंडा फेंकण्याची बुद्धि तुझांस होईल ती बुद्धि तरी तुमच्या कर्तृत्वाची आहे काय ! कदाचित् धोंडा फेंकण्याची बुद्धि होऊन तो न फेंकण्याची दुसरी ऊर्मि आल्यावर तो धोंडा तुम्ही न फेंकतां तसाच हातांत ठेवाल. मनुष्याचे मनांत विचार येतात ते कर्तृत्वजन्य नसतात. ते आपोआप उत्पन्न होत असतात. सात्विक, राजस, तामस प्रकृतीच्या अनुरोधानें जीवाचे विचार, विकार व आचार चाललेले दिसून येतात. निश्चय अथवा बुद्धीचा करार सर्व जीवांत सारखा नसतो. व्यसनाधीन झालेल्या लोकांत कांहीं निश्चयानें व्यसनपराङ्मुख होतात, कांहीं निश्चयाभावामुळें त्यांतून सुटत नाहींत. मेंदूंत निश्चयाचे तंतु कमी असल्यामुळें कित्येकांना बुद्धि असून सुद्धां ते आयदी व अज्ञानी रहातात. नाहींतर स्वतंत्रकर्तृत्व खरें असतें तर कित्येकजण प्रति बाळगंगाधरच झाले असते. परंतु प्रवृत्तिस्वातंत्र्य नसल्यामुळें त्यांना तसें होतां येत नाहीं. हल्लीं चाललेल्या संग्रामांतील कोट्यवधि प्राणाहुति केवळ एका कैसरच्या कर्तृत्वाचें फळ मानिल्यास विश्व हें अध्यक्षाशिवाय चाललेलें आहे असें मानावें लागेल. असंख्य प्राण्यांचें प्रारब्ध या कालीं या तऱ्हेनें उदयास आलेलें आहे, कैसर फक्त निमित्तमात्र आहे असेंच मानणें रास्त आहे. श्रीकृष्णाच्या विश्वरूप दाखेंत हा संहार पूर्वीच झालेला आहे-याचें कर्तृत्व जीवाकडे वास्तविक नाहीं, परंतु परमार्थतः हें जरी खरें आहे तथापि योद्ध्यांची ही भावना नसून " मी लढेन, मी मारीन, मी मरेन " अशी भावना असल्यामुळें बुद्धीची समता नष्ट होऊन जय अपजय याबद्दल हर्ष व विषाद हीं त्यांना होत आहेत. प्रकृतीचा, अहंकार हा फार नैष्ठिक व अत्यंत महत्वाचा साथीदार आहे. अहंकार आहे म्हणूनच प्रकृतीचे खेळ सुयंत्र चाललेले आहेत. प्रवृत्तिस्वातंत्र्य नसतांना तें आहेसें वाटणें यांतच प्रकृतीच्या चेष्टेचें खरें इंगित आहे.

Contemporary Review च्या सन १९०४ च्या मार्चच्या अंकांत Free will and determinism (प्रवृत्तिस्वातंत्र्य व स्वतंत्र-प्रवृत्यभाव) या विषयावर लेख आलेला आहे त्याचा उतारा Sir Oliver Lodge यांनीं आपल्या " Life and Matter " या पुस्तकांत घेतला आहे. त्यांतील एक अवतरण खालीं देत आहों.

" If we could grasp the totality of things, we should realize that every thing was ordered and definite, linked up with everything else in a chain of causation and that nothing was capricious and uncertain and uncontrolled. The totality of things, however, is and must remain beyond our grasp; hence the actual working of the processes, the nature of the links, the causes which create our determinations, are

frequently unknown. And since it is necessary for practical purposes to treat what is utterly beyond our ken as if it were non-existent, it becomes easily possible to fall into the erroneous habit of conceiving the transcendental region to be completely inoperative."

" तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः " या श्रुतीची कल्पना तिकडे नसल्यामुळें " एकत्वभावना " ही असंभाव्य वाटणें साहाजिक आहे. परंतु व्यावहारिक स्वातंत्र्य व पारमार्थिक पारतंत्र्य या सत्याची अनुमानानें कल्पना बांधलेली वरील अवतरणांत दिसून येईल.

तसेंच सकल भौतिकशास्त्रविशारद Ernst Haeckel हे आपल्या " विश्वाचें कोडें " (Riddle of the Universe) या ग्रंथांत अनेक शास्त्रांचे आधारें काय सिद्ध होतें म्हणतात पहाः-

" The great struggle between the determinist and the indeterminist, between the opponent and the sustainer of the freedom of the will, has ended today, after more than 2000 years, completely in favour of the determinist" P.47.

जॉन टिंडालसाहेब यांच्या शास्त्रवेत्तेपणाबद्दल तर आधुनिकांस शंका येण्याचें कारण नाहीं. प्रत्यक्ष पुराव्याशिवाय कोणत्याही गोष्टीवर श्रद्धा ठेवणाऱ्यापेकीं ते नव्हत. त्यांनीं आपल्या Science and Man या निबंधांत म्हटलें आहे कीं, शास्त्रीत्या विचार करितां मनुष्यास प्रवृत्तिस्वातंत्र्य नाहीं हेंच कबूल करावें लागतें.-हा सर्व निबंध वाचण्यासारखा आहे. तो सर्वांनीं अवश्य वाचावा, अशी आमची शिफारस आहे.

" Are we or are we not, complete masters of the circumstances which create our wishes, motives and tendencies to action ? Adequate reflection, will, I think, prove that we are not."

" My physical and intellectual textures were woven *for* me, not *by* me."

युक्तिवादानें व शास्त्रीय प्रमाणांनीं प्रवृत्तिस्वातंत्र्य मनुष्यास नाहीं हें Tyndall साहेबांनीं सिद्ध केलें आहे. हा वाद लोकांना रुचणार नाहीं. परंतु तो सत्य आहे याविषयीं शंका नाहीं असें तें म्हणतात.

" It is as fatal as it is cowardly to blink facts because they are not to our taste. "

हें वाक्य रहस्यकारांनीं व व्यवहाररतांनीं चांगलें स्मरणांत ठेवावें.

१२ निष्ठाद्वय योग.

लोकेस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेण योगिनाम् ॥ ३ ॥

भग० अ० ३.

हा श्लोक व

"एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ।
बुद्ध्यायुक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि" ॥

अ० २ श्लो० ३९.

हा श्लोक हे रहस्यकारांच्या कर्मयोग शास्त्राचे मुख्यतः आधार आहेत. या श्लोकांत वर्णिलेल्या निष्ठांनाच ते 'सांख्ययोग' व 'कर्मयोग' म्हणतात. यांनाच ते अनुक्रमें "संन्यास" व ' कर्मयोग ' अथवा " निवृत्ति व प्रवृत्तिधर्म" म्हणतात. तसेंच हे दोन्ही मार्ग मोक्षासच पोंचविणारे असल्यामुळें ते तुल्यबल आहेत खरें परंतु त्यांतल्या त्यांत जर निवड करावयाची तर कर्मयोगासच श्रेष्ठत्व देणें हें, भगवद्गीतेचे आधारानें योग्य आहे असें ते म्हणतात. हा कर्मयोगाची व संन्यासयोगाची योग्यता सारखीच आहे हें भगवान् स्वतः सांगत आहेत.

"सांख्य-योगौ पृथक्बालाः प्रवदंति न पण्डिताः ।
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥
यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं साख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥

अ० ५ श्लो० ४।५.

कर्मयोग त्यांतल्या संन्यासमार्गापेक्षां श्रेष्ठ आहे हें भगवान् खालील श्लोकानें सांगत आहेत.

"संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरौ उभौ ।
तयोस्तु कर्मसन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥

अ० ५ श्लो० २.

रहस्यकारांच्या कर्मयोगशास्त्राचे भगवद्गीतेंतील हे मुख्यतः प्रमाणभूत श्लोक आहेत. व याशिवाय " तस्मादोगाय युज्यस्व" (गी० २-५०) " मा ते संगोस्त्वकर्मणि " " कर्म ज्यायो ह्यकर्मणः " (गी० ३-८) " योगमातिष्ठोत्तिष्ठ " " ज्ञानिभ्योऽपि मतोधिकः " " तस्माद्योगी भवार्जुन " " मामनुस्मर युद्ध्य च "

इत्यादि वचनांचे आधारें संन्यासापेक्षां कर्मयोग श्रेष्ठ आहे असें सिद्ध होत आहे. " ज्यायः " " आधिकः " " विशिष्यते " इत्यादि श्रेष्ठत्वाचे पदांनीं भगवानांनीं कर्मयोगास उघड उघड श्रेष्ठत्व दिलें असतां एकदेशीय संन्यासमार्गी सांप्रदायिक टीकाकार गीतेचा सर्व अर्थ संन्यासपरच लावूं पाहतात हें चांगलें नाहीं, हा रहस्यकारांचा पूर्वपक्ष आहे.

हा पूर्वपक्ष दिसण्यास प्रबल तर खास दिसत आहे, इतकेंच नव्हे तर प्रस्थानत्रय ज्यांनीं गुरुपरंपरेनें समजून न घेतां केवळ प्राकृत अगर थोड्याश्या संस्कृत प्रकरणग्रंथांचेंच अध्ययन स्वतःचे बुद्धीनें केलेलें आहे अशा वेदान्ती लोकांस हा पूर्वपक्ष सिद्धान्तवत् खास वाटेल असा आमचा समज आहे. आपल्या मताचे पुष्ट्यर्थ जितकीं म्हणून वचनें भगवद्गीतेंत सांपडलीं तितकीं सर्व धुंडाळून रहस्यकारांनीं नोंदून ठेविलीं आहेत, त्यामुळें हा पक्ष फारच जोरावलेला दिसत आहे.

प्रथमतः हें सांगणें जरूर आहे कीं, रहस्यकारांनीं "प्रवृत्ति, निवृत्ति " "सांख्य योग " " संन्यास कर्मयोग " इत्यादि शब्दार्थामध्यें विलक्षण घोंटाळा माजविला आहे. व हा घोंटाळा माजविल्यामुळें आचार्यपरंपरेवर ते अकारणच संतापले आहेत. हा त्यांचे मनांतील गोंधळ नाहींसा झाला म्हणजे कृतकर्माचा पश्चाताप त्यांनाही झाल्याविना रहाणार नाहीं. आतां शांत चित्तानें मनन केल्यावर मनास झालेली उपरति ते उघड सांगतील असें जरी वाटत नाहीं, तथापि त्यांच्याही मधून मधून येणाऱ्या आचार्यविरोधाभावदर्शक वाक्यांत थोडी तरी पुढील आवृत्तींत भर पडेल अशी बळकट आशा आहे.

भगवान् " संन्यास " शब्दानें काय समजतात तें आधीं पाहूं.

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥

अ० १८ श्लोक० २.

काम्य कर्मांचा न्यास म्हणजे त्याग करणें याला कवि संन्यास म्हणतात. व सर्वकर्मफलांचा त्याग करणें याला कवि त्याग म्हणतात. पुन्हां भगवान् म्हणतातः—

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।

म्हणजे नित्य कर्मांचा संन्यास संभवतच नाहीं अथवा युक्त नाहीं. तसेंच

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ॥
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः ॥

जें कांहीं अवश्य केलेंच पाहिजे म्हणजे नित्यकर्म त्याचें संगरहित व फलाकांक्षारहित अनुष्ठान करणें हा सात्विक त्याग होय.

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्यते ।
त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥

नहि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥
अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम्।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥

अ० १८ श्लो० १०।११।१२.

ह्या तीन श्लोकांत त्यागाचें स्वरूप विशद करून भगवानांनीं सांगितलेलें आहे; व त्याग व संन्यास हे पर्यायानें एकच आहेत हें दर्शविलें आहे. ह्या श्लोकामध्यें सांगितलेला संन्यास अथवा त्याग रहस्यकारांच्या कर्मयोगास जुळवून पाहातां अगदीं तंतोतंत जुळतो, हें रहस्यकारांनाही मान्य झालें पाहिजे. जिवंत मनुष्याला कर्म सोडणें शक्य नाहीं तर त्या कर्माच्या फलाची आकांक्षा सोडून तीं कर्मे करीत राहणें हाच रहस्यकारांचा कर्मयोग होय. व भगवान् यालाच संन्यास अथवा त्याग म्हणत आहेत. वाचकहो, ही गोष्ट आपणास समजून घेण्यास फारशी विद्वत्ता नको आहे. वरील श्लोकांत दिलेलें त्यागाचें लक्षण व हा नूतनाचार्यांचा कर्मयोग हीं दोन्हीं अगदीं एकच आहेत. ह्यालाच रहस्यकार प्रवृत्ति मार्ग म्हणतात. ह्याच मार्गाचा व संन्यासमार्गाचा विरोध-अत्यंत विरोध-आहे असें ते प्रतिपादितात. जेव्हां ते या "त्यागधर्म" अथवा "संन्यास धर्म" किंवा "कर्मयोग शास्त्र" यांचा संन्यासमार्गाशीं विरोध दाखवितात तेव्हां त्यांचे मनांत सर्व कांहीं करणें व तें फलासक्तिरहित करणें आणि कांहीं न करितां स्थाणूसारखें स्वस्थ रहाणें या दोन स्थितीमधील विरोध उभा रहात असतो. अथवा संन्यास म्हणजे भगवीं वस्त्रें व मुंडन आणि भिक्षावृत्ति यांचें चित्र त्यांचे डोळ्यांपुढें उभें रहात असतें. आचार्य हे स्वतः अशा प्रकारचे संन्यासी असतां त्यांनींही ग्रंथरचना, लोकशिक्षण, वेदमार्ग-स्थापना, श्रुतिसमन्वय इत्यादि कर्मे भगवीं वस्त्रें, मुंडन व भैक्षचर्य असूनही केलीं आहेत हें रहस्यकार कां विसरतात ! हीं सर्व कामें करूनही ते निवृत्तिमार्गी होते. तेव्हां एकतर त्यांच्या बोलण्यांत व चालण्यांत मेळ नव्हता असें म्हटलें पाहिजे किंवा त्यांचा " सर्वकर्मसंन्यास " या शब्दाचा अर्थ तरी निराळा होता असें मानलें पाहिजे. सर्व जगांत विचारक्रांति करून सोडणारे, जाडे तत्त्ववेत्ते श्रीशंकराचार्य यांच्यावर पहिला आरोप लादावयाचा म्हणजे आमची स्वतःचीच उपहास्यता करून घ्यावयाची यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. त्यांचें चरित्र समग्र वाचल्यास अशी खात्री झाल्याशिवाय रहात नाहीं. इतकेंच नव्हे तर अशासारख्या व्यक्तींचीं चरित्रें हीं " बोले तैसा चाले " या साधुवचनाचीं मूर्तिमंत प्रतिमाच होत. या ठिकाणीं आचार्यांच्या चरित्रांतील एका कथानकाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. आचार्य श्रीक्षेत्र काशी येथें असतां गंगेस जाण्याच्या वाटेवर एक चांडाल पुढें आला, त्याला उद्देशून आचार्य " गच्छ दूरम् " (दूर हो), असें म्हणाले तेव्हां

त्यानें वेदान्तांतील अभेद सिद्धान्ताच्या शब्दांनीं आचार्यांची कानउघाडणी केली व विचारलें,

गच्छ दूरमिति देहमुताहो देहिनं परिजिहीर्षसि विद्वन् ।
भिद्यतेऽन्नमयतोऽन्नमयं किं साक्षिणश्च यतिपुंगव साक्षी ॥
ब्राह्मणश्वपचभेदविचारः प्रत्यगात्मनि कथं तव युक्तः
बिंबितेऽम्बरमणौ सुरनद्यामन्तरं किमपि नास्ति सुरायाम् ॥

(आपण "दूर हो" म्हणतां हें देहास उद्देशून म्हणतां किंवा देहीस (आत्म्यास) उद्देशून म्हणतां ? देहास म्हणत असाल तर देह सर्व अन्नमयच आहेत; मग एका अन्नकार्यापासून दुसरें अन्नकार्य भिन्न कसें ? आत्म्यास उद्देशून म्हणत असाल तर तो दोहीं ठिकाणीं साक्षीरूपानें एकच आहे. मग त्यांत भेद कसला ? ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादि जातिभेद प्रत्यगात्म्याचे ठिकाणीं कोठून आले ? चंद्र गंगेंत प्रतिबिंबित झाला काय, किंवा दारूच्या लोटांत प्रतिबिंबित झाला काय, चंद्रांत कांहीं वैगुण्य आलें काय ?) हा चाण्डालाचा बोध ऐकून, लोकसंग्रहार्थ चातुर्वर्ण्यव्यवस्था ते स्वतः पाळीत असतां, ज्ञानी भेटल्याबरोबर हा कृत्रिम भेद नाहींसा व्हावा व आचार्य त्या चांडालाशीं पूर्ण समतेनें वागावे यांत नवल काय ?

भांति यस्य तु जगद्दृढबुद्धेः । सर्वमप्यनिशमात्मतयैव ।
स द्विजोस्तु भवतु श्वपचो वा । वन्दनीय इति मे दृढ-निष्ठा ॥

(ज्याला सर्व जग आत्ममय दिसूं लागलें तो मनुष्य विप्र असो वा चांडाल असो मला वन्दनीय आहे) असें आचार्यांनीं त्या चांडालास समर्पक उत्तर दिलें. यावरून आचार्य हे स्थाणूसारखे अथवा गेंड्यासारखे वनांत जाऊन बसले नव्हते; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं ठिकाठिकाणीं केलेला उपदेश ते स्वतः आपल्या आचरणांत निदर्शनास आणून देत. वर्णाश्रमरूपी वैदिक धर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती व लहानपणापासूनच वैराग्य अंगीं बाणलें होतें त्यामुळें त्यांनीं आपले पंचाचे आठवेच वर्षीं संन्यासाश्रम घेतला व "यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत्" या श्रुतीस मान दिला म्हणून ते जगास जितके उपयोगी झाले तितके ते गृहस्थाश्रमांत होतेना. रहस्यकार "दारापरिग्रह" "पुत्रोत्पादन" "वक्तृत्व" "वर्तमानपत्रलेखन" एवढ्याच गोष्टीस कर्मयोग म्हणत असतील तर तीं आचार्य व तदनुयायी यांनीं केलीं नाहींत हें खरें. परंतु "सर्वभूतहिते रताः" अशासारखी वृत्ति जर कोणीं कायम ठेविली असेल तर ती आचार्यांनींच.

एकदां केरलनृपतीनें आचार्यांना बोलावणें पाठविलें त्या समयीं आचार्यांनीं नृपतीस उत्तर पाठविलें तें असें:—

भैक्ष्यमन्नमजिनं परिधानं रुक्षमेव नियमेन विधानं ।
कर्मदातुवर शास्ति बटूनां शर्मदायि निगमाप्ति-पटूनां ॥

कर्म नैजमपहाय कुभोगैः कुर्महेऽह किमु कुंभिपुरोगैः ।
इच्छया सुखममात्य यथेतं गच्छ नाथमसकृत्कथयेत्थम् ॥

या उत्तरांत आचार्यांनीं आपलें विधियुक्त कर्म आपणांस कर्तव्य आहे; आपणांस राजसुखाची इच्छा नाहीं अशा तऱ्हेनें, स्पष्टपणें सांगितलें आहे; असें असतां संन्याशी म्हटले कीं दगड, माती, लांकूड अशासारख्या चेतनाशून्य वस्तूंची रहस्यकार कां कल्पना करीत असतात ! याचें कारण एकच आहे कीं, त्यांना सनातन निवृत्तिधर्माचें व प्रवृत्तिधर्माचें खरें मर्म समजलेंच नाहीं हें होय, आचार्यांचें या जगांत एकच कर्तव्य होतें. तें हें कीं, सर्व वेदान्ताचा निष्कर्ष "आत्मैक्य" हा आहे, हें सिद्ध करावयाचें. सर्व श्रुति व स्मृति यांचा या बाबतींत समन्वय आहे. अद्वैत तत्त्वास विरोध करणारीं शास्त्रें व मतें हीं सर्व खोटीं व त्याज्य होत. व या प्रचंड कार्याकरितां त्यांनीं सर्व हिंदुस्थान देशांत फिरून वाद करून अद्वैतविरोधि मतांचा निःपात केला, व सर्व श्रुतींचा एकमेळ घालून दिला. त्यांची विचारसरणी अत्यंत न्यायघटित असल्यामुळें त्यांची शब्दयोजना व वाक्ययोजनाही तशीच न्यायघटित आहे. प्रतिपक्षास कोठेंही त्यांचे ग्रंथांत यत्किंचितही विरोधात्मक शब्दरचना सांपडावयाची नाहीं. शब्दावडंबरांत भकून जाऊन त्यांनीं आपल्या तत्त्वांस कधींही सोडलें नाहीं. कर्माचा व आत्म्याचा अत्यंत विरोध असल्यानें त्या दोहींचा अन्योन्यसंबंध होत नाहीं. कर्मास कर्ता, करण, अधिष्ठान इत्यादि (भ० गी० अ० १८ श्लो० १४) साधनें लागतात. आत्मा निरुपाधिक आहे. कर्म हें भव्य म्हणजे फलरूपानें पुढें भविष्यकालीं होणारें आहे. आत्मा भूत आहे म्हणजे सदेव आहे. कर्माचें शेष उत्पाद्य (पुरोडाशासारखें उत्पन्न करण्याजोगें), विकार्य (सोमादिकासारखें), संस्कार्य (व्रीहिप्रोक्षणासारखें) अथवा आप्य (मंत्रादिकासारखें) आहेत. आत्मा या चारही प्रकारचा नाहीं. तो स्वयंसिद्ध (उत्पादित) संस्कृत, अविकृत व प्राप्तच आहे; यामुळें तो कर्माचा शेष कदापि होणार नाहीं. कर्माचें फल अभ्युदय आहे, आत्म्याचें फल स्वतः आत्माच म्हणजे निःश्रेयस् हें आहे. या दोहींत तमःप्रकाशासारखा ढळढळीत विरोध असल्यानें कर्म व ज्ञान या दोहींचा समुच्चय श्रुतीनें राहो, परंतु युक्तिनेंही होणें शक्य नाहीं. अशाबद्दल आचार्यांनीं पुनरुक्तीचा दोष करूनही दृढबोधाकरितां वारंवार सांगितलें आहे. कर्म हें पुरुषव्यापारतंत्र आहे. आत्मा तसा नाहीं. कर्म व ज्ञान यांचा पारमार्थिक संबंध कांहींएक नाहीं. आचार्यांनीं प्रसंग येईल तेथें तेथें हा युक्तिवाद वाचकांच्या मनावर ठसविण्याचा यत्न केला आहे तिकडे रहस्यकारांचें लक्ष मुळींच गेलें नाहीं. वरील कर्म व ज्ञान यांमधील अत्यंत विरोध रहस्यकारांनीं कोठेंही खोडून काढलेला नाहीं व तो तसा खोडून काढणें कोणासही शक्य नाहीं. कर्म हें परंपरेनें ज्ञानास कारण आहे हें आचार्यांनाही कबूलच आहे. कर्माचे योगें चित्त शुद्ध होते व मग तीं आत्मतत्त्वें ओळखण्यास समर्थ होते. परंतु

चित्तशुद्धीनंतर ज्ञान हें व्हावेंच लागतें. "ज्ञानादेव तु कैवल्यं" हा सिद्धान्त अबाधित रहातो. कर्म व मोक्ष यांच्यामध्यें ज्ञानाचें व्यवधान असल्यामुळें कैवल्यास प्रत्यक्ष कारण आत्मावगति हेंच होय. कर्म हें एका पायरीनें दूर आहे व ही कर्माची पायरी कदाचित् न ओलांडल्यामुळें कैवल्य मिळणारही नाहीं. ज्ञान झाल्याशिवाय कर्माचा कांहीं उपयोग नाहीं. हा आचार्यांचा प्रमुख सिद्धान्त ठिकठिकाणीं नायगारा येथील पाण्याच्या धबधब्यासारखा त्यांच्या सर्व ग्रंथांत धों धों असा संतत रव करीत असतां आपल्या कर्मशास्त्रप्रतिपादनांत रहस्यकार तिकडे अगदीं कानाडोळा करितात व आपलेंच चऱ्हाट वळीत सुटतात याला कोणीं काय करावें ? आचार्यांचें कर्मज्ञानाचें विवेचन पौर्वात्य व पाश्चात्य न्यायशास्त्राचे (Logic) अतितीक्ष्ण कसोटीस उतरण्याजोगें आहे, परंतु त्यांच्या या आधुनिक प्रतिपक्ष्याचें विवरण संदिग्धता, विरोध, संशय, अज्ञान इत्यादि अनेक दोषांनीं दुष्ट आहे. हेंच प्रस्तुत उदाहरण पहा. भगवद्गीतेंत जो त्याग किंवा संन्यास सांगितला आहे तोच रहस्यकारांचा कर्मयोग, व हाच "कर्मयोग" श्रीशंकराचार्यादि सांप्रदायिक टीकाकारांच्या कर्मसंन्यासाचा विरोधी ! आचार्य कर्म सोडण्यास कधींही सांगत नाहींत; परंतु आत्म्याचे स्वरूपाशीं या जड कर्माचा विरोध आहे हें मात्र ते वारंवार सांगतात व तें योग्यच आहे. "वेदोनित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयतां" अशा तऱ्हेचा उपदेश साधकांना आचार्य वारंवार करीत असतात हें विसरतां कामा नये. बुद्धींत आत्मतत्त्वाचें ज्ञान उदित होईपर्यंत कर्म केलेंच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. आत्मज्ञान झाल्यानंतर मात्र त्या ज्ञात्यास शास्त्रमर्यादा कोणीं घालूं म्हणणें गैर व न्यायास सुटून होईल.

"लोकेस्मिन्द्विविधा निष्ठा" या श्लोकाचा अर्थ रहस्यकार समजतात कीं, ज्ञान व कर्म हे दोन मार्ग तुल्यबल आहेत असें भगवंतास इष्ट आहे. "निष्ठा" या शब्दानें ते "मोक्षमार्ग" असें समजतात. "निष्ठा" शब्दाचा "मोक्षमार्ग" हा अर्थ कोणत्या कोशाच्या आधारें त्यांनीं केला आहे हें आम्हांस तर समजत नाहीं. व्यासाचा दुसरा एक शांतिपर्वातील श्लोक त्यांनींच दिला आहे.

द्वाविमावथ पंथानौ यस्मिन्वेदाः प्रतिष्ठिताः ।
प्रवृत्तिलक्षणो धर्मः निवृत्तिश्च विभाषितः ॥

प्रवृत्तिधर्म व निवृत्तिधर्म हे दोन मार्ग अनादि चालत आलेले आहेत. हा व्यासांचा श्लोक व प्रस्तुत श्लोक एकाच अर्थी आहेत. जैमिनीप्रणीत पूर्वमीमांसा व बादरायणप्रणीत ब्रह्मसूत्रें अगर उत्तरमीमांसा हीं दोन्हीं या दोन पंथांचीं दर्शक शास्त्रें होत. "प्रवृत्तिः पुनरावृत्तिर्निवृत्तिः परमागतिः" (म० भा० शां० अ० २१७) प्रवृत्तिधर्माचें फल स्वर्ग व मृत्यु इत्यादि पुनरावृत्ति व निवृत्तिधर्माचें फल परमगति म्हणजे मोक्ष अशी स्वतः व्यासच दोन्ही धर्मांची विल्हेवाट लावीत आहेत. परंतु हे मार्ग सांगितलेंच आहे कीं, रहस्यकार हे आपल्या

उद्दिष्टप्राप्त्यर्थ श्रुती-श्रुतींत विरोध लावीत आहेत, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष व्यासाव्यासांत विरोध लावीत आहेत. भारतकार व्यास व भारतकार व्यास यांत रण माजल्यास त्यांना चालतें. असो, परंतु भगवद्गीताकार व्यास व भगवद्गीताकार व्यास यांतही त्यांनीं विरोध आणला आहे हें मोठें आश्चर्य आहे. तो कसा तो पहाः—

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥
नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥
तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचार ।

वाचकहो, या ठिकाणीं रहस्यकारांच्या शब्दजालास बळी पडूं नका. आपली विचारशक्ति कायम ठेवून निरीक्षण करा. हा अध्याय योग-शास्त्रान्तर्गत कर्मयोगाचा आहे हें विसरूं नका. या ठिकाणीं भगवान् कर्माची उपपत्ति सांगत आहेत व तद्द्वारां कर्म जीवास अपरिहार्य आहे असें सांगत आहेत. असा या श्लोकांच्या मागील संदर्भ आहे. अशाप्रकारचें कर्माचें चाललेलें रहाटगाडगें पुढें जो चालवीत नाहीं त्या इंद्रियलंपटाचें जिणें व्यर्थ आहे अशी कर्मानुष्ठानचोदना मागील श्लोकांत आली आहे. नंतर अव्यवधानानें हे दोन श्लोक पठित आहेत व पुढें "तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर" अशी अर्जुनास आज्ञा केली आहे, तेव्हां प्रवृत्तिमार्गाचें कथन प्रस्तुत आहे. मध्यंतरीं स्वच्छ रीतीनें ज्ञानी मनुष्याचा हा कर्मयोग नव्हे असें भगवानांनीं सांगितलें व म्हणून (तस्माद्) 'तूं नित्यकर्मे करीत जा' असा अर्जुनास खडसून उपदेश केला आहे. ज्ञान्यांचा हा मार्ग नव्हे. ते कर्मातीत झालेले असतात. तूं अद्याप अज्ञानी आहेस, शोकमोह पावतो आहेस, तस्मात् तूं कर्मयोगच आचरावयास पाहिजे. हा अभिप्राय व्यासांनीं इतका उघड सांगितला असतां त्याला विरोधात्मक असा, ज्ञानी लोकांनीं सुद्धां कर्माचरणच केलें पाहिजे हा सिद्धान्त त्याच व्यासाचे मुखीं घालण्यास रहस्यकार मुळींच कचरत नाहींत. आतां कदाचित् ह्याच विरोध आमचे गळ्यांत कोणी बांधतील व म्हणतील कीं ह्या दोन श्लोकांत जर ब्रह्मज्ञानी कर्मातीत आहेत तर "तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते" ह्या आधिक्याची उपपत्ति कशी लागते ? आम्ही म्हणतों हीं वचनें अधिकारपरत्वें लावावयाचीं असतात. व्यास कर्म करावें व कर्मसंन्यास करावा अशा अर्थांचीं विरोधी वाक्यें सांगण्याइतके खास अप्रबुद्ध नव्हते. तर अज्ञान्यांकरितां कर्मविधि व ज्ञान्यांकरितां कर्मसंन्यास असा अधिकारपरत्वें विनियोगच या ठिकाणीं करणें प्राप्त आहे. अनधिकाऱ्यांनीं कर्मसंन्यास करणें उचित नाहीं. त्यांनीं कर्माचें अनुष्ठान केलेंच पाहिजे, असेंच भगवंतांस सांगणें भाग आहे. शिवाय भगवान् अर्जुनास म्हणतच आहेत

कीं, संन्यास हा योगाशिवाय प्राप्त होणें फार कठीण आहे. त्याच अर्जुनास 'आधीं योगयुक्त हो' अशी भगवंतांनीं आज्ञा केली आहे. आतां ज्याअर्थीं तुझा कर्मयोगाचाच अधिकार आहे त्याअर्थीं हा कर्मयोग तुला जर बंधक न करतां मोक्षप्रद करावयाचा असेल तर या कर्मयोगफलाची अपेक्षा न ठेवितां असंगत्वानें व निरभिमानें कर्मयोग कर म्हणजे तुला चित्तशुद्धिद्वारां ज्ञानही होईल. शिवाय भगवतद्गीताव्यासाव्यासांत आणलेला दुसरा विरोध म्हणजे भगवान् अशा तऱ्हेच्या कर्मयोगास त्याग अथवा संन्यास हें नांव देत असतां (अध्याय १८ पहा) रहस्यकार बळेंच हा एक नवीन प्रवृत्तिमार्ग म्हणून त्यास संबोधून त्याच्यांत व संन्यासमार्गांत नसताच विरोध उत्पन्न करूं पाहात आहेत. हें कर्माचरणानें चित्तशुद्धि होण्याचें फल आम्ही आपल्या पदरचें किंवा श्रीशंकराचार्यही आपल्या पदरचें सांगत नाहींत. भगवानूच ह्मणतातः—"योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वात्मशुद्धये." सारांश, जगांत मार्ग दोनः प्रवृत्ति व निवृत्ति. दोन्हीही मार्ग वैदिकच मार्ग आहेत. परंतु त्यांतील एक बंधक होतो व दुसरा मोक्षप्रद होतो. ह्या दोन मार्गांच्या मध्यंतरीं तिसरा एक मार्ग आहे तो निवृत्तप्रवृत्तिमार्ग होय. साधकास अगर मुमुक्षूस या निवृत्तप्रवृत्तीचा उपदेश आहे. पुण्यास जावयाचें आहे, परंतु बराच मार्ग क्रमून गेल्यावर पुण्यास जाणें बंधप्रद आहे असें कळून आल्यानंतर तोच आक्रमण केलेला मार्ग पुनरपि परत आक्रमण केल्याशिवाय मूळपदावर येणें शक्य नाहीं. म्हणून या प्रवृत्तीस निवृत्तीच वास्तविक म्हटलें पाहिजे. स्क्रूचे पींळ एखाद्या फळींत सगळे बसले असल्यास आडदांडपणानें तीं फळी आपटल्यास फळी मात्र मोडण्याचा संभव आहे, न होऊन स्क्रू निघणार नाहीं. तद्वतच अनेक जन्मांचे जीवावरील मायासंस्कार निष्काम कर्मानें नाहींसे करीत करीत स्क्रूचे पेंच उलट दिशेस वळवीत वळवीत बाहिर्मुख इंद्रियवृत्ति प्रत्यग्प्रवण करावयाची आहे, हें आहे वेदान्तशास्त्रांतील रहस्य—व हेंच भगवद्गीतेतही प्रतिपाद्य आहे. प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग या दोहींचें स्पष्टीकरण महाभारतान्तर्गत शांतिपर्वांत केलेलें आहे. त्या ठिकाणीं प्रवृत्तिधर्म बंधक असून निवृत्तिधर्म मोक्षप्रद आहे असें म्हटलें आहे, त्याअर्थीं रहस्यकारांच्या मतें हा प्रवृत्तिमार्ग कर्मयोगशास्त्राने समजावयाचा नाहीं, हें उघड होत आहे. म्हणजे भगवद्गीतेंत ज्यास संन्यास अगर त्याग असे सलक्षण भगवंतांनीं नांव दिलें आहे तें रहस्यकारांचें कर्मयोगशास्त्र हें निर्विवाद आहे. एवंच त्याग अथवा संन्यास म्हणजे कर्मयोग असा पक्ष रहस्यकारांच्या विचारसरणीनें ओघानेंच सिद्ध होत आहे. तेव्हां संन्यास म्हणजे कर्मयोग या विलक्षण व विपरीत विरोधांतून रहस्यकारांना कोण सोडवील कोण जाणे! वाचकहो, पुन्हां एकवार हा विरोध पहा. उगाच वरवर पाहून रहस्यकारांना दोष देऊं नका. भगवद्गीतेच्या मतें काम्यकर्मांचा त्याग म्हणजे संन्यास (अ० १८ श्लो० २). सर्व कर्मफलत्याग म्हणजे त्याग (तोच श्लोक). रहस्यकारांचा कर्मयोग म्हणजे हाच होय. काम्य कर्में

टाकावयाचीं व सर्व प्राप्त सांसारिक कर्में फलाकांक्षेशिवाय करावयाचीं हाच या नूतन कर्मयोगसांप्रदायाचा मुख्य आशय आहे. तेव्हां कर्मयोग=संन्यास+त्याग, असें समीकरण प्राप्त झाल्यावर संन्यासमार्ग (आचार्यांचा) व कर्मयोगमार्ग यांत फारसें अंतर कोठें राहिलें? वर सांगितल्याप्रमाणें हा कर्मयोग निवृत्तिपरच आहे. "यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः" अशा तऱ्हेचा प्रवृत्तिमार्ग व "नास्ति अकृतः कृतेन" या श्रुतिसिद्धान्तानुरूप केलेला अनारंभ निवृत्तिमार्ग यांत रहस्यकारांना फरक काय दिसत आहे कोण जाणे? आपल्या अप्रतिहत वक्तृत्वप्रभावानें ते जरी म्हणत असले कीं, समबुद्धीनें कामसंकल्परहित कर्माचरण करीत असावें, तरी यज्ञयागादि श्रुतिस्मृत्युक्त कर्माचरणासेरीज इतर कर्मास हें कामसंकल्परहितत्व लागणें शक्य नाहीं हें रहस्यकार जाणत नाहींत असें दिसतें. "स्वर्गकामो यजेत" असा श्रुतीचा विधि आहे. "स्वर्गकाम असणारानें यज्ञ करावा" ह्या न्यायास अनुसरून कोणी "स्वर्गप्राप्त्यर्थं यजे" असा संकल्प करून यज्ञास सुरुवात करील अथवा कोणी कांहीं संकल्प न करितां केवळ कर्तव्य म्हणून यज्ञ करील. हे दोन्ही पक्ष श्रौतस्मार्तकर्मांत संभवतात. परंतु "मी जेवतों तो क्षुधाशांत्यर्थ" हा एकच पक्ष सांसारिक प्राप्त कर्माचे ठिकाणीं संभवतो. "या जेवणापासून क्षुधाशांति होवो वा न होवो, जेवावयाचें म्हणूनच मी जेवतों" असें म्हणून कोणी जेवणास प्रवृत्त होत नाहीं. "जपानास अगर अमेरिकेस जाऊन मी अमुक धंदा अगर विद्या शिकेन" असा संकल्प केल्याशिवाय त्या त्या देशास जाणें निरर्थक होईल, इतकेंच नव्हे तर या संकल्पास कोणीं प्रतिबंध केल्यास त्याचा प्रतिकार करणें हेंही प्राप्त होईल. कोणी त्या देशांत आपला अपमान केल्यास "मानापमानयोस्तुल्यः" अशा तऱ्हेची वृत्ति धारण करून चालणार नाहीं. इतकेच नव्हे तर उलट या उत्क्रांतिमार्गांतील साधनभूत असे सर्व मनोविकार पूर्ण जागृत ठेवूनच त्या धंद्यांत पडावें लागणार, नाहींतर सर्व क्रिया अचेतनवत् होऊन जातील. एखाद्यानें थोबाडींत मारल्यास व्यवहारांत म्हणजे रहस्यकारांच्या प्राप्त सांसारिक कर्मांत, ताबडतोब ही थोबाडींत सव्याज परत दिली पाहिजे. अगदीं बरोबर आहे. परंतु ही थोबाडींत देण्याचें काम रागानें अथवा संतापानेंच झालें पाहिजे; त्याशिवाय सव्याज फेड होणार नाहीं. नाहींतर संतापाचे अभावीं केवळ रहस्यकार सांगतात एवढ्यावरूनच कर्तव्य म्हणून आठवण करून जर त्या थोबाडीचें प्रतिदान कोणी करूं म्हणेल तर त्या मनुष्याची ती क्रिया नेभळटच होणार; व कदाचित् त्याच्या या नीरस क्रियेचा अंमल होईपर्यंत आणखी पांचचार थोबाडींत त्याला खाव्या लागणार! व्यवहारांतील क्रिया समबुद्धीनें करण्याचा हा अलौकिक उपदेश करण्याचें धाडस रहस्यकारांसारख्या विचारी पुरुषानें कसें केलें हेंच आम्हांस समजत नाहीं. असो, आतां भारतकार व्यास व गीताकार व्यास यांचेमध्यें रहस्यकारांनीं

कसा विरोध आणला आहे पहा. कपिल-स्यूमराश्मि संवाद म्हणून एक महाभारतांत शांतिपर्वांत अध्याय आहे. हा आमचेकडे असलेल्या मुंबईमतींतील दोनशें एकाहत्तरावा अध्याय आहे. ह्यांत कर्माचें ज्ञानांगत्व अगदीं स्पष्टपणानें श्रीव्यासांनीं प्रतिपादिलें आहे. या अध्यायांत कपिलांनीं वर्णाश्रमधर्म कथन करून

"परिग्रहाः शुभाः सर्वे गुणतामभ्युपागताः।
न तु त्यागसुखं प्राप्ता एतत्त्वमपि पश्यसि"

असें स्यूमरश्मीस सांगितल्यावर स्यूमरश्मीनें विचारलें,

भवंतो ज्ञाननिष्ठा वै गृहस्थाः कर्मनिश्चयाः।
आश्रमाणां च सर्वेषां निष्ठायामैक्यमुच्यते ॥ ३६ ॥
एकत्वेन पृथक्त्वेन विशेषो नात्र दृश्यते।
तद्यथावद्यथान्यायं भगवान्प्रब्रवीतु मे ॥ ३७ ॥

यानंतर कपिलांनीं स्यूमरश्मीस उत्तर केलें आहे,

शरीरपक्तिः कर्माणि ज्ञानं तु परमागतिः।
कषाये कर्मभिः पक्के रसज्ञाने च तिष्ठति ॥ ३८ ॥

हा श्लोक रहस्यकारांनीं आपल्या ग्रंथांत घेतला आहे. व आचार्यांनीं आपल्या ब्रह्मसूत्रभाष्यांतही हा श्लोक निराळ्या पाठानें घेतल्याचें सुचविलें आहे. आचार्यांनीं (३-४-२६) या सूत्रावरील भाष्यांत सदरचा श्लोक स्मृति म्हणून दिला आहे. महाभारतांतील अवतरण म्हणून दिलेला नाहीं. महाभारतांतील अवतरण द्यावयाचें असल्यास आचार्य "महाभारते" असा स्पष्ट उपक्रम करीत असतात. उदाहरणार्थ (ब्र० सू० अ० २ पा० १ सू० १ यांत) "महाभारतेऽपि च 'बहवः पुरुषा ब्रह्मन्नुताहो एक एव तु'-" भगवद्गीतेंतील अवतरण असल्यास स्मृतीचें म्हणून अवतरण ते देत असतात. तेव्हां ह्या स्मृतिश्लोकांतील व महाभारतश्लोकांतील शब्दभेदानें अर्थभेद झालेला नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. असो. ह्या कपिल ऋषींनीं दिलेल्या उत्तरावरून कर्माचें ज्ञानांगत्व स्पष्टपणें महाभारतकारांनीं स्वतंत्र अध्यायानें दाखविलें असतां ह्या व्यासोक्तीचा भगवद्गीतेशीं विरोध आणण्यांत रहस्यकारांना मुळींच दिक्कत वाटत नाहीं. हेंही असो; परंतु आपल्या ह्या कर्मयोगास पुष्टि आणण्याकरितां रहस्यकारांनीं श्रुतीचा मुद्दां विपर्यास करण्यास व श्रुतिश्रुतींचा विरोध आणण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. व असें करतांना त्यांनीं "ईशावास्योपनिषद्" प्रथम हातीं धरलें आहे. ते म्हणतात, हें उपनिषद् खुद्द वाजसनेयि संहितेंत पठित असल्यामुळें इतर अरणकांपेक्षां या उपनिषदास प्रामाण्य जास्त आहे. आमचे मतें हें उपनिषद् प्रत्यक्ष कर्मकांडांतच पठित असल्यामुळें ज्ञानकांडांत त्याचा उपयोग इतर अरणकासारखा करणें रहस्यकारांचेच चुकीनें योग्य नाहीं. संहिता ही यज्ञास उपयोगी पडणाऱ्या मंत्रांची गाथा आहे. यज्ञ हे बोलून चालून कर्मरूप आहेत, तेव्हां या कर्मरूप

संहितेंतील उपनिषद् कर्मपक्षपाती दिसण्यांत तरी असणार. असो, आचार्यांना श्रुतींत विरोध दिसून येत नव्हता; दिसून आल्यास त्यांचा समन्वय करण्याकडे त्यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून सर्व श्रुतींचा सोपपत्तिक समन्वय लाविला आहे. कारण त्यांचे मतें वेद अथवा श्रुति अपौरुषेय अतएव प्रमाणभूत असल्यामुळें तसा त्यांचेकडून प्रयत्न झाला हें साहजिकच झालें. परंतु रहस्यकारांना तो प्रतिबंध नसल्यामुळें श्रुतिश्रुतींत अगर स्मृतिस्मृतींत अगर श्रुतिस्मृतींत विरोध आल्यास त्याची त्यांना पर्वाच नाहीं. फक्त आपला कर्मयोग साधला म्हणजे झालें एवढेंच त्यांचें कार्य. असो. ईशावास्योपनिषदांतील श्लोक

विद्यां चाऽविद्यां च यस्तद्वेदोभयं सह।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते ॥

हा रहस्यकारांना ज्ञानकर्मसमुच्चयात्मक आहे असें वाटत आहे; आधीं मुळीं " ज्ञानकर्मसमुच्चय " या पदाचा अर्थ रहस्यकारांना नीट समजला नाहीं. त्यांचे मतें ज्ञान झाल्यावर कर्में केलीं पाहिजेत म्हणजे ज्ञान (अपरोक्षज्ञान) व कर्म (यज्ञयागादि) ह्या दोहोंचा समुच्चय म्हणजे समकालीन निष्ठा असा ज्ञानकर्मसमुच्चय याचा ते अर्थ करितात. ही मोठी चूक आहे. अपरोक्षज्ञान झाल्यावर कर्माचा विधि नाहीं. कर्म हें " कषायपक्ति " अगर चित्तशुद्धीकरितां आहे. कर्म हें ज्ञानास कारण आहे. मोक्षास ज्ञान हें कारण आहे. दुधाचें लोणी, लोण्याचें तूप असा कार्यकारणभाव असल्यामुळें दूध व लोणी यांचा समुच्चय एककालीन होणें शक्य नाहीं, हें व्यवहारतः प्रत्यक्ष सिद्ध आहे. तद्वतच कर्मानें मोक्ष नाहीं, कर्मानें चित्तशुद्धिद्वारा ज्ञान होतें, ज्ञान झाल्यावर मोक्ष, म्हणून कर्म व ज्ञान यांचा समुच्चय होणें शक्य नाहीं. हा आचार्यांचा मुख्य आशय आहे. परंतु रहस्यकार बळेंच आचार्यांच्या मुखांत निराळाच ज्ञानकर्मसमुच्चयाभाव घालीत आहेत त्याला कोणीं काय करावें ? पहिल्या प्रतीच्या ३५९ पानावर गीतारहस्यांत ते म्हणतात, " सारांश ज्ञान झाल्यावर संन्यास घ्यावा, कर्में करूं नयेत; कारण ज्ञान व कर्म यांचा समुच्चय केव्हांही न्याय्य नाहीं असा जो शांकरसंप्रदायाचा मुख्य सिद्धान्त त्याच्याविरुद्ध ईशावास्यांतील मंत्र जाऊं नये एतदर्थ विद्या शब्दाचा गौणार्थ स्वीकारून सर्व श्रुतिवचनांची आपल्या संप्रदायानुरूप एकवाक्यता करण्यासाठीं शांकरभाष्यांत ईशावास्याच्या अकराव्या मंत्राचा वर लिहिल्याप्रमाणें अर्थ केला आहे, असें उघड होतें. " ज्ञानोत्तर कर्म सोडलेंच पाहिजे हा आचार्यांचा आग्रह नाहीं; त्यांचा सिद्धान्त एवढाच आहे कीं, कर्मसंन्यासाशिवाय ज्ञान अथवा मोक्ष होत नाहीं. कर्मसंन्यास कशास म्हणावें याबद्दल आम्हीं सविस्तर विवरण मागें केलेंच आहे. कर्मसंन्यास म्हणजे भगवीं वस्त्रें व भिक्षा असा नव्हे एवढेंच येथें सांगितलें म्हणजे पुरें आहे. जडकर्माचरणानें ज्ञान होत नाहीं, तें कर्मसंन्यासानेंच होतें, हा सिद्धान्त, रहस्यकारांचा सर्व कर्मयोग म्हणजे कर्मसंन्यासच होय, तो कर्मयोग नव्हे, तेव्हां

रहस्यकारांनीं हा वायुताडणाचा प्रयत्न वृथा केला आहे. असो, आतां "ईशावास्याचा" आरंभ पहा. पहिल्या श्लोकांत त्याग सांगितला आहे. सर्व जग ईश्वरमय आहे असें समजून त्यागानें आत्मरक्षण कर, कोणाच्या द्रव्याची अपेक्षा करूं नकोस, तूं जर असें म्हणत असशील कीं, "कर्में करीतच शंभर वर्षे वाचावें" तर अशा तुला कर्माशिवाय अन्य उपाय नाहीं. आत्मरक्षण न करणाऱ्या म्हणजे आत्मघ्न (देहात्मवादी) लोकांना कनिष्ठ तमोयुक्त अशा लोकांची प्राप्ति होते. नंतर आत्मस्वरूपाचें वर्णन केलें आहे. आत्मज्ञान झालेल्या मनुष्यास शोक, मोह होत नाहींत असें सांगितलें. एथपर्यंत या उपनिषदाचा अर्थ भानगडीचा नाहीं. वर दिलेला अर्थ शब्दशः दिलेला नसून गोषवाऱ्याच्या रूपानें दिलेला आहे. लागलींच अकरावा मंत्र आलेला आहे. या मंत्रास ९ वा व १० वा श्लोक हे प्रस्तावनारूप आहेत. नुसत्या अविद्येनें अन्धकारमय लोकप्राप्ति होते, नुसत्या विद्येत जे रत असतात त्यांना त्याहीपेक्षां अन्धकारयुक्त लोकांची प्राप्ति होते. तेव्हां अविद्या व विद्या ह्या दोहींचे समुच्चयानें जो अनुष्ठान करतो, तो मरणातीत होऊन अमृतपदास जातो. आतां या ठिकाणीं "विद्या" व "अविद्या" हे शब्द आम्हीं जसेच्या तसेच ठेविले आहेत. हेच शब्द वादाचे विषय होत. आचार्यांनीं या शब्दांचे अर्थ कर्म व उपासना अथवा व्याकृत-अव्याकृत उपासना असे केलेले आहेत; परंतु रहस्यकारांनीं त्यांचे अर्थ कर्म व ज्ञान असे करून ज्ञानकर्मसमुच्चयवाद उपस्थित केला आहे. ठीक आहे. परंतु याच उपनिषदांत याच दोन शब्दांचे ठिकाणीं "संभूति" व "असंभूति" तसेंच "संभूति" व "विनाश" असे पर्यायशब्द घातले आहेत. या ठिकाणीं रहस्यकारांची फारच गडबड उडाली आहे. "संभूति" म्हणजे जगाचें आदिकारण म्हणजे 'विद्या' 'ज्ञान,' व असंभूति किंवा विनाश म्हणजे 'कर्म' अशी ओढाताण आपल्या संप्रदायानुरूप ते करण्यास प्रवृत्त झाले आहेत. त्यांची त्रेधा साधारण संस्कृतज्ञाच्या सुद्धां सहज लक्षांत येईल अशी आहे. विद्या म्हणजे आदिकारण !! आदिकारण म्हणजे ज्ञान !!! विनाश म्हणजे कर्म !!! ह्या अर्थसंगतीस बळी पडणारे गृहस्थ रहस्यकारांच्या उपग्रहांत अद्याप मिळतीलच यांत शंका नाहीं; परंतु खरे जिज्ञासू तरी या आविष्करणानें सावध होवोत एवढीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे. परंतु याहीपेक्षां आणखी एक गम्मत बाराव्याच श्लोकांत आहे ती ही कीं, तेथें असंभूतिउपासना सांगितली आहे, "अन्धंतमः प्रविशन्ति येऽसंभूतिमुपासते" या चरणांत असंभूति-उपासना सांगितली आहे. आचार्यांनीं या पदांचे सरळ व्याकृत-अव्याकृत-उपासना असे अर्थ लाविलेले आहेत. हे व्युत्पत्तीस धरूनच आहेत हें आतां निराळें सांगणें नको. रहस्यकारांनींच अर्थांची ओढाताण करून आपल्या संप्रदायास जुळतील असे अर्थ केले आहेत हेंच उघड होत आहे. इतकेंच नव्हे, तर कठोपनिषद्, छांदोग्य, तैत्तिरीय, श्वेताश्वेतर इत्यादि श्रुतींतही आपला कर्मयोगच प्रतिपाद्य आहे असें

असून श्रीशंकराचार्यांनीं मात्र जेथें तेथें कर्मसंन्यासच प्रतिपाद्य आहे असा आग्रह धरला आहे, असें रहस्यकार म्हणतात. रहस्यकारांना कठोपनिषद् कर्मपर दिसत आहे यांत त्यांचा दोष नसून त्यांची दृष्टि कर्मयोगोपहत झाली आहे, यामुळें त्यांना हा विलक्षण भ्रम झाला आहे. आमचें असें म्हणणें आहे कीं, कठोपनिषद् पूर्ण कर्मसंन्यासपर आहे. श्रीशंकराचार्यांचें या उपनिषदावरील भाष्य न पाहतां केवळ मोक्षमुख्यरसाहेबांचें भाष्य जरी कोणीं पाहिलें, तरी त्याची सहज खात्री होण्याजोगी आहे. नचिकेताचें वैराग्य पूर्ण कसोटीस लावून पाहिल्यानंतरच त्यास यमराजानें आत्मविद्या सांगितली आहे. रहस्यकारांच्या कर्मयोगाचें व सांपत्तिक ऐश्वर्याचें मुळींच वांकडें नाहीं. यमराजानें हजारों रथ, अश्व, गज, अमृतघट इत्यादि रहस्यकारांना देऊं केल्यास ते मुकाट्यानें हे वर घेण्यास तयार होतील. कारण प्राप्तकर्म समबुद्धीनें केल्यास दोष नाहीं, तेव्हां यमानें आयतें दिलेलें ऐश्वर्य टाकून देण्यांत नचिकेतानें मोठी चूक केली असें रहस्यावरून उघड होत आहे. परंतु नचिकेतानें या वरांचा त्याग केल्यामुळें यमराजांनीं उलट त्याची स्तुतिच केली आहे.

"दूरमेते विपरीते विषूची अविद्या या च विद्येति ज्ञाता।
विद्याभीप्सिनं नचिकेतसं मन्ये न त्वा कामा बहवोऽलोलुपन्त॥"

कठ० २।४.

विद्या व अविद्या या दोन अत्यंत परस्पर भिन्न अशा निष्ठा आहेत (कारण एकीचें मोक्ष व दुसरीचें संसार हें फल आहे) त्या दोन्हींपैकीं नचिकेतानें विद्येचा अंगिकार केला व अनेक (दुर्लभ अशा) कर्मांच्या फशीं तो पडला नाहीं; इतकें कडक वैराग्य पाहूनच यमराजानें त्यास आत्मोपदेश केला आहे. परंतु रहस्यकारांचा मोक्ष ऐश्वर्ययुक्त आहे (गी० र० पृ० ११८.) "नुस्त्या ऐश्वर्यापेक्षां नुस्तें आत्मज्ञान जरी अधिक योग्यतेचें असलें तरी, या जगांत ज्यास रहावयाचें आहे त्यास लोकाप्रमाणेंच ऐहिक समृद्धिहि आपणास किंवा आपल्या देशास प्राप्त करून घेण्याची अवश्यकता व नैतिक हक्कही असल्यामुळें 'मनुष्याचें या जगांत परम साध्य काय?' या प्रश्नास शांति व पुष्टि, प्रेय व श्रेय किंवा ज्ञान व ऐश्वर्य या दोहींचा समुच्चय, हेंच आमच्या कर्मयोगशास्त्राचें शेवटचें उत्तर आहे." रहस्यकारांचा मोक्ष याप्रमाणें ऐश्वर्ययुक्त अथवा प्रेय व श्रेय या दोहींचा समुच्चय असा असल्यामुळें त्यांच्या संप्रदायाविरुद्ध नचिकेतानें वर्तन केलें आहे. त्यानें खरें म्हटलें तर आलेलें प्रेयही पदरांत प्रथम बांधून घेऊन मग आत्मबोध करून घेतला पाहिजे होता!! चुकला बिचारा. असो, छांदोग्य, ईशावास्य वगैरे उपनिषदांचे उतारे रहस्यकारांनीं ३५६ पानांवर दिलेले आहेत व त्या श्रुतीचे आधारें आपला कर्मयोग पुष्ट झाला आहे असें त्यांचें म्हणणें आहे. उपनिषदांतील याविरुद्ध अनेक अवतरणें देतां येतील. आम्हीं नियमित केलेल्या योगाची मर्यादा

संपत आली. शिवाय रहस्यकारांनीं " शेषत्वात्पुरुषार्थवादो यथाऽन्येष्विति जैमिनिः " या पूर्वपक्षांतील सूत्रांतर्गतच अवतरणें घेऊन आपल्या पक्षाचें मंडन केलें आहे, हें ब्रह्मसूत्रभाष्य वाचणाराचे लक्षांत येईलच. परंतु या पूर्वपक्षाचें खंडन " अधिकोपदेशात्तु बादरायणस्यैवं तद्दर्शनात् " इत्यादि सूत्रांनीं बादरायणांनीं स्वतः केलेलें आहे. त्यांतील पूर्वपक्ष व सिद्धान्त वाचकांनींच पाहावेत म्हणजे त्यांनाच समजून येईल कीं, रहस्यकारांनीं एकदां बोथट झालेलीं शस्त्रास्त्रें घेऊन पुन्हां तीं नवीं म्हणून चालविण्याचा प्रयत्न केला आहे. आचार्यांनीं आपल्या भाष्यानेंही या पूर्वपक्षाचें खंडन केलें आहे. याकरितां, आतां या पिष्टपेषणांत पडण्याचें प्रयोजन आम्हांस दिसत नाहीं.

तपः श्रद्धे ये ह्युपवसन्त्यरण्ये शान्ता विद्वांसो भैक्ष्यचर्यां चरंतः ।
सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयान्ति यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥
परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन ।
तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥

मुण्डक० १।२।११।१२.

ह्या तऱ्हेचीं कर्मसंन्यासपर वचनें उपनिषदांतून आहेत. परंतु आमचे मतें हीं विरोधी वाक्यें नसून परस्परसहाय्यकच आहेत. त्यांचा विनियोग मात्र अधिकारपरत्वें करणेचा आहे. तैत्तिरीयोपनिषदांतील 'सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः ।' इत्यादि कर्मयोगपर म्हणून दिसणारीं वाक्यें हीं ब्रह्मज्ञानापूर्वी शिष्यास केलेल्या उपदेशाचीं आहेत. "वेदमनूच्याचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति" अशी प्रस्तावना या विधीच्या आरंभीं आहे हें रहस्यकारांना माहीत नसेल हें संभवत नाहीं. परंतु अधिकारभेदानें वेदांतील वचनें पहावयाचीं आहेत हें त्यांच्या गांवीं नाहीं. असो. हा निष्ठाद्वय योग संपविण्यापूर्वी मनूचीं वचनें देणें इष्ट वाटतें.

सुखाभ्युदिकं चैव नैःश्रेयसिकमेव च ।
प्रवृत्तं च निवृत्तं च द्विविधं कर्म वैदिकम् ॥
इह चामुत्र वा काम्यं प्रवृत्तं कर्म कीर्त्यते ।
निष्कामं ज्ञानपूर्वं तु निवृत्तमुपदिश्यते ॥
प्रवृत्तं कर्म संसेव्यं देवानामेति साम्यताम् ।
निवृत्तं सेवमानस्तु भूतान्यत्येति पञ्च वै ॥

हीं वचनें रहस्यकारांनीं पहावींत व आपल्या कर्मयोगाचें स्वरूप कर्मसंन्यासरूपच आहे कीं नाहीं, हें समदृष्टीनें पाहावें ही आमची त्यांना विनंति आहे.

१३ कर्मयोग.

नियतं कुरु कर्म त्वं कर्मज्यायो ह्यकर्मणः ॥
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥

म० गी० अ० ३ श्लो० ८.

(तुला नित्य कर्म केलें पाहिजे. अकर्मापेक्षां कर्म श्रेष्ठ आहे, अकर्मनिष्ठेनें तुझी शरीर-यात्रासुद्धां चालणार नाहीं.)

अर्जुन वनांतील कष्टास कंटाळून लोभमूलक राज्याच्या इच्छेनें युद्धास प्रवृत्त झाला असतां त्यास ब्राह्मणधर्मांतील भैक्ष्यचर्याचा अवलंब करावा अशी अधर्म्य वासना उत्पन्न झाली, व बांधवांच्या भावी विनाशानें त्याचे मनांत शोकमोहाचा प्रादुर्भाव झाला, या दोन्ही गोष्टी ज्ञानविरुद्ध आहेत, असें असतां अर्जुन तत्त्वज्ञानाच्या गोष्टी भगवंतास सांगूं लागला हें भगवंतांस अर्थात्‌च सहन झालें नाहीं. तेव्हां त्यांनीं अर्जुनास उपहासयुक्त वाणीनें म्हटलें कीं, अशोच्य गोष्टींबद्दल तूं शोक करीत आहेस व ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगत आहेस, व तुझ्या अधिकारानुरूप प्राप्त झालेलें कर्म न करितां त्याचा मूढपणानें त्याग करीत आहेस, हें चांगलें नव्हे. यापासून तुझें इहपर कल्याण होणार नाहीं. तुझ्या वर्णाचा धर्म म्हणजे युद्ध, तुला केलेंच पाहिजे. भिक्षावृत्ति अथवा स्वरूपसंन्यास हा ब्राह्मणवर्णाचा धर्म आहे.

चत्वारो ब्राह्मणस्योक्ता आश्रमाः श्रुतिचोदिताः ।
क्षत्रियस्य त्रयः प्रोक्ता द्वावेको वैश्यशूद्रयोः ॥

असें याज्ञवल्क्यवचन आहे.

प्राजापत्यां निरूप्येष्टिं सर्ववेदसदक्षिणाम् ।
आत्मन्यग्नीन्समारोप्य ब्राह्मणः प्रव्रजेद्गृहात् ॥

म० अ० ६ श्लो० ३८.

असें मनूचें वचन आहे.

"ब्राह्मणाः प्रव्रजन्ति" अशी जाबालश्रुति आहे. या वचनांवरून क्षत्रियास संन्यासाश्रम विहित नाहीं हें उघड आहे. कदाचित् कूर्म, ब्रह्माण्ड वगैरे पुराणादिकांमध्यें "क्षत्रियांनींही संन्यास घ्यावा" अशीं वचनें आहेत, तीं या श्रुतिस्मृतींविरुद्ध मान्य केल्यास तो क्षत्रियांचा संन्यास अतिशय वैराग्यानंतरचा आहे, हें त्याच वचनांवरून उघड होत आहे. कसेंही असलें तरी, अर्जुन हा संन्यास घेण्यास पात्र नव्हता हें मागें सिद्ध केलेंच आहे. तो ज्ञानीही नव्हता. त्याचीं

भगवद्गीतेंतील भूमिका इतरे जनांसारखी मूढ व अज्ञानी तन्हेची आहे हें गीतेंतील स्पष्ट वचनांच्या आधारें मागें दाखविण्यांत आलेंच आहे. तेव्हां अर्जुन हा सिद्ध नसून साधक आहे. साधकदशेंत ज्ञानाच्या गोष्टी सांगून आरंभिलेलीं अगर अवश्य आरंभावयाचीं कार्यें सोडून देण्यास लोक कसे प्रवृत्त होतात याचीं उदाहरणें प्रस्तुत कालांत पुष्कळच पहावयास सांपडतील. ब्रह्मविद्येच्या अपक्क वारुणीनें धुंद होऊन समाजांतील वर्णभेद, आश्रमभेद, योग्यताभेद, इत्यादि अवश्य पाळल्या जाणाऱ्या भेदांची व वेदाज्ञेनें विहित असलेल्या कर्मयोगाची कशी पायमल्ली चाललेली आहे हें निरनिराळ्या निघालेल्या गुरुपंथांवरून सहज कळण्याजोगें आहे. ब्रह्म भेदातीत आहे हें खरें; परंतु तें अनधिकाऱ्यांकरितां नव्हे. अनधिकाऱ्यांच्या हातांत ही दिव्यज्योति कोलतीसारखी आहे. व्यवहारांत या अपक्क ज्ञानापासून फार खराबी होईल व तशी ती हल्लीं होतही आहे. ही ब्रह्मविद्या वेदांतील आहे.

"तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति ।
यज्ञेन दानेन तपसानाशकेनैतमेव विदित्वा मुनिर्भवति"

ह्या बृहदारण्यकोपनिषद्वचनाप्रमाणें हा आत्मा श्रुतींतच श्रुत आहे. अलीकडे उत्पन्न झालेल्या धर्मांतून व पंथांतून त्याचा अस्पष्ट अनुवाद केलेला आढळला, तथापि आत्मविद्येची साधनांसह मीमांसा वेदधर्मांशिवाय इतरत्र कोठेंही मिळणार नाहीं. उपनिषदांचीं प्राकृत भाषांतरें, थिऑसफीचीं व्याख्यानें, विवेकानंदादिकांसारख्या वक्त्यांचीं भाषणें, तुकाराम, रामदास, एकनाथ इत्यादि साधुपुरुषांच्या ज्ञानपर गाथा इत्यादि ग्रंथांतून वेदान्तानिरीक्षण केल्यामुळें या सर्व ज्ञानाचा अनादि व अनंत असा जो वेदनिर्झर, त्याची लोकांना विस्मृति पडावी व अनादर उत्पन्न व्हावा हें साहजिक आहे. ज्ञानाच्या मोठमोठ्या गप्पा मारणाऱ्या लोकांत स्वाध्याय केलेले कितीं महात्मे आढळतील ! रोज पंचमहायज्ञ करणारे लोक या पंडितांत कितीसे सांपडतील ! या सर्व ब्रह्मनिष्ठांच्या तोंडीं कर्मनिंदा सदोदित भरलेली असते. स्नानसंध्यादि नियमांचा यांना पूर्ण तिरस्कार आलेला असतो, कारण यांची समज यांना ब्रह्मज्ञान झालेलें आहे म्हणून. व्रतोपवासांचें तर नांवच नको, कारण हीं पडलीं बहिरंग साधनें ! एवंच अंतरंगसाधनाविषयीं अपात्रता व बहिरंगसाधनाविषयीं तिरस्कार !! यामुळें "बोलाचाची भात बोलाचीच कढी" या असल्या पोकळ शब्दचावटीशिवाय या लोकांच्या पदरीं कांहींएक पडत नाहीं.

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥

या भगवदुक्तीप्रमाणें या लोकांचा आचार मिथ्याचार होत आहे. वेदाचे ठिकाणीं अनादर करणारास मुक्ति नाहीं, हा परमसत्य सिद्धान्त आहे. अर्जुनाच्या ज्ञानाच्या गप्पांनीं भगवंताच्या मनांत वरील चित्र उभें राहिलें

यांत संदेह नाहीं. आधुनिक ब्रह्मज्ञांप्रमाणें कांहीं अंशीं अर्जुनाची स्थिति झाली होती, हें त्याच्या कृतीवरून व उक्तीवरून उघड होत आहे. त्यामुळें भगवंतांना खरा वैदिकमार्ग काय आहे याबद्दल स्पष्ट व्याख्यान करणें भाग पडलें. वैदिकधर्माच्या तीन निष्ठा—कर्म, उपासना व ज्ञान. या तिन्हींचें सोपपत्तिक व्याख्यान भगवंतांनीं श्रुतिस्मृतींस धरून केलें व स्वधर्मपालनांतच श्रेय आहे असें अर्जुनास सांगितलें. या व्याख्यानांत भगवंतांनीं वर्णाश्रमधर्मांबद्दल अत्यंत आदर दर्शविला आहे इतकेंच नव्हे, तर अर्जुन व श्रीकृष्ण या शिष्यगुरुद्वयाच्या चित्तांत ह्या वर्णाश्रमधर्मांविषयीं पराकाष्ठेची श्रद्धा व काळजी वसत होती हें अर्जुनाच्या "संकरो नरकायैव" व श्रीकृष्णाच्या "संकरस्य च कर्तास्यामुपहन्यामिमाः प्रजाः" यासारख्या वचनांवरून पूर्ण विशद असतां रहस्यकार ह्मणतात, श्रीकृष्णास ह्या जुन्या व निर्जीव वर्णाश्रमधर्मांची पर्वा नव्हती. वर्णाश्रमधर्म कसेही असोत, त्याबद्दल श्रीकृष्ण उदासीन आहेत. श्रीकृष्णांच्या प्रत्यक्ष उक्तीकडे रहस्यकार दुर्लक्ष्य करून आपला नवा धर्म स्थापित करूं पहात आहेत. आतां कलियुगांत अगर हल्लींच्या मार्षेत लिहावयाचें ह्मणजे विचारक्रान्तियुगांत नवा धर्म घालून द्यावयाची रहस्यकारांची महत्वाकांक्षा असल्यास तिचे आड आह्मी येत नाहीं. आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितलेला हा धर्म नसून तो धर्म वैदिक, सनातन, श्रौतस्मार्त व शाश्वतीय असा आहे. येशु ख्रिस्तानें यहुदी धर्मांत सुधारणा करून जसा नवा धर्म काढला त्याप्रमाणें वैदिकधर्म सुधारून नवीन गीताधर्म श्रीकृष्णांनीं उत्पन्न केला नाहीं. असें करणें ह्मणजे श्रीकृष्णास स्वतःसच घातक झालें असतें. कारण "यस्य निःश्वसितं वेदाः" ह्या वचनास बाध येऊन श्रीकृष्णाचें श्रुतिकर्तृत्व लयास गेलें असतें व अर्थातच वैदिक मार्ग अप्रमाण ठरल्यावर सर्वच तन्मूल इतर धर्म अप्रमाण ठरले असते. तेव्हां असा "मूले कुठारः" सारखा प्रयत्न भगवान् कधींही करणार नाहींत. भगवानांचा अर्जुनास व वसिष्ठांचा श्रीरामचंद्रास उपदेश हे दोन्ही अकालीं ब्रह्मज्ञान व वैराग्याच्या गोष्टी बडबडणाऱ्या अपक्व शिष्यांकरितां आहेत हें विसरतां कामा नये. अर्जुनाचा कडेकोट युद्धसंभार व श्रीरामचंद्राचें पूर्ववय व भावी अद्भुत कर्तव्यें इकडे लक्ष देऊन श्रीकृष्ण व वसिष्ठ या दोघांनीही खऱ्या सनातन धर्माचा उपदेश त्यांना केला आहे. अर्जुनाची स्थिति आधुनिक थिऑसफीस्टसारखी झाली होती. ब्रह्मज्ञान त्यानें ऐकिलें होतें, उपनिषदांतून प्रसंगवशात् आलेली कर्मनिंदा थिऑसफीस्टासारखी त्यानेंही पाहिली होती, "ब्राह्मणश्वपचभेदविचारः प्रत्यगात्मनि कथं तव युक्तः" सारख्या ब्रह्मस्थितींतील वाक्यांनीं त्याचें डोकें, आधुनिक गुरूपदेश घेणाऱ्या शेंकडों शिष्यसमुदायाप्रमाणें वैदिक मार्गापासून लांब भडकलें होतें. अशा व्यवहाररत परंतु शब्दब्रह्मनिष्ठ अर्जुनास निमित्त करून भगवंतांनीं अधिकारपरत्वें लागू होणारा कर्म, उपासना व ज्ञान ह्या तिन्ही मार्गांचा सोपपत्तिक उपदेश

केला आहे, असें असतां रहस्यकारांना त्या उपदेशांत केवळ आपला कर्मयोगच दिसून येत आहे. अर्जुनास युद्ध करण्यास लाविलें म्हणून युद्धधर्मच गीतेंत प्रतिपाद्य आहे असें कां म्हणूं नये ? बाकीच्या कर्माचा अन्तर्भाव या युद्धकर्मात करावयास नको आहे. युद्धाचा उपक्रम, युद्धाचा उपसंहार व युद्धाचाच उपदेश ! झालें, गीताशास्त्र हें युद्धशास्त्र ठरलें ! तेव्हां या शास्त्राचें अध्ययन प्रस्तुत महायुद्धांतील वीरांनींच करणें उचित आहे. अन्य जनाचा या शास्त्रांत अधिकार नाहीं असें न्यायानेंच प्राप्त होईल. परंतु हा न्याय रहस्यकारांस अर्थातच मान्य होणार नाहीं. कारण त्यांची कर्माची व्याप्ति जगद्व्यापी आहे. ती नुसत्या युद्धकर्मापुरती नाहीं. त्यांच्याच उपक्रमोपसंहाराच्या पालोपदावरून गीता युद्धशास्त्र होऊं पहात आहे, याचा त्यांनीं नीट विचार करावा. आमचें म्हणणें आहे कीं, अशा वेदान्तज्ञानानें वैदिक कर्मांवर अश्रद्धा करणाऱ्या शिष्यास पुढें करून सर्व धर्माचा साधनासह ऊहापोह भगवंतांनीं केला आहे. त्यांत योगाचें म्हणजे पातंजल योगाचें साधन प्रधान धरून कर्म, भक्ति, ज्ञान या तिहींचेंही यथासमय विवेचन केलें आहे. भगवंतांनीं प्रथमच अर्जुनास म्हटलें आहेः—

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥

अ० २ श्लो० ५३.

श्रुतींतील अनेक साधनवचनांनीं तुझें डोकें भडकलें आहे. तें समाधिसाधनानें जरा स्थिर होऊं दे, म्हणजे तुला समबुद्धियोग प्राप्त होईल. तुझा अधिकार कर्म करण्याचाच आहे. तुला कर्मत्याग करतां येत नाहीं. आत्मरत होशील त्यावेळीं तुला उपदेशाची जरूरीच रहाणार नाहीं. परंतु तूं तसा नाहींस म्हणून (तस्मात्) तूं कर्मेंच करीत राहिलें पाहिजे. साधकदशेंतील सर्व लोकांना हाच भगवंताचा उपदेश उचित व अवश्य आहे. नाहींतर "इदं च नास्ति परं च न लभ्यते" ह्यासारखी स्थिति होईल. सर्व गीता ही साधकास सांगितली आहे. सिद्धास सांगितली नाहीं. हीं दोन वाक्यें वाचकांनीं व रहस्यकारांनीं हमेष हृदयांत बाळगिलीं पाहिजेत, त्याविना गीतारहस्य कळावयाचें नाहीं. सिद्धास उपदेश कोणत्याही काळीं उपपन्न नाहीं. असो.

कर्मास अधिकारी दोन. एक इहामुत्रफलाकांक्षी (इहपरकल्याणकांक्षी) व दुसरा मुमुक्षु. पहिल्यावर्गांत केवळ फलाकांक्षीचाच अन्तर्भाव होतो, असें मात्र कोणी समजूं नये. कारण आमचा वैदिकधर्म धर्मार्थकाममोक्ष अशा चार पुरुषार्थांचा आहे. अतिमंद मुमुक्षुत्व व फलकांक्षाप्रधानत्व ज्यांचे ठिकाणीं आहे अशांचाही समावेश पहिल्या वर्गांत होतो व मुमुक्षा प्राधान्येंकरून व मंद फलाकांक्षित्व ज्याच्यांत आहे अशांचाही समावेश दुसऱ्या वर्गांत होतो. पशुकाम, द्रव्यकाम, स्वर्गकाम असे जे लोक असतात त्यांना त्यांना तो तो संकल्प करून यज्ञविधि

सांगितलेला आहे. "अनेन प्रसविष्यध्वं एष वोस्त्विष्टकामधुक्" अशा तऱ्हेचा यज्ञविधि ब्रह्मदेवानेंच निर्माण केला आहे असें भगवान् सांगत आहेत. सृष्टिक्रमाबरोबरच यज्ञाची उत्पत्ति आहे. यज्ञानें देवाचें यजन करून त्यांचेकडून वृष्टि, धन, पुत्र, पशु इत्यादिकांची प्राप्ति करून घ्यावयाची आहे. यज्ञ संकल्परूप आहेत. वैदिक कर्मयोग संकल्परूप आहे, लौकिककर्मेही संकल्परूप आहे.

संकल्पमूलः कामो वै यज्ञाः संकल्पसंभवाः ।
व्रतानि यमधर्माश्च सर्वे संकल्पजाः स्मृताः ॥
अकामस्य क्रिया काचिद्दृश्यते नेह कर्हिचित् ।
यद्यद्धि कुरुते किंचित्तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥

म० स्मृ० अ० २ श्लो० २४.

अशा तऱ्हेची सर्व लौकिक व वैदिक कर्मांची स्थिति आहे. परंतु वैदिक कर्मांना श्रद्धा मात्र अवश्य लागत असते, तसेंच वैदिक कर्म चातुर्वर्ण्यमय आहे.

यो वै श्रद्धामनारभ्य यजते नास्येष्टाय श्रद्दधते ॥

असें कृष्णयजुःसंहितेंत पहिल्या कांडांत सहाव्या प्रपाठकांत वचन आहे.

"शास्त्रीये तु व्यवहारे यद्यपि बुद्धिपूर्वकारी नाविदित्वात्मनः परलोकसंबंधमधिक्रियते"

असें श्रीशंकराचार्यांचें वचन आहे. आत्मा देहाहून भिन्न आहे व त्याचा परलोकांशीं संबंध आहे ही भावना असल्याशिवाय शास्त्रीय व्यवहारास अधिकार येत नाहीं. वेदांतील मंत्र सर्व देवतामय आहेत. देवतांवर श्रद्धा असल्याशिवाय मंत्रांचा उपयोग नाहीं. याजन, अध्यापनादि कर्में ब्राह्मणांचींच असल्यामुळें व श्रौताग्नीवरील कर्ममीमांसेंत "ब्राह्मणो वसन्ते क्षत्रियो निदाघे, वैश्यः शरदि हेमन्ते वा रथकारस्तु वर्षासु विदध्यात्" असा अग्न्याधानाचा विधि शतपथ ब्राह्मणांत विहित असल्यामुळें श्रौत कर्में तीन वर्णांची असून, वैदिक धर्म चातुर्वर्ण्यात्मक आहे, हें सिद्ध होत आहे. आतां येथें पुन्हां हें बजावणें अवश्य आहे कीं, ज्या लोकांचा पुनर्जन्मावर विश्वास नाहीं, वैदिक देवतांवर विश्वास नाहीं, चातुर्वर्ण्यव्यवस्था ज्यांना मान्य नाहीं त्यांचेकरितां वैदिकधर्म नाहीं, लौकिक व्यवहारांत त्यांनीं वाटेल त्या इष्ट सुधारणा घडवून आणाव्या आमची त्यांस कोणतीहि हरकत नाहीं. आमची त्यांना एवढीच विनंति आहे कीं, त्यांनीं आपल्यास शास्त्रानुकूलतेची जरूरी ठेवूं नये व वैदिक धर्मवचनांची हवी तशी ओढाताण करूं नये. शास्त्रीय व्यवहारांत अशास्त्रीय मार्गांचा अवलंब करून त्यास भलतेंच रूप देऊं नये. असो.

कर्में दोन प्रकारचीं आहेत. एक श्रौत व दुसरें स्मार्त. श्रौत धर्म, श्रौतसूत्रांतून व प्रत्येक वेदाच्या ब्राह्मणांतून सांगितले आहेत. स्मार्त धर्म, स्मृति व गृह्य-

सूत्रें यांत सांगितले आहेत. अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रायणी, चातुर्मास्य, निरूढ-पशुबंध, सौत्रामणी अशा सात हविर्यज्ञसंस्था आहेत. अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम, उक्थ, षोडशी, वाजपेय, अतिरात्र व आप्तोर्याम या सात सोमयज्ञ संस्था आहेत. हे सर्व प्रकार श्रौताग्नीवर होत असतात. याशिवाय आयुष्कामेष्टि, पुत्रकामेष्टि, वर्षकामेष्टि, कारीरेष्टि इत्यादि काम्य इष्टि पुष्कळ करावयाच्या असतात. हल्ली असे श्रौताग्नि ठेवलेले लोक फारच थोडे सांपडतील. या श्रौताग्नि ठेवणाऱ्या इसमास "अग्निहोत्री" असें म्हणतात. "यावज्जीवं अग्निहोत्रं जुहुयात्" असा श्रुतीचा विधि आहे. अग्निहोत्र हें ब्राह्मणाचें नित्य कर्म आहे. लौकिकाग्नि व गृह्याग्नि या दोन्हींवरील कर्में हल्ली प्रचारांत पुष्कळांस पहावयास मिळतात. लौकिकाग्नीवर ब्रह्मचाऱ्याचा समिद्धोम होत असतो. तसेंच नित्य सायंप्रातर्वैश्वदेव, उत्सर्जनोपाकर्म होम, उपनयन इत्यादिकांतील होम होत असतात. लग्नाचे वेळी होमाकरितां जो अग्नि तयार करतात त्यास गृह्याग्नि अगर स्मार्ताग्नि म्हणतात. हा अग्नि गृहस्थानें आमरणान्त पाळिला पाहिजे. याही अग्नीवर नित्य व नैमित्तिक होम करावे लागत असतात. लौकिक व गृह्य या दोन्ही अग्नींवरील कर्में स्मार्त कर्में होत.

श्रुति व स्मृति या दोन्हींचे अपेक्षेनें श्रौत व स्मार्त असे कर्मांत दोन भेद मानले. परंतु स्वरूपानें कर्मांचे चार भेद आहेत. नित्य, नैमित्तिक, काम्य व प्रायश्चित्त. "अहरहः संध्यामुपासीत" "स्वाध्यायोऽध्येतव्यः" "यावज्जीवं अग्निहोत्रं जुहुयात्" "तद्यदग्नौ जुहोति स देवयज्ञो यद्बलिं करोति स भूतयज्ञो यत्पितृभ्यो ददाति स पितृयज्ञो यत्स्वाध्यायमधीयते स ब्रह्मयज्ञो यन्मनुष्येभ्यो ददाति स मनुष्ययज्ञ इति ॥ ३ ॥ तानेतान्यज्ञानहरहः कुर्वीत ॥४॥" (आश्व० गृ० सू०) इत्यादि सारखीं कर्में हीं नित्यकर्में होत. हीं अवश्य केलींच पाहिजेत. हीं कर्में न केल्यापासून मात्र प्रत्यवाय आहे. ह्या कर्मांचा संन्यास विहित नाहीं. यावज्जीव तीं करणेंच प्राप्त आहे. (हें सर्व शास्त्र साधकाकरितां आहे हें लक्षांत असूं दे. "सर्वे विधिनिषेधाः स्युरेतयोरेव किंकराः" अशासारख्या ब्रह्मनिष्ठांकरितां अगर सिद्धाकरितां नव्हे). म्हणूनच भगवंतांनीं म्हटलें आहे,

" नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते "

अ० १८.

" वैश्वानरं द्वादशकपालं निर्वपेत्पुत्रे जाते " सारखी श्रुत्युपदिष्ट किंवा उपराग स्नानादिकासारखी स्मृत्युपदिष्ट कर्में नैमित्तिक होत. हीं नैमित्तिक कर्में करण्यापासून साधकास कोणतीहि हानि नाहीं. तीं बंधक होत नाहींत. नित्य कर्मांचा लोप झाल्यास अगर सुरापानादि दोष घडल्यास म्हणजे निषिद्ध कर्माचरण घडल्यास त्या दोषांचें परिहरण करण्यास प्रायश्चित्त-कर्मांचा फार उपयोग आहे. नित्य अगर निषिद्ध कर्माचरणापासून उत्पन्न झालेले दोष घालविणें हें प्रत्येक साधकाचें

कर्तव्य आहे व तें त्यानें केलेंच पाहिजे. कृच्छ्र-चांद्रायणादि व्रतें, उपवास, जप, प्राणायाम, ऋग्वेदादि अपौरुषेय ग्रंथांचीं पारायणें, दानें इत्यादि स्मृतींतून सांगितलेलीं कर्में हीं प्रायश्चित्त कर्में होत. शरीरशुद्धीकरितां यांचेंही आचरण विहित व उक्त आहे. यज्ञयागादि क्रिया करीत असतां घडलेल्या दोषांचे निवारणार्थही प्रायश्चित्तें श्रौतमार्गांत आहेत त्यांचेंही यथाविध आचरण करणें भाग आहे. तेव्हां नित्य, नैमित्तिक व प्रायश्चित्त या तिन्ही कर्मांचें आचरण साधकानें केलेंच पाहिजे. हीं सर्व कर्में हा देहाचा मृत्पिंड शुद्ध सात्विक करण्याकरितां योजिलेलीं आहेत. गर्भाधानादि षोडश संस्कारांनीं हा साधकदेह पुनीत करावयाचा आहे. ब्रह्मज्ञानाचा उदय होण्यास पिंड सात्विक असला पाहिजे. तसेंच पिंडोपजीवी बुद्धीसुद्धां सात्विक असली पाहिजे. शरीर व बुद्धि हीं दोन्हीं शुद्ध सात्विक झाल्याशिवाय ज्ञानोदय होत नाहीं इंद्र-विरोचनाच्या कथेंत वारंवार दोघांनाहीं तपश्चरण करण्यास सांगण्यांत गुरूचा हाच हेतु होता.

वैदिकैः कर्मभिः पुण्यैर्निषेकादिर्द्विजन्मनाम् ।
कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ॥
गार्भैर्होमैर्जातकर्मचौडमौञ्जीनिबन्धनैः ।
बैजिकं गार्भिकं चैनो द्विजानामपमृज्यते ॥
स्वाध्यायेन व्रतैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः ।
महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ॥

म० स्मृ० अ० २ श्लो० २६।२७।२८.

मनुस्मृतींत, हे सर्व संस्कार द्विजास केलेच पाहिजेत, यायोगें बीजगत, गर्भगत वगैरे दोष नाहींसे होतात, असें म्हटलें आहे. अठ्ठाविसाव्या श्लेकांत सांगितलेल्या कर्मांनीं शरीर ब्रह्मज्ञानास योग्य होतें असें सांगितलें आहे. आतां आधुनिक पंडितांची येथें अशी शंका निघेल कीं, ह्या संस्कारांनीं शरीरांतील व बुद्धींतील दोष कसे नाहींसे होतात ? याला एवढेंच उत्तर आहे कीं, शेवटीं ब्रह्मज्ञान करून घ्यावयाचें आहे हा तरी अंतिमहेतु अगर परमपुरुषार्थ आपणास मान्य आहे काय ? नसल्यास वादच नाहीं. आपण या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं. नेव्हां आपण दृष्टव्यवहारांत नैपुण्य मिळवा व प्रपंच नेटका करा. वरील परमपुरुषार्थ मान्य असल्यास हा पुरुषार्थ आहे असें आपणास कशावरून समजून आलें ? बायबल, कुराण, झेंदावेस्त अशा धर्मग्रंथांवरून अगर कांट, हेगेल, स्पेन्सर इत्यादि पाश्चात्य तात्विक ग्रंथावरून ही कल्पना आपणास आली हें प्रथम समजलें पाहिजे. परधर्मग्रंथांवरून समजलें असें म्हणणें असेल तर तें अनुपपन्न आहे. कारण त्या ग्रंथांतून हा विषय प्रतिपाद्य नाहीं. क्वचित् प्रसंगीं बायबलांतून "That whosoever believeth in him should not perish but have eternal life" (St. John 3. 15) किंवा " I am in my father and ye in me and I in you" (12, 20) (जो कोणी

मजवर श्रद्धा ठेवील त्याला अमृतत्व मिळेल. बापाचे ठाईं मी आहें. तुम्हीं माझ्यांत आहां मी तुमच्यांत आहें.) अशा तऱ्हेचीं वाक्यें येतात परंतु इकडील ब्रह्मविद्या व विद्यासाधन यांचा विचार या ग्रंथांतून मुळींच नाहीं. बरें याच ग्रंथावर आपला विश्वास असल्यास तसा स्वधर्मपरित्याग करा, व त्या ग्रंथांत जीं साधनें सांगितलीं आहेत त्यांचा खुशाल आश्रय करा व "स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः" असा इशारा देणाऱ्या श्रीभगवद्गीतेकडे लक्ष देऊं नका. पाश्चात्य तत्त्वज्ञांनीं लिहिलेल्या ग्रंथांवरून ब्रह्म आपल्यास अवगत झालें असेल तर तें अगदींच अनुपपन्न आहे हें आम्हीं स्वतंत्र योगांत दाखविणार आहोंत. तुमच्या अनुमानानें आत्मा सर्वांसच अवगत आहे. आमचें आग्रहाचें असें मत आहे कीं, आत्मविद्या व ती अवगत करण्याचीं साधनें वेदधर्मखेरीज अन्यत्र उपलब्ध नाहींत. असें जर आहे तर ब्रह्मज्ञानापुरती श्रुति प्रमाण व ब्रह्मज्ञानप्राप्तीच्या साधनापुरती ती अप्रमाण, असा अर्धजरतीन्याय कोणीही मान्य करणार नाहीं. तात्पर्य हें आहे कीं, अशा "अर्धजरतीन्याय" पत्करणाऱ्या लोकांकरितां अर्जुनास निमित्त करून "गीताधर्म" श्रीकृष्णांनीं उपदेशिला आहे. साधकांनीं कर्मत्याग करणें अत्यंत अनिष्ट आहे, असें भगवान्चसे काय पण संन्यासमार्गीय सुद्धां साग्रह सांगतात.

चित्ते ह्यादर्शवद्यस्माच्छुद्धे विद्या प्रकाशते ।
यमैर्नित्यैश्च यज्ञैश्च तपोभिस्तस्य शोधनम् ॥
शरीरादि तपः कुर्यात्तद्विशुद्ध्यर्थमुत्तमम् ।
मन आदिसमाधानं तत्तद्देहविशोषणम् ॥
मनसश्चेन्द्रियाणां च ह्यैकाग्र्यं परमं तपः ।
तज्ज्यायः सर्वधर्मेभ्यः स धर्मः पर उच्यते ॥

उ० सा० प्र० १७ श्लो० २२।२३।२४.

चित्तशुद्धि होण्याकरितां यज्ञयागादिकांचें व तिन्ही प्रकारच्या तपांचें आचरण करणें भाग आहे असें आचार्यही सांगत आहेत. तसेंच:-

देहाद्यैरविशेषेण देहिनो ग्रहणं निजम् ।
प्राणिनां तदविद्योत्थं तावत्कर्मविधिर्भवेत् ॥

उ० सा० प्र० १ श्लो० १६.

जोंपर्यंत देहादिकांपासून आपलें स्वरूप निराळें नाहीं, अशी बुद्धि मनुष्यांत आहे तोंपर्यंत त्याला शास्त्रविधि प्रमाण आहे. तसेंच छांदोग्योपनिषदावरील भाष्यांत (आनंदाश्रमप्रतींत १७० पृष्ठावर) आचार्य म्हणतात—

'कर्मविधीनां अप्रामाण्यप्रसङ्ग इति चेत् न अनुपमर्दितभेदप्रत्ययवत्पुरुषविषये प्रामाण्योपपत्तेः स्वप्नादिप्रत्ययइवप्राक्प्रबोधात्'

(ज्यास अद्वैत बोध अथवा अभेदप्रत्यय झालेला नाहीं अशा पुरुषाचे ठिकाणीं कर्मविधि प्रमाणभूत असतो या करितां कर्मविधि व्यर्थ आहेत असें कोणी समजूं नये.)

रहस्यकारांनीं पुनः पुनः निर्दिष्ट केलेल्या ब्रह्मसूत्रावरील (ब्र० सू० ३।४२६) भाष्यांत सुद्धां आचार्य म्हणतात, "**उत्पन्ना हि विद्या फलसिद्धिं प्रति न किंचिदन्यदपेक्षते उत्पत्तिं प्रतित्वपेक्षते। कुतः यज्ञादिश्रुतेः। तथाहि श्रुतिः—'तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसा 'नाशकेन' (बृ० ४।४।२२) इति यज्ञादीनां विद्यासाधनभावं दर्शयति..... एवमाश्रमकर्माणि विद्यया फलसिद्धौ नापेक्ष्यन्त उत्पत्तौ चापेक्ष्यन्त इति॥**"

अशा अनेक स्पष्ट वचनांवरून आचार्यांचें कर्मविधीबद्दल काय मत होतें हें उघड असतां अगदीं निर्भेळ संन्यासमार्ग त्यांचे गळ्यांत रहस्यकारांनीं कां अडकविला आहे कोण जाणे! असो, भगवानही गीतेंत हेंच सांगत आहे.

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते।

(कर्माचरण प्रथम करून चित्तशुद्धि झाल्याशिवाय पुरुषास नैष्कर्म्यसिद्धि मिळत नाहीं.)

नच संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति॥

एकदम कर्मसंन्यास करूं म्हणशील तर नुसत्या कर्मसंन्यासानेंच (चित्तशुद्धि झाल्याविना) मोक्ष मिळणार नाहीं. पुढें दोन तीन श्लोक सोडूनच भगवान् सांगतात, "नियतं कुरु कर्म त्वं" (तुला नित्य कर्म करणेंच भाग आहे) हा उपदेश साधक अशा अर्जुनास असून सिद्ध अर्जुनास नव्हे हें अर्जुनाचे अधिकारनिर्णयावरून सिद्ध होत आहे. अर्जुनाचा अधिकारनिर्णय मागें अनेक भगवद्गीतेंतील प्रमाणांवरून केलाच आहे. महाभारतांतील भगवद्गीतेनंतरच्या प्रसंगांतील अर्जुनाच्या अनेक कृतींवरूनही त्याचा अधिकार पूर्ण निर्णीत होत आहे. रहस्यकार म्हणतात, श्रीकृष्णास तसें स्पष्ट शब्दांनीं म्हणण्यास काय हरकत होती!

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठभारत॥

अ० ४।४२.

तसेंच

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।

अ० १८।५९.

अशा तऱ्हेच्या अज्ञान व अहंकार या दोन्ही दोषांच्या वृत्ति ज्याचे मनांत जागृत आहेत असा अधिकारी अर्जुन आहे. रहस्यकार म्हणतात, अर्जुनास "पूर्ण ज्ञानी केल्यावर त्याच्याकडून युद्ध करविलें आहे. यावरून ज्ञाल्या पुरुषानें ज्ञानोत्तरही निष्काम कर्म करीत रहाण्याचा पक्षच सर्वोत्तम, असा भगवंतांचा

अभिप्राय असल्याचें स्पष्ट सिद्ध होतें." (गी० र० पा० ३०८ पहिली प्रत). भगवद्गीता सांगून जर अर्जुन लागलींच ज्ञानी झाला तर तुम्हीं आम्हीं भगवद्गीतेचे वाचकही जीवन्मुक्त झालोंच म्हणावयाचें ! आम्हीं म्हणतों हेंच शाब्दज्ञान. हें शब्दज्ञानच केवळ मोक्षद नसून हें जिज्ञासुत्व व मुमुक्षत्व उत्पन्न करीत असतें, याला फारशी मातब्बरी देण्याचें कारण नाहीं. परंतु रहस्यकार यालाच वारंवार "ज्ञान" ही संज्ञा देत असतात व आपणास व इतर वाचकांस कृतार्थ मानीत असतात. बरें; क्षणभर वादाकरितां असेंही मानलें कीं, अर्जुन ज्ञानी झाला. रहस्यकारांनीं अर्जुनास ज्ञान झाल्याचा श्लोक दिला आहे तो हाः (पहा पा० ३०८)—

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥

अ० १८ श्लो० ६३.

रहस्यकारांच्याच युक्तिवादानें पाहूं गेल्यास त्यांचा कर्मयोग यापुढें सांगावयास पाहिजे होता. आतां या श्लोकानें अर्जुन ज्ञानी झाला आहे. परंतु कर्मयोगप्रतिपादन तर सर्वच मागेंच येऊन गेलें ! तेव्हां "वरातीमागून घोडें" अशांतला हा प्रकार दिसत आहे. रहस्यकार म्हणतात, आपला कर्मयोग ज्ञानोत्तर दर्शेतील आहे. अर्जुनास ज्ञान पहावें तों तें गीतेच्या शेवटीं झालें !! या ज्ञानाच्या पूर्वी भगवंतांनीं अर्जुनास जे पांचचार श्लोक सांगितले आहेत ते कर्मपर मुळींच नसून केवळ अनन्यभक्तिपर आहेत.

"सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज"

असें सांगून भगवंतांनीं भक्तिपरायणासच भगवद्गीता सांग (इतरांस कर्मठांस वगैरे सांगू नको). तसेंच

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥

अ० १८ श्लो० ७०.

असें म्हटलें आहे.

वाचकहो, हा भगवद्गीतेंतील श्रीकृष्णाच्या तोंडचा उपदेशात्मक शेवटचा श्लोक आहे. याच्या पुढील एक श्लोक फलश्रुतीचा आहे व पुढील म्हणजे अखेरचा अर्जुनाचा अज्ञानध्वंस झाला काय अशाबद्दल अर्जुनासच प्रश्न केल्याचा आहे. आतां या शेवटच्या श्लोकांत भगवान् "कर्मयोग" सांगत नसून "ज्ञानयज्ञ" सांगत आहेत; व गीता अथवा श्रीकृष्णार्जुनसंवाद हा "कर्म्य" नसून "धर्म्य" आहे असें म्हटलें आहे. म्हणूनच आम्हीं "श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्" इत्यादि चतुःसूत्री सारभूत म्हणून दिली आहे व या अल्प कृतीस **"गीताधर्म"**

असें अन्वर्थक नांव दिलें आहे. असो. भगवानांनीं आपला कर्मयोग फक्त तिसऱ्या अध्यायांत सांगितला आहे व चवथ्या अध्यायाचे आरंभीं त्याबद्दल म्हणजे तो योग संपूर्ण झाल्याबद्दल भगवंतांनीं स्पष्ट उल्लेख केला आहे. "इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहं" इ०. नंतर पुढें अर्जुनाच्या अनेक शंका व त्यांस भगवंतांचीं उत्तरें या रूपानें अनेक प्रकरणें उपस्थित झालीं आहेत. असें असतां रहस्यकार ह्याच अध्याय प्रधान करून आपल्या संप्रदायानुरूप सर्व ठिकाणीं तोच लावूं पाहत आहेत, हें स्वतः भगवानांच्या उपदेशाविरुद्ध असून गीतासंकल्पाच्याही विरुद्ध आहे, हें या तिसऱ्या व इतर अध्यायांच्या संकल्पावरून सहज ध्यानीं येईल. शिवाय या कर्मयोगाचें स्वरूप कसें आहे हें चवथ्याच अध्यायाचे प्रारंभीं भगवानांनीं स्वतः सांगितलें असतां, रहस्यकार आपल्या संप्रदायाचे पुष्ट्यर्थ व स्वमतप्रतिपादनाचे आवेशांत तिकडे दुर्लक्ष करीत आहेत. भगवानास चातुर्वर्ण्यव्यवस्थाच मान्य आहे असें आम्हीं वारंवार स्पष्ट वचनांनीं सिद्ध केलेंच आहे; तथापि ह्या "कर्मयोग" अध्यायाचे उपसंहारांत म्हणजे चवथ्या अध्यायाचे आरंभीं भगवानच म्हणत आहेत कीं, हा कर्मयोग "राजर्षींना" माहीत आहे.

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।

अ० ४ श्लो० २.

अर्जुन क्षत्रिय आहे. ब्राह्मण नव्हे. हा परंपराप्राप्तधर्म तिसऱ्या अध्यायांत अर्जुनास म्हणजे क्षत्रियास सांगितला आहे. हा धर्म राजर्षिप्राप्त आहे. ब्रह्मर्षिप्राप्त नव्हे. हें वचन रहस्यकारांनीं नीट पाहिलें नाहीं असें दिसतें. पाहिलें असतें तर जनक व याज्ञवल्क्य या दोघांत एवढें वितुष्ट त्यांनीं आणिलें नसतें. क्षत्रियांना संन्यासमार्ग निदान अर्जुनाचे स्थितींत तरी विहित नव्हता, यामुळें परधर्माचरणास तो प्रवृत्त झाल्यामुळें भगवानांनीं त्यास राजर्षीचा धर्म सांगितला आहे. हा राजर्षिधर्मच भगवद्गीतेंत अन्य-व्यावृत्तीनें प्रतिपादिला आहे, हा निव्वळ रहस्यकारांचा सांप्रदायिक आग्रह आहे. ज्ञान-मार्गाचे अपेक्षेनें कर्मयोगास भगवंतांनीं कसें गौणत्व दिलें आहे हें "ज्ञानयोग" प्रकरणांत आम्हीं दाखवीनच आहों. आतां रहस्यकारांचा कर्मयोग जुन्या ज्ञानकर्मसमुच्चयवाद्यांच्या कर्मयोगासारखा नाहीं, हें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. त्यांचे मतें वाटतील तीं सांसारिक कर्में ह्या योगांत अन्तर्भूत होतात. ह्या मतास भगवद्गीतेंत कोठेंही आधार नाहीं. हें रहस्यकारांच्या देशभक्तिसंप्रदायांतील स्वकपोलकल्पित मत असून तें भगवान् श्रीकृष्णावर जबरदस्तीनें लादलेलें आहे याला भगवद्गीतेंत आधार म्हणजे

"शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः"
"शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोषि किल्बिषं" ।
"नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्" ॥

" नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्ववित् ।
पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ॥
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ॥

इतकीं वचनें आहेत. ह्या वचनांचा संदर्भ अथवा " प्रकरण " लक्षांत न घेतां यांतील सर्व क्रियावाचक शब्दांचा अन्तर्भाव कर्मयोगांत केला आहे. " शारीरं केवलं कर्म " या वचनाच्या पाठीमागील श्लोकार्ध " निराशीर्यतचित्तात्मा त्यक्त-सर्वपरिग्रहः " असा आहे. या श्लोकांत सांख्य अथवा ज्ञाननिष्ठ अथवा कर्म-संन्यासी, (अर्थात् ज्ञानोत्तरकालीन) यांचें वर्णन आहे. या अध्यायाचा संकल्पही " ज्ञानकर्म-संन्यास योगो नाम चतुर्थोऽध्यायः " असा आहे. या श्लोकांत सर्वसंग परित्याग केलेल्या अशा वासनारहित पुरुषानें श्वास-निःश्वासाचें निरोधन अथवा मलावरोध न करितां शारीरकर्म केल्यापासून त्यास बाध येत नाहीं. म्हणजे अशा ज्ञानी पुरुषानें कर्मसंन्यास जरी केला (म्हणजे शास्त्रीयकर्माचा संन्यास) तरी त्याच्या शारीर म्हणजे शरीरयात्रेस आवश्यक अशा भिक्षादि वृत्तीचा आश्रय केल्यास तो त्यास बंधक होत नाहीं, असा भावार्थ आहे. या ठिकाणीं शास्त्रीय कर्म व शारीरिक कर्म यांचा स्पष्टभेद केला असून शारीर कर्माचा कर्मयोगांत अन्तर्भाव होत नाहीं असें सांगण्याचा भगवानांचा हेतु उघड होत आहे. कदाचित् दीर्घपंडित म्हणतील कीं, ज्ञान्याचें यज्ञयागादि कर्म सुटलें परंतु भिक्षाटनादि कर्में त्याचीं चालतातच, तर त्या पंडितास हें भगवानांचें उत्तर आहे कीं " बाबा, असें नव्हे. ज्या प्रारब्धकर्मानें हा देह ज्ञान्यास मिळाला व देहपातापर्यंत जें प्रारब्ध-कर्म त्यास भोगलें पाहिजे त्या देहपोषणास आवश्यक असें कर्म म्हणजे क्रिया हीं ज्ञान्यास बंधक होत नाहींत." आतां दुसरें वचन पाहूं. " नहि कश्चित् क्षणमपि " हा श्लोक कर्मयोगाध्यायांत पठित आहे. भगवानांनीं प्रवृत्ति व निवृत्ति या दोन निष्ठा सांगितल्याबरोबर कर्में करून चित्तशुद्धि झाल्याविना नैष्कर्म्यसिद्धि मिळत नाहीं असा शास्त्रोक्त सिद्धान्त सांगितला व लागलींच हा दुसरा श्लोक सांगितला आहे. या वचनाचा उत्तरार्ध " कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः " असा आहे. अर्जुनाची भावना वेदान्ताबद्दल भलतीच झाली होती. ' कांहीं न करण ' म्हणजे निष्कर्म अशी त्याची समजूत होती. ही समजूत घालविण्याकरितां भग-वान् सांगतात कीं, शास्त्रोक्त कर्म जें युद्ध तें टाकून तूं स्वस्थ बसणार म्हणजे तरी तूं स्वस्थ अगर निष्कर्म झालास का ? कर्म कोणत्याना कोणत्या तरी स्वरूपानें तुला करावें लागणारच. मग हा ' अकर्माचा ' आग्रह कां ? अर्जुन " अकर्मास " " निष्कर्म " समजूं लागल्यामुळें " निष्कर्म " म्हणजे शास्त्रविहित कर्माचा संन्यास व ' अकर्म ' म्हणजे शास्त्रीय व शारीरिक अशा दोन्ही कर्मांचा संन्यास म्हणजे श्वासादिनिरोध करून प्राणत्याग करणें असा

अर्थ आहे असें भगवंतांनीं ध्वनित केलें आहे. "अकर्म" होणें कोणासच शक्य नाहीं. सिद्ध असो वा साधक असो, जिवंत जो कोणी आहे त्यास जिवंत राहून अकर्म होतां येत नाहीं. म्हणूनच भगवानांनीं " जातु तिष्ठत्यकर्मकृत् " असें " अकर्म " पद मुद्दाम घातलें आहे. शारीरिक कर्म, साधक, सिद्ध व प्रापंचिक व प्राकृतिक कोणासच सुटत नाहीं. तेव्हां " अकर्मकृत् " तूं होणारच नाहींस. तुला निष्कर्म व्हावयाचें असेल तर त्याकरितां आधीं कर्माचरण केलें पाहिजे, म्हणजे शास्त्रप्राप्त कर्माचा त्याग करावयाचा असल्यास तें कर्म आचरीत असल्याशिवाय त्याचा त्याग संभवत नाहीं. तुझा अधिकार अद्याप शास्त्रीय कर्मे सोडण्याचा नाहा. सोडलींस तरी तुझ्या मताप्रमाणें तूं अकर्मकृत् होत नाहींस हें खास. या उपदेशावरून भगवानांस शारीरकर्मे कर्मयोगांत घालावयाचीं होतीं असें मानिल्यास नूतन गत-भर्तृकेस आप्तमंडळी सांगतात "बाई, जगाच्या रहाटीकडे लक्ष द्या. आतां आपला दीर, वडील मुलगा आहेत तिकडे लक्ष द्या व हें आपलें दुःख आवरा" ह्या आप्तमंडळीच्या देवपुत्र नामाभिधानानें त्यांचा सर्वांशीं पतिवचनांत अन्तर्भाव केल्यासारखें असमंजस होईल. तसेंच " नैव किंचित्करोमीति " या श्लोकांत " तत्ववित् " याचें वर्णन आहे. इंद्रियार्थाचे ठिकाणीं इंद्रियें जात असल्यास निरहंकारवृत्तीनें जो शारीरिक कर्म करीत असतो, अशा ज्ञान्याचें वर्णन या श्लोकांत आहे, कर्मयोग्याचें वर्णन नव्हे. सारांश " पाहणें, ऐकणें, स्पर्श करणें" इत्यादि शारीरिक कर्मे यांना धर्मशास्त्रांत कर्मे ही संज्ञा नाहीं. " श्वास घ्यावा " " कानानें ऐकावें " " जेवावें, " "डोळ्यांनीं पाहावें" इत्यादि रागप्राप्त कर्माबद्दल विधि नाहीं. ज्याबद्दल विधि अगर निषेध नाहीं अशा क्रियेस धर्मशास्त्रांत कर्मत्व नाहीं. रहस्यकार म्हणतात असा सार्वत्रिक व्याप्तीचा कर्म शब्दाचा अर्थ केल्यास भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायांतील

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥

या श्लोकांतील आशयास विरोध येतो. तसेंच पुढील श्लोकांतील

" ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि "

याही वचनाचा व्याघात होईल. शिवाय हा कृष्णार्जुनसंवाद " धर्म्य " आहे त्यामुळें "अथातो धर्मजिज्ञासा " या सूत्रानें आरब्ध झालेल्या धर्मशास्त्रांत जें कर्म सांगितलें आहे तेंच कर्म घेतलें पाहिजे. शास्त्रीय कर्माच्या फलाकांक्षेचा त्याग संभवतो, परंतु सांसारिक कर्माच्या फलाचा त्याग संभवत नाहीं. सांसारिक कर्माचरणांत अहंकारवृत्ति जागृत ठेविल्याशिवाय चालणारच नाहीं. चढाओढीच्या कालांत निरपेक्षवृत्ति कुचकामाची ठरेल. समचित्तानें व्यापारवृद्धि अथवा उद्योगवृद्धि साध्य होणार नाहीं. या तऱ्हेच्या उद्योगांत पूर्ण अभिनिवेश करावा लागतो, जयापजयांनीं हर्षित खिन्न झाल्याशिवाय पुढील कार्यास लागणारें

औत्सुक्य येणार नाहीं. रहस्यकारांनीं ही समबुद्धि देशकार्यांत आणण्याचा जो प्रयत्न केला आहे तो वृथा व अशक्य आहे. शिवाय " प्राप्तकर्म " म्हणजे शास्त्रप्राप्त कर्म घ्यावयाचें कीं आपल्या मनास वाटेल तें प्राप्त कर्म समजावयाचें ? " प्राप्त " कर्म ठरविणार कोण ? रहस्यकार कीं शास्त्रकार ! दैववशात् मुदतबंदी करारानें नेलेल्या मजुरांतून जर चुकून एखाद्या ब्राह्मणास आफ्रिकेंत नेलें व तेथें भंग्याचें काम त्यास लाविलें तर " स्वधर्मे निधनं श्रेयः " सारख्या वचनाकडे लक्ष देऊन प्राणत्याग पत्करिला; परंतु अशास्त्राचरण करणार नाहीं असा त्यानें आग्रह धरणें चांगलें, का रहस्यकारांचे म्हणण्याप्रमाणें प्राप्त कर्म निरपेक्षतेनें करण्यास त्यानें तयार होणें हें चांगलें ! समजा, विधुर झाला आहे. ब्राह्मणानें अनाश्रमी राहूं नये असें शास्त्र आहे. तेव्हां त्या ब्राह्मणानें एक लग्न तरी करून गृहस्थाश्रमी व्हावें अगर चतुर्थाश्रमी व्हावें असें शास्त्रतः प्राप्त होतें. परंतु आता त्याचें सांसारिक प्राप्तकर्म रहस्यकाराचे मतें कोणतें ? वर्तमानपत्रांत लेख लिहिणें ? का म्युनिसिपाल कमिटींत जाऊन केराच्या टोपल्या वाहाणें ? का लढाईवर जाणें ? का काय ? प्राप्त कर्म म्हणजे कोणीं व कसें ठरवावयाचें ? ज्याचें त्यानेंच ठरवावयाचें असें झाल्यास उत्तमच झालें; कारण अर्जुनानें म्हणावें "शास्त्रानें माझें कर्म "युद्ध" म्हणून सांगितलें आहे हें खरें, परंतु तुला (कृष्णास) चातुर्वर्ण्यव्यवस्थेबद्दल फारशी आस्था नाहीं असें रहस्याचार्य म्हणत आहेत तेव्हां माझें या वेळीं प्राप्तकर्म मीच ठरविणार. तूं ठरविणार कोण ? मी भिक्षावृत्ति पत्करून ब्राह्मण होणार ! तेव्हां या प्राप्तकर्म करणाऱ्या अर्जुनाला आवरण्यास कोण समर्थ होणार ? " रहस्यकार महाराज, आपण शास्त्रविहित कर्मास गौणत्व देण्यास व वाटेल तें सांसारिक प्राप्तकर्म भगवद्गीतेच्या कक्षेंत ओढण्यांत केवढा अनर्थ केला आहे याची आपल्याला कल्पना आहे काय ? प्रत्येक व्यक्तीचें प्राप्तकर्म कोणतें हें सांगण्याची जबाबदारी आपण आपल्या शिरावर घेणार काय ? ही घेण्यास आपण तयार झालां तरी ती आपल्या हातून निभावून जाणें शक्य नाहीं. घरें प्रत्येक व्यक्तीनें आपलें प्राप्तकर्म ठरवावें असें झाल्यास शास्त्राची व सदाचाराची गरज तरी काय राहिली ? इकडे पाहावें तों आपण आत्मतत्व, श्रीकृष्ण, पुनर्जन्म इत्यादिकांवर पूर्ण श्रद्धा दाखवीत आहां, दुसरीकडे पाहावें तों वेद, शास्त्र, उपनिषदें, वर्णाश्रमव्यवस्था इत्यादींचे ठिकाणीं अनास्था दाखवितां. तेव्हां आपणास इष्ट धर्म कोणता आहे ? असो. भगवानांनीं तिसऱ्या अध्यायांत अशा तऱ्हेचा कर्मयोग सांगितला नाहीं. यज्ञयागादिकांची उत्पत्ति सृष्टीबरोबरीची आहे, चातुर्वर्ण्यव्यवस्था सृष्टीबरोबरीची आहे असें भगवंतांनीं इतक्या स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, तेथें शंका घेण्यास अवसरच नाहीं. यज्ञांनीं देवांचा संतोष करावा व असें हें यज्ञाचें रहाटगाडगें चालू ठेवावें असें भगवंतांनीं आग्रहपूर्वक सांगितलें आहे. यज्ञ करून उरलेलें अन्न खात जा, केवल उदरंभर होऊन आपल्याचसाठीं अन्न शिजवून खाऊं नको. द्रव्ययज्ञ करीत

करीत गतकल्मष झाल्यावर तुला ज्ञानयज्ञ साध्य होईल. " योगी चित्तशुद्धी-करितां कर्मे करीत असतात " " जनकादिकांनींही कर्माचरणानेंच सिद्धि मिळविली आहे " असा जेथें तेथें भगवान् शास्त्रीयकर्ममार्गाचा मुमुक्षूस उपदेश करीत आहेत. जनकानें शास्त्रीय कर्माचरण केलें, परंतु आपल्या राजवाड्यास आग लागली तेव्हां रहस्यकारमतान्वयें ते आग विझविण्यास न पळतां " न मे किंचित्, न दह्यति " असें म्हणून स्वस्थ बसले हें प्राप्त सांसारिकच कर्म का ! समर्थ रामदास लग्नाचे वेळीं पळूनच गेले हें सांसारिक प्राप्तकर्मच का ! सारांश कर्मविधि भगवद्गीतेंत अगर इतर धर्मग्रंथांत सांगतला आहे तो शास्त्रीयकर्माबद्दलचा असून नुसत्या प्राप्तकर्माबद्दल नव्हे व तोही केवल साधकास उद्देशून आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

१४ भक्तियोग.

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥

म० गी० अ० १४ श्लो० २६.

(माझी जो अनन्य भक्तियोगानें उपासना करितो तो प्रकृतीच्या गुणांचें उल्लंघन करून ब्रह्मपदास पोंचतो.)

साधकास हा योग सर्वांत अत्यंत महत्वाचा आहे. हा योगही वेदमूल असून स्मृति-पुराणकालांतही या योगास पराकाष्ठेचें महत्व होतें. अद्याप कलियुगांतही हा योग सर्वमान्य आहे. प्रत्येक धर्मांत कोणत्याना कोणत्यातरी रूपानें ह्या योगाचा अंगिकार केलेला आहे. ह्या योगप्रक्रियेंत स्थलकालमानानें फारसें अंतर पडलेलें दिसत नाहीं. इष्ट देवतेच्या नांवांत अगर स्वरूपांत भेद आढळेल, परंतु भक्तियोगाचें स्वरूप प्रायः सर्वत्र एकच आढळून येईल. वेदांत अथवा श्रुतींत ह्या योगाचें स्वरूप उपासनेच्या रूपानें वर्णिलें आहे. ऋग्वेदाच्या पहिल्या अष्टकांतील पहिल्या अध्यायाच्या पहिल्या मंत्राचीं पहिलीं अक्षरें "अग्निमीळे" अशीं आहेत. विश्वांतील घडामोडी एकटा मायावी परमेश्वर (इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयते) स्वतः करीत असतो हें खरें; तथापि निरनिराळ्या कार्यजातास त्याचीच निरनिराळी शक्ति अथवा अंश मानल्याखेरीज मनुष्याचें समाधान होत नाहीं. याच दृष्टीनें वेदांत निरनिराळ्या देवता मानून त्यांची उपासना सांगितली आहे. इंद्र, वरुण, मित्र, वायु, रुद्र, अग्नि इत्यादि देवता जरी भिन्नकर्तृक मानिल्या आहेत तथापि त्यांचें तत्वदृष्ट्या वेदांत ऐक्य मानिलें आहे—(एकं सद्विप्रा०, एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति, हंसः शुचिसद् इत्यादि अनेक मंत्रांनीं). ऋग्वेदाचें ज्योतिष म्हणून एक अंग आहे त्यांत इंद्रादि देवता ह्या नक्षत्राभिमानी देवता आहेत असा उल्लेख आहे.

अग्निः प्रजापतिः सोमो रुद्रोऽदितिर्बृहस्पतिः ।
सर्पाश्च पितरश्चैव भगश्चैवार्यमापि च ।
सविता त्वष्टाथ वायुश्चेंद्राग्नी मित्र एव च ।
इंद्रो निर्ऋतिरापो वै विश्वेदेवास्तथैव च ।
विष्णुर्वसवो वरुणोऽज एकपात्तथैव च ।
अहिर्बुध्न्यस्तथा पूषाश्विनौ यम एव च ।
नक्षत्रदेवता एताः ... ...

कृत्तिका नक्षत्रापासून आरंभ करून क्रमानें नक्षत्रें मोजीत गेल्यास त्या त्या नक्षत्रदेवतेचा क्रम वरील श्लोकांत सांपडेल. सर्व विश्वाचा कर्ता जरी एक असला तरी असंख्य कार्यकारित्वास ज्या अनंत शक्ति विश्वांत दिसून येतात त्या सर्व त्या परमेश्वराच्याच आहेत असें मानणें भाग आहे. व्यवहारदृशेंन संसार सत्य आहे (इंद्रियग्राह्य) असें मानलें म्हणजे ह्या अनंत शक्तींचें कर्तृत्वही मानणें भाग येतें. व असें कर्तृत्व मानिल्यास त्या त्या शक्तीची उपासनाही प्राप्तच होते. ही उपासना करण्याचे प्रकार निरनिराळे आहेत. कोणी द्रव्यमय यज्ञ करून म्हणजे तद्द्वारा अनेक देवतांचें यजन करून यज्ञस्वरूपी श्रीविष्णुस संतुष्ट करतो. कोणी वेदांतील पवित्र मंत्रांचा जप करून त्याच विष्णुची आराधना करितो, कोणी कर्मसंन्यास करून अरण्यांत राहून भिक्षावृत्तीनें त्याच विष्णूचें आत्मरूपांत ध्यान करतो. सारांश, भक्तिमार्ग हाही वैदिक--धर्म असून त्याचें आचरण अद्यापही मोठ्या प्रमाणावर होत आहे. मात्र यांत विशेष एवढाच आहे कीं, हा मार्ग केवळ वेदगम्यच नव्हे. इतर धर्मांतही भक्तीचें प्राबल्य मोठें आहे. रहस्यकारांचे मताप्रमाणें आमचेंही मत आहे कीं, हा भक्तियोग साधन आहे, साध्य नव्हे. मोक्ष साध्य व भक्ति हें साधन. इतर धर्मांत भक्तीचें साध्य मोक्ष नसून स्वर्गवास अथवा समीपता इत्यादि साध्यें समजण्यांत येत असतात. मोक्ष हा परमार्थ केवळ वेदधर्माचाच विशेष आहे. परंतु इतिहास व आधुनिक उत्क्रांतिवाद या दोहींचे आधारें हल्लीं कांहीं लोक समजतात कीं, वेदांत कर्मांचें विवेचन असून म्हणजे संहितेंत फक्त कर्ममार्ग असून उपनिषदांत कर्ममार्ग गौण केला आहे व ज्ञानमार्गाची महती विशेष सांगितली आहे. तसेंच संहिताकाल व उपनिषत्काल लोटून गेल्यानंतर पुढें जो इतिहास--पुराणकाल सुरू झाला त्यांत भक्तिमार्गाचें स्तोम फार वाढविलें आहे. तेव्हां या लोकांच्या मतें हिंदुधर्माच्या उत्क्रांतीचा इतिहास कर्म, ज्ञान व भक्ति अशा परंपरेचा आहे असें होतें. परंतु वास्तविक पहातां संहिताभाग जरी कर्मप्रधान असला तरी त्यांत भक्ति व ज्ञान यांचा विचार अप्राधान्यानें तरी पुष्कळच आला आहे. उपनिषदांतून कर्म, उपासना या दोहींचाही ठिकठिकाणीं विचार केला आहे असें आढळून येतें. त्याचप्रमाणें पुराण ग्रंथांत भक्ति प्रधान धरून कर्म व ज्ञान यांचा सांगोपांग विचार केलेला आढळतो. सारांश, संहिता, उपनिषदें व पुराणें या तिहींचे विषय जरी निरनिराळे दिसले तथापि आपापल्या विषयाच्या विचारांत बाकीच्या दोन्ही विषयांबद्दल त्यांपैकीं कोणीही मूक नाहीं. नवविधा भक्तीचें वर्णन पुराणांतून आहे, परंतु अशा तऱ्हेची भक्ति वेदांत नव्हती हें म्हणणें चुकीचें आहे. वेदांतील भक्ति पितापुत्राच्या प्रेमभावाची आहे. " पितेव सूनवे " सारखे उद्गार संहितेंत अनेकदां आलेले आहेत. मुलानें जगांत पित्याकडेच मागणी करावयाची, नहून एरव्हीं त्याची दाद कोण घेणार ? आपण आपल्यापाशीं आहे त्याचा, यज्ञांत देवतोद्देशानें त्याग करून अग्नीचे मार्फत

देवास यावें व आपणापाशीं नाहीं तें त्याच्यापाशीं मागावें. तो "द्यौः पिता" आहे, "विश्वाचा चक्षु" आहे, "सविता" आहे म्हणजे स्थावरजंगमाला उत्पन्न करणारा आहे." सर्व विश्वाचा प्राण " इत्यादि महत्वसूचक विशेषणें देवास मंत्रांतून दिलीं आहेत. तो आपलें कोड पुरवील, सन्मति देईल, सुपथास लावील; आम्ही मर्त्य क्षणोक्षणीं प्रमादशील होतों हें जाणून दयेनें तो आमचे दोषपरिमार्जन करील, आमची स्तुतियुक्त वाणी ऐकून त्यानें आम्हास दर्शन दिलें, आम्हीं काढलेल्या सोमरसाचें त्यानें पान केलें, त्याच्या उत्कृष्ट तेजाचें आम्ही चिंतन करितों, आमच्या बुद्धीचा तोच प्रेरक आहे, इत्यादि उद्गारांस भक्ति म्हणावयाचें नाहीं तर काय म्हणावयाचें ! केवळ हातांत टाळ घेऊन, अगर पताक घेऊन नाचत पंढरीस जाणें, अगर पाषाणाची प्रतिमा करून तिची षोडशोपचार पूजा-अर्चा करणें अगर आठवड्यांतून नियमित वेळीं एक ठिकाणीं जमून आकाशांतील बापाची स्तुति करणें अगर प्रार्थनामंदिरांत जमून पीठस्थपंडितांचें व्याख्यान ऐकणें एवढाच भक्तीचा संकुचित अर्थ केल्यास अशी भक्ति वेदांत आढळत नाहीं हें खरें. परंतु भक्तीचें खरें रहस्य त्यांत नाहीं असें मात्र नाहीं. नवविधा भक्तीपैकीं कीर्तन, श्रवण, स्मरण, वंदन, सख्य व आत्मनिवेदन इतकीं अंगें वेदान्तर्गत भक्तिमार्गांत दिसून येतील. प्रतीकोपासना त्या कालीं नव्हती म्हणून पादसेवन, दास्य व अर्चन हे तीन प्रकार करण्यास वावच नव्हता. कर्मकांडांत देवता विग्रहवती (म्हणजे देहभारी) मानीत नाहींत. त्यांतील देवता मंत्रमयीच होत. नाहींतर एकाच कालीं अनेक ठिकाणीं भक्तांनीं पाचारण केल्यास इतक्या ठिकाणीं एका देहानें जाणें त्यांना शक्य नाहीं. असो. त्यांचा यज्ञ हेंच मुळीं मोठें अर्चन असे. नामस्मरणाचें महत्वही मंत्रांतून आलेलें आहे हें पाहून कित्येकांना आश्चर्य वाटेल. ऋग्वेद संहिता अष्टक १ अध्याय २ यांत शुनःशेपास यूपास बांधल्या वेळीं देवाचा त्यानें धांवा केला आहे. त्यांत तो म्हणतो, "अग्नेर्वयं...मनामहे चारु देवस्यनाम" या मंत्रांत नामस्मरणाचा मर्मासह उल्लेख आहे. नुसतें तोंडानें नांव घेऊन भागत नाहीं. " मनामहे " म्हणजे वाणीस मनाची जोड द्यावी लागते तेव्हां नाम फलद्रूप होत असतें. " इंद्रस्य नु वीर्याणि " सारख्या मंत्रांनीं इंद्राचें कीर्तनच होत असे. एकंदरींत भक्तिमार्ग हा वेदप्रतिपाद्यच आहे हें सिद्ध होतें.

प्रत्येक शरीरांत ज्याप्रमाणें स्थूल, सूक्ष्म व चिद्रूप असे तीन प्रकार दिसून येतात त्याचप्रमाणें या धर्मरूपी शरीराचे तीन प्रकार आहेत. कर्माचा स्थूल शरीराशीं निकट व विशेष संबंध येत असल्यामुळें कर्ममार्ग हा या धर्माचा स्थूल भाग होय. भक्तीचा विशेष संबंध मनाशीं असतो, कारण भक्तीस अवश्य लागणारी श्रद्धा ही मनाचाच भाग आहे, यामुळें भक्तिमार्ग अथवा उपासनामार्ग हा धर्माचा सूक्ष्म भाग होय. ज्ञानाचा प्रथमावस्थेंत बुद्धीशीं निकट संबंध येतो, परंतु त्या बुद्धीसह शेवटीं ज्ञान आत्म-

स्वरूपांत लय पावत असते म्हणून ज्ञानमार्ग हा धर्माचा तिसरा चिद्रूप प्रकार आहे. कर्ममार्गांत पत्नी, अग्नि, स्थंडिल, वेदी, समिधा, कुश, स्रुवा, स्रुची, इत्यादि पात्रें, आसनें, अध्वर्यु आदिकरून मंडळी, कपाल, पुरोडाश, यूप, पशु इत्यादि अनेक जडवस्तूंचा संभार तयार असावा लागतो. भक्तीचा प्रकार तसा नाहीं. "पत्रं, पुष्पं, फलं, तोयं" इत्यादिही नसलें तथापि जें जें कांहीं भक्त स्वतः खाईल, पीईल, बोलेल तें देवतेस अर्पण केल्यास चालतें. ज्ञानमार्गांत याचीही अपेक्षा नाहीं. विश्वात्म्याच्या नाडीस्पंदनाबरोबर स्वतःचें नाडीस्पंदन जमवून अगर त्याच्याशीं एकतानता करून क्रमशः जीवात्म्याचा परमात्म्यांत लय करण्याकडे ज्ञान्याची धांव असल्यामुळें स्थूल अगर सूक्ष्म देहाशीं त्याचा संबंध फारसा असत नाहीं. हल्लींच्या मानसशास्त्रभाषेनें लिहावयाचें झाल्यास कर्ममार्गाचा विशेष संबंध matter व motor nerves यांच्याशीं आहे. भक्तीचा विशेष संबंध sentiment शीं आहे. व ज्ञानमार्गाचा Reason शीं आहे. वाचकहो! हा अन्योन्यसंबंध नीट लक्षांत ठेवा. या संबंधाचें निरीक्षण चांगलें मनांत ठसल्यास वरील तीन मार्गांचा तारतम्य भाव समजण्यास फार सुलभ जाईल. ज्ञान अथवा मोक्ष हा पर पुरुषार्थ सिद्ध झाल्यावर या तीन मार्गांपैकीं ज्ञानास जवळ कोठचा हें सांगणें तुम्हांस कठीण पडणार नाहीं. येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, या प्रत्येक मार्गांत शरीराचा, मनाचा अथवा बुद्धीचा कांहींच संबंध येत नाहीं असें मात्र कोणीं समजूं नये. नाहीं तर यज्ञयागादि करीत असतांना कुशाचे ठिकाणीं कोणी बुद्धीस धाब्यावर ठेवून कडब्याचा उपयोग केल्यास अनर्थ होईल. म्हणूनच प्रत्येक ठिकाणीं "विशेष" संबंध असें म्हटलें आहे. ही सनातन धर्माची तीन कडब्यांची सांखळी एका कडीनें संसारास जोडली गेली आहे व दुसऱ्या म्हणजे (ज्ञान) कडीनें मोक्षास जोडली गेली आहे. ही सांखळी धर्म-जिज्ञासूनें आमूलाग्र नीट पाहून घ्यावी. नुसत्या कर्मयोगाचें स्तोम माजविणाऱ्या रहस्यकारांच्या वचनावर अंधश्रद्धा ठेवून वैदिक कर्म अगर गीताधर्म याबद्दल भलतीच भावना करून घेऊं नये. कर्मास श्रद्धेची मदत लागते. ज्ञानाची त्यास अपेक्षा नाहीं. भक्तीस ज्ञानाची जोडगण लागते व कर्माचीही लागते. ज्ञानास दोहींचीही अपेक्षा नाहीं. आतां साधकास उपाय म्हणून ज्ञानाचे कडीपर्यंत जाईपावेतों कर्म व उपासना यांची जरूरी लागते. मोक्षास ज्ञानाची कडी जवळ असल्यामुळेंच "ज्ञानादेव कैवल्यं" असें म्हटलें आहे. मोक्षामध्यें व कर्मामध्यें दोन कड्यांचें व्यवधान आहे. रहस्यकारांनीं आपल्या संप्रदायपुष्ट्यर्थ "लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा" या भगवद्वचनाची कशी ओढाताण केली आहे तें आतां पाहूं. लोकांत "निष्ठा" दोन. निष्ठा म्हणजे मार्ग नव्हे. रहस्यकारांचे मतें निष्ठा म्हणजे ज्ञानोत्तर स्थिति. या लोकांत ज्ञानोत्तर दोन स्थिति आहेत. ज्ञानयोग व कर्मयोग. नेव्हां अर्थातच भक्तिमार्गाची वाट काय! परंतु रहस्यकारांनीं आपल्या बुद्धिसाम-

ह्यांनें याही विकट प्रश्नाची आपल्या मतानें वाट लाविली आहे. त्यानीं भक्तीस ज्ञानकर्मापेक्षां गौणत्व दिलें आहे. कारण भक्तीस जर ज्ञान व कर्म यांचे पंक्तीस बसविलें तर आपण ज्ञान व कर्म या दोन निष्ठा भगवंताचें मुखांत घातल्या आहेत त्यास बाध येईल !! वाचकहो, रहस्यकारांनीं या भक्ति-मार्गाचे विवेचनांत फारच सावधानता ठेविलेली आहे. हा भक्तियोग कोठें तरी मध्यंतरीं आड येऊन निष्ठाद्वयरूपी श्रेष्ठ वर्णाच्या समतेस येऊन धोंटाळा उडेल या भीतीनें "बाबा तूं मोठा गोड घांस आहेस" म्हणून त्यास गोंजारून त्यास शेवटच्या पंक्तीस बसविलें आहे. आतां भक्तीस निष्ठेंतून युक्तीनें कसें हाकलून दिलें आहे पहा. "सारांश अव्यक्तोपासना या अर्थानें ज्ञान हें एकदां साधन, तर ब्रह्मात्मैक्याचा अपरोक्षानुभव या अर्थी तेंच ज्ञान निष्ठा म्हणजे अखेरची स्थिति होऊं शकतें. आणि हा भेद जेव्हां दाखविणें जरूर असतें तेव्हां " ज्ञानमार्ग " व " ज्ञाननिष्ठा " हे दोन शब्द समानार्थी न वापरतां अव्यक्तोपासनेची साधनावस्थेंतील स्थिति दाखविण्यास " ज्ञानमार्ग " आणि ज्ञानोत्तर सर्व कर्मे सोडून देऊन, ज्ञानांतच गढून जाण्याची सिद्धावस्थेंतील स्थिति दाखविण्यास " ज्ञाननिष्ठा " या शब्दांचा उपयोग केला जातो, म्हणजे अव्यक्तोपासना किंवा अध्यात्मविचार या अर्थी ज्ञान हें एकदां साधन (ज्ञानमार्ग) तर अपरोक्षानुभव या अर्थी तेंच निष्ठा म्हणजे अखेरची कर्मत्यागरूप अवस्था होऊं शकतें. आणि कर्माची गोष्टही तशीच आहे. शास्त्रोक्त मर्यादेप्रमाणें चित्तशुद्धीसाठीं प्रथम जें कर्म करावयाचें तें साधन होय. या कर्मानें चित्त शुद्ध होऊन परिणामीं ज्ञान व शांति प्राप्त होते; परंतु पुढें या ज्ञानांतच गढून न जातां शांतीनें आमरण निष्काम कर्मे करूं लागलें म्हणजे ज्ञानयुक्त निष्कार्म कर्म या अर्थी कर्म हें निष्ठा होऊं शकतें (गी. ३. ३) भक्तीची गोष्ट तशी नाहीं. भक्ति हा नुसता मार्ग म्हणजे ज्ञानप्राप्तीचें साधन आहे. निष्ठा नव्हे " (गी० र० पा० ४१२).

वाचकहो! हें शब्दावडंबर समजण्यास कठीण तर खरेंच, परंतु हें सर्व सार्थ असून त्यांत रहस्यकारांनीं विलक्षण कोटि केलेली आहे हें विचारांतीं समजून येईल. " मार्ग " व " निष्ठा " यांतील भेद सांगण्याकरितां हा सर्व उपद्व्याप केलेला आहे. मार्ग व निष्ठा हे दोन पर्याय शब्द केल्यास भक्तीस कर्म व ज्ञान यांचे जोडीस बसवावें लागेल व तसें केलें म्हणजे ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा ह्या दोन्ही तुल्यबल आहेत असें जिकडे तिकडे आपण आकांडतांडव केलेलें आहे त्यास कोठें तरी विरोध येईल या भीतीमुळें हा " मार्ग व निष्ठा " या शब्दांतील अर्थभेद स्पष्ट करण्याचा अंतिम हेतु आहे. परंतु हा मार्ग व निष्ठा यांतील भेद रहस्यकारांच्या लक्षांत भक्तियोगप्रकरणांतच आलेला दिसतो असें तरी एक म्हणावें लागतें अगर रहस्यकारांची शब्दयोजना अशास्त्रीय अगर न्यायविरुद्ध असते असें तरी मानणें भाग येतें. उदाहरणार्थ, निष्ठा शब्दासच त्यांनीं पर्याय

शब्द मार्ग हा घातलेला आहे. पान ३०७ यांत " उलट संन्यास आणि कर्मयोग हे दोन्ही मार्ग एकसारखेच निःश्रेयसकर ... आहेत ..... " एकं सांख्यं च योगं च यः " ... हे दोन मार्ग एकच आहेत ..... अशी या दोन मार्गांची शक्य तितक्या युक्तीनें ..... दाखविली आहे " या ठिकाणीं निष्ठेच्या ऐवजीं मार्ग हा पर्याय शब्द रहस्यकार बिनदिक्कत योजीत आहेत. तसेंच " यावरून सांख्य व योग हे दोन **मार्ग** मूळपासूनच स्वतंत्र आहेत हें निर्विवाद सिद्ध होतें. " " संन्यास व कर्मयोग हे दोन्ही **मार्ग** निःश्रेयस म्हणजे मोक्ष देणारे.....आहेत " (पा० ३०४) " जनकाचा निष्काम कर्म**मार्ग** व याज्ञवल्क्याचा कर्मसंन्यास **मार्ग** " (पा० ३५६) असा निष्ठेच्या ऐवजीं 'मार्ग' शब्दाचा सररहा उपयोग रहस्यकारांनीं केलेला आढळून येईल. निष्ठा व मार्ग शब्दांची अशा तऱ्हेची अभेद प्रतीति रहस्यकारांनीं अनेकदां केलेली आहे हें वरवर वाचणाऱ्याच्यासुद्धां सहज ध्यानीं येईल. असें असतां भक्तियोग सुरू झाल्याबरोबरच " मार्ग " " निष्ठा " द्वयांत एवढी फूट पाडण्याचा प्रयत्न रहस्यकार कां करतात यांतील हेतु वर दिलाच आहे. कर्मयोग म्हणजे ज्ञानोत्तर स्थिति असें धरल्यास श्रीकृष्णानीं शेंकडों ठिकाणीं " कर्मयोग " म्हणजे नुसतीं चित्तशुद्धिकारक कर्में नव्हेत, तर रहस्यकारांचा फलाकांक्षारहित कर्मयोग ब्रह्मज्ञानाचें साधन म्हणून म्हटलें आहे त्याची वाट काय ?

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥
कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।
ये मे मतमिदं... ... ... कर्मभिः ॥

अ० ३ श्लो० ३१.

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
नहि ज्ञानेन सदृशं... ... ...विद्यते ॥

अ० ४ श्लो० ३८.

योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥

अशा तऱ्हेचीं शेंकडों वचनें भगवद्गीतेंतून देतां येतील. या वचनांत फलाकांक्षारहित कर्मयोग केवल ज्ञानसाधन म्हणून भगवान् सांगत असतां बळेंच रहस्यकार त्या कर्मयोगास उचलून ज्ञानोत्तर दशेंतील निष्ठा या पदावर बसवीत आहेत व बिचाऱ्या भक्तीस भगवान् अट्टहासानें कर्मयोगापेक्षां अनेक वचनांनीं महत्त्व देत असतां रहस्यकार मात्र तिला निष्ठेंतून बहिष्कार घालीत आहेत.

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ॥
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥

अशा निःसंशय वचनांनीं भगवान् भक्तियोगास प्रसंगवशात् ज्ञानापेक्षांही महत्त्व देत असतां रहस्यकार भगवद्वचनांचा अनादर करून गरीब भक्तीची विटंबना करीत आहेत. यावरून आमची तर अशी कल्पना होते कीं, रहस्यकारांनीं व्यवहार, प्रपंच अथवा देशभक्ति यांची तरफदारी करण्याचा विडा उचलला आहे व आजपर्यंत इतिहास वगैरे शास्त्रांतील व राजशास्त्रांतील आधारांनीं देशभक्तीचा जसा त्यांनीं उठावा केला आहे तद्वतच आतां वार्धक्यांत परमार्थशास्त्रांतील आपल्यास अनुकूल होतील अशा प्रमाणाभासांनीं, इतर स्पष्ट प्रमाणांकडे दुर्लक्ष करून त्याच आपल्या आवडत्या संप्रदायाची तारीफ करण्याचा त्यांनीं जंग बांधला आहे व या त्यांच्या कृतीस कालही फार अनुकूल मिळाला आहे. धर्मशास्त्र समजणारीं माणसें जीं थोडीबहुत आहेत त्यांना रहस्यकारांचें पाश्चात्य पद्धतीचें विवरण अगम्य असल्यामुळें ते जवळ जवळ निरुत्तर होत्साते कालमाहात्म्याकडे नजर देऊन रहस्यकारांचे तोंडास लागणार नाहींत. आधुनिक सुशिक्षितांचें संस्कृत-अध्ययन परीक्षेपुरतेंच व तेंही डॉ. भांडारकरांच्या मालेच्या आधारें व मोक्षमुल्लर साहेबांच्या भाषांतरसाहाय्यानेंच झालें असल्यामुळें व त्यांचे ठिकाणीं मुमुक्षुत्वही बेतांचेंच असल्यामुळें त्यांनीं या वकिली कोट्यांस माना डोलविल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. असो. रहस्यकारांची आणखी एक कोल्हाटी उडी आपण पाहूं. श्रीतुकोबारायच यांचा नामनिर्देश रहस्यकारांनीं या भक्तिप्रकरणांत केला आहे. या नामनिर्देशांत त्यांनीं तुकोबारायांस अत्यंत पूज्य व आदरार्ह केलें आहे. भक्तिमार्गासारख्या द्वैतपंथानें अद्वैतज्ञान कसें होणार असें म्हणणाऱ्या कांहीं तार्किकांविरुद्ध आपल्या जंजाल तोफेच्या मुखांतून त्यांनीं तुकोबास सोडून देऊन त्या तार्किकास छिन्नविच्छिन्न केलें आहे. ते म्हणतात " तर्कापेक्षां साधुपुरुषांचा प्रत्यक्ष अनुभव हेंच या आक्षेपास बिनतोड उत्तर असून, त्यांतले त्यांतही भगवद्भक्तशिरोमणि तुकारामबुवा यांच्यासारख्याचा अनुभव या कामीं आम्ही विशेष महत्त्वाचा समजतों. " खरोखरच भक्तिपंथी लोकांना या तुकारामाच्या सत्कारानें गुदगुल्या व्हाव्या यांत काय नवल आहे ? परंतु बिचारे कर्मठासारखे तेही फसले गेले आहेत. तें कसें तें पहा. तुकारामबुवा म्हणतातः—

प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही ।
एकही निदानीं न घडे त्यासी ॥
दोहीं पंवावरी ठेवूं जातां हात ।
शेवटीं अपघात शरीराचा ॥

तुका म्हणे तया दोहींकडे धका ।
शेवटीं तो नरकामाजी पडे ॥

तेव्हां असें म्हणणारा तुकाराम जरी तार्किकांशीं युद्ध करतेवेळीं गोळीबारा-ऐवजीं उपयोगीं पडला तरी ज्ञानकर्मसमुच्चयरणांत कर्मसंन्याशांच्या बाजूनें जेव्हां तुकाराम बोलूं लागले तेव्हां त्यांनीं (रहस्यकारांनीं) श्रीसमर्थांस अचानक उचलून आपल्या तोफेंत बसविलें व तुकारामाचा पाडाव करण्यास ते कचरले नाहींत. कारण श्रीसमर्थ " शहाणे करून सोडावें । बहुत जन ॥ " असा कर्मपर उपदेश करीत आहेत. परंतु समर्थांचें चरित्र पाहावें तों ते प्राप्तकर्म टाकून अरण्यांत पळून गेले होते. " मुमुहूर्त सावधान " हे शब्द कानीं पडतांच भावी पत्नीची अथवा सन्मुख असलेल्या नवरीची पर्वा न करितां अरण्यांत पळून गेले व तेथें एक तप पुरश्चरण केलें. हें कृत्य भगवद्गीतेंतील रहस्यकारांच्या कर्मयोगाविरुद्ध झालें. तेव्हां अशा भिक्षोपजीवी समर्थांची कांस रहस्यकारांनीं कां धरली कोण जाणें ! रामदासपंथ तर सर्व भिक्षोपजीवी. तेव्हां अशा वेळीं पुनः तुकोबारायाची गोळी करून तोफेंतून फेंकण्यास ते मागेंपुढें पाहात नाहींत. कारण तुकोबा म्हणतातः—

भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ॥
ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ॥

गी० र० पा० ४३४.

हा रहस्यकारांचा सांवळागोंधळ खपणारीं नव्हे चाहाणारीं माणसें भरतखंडांत आजमित्तीस हजारों आहेत, त्याअर्थीं अद्याप हिंदुस्थानांत अंधश्रद्धाच पुष्कळ असून विचारयुग सुरू झालें नाहीं असेंच म्हणणें भाग येतें.

आमचे मतें रहस्यकारांनीं भक्तीस निराळें करण्यांत स्वपक्षघात केला आहे असें दिसतें. कारण कर्म म्हणजे नुसतें शास्त्रीय कर्म नव्हे हा त्यांचा सिद्धान्त आहे. हासणें, खेळणें, रडणें, धांवणें इत्यादि क्रिया सुद्धां कर्मेंच होत. मग "भक्ती"-स या कर्मयोगांत थारा मिळाला नसता काय ? अशा कर्मयोगाच्या मुक्तद्वार-रमण्यांत दीन भक्तीसच अन्नाचा ग्रास मिळण्यास कां मज्जाव झाला हें समजणें कठीण आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम् ॥

या नऊ क्रिया कर्मयोगांत येत नाहींत काय ? रहस्यकार महाराज, या प्रश्नास आपण काय उत्तर देणार आहां ? आपण उत्तर द्याल परंतु तें समर्पक कसें होणार ? जर हासणें, खिदळणें ह्या क्रियांचा आपल्या उदार कर्मयोगांत समावेश होतो तर श्रवण, स्मरण यांचा कां होऊं नये ? जर होतो असें आपण म्हणत असाल तर मग कर्मयोग मात्र निष्ठा होतो व भक्तियोग कां होत नाहीं ? तो

नुसता " मार्गच " कां ह्मावा. या ठिकाणीं " कर्मयोग " व " श्रवणं कीर्तनं० " यामध्यें आपण काय सूक्ष्म व चातुर्ययुक्त भेद केला आहे हें कोठें सांगितलें नाहीं. असो. भक्तीस असा मज्जाव न करितां तिलाच कर्मयोगांत घेऊन रहस्य-कारांना आपलें उद्दिष्ट सहज साधतां आलें असतें.

भगवान् श्रीकृष्ण स्वतः भक्तिमार्गाचा उपदेश करीत आहेत तेव्हां या उपदेशामृताचें पान करण्यास आपण लागावें हें चांगलें.

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।
मायया ऽपहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥
चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियोहि ज्ञानिनोत्यर्थमहं स च मम प्रियः ॥

भ० गी० अ० ७ श्लो० १५।१६।१७.

मायेनें ज्यांच्या ज्ञानाचें आवरण झालेलें आहे म्हणजे प्रकृतीच्या गुणांनीं ज्यांचें ज्ञान झांकून गेलें आहे अशा आसुरी संपत्तीच्या पाठीस लागलेले अतएव दुराचारी अज्ञ जन यांना माझी प्राप्ति होत नाहीं. सदाचरणी लोकच माझी सेवा करीत असतात. त्यांतही चार प्रकारचे लोक आहेत. आर्त म्हणजे कायिक, मानसिक, दैविक आधिव्याधींनीं पीडलेले व त्यांतून मुक्त होऊं इच्छिणारे लोक. अर्थार्थी म्हणजे संतति, संपत्ति, ऐश्वर्य इत्यादि परमेश्वरापाशीं मागणारे लोक. ही भक्ति, रजोगुणात्मक होय. यहुदी लोकांची भक्ति याच मासल्याची होय. देवास अमित पशु बलि द्यावेत व यहुदी लोकांची संख्या या जगांत अगणित ताम्यांइतकी वाढवावी व त्यांना ऐश्वर्य प्राप्त करून द्यावें अशा हेतूनें ही भक्ति प्रेरित झालेली आहे. तसेंच आमच्यांतील स्वर्गकाम, पशुकाम इत्यादिकांनीं केलेले यागही याच कोटींत येतात. रहस्यकारांचा पुष्टि-तुष्टि-मय कर्मयोगही भक्तीचें साहाय्य असल्यास याच कोटींत येतो. तिसरा वर्ग जिज्ञासूंचा. परमेश्वराचें तत्व जाणण्याच्या इच्छेनें भक्ति करणारे लोक जिज्ञासू भक्त होत. रामानुज पंथी, मध्वपंथी, ख्रिस्ती, महंमदी वगैरे पंथ या कोटींतील होत. अद्वैत तत्वाचें ज्ञान होऊन परमेश्वराचे ठिकाणीं जे अनन्य प्रेम ठेवितात असे श्रीरामकृष्ण परमहंस, तुकाराम, एकनाथ इत्यादि भक्त हे ज्ञानी भक्त होत. या चवथ्या वर्गांतील भक्त परमेश्वरास अत्यंत प्रिय आहेत. त्यांच्या जीवाचे हे भक्त कलिजे होत असें भगवान् नेहमीं म्हणत असतात.

डोळियाचें दैव आजि उभें ठेलें ।
निधान देखिलें पंढरीराय ॥

काय तें वानावें वाचेचे पालवें ।
वेदा न बोलवे रूप ज्याचें ॥
आनंदाच्या रसें ओतींव चांगलें ।
देखतां रंगलें चित्त माझें ॥
तुका म्हणे मी तो सगळाच विरालों ।
विठ्ठलचि झालों दर्शनानें ॥

तसेंच आणखी तुकोबाराय ज्ञानोत्तर भक्तीचें वर्णन करितातः—

घोटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं ।
मुक्तां आत्मस्थिति सांडवीन ॥
ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं ।
भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥
तीर्थ भ्रामकासी आणीन आळस ।
कडू स्वर्गवास करीन भोग ॥
सांडवीन तपोनिधा अभिमान ।
यज्ञ आणि दान लाजवीन ॥
भक्ति भाग्य प्रेमा साधीन पुरुषार्थ ।
ब्रह्मींचा जो अर्थ निज ठेवा ॥
धन्य म्हणवीन इहलोकीं लोका ।
भाग्य आम्हीं तुका देखियला ॥

वाचकहो ! रहस्यकार म्हणतात तुकोबारायांची अपरोक्षानुभवाची वचनें आपणांस मान्य आहेत. तेव्हां आतां त्यांनाच विचारा कीं, आपलें कर्म जसें ज्ञाननिष्ठा अथवा ज्ञानोत्तर स्थिति होऊं शकतें त्याप्रमाणें प्रत्यक्ष श्रीकृष्णाचें "ज्ञानी भक्त आपणास फार प्रिय आहेत." अशा अर्थाचें वचन व तुकोबारायाचें वरील वचन या दोहींवरून भक्ति ही ज्ञाननिष्ठा होऊं शकते कीं नाहीं ? अर्थात् रहस्यकारांना तुकोबाच्या नाहीं तरी श्रीकृष्णाच्या निदान भगवद्गीतेमधील वचनाविरुद्ध जाणें शक्य नाहीं, तेव्हां त्यांना येथें निरुत्तरच झालें पाहिजे; त्यावांचून गत्यंतर नाहीं. निरुत्तर झाल्यास ज्ञानोत्तर निष्ठा दोनच, ह्या पालोपट्टाचा विध्वंस झाला. असो. आम्ही वारंवार म्हणतों कीं, भगवंतांनीं ह्या दोन निष्ठा सांगितल्या आहेत ह्या सिद्धावस्थेंतील नसून साधकदशेंतील आहेत. सांख्ययोगाची निष्ठा एक व योगाची निष्ठा दुसरी. या दुसऱ्या निष्ठेंत कर्म, भक्ति, पातंजलयोग इत्यादींचा समावेश होतो. भगवान् ज्ञानोत्तर कर्म केल्यास चांगलेंच म्हणतात. परंतु त्यांचा मात्र कर्म करावेंच असा आग्रह नाहीं. विधि नाहीं. ज्ञान्यास बांधून घालण्यास आपला अधिकार नाहीं हें भगवान् जाणून होते. तसेंच ज्ञानोत्तर भक्तीचीही त्यांना आवड आहे असें तें वारंवार

सांगत असतात. ह्या वाक्यांतील मर्म नुसतें वरवर पहाणारास समजत नाहीं. "ज्ञानी झाल्यावर त्यास कांहीं कर्म करणें नलगे" असेंही भगवान् सांगतात व "कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोग प्रशस्त" कारण, "मी स्वतः कर्म करीत असतों" असेंही भगवान् सांगतात तेव्हां, हें आहे काय ? ही शंका साहजिकच उत्पन्न होते. मागें सांगितलेंच आहे कीं, तुर्यावस्थेंत परमेश्वरबुद्धीं आपलें सगुण रूप टाकतो व गुणातीत होऊन भक्तांशीं ऐक्य पावतो. त्या स्थितींत उपदेश अगर विधि ही भावनाच अनवसर आहे. हीं परस्परविरोधी दिसणारीं वाक्यें अधिकारपरत्वें लाविल्यास त्यांतील विरोध नाहींसा होतो. ज्ञान्यास कर्में करण्याचें कारण नाहीं हेंही खरेंच; व त्यानें जागृतादि ऐहिक अवस्थेंत प्रारब्धवशात् कर्में केलीं तर चांगलेंच हेंही खरें. कारण त्यायोगें दीनांचा उद्धार होत असतो. तसेंच साधकाचे ठिकाणीं कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोगच प्रशस्त आहे. अर्जुनही साधकच आहे. शिवाय दुसरें असें आहे कीं, साधकदशेंत ज्या साधनाचा उपयोग मुमुक्षु करीत असतो त्याच साधनाचा ज्ञानोत्तरदशेंतही देहाभ्यासानें सहज अवलंब करीत असतो. निरपेक्ष यज्ञयागादिकांनीं चित्तशुद्धि होऊन ज्ञानद्वारा स्थितप्रज्ञ झाला तरी, नेहमीं घडलेलें कर्म देहाभ्यासानें यज्ञयागादिच त्याचे हातून घडेल. तसेंच, भक्तिमार्गानें जर त्यास सिद्धि मिळाली असेल तर ज्ञानोत्तरही तो तुकोबारायासारखा कीर्तनांतच रंगेल व त्यांतच त्याला समाधि लागेल. कर्म, भक्ति व ज्ञान (आत्मचिंतन) हे तिन्ही मार्ग भगवद्गीतेंत प्रतिपादिले आहेत, त्यांत अमुकच श्रेष्ठ असा भगवानांचा आग्रह नाहीं. सर्व मार्गांचें ध्येय मोक्ष हेंच होय. आमचे मतें जर कोणतें साधन विशेष जोरानें भगवंतांनीं प्रतिपादिलें असेल तर तें साधन, योगानें म्हणजे पातंजलयोगानें येणारें बुद्धिसाम्य अथवा चित्तैकाग्र्य व कर्म-भक्ति-ज्ञान (आत्मचिंतन) या तिन्ही उपयांनीं तेंच साध्य करावयाचें आहे. बुद्धिसाम्य झाल्यावर मग महावाक्याच्या अर्थाचा त्या बुद्धीवर प्रकाश पडून मग अपरोक्षसाक्षात्कार होत असतो. भगवंतांनीं कर्माचीही प्रशंसा केली आहे. भक्तीची तर त्याहीपेक्षां कमालीची तारीफ केली आहे. ज्ञान तर श्रीकृष्णस्वरूपच होय. तेव्हां अशा ठिकाणीं रहस्यकारांना आपल्या कर्मयोगाचीच तुतारी वाजविलेली आहे असें कां वाटावें ? आमच्या शास्त्रांतील एक वर्म सर्वांनीं लक्षांत ठेवण्याजोगें आहे तें हें कीं, ज्या साधनाची अथवा देवतेची मीमांसा सुरू होते त्यावेळीं त्या साधनास अथवा देवतेस सर्वांत श्रेष्ठपद दिलें जात असतें; व असें करण्यांत त्या साधनांत अथवा देवतेंत साधक अथवा भक्त अनन्यरत व्हावा हा शास्त्रकारांचा हेतु असतो. असो.

आर्तभक्त देवाला अर्थात्च प्रिय होत नाहींत, कारण त्या भक्तींत 'दे वाण घे वाण' म्हणजे व्यापारी कावा असतो. कामना सफल झाली म्हणजे संकट निवारण झालें कीं, भक्त व देव यांचा संबंध सुटला. अशा भक्तास ज्ञानप्राप्ति होत नाहीं.

कारण त्यांची प्रपंचरति तिळमात्र कमी झालेली नसते. देवास हवे ते नवस करावेत, देहास अत्यंत कष्ट होतील अशा तऱ्हेची सेवा करावी, गळ्यास सुया अगर खिळे टोंचून घ्यावेत, देवाच्या दारांशी उपाशी धरणें घ्यावें इत्यादि प्रकारची हीन भक्ति तामसभक्ति होय. भावकाई, म्हसोबा, बिरोबा, देमव्वा इत्यादि देवता अशा भक्तांच्या उपास्य होत. अर्थार्थी भक्तसुद्धां ज्ञान मिळवूं शकत नाहींत. त्यांच्या अर्थाची प्राप्ति झाली कीं, उपास्य-उपासक संबंध सुटला ! यामुळें व चित्तांत प्रपंचाची उपरति नसल्यामुळें अशा भक्तांनाही परमेश्वर आपलें सत्य ज्ञान सांगत नाहीं हेंही रास्तच होय. जिज्ञासु भक्त हे ह्या दोन्ही भक्तांपेक्षां श्रेष्ठ होत. परमेश्वराचें वैभव जाणण्याची व त्या वैभवाचा उपभोग घेण्याची अथवा ज्ञानप्राप्ति करून घेण्याची या भक्तांची इच्छा असल्यामुळें त्या त्या इच्छेप्रमाणें भक्तांस फलप्राप्ति होत असते. ह्या भक्तांत वैराग्य, साधनसंपत्ति, कैवल्याकांक्षा, ध्येय इत्यादि भेदांमुळें उच्चनीच भाव होत असतो.

यहुदी, ख्रिस्ती व महंमदी या धर्मांत पाहिल्यास विश्व हें खरें आहे, जीव खरे आहेत. देव जीवाहून भिन्न आहे. तो देव या जीवास जीवाची शर्यत खेळण्यास एकदांच संधि देत असतो; व एकाच शर्यतींतील जीवाच्या कर्माप्रमाणें त्यास फलदान करीत असतो. चांगल्यास स्वर्गवास व वाईटास नरकवास हीं दोनच फलें होत. येशूख्रिस्तावर भरंवसा ठेऊन मिळवावयाचें फल Revelation च्या बाविसाव्या भागांत सांगितलें आहेः—

सेंट जान म्हणतोः—

"And he showed me a pure river of water of life, clear as crystal proceeding out of the throne of God and of the Lamb (येशूख्रिस्त). In the midst of the stream of it and on either side of the river was there the tree of life which bore twelve manner of fruits and yielded her fruit every month and the leaves of the tree were for the healing of the nations " " And they shall see his face ....." " And there shall be no night there and they need no candle, neither the light of the Sun for the God giveth the light and they shall reign for ever and ever."

देवाच्या सिंहासनाकडे चिरकाल पाहात बसावें, चिरंतन उजेडांत असावें, जीवाच्या निरंतर स्फटिकतुल्य प्रवाहांत स्नान करावें, देवाबरोबर व त्याचा पुत्र येशू यांजबरोबर बोलत चालत राहावें असें ख्रिस्ती धर्माचें ध्येय आहे व अशा भावनेनें देवाची भक्ति केल्यास देव तसेंच फल देतो.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहं ॥

सिंहासन, निर्झर, वृक्ष या स्थूल वस्तू आहेत. स्थूल वस्तु परमाणुसंयोगानें झालेल्या आहेत. असले संयोग विश्वांत चिरंतन असत नाहींत. ईश्वर व त्याचा पुत्र हे दोघेही सिंहासनारूढ होण्यास त्यांना अवयवसमुदाय असला पाहिजे. त्या अवयवांच्या पेशी कशाही तऱ्हेच्या असोत त्या संयोगास आल्या त्या वेळींच वियोगाकडे जाण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत उत्पन्न झाली असली पाहिजे. हें फल अर्थात् अंतवंत आहे.

अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ॥

अ० ७.

तसेंच अश्रद्धावान, मूर्तिपूजक, खुनी वगैरे लोकांकरितां फल सांगितलें आहें तें असें:—

But the fearful, the unbelieving and the abominable and murderers and whore-mongers and sorcerers and idolators and liars shall have their part in the lake which burneth with fire and brimstone " Revelation Chap. 21.

कर्म व पुनर्जन्म यांच्यासंबंधाची कल्पना या धर्मांतून नाहीं. वाईट कर्में करणारीं माणसें हीं सैतानाचीं मुलें होत व देव त्यांचें नुकसान करतो. (सेंट जान. भा० ३. ८. नवाकरार) देवाच्या इच्छेविरुद्ध कोणी वागल्यास त्यास देव भयंकर शिक्षा करीत असतो. सोडम व गोरमरासारखीं शहरें जाळून फस्त करीत असतो.

महंमदी धर्मांतमुद्दां स्वर्गनरकाच्या अशाच कल्पना आहेत. परमेश्वर ज्यांना तारणार आहे असे लोक तो प्रथमपासून रोखून ठेवीत असतो व ज्यांचा नाश करावयाचा आहे त्यांच्या बुद्धींत भ्रंश उत्पन्न करीत असतो असें कुराणांत सांगितलें आहे. इतकेंच नव्हे तर अल्लानें कुराणांत मुद्दाम अशीं संदिग्ध वाक्यें घातलीं आहेत कीं, त्यायोगें गैरमर्जीतले लोक मार्गभ्रष्ट व्हावेत. Allah is he who sent down unto the book some verses which are the mother of the book and others ambiguous wherefore those that are perverse take the ambiguous part (Kuran Chap. III. 7).

परमेश्वर हा विश्वास व्यापून असत नाहीं. त्याच्या घडामोडीस जीवाच्या कर्माकर्माची अपेक्षा नाहीं. पुनर्जन्म नाहीं. कुंभार ज्याप्रमाणें चाक आपल्याहून निराळें करून ठेवतो व वाटेल तेव्हां मोडून टाकतो, अगर आपण केलेलें मृण्मयपात्र शुभाशुभ कार्यास लावण्यास कुंभार समर्थ आहे तद्वत् ईश्वर एका प्राण्यास

आपल्या इच्छेप्रमाणें सुखी करील अगर दुःखी करील त्यास कोण विचारणार? (नवाकरार. रोमन्स. ९)

या कारणामुळें ख्रिस्ती, महंमदी वगैरे धर्मांत नवविधा भक्तीचा प्रकार दिसून येत नाहीं. प्रार्थना (Prayer) करणें, आत्मनिवेदन करणें व श्रवण करणें हे तीन प्रकारच या भक्तींत विशेष दिसून येतात. आमच्या धर्मांत ईश्वरास सर्वव्यापित्व असल्यामुळें तो कशांत नाहीं असें नाहीं. प्रतीकोपासना घेतली तरी तो प्रतीकांत आहे यामुळें सर्व ठिकाणीं परमेश्वर पहावयाचें झाल्यास भक्तास कोठेंच अडचण पडत नाहीं. संसारांतील सर्व मनोविकारांस या ईशभक्तींत ईश्वरार्पण करण्यास अवसर मिळतो. शंख-चक्र-गदाधारी, अमित सौंदर्यवान, वैजयंती मालाधारी, देदीप्यमान किरीट-कुंडल-वाही, पीतांबरधारी अशासारखी निसर्गजन्य मनोविकारांना (Sentiment) पटण्याजोगी सगुण मूर्ति ध्यानास घेऊन आपल्या पंचेंद्रियांची विषयवैभवपरवृत्ति, कीर्तन, श्रवण, प्रसादग्रहण, षोडशोपचार पूजाविधि इत्यादि निवृत्ति उपायांनीं शांत व नियमित करून हळू हळू सर्वविश्वाचे ठिकाणीं तीच मूर्ती भक्त पाहूं लागतो व नक्षत्रमालांचीं भूषणें, चंद्रसूर्याचे नेत्र, आकाशगंगेची वैजयंतीमाला इत्यादि विश्वजन्य सोपस्कारयुक्त सगुणमूर्तीचें ध्यान करण्यास भक्ताची तयारी होते. पुढें पुढें जड वस्तूंचा संभार कमी होत जाऊन हृदयांत व बाह्यविश्वांत चिन्मय एकच एक स्वरूपाचा त्या भक्तास अपरोक्ष साक्षात्कार होत असतो. स्थूलानंतर सूक्ष्म, सूक्ष्मानंतर ज्ञानमय अशा तऱ्हेची शरीरानुकूल प्रगति भक्तांत होत जाते. आसनीं, शयनीं, भोजनीं रामरूपाकार होण्याचीं साधनें या वैदिकधर्मासारखीं इतरत्र नाहींत. तसेंच सर्वांभूतीं परमेश्वर आहे ही कल्पना इतर धर्मांत नाहीं. फक्त " मनुष्यास मात्र ईश्वरानें आपल्या आकृतीसारखी आकृति दिली व त्याच्या नाकपुडींतून प्राणवायु आंत फुंकून घातला " यामुळें मनुष्येतर प्राण्यांना आत्मा नाहीं अशी समजूत असल्यामुळें सर्वांभूतीं, वसे काय पण सर्व ठिकाणीं जलीं, स्थलीं, काष्ठीं, पाषाणीं नारायण भरून उरला आहे ही कल्पना केवळ सनातन वैदिकधर्मांतच आहे. असो. या विवेचनावरून इतर धर्मांची अवहेलना आम्हांस इष्ट आहे असें कोणी समजूं नये. एकाच परमेश्वरानें ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूप जो जो धर्म घालून दिला व जेवढें जेवढें सत्य उलगडून दिलें त्या त्या धर्मांत व सत्याचरणांत प्रत्येकानें रत असावें असाच श्रीकृष्णाचा अभिप्राय आहे. " Thou shalt love thy neighbour as thyself " या आज्ञेपेक्षां " समं सर्वेषु भूतेषु " ही आज्ञा जास्त प्रगल्भ व उदात्त आहे ह्याबद्दल कोणासच शंका येणार नाहीं. परंतु कसेंही असलें तरी " स्वधर्मे निधनं श्रेयः " हाच मार्ग सर्वांस श्रेयस्कर आहे. असो. इतर धर्मांतील भक्तिपद्धतींत गुणही पुष्कळ आहेत त्यामुळें तेही धर्म त्या त्या धर्मीयांस आदरणीयच होत. प्रत्यक्ष येशू ख्रिस्ताचें चरित्र पाहिल्यास त्याच्या निःसीम निष्ठेची व स्वार्थ-

त्यागाची सर्वांस खात्री पटेल. मानवजातीकरितां त्यानें स्वतःच्या शरीराचा यज्ञ करून जगास म्हणजे तद्धर्मीयांस स्वार्थत्यागाचा अनुपम धडाच घालून दिला आहे. तसेंच परमेश्वराची भक्ति कशा तऱ्हेची असावी याबद्दल तो सांगतो. "The Lord our God is one Lord. And thou shalt love the Lord thy God with all thy heart and with all thy soul and with all thy mind and with all thy Strength." St. Mark VII 29. 30.

समारियाच्या एका बाईस त्यानें ईश्वराचें स्वरूप व भक्तीचा प्रकार सांगितला आहे तो असाः—

God is a Spirit and they that worship Him must worship Him in Spirit and in truth.

इस्लाम धर्मासुद्धां भक्तिदृष्ट्या फार महत्वाचा आहे. सर्वस्व परमेश्वरास अर्पण करणें हेंच या इस्लामधर्माचें स्वारस्य होय. अल्लाच्या नांवानें सतत टाहो फोडणें, त्याच्या स्वामित्वाचें व गुणांचें सदोदित चिंतन करणें, विवेक जागृत ठेवणें, आज्ञा पाळणें, संकटकाळीं धांवा करणें इत्यादि प्रकार या भक्तींत आहेत. ज्या त्या धर्माच्या निःसीम प्रेमानें व श्रद्धेनें आचरण करून तत्तद्धर्मीयांत तत्तद्धर्मोपदिष्ट सिद्धि मिळविलेले महात्मे अनेक होऊन गेले आहेत, हें इतिहासज्ञांस सांगण्यास नको आहे.

यादृशी भावना कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ॥

ह्या भगवदुक्तीप्रमाणें स्वस्वधर्माचें आचरण करून त्या त्या भावनेप्रमाणें फल मिळवावयाचें आहे. आतां भक्तिमार्गांत रत असलेल्यानें स्ववर्णाश्रमाचें कर्म सोडलें पाहिजे असें नाहीं. इतकेंच नव्हे तर नियत कर्म करूनच भक्ति केली पाहिजे असा सर्व धर्माधिकाऱ्यांचा आग्रह आहे. "स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः"

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥

असें भगवानही सांगत आहेत. एकनाथ, तुकाराम इत्यादि साधुपुरुष सुद्धां वर्णाश्रम कर्माचा त्याग करण्यास सांगत नाहींत. त्यांनीं दांभिक कर्मठांची निंदा केली म्हणून शास्त्रोक्त विधियुक्त कर्माची निंदा त्यांनी केली नाहीं. त्यांच्या वचनांचा विपर्यास करून कांहीं लोक कर्ममार्गाची निंदा करीत असतात हें योग्य नाहीं. तुसत्या अज्ञ कर्मठाचबद्दल तुकाराम म्हणतातः—

वर्णाश्रम करिसी चोख । तरि तूं पावशी उत्तम लोक ॥
परि तें तुज नाहीं ठावें । जेणें अंगीं ब्रह्म व्हावें ॥

तथापि वर्णाश्रमधर्माचा लोप झालेला त्यांना खपत नाहीं—

वर्णधर्म कोणी न धरी विटाळ ।
घालती गोंधळ एका ठाईं ॥

वेदाचे पाठक सेवितील मद्य ।
न देखती भेद विषयीं भांड ॥
तुका म्हणे किती करावे फजित ।
तोचि छंद नित्य बहु होती ॥

एकाच थोरपुरुषाचीं वाक्यें परस्परविरोधीं असल्यास तीं वाक्यें संदर्भावरून म्हणजे प्रकरणावरून व जेथें प्रकरण अवगत नसेल जेथें अधिकारास अनुसरून अर्थीं लाविलीं पाहिजेत, नाहींतर एका सोंवळ्या भटास शिवल्यावर त्यास संताप आल्यामुळें एका आधुनिकानें त्यास तुकारामाचें वाक्य म्हणून दाखविलें कीं

ऐसे कैसें रे सोंवळें । शिवतां होतसें ओंवळें ॥

अर्थातच आधुनिकानें दांभिक सोंवळ्याची निंदा या अभंगांत आहे, खऱ्या ब्राह्मणाची नाहीं हें न जाणून हें प्रमाण दाखविलें; तसेंच त्या ब्राह्मणानें प्रकरणाकडे लक्ष न देतां म्हटलें " अहो, पण तुकाराम काय म्हणतो ठाऊक आहे काय ? अशा तुमच्यासारख्या वचनसंदर्भ न कळणाऱ्या माणसाला " तुका म्हणे ऐशा नरा मोजून, माराव्या पैजारा " अशांतील प्रकार होईल. असो.

संध्यावंदनादि सर्व नित्यकर्में केवळ भक्तिपर आहेत हें त्या कर्मांचा अर्थ कळणारास निराळें सांगणें नको. एक संध्या घेतली तरी त्यांत कर्म, उपासना, योग, ज्ञान इत्यादींचा फार चातुर्यानें समावेश केला आहे. संध्या हें उच्चप्रकारचें भजनच आहे. स्वाध्याय हा ईशनिर्मित मंत्रांनींच भजनाचा श्रेष्ठतम मार्ग तयार केला आहे. ब्राह्मयज्ञ हा महानुभावांचें-ऋषींचें स्मरण आहे. वैश्वदेव हें यज्ञाचें, स्वार्थत्यागाचें, भूतदयेचें शिक्षण आहे. सर्व कर्मांचेशेवटीं अच्युतनारायणाचें स्मरणच ठेविलें आहे. सारांश सर्व कर्मांचा नारायणाचेच ठिकाणीं न्यास करावयाचा हें तत्व, नियत कर्ममार्गातही धर्माचार्यांनीं घालून दिलेलें आहे. श्रीकृष्ण भगवान् हेंच सांगत आहेत. " सर्वकर्मांचा सन्यास माझे ठिकाणीं कर " " माझा अनन्यभक्त हो, म्हणजे तुझा योग-क्षेम मी चालवीन " " मन्मना भव मत्सक्तो मद्याजी मां नमस्कुरु " " मी भक्ताचा व भक्त माझे " " मी त्यांच्यांत व ते माझ्यांत " अशा तऱ्हेचा देवभक्तांतील अभेद दाखविणारीं वचनें अनेक आहेत. परंतु सिद्धि मिळण्यास जी भक्ति पाहिजे ती अनन्य पाहिजे

" जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी " ॥

अशी भक्तांस देवाबद्दल अहर्निश तळमळ लागून राहिली पाहिजे. देहबुद्धीचा लय झाल्याविना मात्र परमेश्वर पावत नाहीं. कोणताही मार्ग घेतला तरी सिद्धि प्राप्त होण्यास प्रपंचाची होळीच करावी लागत असते. भक्तिमार्ग जरी सर्वांना विहित आहे तरी पराकाष्ठेची म्हणजे ब्रह्मज्ञान होण्याची भक्ति एका जन्मांत साध्य होत नाहीं. यांगांत जें चित्तैकाग्र्य साध्य करावयाचें असतें तेंच शेवटीं भक्तिमार्गांतही

करावयाचें आहे. सगुण मूर्तीचें ध्यान निरनिराळ्या चक्रामध्यें करण्यांत व त्या मूर्तीचे चरणकमळीं मन स्थिर करण्यांत अर्थातच योगाचाही आश्रय करावा लागतो. परमेश्वरार्पणपूर्वक कर्में करावयाचीं म्हणजे भक्तियोगच. ह्या मार्गाचें रहस्य हेंच आहे कीं, यांतील कांहीं फुकट जात नाहीं. ह्या जन्मीं थोडें, पुढील जन्मीं थोडें असें होत होत भक्त शेवटीं विष्णुपदीं जातो हा निश्चय. परंतु कोणत्याही मार्गांत सिद्धि मिळविण्यास प्रपंचास शेवटीं आंचवावें लागतें.

भक्ति तो कठीण शुळावरील पोळी ।
निवडे तो बळी विरळा शूर ॥ तुकाराम

" Except a man be born again he cannot reach the kingdom of God " Jesus Christ.

तसेंच

क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया ।
दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति ॥

कठ ७.

१५ ज्ञानयोग.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिहविद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥

भ० गी० अ० ५ श्लो० ३८.

ह्या लोकीं ज्ञानासारखें पवित्र असें दुसरें कांहीं नाहीं. साधकानें योगमार्गाचा अवलंब करून त्यांत प्रावीण्य मिळविल्यास कालांतरानें त्यास ज्ञानप्राप्ति होत असते. ह्या भगवद्गीतावचनावरून व रहस्यकारांच्या योग शब्दाच्या पर्यायावरून म्हणजे 'तुल्यबल' कर्मयोगावरून पाहिलें असतां, हा वरील श्लोक त्यांच्या नवीन संप्रदायास बाधक होतो. रहस्यकारांना या ठिकाणीं योगाचा अर्थ पातंजल योग असा करतां येणार नाहीं. कारण तिसऱ्या अध्यायांतच त्यांचा कर्मयोगविचार आहे. हा श्लोक चवथ्या म्हणजे ज्ञानकर्मसंन्यासयोगांतील आहे. रहस्यकारांचे म्हणण्याप्रमाणें पातंजलयोगाचा विचार सहाव्या अध्यायांत आहे. तेव्हां 'योग' शब्दाचा अर्थ या ठिकाणीं पातंजलयोग करणें म्हणजे "प्रस्तुत हान" व "अप्रस्तुत प्रसंग" असे दोन्ही दोष पदरीं घ्यावे लागतील. असो. भगवंतांचे मतें कर्मयोगापेक्षां ज्ञानयोग श्रेष्ठ कसा आहे हें दाखविण्याचें या योगांत योजिलें आहे. वरील श्लोकांत ज्या योगाचे साहाय्यानें ज्ञान मिळेल असें भगवान् सांगत आहेत तोच योग तूं स्वीकार व युद्धास ऊठ अस भगवान् बेचाळिसाव्या श्लोकानें अर्जुनास सांगतात. त्याअर्थी योग हें साधन व ज्ञान हें साध्य झालें हें उघड होत आहे. तसेंच--

सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते

असें भगवंतांनीं स्पष्ट शब्दांनीं कर्मयोगास ज्ञानापेक्षेनें अवरत्व दिलेलें असतां रहस्यकारांनीं त्याच योगास तुल्यबलत्व दिलें आहे.

"ज्ञानाग्निदग्धकर्माणं" "यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते"
"श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः
"ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते"
"संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः"

हीं भगवद्वचनें आमच्या मतें ज्ञानाचें श्रेष्ठत्व दाखविण्यास पुरेशीं आहेत. आधींमुळीं रहस्यकारांनीं गीतोपदेशास आरंभ केला तो वक्त्यांस व श्रोत्यांस ब्रह्मज्ञान उत्पन्न झालेलें आहे अशा समजुतीनें केला आहे. आमचें मतें यामुळें ही एक नवीनच "मीमांसा" उत्पन्न झाली आहे. आजपर्यंत "अथातो धर्मजि-

ज्ञासा " या सूत्रानें आरंभ झालेली " पूर्वमीमांसा " (जैमिनीकृत) प्रसिद्धच आहे. तसेंच " अथतो ब्रह्मजिज्ञासा " या सूत्रानें आरंभ झालेली " उत्तर मीमांसा " (बादरायणकृत) ही प्रसिद्ध आहे. परंतु " अथातो ब्रह्मज्ञानोत्तरकर्म-जिज्ञासा " अशा सूत्रानें आरंभ केलेली ही " उत्तरपूर्व " अथवा " उत्तरदक्षिण मीमांसा " (बाळाचार्यकृत) तृतीय मीमांसा या भरतखंडांत निर्माण झाली आहे. आजपर्यंत कर्मविधिनिषेधांचें टुमणें साधकाच्याच फक्त मागें लागलेलें होतें; परंतु रहस्यकारांनीं हें टुमणें ज्ञानी लोकांच्या मुद्दां पाठीस लाविलें हें मोठें अलौकिक कार्य त्यांनीं केलें आहे ! ह्या नवीन मीमांसेचा प्रसार भरतखंडांत सर्वत्र करण्याकरितां छापखानेवाले, पुराणिक, शास्त्री वगैरे मंडळी पुढें येऊं लागली आहेत. हें या संप्रदायाच्या भावी उत्कर्षाचें सुचिन्हच आहे. रहस्यकारांनीं भगवद्गीतेचा मार्ग जर ब्रह्मज्ञानीजनाकरितां काढला आहे तर मग साधक व साधकेतर यांना या शास्त्राचा उपयोग काय ! समबुद्धि व स्थिरप्रज्ञता साध्य झाल्यावर रहस्यकारांचा कर्मयोग सुरू होणार; तोंपर्यंत या शास्त्रास त्यांच्या मतें अर्थातच अधिकार येत नाहीं. हा समबुद्धियोग सर्वांना साध्य नाहीं. तेव्हां त्यांच्याच युक्तिवादानुरूप गीताशास्त्र केवल अल्पसंख्याकांकरितां आहे असें सिद्ध होत आहे. बरें, हें शास्त्र अशा ब्रह्मज्ञ, समबुद्धि, स्थिरप्रज्ञ, सर्वा-भूतीं ईश्वर पहाणाऱ्या अथवा दृश्याच्या बुडाशीं परमात्मस्वरूप ओळखणाऱ्या इसमाकरितां आहे असें धरलें तरी रहस्यकारांचें मतें असे प्राणि कोण आहेत ? याज्ञवल्क्य बोलून चालून संन्यासमार्गी; शंकराचार्यादि जगद्गुरु तर स्वरूपसंन्या-शीच. तुकाराम, एकनाथ, रामदास ही मंडळी या गीतारहस्यास योग्य अधिकारी आहेत असें म्हणावें तर तुकारामांनीं तरी प्रपंच केला असें म्हणतां येईल काय ! तुकारामाचें चरित्र पाहिलें असतां असें दिसतें कीं, त्याचा एक मुलगा उपासमार होऊन वारला. बायकापोरें सदोदित अन्नान्न करीत होतीं. बायकोनें माहेरच्या तुटपुंज्या सहाय्यानें शिव्याशाप देत कसा तरी तुकारामाच्या प्रपंचाचा गुजारा केला. तुकारामास मंबाजीनें मार दिला, म्हणून त्यास उलट मार न देतां त्याचे हात दुखावयास लागले म्हणून त्याचीच शुश्रूषा केली. ह्या व अशा अनेक असल्याच कृति केल्या, त्याला रहस्यकार " नेटका प्रपंच " म्हणतात काय ! एकनाथमहाराजांची स्वारी स्नानाहून परत येत असतां यावनानें आपल्या तांबूलरसानें त्यांना वरचेवर विटाळ करण्याचा संकल्प केला तरी एकनाथानीं त्याचा प्रतिकार न करतां आपणच निमुटपणें पुन्हां पुन्हां गंगेस खेपा केल्या. तसेंच भरपंक्तीमध्यें त्यांच्या कुटुंबाचा एका ब्राह्मणानें उपमर्द केला असतां त्याचा सूड घेण्याचें बाजूसच राहून उलट त्या ब्राह्मणाची, त्याचा इच्छाभंग होऊं नये म्हणून त्यांनीं विनवणी केली. तेव्हां रहस्यकारांनीं

३९४ पानावर दिलेल्या

यस्मिन्यथा वर्तते यो मनुष्यः ।
तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः ॥
मायाचारो मायया बाधितव्यः ।
साध्वाचारः साधुना बाधितव्यः ॥

अथवा

यो यथा वर्तते यस्मिन् तस्मिन्नैवं प्रवर्तयन् ।

या वचनांशीं या साधुचरित्रांचा कसा मेळ बसतो ?

धटासि आणावा धट । उद्धटासि पाहिजे उद्धट ॥
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥

हा समर्थांचा उपदेश कर्मयोगशास्त्रांमधील प्रधानसूत्र आहे. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें, समर्थांच्या चरित्राशीं तरी हें सूत्र जुळतें आहे काय ? समर्थ स्वतःच म्हणतातः—

मना रे जनीं मौन्य मुद्रा धरावी ।
कथा आदरें राघवाची करावी ।
नसे राम तें धाम सोडून द्यावें ।
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥
सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं ।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ॥

तेव्हां अशा ब्रह्मचर्यव्रतानें व भिक्षावृत्तीनें आजन्म रहाणाऱ्या समर्थांचा चरित्रक्रमसुद्धां रहस्यकारांच्या कर्मयोगास विरुद्धच आहे. अगदीं अलीकडील रामकृष्ण परमहंस यांनी तरी प्रपंच धड केला असें रहस्यकारांचें म्हणणे आहे काय ? आतां राहातां राहिले जनक. मागील योगांत दिलेली कथा पाहिल्यास जनकांनीं आग विझविण्याच्या व चीजवस्त, प्राण वांचविण्याच्या भरीस न पडतां ते स्थाणूसारखें तटस्थ राहिलेहें तरी रहस्यकारांना योग्य वाटतें काय ? विश्वामित्रानीं वसिष्ठाचे शंभर पुत्र मारले त्या वेळीं वसिष्ठानीं "धटासि आणावा धट" ह्या सूत्राच्या अर्थास विपरीत असेंच नाहीं का वर्तन केलें ?

कोणी म्हणेल कीं " अहो रहस्यकारानीं हीं वर दिलेलीं वचनें आपल्या पदरचीं नाहींना दिलीं ? जर तीं पदरचीं नाहींत तर तीं अग्राह्य कां ठरवितां ? " आमचें म्हणणें, " होय, हीं पदरचीं वचनें नव्हेत. परंतु अशा वादविवादांत नेहमीं दोन पक्ष असतात. एक पक्ष म्हणजे एकाच शास्त्रकाराचीं जर परस्परविरुद्ध अशीं वचनें असतील तर त्यांचा प्रकरणदृष्ट्या मेळ बसतो कीं नाहीं हें पाहावयाचें. संदर्भ, अधिकार, प्रसंग इत्यादिकांवरून अशा वचनांत मेळ बसतच नसेल तर त्या ठिकाणीं त्या वचनावरून विकल्प मानावयाचा आहे; म्हणजे हें अगर तें

कोणतें तरी एकच ग्राह्य, हें एकदां तें एकदां असें नव्हे. हा एक पक्ष. दुसरा पक्ष असा कीं, अशीं परस्परविरोधी वचनें असतील तर आदर व श्रद्धा या दोन्हीं विकारांच्या तावडींत न सांपडतां त्या शास्त्रकारास अगर साधूस मुळींच प्रमाण न मानणें. पहिला पक्ष स्वीकारल्यास ह्या वचनांचा मेळ सहज बसतो. गृहस्थानें व्यवहारांत कसें वागावें, परमार्थाकडे नजर ठेवून प्रपंच कसा करावा अशाबद्दल जेव्हां शास्त्रकार व साधुपुरुष उपदेश करीत असतात तेव्हां कर्तव्य, धैर्यशालित्व, जशास तसें, काटकसर, योग्यदान अशासारखेच उपदेश करीत असतात. परंतु साधक तीव्र मुमुक्षूपैकीं आहे, त्याला प्रपंच मिथ्या दिसत आहे, ईश्वराच्या चरणप्राप्तीची अत्यंत उत्कंठा लागलेली आहे तर अशा साधकास " सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं " अशाच तऱ्हेचा उपदेश योग्य आहे. दुसरा पक्ष घेतल्यास, अशीं परस्परविरोधीं वाक्यें लिहिणाऱ्या पुरुषाचीं वचनेंच प्रमाण म्हणून देण्याचें कारण रहात नाहीं. परंतु रहस्यकारांनीं हीं प्रमाणें दिलीं आहेत. तेव्हां संन्यासपर व कर्मपर अशा एकाच पुरुषाच्या वचनांचा ते कसा मेळ लावीत आहेत ! असो. आतां आपण ज्ञानयोगाचा आश्रय करणाऱ्या शिष्याच्या इतिहासाचें क्रमशः अवलोकन करूं म्हणजे कर्मयोगशास्त्राचा टिकाव या इतिहासांत कोठपर्यंत लागतो तें पाहूं. जिज्ञासा अथवा मुमुक्षुत्व या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, इहलोकीं शाश्वत असें कांहीं दिसत नाहीं, कालाचीं व स्थलाचीं दोन्हीं टोकें मनुष्यास न दिसणाऱ्या ठिकाणीं आहेत. इहलोकींच्या रंगभूमीवर असंख्य प्राणी आपापल्या भूमिका करून गेले आहेत, ते पुन्हां परत आलेले नाहींत. ' सुख सुंख ' म्हणून ज्यास म्हणतात तें क्षणैकजीवी असून औपाधिक आहे. हा आपला अल्प जीव या अफाट विश्वांत एका नुसत्या अणूएवढा आहे असें म्हणणें म्हणजे या जीवास फार महत्व देण्यासारखें आहे. मृत्यु केव्हां येईल याचा नेम नाहीं. शारीरिक व मानसिक व्यथा केव्हां कशा उत्पन्न होतील याचा भरवंसा नाहीं. जिकडे तिकडे सर्वत्र परवशता दिसून येते. अशा तऱ्हेची प्रपंचांत नैराश्यवृत्ति व अलंबुद्धि उत्पन्न होणें ही या जिज्ञासेंतील पहिली पाहिरी होय. यानंतरची पाहिरी म्हणजे या नश्वर प्रपंचांत कांहीं तरी सत्य अशी वस्तु आहे. मी जो लहान होतों तोच आज थोर झालों आहें, म्हातारा झालों आहें इत्यादि अनुभव वरचेवर पालटणाऱ्या देहाच्या आंत सर्व अवस्थांत अविकृत असलेल्या आत्म्यास उद्देशून सांगत असतात; तसेंच या जीवबाह्य सृष्टीचीं रूपें जरी क्षणक्षणीं पालटत आहेत तरी त्यांतूनही ओतप्रोत सूत्रात्मा एकच भरलेला आहे अशा तऱ्हेची भावना अथवा विचार प्रादुर्भूत होणें, ही दुसरी अवस्था होय. यालाच नित्यानित्य विवेक म्हणत असतात. वैराग्य व नित्यानित्य विवेक सिद्ध झाल्यावर मग अर्थातच अनित्याचा त्याग व नित्याचें ग्रहण हें साहाजिकरीत्याच ध्येय होऊं लागतें. अनित्य वस्तूंचा आंतबाहेर जन्मतःच सहवास असल्यामुळें अथवा

अनंत जन्मांचेंच त्याचें साहचर्य असल्यामुळें अनित्य वस्तू जरी विवेकास पटली तरी नित्यापासून तिची भेदप्रतीति अनुभवास येत नाहीं; त्यामुळें नित्यानित्य विवेक होऊन सुद्धां जीवाचें समाधान होत नाहीं. नित्यवस्तु काय आहे, तिचें स्वरूप कसें आहे, अनित्यवस्तूपासून पृथक्त्वानें तिचा साक्षात्कार होतो कीं नाहीं या विचारास मनुष्य लागला म्हणजे अर्थातच त्या साधनाच्या शोधास तो लागतो. आजपर्यंत कोट्यवधि जन्म आपण घेतले, नानाविध अनित्य कौंथ केलीं, सहस्रावधि पापपुण्यकर्में केलीं, या सर्वांस शेवटीं कांहीं अंत आहे काय ? का हें असेंच संसारचक्र पाठीमागें अनाद्यनंत रहाणार !

मृतश्चाहं पुनर्जातो जातश्चाहं पुनर्मृतः
नानायोनिसहस्राणि मयोषितानि यानि वै ।
आहारा विविधा भुक्ताः पीता नानाविधास्तनाः ।
मातरो विविधा दृष्टाः पितरः सुहृदस्तथा ॥

अशा तऱ्हेच्या निरुक्कारांनीं सांगितलेल्या यातायातींतून सुटावें अशी ज्यास जबर इच्छा होते त्यानेंच त्या साध्यांचीं साधनें हुडकावयाचीं आहेत. इतरांना अर्थातच त्यांची अपेक्षा नाहीं. बरें आतां अशा मुमुक्षु पुरुषास साधनें तरी काय आहेत ! मीं बद्ध आहें, यातून मीं सुटलों पाहिजे असें ज्यास वाटेल तोच मुमुक्षु. प्रपंच सुखात्मक आहे, तो परमेश्वरानेंच निर्माण केला आहे, त्यालाही तो चालवावा लागतो, त्याची इच्छा सर्वांनींच हा प्रपंच चालवावा अशी आहे, इतकेंच नव्हे तर तो मुक्त असतांही प्रपंचच करितो, तेव्हां सर्वांनींच हा ईशसृष्ट प्रपंच चालवून त्यांतच आनंद मानून राहिलें पाहिजे, परमेश्वराच्या या रंगभूमीवरील पडदे बाजूस करून पडद्याच्या आंत काय आहे हें पाहाण्याच्या भरीस पडूं नये अशी ज्यांची निष्ठा आहे त्यांना साधनाची उठाठेवही नको आहे हें उघड आहे. तेव्हां नित्यानित्यविवेक, वैराग्य, साधनसंपत्ति व मुमुक्षुत्व इतक्या चतुष्टयाची तयारी झाली म्हणजे त्यास साधकत्व आलें. आतां पहा कीं, साधकत्वाचा आरंभच मुळीं प्रपंचकल्पनेशीं विरोधात्मक आहे. प्रपंचबुद्धीचा व देहबुद्धीचा शनैःशनैः विराम होऊन, चिदानंद स्वरूपाचा आंतबाहेर सदैव आविर्भाव व्हावा या हेतूनें साधक, साधनांस प्रवृत्त होत असतो. संसारापासून निवृत्त व्हावें हेंच त्याचें इतिकर्तव्य असतें. हें साध्य एका जन्मांतच अथवा अल्पावधींत प्राप्त होणें शक्य नसल्यामुळें, त्या अंतिम हेतूकडे नजर देऊन साधक हा आपलें जीवनवृत्त तत्पर ठेवीत असतो. इहलोकांतील व्यावहारिक व शारीरिक कर्में तर त्याचे पाठीस लागलेलींच असतात, व तीं त्यास उरकून टाकणें भागच असतें. त्याप्रमाणें मोक्षास उपयोगीं पडणारीं कर्मेंही त्यास करणें अवश्य वाटतें. वासनेचा त्याग केल्याशिवाय गति नाहीं, इंद्रियांच्या स्वभावजन्य बाह्यवृत्ति अन्तर्मुख केल्याविना स्वरूपप्रतीति होत नाहीं इत्यादि तत्त्वें शास्त्राभ्यासानें त्यास अवगत झाल्यामुळें तो त्यांचा अभ्यास करूं

लागतो. देहादिकांनीं यज्ञयागादि कर्में निष्कामप्रवृत्तीनें करणें, मनानें एकान्तवासांत योगाभ्यास करून अथवा सगुण ईश्वराचें चिंतन करून चित्ताचें ऐकाग्र्य करणें, व बुद्धीनें आत्मस्वरूपाचा निश्चय करून त्या स्वरूपाचें चिंतन, मनन अथवा निदिध्यास करणें इत्यादि कायिक वाचिक व मानसिक साधनें हीं सर्व प्रवृत्तिपर आहेत असें कसें मानतां येईल ?

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वाऽत्मशुद्धये ॥

भ० अ० ५ श्लो० ११.

साधकास समबुद्धित्व मिळवावयाचें असल्यानें त्याची वृत्ति

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥

अ० श्लो० १८

अशा तऱ्हेची असावी लागते. तेव्हां, या अवस्थेंत "धटासि आणावा धट यासारखी राजनीति त्या बिचाऱ्यास कोठून साध्य होणार ?

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥

शीत व उष्ण, मान व अपमान ह्या द्वंदासारखीं द्वंद्वें कायमचा नाहींशीं करण्याकडे ज्याच्या मनाची धांव लागली त्यानें पुन्हां एका थोबाडांत मारल्यास दुसरा थोबाड मारणाऱ्यापुढें न करतां "खटनटासी खटनट" असें वागून कसें चालेल ? रहस्यकारांचे मतें एकनाथांनीं त्या अंभावर थुंकणाऱ्या यवनाचा चांगला खरपूस समाचार घ्यावयास पाहिजे होता अगर तुकारामानें संबाजीस उलट चांगला लंबे करावयास पाहिजे होता ! ! परंतु हें होणार कसें ? साधकाचें कसें तरी असो, कारण त्याचे सर्व मनोविकार कांहीं त्याचे ताब्यांत आलेले नसतात; परंतु एकनाथादि साधूंस अपकर्ता व अपकृत या दोहींत कांहीं भेदच गणिला नसल्यानें डाव्या हातानें उजव्या हातास अपकार झाल्यास त्याचा समाचार उलट उजव्या हातानें घेण्याइतकें मूढपणाचें वर्तन त्यांच्या हातून होणार नाहीं. सर्वांभूतीं परमेश्वर आहे ही वृत्ति चित्तांत दृढमूल झाल्यावर "माझा अमक्यानें अपमान केला", "माझ्याशीं अमक्यानें कपटाचरण केलें अथवा धटाचरण केलें" "मलाही त्याच्याशीं तसेंच वागलें पाहिजे" इत्यादि भावनांचा उगमच होणें शक्य नाहीं. गौतमबुद्धास एका गृहस्थानें राग येण्याकरितां खूप शिव्या दिल्या परंतु त्या शिव्यांचा पाढा संपल्यानंतर शांत चित्तानें बुद्धानें सांगितलें "बाबा ह्या शिव्या मी कांहीं घेत नाहीं. तुझ्या तुं पाहिजे असल्यास परत घेऊन जा" या उत्तरामुळें तो गृहस्थ अत्यंत ओशाळला. या प्रसंगांत रहस्यकाराच्या मतानें

बुद्धानें जागचें उठून एक पांचपन्नास श्रीमुखांत त्या गृहस्थास द्यावयास पाहिजे होत्या. कारण हा कर्मयोग असाच खगखणांत आहे. आजपर्यंत आम्ही अशा तऱ्हेच्या समचित्ततेच्या अनेक साधूंच्या गोष्टी ऐकत आलों त्या सर्व रहस्यकारांच्या कर्मयोगशास्त्राच्या दृष्टीनें अप्रयोजक व मूर्खपणाच्या होत! त्यांच्या मतें समचित्त झालें म्हणून काय झालें? संसारचक्र जर अबाधित चालवावयाचें आहे तर समचित्तांनींसुद्धां बळेंच अथवा खोटेंच असमचित्त व्हावयास शिकलें पाहिजे. ते म्हणतातः "निर्वैर व शान्त अशा साधुपुरुषांच्या आचरणासंबंधानें लोकांची सध्यां जी गैर समजूत झालेली आहे ती कर्मयोगमार्ग लुप्तप्राय होऊन सर्वच संसार त्याज्य मानणाऱ्या संन्यासमार्गाचें हल्लीं चोहोंकडे प्रस्थ वाढल्यामुळें झालेली आहे. निर्वैर झालें म्हणजे निष्प्रतिकारहि झालें पाहिजे असा गीतेचा उपदेश किंवा उद्देशही नाहीं" (गी० र० पा० ३९६) गीतारहस्याचा हा भाग सर्व काळजीपूर्वक वाचण्याजोगा आहे. गीतारहस्यांतील अस्सल रहस्य या एक दोन पानांत पाहावयास मिळेल. व्यवहारदृष्ट्या हा रहस्यकारांचा उपदेश आम्हांसच काय पण सर्व जगासच मान्य झाला पाहिजे. कारण व्यावहारिक सत्तेंत जोंपर्यंत आपण सर्वजण आहोंत तोंपर्यंत, कुलधर्म, जातिधर्म, देशधर्म इत्यादि अवश्य पाळले पाहिजेत. इतकेंच नव्हे तर अकालीं व अनाठायीं ब्रह्मज्ञानाच्या गप्पा झोडून प्राप्त कर्मापासून भ्याडासारखें पराङ्मुख होणें हें केव्हांही निंद्यच आहे. अशा कर्तव्यशून्य, नेभळट व आयदी लोकांचा जितका तीव्र निषेध होईल तितका करणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. परंतु हिंदुस्थानांत जे कोणी पांच चार ब्रह्मज्ञानी गिरिकंदरीं असतील अथवा "विश्वचि जयाचें घर" अशा वृत्तींत समाजांत असतील त्यांच्यामागें रहस्यकार कां हात धुऊन लागले आहेत? कुल, जाति, देश इत्यादि कृत्रिम बंधनें ज्यांचीं लयास गेलीं अथवा त्याविषयींचा आभिमान ज्यांचा पूर्ण नष्ट झाला त्यांना रहस्यकार असा बहिष्कार कां घालूं लागले आहेत? ते म्हणतात त्याप्रमाणें असें संन्यासमार्गीयांचें प्रस्थ तरी कोठें आहे? आम्हांस वाटतें रहस्यकारांचें धोरण या ठिकाणीं अगदीं निराळें आहे. "**संन्यासमार्गीयांचें प्रस्थ**" या पदांचा अर्थ श्रीशंकराचार्य, विद्यारण्य, रामानुज, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामकृष्ण परमहंस इत्यादि साधुपुरुषांचें प्रस्थ अथवा खुळमुळाट असा नसून वेदान्ताच्या निवृत्तिपर कथांनीं "धड प्रपंच ना परमार्थ" अशा तऱ्हेची अजागळ, मेषपात्र, निराशापूर्ण, निरुत्साही, स्वाभिमानशून्य वृत्ति आमच्या समाजांत दृढमूल होऊन गेलेली आहे व तिचा परिणाम तरुण भावी पिढीवर होण्याचा संभव आहे, तेव्हां तिचा प्रतिकार अवश्य केला पाहिजे अशा तऱ्हेचा रहस्यकारांचा आशय असला पाहिजे. कारण वर दिलेल्या संतसाधुमंडळींचें प्रस्थ हल्लीं हिंदुस्थानांत नाहीं हें रहस्यकारांना कोणी सांगावयास नको. भोंदूंचें मात्र प्रस्थ आहे, परंतु ते खरे संन्यासमार्गी नव्हत. तेव्हां रहस्यकारांचा हा वर दिलेलाच ज्र

आशय असेल तर तो अगदीं स्तुत्य आहे व आमचेंही मत असेंच आहे कीं, ब्रह्मज्ञान इतकें चव्हाट्यावर मांडलें गेल्यामुळें व अधिकारशून्य जनाच्या हातांत तें पडल्यामुळें समाजावर भलताच परिणाम झाला आहे व त्याचा प्रतिकार केला पाहिजे–परंतु असें करतांना " ब्रह्मज्ञान्यांनीं युद्धां कर्म केलेंच पाहिजे " सारखे अगदीं अशास्त्रीय, अब्रह्मण्य, अवेदोक्त सिद्धान्त ठोकण्याचें रहस्यकारांना कारण नव्हतें. बरें भगवान् श्रीकृष्ण तरी तसें सांगतात म्हणावें तर तसेंही नाहीं.

" योगी युंजीत सततं आत्मानं रहसि स्थितः ॥

अ० ६ श्लो० १०.

असा एकान्तवास व आत्मस्थिति यांचा **सतत** अभ्यास करण्यास योग्यास सांगलास इतकेंच नव्हे तर त्यास अपरिग्रहाचीही दीक्षा देतात. रहस्यकार या " सततं " शब्दाची विल्हेवाट कशी लावतात ? श्रीकृष्णांनीं अर्जुनास युद्ध करावयास लाविलें; होय, परंतु अर्जुन योगी नव्हता, सिद्ध नव्हता. नुसता मुमुक्षु होता. त्यास योगी हो असें सांगून पुढें असलेलें युद्ध तसेंच चालू करण्यास सांगितलें आहे.

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ॥

असें भगवान् अर्जुनास स्पष्ट सांगत आहेत. तूं मुमुक्षु आहेस म्हणून

कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतं ।

तूं कर्मच केलें पाहिजेस तसेंच "युञ्जन्नेवं **सदात्मानं** योगी नियतमानसः" योग्यानें सदा नियतमानसानें आत्मयुक्त असलें पाहिजे. या भगवद्वचनाची प्रपंचरहाटीशीं संगति कशी जुळवावयाची ? त्याप्रमाणेंच "युञ्जन्नेवं **सदात्मानं** योगी विगतकल्मषः " हेंही भगवंतांचें स्पष्ट वचन असतां रहस्यकार म्हणतात "भगवान् एकान्ती योगाभ्यास करण्यास सांगतात म्हणून जगाचे सर्व व्यवहार सोडून योगाभ्यासांतच सर्व आयुष्य घालविणें हें गीतेचें तात्पर्य असा अर्थ समजावयाचा नाहीं. " वरील " सततं " " सदा " ह्या पदांनीं भगवंतांचें तात्पर्य काय आहे हें आम्हीं वाचकांस निराळें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. त्यांचा त्यांनींच विचार करावा. परंतु रहस्यकारांना हा वरील सर्वव्यापी सिद्धान्त अर्थातच झोंबूं लागल्यामुळें ते त्याच पानांत म्हणतात "म्हणून कर्मयोग एकसारखा चालवीत असतां थोडा वेळ नित्य किंवा मधून मधून कांहीं काळ एकान्ताचें सेवन करणेंही जरूर पडतें." (गी. र० पा० २८०) हें एकान्ताचें सेवन कर्मशास्त्राच्या यातायातीनें थकून भागून गेल्यावर करावयाचें वाटतें ! व तेंही थोडा वेळ करावयाचें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. या आपल्या कर्मयोगास श्रीकृष्णाची जरूरी रहस्यकारांस कशास होती कोण जाणें ! कारण त्यांचीं वचनें तरी रहस्यकारांना प्रमाण कोठें आहेत ! भगवान् " त्यक्तसर्वपरिग्रहः " " अपरिग्रहः " असें म्हणूं लागले कीं रहस्यकार म्हणतात " पण त्यासाठीं जगाचे व्यवहार सोडावे असें भगवान् कोठें-

ही सांगत नाहींत." (गी० र० पा० २८०). धन्य ह्या रहस्यकारांच्या दिव्य दृष्टीची ! यापेक्षां सर्व उपनिषदें, गीता, ब्रह्मसूत्रें इत्यादि सब्ब झूट म्हणून आपलेंच कर्मकांड जगापुढें रहस्यकारांनीं मांडलें असतें तर फार बरें झालें असतें; म्हणजे निदान श्रद्धाळु लोक तरी या ग्रंथानें फसले नसते. असो. आपण साधकाच्या इतिहासाचें आलोचन करीत असतां कर्मयोगाचें म्हणजे निष्काम प्रपंचाचें त्या इतिहासाशीं किती रहस्य आहे हें पहात होतों. तिकडेच आपण फिरून वळूं. " ज्ञानयोग " या शब्दाचा अर्थ आमच्या मतें ज्ञानी झाल्यानंतरचाच योग असा नसून साधक व सिद्ध दशेंतील योग असा आहे. साधक चित्तशुद्धीकरितां कर्में करीत असतो, नंतर चित्तशुद्धि झाल्यावर योगाचा अथवा भक्तीचा अभ्यास करतो. कारण चित्तशुद्धि झाल्याशिवाय चित्ताचें स्थैर्य होणें त्यास दुरापास्त असतें.यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा व समाधि इत्यादि अष्टांग योगाचे आचरण चाललें असतां रहस्यकारांचा कर्मयोग त्या साधकाच्या ठिकाणीं संभवतो काय! संभवत असेल तर विलक्षणच म्हणावयाचें! बरें कदाचित् असें म्हटलें कीं " कांहीं वेळ हा योग करावा व बाकीच्या वेळांत प्रपंच करावा--नव्हे--केलाच पाहिजे. " ह्या उपदेशामृताचा क्षणभर शांत चित्तानें विचार करा. प्रपंचांत वैराग्य उत्पन्न झाल्यानें साधक योगाभ्यासास लागला, आतां पुन्हां त्यास याच प्रपंचाचा स्वीकार करावयास लावावयाचें ! योगाभ्यासाच्या पहिल्या पहिल्या अवस्थेंत कदाचित् तो प्रपंचही करूं शकेल. परंतु जों जों त्याचें वैराग्य वाढूं लागेल तों तों या मायेस तो कां कवटाळील ह्या प्रश्न आहे. रहस्यकार म्हणतात, एका मजल्यावर चढून गेलें, नंतर तेथून दुसऱ्या, नंतर तिसऱ्या, अशा क्रमानें शेवटच्या मजल्यावर गेल्यावर खालील मजले पाडून कां टाकावयाचे ! हा लौकिक दृष्टान्त दिसण्यांत फार चांगला दिसतो. परंतु यांत एक मोठा दोष आहे. तो असा कीं, स्थूल व सूक्ष्म यांतील भेद या दृष्टान्तांत घेतलेला नाहीं. किती झालें तरी दृष्टान्तांतील मजले हे स्थूल व एकाच स्वरूपाचें आहेत. पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला हे सर्व दगडमातीचेच आहेत. ह्या मजल्यांच्या सहाय्यानें एकदां निरालंब अंतरिक्ष मजल्यांत साधक गेल्यावर खालील मजले लाथाडून दिले काय किंवा सुरुंग लावून उडवून दिले काय, त्याबद्दल सदैव सूक्ष्म अंतरालांतच रहाणाराला पर्वा नाहीं. रहस्यकार म्हणतात, ज्ञान्यानें आपल्या समाधिसुखांतच सदैव राहाणें चांगलें नाहीं. त्यानें लोकसंग्रह हा केलाच पाहिजे.

यावल्लोकपरामर्शो निरूढो नास्ति योगिनः ।
तावत्दृढसमाधित्वं न भवत्येव निर्मलम् ॥ .....

त्यानें (योगारूढानें) केवल आपल्याच समाधिसुखांत गढून जाणें म्हणजे एका प्रकारें आपला स्वार्थ पाहाण्यासारखें होय. संन्यासमार्गीय लोक या गोष्टीकडे

दुर्लक्ष्य करितात हाच त्यांच्या युक्तिवादांतील मुख्य दोष आहे. भगवानापेक्षां कोणीहि अधिक ज्ञानी, अधिक निष्काम किंवा योगारूढ असणें शक्य नाहीं. पण भगवान् देखील "साधूंचें संरक्षण व दुष्टांचा नाश" हीं लोकसंग्रहाचीं कामें करण्यासाठींच जर वेळोवेळीं अवतार घेतात तर ज्ञानी पुरुषानें लोकसंग्रह करण्याचें सोडून देऊन " परमेश्वरानेंच हे सर्व लोक उत्पन्न केले आहेत, तो त्यांचें पाहिजे तसें धारणपोषण करील, तिकडे पहाणें हें माझें काम नव्हे. " असें म्हणत बसणें सर्वथैव अनुचित होय. (गी० र० पा० ३३०). गीतारहस्यरूपी अटवींत ज्या कांहीं ठळक ठळक मार्गदर्शक अथवा दिक्सूचक खुणा आहेत त्यांतील हा उतारा ही एक मोठी ढळढळीत खूण होय. योगारूढानें सदैव समाधींत रहाणें हा निव्वळ स्वार्थ होय असा रहस्यकारांचा आक्षेप आहे. बरोबर आहे. पंचपक्वान्नाचें भोजन आहे, अथवा सुखवाहनामधून रमणीय प्रदेशांत संचारास जावयाचें आहे, किंवा विमानांतून उड्डाण करावयाचें आहे, अथवा सहकारित्वाच्या तत्वावर भांडवल उभारून एखादा धंदा काढावयाचा आहे तर असल्या कामांत जर तो योगारूढ एकटाच पक्वान्नावर ताव मारील अगर उपरिनिर्दिष्ट गोष्टी एकटाच करील तर तो स्वार्थी खास होय. परंतु योगसाध्य समाधि ही अशा प्रकारची वस्तु नाहीं. दहापांच मंडळी बसून, हें समाधिसुख वांटून घेतां येण्यासारखें नाहीं. तें केवळ स्वसंवेद्य आहे. तें मिळविण्यास साधक स्वतःच तयार झाला पाहिजे. प्रार्थनासमाजाच्या मंदिरांत तें सुख अध्यक्षपीठावरून वांटतां येण्याजोगें नाहीं, किंवा चित्रमयजगताचे अंकांतून त्या सुखाचीं मनोहर चित्रें काढून वाचकांची अध्यात्मतृष्णा तृप्त करतां येण्यासारखीही त्या सुखाची स्थिति नाहीं. तेव्हां आतां योगारूढानें व्यवहारदशेंत काय करावें असें रहस्यकाराचें म्हणणें आहे ? समाधिसुख वांटून देणें शक्य नाहीं हें आतां पाहिलेंच–मग त्यानें स्वार्थदोष टाळण्यास प्रपंचांत पडावें ? म्हणजे लग्नें, मुंजी जुळवून आणावीत, कोणाचीं पिठें दळून द्यावींत अगर कोणाचीं आंगणें झाडावींत ? त्याचें मग कर्म कोणचें ? त्याच्या दृष्टीनें प्रपंच तर मिथ्या आहे. तर मग त्यानें अर्थात् दुसऱ्यास आपलाच परामार्थमार्ग दाखवावा यापेक्षां त्याचें कर्तव्य दुसरें कांहीं रहात नाहीं. परंतु संन्यासमार्गीयांनीं तर ज्ञानोत्तर हेंच काम केलें आहे. आपण तरून दुसऱ्यास तारण्याबद्दलची त्यांनीं अहर्निश खटपट केल्याचा त्यांचे अजरामर ग्रंथ हाच पुरावा आहे. रहस्यकारांची दुसरी कोटी म्हणजे भगवान् स्वतः कर्में करतात. त्याच्यापेक्षां मोठा ज्ञानी कोणी नाहीं.इ०इ०,"अमक्यापेक्षां अमका मोठा ज्ञानी" ही तुलना अगर तारतम्य, ज्ञानांत नाहीं. पूर्ण अद्वैत ज्ञान झालें म्हणजे भगवानांच्या अद्वैतज्ञानांत व सिद्धाच्या अद्वैतज्ञानांत बिलकुल फरक नाहीं. रहस्यकारांच्या मतें तुकारामाचें ज्ञान चाळीस फूट, श्रीशंकराचार्यांचें शंभरफूट, तर समर्थांचें दोनशें फूट तर परमेश्वराचें लक्षोगणती फूट असें ज्ञानांत तारतम्य असल्यास कोण जाणे ! "अधिक

ज्ञानी" हा शब्दप्रयोग वेदान्तदृष्ट्या गलिच्छ आहे, असो. भगवानांच्या कर्माचा दृष्टान्त घेतल्यास कोणींच मुक्तीची इच्छा करूं नये असें होईल. कारण भगवान् जर संसारचक्राचें परिभ्रमण सदैव चालविणार आहेत, तर मग आपण सुद्धां हें संसारचक्र त्यांच्याकडे पाहून सदैव चालविलें पाहिजे असें होईल! म्हणजे मुक्तांनीसुद्धां वारंवार जन्म मागून हें प्रपंचाचें रहाटगाडगें अनंतकाल चालविलें पाहिजे अशी आपत्ति येईल, परंतु ही तर मुक्तावस्थेस बाधक आहे. शिवाय परमेश्वराच्या मनांत जर सृष्टि चालवावयाची आहे तर आपणच त्यांतून मुक्त होऊन जाणें परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध होतें, असें प्राप्त झालें म्हणजे कोणीही मोक्षाची इच्छा धरतां कामा नये असें सहजच अनुमान करावें लागेल. तसेंच या भगवंताच्या कर्मानुरूप आम्हीं वर्तन ठेवाव्यांचें म्हटल्यास आणखीही अनर्थ उद्भवण्याचा संभव आहे. कारण जगांत आंधळे, पांगळे, अशा तऱ्हेचे दीनदुबळे लोक परमेश्वरानेंच निर्माण केले असल्यामुळें, व त्यांच्या त्यांच्या कर्मांचीं फळें, भोगण्याची शिक्षा परमेश्वरानेंच दिली असल्यानें आम्हीं या ईशदत्त शिक्षेंतून त्यांची सुटका करणें म्हणजे ईश्वराच्या इच्छेविरुद्ध वर्तन केल्यासारखें होईल. देशांत दुष्काळ पडल्यावर अथवा परमेश्वरानें तो पाडल्यावर त्याचेच इच्छेविरुद्ध आम्हीं दुष्काळग्रस्तांत मदत करणें म्हणजे ईश्वराच्या शत्रूस मदत करण्याचा द्रोह करण्यासारखें होईल. तेव्हां हा न्यायतः प्राप्त होत असलेला सिद्धान्त रहस्यकारांना मान्य आहे का? आम्हीं म्हणतों ईश्वराच्या कर्माचा दृष्टान्त देऊन रहस्यकारांनीं आपला कर्मयोग सजविण्याचा यत्न केला आहे ही चूक आहे. ज्ञानदशेंत ईश्वर व भक्त या दोघांच्या ज्ञानांत जरी कांहीं फरक रहात नाहीं, तरी विश्वाची उत्पत्ति, स्थिति व लय करण्याची मायेची शक्ति एका परमेश्वराची आहे. प्रत्येक मुक्तास ती कर्तुमकर्तुं शक्ति नाहीं, कारण मुक्तावस्थेंत मुक्त परमेश्वराबाहेर असा रहातच नाहीं. तो त्याच्याच स्वरूपांत मिळून जात असतो. तेव्हां त्याचें स्वतंत्र असें कांहीं कार्य नसतें. शिवाय, प्रत्येक मुक्त, मुक्त होऊनसुद्धां पुन्हां निराळा असा स्वतंत्र शक्त्यधिष्ठित ईश्वरांश मानिल्यास अशा मुक्तलोकांच्या कर्तृत्वास अवसर कोठें मिळणार? अवसर मिळाला तरी, अद्वैततत्त्वाचा त्या कल्पनेनें व्याघात होतो तें निराळेंच!

योगी योगसाधन करतो त्याचें तरी प्रयोजन काय? अर्थात् आपली संसाराची आसक्ति हळुहळू कमी होऊन आपल्यास आत्मस्वरूपाची ओळख पटावी ह्या करितांच तो एकान्तवास करून

"शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्याधृतिगृहीतया"

क्रमाक्रमानें आपली बुद्धि धैर्यानें आत्म्याचे ठिकाणीं निश्चल करण्याचा अभ्यास करीत असतो, त्यास रहस्यकार म्हणतात "तूं सारखा असेंच करूं

नकोस. केव्हांतरी क्षणभर आत्मस्वरूप पहा त्यांस आमचें नको नाहीं. परंतु ह्या संसाराच्या घाणींत बाकीचा सर्व वेळ तुला काढला पाहिजे." म्हणजे रहस्यकारांच्या मतें प्रपंचापासून केव्हांही निवृत्त न होतां त्यांतच सदोदित आनंद मानून राहिलें पाहिजे. मुक्ति हा पदार्थ या प्रपंचापेक्षां जास्त मातब्बरीचा नाहीं. 'अध्यात्म' विषयावर रहस्यकारांनीं किति जरी लिहिलें तरी शेवटीं त्यांची ही दृढ झालेली प्रपंचवृत्ति सुटत नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. त्यांच्या उपदेशाचें खरें स्वरूप पहाणें झाल्यास तें हें आहे कीं "मनुष्यानें ह्या जगांत सत्य काय आहे हें समजून घ्यावें; मग तें श्रुतिग्रंथातूनच समजून घेतलें पाहिजे असें नाहीं. तर अरिष्टाटल, नित्शे, आगस्टस, कोंट इत्यादि पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथावलोकनानें जरी तें समजून आलें तरी बस्स आहे. हें जगाच्या बुडाशीं असलेलें सत्य समजलें म्हणजे बुद्धि सम होईल, व सर्वांभूतीं परमेश्वरच आहे असें समजूं लागेल; व असें समजलें म्हणजे मग असें समजूनही इंग्लंड निराळें, जर्मनी निराळा, हिंदुस्थान निराळा, एकमेकांनीं एकमेकांवर राज्य करूंनये, अशा तऱ्हेची, सर्वांभूतीं परमेश्वर रूपी समबुद्धीनेंच "धटासि आणावा धट" अशी वैय्यक्तिक अभिमानवृत्ति प्रबल तपूं लागते व असें झालें म्हणजे, जिकडे तिकडे पराक्रम, वैभव, संपत्ति, पुष्टि, तुष्टि, शांति व मोक्ष यांची रेलचेल व चंगाळीच उडेल" ह्या रहस्यकारांच्या उपदेशामृताचा खरा निष्कर्ष आहे. आम्हांस तर हें पुस्तक वाचतांना संशय येतो कीं, रहस्यकार हे नास्तिक असावेत, परंतु लोकसंग्रहाच्या कडकडीत व्रतपालनांत तसें उघड रीतीनें त्यांना सांगणें शक्य नाहीं. परंतु ग्रंथ लिहिण्याची सर्व शैली व चातुर्य बारीक रीतीनें पाहिल्यास या वरील वक्तृत्वखलखलाटाच्या खालीं नास्तिक्य बुद्धीचा प्रवाह जोरानें वाहात चालला असल्याचें चाणाक्ष वाचकाच्या लक्षांत आल्याविना रहाणार नाहीं. श्रीकृष्णाचें सुदर्शन आड घेऊन रहस्यकारांनीं आपलीं स्वकपोलकल्पित प्रमेयें जगापुढें बिनधोक मांडून ठाकलीं आहेत. या सुदर्शन चक्राच्या मोहिनीचा आश्रय केल्यामुळें रहस्यकारांचें तत्वज्ञान भराभर लोकमान्य होऊं लागलें आहे. आश्चर्य हें कीं, "ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावर" "आत्मज्ञान होण्यास इंद्रियनिग्रहानें बुद्धि स्थिर, निष्काम, विरक्त व सम झाली पाहिजे." "चित्तशुद्धि होईपर्यंत कर्में केलीं तरी अखेर सोडून दिलीं पाहिजेत" ह्यांसारखीं आचरट व बालिश विधानें लोक निर्धास्तपणें श्रुतिवत् प्रमाण मानूं लागले आहेत; पण कोणी असा विचार करीत नाहीं कीं, ब्रह्मज्ञान झाल्यावर मग "आत्मज्ञान होण्यास" हा शब्दप्रयोग संभवतो कसा ! तसेंच ब्रह्मप्राप्ति झाल्यावर "चित्तशुद्धि" व्हावी लागते हें आहे तरी काय ! म्हणजे चित्तशुद्धि होण्यापूर्वीच ब्रह्मज्ञान होतें की काय ! ह्या शंका सामान्य वाचकांस सुचणारही नाहींत, व त्यांबद्दल आम्हीं त्यांना दोषही पण देत नाहीं. परंतु तज्ज्ञ म्हणविणाऱ्यांनीसुद्धां

निमूटपणें हेंच तत्वज्ञान शिरसावंद्य करून रहावें याचें मात्र वारंवार आश्चर्य वाटतें. असो.

वादाकरितां क्षणभर असेंही धरून चालूं कीं, ज्ञानी लोकांनीं ज्ञानोत्तरही कर्म केलेंच पाहिजे; तथापि असे ज्ञानी लोक किती दिवस हा कर्मयोग करीत रहाणार ? हिंदुस्तानांतील तीस कोटी प्रजेनें या पंकांत रुतलेल्या कर्मयोगरूपी रथचक्रास आपले खांदे लाविल्यास हा रथ हां हां म्हणतां बाहेर सुस्थळीं येऊं शकेल, तेव्हां मग या दहापांच ज्ञानी लोकांची मदत या कामाकरितां कशास हवी! थिऑसफी, प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज, इत्यादि पंथांतील मंडळी जर रहस्यकारांच्या मतानें ब्रह्मज्ञानी असतील तर त्या त्या पंथांतील विद्वान् व विद्वान् आतां "पोलिटिकल व सोशल भातुकलीं" खेळूंच लागली आहेत तेव्हां त्यांच्याबद्दल रहस्यकारांनां ते संन्यासमार्गी होतील ही काळजी करावयास नको आहे. आतां कोठें हिमालय, विंध्याद्रि इत्यादि पर्वतांच्या गुहारांत युगानुयुगें तपश्चर्या करीत बसलेल्या योग्यांवर जर रहस्यकारांचा डोळा असेल तर आमची एवढी विनंति आहे कीं, त्या अल्पशा लोकांची रहस्यकारांनीं उपेक्षा केल्यास ही कर्मयोगप्रवृत्तीस किमपि बाध येणार नाहीं.

आतां रहस्यकारांचा डोळा जर अशा गिरिकंदरांतील लोकांवर नसून तो अंगास राख फासून, जटाभार डोक्यावर ठेऊन केवळ भोंदूपणा व भामटेगिरी करीत भिक्षा मागणाऱ्या लोकांवर असेल तर त्यांचा आमचा मुळींच मतभेद नाहीं. अशा लोकांना योग्य उद्योग लाऊन ताळ्यावर आणण्याकरितां जितके प्रयत्न करतां येतील तितके करणें अवश्य आहे. हिंदुस्थानांत अशा निरुद्योगी आयदी लोकांचा फार सुळसुळाट झाला आहे. मुसने बैरागी देशांतच नव्हे तर गृहस्थवेशांतही असे उद्योगहीन पोटभरू लोक फार उत्पन्न झाले आहेत. परमार्थाच्या नांवावर भिक्षा मागावी, किंवा एखाद्या भोळ्या बापड्या सधनाचा आश्रय करावा व त्यास यथेच्छ लुबाडावें, कोल्ला तरी गुरू करावा व त्याच्या पंकांत रोज पंच पक्वान्नें खुशाल झोडावींत, तोंडानें वेदांत अस्खलित बोलत सुटावें, आचरणांत मात्र पाहावें तों पक्की व्यापारदृष्टि, ब्रह्म सनजलें अशी भावना झाल्यामुळें कर्मभ्रष्टता हींच प्रधानत्वानें जगाच्या नजरेस आणून त्यांनाही कर्मभ्रष्ट करावें असा लहरेचें पाखांड जगांत फार माजलें आहे. त्याचा खूप जोरानें निषेध करून त्या लोकांना योग्य मार्गास लावणें हें प्रत्येक देशाभिमान्याचें कर्तव्य आहे. असो.

पुन्हांही क्षणभर असें मानिलें कीं, या गिरिकंदरांतील थोड्याशा लोकांनीसुद्धां कर्मयोग स्वीकारून समाजांत मिसळलें पाहिजे तरीसुद्धां रहस्यकारांना यांचा किती कालपावेतों उपयोग होणार याची त्यांना कल्पना आहे काय ? फार झालें तर हा एक जन्मपर्यंत, म्हणजे त्या सिद्ध पुरुषांच्या देहपातापर्यंत त्यांचा

समाजास उपयोग होईल, यापुढें तर नाहींना होणार ! का मोक्षानंतरसुद्धां त्यांना कर्मयोगास जुंपण्याकरितां इहलोकीं त्यांना देहधारी करणार ! तेव्हां त्यांच्या संख्येच्या दृष्टीनें व सेवाकालाच्या दृष्टीनें या लोकांची रहस्यकारांनीं कींव करावी व त्यांना एवढी कर्मबंधांत न घेण्याची सवलत ठेवावी असें आमचें म्हणणें आहे. कारण हे लोक या कामास न आल्यास प्रपंचाची हानि यत्किंचित्ही होणार नाहीं याबद्दल आम्ही खात्री देतों.

शेवटीं रहस्यकारांना आमचें आग्रहाचें असें सांगणें आहे कीं, हा ब्रह्मज्ञानयोग इतर धर्मांत कोठेंही मिळावयाचा नाहीं. हा केवळ वेदैकगम्य आहे. ज्ञानोत्तरकर्मे करावींत अशाबद्दल पाश्चात्य पंडितांचीं वचनें प्रमाण म्हणून घेणाऱ्या रहस्यकारांना हें सांगणें अत्यवश्यक आहे. त्यांच्यासारख्या अन्य पंडितांचीही समजूत जर अशीच असेल तर ती निराधार आहे हें स्वतंत्र प्रकरणांत आम्ही दाखविणार आहों. वेदबाह्य धर्मांतून मोक्ष, ब्रह्मज्ञान, योग इ० कल्पना मुळींच नाहींत. ब्रह्म म्हणून स्वतंत्र व स्वसंवेद्य सत्यवस्तु आहे, व तिचा अनुभव आला म्हणजे जगांतील यातायात बंद होते व मोक्ष होतो ही कल्पना केवळ आगमधर्मांचेच विशिष्ट लक्षण आहे. इतर धर्मांतून कोठेंतरी कांहीअसंगी अद्वैत बोधासारखीं भासणारीं वाक्यें दिसून येतात, नाहीं असें नाहीं. परंतु त्या धर्मांचें प्रयोजन स्वतंत्ररीत्या पाहिल्यास तीं वाक्यें अद्वैतपरच लावावींत कीं नाहीं यांची शंका येते. परमेश्वरानें मोझेस प्रेषितास यहुदींना परकाऱ्यांच्या जाचांतून सोडविण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां मोझेसनें, "आपणास कोणीं पाठविलें असें विचारल्यास काय उत्तर द्यावें" असें देवास विचारल्यावर देव म्हणाला, "I am, that I am हें माझें नांव आहे असें सांग. मला "I am "नें पाठविलें आहे असें सांग" असें यहुदींच्या मित्रदेवानें सांगितलें. हें वाक्य वाचून जीवाच्या त्वंपदार्थाची व परमात्म्याच्या तत्पदार्थाची व दोहींचा सदैव असणारा संबंध (तत्त्वं+असि) दर्शवून देणाऱ्या " असि " या बोधरूप क्रियापदार्थाची व असा अनुपम बोध करणाऱ्या सद्गुरूंची आठवण आल्यावांचून कोणी राहणें शक्यच नाही. देवानें आपलें नांव " I am " (मी आहें) असें सांगावें, परंतु या नांवाचा खरा अर्थ यहुदी लोकांस कळूं नये अथवा स्वतः मोझेसलाही कळूं नये यांचें कारण हा लोकांचा हें ज्ञान मिळविण्याइतका अधिकार नव्हता हेंच खरें आहे. नव्या करारांत (New Testament) मध्यें देव स्वतः सांगत आहे कीं, " I am Alpha and Omega, the beginning and the end, the first and the last " हें वाक्य बायबलच्या Revelation (ईशप्रेरणा) या भागांत पठित आहे. हें वाचून " अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च " या भगवद्वचनाची कोणास आठवण होणार नाहीं ! परंतु तद्धर्मीयांना ज्ञानाधिकार नसल्यामुळें त्यांना

ह्या वाक्यांतील मर्म समजणें शक्य नाहीं. अशा किरकोळ एक-दोन वाक्यांवरून हे परकीय धर्मग्रंथ ज्ञानपर आहेत असें म्हणणें अगदीं गैरशिस्त आहे. एवंच काय झालें कीं, हें ज्ञान मिळवावयाचें झाल्यास (ज्ञान म्हणजे शाब्द नव्हे, अपरोक्ष ज्ञान) तें श्रुतिग्रंथांतूनच मिळविलें पाहिजे व त्याचा प्रत्यक्षानुभव करून घेणें झाल्यास सद्गुरुचरणांचाच आश्रय घेतला पाहिजे हाच सिद्धान्त.

१६ पाश्चिमात्य ज्ञानयोग.

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥

भ० गी० अ० १८ श्लो० १६

(असें असतांही जो आत्मकर्तृकत्व अथवा आत्माच कर्ता आहे असें मानतो, व या अज्ञानास संस्कारभाव हेंच कारण असतें—त्या मूढास खरें ज्ञान होत नाहीं.)

हा " योग " भगवद्गीताधर्मांत उपस्थित करण्याचें वास्तविक प्रयोजन नव्हतें; परंतु रहस्यकारांनींच या योगास ठिकठिकाणीं अत्यंत महत्त्व दिलेलें असल्यामुळें त्याचेंही थोडक्यांत विवेचन करणें भाग आलें आहे. आरिस्टाटल, आगस्टस कोंट, नित्शे, इत्यादि पंडितांना रहस्यकारांनीं आचार्यपक्षीयांशीं युद्ध करतांना आपल्या मदतीस बोलाविलें आहे, व ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं, अशा-बद्दल त्यांच्या तोंडून कांहीं वचनें वदविलीं आहेत. एवढ्याच कारणावरून रह-स्यकार या पंडितांना ऋषिवत् समजत आहेत असें आम्ही म्हणत नाहीं. कारण संन्यासमार्गीयांशीं लढण्याच्या कामांत जरी रहस्यकारांनीं या पंडितांचा आश्रय व गौरव केला तथापि कर्मयोगान्तर्गत नीतिविवेचनसमयीं त्यांनीं त्या सर्व पंडितांस फजित केलेंच आहे. रहस्यकारांची कोणा एका ग्रंथावर अथवा ग्रंथ-कारावर अशी पूर्ण श्रद्धा नसून ती फक्त एक त्यांच्या कर्मयोगावरच आहे. या-करितां कोणाही पंडितानें, ऋषिनें, साधूनें अगर शास्त्रज्ञानें त्यांच्या क्षणिक गौरवानें फुगून जाऊं नये. असो. पौर्वात्य व पाश्चात्य आध्यात्मिक ज्ञानाची तुलना करण्याचा आव घालून पुढें ती करण्याचें कारण नाहीं असें सांगतांना सा-हेब त्यांच्या लेखणीतून एक वाक्य निघून गेलें आहे. परंतु तेवढ्यावरून दोन्ही देशांतील आध्यात्मिक ज्ञानाबद्दल तुलनात्मक दृष्टीनें त्यांची काय भावना आहे हें जगाच्या सहज निदर्शनास आलें आहे. तें वाक्य त्यांच्याच शब्दांनीं सांगणें बरें, तें असें आहेः—

"पण पाश्चिमात्य आध्यात्मिक ज्ञानाची धांव आमच्या वेदान्तापलीकडे अद्याप फारशी गेलेली नाहीं ही गोष्ट सर्वमान्य असल्यामुळें, पौर्वात्य व पाश्चिमात्य अध्यात्म शास्त्रांची तुलना करण्याचें विशेष कारण रहात नसून ....." या वाक्याचा अगदीं सरळ अर्थ केला तरी पाश्चिमात्य व पौर्वात्य आध्यात्मिक ज्ञान हीं निदान तुल्यबल तरी खास आहेत अशी भावना होते. " फारशी " या

शब्दाचा अर्थ मनांत आणल्यास " थोडीशी "या शब्दाची कल्पना उभी राहात्ये. "फारशी नाहीं " तर थोडीशी तरी गेलेली आहे असें होतें; म्हणजे एका अंशानें का होईना, पाश्चिमात्य आध्यात्मिक ज्ञान पौर्वात्य ज्ञानापेक्षां श्रेष्ठ असें रहस्यकार म्हणत आहेत असें आम्हीं म्हटल्यास आम्हांस मराठी भाषा कळत नाहीं असें कोणी म्हणणार नाहीं असें वाटतें. " पाश्चिमात्य ज्ञान पौर्वात्य ज्ञानाच्या पुढें फारसें गेलेलें नाहीं " असें म्हणण्याचा अगदीं उदार बुद्धीनें अर्थ केला तरीसुद्धां, हीं दोन्हीं ज्ञानें निदान एकाच मातबवरीचीं आहेत असें होतें. रहस्यकारांनीं पाश्चिमात्य आध्यात्मिक ज्ञानास इतकें महत्व कसें दिलें हें आम्हांस समजत नाहीं. त्यानीं त्यांचें नीतिशास्त्र मात्र आमच्या नीतिशास्त्रापेक्षां अत्यंत कमकुवत आहे असें सिद्ध केलें आहे, परंतु त्यांच्या आध्यात्मिक ज्ञानास ते एवढें कां भुलले ! आमच्या तें आमच्या वेदान्तशास्त्रांतील तत्वज्ञानाचें खरें इंगित रहस्यकारांना कळलें नसल्यानें पाश्चिमात्य तत्वज्ञानाचा त्यांना एवढा भाऊ नाहींतरी अचंबा वाटत आहे. आणि म्हणूनच ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं, हा प्रश्न सोडवितानां त्यांनीं पाश्चिमात्य तात्विकांकडे धांव मारली आहे. पाश्चिमात्य तात्विकांत ज्ञान कोणास झालें होतें कीं नाहीं ह्या मुद्याचा निकाल लावण्यांत मोठेंसें तथ्य नाहीं. कारण ते तत्वज्ञ सुद्धां आपणास असें अपरोक्ष ज्ञान होत असतें असें कोठेंही म्हणत नाहींत. शिवाय हा मुद्दा मोठा नाजुक आहे. कारण आधुनिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणारे महंत एकाएकीं चवताळून जातील व म्हणतील " काय ? स्पेन्सर, कांट हेगेल, शोपेनहार यांसारख्या बड्या तत्वज्ञांना ज्ञान झालें नव्हतें म्हणणें म्हणजे अज्ञानाचा कळस झाला. त्यांचें तत्वज्ञान इतकें गहन आहे कीं, तें जन्माच्याही अभ्यासानें पुरें होणार नाहीं. एम. ए. च्या परीक्षेस दोन वर्षें आम्हीं अभ्यास केला परंतु या तत्वज्ञानाचा अल्पांशसुद्धां आम्हांस मिळाला नाहीं, असें असतां त्या ग्रंथकारांना ज्ञान झालें नव्हतें म्हणणें हें आपल्या अज्ञानाचेंच फल होय" या त्यांच्या उत्तरांत हास्यास्पद अथवा निंद्य असें कांहीं नाहीं. कारण त्यांची भावनाच तशी तयार झालेली असते. साक्रेटिसपासून तों थेट स्पेन्सरपर्यंत जितके तत्वज्ञ युरोपखंडांत झाले तितक्या तत्वज्ञांचीं आध्यात्मिक, नैतिक, सामाजिक मतें इतकीं विविध आहेत कीं, त्यांचा सर्वांचा स्मृतींत, संग्रह करणें फार कठिण झालें आहे. परंतु ज्ञानाची विविधता व गहनता हेंच जर त्या ज्ञानाच्या महत्वाचें मान असेल तर प्रत्येक आधिभौतिक शास्त्रही मोक्षशास्त्राच्या जोडीस बसविता येईल. पाश्चिमात्यांचा आत्मविचार त्यांच्या राजकीय व सामाजिक इतिहासासारखा उत्क्रांतिमय आहे. त्यांच्या आत्मविचारास अद्याप परिणतावस्था यावयाची आहे. आतां कोठें ते अद्वैततत्वाकडे वळूं लागले आहेत. आम्हीं म्हणतों असें होत होत जरी त्यानीं आपल्या इकडील अद्वैततत्व पूर्ण मान्य केलें तरी शाब्दज्ञानाच्या पलीकडे त्यांची मजल जाणारी नाहीं. शाब्द व प्रत्यक्ष या दोहींत

जमीनअस्मानाइतकें अंतर आहे हें विसरतां कामा नये. समजा, मंगळ, गुरु अथवा शनि या ग्रहांवर अमुक अमुक प्राणि आहेत अगर नाहींत, हवा पाणी आहे अथवा नाहीं, तेथें धर्मविचार आहे किंवा नाहीं इत्यादि अनुमानें आम्ही आमच्या प्रत्यक्ष, अनुमान वगैरे प्रमाणांनीं ठरवीत असतों; परंतु या सिद्धान्तांचें प्रत्यक्ष ज्ञान आम्हांस येथें बसून होत नाहीं; परंतु हेंच जर आम्हांस अंतरिक्षांतून संचार करण्याची कला सांपडली, व आमच्या स्थूलदेहांस गुरुत्वाकर्षण, हवेचा दाब इत्यादि शास्त्रनियमांच्या अवश्य होण्याऱ्या परिणामांपासून मुक्त करतां आलें व त्या त्या ग्रहांवर सदेह जातां आलें, तर तेथील देखावे पाहून जी मनाची खात्री व समाधान होईल तीं खात्री व तें समाधान पृथ्वीवर बसून केलेल्या शेंकडों अनुमानांनीं सुद्धां होणार नाहीं हें निराळें सांगणें नको. अमृत इंद्रापाशीं आहे असें आम्ही पुराणांतून ऐकतों. अमृताच्या वर्णनावरून त्याची कल्पना मात्र आम्ही येथें करीत असतों; परंतु तेंच अमृत जर इंद्राकडून पैदा करण्याचें सामर्थ्य आमच्यांत आलें तर आम्हीं कितीतरी पटीनें हल्लीपेक्षां सुखी होऊं बरें ! त्याप्रमाणेंच पाश्चिमात्यांनीं आत्मस्वरूपाबद्दल किती जरी तर्क केले तथापि ते त्यांचे तर्क भूतलावर बसून केलेल्या अन्यग्रहांवरील वस्तूंच्या तर्कांसारखे अथवा पुराणश्रुत अमृताविषयींच्या तर्कासारखेच निरर्थक होत. आत्मा अमर आहे असें कळलें–नव्हें समजलें–अथवा आत्मा व परमात्मा वस्तुतः एकच आहेत असें पक्कें अनुमान बांधलें. तसेंच विश्व हें नुसतें चित्स्वरूपावरील आवर्त आहे म्हणून तें मिथ्या आहे असेंही युक्तीला पटलें, तथापि इतक्याही ज्ञानानें मनुष्य ज्ञानी झाला असें म्हणावयाचें नाहीं. मुमुक्षूनों, हें चांगलें पक्कें लक्षांत ठेवा, नाहींतर वेदान्तग्रंथ वाचून एकदम तुम्ही आपणांस ज्ञानी या कोटींत घालाल व मुख्य कर्तव्यास विसराल. आणखी एका दृष्टांतानें तुम्हांस दिलेली ही सूचना दृढ करतों.–समजा अठराविश्वे दारिद्र्यानें एखादा मनुष्य गांजून गेलेला आहे. त्याला कोणी येऊन सांगितलें कीं " बाबा, तुझ्या नेहमींच्या बसण्याउठण्याच्या जागेंत एक मोठें भांडार आहे. असें असतां तूं असा दैनवाणा कां ! " यावर समजा त्या दरिद्र्यानें त्या भांडाराबद्दल विचारपूस केली व त्यांस पक्कें समजलें कीं. तें भांडार खास तेथें आहे, परंतु तें मिळणें म्हणजे हातास येणें हें फार दुःसाध्य आहे. तें भांडार नुसत्या पार्थिव धातूच्या भांड्यांत नसून वज्रासारख्या अत्यंत कठिण धातूच्या कंदुकेंत आहे. तिच्या किल्ल्या एका फकिराच्या स्वाधीन आहेत. तो फकीर मोठा निस्पृह व स्वैरसंचारी आहे. त्याला द्रव्यानें, वैभवानें, पुष्टि–तुष्टीनें, अथवा कोणत्याही ऐहिक उपायांनीं मोह पडत नाहीं. एक शुद्ध सात्विक भावाच्या दानानें तो तेव्हांच वश होतो, तेव्हां अशा तऱ्हेच्या त्या फकीराकडे धांव घेतल्यास आपल्या दारिद्र्यापासून आपली सुटका होईल. समजा, इतकें त्या दरिद्र्याला समजलें तथापि तो दारिद्र्यमुक्त झाला काय ? नाहीं. इतकेंच नव्हें, तर त्या दारिद्र्याच्या डागण्या आहेत तशाच राहून पुन्हां या भांडारप्राप्तीच्या

तळमळीची डागणी मात्र त्यानें एक जास्त पाठीस लाऊन घेतली यापेक्षां त्याला अद्याप दुसरा कांहीं लाभ झाला नाहीं. तसेंच अत्यंत तृषित मनुष्य आहे, अरण्यांतून उदकार्थीत्यर्थ अत्यंत तळमळत वणावणा हिंडत आहे, परंतु पाणी कोठेंही मिळत नाहीं. पुढें समजा त्याला समजलें कीं, पांच हजार फूट उंच असलेल्या जवळच्या पर्वतशिखरावर अत्यंत स्वादिष्ट अतें शीतोदक विपुल आहे तर त्या समजण्यानें त्या तृषिताची तृषा शमली काय ? असो. आतां ही दरिद्री व तान्हेलेल्याची अभागी जोडी एका बाजूस उभी करा व सधन असा एक मनुष्य व तृषेनें न पीडिलेला एक मनुष्य अशांची एक जोडी विचाराकरितां दुसऱ्या बाजूस घ्या. फावल्या वेळांत सहज जिज्ञासेनें या प्रत्येकानें त्या भांडाराची अथवा त्या शीतोदकाची अनुक्रमें चौकशी करून ठेविली व त्यांनाही त्यांचें अस्तित्व पक्कें समजून आलें. ही दैवशाली दुसरी जोडी अगदीं पहिलीच्या सन्मुख उभी करा. तुम्हांस दोघांच्या चर्येंत काय फरक दिसून येईल ? अर्थात् पहिल्या जोडीच्या तोंडावर म्लानता, खिन्नता व त्यांतल्या त्यांत नव्या शोधानें उत्पन्न झालेली हुरूप असे परस्परविरुद्ध मनोविकार दिसतील. आतां या दुसऱ्या जोडीकडे पहा. त्यांच्या तात्पुरत्या गरजा भागलेल्या असल्यामुळें त्यांना म्लानताही नाहीं किंवा त्या विकट ठिकाणीं असलेल्या निधीची अथवा जलाची आकांक्षाही नाहीं व तीं मिळविण्याची हुरूपही नाहीं. मात्र हें ध्यानांत ठेवा हा दृष्टान्त आहे. याचा सर्वांशीं उपयोग करावयाचा नाहीं. धन व पाणी या दोन्ही ऐहिक वस्तु आहेत व मुक्ति अथवा मोक्ष ही पारमार्थिक अतएव जडाहून अत्यंत भिन्न अशी वस्तु आहे. असो. ह्या सन्मुख उभ्या असलेल्या जोडीकडे पुन्हां तुम्ही निरखून पहा. पहिल्या जोडीच्या ठिकाणीं वेदान्तज्ञान असलेले मुमुक्षु आहेत असें समजा व दुसऱ्या जोडीच्या ठिकाणीं युरोपियन तत्वज्ञानी उभे आहेत असें समजा. आतां तुम्हांस या द्वंद्वामधील तारतम्य बरोबर समजून येईल. इकडील पहिल्या मुमुक्षूच्या जोडींत या विश्वाचा व विश्वान्तर्गत वस्तूबद्दलचा वीट व मोक्षाची तळमळ व दुसऱ्या जोडींत प्रपंचासक्ति व सुखासमाधानांत मिळेल तें ज्ञान मिळविण्याची खटपट, हीं दिसून येतील. येथें या जोडींचें सन्मुख उभें राहणें संपलें. यापुढची अवस्था म्हणजे, पहिली जोडी आपल्या फकीराच्या शोधाकरितां अथवा गिर्यारोहणाकरितां लागलेली दिसेल. दुसरी जोडी मात्र आपापल्या परोक्ष ज्ञानांतच मग्न राहील. मुमुक्षु मात्र आपल्या साधनसंपत्तीच्या पाठीं अहर्निश लागेल व मध्यंतरीं अष्टसिद्धि जरी आड आल्या तरी त्यास न जुमानतां तो आपल्या इष्ट गुरुप्राप्त्यर्थ सतत मनोवाक्कायें तपश्चर्या करीत राहील. (रहस्यकारांच्या मतें या अष्टसिद्धि मिळाल्यास त्यांचा त्याग करण्याचें प्रयोजन नाहीं, कारण त्यांचा मोक्ष असा दरिद्री नसून शांति, पुष्टि, तुष्टि या सर्वांचें मिश्रण आहे.) दुसऱ्या जोडीचा म्हणजे युरोपियन तत्वज्ञांचा मार्ग मात्र मार्गेच खुंटला.

त्यांनीं पलीकडे भांडार व गिरिशिखरावर शीतोदक आहे हें समजून घेतलें खरें, परंतु तें स्वतःस प्राप्त करून घेणें अशक्य आहे अशा समजुतीवर ते स्वस्थ बसले. यांनाच Agnostics अज्ञेयवादी म्हणतात. ब्रह्म अथवा "Supreme Consciousness" अथवा "World Intelligence" यासारखें या विश्वाच्या बुडाशीं कांहीं तरी आहे एवढेंच अनुमान काढून ते लोक स्वस्थ बसले आहेत. परंतु आमचे लोक मात्र ह्या अनुमानांतच खुष न राहतां गिर्यारोहणासारखें कष्टमय तप करून तें ब्रह्म अथवा ती World Intelligence आपलीशी करूं लागले; हा दोहोंत मोठा महत्वाचा फरक आहे. अशा गिरिशिखराच्या उत्तुंग चिन्मय प्रासादकुट्टिमावर बसून विश्वांतील उच्चनीच, शीतोष्ण, सुखदुःख, मानापमान, इत्यादि द्वंद्वांना साक्षिरूपानें पाहाणारे जीवन्मुक्त पौर्वात्य कोणीकडे ? व द्वंद्वांतच सदैव आपल्या अनावर भूमितृष्णेनें व प्रगतीच्या अनावर हांवेनें लोळत असलेले युरोपियन तत्वज्ञ कोणीकडे ? टिळक महाराज ! ह्या दोघांत आपणांस कांहींच का अंतर दिसत नाहीं ? त्यांच्या ऐहिक ऐश्वर्यास भुलून अथवा त्यांच्या आधिभौतिक प्रगतीकडे पाहून आपल्या तोंडास असें कां पाणी सुटलें ? आपल्या पूर्वजांनीं आपणांस स्वाराज्य, वैराज्य दोन्हीं दिलीं असतां परकीयांच्या क्षणिक प्रगतीनें आपण असें कां दिपून जातां ? धीर धरा. कदाचित् पुढील जन्मीं आपण युरोपियनच व्हाल म्हणजे मग आपणास स्पृहणीय असें कांहीं राहणार नाहीं. तुष्टि, पुष्टि, ऐश्वर्य व शिवाय आरिस्टाटल, नित्शे, स्पेन्सर इत्यादि तत्वज्ञांचें ज्ञानही मिळेल; व आपण कृतकार्य व्हाल. परंतु तेथें भगवद्गीतान्तर्गत नीति मात्र मिळणार नाहीं. असो, पुन्हां तेथें, ही उणीव भासल्यास पुन्हां इकडे जन्म घ्यावा म्हणजे झालें. वाचकहो, पुन्हां एकदां आपणास रहस्यकारांचा पंथ अथवा संप्रदाय संक्षेपरूपानें सांगतों. युरोपियन लोकांचें तत्वज्ञान, युरोपियन लोकांची ऐहिक संपत्ति, त्यांचें ऐहिक स्वातंत्र्य, त्यांची कर्तबगारी, इतकें आपणास असावें. इतकें असूनही भगवद्गीतेंतील साम्यावस्थारूपी योग असावा व कर्मे करण्याचें योगयुक्त कौशल्य असावें म्हणजे युरोपियनांत ज्या नीतिशास्त्राची उणीव आहे तेवढी भगवद्गीतेंतून मिळावी म्हणजे त्यांचें (रहस्यकारांचे) इहपर कार्य झालें!! वरचेवर जन्म येईनात बिचारे ! पौर्वात्य साम्यावस्था व पाश्चिमात्य ऐश्वर्य यांची सांगड झाल्यावर मग आपल्या दैवास काय उणें आहे ? असो. असा वर देणारा परमेश्वर सुद्धां पौर्वात्य व पाश्चिमात्य अशा दोन्ही गुणांचाच मिळून ओतलेला पाहिजे. त्याशिवाय असलें अचाट वरदान तो तरी कसें देणार ? असो, आमच्या मतें युरोपियन तत्वज्ञान हें केवळ "बोलाचाचि भात, बोलाचीच कढी" अशांतील आहे. ऐहिक ज्ञानांत अर्थात् हें श्रेष्ठ ज्ञान आहे याबद्दल वाद नाहीं. स्पेन्सरसाहेब म्हणतात कीं, ज्ञानाचें एकीकरण करणें अथवा एकरूपी ज्ञान करणें (Unification of knowledge) हाच तत्वज्ञानाचा हेतु

अथवा प्रयोजन आहे. या तत्वज्ञानानें आचारांत, विचारांत अर्थांतच विवेक व शांति उत्पन्न होईल; परंतु या शाब्दिक ज्ञानानें मोक्ष मात्र कदापि मिळणार नाहीं.

" श्रद्धाभक्तिध्यानशमाद्यैर्यतमानैर्ज्ञातुं शक्यो देव इहैवाशु य ईशः ।
दुर्विज्ञेयो जन्मशतैश्चापि विना तैः तं संसारध्वान्तविनाशं हरिमीडे।२४।

श्रीशंकराचार्य हरिमीडेस्तोत्र.

(साधनांचा आश्रय करून कर्म, उपासना, ज्ञान या तिहींच्या मार्गानें मुमुक्षु गेल्याशिवाय शेंकडों जन्म घेऊन सुद्धां ज्या हरीची प्राप्ति होणार नाहीं त्याला मी प्रार्थितों,) अशा तन्हेची ज्ञानाची पराकाष्ठा अथवा स्वानुभव अथवा अपरोक्षानुभव किंवा ज्ञान, आनंद अथवा सत्तामयच स्वतः होणें याबद्दलची नुसती अस्पष्ट कल्पना सुद्धां पाश्चिमात्य पंडितांना नाहीं. व असें म्हटल्यास त्यांना रागही पण येणार नाहीं, कारण अद्याप त्यांनाही ही ब्रह्मावस्था मनुष्यप्राप्य अथवा स्वसंवेद्य आहे व ती मनुष्यास या देहांत असून मिळवितां येईल असें स्वप्नांत सुद्धां वाटत नाहीं. तेव्हां या बाबतींत ते पौर्वात्यांपेक्षां किती तरी पटीनें मागसलेले असतां त्यांना आध्यात्मिक विचारांत रहस्यकारांनींच एवढें श्रेष्ठपद दिलेलें आहे. त्या ज्ञानाचा उपयोग फक्त इतर आधिभौतिक ज्ञानाप्रमाणेंच ते करतात. त्यांच्यांत मुक्ति, मोक्ष, कैवल्य या सारखा परमपुरुषार्थ मानींत नाहींत. पुनर्जन्म व कर्मविपाकशास्त्र त्या सर्वांना सर्वांशीं मान्य नाहीं. तेव्हां जन्माची यातायात व त्यांतून कायमची सुटका या गोष्टी त्यांच्या गांवीं कशा असणार ! विश्वांतील नानाविध कार्यजात कारणासह सांगतां आलें म्हणजे त्यांचें कार्य झालें. तें सांगतां येईपर्यंत त्यांचा आधिभौतिक शास्त्रांचा नाद सुटावयाचा नाहीं. प्रत्येक कार्यास कारण असलें पाहिजे. प्रत्येक कारण हें सुद्धां कार्य आहे, पुन्हां त्याचें कारण काय ! तसेंच तेंही स्वतः एका तिसऱ्याच कारणाचें कार्य असतें; अशी कारण-परंपरा शोधून काढण्याकडे पाश्चिमात्य तत्वज्ञानाची धांव आहे. त्यांचें ज्ञान स्थूल सृष्टींतील वस्तु व नियम यांच्या निरीक्षणानें बनलेलें आहे. उदाहरणार्थ, त्यांचें मानसशास्त्र पहा. मन हें ब्रेन (मेंदू) मध्यें आहे अशी त्यांची भावना झाल्यामुळें त्या मनाचें स्वरूप ते लोक या मेंदूंतील पेशींच्या निरनिराळ्या गतींवरून ताडण्याचा यत्न करीत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा मुख्य आधार म्हणजे आधिभौतिक शास्त्र-शोधाचा. त्या शोधान्वयें आपलीं तात्विक अनुमानें ते लोक काढीत असतात. त्यांचें तात्विक ज्ञान प्रत्येक व्यक्तीबरोबर व युगाबरोबर बदलत गेलेलें आहे. आमचें तत्वज्ञान वेदापासून सतत एकच प्रकारचें आहे. त्यांत बदल झालेला नाहीं. शिवाय आमच्या तत्वज्ञानास स्थूलशास्त्राचा आधार नसून महान् महान् ऋषींचा, साधूंचा, तपस्वी लोकांचा, योग्यांचा व महानुभावांचा स्वतःचा प्रत्यक्ष अनुभव हाच आधार आहे. त्यांच्यांत ज्ञान साध्य नसल्यामुळें साधनपरंपरा नाहीं; आमच्यांत ज्ञान साध्य असल्यामुळें साधनपरंपरा आहे. आमच्या तत्वज्ञानास

धर्माचा दुजोरा आहे, इतकेंच नव्हे तर सर्व तत्वज्ञान धर्मांतच गोवून टाकिलें आहे त्यांच्यांत धर्माची व तत्वज्ञानाची केव्हांच फारखत झालेली आहे, इतकेंच नव्हे तर कर्म व तत्वज्ञान या दोहींत चांगलीच फूट पडून राहिली आहे. आमच्या तत्वज्ञ लोकांना आपलें तत्वज्ञान सच्छिष्यास प्रत्यक्ष अनुभवास आणून देतां येतें; परंतु त्या तत्वज्ञांना तसें करतां येत नाहीं. ते फक्त आपलें म्हणणें युक्तिवादानें सिद्ध करून शिष्याची खात्री करून त्यास निरुत्तर करतील, परंतु शिष्यास ज्ञानरूप करण्याचें सामर्थ्य त्यांना नाहीं. त्यांचें ज्ञान त्यांचे ग्रंथ वाचून समजतें. आमचेंही समजतें, परंतु गुरूशिवाय तें वृत्तिरूढ होत नाहीं. त्यांचे ग्रंथकार स्वतः जवळ असूनही त्यांचे ज्ञान त्यांना वृत्तिरूढ करितां येत नाहीं. त्यांचें तत्वज्ञान चोहींकडून अगदीं बंद केलेल्या अथवा सदैव न उघडतां येण्याजोग्या पेटींत घातलेल्या रत्नाप्रमाणें आहे; परंतु आमचें ज्ञान करतलगत रत्नाप्रमाणें आहे. त्यांचें ज्ञान टांटालस नांवाच्या शापितास दिलेल्या स्वच्छ व शीत सरोवर व नाना स्वादिष्ट फलें यांच्यासारखें आहे. म्हणजे दोन्ही पदार्थ इतके सन्निध असूनही ते जसे टांटालसच्या तोंडास येत नसत, तद्वत् तें ज्ञान आहे; आमचें ज्ञान असें आहे कीं, साधनांचा योग्य शास्त्रमार्गानें अवलंब केल्यास आंत, बाहेर, मध्यें, सर्वच ज्ञानमय होऊन जातें. सारांश, आमचें ज्ञान नुसतें शाब्द नसून तें प्राप्त करून घेतल्यास जन्ममरणपरंपरा कायमची चुकवून जीवास परमात्मरूप म्हणजे कायमचें सच्चिदानंदरूप करीत असतें; परंतु त्यांच्या शाब्दज्ञानांत हें सामर्थ्य नाहीं. असें असतां रहस्यकार त्या ज्ञानास व त्या तत्वज्ञांस किती महत्व देत आहेत पहा. रहस्यकार आतां कदाचित् म्हणतील कीं "आमच्या एवढ्याशा तुटक्या वाक्यावर तुम्हीं इतकी टीका करण्याचें कारण नव्हतें. आणखी भरीं आमचीं वाक्यें महत्वपूर्वक असल्यास दाखवावीं." यावर आमचें असें उत्तर आहे कीं " होय. एवढेंच वाक्य घेऊन त्यावर आम्ही एवढी इमारत रचित नव्हतों; परंतु आपण जेव्हां ज्ञानोत्तर कर्में करावींत किंवा नाहींत अशाबद्दल आम्हांस या पंडितांचीं वचनें सांगूं लागलां, तेव्हां ज्ञानोत्तर दशेचा त्या लोकांनीं अनुभव घेतलेला आहे असें तरी आपण समजत असलां पाहिजे, नाहीं तर, आमचेंही ज्ञान त्यांच्यासारखें पोंचट, नुसतें शाब्द व पुस्तकांतून वाचण्याजोगेंच, नव्हून प्रत्यक्ष जाणण्याजोगें नव्हे, असें तरी आपण समजत असलां पाहिजे. या दोन्हीशिवाय कोणताही पक्ष संभवत नाहीं. परंतु हे दोन्ही पक्ष आपल्या पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्वज्ञानास अत्यंत कमीपणा आणणारे आहेत." असो. आतां कोणी म्हणेल " अहो, पाश्चिमात्य ज्ञान जर तुमच्या मतें इतकें निरर्थक आहे तर तुम्हीं त्याच ज्ञानाच्या अनुरोधानें " बाह्याभ्यास आंतरभ्यास " " कर्म विपाक योग " इत्यादि प्रकरणांतून विवेचन केलें आहे तें काय म्हणून ! " आमचें यास एवढेंच उत्तर आहे कीं " आम्हीं तरी वाचकांस अपरोक्ष बोध करून देण्याचा इरादा धरलेला नाहीं. विश्वाभ्यास युक्तीस पटण्या-

करितां, जीवास स्वातंत्र्य नाहीं हें नुसतें बुद्धीस पटण्याकरितां, आधुनिक इंग्रजी शिकलेल्या वाचकांच्या सोईकरितां, किंबहुना प्राकृतिक शास्त्रांनींच प्रकृति कशी खोटी ठरते हें दाखविण्याकरितां आम्हीं त्यांच्या प्रक्रियेचा आश्रय केला आहे. नहून अष्टांग योगशास्त्रांकरितां अथवा तुर्यावस्थेतील बोधाकरितां अथवा तदनंतरची कर्माकर्मस्थिति दाखविण्याकरितां आम्हीं त्या शास्त्रांचा उपयोग केलेला नाहीं; व तसा कधीं करणारही नाहीं. कारण हीं शास्त्रें शाब्दबोधाच्या पुढल्या स्थितींत अगदीं दीन, पंगु व निर्बल आहेत हा आमचा निश्चय आहे.

साधारण ग्रीक तत्वज्ञानाचा उदय होण्यापूर्वी यूरोपखंडांत आत्म्याबद्दलच्या समजुती फारच कोत्या व अडाणीपणाच्या होत्या. जिवंत व मृत शरीरांत काय भेद असावा ? व स्वप्नांत मनुष्याच्या आकृति दिसतात त्या कोठल्या ? असले प्रश्न त्या वेळच्या लोकांना सुचत व त्यांचीं उत्तरें ते आपल्या समजुतीप्रमाणें देत. ते म्हणत, छायारूप, सूक्ष्म, अदृश्य, असा एक पिशाचरूपी आत्मा जिवंत शरीरांत रहात असतो. त्याची आकृति ज्या शरीरांत तो रहातो त्या शरीराच्या आकृतीसारखीच असते, परंतु ती सूक्ष्म व अदृश्य असते. हा आत्मा हवें ते देह घेऊं शकतो व हव्या त्या देहांत संचार करूं शकतो. जगांतील सजीव व निर्जीव अशा दोन्ही पदार्थांत आत्मा असतो. यामुळें दगड, झाडें यांची पूजा सुद्धां ते लोक करीत असत. आमच्या इकडील सर्व जलीं, स्थलीं, काष्ठीं, पाषाणीं आत्मा भरलेला आहे या कल्पनेंत व त्यांच्या वरील कल्पनेंत मात्र फार अंतर होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे, कारण आत्मा एकरूप आहे ही कल्पना त्यांना नव्हती. प्रत्येक वस्तूचा आत्मा निराळा व त्याचा आकारही निराळा. जितक्या व जसल्या वस्तु तितके व तसले आत्मे. भेद इतकाच कीं, वस्तू जड व त्यांचे आत्मे सूक्ष्म. चिदात्म्याची कल्पना त्यांना नव्हती; पुढें ओक तत्ववेत्ते या कल्पनेच्या थोडेसे पुढें गेले. एंपिडाक्लीस (Empedocles) म्हणे, कीं जगांत अग्नि, वायु, जल व पृथ्वी अशीं चार मूलतत्वें आहेत. हीं मूलतत्वें प्रीति अथवा स्नेह व द्वेष या दोन सूक्ष्म तत्वांनीं अनुक्रमें संयोग-वियोग पावत असतात. आत्मा ह्या सर्व तत्वांचा बनलेला असल्यामुळें त्याला सर्व पदार्थांचें ज्ञान होत असतें. अनाक्सागोरस (Anaxayogorus) म्हणे कीं, आत्मा हा अग्नि ! वायु या तत्वापेक्षांही सूक्ष्म असा तत्वांचा बनलेला आहे. त्याच्यांत अधिक शक्ति असून सर्व पदार्थ जाणण्याची शक्ति आहे. विश्वांत गति व कार्य हीं दोन्हीं हा आत्मा घडवून आणीत असतो. पिथागोरस (Pythagoras) म्हणे कीं, आत्मा म्हणजे संख्या व सामंजस्य (Number & Harmony.). हें तत्व समजण्यास कठीण आहे; परंतु पुराव्याची मीमांसा करीत बसणें मानवण्याची तेथें अजीं दिनेधता व विचिकित्सा दिसून येजारच. असो. हें मात्र ओढक्यांत असें आहे कीं, विश्व हें दिसण्यांत नियमित आहे, परंतु तें अनियमित

अशा अवकाशांत आहे. भूमितिशास्त्र हें अवकाशाचें शास्त्र आहे. म्हणजे भूमितींतील आकृति अवकाश मर्यादित केल्यामुळें उत्पन्न होतात. एक टिंब दिलें कीं बिंदु होतो. दोन टिंबांची ओळ होते. तीन टिंबांनीं पातळी तयार होत असते. एका बिंदूपासून जसें सर्व भूमितिशास्त्र उत्पन्न होतें व त्यांतील सर्व आकृति तयार होतात. तसेंच एक संख्येपासून दोन, दोन्हीपासून तीन, तिन्हीपासून चार अशा क्रमानें अव्यक्त अशा Space (अवकाश) मध्यें संख्येनें नियमितता व व्यक्तता येत असते. या संख्यातत्वाचें खूळ या पंथांत इतकें माजलें होतें कीं, व्यवहारांतील बऱ्याचशा गोष्टी हे लोक संख्यारूपानें दर्शवीत असत. उदाहरणार्थ, प्रसंग अथवा वेळ याला " सात" ही संख्या योजीत व लग्नास " पांच " ह्या संख्येनें दर्शविलें जात असे. तेव्हां सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे संख्या हीच असल्यामुळें " संख्या " हाच आत्म्याचा प्रधानगुण मानण्यांत आला यांत आश्चर्य नाहीं. तसेंच ते लोक गायनकलेचे फार भोक्ते असल्यानें सुराची साम्यावस्था किंवा एकतानता ही त्यांना फार प्रिय होती. यामुळें तीही एक आत्म्याचा गुण होऊन बसली. असो. प्लेटो (Plato) हा ग्रीक तत्ववेत्त्यांपैकीं एक बडा तत्ववेत्ता होय. याचें म्हणणें कीं, विश्वाच्या आरंभीं व्यवस्था नव्हती. अव्यवस्थित व अव्याकृत अशी प्रकृति व चिरंतन असे संकल्प (Ideas) असे दोन पदार्थ होते. विसकटलेल्या प्रकृतींत (Matter) संकल्पांनीं शिस्त आणली. विश्वांत जी नामरूपात्मक व्यवस्थित मांडणावळ दिसून येत आहे ती सर्व अनादि व अनंत अशा संकल्पांचें कार्य आहे. या संकल्पांच्या सहाय्यानें ब्रह्मदेव (Demiurgus) अव्यवस्थित अशा प्रकृतीपासून सृष्टि उत्पन्न करीत असतो. शुद्ध संकल्पान्वयें सृष्टि निर्माण करणें विधात्यासही कठीण गेलें, यामुळें सृष्टींत वैगुण्य राहिलें. सत्य, सौंदर्य, सद्गुण हे शुद्ध संकल्प सृष्टींत अंशतः आहेत; परंतु पूर्णत्वानें आले नाहींत. विश्वात्मा आत्मा आहे व तो विश्वाचा मध्यबिंदु आहे. जीव एक लहानसें विश्वच आहे व जीवांत दोन आत्मे आहेत. हृदयांत रहाणारा आत्मा श्रेष्ठ असून धैर्य, क्रोध, उत्साह इत्यादि गुण-विशिष्ट आहे. जठरांत रहाणारा क्षुधात्मक आहे. या शरीरगत दोन आत्म्यांशिवाय आणखी एक विचारशील आत्मा जीवांत असतो. या विचारशील आत्म्याशीं वर सांगितलेल्या दोन आत्म्यांचा कलह चाललेला असतो. संकल्प हेच या विश्वांत श्रेष्ठतम होत. जड विश्व व संकल्प यांच्यामधली सृष्टि म्हणजे आत्मा होय. ह्या विश्वात्म्यामध्यें संकल्प व जड प्रकृति यांच्या गुणांचें मिश्रण असतें म्हणून आत्मा हा संकल्पापेक्षेनें कनिष्ठ व प्रकृत्यात्मक विश्वाच्या अपेक्षेनें वरच्या दर्ज्याचा होय. विश्वात्म्याची ही दशा मग जीवात्म्याचें नांव कशाला ? तो अर्थातच संकल्पापेक्षेनें विश्वात्म्यापेक्षां फारच कनिष्ठ होय. विश्वात्मा हा विश्वमध्यांत असून सर्व विश्वास व्यापून असतो व तो स्वतः गतिमान् आहे. ॲरिस्टॉटल (Aristotle) नें ह्या

आध्यात्मिक विचारास महत्व न देतां आपला निराळाच मार्ग काढला. त्याच्या मतें आत्म्यास गति नाहीं. तो स्थिर आहे. संकल्प व प्रकृति ह्या वस्तु निरनिराळ्या नसून एकाच वस्तूचीं दोन रूपें आहेत. प्लेटोचें द्वैत त्याला मान्य नाहीं. आकाराशिवाय अथवा रूपाशिवाय प्रकृति तरी कशी ज्ञानगोचर होणार ? तेव्हां संकल्पाच्या ऐवजीं ॲरिस्टॉटलनें Form ची म्हणजे रूपाची योजना केली, व त्या दोन्ही वस्तूंचें संमेलन केलें. प्रकृति नुसती अव्याकृत आहे. रूप व्याकृत आहे. अव्याकृतापासून उत्क्रांतिरूपानें शेवटचें कार्य जीव हें होय. प्रगतीची पराकाष्ठा म्हणजे शुद्ध रूपाचें (Pure Torm) आविष्करण होय. प्रकृति, रूप (प्लेटोचा संकल्प), निमित्त (Efficient cause) व प्रयोजन (Final cause) अशा चार प्रकारचीं कारणें ह्या विश्वांत आहेत. जड प्रकृति हें स्थूल कारण होय. कर्त्याच्या मनांतील संकल्प हें रूपात्मक (Formal cause) कारण होय. कार्य घडविण्यास लागणारी सामुग्री (कर्त्याची शक्ति वगैरे) ही निमित्तकारण होय. व ज्या हेतूनें एखादें कार्य केलें तो हेतु प्रयोजनकारण होय. जीवात्मा ह्या प्रकृतीच्य उत्क्रांतींतील एक कार्य आहे. ह्या आत्म्यास देह आहे; परंतु तो सूक्ष्म प्रकृतीचा आहे. अग्नि, वायु व आकाश या शुद्ध तत्वांचा आत्मा झालेला आहे. वर जीं चार प्रकारचीं कारणें सांगितलीं, त्यांपैकीं शेवटचीं तीन कारणें आत्म्याच्या अस्तित्वाचीं द्योतक आहेत. ॲरिस्टॉटलच्या मतानें वनस्पतीचा आत्मा नुसता (Nutritive Soul) पोषकात्मा होय. मनुष्येतर प्राण्याचा आत्मा विकारात्मक (Sentient soul) होय. हे दोन्ही आत्मे शरीरापासून वेगळे असत नाहींत मनुष्यांत दोन प्रकारचे आत्मे आहेत. जडात्मा म्हणजे नुसता पाहाणारा अथवा विषयांचा उपभोग घेणारा होय. हाही शरीरापासून पृथक्त्वानें रहात नाहीं. चिदात्मा (Active or Reproductive Intellect) हा मात्र शरीराहून भिन्न असून अमर आहे. ॲरिस्टॉटलच्या मतें हा जीवात्मा तेवढा अमर आहे. परमेश्वर शुद्ध व सात्विक असा आहे व सर्व जगाची प्रगति त्याचेकडेच होत आहे. वाचकहो, ह्या ॲरिस्टॉटलचाच दृष्टान्त रहस्यकारांनीं आपणास दिला आहे. ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं या शंकानिरसनास आम्हास याच ॲरिस्टॉटलचें वचन सांगितलें आहे. असो, सर्व युरोपिन तत्वज्ञांच्या मतांचा इतिहास देण्यास येथें अवकाश नाहीं. वाचकांनीं जिज्ञासा असल्यास त्या विषयावरील स्वतंत्र ग्रंथ पाहावेत. Student's History of Philosophy या नांवाचा प्रोफेसर आरथर राजर्स यांनीं केलेला ग्रंथ लहान असून उत्कृष्ट आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य वाचावा अशी आमची शिफारस आहे. असो, ॲरिस्टॉटलपासून हळूहळू उत्क्रांति होत आत्मविचारांत पुढें बरीच प्रगति होत गेली व Thomas Acquinas च्या वेळेपर्यंत आत्म्याच्या कल्पनेंतील स्थूलता अथवा जडता कमी होत जाऊन त्यांत चिदंश व चिरंतनता येत चालली. या तत्ववेत्त्याच्या मतें, (Nutritive or

Vegetable Soul) वनस्पत्यात्मा हा जरी अज्ञानावेष्टित असला तथापि त्यांत जडांश नसून सात्विकांश आहे. तसेंच मनुष्येतर प्राण्याचा आत्मा हा केवळ जड नसून ज्ञानधर्म आहे व मनुष्याचा आत्मा (Intellect) हा चिदंश असून ज्ञानविशिष्ट आहे. पुढें बराच काल लोटल्यावर म्हणजे सतरावे शतकांत (१५९६–१६५०) डेकार्टे (Descartes) नांवाचा तत्ववेत्ता उदयास आला व तेव्हांपासून आधुनिक तत्वज्ञानास प्रारंभ झाला असें म्हणण्यास नड नाहीं. हें तत्वज्ञान विवेकवादी अथवा युक्तिवादी (Rationalism) आहे. डेकार्टे म्हणतो "मी आहे" "मी विचारवान् आहे" इत्यादि सिद्धान्त स्वानुभवानेंच खरे आहेत याबद्दल वाद असतां उपयोगी नाहीं. बाकीचें विश्व जरी मिथ्या आहे असें क्षणभर समजलें तरी वरील सिद्धान्त अबाधित रहातात, तेव्हां जीवात्मा खरा आहे. तसेंच ईश्वर खरा आहे हाही सिद्धान्त सत्य मानणें भाग आहे, कारण ही प्रतीति माझी मलाच होत असते, बिचा उगम बाहेर नाहीं तेव्हां बाह्योपाधिविरहित उत्पन्न झालेली कल्पना तरी माझ्यांत कोठून आली? अर्थात् ती खरी व स्वतः सिद्ध असल्यामुळें आली. मी अज्ञ व अल्प असा असतां माझ्यांत अनंत, सर्वज्ञ, सर्वसाक्षी अशा परमेश्वराची ज्याअर्थी कल्पना आली त्याअर्थी तो अनादिकालची व खरीच असली पाहिजे. तेव्हां "मी" व "ईश्वर" या दोन वस्तु सिद्ध झाल्यानंतर तिसरी वस्तु म्हणजे बाह्य विश्व हेंही खरें असलें पाहिजे हेंही अनुमान सहजगत्या प्राप्त होतें. कारण तें खोटें मानिल्यास ईश्वर "फलव्या" आहे असें मानावें लागेल. यामुळें डेकार्टेच्या मतें जीव, ईश्वर व विश्व हीं तिन्हीं सत्य आहेत असें होतें. या तिन्हींचा परस्परसंबंध काय विषयांत मात्र डेकार्टेच्या विवेक पद्धतींत फार घोंटाळा उत्पन्न झाला. असो. पुढें स्पायनोझा (Spinoza) नें याच सिद्धान्तास अद्वैत स्वरूप दिलें. याचे मतें ईश्वर व जग हीं दोन्हीं निरनिराळीं नसून एकाच वस्तूचीं (Substance) दोन स्वरूपें आहेत. स्थूल पदार्थ (Thing) हा विचाराचा (Thought) च विस्तार (Extension) आहे. विचार व विस्तार या दोनच गुणांचा आविर्भाव निरोभाव या जगांत दिसून येत असे. प्रत्येक पदार्थ, हा त्या पदार्थाच्या कल्पनेचाच विस्तार आहे. चांगलें, वाईट, शीत, उष्ण अशा तऱ्हेचीं द्वंद्वें या जगांत वास्तविक नाहींत तीं मनुष्याच्या विकारामुळें उत्पन्न झालीं आहेत. ईश्वरास विकार अथवा इच्छा नाहींत. "त्याचे गुण" असें म्हणणें हें मुद्दां विपरीत आहे, कारण तोच गुणात्मक आहे, यामुळें तो व त्याचे गुण अशी द्वैत कल्पना संभवत नाहीं. या पंथांत विश्व, जीव, ईश्वर हीं तिन्हीं खरीं असून तीं एकच आहेत असा विशेष आहे. परमेश्वरास स्वतःची स्वतंत्र अशी इच्छा नसल्यामुळें, त्याला अमुक कार्य घडून आलेंच पाहिजे अथवा अमुक कार्य घडून येतां कामा नये, अशा तऱ्हेची कर्तुमकर्तुं शक्ति नाहीं. अपरि-

ह्यार्य व अवश्यंभावी अशा नियमानें तोही परवश होऊन गेला आहे. परमश्रेष्ठ सत्य म्हटलें म्हणजे विश्वान्तर्गत सृष्टिनियम. मनुष्याचें इतिकर्तव्य म्हणजे या अभेद्य व नित्यनियमाचें ज्ञान करून घेणें. द्वंद्वें मिथ्या असून भावनात्मक आहेत. जगांत स्वातंत्र्य मुळींच नाहीं. जें जें घडून येत असतें तें तें घडून आलेंच पाहिजे. तें सत्यनियमांनीं घडत असतें. म्हणून जिवानें आपले मनोविकार जिंकून जगाच्या अपरिहार्य सत्यधर्माकडे सदैव लक्ष दिलें पाहिजे व द्वंद्वांतून आपली सुटका करून घेतली पाहिजे. हाच मोक्ष.

लिबनिझ (Leibniz) यानें याहीपुढें मजल मारली. जडपदार्थ, मन, ईश्वर हीं सर्व डेकार्टेसारखीं पृथक् न मानितां अथवा स्पायनोझासारखें सर्व विश्व आपल्या नियमानें जखडून बांधलें गेलें आहे, त्यांत कोणासही स्वातंत्र्य नाहीं असेंही न मानितां, त्यानें Matter, mind, God यांची योजना अगदीं निराळ्या तऱ्हेनें केली. तो अशीः-जग हें निरानिराळ्या पिंडांचें बनलेलें आहे. ह्या पिंडांत जडता, गतिमत्ता व सूक्ष्मज्ञान कमजास्त मानानें भरलेलें असतें. प्रत्येक पिंड (Monad) स्वतः ब्रह्माण्ड आहे. प्रत्येक गतिमान् असून ज्ञानवान् आहे फरक एवढाच कीं, कांहीं पिंडांत ज्ञान प्रच्छन्न असतें, कांहीत आविर्भूत असतें. झाड, दगड, मनुष्य सर्वच Monad चे झालेले आहेत. प्रत्येकाची प्रगति आपापल्यापरी स्वतंत्ररीतीनें होत असते. असे सर्व पिंड मिळून ब्रह्माण्ड होतें. जगांत पिंडाशिवाय रिकामी जागा नाहीं. ईश्वर ब्रह्माण्डाचा राजा व नियंता आहे. ब्रह्माण्ड हें ईशपूर (City of God)आहे. पिंड(Monad) हा त्यांतील रहिवाशी आहे. डेकार्टे, स्पायनोझा व लीबनिझ् या तत्वाज्ञानी विवेकप्रधानतत्त्वज्ञ (Rationalist) म्हणतात. यापुढें तत्वज्ञानाच्या इतिहासांत निराळें युग झालें. या युगास Emriricism (केवल प्रत्यक्षोपजीवि) म्हणीत असतात. Locke (लॉक), Berkeley (बर्कले) व Hume (ह्यूम) हे या युगांतील प्रधान तत्ववेत्ते होत. या तिघांत Berkeeyचें तत्त्वज्ञान फार महत्त्वाचें आहे. या तत्त्वज्ञानें बाह्यजगाचें ज्ञान विचाराच्या कसोटीस लावून असें ठरविलें कीं, विश्व असा कांहीं पदार्थ बाहेर नसून तो फक्त ज्ञानात्मक आहे. जें कांहीं आम्हांस कळतें तें ज्ञानदृशेंत कळतें. म्हणजे आम्हांस जो बाह्यजगाचा अनुभव येतो तो ज्ञानरूपच असतो. तेव्हां ज्ञानरूपता (Mental state) हीच शेवटीं खरी ठरते. या तत्त्वज्ञाच्या प्रक्रियेचा आम्हीं " बाह्याध्यास " प्रकरणांत बऱ्याच अंशीं आश्रय केला असल्यामुळें आतां त्याबद्दल विशेष विस्तार करण्यास नको आहे. ह्या तत्वज्ञास ईश्वराचें अस्तित्व मान्य आहे, इतकेंच नव्हे, तर कार्यकारणभाव, नियमबद्धता वगैरे जीं आमच्या ज्ञानांत दिसून येतात तीं सर्व या ईशसत्तेचीं कार्यें होत, असें तो समजत असे. यापुढील महत्त्वाचे तत्त्ववेत्ते म्हणजे कांट, हेगेल, शोपेनहार, स्पेन्सर इत्यादि होत. कान्ट हा द्वैती तत्त्ववादी होय. यानें ज्ञानाची मीमांसा करून

Ideal and real किंवा Phenomenal and noumenal अशा दोन प्रकारचें जग आहे असा सिद्धान्त स्थापित केला. इंद्रियास (sense) व बुद्धीस (Uuderstanding) जें दिसतें तें Phenomenal जग होय. वस्तूचें खरें स्वरूप हें नसून तें इंद्रियातीत व बुध्यातीत आहे. मनुष्यास ह्या खऱ्या अथवा सत्यवस्तूचें ज्ञान होण्यास साधनें दिलेलीं नाहींत. म्हणून ही सत्यवस्तु (Thing-in-itself) अज्ञेयच रहाणार. हेगेलनें ह्या द्वैताची सांगड घालून आपलें अद्वैततत्त्व प्रस्थापित केलें. त्याच्या मतें Phenomenal व noumenal या दोहींत कायमचा विरोध नसून एक दुसऱ्याचें पोषक व सहाय्यकारी आहे. सत्य व असत्य, स्वातंत्र्य व प्रारब्धाधीनता, इत्यादि द्वंद्वें आत्म्याच्या एकत्व प्रतीतिकरितांच निर्माण झालीं आहेत. विश्वाचा इतिहास म्हणजे आत्म्याच्या स्वानुभवाचा अथवा स्वप्रतीतीचाच इतिहास होय, असें हेगेलचें मत होतें. स्पेन्सरसाहेब तर बोलूनचालून अज्ञेयवादीच होत. अर्न्स्ट-हेगेलसारखे आधिभौतिक शास्त्रज्ञ, जडाद्वैती होत. आत्मा प्रकृतीहून वेगळा नसून, तो तिच्यांतच सूक्ष्मरूपानें असतो व जगाच्या उत्क्रांतीच्या अचलप्रकृति-नियमानें (Law of substance) तो आविर्भूत होत जाऊन विकास पावत जातो.

एवंच, या युरोपियन तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत तर्क, अनुमान व प्रत्यक्ष यांशिवाय कोणतेंही प्रमाण मानलेलें नाहीं असें दिसून येईल. श्रद्धा, योग, मानसिक प्रचंड शक्ति, अनुभव, इत्यादिकांचें यांत नुसतें वारेंसुद्धां नाहीं. योगशालेंतील मानसिक प्रयोगांनीं तूर्यावस्थेवर जे प्रत्यक्ष अनुभव इकडील ऋषिवर्यांनीं घेतलेले आहेत त्या अनुभवांचा या तत्त्वज्ञांत पूर्ण अभाव दिसून येतो. असें असतां रहस्यकार म्हणतात, या तत्त्वज्ञांपैकीं कांहींजण ज्ञानोत्तर कर्मयोगच प्रतिपादन करितात व संन्यासमार्गीयांस ते निरुत्तर करूं पहातात. यावरून ज्ञानाबद्दल त्यांची कल्पना काय आहे हें चांगलें व्यक्त होतें. असो. स्वतः कान्ट आध्यात्मिक ज्ञानाबद्दल काय म्हणतो पहाः—

" Both parties to the dispute beat the air; they worry their own shadow ; for they pass beyond nature to a region where their dogmatic grips find nothing to lay hold of " (Kant by Wallace p. 189.) प्रोफेसर हड्सन (Hudson) आपल्या स्पेन्सर मतप्रकाशन ग्रंथांत म्हणतातः—

The dividing line between appearance and reality can never be passed, no matter what achievements of insight and geinus and Knowledge the future ages may hold in store; and for all mankind, as for us, the

eternal and ever-working power revealed to us only in its manifestations must still remain beyond definition, beyond even conception." Popular Edition P. 115.

अर्न्स्ट हेगेल हे आपल्या "Riddle of the Universe" ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म्हणतात कीं, आपण केलेलीं प्रमेयें अगदीं (अर्थात् विश्व व आत्मा यांसंबंधीं) निर्दोष आहेत असें कोणी समजूं नये.

प्रो. टिंडाल (Tyndall) म्हणतात कीं " The chasm between the two classes of phenomena wonld still remain in tellectually impassable " (Lectures and Essays Popular Edition P. 59).

पाश्चिमात्य तत्त्ववेत्ते ज्या अध्यात्मविचारापुढें हात टेंकून निराश होतात त्या अध्यात्मविचारांचें आमच्या ऋषींनीं अनुभवात्मक शास्त्र निर्माण केलें आहे व " अज्ञेया"स " ज्ञेय कोटींत घालून टाकलें आहे, ह्याबद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. "

१७ श्रीकृष्णार्जुनसंवादयोग.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥

भ० गी० अ० १८ श्लो० ७०.

श्रीकृष्ण आपल्या गीतोपदेशाच्या शेवटीं सांगतात " ह्या आमच्या धर्मरूपी संवादाचें जो कोणी अध्ययन करील त्यानें माझें ज्ञानयज्ञानें पूजन केल्यासारखें होईल असे माझें म्हणणें आहे." ह्या संवादाच्या अध्ययनाचें फल "कर्मयोगानें श्रीकृष्णाचें यजन " नसून तें " ज्ञानयज्ञानें " अथवा " सांख्ययोगानें " होईल असें भगवान् स्वतः सांगत आहेत. भगवान् स्वतःच जर असे ज्ञानमार्गपक्षपाती झाले तर मग रहस्यकारांच्या कर्मयोगास कोठून थारा मिळणार ? परंतु असें असतांही रहस्यकारांनीं आपला " कर्मयोग " इतक्या अडचणींतूनही पार पाडून नेला आहे. असो. आतां या संवादाचें आपण सिंहावलोकनानें पुनः निरीक्षण करूं. अथवा हेंच दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे आपण " गीताध्याय संगति " कशी लाविता येईल तें पाहूं.

पांडवांचा वनवास संपला. दुर्योधनास दिलेलें धर्मवचन अथवा करार अनंत हालअपेष्टा भोगून पांडवांनीं पूर्णपणें पाळला. आतां दुर्योधनानें आपल्या कराराचा भाग पूर्ण करावयाचा राहिला होता, म्हणजे राज्याचा अर्धांश पांडवांस द्यावयाचा होता. पांडवांनीं त्याबद्दल मागणी केली. दुर्योधनानें त्या मागणीचा अव्हेर केला. तेव्हां पांडवांसमोर दोन प्रश्न उभे राहिले. एक राज्याच्या अर्धांशाची पर्वा न करितां आजपर्यंत जसे कष्टांत दिवस काढले तसाच पुढील आयुष्यक्रमही ठेवावा अगर दंडांत जोर असल्यास क्षात्रधर्मास उचित असें अधर्मशील दुर्योधनपक्षीयांशीं युद्ध करून त्यास कायदेशीर, वाग्निश्चित व असंदिग्ध असा असलेला करार पुरा करण्यास भाग पाडावें. हे दोन पक्ष पुढें येऊन उभे राहिल्यावर धर्मानें-चलें काय, पण भीमार्जुनांसारख्या कट्ट्या व कडव्या वीरांनींसुद्धां सामोपचारानें हा कुलनाश टाळतां आल्यास टाळावा अशाबद्दल मनःपूर्वक प्रयत्न केले; व ह्या कामाकरितां श्रीकृष्णास स्वतः शिष्टाईस पाठविण्यांत आलें. धर्मराज तर राज्याच्या अर्धांशावर पाणी सोडण्यास व फक्त पांचच गांवें पांच भावांपुरतीं मिळाल्यास युद्धाच्या भरीस न पडण्याइतके तयार झाले होते. त्यावेळीं श्रीकृष्णांनीं धर्मास सांगितलें कीं, "धर्मा, युद्ध न केल्यास तुमच्या नशीबीं भिक्षावृत्तीशिवाय कांहीं नाहींसें होईल, परंतु भिक्षावृत्ति क्षत्रियाचा धर्म नव्हे. तूं अल्पसंतुष्ट आहेस खरा, परंतु कौरवांचा सर्व

कटाक्ष युद्धावर आहे. तस्मात् तूं क्षत्रिय असल्यामुळें तुला युद्ध केलेंच पाहिजे" हा भाग महाभारतांत उद्योगपर्वांत आला आहे. पुढें श्रीकृष्णशिष्टाई जेव्हां विफल झाली. इतकेंच नव्हे, तर श्रीकृष्णासही ती अत्यंत उपमर्दकारक झाली तेव्हां, युद्धाचा बेत पांडवांनीं कायम केला. आपल्या दोस्त राष्ट्राधिपतींना निमंत्रणें करून आपल्या पक्षास मिळऊन घेतलें. युद्धाच्या सर्व सामुग्रीची आटोकाट तयारी केली. सेनापत्य योजना झाली. दोन्ही पक्षांनीं मिळून संग्रामनीतीचा खर्डा तयार केला. झालें, युद्धास तोंड पडणार तोंच अर्जुनाच्या हृदयांत क्षणैक वैराग्यवृत्ति उत्पन्न झाली, धर्माच्या मनोवृत्तीचीच ही पुनरावृत्ति होय. समजा, अशा वेळीं हीच वैराग्यवृत्ति दृढ झाली असती तर काय परिणाम झाला असता ? अर्जुन समरांगणांतून पळून गेला ह्या अपकीर्तीचा डांगोरा सर्व जगभर पसरला असता. शिवाय, क्षत्रियाच्या धर्मास त्यास आंचवावें लागलें असतें, व परकीयांच्या धर्माचें म्हणजे ब्राह्मणधर्माचें अनुकरण केल्याचें पाप त्याच्या पदरीं बांधलें जात होतें. युद्धाची तयारी करण्यापूर्वी जर अर्जुन अविहित संन्यास घेत होता, तर फार झालें तर विकर्म केल्याचाच दोष त्यास लागला असता. परंतु प्राप्त झालेल्या नव्हे, स्वतः अकृलहुपारीनें केलेल्या युद्धप्रसंगापासून परावृत्त होण्याच्या भ्याडपणापासून तरी तो अलिप्त राहता. अशा घनघोर प्रसंगाच्या वेळीं अर्जुन हताश झाल्यामुळें, अर्थातच श्रीकृष्णालासुद्धां सखेदाश्चर्य वाटावें यांत नवल काय ! मागें "गुरुशिष्ययोगांत" वर्णिलेल्या वस्तादजीची अवस्था व श्रीकृष्णाची प्रस्तुतची अवस्था एकच म्हणावयाची. अर्जुन तर अशा वेळीं ज्ञानाच्या गोष्टी श्रीकृष्णास सांगूं लागला. साधुसंतांची भूतदया त्याच्या मनांत उभी राहिली व त्या भरांत तो म्हणालाः—

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥

अ० १ श्लो० ३९.

अज्ञ कौरवांना हा कुलक्षय दोष लोभाविष्टेतेमुळें समजत नसला तथापि आम्हां सुज्ञांस तो समजूं नये काय ! अशासारख्या ज्ञानाच्या गप्पा श्रीकृष्णापुढें कशा चालतील ! लागलीच श्रीकृष्णांनीं अर्जुनास टोमणा मारला कीं, ज्ञानाच्या गप्पा मात्र सांगत आहेस परंतु कृतींत पहावें तों ज्ञानविरुद्ध वर्तन दिसून येत आहे; म्हणजे ज्यांच्याविषयीं शोक करण्यास नको असें ज्ञानशास्त्र सांगतें, त्यांविषयीं तूं तर शोक करीत आहेस ! तेव्हां तुझी ही बडबड पुरी कर व मी जो धर्ममार्ग सांगतों तो ऐक. त्यांतच तुझें कल्याण आहे. तूं पंडित नव्हेस. नुसता शब्दज्ञानी आहेस. कारण पंडित अशांचा कधीं शोक करीत नाहींत (नानुशोचंति पण्डिताः). अशा शोकमोहग्रस्त अतएव अज्ञ अर्जुनास श्रीकृष्ण ज्ञानामृत पाजून सुज्ञ करीत आहेत. भगवान् प्रथम

सांख्ययोगच अर्जुनास सांगूं लागले आहेत. ह्या दुसऱ्या अध्यायास " सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः " असाच संकल्प आहे, व त्यांत अर्जुनास केलेला उपदेशही केवल ज्ञानमार्गाचा आहे. या सांख्ययोग अध्यायांत भगवान् अर्जुनास " तूं संन्यासाश्रम घे " अथवा " अरण्यांत जाऊन भिक्षेवर निर्वाह कर व भगवीं वस्त्रें धारण करून मुंडन कर " अशा तऱ्हेचा उपदेश करीत नाहींत व आचार्यही या सांख्ययोगानें भगवानांनीं अर्जुनास असें सांगितल्याचें कोठें म्हणत नाहींत. उलट सांख्ययोग कथनांत सुद्धां " तस्माद्युध्यस्व भारत " असेंच भगवान सांगत आहेत. दुसऱ्या अध्यायांतच अठराव्या श्लोकांतः-

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥

असें स्पष्ट सांगत आहेत. सांख्ययोगाचीं तत्वें सांगून भगवान् अर्जुनास स्वधर्मपालनच करण्यास सांगत आहेत. आचार्यही याठिकाणीं भगवानांचा हाच आशय आहे असें धरून चालत आहेत. आचार्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, ज्ञानवानाच्या ठिकाणीं ज्ञान व कर्म या दोहींचा समुच्चय न्याय्य नाहीं. म्हणूनच अनात्मविदास कर्मयोग व आत्मविदास ज्ञानयोग विहित आहे असें आचार्य वारंवार म्हणतात. असो, आत्मा अमर आहे, शरीरें हीं अन्तवन्त आहेत. जन्मास जो आला तो मेलाच पाहिजे, नाश शरीराचा होतो, आत्म्याचा होत नाहीं, आत्मा स्वतः कांहीं करीत नाहीं. तो कर्मरहित, नाशरहित व विकाररहित आहे. तेव्हां तुला खरें ज्ञान झालें आहे असें जरी क्षणभर मानलें, तरी सुद्धां प्रारब्धकर्म शेवटास नेण्यांत तुला पाप लागणार नाहीं. बरें तूं केवल शरीरात्मवादी आहेस असें मानलें, तरी सुद्धां आत्मा नित्य जन्मास येतो व नित्य मरतो तेव्हां अशा नित्य जन्मणाऱ्या व मरणाऱ्या आत्म्याबद्दल शोक करण्याचें तुला प्रयोजन नाहीं (श्लो० २६) कारण हा " जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च " न्याय टाळतां येण्याजोगा नाहीं. पुष्कळ लोक आपणास आत्मतत्त्व समजलें म्हणतात; परंतु तें तत्व वास्तविक फार थोड्यांसच समजलेलें असतें (श्लो० २९). बरें, तूं फक्त कर्माधिकारीच आहेस असें धरून चाललें तरी सुद्धां, क्षत्रियाचा धर्म तुला टाकतां येत नाहीं. व्यवहारदृष्ट्या सुद्धां तुला स्वधर्मत्याग करतां येत नाहीं, कारण जगांत तुझी अपकीर्ति होईल व तुला भ्याड म्हणतील. बरें न्यायानें पाहिलें तरी या युद्धांत तूं मेलास तर तुला स्वर्ग मिळेल, युद्ध जिंकलेंस तर पृथ्वीचें राज्य मिळेल. तेव्हां कोणत्याही दृष्टानें हें प्राप्तकर्म- नव्हे स्वतः अकुलहुषारीनें आरंभिलेलें कार्य-आचरण्यापासून तुझा फायदाच आहे.

बरें, तुला आत्मज्ञान झालें नाहीं असें मानलें तरी हें कर्म योगबुद्धीनें तूं केल्यास तुला त्या कर्मापासून पाप व बंध याचा उपसर्ग होणार नाहीं. वाचकहो,

ध्यानांत ठेवा कीं, हा बुद्धियोग सांख्ययोगाच्याच अध्यायांत सांगितला आहे. कर्मयोगाचा अध्याय तिसरा आहे. भगवान् अर्जुनास म्हणतात, तुला ज्ञान नसलें तरी योगयुक्त कर्म केल्यास तें कर्म तुला बंधक होणार नाहीं. अशा तऱ्हेचें कर्माचरण हें वस्तुतः कर्मसंन्यासाच्याच तोडीचें आहे. " कर्मण्येवाधिकारस्ते " हा श्लोक या सांख्ययोग अध्यायांतच पठित आहे. ह्या श्लोकाच्या आरंभीं भगवान् बुद्धियोग सांगूं लागले आहेत.

" भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥

या श्लोकानें भगवान् सांगतात कीं, भोग व ऐश्वर्य ह्यांची ज्यांना आसक्ति आहे त्यांना समाधि साधणार नाहीं व बुद्धियोगही साध्य होत नाहीं. परंतु रहस्यकारांचा तर " ऐश्वर्य, तुष्टि, पुष्टि " या तिहींवर पूर्ण भर आहे. असो. ज्ञान्यांचा सांख्ययोग, अज्ञान्यांचा बुद्धियोग हे दोन्ही फलापेक्षेनें समान असल्यामुळें व वस्तुतः कर्मसंन्यास-रूपच असल्यानें त्या दोहींचाही भगवान् या सांख्ययोगाध्यायांतच समावेश करीत आहेत. भगवान् अर्जुनास " निर्योगक्षेम आत्मवान् " होण्यास सांगत आहेत. तसेंच " निस्त्रैगुण्य " होण्यास उपदेश करीत आहेत. अर्जुन जर मूळचाच ज्ञानी असता तर हा उपदेश अप्रयोजक झाला असता. ह्या आशयानेंच ते अर्जुनास म्हणतात " तुझा अधिकार कर्मे करण्याचाच आहे. परंतु हीं कर्मे करीत असतांना त्या कर्माच्या फलाची आकांक्षा मात्र ठेवूं नको. तसेंच " अकर्मा "चे ठिकाणींही तूं प्रीति ठेवूं नको. ' कर्म ' असो किंवा " अकर्म " असो, कोणत्याही ठिकाणीं आसक्ति अथवा प्रेम ठेवल्यास बंधन चुकत नाहीं, म्हणून तूं अकर्माचा तरी हट्ट कां धरतोस ? " अर्जुनाचा आग्रह कर्मसंन्यासाबद्दल नसून अकर्माबद्दल होता. " कर्मसंन्यास " व " अकर्म " या दोहींतील भेद सूक्ष्म आहे; परंतु फार महत्वाचा आहे. अर्जुन लढाईस तयारच होता. त्याला कर्मसंन्यासच करावयाचा होता, तर युद्धाची तयारी करावयाचें कारण नव्हतें. कर्म सुरूं झालेंच आहे. आतांच निर्वाणीच्या वेळीं " अकर्मासक्ति " त्याच्या ठिकाणीं उद्भवली. ही अकर्मासक्ति ज्ञान्यास असो किंवा अज्ञान्यास असो कोणासही अनिष्टच आहे, कारण आसक्ति सांख्य व योग या दोन्ही निष्ठांस विरुद्धच आहे. संन्यासी ज्ञानी कर्मे करीत नाहीं परंतु तीं न करण्यांत मुद्दां त्याची आसक्ति असत नाहीं. प्रारब्धवशात् किंवा ईशेच्छेनें त्यास कर्म करणें प्राप्त झाल्यास तो अडूनही बसत नाहीं. असा योग तरी तो भगवानांच्या मतें कोणता, असा साहजिकच प्रश्न उद्भवतो. त्यास भगवानच उत्तर देतात कीं, "समत्वं योग उच्यते" "सिद्धि, असिद्धि या दोहींस समान मानून, फलाची आकांक्षा व संग सोडून कर्मे कर (कारण तुझा अधिकार कर्माचरणाचाच आहे). योग म्हणजे समत्व "

(अर्थात् बुद्धीचें), या बुद्धियोगापेक्षां कर्म हें अत्यंत गौण आहे. तेव्हां कर्मयोगाचा (अशा गौण कर्मयोगाचा) आश्रय न करितां तूं बुद्धियोगाचा आश्रय कर. परंतु हा बुद्धियोग मात्र उगाच प्राप्त होत नाहीं (रहस्यकारांच्या न्यायानें वाटेल त्या मनुष्यास तो प्राप्त होत असतो). समाधीच्या ठिकाणीं जेव्हां तुझी बुद्धि स्थिर होऊं लागेल, तेव्हांच तुला योग प्राप्त झाला असें म्हणतां येईल (अ० २ श्लो० ५३). पुढें अर्जुन विचारतोः—

" केशवा, स्थितप्रज्ञ कोणास म्हणावें ? त्याची वागणूक किंवा रहाटी कशी असते ?" हा प्रश्न अर्थात् ज्ञान्याच्या तोंडून निघणार नाहीं हें कोणासही समजण्यासारखें आहे. आम्हीं मागेंच सांगितलें आहे कीं, अर्जुन हा जरी नराचा अवतार असला तरी श्रीव्यासांनीं त्याला या ठिकाणीं जी भूमिका दिली आहे ती जिज्ञासु शिष्याची दिली आहे हें विसरतां कामा नये, परंतु रहस्यकार म्हणतात, गीतेचा उपदेश अज्ञानी अर्जुनास नव्हे. असो. भगवान् या प्रश्नाचें उत्तर देतातः- जो आपल्या मनांतील सर्व काम (इच्छा) टाकतो–नव्हे पूर्णपणें टाकतो–(प्र+जहाति=प्रकर्षेण जहाति) व आत्मसुखानेंच ज्याला सुख होत असतें त्यास स्थितप्रज्ञ म्हणावें. परंतु रहस्यकार म्हणतात कीं गीता सर्व इच्छा सोडण्यास सांगत नाहीं. तेव्हां वाचकहो, आपल्या हृदयांत समता शिल्लक असल्यास आपणच याबद्दल विचार करा. " कामान् सर्वान् " असा भगवान् सर्वकामांचा निषेध स्वच्छ शब्दांनीं करीत आहेत. तसेंच इंद्रियें व मन हीं प्रमादशील असल्यामुळें तीं दोन्हीं स्थितप्रज्ञानें अंकित केलेलीं असतात व इंद्रियार्थापासून इंद्रियें परावृत्त केलेलीं असतात. शान्ति जोंपर्यंत नाहीं तोंपर्यंत सुख नाहीं.

"विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः।
निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥

अ० २ श्लो० ७१.

पुढें ही शान्ति कशानें मिळेल अशी अर्जुनास शंका येईल म्हणून तिचें स्वतःच श्रीकृष्ण निरसन करतात. " विहाय कामान् " **सर्व कामांचा** (इच्छासमूहाचा) त्याग करूनच शान्ति मिळते (वि+हाय= विशेष त्याग करून). भगवानांनीं ह्या ठिकाणीं पुनरुक्ति केली आहे, तथापि रहस्यकार तिकडे लक्ष देत नाहींत. पुढें तिसऱ्या अध्यायास आरंभ झाला आहे. अर्जुनाचा प्रश्न साहाजिकच असा आहे कीं, कर्मापेक्षां बुद्धियोग श्रेष्ठ असें तुझें मत आहे तर मला या घोरकर्मात कां घालतोस ? हा प्रश्न सांख्ययोग व बुद्धियोग ऐकल्यानंतरचा आहे. भगवान् सांख्ययोग व बुद्धियोग एकाच अध्यायांत सांगून गेले आहेत. कारण त्या दोहींत फारसा फरक नाहीं. कर्मफलत्याग म्हणजे वस्तुतः कर्मसंन्यासच आहे. व भगवान् ' संन्यास व त्याग " या दोहींचें लक्षण याचप्रकारें करीत आहेत. तेव्हां अर्जुनास ही शंका साहाजिकच आली कीं, भगवान् सांख्ययोग व बुद्धियोग यांची प्रशंसा करीत

असूनही पुन्हां पुन्हां " तस्माद्युध्यस्व भारत " असें सांगत आहेत. तेव्हां हें आहे काय ! अद्याप ' कर्म ' व " कर्म करीत असतांनाच नैष्कर्म्य " हा सिद्धान्त अर्जुनास पटला नव्हता म्हणून ही शंका साहाजिकच उद्भवली, तेव्हां भगवान् सांगूं लागले:-

या जगांत दोन निष्ठा आहेत असें मीं पूर्वी सांगितलेलें आहे. या ठिकाणीं " पुरा " या शब्दाचा अर्थ " नुकतेंच पूर्वी " म्हणजे एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगेत्विमां शृणु" या शब्दांनीं सांगितलेल्या निष्ठा असा रहस्यकार अर्थ करितात. परंतु ' पुरा ' हा शब्द घालण्याजोगें या वरील श्लोकार्धास पुराणत्व आलेलें नाहीं. अवघ्या पसतीस श्लोकांचेंच अंतर पडल्यास त्या अंतरास " पुरा " हा शब्द घालण्याचा पुराणकवींचा संप्रदाय असल्यास रहस्य ग्रंथही पुरातन ग्रंथ म्हणण्यास प्रत्यवाय येणार नाहीं. आतां या अर्थास मधुसूदनकार, श्रीधरस्वामी वगैरे बड्या-बड्या टीकाकारांचा आश्रय मिळाला आहे हें खरें; परंतु आचार्य (श्रीशंकराचार्य) या पदाचा जो अर्थ करीत आहेत तो आम्हांत जास्त चांगला वाटतो. ते म्हणतात, " पुरा " म्हणजे " सर्गादौ प्रजाः सृष्ट्वा तासामभ्युदय-निःश्रेयसप्राप्ति-साधनं वेदार्थसंप्रदायमाविष्कुर्वता प्रोक्ता मया " पुढेंही भगवान् " इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् " ह्या श्लोकार्धानें सर्गकालची आपली उक्ति सांगत आहेत, व अर्जुनही त्यांना विचारतो " आपण त्या वेळींही होतां व हें आपण " आदौ " म्हणजे पूर्वी सांगितलें असें म्हणतां हें कसें ! " या दोन्ही गोष्टींस " पुरा " शब्द विसंगत नाहीं, तेव्हां " प्रवृत्ति व निवृत्ति " हे दोन्ही मार्ग भगवानांनीं अनादि-कालापासून लावून दिले आहेत व तेच मार्ग ह्या श्लोकांत भगवानांनीं सांगि-तले आहेत. प्रवृत्तिधर्म मरीच्यादिकांना लावून दिला आहे व निवृत्ति मार्ग सनकसनंदनादिकांनां लावून दिला आहे. ह्याच दोन मार्गांचें येथें कथन आहे. हे दोन मार्ग भिन्न पुरुष-निष्ठ आहेत. हे एकाच पुरुषाचे ठिकाणीं संभवत नाहींत म्हणून आचार्यांनीं मुख्यतः " ज्ञानकर्मसमुच्चय " भ्रमाचें यथान्याय खंडन केलें आहे व ज्ञानी लोकांना अथवा तीव्र मुमुक्षूंना ज्ञान-मार्ग व अनात्मज्ञांस प्रवृत्तिमार्ग असे दोन निरनिराळे मार्ग भगवान् नारायणानेंच आंखून दिले आहेत असें म्हटलें आहे. हे तुल्यबल आहेत असें भगवान् या ठिकाणीं म्हणत नाहीं. " द्विविधा निष्ठा " म्हणजे एकाच अधिकारी पुरुषाची नव्हे म्हणून येथें विकल्प करितां येत नाहीं. शिवाय याच श्लोकांत भगवानांनीं या निष्ठेचे अधिकारीही निरनिराळे सांगितले आहेत. सांख्यांना ज्ञानयोग व कर्मयोग्यांना कर्मयोग म्हणजे निवृत्ति व प्रवृत्ति असे दोन मार्ग अनुक्रमें निर-निराळ्या अधिकाऱ्यांकरितां आहेत, असें श्रीकृष्णच सांगत आहेत. हे दोन मार्ग भिन्नकर्तृक असल्यामुळें त्यांचा समुच्चय अथवा सामानाधिकरण्य संभवत नाहीं, हाच काय तो आचार्यांचा आग्रह आहे. या लोकांत दोन निष्ठा आहेत

एवढेंच श्रीकृष्ण सांगत नाहींत तर त्या दोन निष्ठांस दोन निरनिराळे अधिकारी आहेत असें सांगत आहेत. एकाच प्रकारच्या मनुष्याच्या दोन तुल्यबल निष्ठा आहेत असा अर्थ या श्लोकांतून कधींही निघणार नाहीं. अर्जुन ज्या अधिकाराचा असेल त्या अधिकाराप्रमाणें त्याची निष्ठा, म्हणजे कर्मयोग " कर्मण्येवाधिकारस्ते " असा स्पष्ट अधिकारनिर्देशहा भगवानानींच करून ती शंका दूर केली आहे. तूं जर उगीच ज्ञान्याचें सोंग आणून मनानें विषयचिंतन करीत कर्मसंन्यासाचा आव घालशील तर तो मिथ्याचार होईल. पुढें भगवानानीं शास्त्रोक्त कर्मांची उत्पत्ति व थोरवी वर्णन केली आहे. कर्मांची योग्यता सांगून पुढें याच अध्यायांत १७ व १८ या श्लोकांनीं भगवान् सांगत आहेत कीं, जो पुरुष आत्मरत व आत्मतृप्तिनानें तृप्त झाला व आत्मस्वरूपांत जो तल्लीन झाला त्याला कर्मविधि नाहीं, त्याला इहलोकीं कर्मांपासून कांहीं मिळावयाचें असत नाहीं किंवा कर्म न करण्यापासूनही त्याला कांहीं फायदा नाहीं. "तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर" "ज्ञानी लोकांना कांहीं करावयास नको म्हणून तूं कर्म कर" या वाक्याचा सरळ व समतोलपणाचा अर्थ म्हटला म्हणजे "ज्ञान्यास कर्मसंन्यास उचित आहे (परंतु तूं ज्ञानी नाहींस) म्हणून तूं कर्मे केलींच पाहिजेस." परंतु रहस्यकारांना हा सरळ अर्थ सम्मत नाहीं, त्यांच्या मतें अर्जुन ज्ञानीच आहे. असो. हे दोन श्लोक भगवानांचा आशय खुला करून सांगत आहेत. अर्जुनाचा अधिकार कर्मे करण्याचा खरा, परंतु श्रीकृष्ण त्याला हींच कर्मे अबंधक व मोक्षदायक कशीं करतां येतील याबद्दल उपाय सांगत आहेत. तो उपाय म्हटला म्हणजे " संग-रहित, फलाकांक्षारहित, समचित्तानें कर्मे करणें ". कदाचित् अर्जुन म्हणेल कीं, अशा कर्मांत मला जर गुंतवून ठेविलेंस तर मला सत्यज्ञान होऊन मोक्ष कसा मिळेल ! यास भगवान् सांगतात " असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः " असाच निष्कामकर्माचरणाचा मार्ग तूं स्वीकारल्यास तुला ज्ञानप्राप्ति होऊन मोक्ष मिळेल. तूं त्याबद्दल काळजी करूं नको. आतां म्हणशील "अशा निष्काम कर्माचरणानें कोणास ज्ञान झालें आहे?" तर ऐक:-जनक राजा ह्याच निष्कामकर्माचरणानें ज्ञानी झाला. जनक हा क्षत्रिय होता. अर्जुनही क्षत्रियच आहे. तेव्हां भगवानांनीं त्याला समर्पक दृष्टान्त दिला व कर्माचरण करण्यास सांगितलें. लोकसंग्रहाचें कर्तव्यही श्रीकृष्णांनीं त्याचे पुढें मांडलें, तसेंच आपलाही दाखला दिला. श्रीकृष्णाचा अवतार या लोकीं विशेष कारणाकरितां होता. तें अवतारकृत्य त्याला करणें भाग होतें. प्रत्येक जण जर असेंच म्हणेल कीं, "भगवानांनीं जर विशेष कार्याकरितां अवतार घेतला आहे तर आम्हींही वाघ, सिंह, माकड, घिसाडी, लोहार, कारकून, वकील इत्यादि व्यक्तींचे अवतार घेतले आहेत, तेव्हां तीं तीं कामें केल्याशिवाय अथवा असेंच वरचेवर अवतार (पुनर्जन्म) घेऊन अशींच कर्मे केलीं नाहींत तर भगवानासारखे आपण वागलों नाहीं असें होईल" असा त्या स्या

व्यक्तींनीं आग्रह धरल्यास मोक्षाची अपेक्षा करणें अगदीं गैर होईल. अर्जुनाचें इहलोकींचें कर्तव्य भगवानास स्पष्ट दिसत होतें, तेव्हां तें पुरें केल्याशिवाय त्याची सुटकाच होण्याजोगी नव्हती; म्हणून भगवानांनीं त्यास मोक्षोपाय म्हणून निष्काम कर्माचरण अथवा क्षत्रियोचित कर्मसंन्यासमार्ग सांगितला. ज्याला लोकसंग्रह करावयाची इच्छा आहे (चिकीर्षुः), त्यानें कर्माचरण केलेंच पाहिजे. वाचकहो, या ठिकाणीं कोणत्याही टीकेची मदत घेतल्याशिवाय २५ व २६ श्लोक वाचा. लोकसंग्रहचिकीर्षूनें अज्ञजनासारखें कर्म करीत रहावें, (परंतु ज्याला लोकेषणेची चाड नाहीं त्यानें काय करावें ! असा प्रश्न उत्पन्न झाल्यास त्याचें उत्तर काय ! अर्थात् त्यास कर्माचरणाची जरूर नाहीं). कर्मसंगी अथवा कर्मयोगपक्षपाती जे अज्ञ आहेत त्यांचा मतिभेद करूं नये, कारण तसा त्यांचा अधिकार नसतो. त्यांनीं कर्म सोडल्यास अनर्थ होईल, ज्ञान बाजूसच राहील व विहितकर्माचरणासही ते मुकतील. यांत भगवानांनीं कोणासही फसविलें नाहीं. रहस्यकारांना त्याबद्दल काळजी वाटण्यास नको आहे. रहस्यकार म्हणतात " कर्मसंन्यास " हाच जर श्रेष्ठ असें भगवंतास वाटत होतें, तर लोकांना आडवाटेस नेण्याचा मार्ग ते सांगतेना. आम्ही म्हणतों कीं, भगवान् फसवीत तर नाहींतच; परंतु उलट लोकांनां ते योग्य इषारा देत आहेत. नाहींतर अधिकार नसतांना या कलियुगांत लोक " नैष्कर्म्याचें" तत्त्व वारंवार ऐकून कर्में मात्र सोडतील व ज्ञान राहील बाजूसच. म्हणून लोकेषणा जागृत असणारांनीं लोकांना योग्य कर्ममार्गीतच दक्ष ठेवीत असावें. पुढील २७ व्या श्लोकांत पुन्हां भगवान् खडसून ताकीद देत आहेत " तत्ववित्तु...न सज्जते " तत्ववित् जो आहे, तो कर्माचरणास प्रवृत्त होत नाहीं. लोकसंग्रह करणाऱ्यानें कर्माचरण करावें व पुढें " तत्ववित्तु " यांत " तु " शब्दानें " उलटपक्षीं " असें समजावयाचें असतें, हें सर्वांनाच मान्य होईल, तेव्हां " परंतु तत्ववित् जो आहे तो कर्मांस सज्ज होत नाहीं " असें भगवान् सांगत आहेत. पुन्हां ३० वा श्लोक पहाः—" माझ्या ठिकाणीं मनोभावें कर्मसंन्यास कर व युद्धास ऊठ." २९ व्या श्लोकांत कर्माची निंदा करून पुढें या श्लोकानें संन्यासपूर्वक कर्म करण्यास भगवान् सांगत आहेत. तेव्हां भगवानांच्या हृदयांत " कर्मसंन्यास " इष्ट आहे हें समत्व बुद्धीनें ज्याचें त्यानेंच पाहून घ्यावें. पुन्हां एकवार येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, " युध्यस्व " " युध्यस्व " असें भगवान् कर्मसंन्यासं व सांख्ययोग सांगणाऱ्या श्लोकांतच कसें सांगत आहेत ही शंका घेण्याचें कारण नाहीं कारण अर्जुनानें आपल्या शिरावर युद्धाचें गांठोडें आधींच बांधून घेतलेलं होतें, तें गांठोडें त्यास इष्टस्थळीं नेणेंच भाग होतें. तें खालीं पडल्यावर मग दुसरें कर्माचें गांठोडें शिरावर घ्यावें कीं न घ्यावें, हा प्रश्न उपस्थित झाल्यास त्यावेळीं " युध्यस्व " असें सांगण्याचें प्रयोजनच नाहीं. अर्जुन हें

गांठोडें घेऊन युद्धास चालला आहे, भगवान् त्यास सांगतात " अरे तूं निघाला आहेस युद्धयामास व गोष्टी चालविल्या आहेस मोक्षगांवाच्या. हं चल पाय उचल, युद्धयाम आधीं गांठ व त्या मार्गांतच मोक्षमार्गाची आठवण ठेव. " शास्त्रांचेंही रहस्य हेंच आहे. आधीं दारापरिग्रह न करितां एकदम चतुर्थाश्रम घ्यावा, परंतु इच्छा अनावर असतील अथवा तो अधिकार नसेल तर त्यानें दारापरिग्रह करावा. परंतु अग्नि, ब्राह्मण, सूर्य या तिघांच्या समोर दाराप्रतिग्रह करून "धर्मे च अर्थे च कामेच नातिचरामि" अशा शपथा घेतल्यावर शास्त्र सांगेल " हं आतां दारापरित्याग करणें, तुला युक्त नाहीं. आतां तुला मोक्षच पाहिजे असें असल्यास तुला वाचाऋणांतून निष्कामकर्माचरणानेंच सुटका करून घेतली पाहिजे. " याप्रमाणेंच अर्जुन वाचादत्त झालेला आहे, आतां श्रेष्ठ अशा ज्ञानमार्गाच्या गोष्टी सांगण्यास तो अपात्र आहे. " युध्यस्व " " युध्यस्व " असें वरचवर भगवान् सांगत आहेत यांतील तात्पर्य हें आहे. असो. शेवटीं या कर्मयोग अध्यायांतच भगवान् आमची चतुःसूत्री सांगतातः-

" श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

पुढें अर्जुन विचारतोः-

मनुष्य पापाचरणास बळेंच इच्छा नसतांनाही कां प्रवृत्त होतो ?

भगवान् त्यास यथोचित उत्तर देऊन म्हणतात " जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् " (हे महाबाहो, ह्या कामरूपी शत्रूला तूं आधीं नाहींसा कर) म्हणजे अर्जुन ज्ञानी व अधिकारी असता तर हा प्रश्न व हें उत्तर संभवत होतें काय ! याचा वाचकांनींच विचार करावा. पुढें चवथ्या अध्यायांत भगवान् म्हणतात हा कर्मयोग अथवा प्रवृत्तिमार्ग आपण विवस्वानास सांगितला होता. पुढें त्यानें (विवस्वानानें) मनूस सांगितला. सारांश, हा मार्ग राजर्षींचा आहे (क्षत्रियांचा आहे). " इमं राजर्षयो विदुः " हें वाक्य महत्वाचें आहे. असो, पुन्हां अर्जुन विचारतो "तुमचा जन्म आतांचा, विवस्वानाचा पुरातनचा, तेव्हां आपण हा धर्म विवस्वानास सांगितला हें संभवेल कसें " वाचकहो, हाच तो रहस्यकारांचा ज्ञानसंपन्न अर्जुन ! ! असो, भगवान् या प्रश्नास यथोचित उत्तर देतात, "माझे अवतार या भूतलीं फार झाले आहेत, अधर्माची प्रवृत्ति होऊन धर्म नष्ट होण्याचा समय आला म्हणजे, मी मुद्दाम अवतार घेत असतों. हें जें दिव्य कर्म व दिव्य अवतार यांना जो कोणी याथातथ्य जाणतो तो फिरून जन्मास येत नाहीं." परंतु रहस्यकार म्हणतात, " आम्हीं श्रीकृष्णासारखे वरचेवर जन्म घेऊन दुष्टांचें खंडन व सुष्टांचें पालन केलें पाहिजे " श्रीकृष्ण तर म्हणतात, तत्त्वज्ञास जन्म नाहीं तेव्हां रहस्यकारांचें रहस्य पाळणें झाल्यास मनुष्यानें तत्त्वज्ञ होतां कामा नये. कारण श्रीकृष्णासारखें त्यानें वागलें पाहिजे, परंतु तत्वज्ञ झाल्यावर

हें होणें शक्य नाहीं. असो, अर्जुन तर आमच्या मतें व श्रीकृष्णाच्या मतानें अज्ञ आहे, निदान भगवद्गीतेंत तरी त्यास मोह, अहंकार व अज्ञान या तिन्ही दोषांचा भागीदार केलें आहे हें सिद्ध आहे. तेव्हां अशा अर्जुनास कर्माचरणच विहित आहे हेच खरें, परंतु त्याला वाटेल कीं, असें गौण कर्माचरण श्रीकृष्णानें आपणास करावयास सांगावें हें चांगलें नाहीं, म्हणून श्रीकृष्ण त्याची समजूत घालतात, "एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि **मुमुक्षुभिः** " " कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् " या श्लोकांतील " मुमुक्षु " शब्द वाचून रहस्यकार जागे होतील काय ! ' मुमुक्षुभिः कर्म कृतं " मुमुक्षूनीं कर्मच केलें आहे. तूं मुमुक्षु आहेस तस्मात् तूंही कर्मच कर. रहस्यकार या स्पष्ट वचनानें, अर्जुनाच्या अधिकाराबद्दल अगदीं निरुत्तर झाले पाहिजेत. असें आम्हांस तर वाटतें. पहावें एवढें आमचें भाग्य आहे का ! पुढें भगवान् ज्ञान्याचें शारीरकर्म सांगतात. शारीरं, नव्हे, शारीरं केवलं कर्म करण्यानें ज्ञान्यास अपाय होत नाहीं. केवळ शारीर कर्म करण्यापासून अपाय नाहा, म्हणजे इतर शास्त्रीय कर्म करण्याची त्यास अवश्यकता नाहीं हें स्पष्ट होत आहे. पुढें नानाविध यज्ञाचे प्रकार भगवान् सांगतात व म्हणतातः—

" श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञानं परिसमाप्यते ॥

ह्या श्लोकांनीं भगवानांनीं तर आपला ज्ञानपक्षपात अथवा कर्मसंन्यास पक्षपात पुरा व्यक्त केला आहे. असले श्लोक पाहून रहस्यकारांना काय बरें वाटत असेल ! एकदां वाटत असेल कीं असले श्लोक गीतेंत नसते तर बरें झालें असतें. परंतु या गोष्टीस त्यांचा निरुपाय आहे. एकदां वाटत असेल " असेनात बिचारीं असलीं वचनें. माझ्या लोकप्रियतेपुढें श्रीकृष्णाच्या लोकप्रियतेची मातब्बरी नाहीं. तेव्हां अशा वचनांची वाट आपल्या " कौशल्यानें " " युक्तीनें " कशीतरी लाविली पाहिजे " असो. या श्लोकाची वाट त्यांनीं आपल्यापरी लाविलीच आहे. ते म्हणतात (पा० ६८१) " हा ज्ञानयज्ञ मोक्षप्रद होतो. म्हणून यज्ञ करा, पण ते ज्ञानपूर्वक निष्काम बुद्धीनें करा असा गीतेचा अभिप्राय आहे. " वाचकहो कोण हा बौद्धिक जुलूम केला आहे हें नीट पहा. श्रीकृष्णांनीं आपल्याकडून शब्दाची योजना निःशंक रीतीनें केली आहे म्हणून बरें आहे; नाहींतर सर्वच या " युक्तीस " अथवा जबरदस्तीस बळी पडते. श्रीकृष्ण म्हणतात. "कर्म ज्ञाने परिसमाप्यते " कर्म ज्ञानांत समाप्ति पावतें. " परिसमाप्यते " म्हणजे ज्ञानानंतरही तें केलें पाहिजे असा रहस्यकारांचा जुलूम कां ! कर्म संपतें असें श्रीकृष्ण सांगत असून रहस्यकार या " संपणें " या शब्दांतून " ज्ञानानंतर शिल्लक राहातें " हा शेषार्थ कसा काढतात कोण जाणें. पुढें भगवान् ज्ञानास गुरूची अपेक्षा सांगतात. भगवानापुढें तर आम्हीं आतां हात टेंकले ! पुन्हां ३७ व ३८ श्लोकांत मुद्दां ज्ञानमार्गावर ते पूर्ण लुब्ध दिसतात,

याला काय करावें ? " ज्ञानानें कर्माचें भस्म होऊन जातें " म्हणजे कांहीं शिल्लक उरत नाहीं असें म्हणतात तसेंच ' ज्ञानाप्रमाणें पवित्र असें कांहीं नाहीं. योगानें (रहस्यकारांच्या कर्मयोगानें) हें ज्ञान कालांतरानें होतें, " या श्लोकांवर रहस्यकारांनीं बरीच मुग्धता ठेविली आहे. असो. भगवान् तर आपल्याकडून वरचेवर संन्यासमार्गीयांकडे घसरत आहेत; परंतु आमचे रहस्यकार त्यांना वरचेवर आपल्या प्रचंड समर्थ्यानें आपल्याकडे ओढूं पाहात आहेत. असो. भगवान् चवथ्या अध्यायाच्या शेवटीं अर्जुनास म्हणतात " **अज्ञानामुळें** " उत्पन्न झालेला तुझा संशय हें ज्ञानखड्ग घेऊन नाहींसा कर व योगाचा आश्रय करून युद्धास ऊठ. पांचव्या अध्यायाच्या आरंभास अर्जुन म्हणतोः-कर्मसंन्यासाचीही तूं प्रशंसा करतोस व कर्मयोगाचीही स्तुति करतोस तेव्हां यांपैकीं श्रेयस्कर असा एक मार्ग मला सांग. वाचकहो, येथपर्यंत अर्जुनही स्वतः श्रीकृष्णास संन्यासपक्षीयच समजत आहे हें उघड आहे. कारण श्रीकृष्णाच्या तोंडून संन्यासपक्षाचें मंडन सहजगत्या वारंवार येऊन गेलें आहे हें अर्जुनासही मान्य आहे; परंतु रहस्यकारांना तसें मान्य नसल्यास नसो. आतां भगवान् या प्रश्नास उत्तर देत आहेत, " कर्मसंन्यास व कर्मयोग दोन्ही श्रेयस्कर मार्ग आहेत; परंतु संन्यासापेक्षां कर्मयोग विशेष महत्वाचा आहे " ह्या श्लोकावर रहस्यकारांचा फार भर आहे. धर्मानभिज्ञ अशा भाविक वाचकांच्या मनःपटावर, हा श्लोक वारंवार त्यांनीं आपल्या वाणीच्या प्रखर तेजाच्या साहाय्यानें, पाडण्याचा यत्न केला आहे, व हें साहाजिकच आहे; कारण या श्लोकानें भगवानांनीं आपला कर्मयोगपक्षपात पूर्ण व्यक्त केला आहे. असला महत्वाचा श्लोक रहस्यकारांच्या तावडींतून निसटून जाणें शक्यच नव्हतें. वाचकहो जरा धीर धरा. ह्या श्लोकाची संगति अगदीं संन्यासपरच लागत आहे, किंवा नाहीं हें पहा. या श्लोकाच्या पुढील दोन श्लोक संन्यास व योग ह्या दोन्ही मार्गांचें तुल्यफलत्व दाखवीत आहेत. सांख्य व योग यांत तारतम्य करणारा " बाल " म्हणजे मूर्ख होय असें भगवान्च म्हणतात असें असून आपणच वरील श्लोकांत " कर्मयोगो विशिष्यते " असें म्हणतात. यावरून आपणच स्वतः या दोहींत तारतम्य करतात व " बालत्व " दोषास पात्र करून घेतात असें होत आहे; परंतु असें कदापि म्हणतां येत नाहीं, कारण श्रीकृष्णांनीं आपण होऊनच या " विशेषाचें " कारण दिलें आहे. यालगतच जो पुढें श्लोक घातला आहे त्यावरून या तारतम्याचा उलगडा स्पष्ट होत आहे.

" संन्यासस्तुमहाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥

हा श्लोक पुढें वाचकांच्या दृष्टीं पडेल ही कल्पना रहस्यकारांच्या मनांत आली नसेल हें संभवत नाहीं. या श्लोकांत भगवंतांनीं " कर्मयोगो विशिष्यते "

असें म्हणण्याचें कारण देऊन टाकलें आहे. असें असतांही शेवटीं त्यांना गोते खावयास रहस्यकारानीं लाविलें आहे. ते म्हणतात "अर्जुना, कर्मयोग साध्य झाल्याशिवाय संन्यास योगाची वार्ता कोठून येणार बाबा ! योगयुक्त होशील तेव्हां मग थोड्याच अवकाशानें तूं ब्रह्मज्ञानी होशील म्हणजे संन्यासमार्गारूढ होशील." अर्जुनाचा अधिकार जाणूनच कर्मयोगाची महति भगवंतानीं त्याच्या पुढें गाइली आहे. तथापि असें करतांनाही आपला मुद्दा भगवंतानीं सोडला नाहीं "योगाशिवाय संन्यास दुर्लभ" असें संन्यास-श्रेष्ठत्व त्यानीं यांतही ठेवून दिलें आहे. अज्ञास श्रेष्ठ मार्ग कर्ममार्गच होय हें कोणींही सांगेल. पुढें याच अध्यायांत योग्यांनीं कर्मेंच कां करावीत हें सांगतात. आत्मशुद्धि अथवा चित्तशुद्धि करण्याकरितां योगी कर्मे करीत असतात (आत्मशुद्धये). पुढें याच अध्यायांतील ३८ वा श्लोक रहस्यकारांच्या कर्मयोगास अत्यंत प्रतिकूल आहे. सर्व ठिकाणीं समदर्शी झाल्यावर "घटासि आणावा घट" ह्या सूत्राचा अवलंब करण्यास अवसरच रहात नाहीं.

सहाव्या अध्यायांत प्रारंभींच भगवान् म्हणत आहेत कीं, संन्यास तोच योग, कारण 'संन्यस्त संकल्प' झाल्याशिवाय योगीच होत नाहीं. म्हणजे योगाच्या आरंभीं व अंतीं संन्यासच आहे. आतां यापुढील श्लोक फारच महत्वाचा आहे. सांप्रदायिक पद्धतीस अनुसरून अर्थाची ओढाताण कधी करीत असतात याचा उत्कृष्ट मासला पुढील श्लोकांत पाहावयास मिळेल. कर्मयोगसांप्रदायी रहस्यकार या श्लोकाचा अर्थ असा करितात "जो (कर्म) योगारूढ होऊं इच्छितो त्या त्या मुनीस कर्म हें (शमाचें) कारण म्हणजे साधन म्हटलें आहे, आणि तोच पुरूष योगारूढ म्हणजे पूर्ण योगी झाला म्हणजे त्यास (पूर्वी) शम हें (कर्माचे) कारण होतें, असें म्हणतात" (पा० ६९४) ह्या अर्थांत कर्म हें शमाचें कारण म्हणजे साधन आहे असें रहस्यकार म्हणतात. या श्लोकार्धाचा अन्वय असा आहेः—

"योगं आरुरुक्षोः मुनेः कारणं कर्म उच्यते" याचा शब्दशः सरळ अर्थ "योगारूढ होऊं इच्छिणाऱ्या मुनीला कर्म हें साधन आहे" असा होतो. ह्यांत मध्येंच "शमाचें" हें पद कोठून आलें ? "योगारूढ होण्यास साधन कर्म" असा अर्थ संपूर्ण अनपेक्षतेनें होत असतां "शमस्य" हें पद जुलमानें मध्येंच कां येतें ! योगारूढ होण्यास व शमास साधन असें कोणाच्या पदरचें आणावयाचें ! "योगारूढ होण्यास साधन कर्म व तोच मुनि योगारूढ झाल्यावर त्याचें साधन शम हें आहे" असा सर्व श्लोकाचा सरळ अर्थ आहे. योगारूढ झाला म्हणजे पूर्ण ज्ञानी झाला असं होत नाहीं. योग हा ब्रह्मप्राप्तीस साधन आहे. हें मार्गे सांगितलेंच आहे. योगारूढ झाल्यावर मोक्षप्राप्ति होण्यास साधन कर्मसंन्यास होय. रहस्यकारांनीं उगाच हजारों काल्पनिक शंका उत्पन्न करून आकांडतांडव केलें आहे व आपलें "अन्योन्यालंकार" अथवा "अर्थचमत्कृतीचें" चक्राकार कोडें (Argument in a circle) वाचकांच्या गळ्यांत घातलें

आहे. आचार्यही या श्लोकाचा सरळ अर्थ करीत आहेत, व त्या अर्थास व्यासांचीच पुष्टि देत आहेत.

नैतादृशं ब्राह्मणस्यास्ति वित्तं यथैकता समता सत्यताच ।
शीलं स्थितिर्दण्ड निधानमार्जवं ततस्ततश्चोपरमः क्रियाभ्यः ॥

पुढच्याच श्लोकांत भगवान् योगारूढाचें साधन सांगतातः-"न कर्मण्वनुषज्यते" "सर्वसंकल्पसंयासी" या योगारूढाच्या कृतीवरून तरी "शम" शब्दानें काय समजावयाचें तें भगवानांस तरी रहस्यकारांनीं विचारावयाचें होतें. असो. सारांश, भगवानांच्या मतें "कर्मास आरंभ केल्याशिवाय नैष्कर्म्य स्थिति येत नसते." (न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते) हा सिद्धान्त वारंवार मनावर ठसविल्याशिवाय आपला उपदेश पूर्णपणें सिद्धीस गेला असें होत नाहीं, हें उघड त्यांना दिसत आहे. म्हणूनच ते वारंवार सांगत आहेत कीं, अर्जुना, कर्मयोग ही पहिली पायरी आहे, ही ओलांडल्याशिवायाच वरील व श्रेष्ठ कर्मसंन्यासाची पायरी दुर्लभ आहे म्हणूनच तश्चासारख्या साधनपरंपरेच्या तळीं असणारास कर्मयोगाचीच पायरी श्रेष्ठ आहे.

पुढें सहाव्या अध्यायांत "योग" म्हणजे पातंजलयोगच स्पष्टपणें सांगितला आहे; व त्यांत दहाव्या श्लोकांत "योग्यानें सतत एकलकोंडें अभ्यासांत राहिलें पाहिजे" असें सांगितलें आहे. (रहस्यकार म्हणतात असें भगवद्गीता सांगत नाहीं. नशीब त्या गीतेचे व वाचकांचें!!) हा एकलकोंडेपणा व लोकसंग्रहत्याग हें भगवानांनीं या अध्यायांत अनेकदां सांगितले आहेत, हें मागें आलेलेंच आहे. भगवानांनीं हा योग सांगितला तेव्हां अर्जुनानें विचारलें "देवा माझें चित्त चंचल आहे तेव्हां हा योग मला कसा सुकर होईल? कृष्णांनीं त्याला उत्तर दिलें कीं, अभ्यासानें सर्व साध्य होत असतें. पुढें अर्जुन कर्मयोग व युद्ध सोडून धर्मजिज्ञासु शिष्यासारखा प्रश्नावर प्रश्न करीत सुटला आहे "देवा, श्रद्धा आहे परंतु मनाच्या चांचल्यानें योग सिद्ध होत नाहीं अशा माणसाची वाट काय?" तेव्हां कृपाळू श्रीकृष्ण भक्तिमार्गाचा उपदेश करते झाले. अर्जुनाचा अधिकार भक्तियोगाचाच आहे असें गृहीत धरून भगवान् भक्तियोग सांगूं लागले. या भक्तियोगावर श्रीकृष्णांनीं यापुढें आपला उपदेश वळविला आहे. योग साध्य होत नसल्यास माझ्या ठिकाणीं श्रद्धा ठेव, अनन्य भक्ति ठेव म्हणजे तूं कृतकार्य होशील. ह्या सातव्या अध्यायांत भक्तियोगाचें सोपपत्तिक विवेचन श्रीकृष्णांनीं केलें आहे. व जन्ममरणपरंपरेपासून सुटका करून घ्यावयाची असल्यास साधकानें माझ्या भक्तिचा आश्रय करावा म्हणजे त्यास ब्रह्मप्राप्ति होईल (अ० ७ श्लो० २९). असें श्रीकृष्ण सांगतात. पुढें आठव्या अध्यायाच्या आरंभीं "कर्मयोग" अथवा "उपक्रमोपसंहार" विसरून जाऊन व रहस्यकारांच्या प्रतोदासही

न जुमानून अर्जुन "ब्रह्म म्हणजे काय, अध्यात्म म्हणजे काय, इ० इ०" भराभर प्रश्न विचारीत सुटला आहे. भगवान् ह्या प्रश्नांना यथोचित उत्तरें या अध्यायांत देत आहेत व हीं उत्तरें सर्व देऊन झालीं नाहींत म्हणून नवव्या व दहाव्या अध्यायांतील कांहीं भाग त्याच उत्तरांकरितां उपयोगांत आणले आहेत. अर्जुनाच्या या प्रश्नांत कर्मयोगाचें नुसतें नांव सुद्धां नाहीं. असो. पुढें दहाव्या अध्यायांत अर्जुनानें पुन्हां विचारिलें कीं "देवा मी तुला कोणत्या उपायांनीं जाणीन ? देवा तुझा योग व विभूति मला सांग." या प्रश्नांस भगवानानीं दहाव्या अध्यायाच्या शेवटापर्यंत उत्तर दिलें आहे. नंतर अर्जुनास श्रीकृष्णाचें विश्वरूप पाहाण्याची इच्छा झाली. तीही श्रीकृष्णांनीं तृप्त केली, व सांगितलें "अर्जुना, हें विश्वरूपदर्शन वेदाध्ययनानें, दानानें, कर्मयोगानें किंवा तपानें पहावयास मिळणार नाहीं. केवळ तुलाच तें पाहावयास मिळालें, कारण तूं माझा परमभक्त आहेस" नंतर बाराव्या अध्यायाच्या आरंभीं अर्जुन विचारतो, तुझ्या अनेक प्रकारच्या भक्तांत श्रेष्ठ भक्त कोण!

"तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित्।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः॥"

या ठिकाणीं येशूख्रिस्तासारखी रडवी नीति भगवान् सांगत आहेत. परंतु यास आमचा नाइलाज आहे. रहस्यकारांना हा श्लोक वाचून अत्यंत खेद होईल. कारण त्यांच्या खणखणीत मोक्षास हा उपदेश साजत नाहीं. पुढें तेराव्या अध्यायापासून भगवान् ज्ञानाचें विवेचन करीत आहेत. तेराव्यांत क्षेत्र व क्षेत्रज्ञ विभाग सांगितला किंवा नित्यानित्य विवेक कथन केला. चवदाव्या अध्यायाच्या आरंभींच भगवान् आपण ज्ञान सांगत आहों असें म्हणत आहेत, व त्याप्रमाणें चवदा, पंधरा व सोळा या अध्यायांत सोपपत्तिक ज्ञान सांगत आहेत. रहस्यकारांना पूर्वाचार्यांनीं हा केलेला विभाग मान्य नाहीं; म्हणजे कर्म, भक्ति व ज्ञान या तिहींचें सोपपत्तिक विवेचन गीतेंत केलें आहे हा सिद्धान्त मान्य नाहीं. नसो. भगवानूच "भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्" अशी प्रतिज्ञा करून पुढील अध्याय सांगत आहेत. परंतु रहस्यकारांचें कर्मयोगाचें घोडें जेथें तेथें जाऊंच पाहात आहे. असो, सतराव्या अध्यायाच्या प्रारंभीं अर्जुन विचारतो "अशास्त्रीय परंतु श्रद्धायुक्त लोकांची काय वाट ?" या प्रश्नास जबाब दिल्यानंतर अर्जुन "संन्यास व त्याग" याबद्दल शंका विचारतो, त्यासही उत्तर देऊन भगवान् अर्जुनाचें समाधान करितात, व आम्हीं मागें दिलेल्या चतुःसूत्रीचा पुन्हां एकदां अनुवाद करितात.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।
स्वभाव-नियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥

उपक्रम लढाईचा. मध्यंतरीं अर्जुन ब्राह्मणाच्या भिक्षाधर्माचा स्वीकार करण्यास तयार झाला, त्याला पुन्हां ज्ञानोपदेश करून अथवा सद्धर्म सांगून परधर्मापासून पराङ्मुख केलें, हें तात्पर्य दाखविण्याकरितां पुन्हां हा श्लोक सांगितला. पुढें ५०।५१।५२।५३ या श्लोकांनीं संन्यासमार्गाची महती व फल सांगून भक्तियोगोपदेशाचा भगवानांनीं कळस चढविला व ह्या धर्म्य संवादाचें जो अध्ययन करील त्यानें ज्ञानयोगानें-कर्मयोगानें नव्हे-माझें यजन केलें असें होईल अशी श्रीकृष्णांनीं प्रतिज्ञा केली.

१८ उपसंहार.

न शब्दशास्त्राभिरतस्य मोक्षो न चैव रम्यावसथ प्रियस्य ।
न भोजनाच्छादनतत्परस्य न लोकचित्तग्रहणे रतस्य ॥
एकान्तशीलस्य दृढव्रतस्य मोक्षो भवेत्प्रीतिनिवर्तकस्य ।
अध्यात्मयोगैकरतस्य सम्यङ् मोक्षो भवेन्नित्यमहिंसकस्य ॥

आपस्तंबस्मृति. अ० १० श्लो० ७।८.

वर दिलेल्या आपस्तम्ब स्मृतींत मोक्ष कोणास होतो व कोणास होत नाहीं याबद्दल विवेचन आहे. ज्यास मोक्ष होत नाहीं अशी स्मृति सांगते त्यास मोक्ष सुलभ करून देण्याचें काम रहस्यकारांनीं अंगावर घेतलेलें आहे. स्मर्तींतील शब्दप्रयोग फार सुलभ व सर्वांना समजण्याजोगाच आहे. पहिला श्लोक मोक्ष कोणास होत नाहीं हें सांगतो व दुसरा कोणास होतो हें सांगतो. पहिल्या श्लोकांत तुष्टि, पुष्टि **लोकसंग्रह** इत्यादींची चाड असणाऱ्यास मोक्ष नाहीं असें म्हटलें आहे व दुसऱ्या श्लोकांत संन्यासमार्गीयासच मोक्ष होतो असें म्हटलें आहे. ही स्मृति रहस्यकारांना मान्य आहे म्हणून तिचें अवतरण आम्ही येथें देतों असें कोणीं समजूं नये. कारण संन्यासमार्गीय वचनें श्रुतींत, स्मृतींत व पुराणांत नाहींत असें ते म्हणत नाहींत. उलट तशीं वचनें असूनही प्रवृत्तिपर अथवा कर्मयोगपर वचनें या ग्रंथांतून आढळतात; परंतु या दोन विरुद्ध वचनांमधून जास्त ग्राह्य वचनें कोणतीं हें पहाणें झाल्यास गीताग्रंथाकडे पहावें म्हणजे या ग्रंथांत कर्मयोगच श्रेष्ठ आहे असें मानलेलें आहे असें दिसून येईल असें त्यांचें म्हणणें आहे. म्हणजे गीताग्रंथ हा धर्मोत्क्रांतिमय ग्रंथ आहे असा त्यांचा अभिप्राय आहे. आतां रहस्यकारांचा कर्म, कर्मसंन्यास, ज्ञान, संन्यासमार्ग, वर्णाश्रमधर्म, वेदांचें अपौरुषेयत्व इत्यादि विषयांसंबंधीं खरा अभिप्राय काय आहे ! हें सांगणें तितकेंसें सोपें नाहीं; कारण कित्येक ठिकाणीं वरील प्रश्नांबद्दल मोठा गौरवयुक्त निर्देश केलेला आढळतो तर कित्येक ठिकाणीं त्यांच्याबद्दल औदासीन्ययुक्त किंवा निंदायुक्तही निर्देश आढळतो. कान्ट साहेबांनीं उत्तरवयांत जे ग्रंथ लिहिले त्या ग्रंथांबद्दल अशाच तऱ्हेची पंडितांची समज झालेली आहे. असें सांगतात कीं Kant साहेबांचे सहाध्यायी Wlömer त्यांना भेटण्याकरितां आल्यावेळीं Kant साहेबांनीं विचारलें " कायहो, तुम्हास आमचे ग्रंथ वाचण्यास फुरसत मिळाली काय ? " यावर Wlömer साहेब म्हणालेः- " अलबत. आपले ग्रंथ मोठ्या आनंदानें वाचले असते; परंतु माझ्या हातास बोटें फक्त दहाच आहेत." या सार्थ परंतु लाक्षणिक उत्तराचा अभिप्राय लक्षांत न आल्यामुळें कान्टसाहेब

म्हणाले " म्हणजे काय !" याला उत्तर असें मिळालें " आपल्या सिद्धान्तास उपसिद्धान्त व अपवाद इतके आहेत कीं, त्या त्या ठिकाणीं बोटें ठेवून ते लक्षांत ठेवण्याचा यत्न करूं लागलों परंतु थोड्याच वेळांत हातांचीं बोटें संपलीं ! ! त्या-प्रमाणेंच या ग्रंथाची स्थिति झाली आहे. वेद पौरुषेय आहेत असें कोठेंच ग्रंथांत म्हटलें नाहीं, तथापि ग्रंथांतील आशय मात्र उघड तसाच आहे. श्रुतीस अप्रामाण्य आहे असें कोठें ग्रंथांत धैर्यानें म्हटलेलें नाहीं; परंतु फलतः तोच अभिप्राय वारंवार वाचकांच्या मनावर बिंबल्याशिवाय रहात नाहीं. शास्त्रीय व वर्णाश्रमविहित कर्मांब-द्दल अत्यंत आदरयुक्त भाषा वापरण्यांत आली आहे; परंतु मधून मधून त्या दोहींतही विशेष तथ्य नाहीं असाही उल्लेख सांपडतो. असे अनेक प्रसंग या ग्रंथांत आढळून येतील. असो. लोकरंजनाची गोड पुटी प्रत्येक नव्या सिद्धांतास देऊन ते सिद्धान्त अचुक लोकांच्या घशांत उतरतील अशा तऱ्हेच्या अत्यंत कौशल्यानें या ग्रंथाची रचना झाल्यामुळें रहस्यकारांच्या योग शब्दाच्या अर्थानुरूप भाषा वापरावयाची झाल्यास हा ग्रंथ अत्यंत योगारूढ (युक्ति अगर कौशल्यारूढ) चित्तानें लिहिला गेला आहे असें म्हणणें गैरवाजवी होणार नाहीं. रहस्यकारांनीं इषारा दिल्याप्रमाणें आम्हीं गीताग्रंथ टीकेच्या मदतीशिवाय वाचून पाहिला; परंतु या ग्रंथाचें श्रुतिमूलत्व व संन्यासपक्षपातित्व आमच्यापुढें दत्त म्हणून वारंवार उभें राहूं लागलें व त्यांत या नवीन कर्मयोग सांप्रदायाची नुसती छाया सुद्धां दिसून येईना, त्यास आमचा नाइलाज झाला. फिरून फिरून प्रयत्न केला परंतु तोही निष्फळ झाला ! इतकेंच नव्हे तर रहस्यकारांना वेदान्तशास्त्राचें खरें रहस्यच समजलें नाहीं अशी मनाची खात्री झाली व ही खात्री इतकी दृढावली कीं, त्यांच्या लोकप्रियतेची भीड व भीति मनांत न बाळगतां त्यांनीं केलेल्या " चापलाचें " आविष्करण यथाशक्ति करावें असें मनानें पक्कें घेतलें. येथें हें सांगणें अवश्य आहे कीं " हा ग्रंथ अमुक व्यक्तीनें लिहिला म्हणून तो त्याज्य " अशा तऱ्हेच्या वैयक्तिक असूया, मत्सर अगर द्वेष या विकारास बळी पडून आम्ही हा ग्रंथ त्याज्य म्हणत नाहीं. कारण या विकारांस थारा मिळण्यास ग्रंथकारांचा व आमचा सामाजिक, राजकीय, औद्योगिक वगैरे बाबतींत कधीं तरी परिचय झाला पाहिजे होता. परंतु या बाबीं-तील आमच्या अत्यंत मुग्धतेमुळें तो परिचय होणें शक्यही नव्हतें. रहस्यकारांची व आमची अद्यापि नुसती ओळख सुद्धां नाहीं. असणार कशी ? त्यांचे व्यवसाय, त्यांचें व्यावहारिक पांडित्य, त्यांचें ग्रंथावलोकन, त्यांचे स्नेह, सारांश, त्यांचें सर्व प्रापंचिक क्षेत्र हें आमच्या प्रापंचिक क्षेत्रापेक्षां फारच उच्च दर्जाचें असल्यामुळें अशा थोर पुरुषाची व आमची गांठ पडण्याचा योग तरी कसा यावा ? तात्पर्य हें कीं, कोणत्याही वैयक्तिक मात्सर्यानें हें रहस्यखंडनाचें काम आम्ही हातीं घेतलेलें नाहीं. केवळ धार्मिक अगर पारमार्थिक कर्तव्य म्हणूनच तें आम्हीं पत्करलें आहे. सूतसंहितेंत ज्ञानयोगखंडांत विसाव्या अध्यायांत वचन आहेः—

स्थापयध्वमिमं मार्गं प्रयत्नेनापि हे द्विजाः ।
स्थापिते वैदिके मार्गे सकलं सुस्थितं भवेत् ॥ ५४ ॥
योहि स्थापयितुं शक्तो न कुर्यान्मोहतो नरः ।
तस्य हन्ता न पापीयानिति वेदान्तनिर्णयः ॥ ५५ ॥
यः स्थापयितुमुद्युक्तः श्रद्धयैवाक्षमोपि सः ।
सर्वपापविनिर्मुक्तः साक्षाज्ज्ञानमवाप्नुयात् ॥ ५६ ॥

भावार्थः–द्विजहो, अत्यंत प्रयत्नानें कां होईना, तुम्ही या मार्गाचें (वैदिक-मार्गाचें) स्थापन करा. वैदिक अथवा सनातन धर्ममार्ग जर व्यवस्थित राहील तर सर्व सुस्थित होईल. अंगांत सामर्थ्य असून जर मोहानें ह्या मार्गाची स्थापना करण्यास कोणी मागें घेईल तर त्याचा खून केल्यास त्यापासून पाप लागणार नाहीं (इंडियन पीनल कोडांतील शिक्षा नव्हे). बरें ज्याच्या अंगांत असा वैदिक धर्म-स्थापना करण्याचें सामर्थ्य नाहीं त्यानें सुद्धां श्रद्धेनें हें काम सुरू केल्यास तो पापापासून मुक्त होऊन साक्षात् ज्ञानवान् होतो.

या वचनावर विश्वास ठेऊन अंगीं सामर्थ्य नसतांही केवल जगद्गुरूच्या चरण-कमलावर श्रद्धा ठेवून या पवित्र कार्यास आरंभ केला व त्या चरण–नौकेच्या आश्रयानेंच या उपसंहाररूपी परतीरास आम्ही येऊन पोंचलों. हें रण आम्हीं कोणाशीं मांडलें आहे याची आम्हांस पूर्ण जाणीव आहे. परंतु हें रण ज्या क्षेत्रावर आहे तें धर्मक्षेत्र आहे, तेव्हां या क्षेत्रावर रहस्यकारांच्या अत्यंत प्रागतिक अशा शस्त्रास्त्रांस आम्हीं मुळींच भीत नाहीं. आम्हांपाशीं जों-पर्यंत आचार्यांसारख्या वेदान्तवीराचीं अत्यंत प्रखर तपोबलानें निशित केलेलीं अस्त्रें, ब्रह्मास्त्रें आहेत तोंपर्यंत रहस्यकारांसारख्या अमित कर्मयोगसांप्रदायिकांना आम्ही मुळींच डरत नाहीं. मग हें रण केवल धर्मशास्त्ररूपी भूमीवर चालो अथवा आधिभौतिक शास्त्ररूपी जलपृष्ठावर चालो किंवा केवल तात्विक ज्ञानरूपी नभो-मंडलांत चालो, जोंपर्यंत आम्हांस श्रीचरणांचा रथ, नौका व आकाशयान ह्यां-सारखा उपयोग होत आहे तापर्यंत लोकसंग्रहासारख्या अवचट नौकावरणास अथवा कौशल्यरूपी नौकानयनास किंवा अचुक शब्दसंधानासारख्या विनाशक शस्त्रक्षेपास आम्ही मुळींच कचरत नाहीं. येथें कोणी म्हणल कीं, आतां कोठें या बौद्धिक रणास तोंड लुकतें पडलें आहे तोंपर्यंत ह्या वल्गना कशास हव्यात ? बरोबर आहे. परंतु आमची ही सर्व बढाई ब्रह्मनिष्ठ मुनींच्या व महर्षींच्या जिवावर चालली आहे. यामध्यें स्वमताभिमान मुळींच नाहीं. यावर कोणी म्हणेल कीं, ही वृत्ति स्वतंत्र विचारसरणीची नसून श्वानवृत्ति आहे. परंतु आमचें यास असें उत्तर आहे कीं, व्यवहारशास्त्रांत आम्ही स्वतंत्र विचारवादी असलों तथापि परमार्थविचारांत या महर्षींच्या द्वारीं श्वानवृत्तिच चांगली बाणल्यास तीच आम्ही भूषणास्पद समजतों. असो.

मागील सतरा " योगांत " अगर प्रकरणांत ज्या मुद्यांचा प्रधानत्वानें विचार केला आहे अगर रहस्यग्रंथाच्या ज्या मर्मस्थानावर शरसंधान केलेलें आहे त्या स्थलांचें पुन्हां चूर्णिकेच्या रूपानें येथें अवतरण करितों. कारण कीं, रहस्यकारांना उत्तरें देण्यास सुलभ पडावें व आम्हांसही इष्ट प्रश्नांचींच उत्तरें मिळण्यास सोपें व्हावें यासाठीं हें पुनः अवतरण करणें भाग आहे. नाहीं तर शंका एक व उत्तरें भलतींच असें होऊन जाईल. अथवा असेंही म्हटल्यास चालेल कीं, हे पुढें दिले जाणारे मुद्दे रहस्यकारांना एक प्रकारचें आव्हानच आहे. या मुद्यांवर सशास्त्र व साधार, समर्पक व समाधानकारक, शान्त व समचित्ताचें उत्तर त्यांनीं दिल्यास आमच्या आजपर्यंतच्या रूढ व गतानुगतिक संस्कारांस कायमची रजा तरी द्यावयास मिळेल. परंतु आमची पक्की खातरी आहे कीं, इतकें आमचें दुर्दैव खास नाहीं. परंतु असें न झाल्यास हा नवीन ग्रंथ निरभिमानपणानें त्यांनीं परत काढून द्यावा.

पहिला मुद्दा:— गीतेचा उपदेश ज्ञानी अर्जुनास नसून तो अज्ञानी अर्जुनास आहे. भगवंतानीं त्याला वरचेवर अज्ञानीच म्हटलें आहे व तो स्वतःसही तसेंच समजत असे. याबद्दल ठिकठिकाणीं आम्हीं भगवद्गीतेतील वचनें दिलींच आहेत. आतां येथें रहस्यकार म्हणतील कीं " आम्हीं अर्जुन ज्ञानी होता असें कोठें म्हटलें आहे ! " आम्हीं एवढेंच म्हटलें आहे कीं " तूं अज्ञानी आहेस म्हणून कर्म कर " असें अर्जुनास स्पष्टपणें भगवानानीं सांगितलेलें नाहीं. एवढ्यावरून अर्जुन ज्ञानी होता असें कसें आमच्या पदरीं बांधतां ? " आम्ही म्हणतों "एवढेंच संदिग्ध वाक्य आपल्या ग्रंथांत असतें तर आम्ही कांहीं हा सिद्धान्त आपल्या माथीं मारीत नव्हतों; परंतु आपल्या ग्रंथाच्या पहिल्या प्रतीतील ३५१ पानांवर सांख्य व कर्मयोग यांच्या तुलनात्मक साधनांचा वृक्ष दिलेला पाहिला म्हणजे सांख्य व कर्म या दोहोंनाही ब्रह्मज्ञानप्राप्ति झाल्यावरच सुरुवात झाली आहे. तसेंच आपला कर्मयोगही सिद्धावस्थेनंतरचा आहे हें निराळें सांगणें नको; सिद्धावस्थेपूर्वीचा कर्मयोग आम्हांसही मान्य असल्यामुळें तेथें मतभेदहि नाहीं, परंतु आपला कर्मयोग ज्ञानप्राप्तीनंतरचा आहे, तेव्हां अर्थातच तो ज्ञानी अर्जुनासच सांगितला आहे असें मानणें भाग आहे; परंतु हें अगदीं चुकीचें आहे.

दुसरा मुद्दा:—आत्मज्ञान झाल्यावर साधनें मुळींच रहात नाहींत, कारण साध्यच कांहीं नसतें. परंतु रहस्यकारांच्या वेदान्तशास्त्रांत आत्मज्ञान झाल्यावर " आत्मज्ञान होण्यास... ... बुद्धि सम झाली पाहिजे ... ... म्हणून चित्तशुद्धि होईपर्यंत कर्में केलीं तरी अखेर तीं सोडून दिलीं पाहिजेत " अशा तऱ्हेची सांख्यमार्गाची मांडणी केली आहे, ही न्यायतः व शास्त्रतः साफ चुकीची आहे. ज्ञानप्राप्ति अथवा आत्मज्ञान कशास म्हणतात हें रहस्यकारांना मुळींच ठाऊक नाहीं, म्हणून हा प्रमाद त्यांच्या हातून झाला आहे. आत्मज्ञान झाल्या-

वर कर्तव्यशेष रहात नाहीं हा वेदांताचा डिंडिम आहे. भगवानूही " यस्त्वात्मरतिरेव स्यात् ... ... " इत्यादि वचनांनीं आत्मज्ञानाच्या ठिकाणीं कर्माचा निषेध करीत आहेत, असें असतां आत्मज्ञान झाल्यानंतर मग चित्तशुद्धि हा " वरातीमागून घोडें " न्याय रहस्यकारांनीं कोठून आणिला आहे ? वेदान्ताचा सर्व खटाटोप व साधनांची उठाठेव हीं ज्ञानप्राप्तीसाठीं आहेत. ज्ञानप्राप्ति झाली म्हणजे कर्तव्य कांहींच उरत नाहीं व प्राणी बंधमुक्त होतो हा सिद्धान्त असतां रहस्यकारांनीं येथून पुढें म्हणजे ज्ञानप्राप्तीनंतर आपलें कर्मयोगशास्त्राचें जाळें पसरलें आहे. ह्या त्यांच्या विवेचनपद्धतीस कोणता वेदान्तज्ञ माना डोलवील ? " सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते " असें भगवान् सांगत असतांही रहस्यकारांचा एवढा अपसिद्धान्त करण्याबद्दल आग्रह कां ?

तिसरा मुद्दा:—वर्णधर्माबद्दल भगवानांचें औदासीन्य मुळींच नसून उलट अर्जुन व भगवान् दोघेही या वर्णधर्मपालनाबद्दल अत्यंत दक्ष असतां हें औदासीन्य श्रीकृष्णाचे पदरीं रहस्यकारांनीं काय आधारें बांधलें ? अर्जुन " संकरो नरकायैव " म्हणतो. श्रीकृष्ण " संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ", यासारखें वर्णधर्मनाशानें आपण सर्व प्रजेचें हनन केल्याइतकें महत्पाप समजत असतां रहस्यकार असा जुलूम कां करीत आहेत ? या श्रीकृष्णाच्या वर्णधर्मांच्या औदासीन्याबद्दल जर ते स्पष्ट वचनें देतील तर त्यांचे सुधारक समाजावर फार उपकार होतील. परंतु अशीं वचनें उपलब्ध भगवद्गीतेंत कोठेंही नाहींत हें आम्ही खात्रीपूर्वक सांगतों. याच्या उलट वचनें मात्र मागें आम्हीं दिलींच आहेत.

चवथा मुद्दा:—प्राप्तसांसारिक कर्में म्हणजे काय ? प्राप्तकर्में कशास म्हणावें ? दैववशात् प्राप्त किंवा जन्मतः प्राप्त किंवा जातितः प्राप्त किंवा हिताहितदृष्ट्या प्राप्त किंवा जबरदस्तीनें प्राप्त किंवा कशानें प्राप्त ? ही शंका या कर्मयोगशास्त्रांतल्या कर्मसंप्रदायांत-उभी राहते व तिचें समाधान कर्मशास्त्रकर्ते कोठें करीत नाहींत. हीं समुदायाचीं कर्में झालीं. प्रत्येक व्यक्तीचें प्राप्तकर्म कोणीं व कसें ठरवावयाचें याबद्दलची उपपत्ति या शास्त्रकारांनीं ठरवून ठाकली असती म्हणजे ग्रंथ सर्वांगसंपूर्ण झाला असता. आम्ही म्हणतों कीं, कर्में म्हणजे शास्त्रोक्त कर्में म्हणजे वर्णाश्रमविहित कर्में. परंतु रहस्यकार म्हणतात, खटपटीलाच कर्में म्हणजे जगांतील सर्व क्रियापदसमुच्चयानें समजलीं जाणारीं कर्में. या कर्मांबद्दल शास्त्रांत विधि असत नाहीं हें पूर्व मीमांसा तत्व रहस्यकारांना ठाऊक नाहीं. मागें सांगितलेल्या दक्षिण आफ्रिकेंतील अगर फिजी बेटांतील मुदतबंदी मजुरांच्या प्राप्त कर्मांबद्दल काय वाट करावयाची ? रहस्यकार म्हणतात खुषीनें पत्करलेला धंदा हा मनुष्याचा धर्म. (पा. ६६१). मग तो धंदा चातुर्वर्ण्यानुरूप आलेला असो अथवा ब्राह्मणानें सांभाराचा धंदा खुषीनें पत्करलेला असो, तो त्याचा धर्म झाला ! हेंच रहस्यकारांचें कर्म. या कर्मास शास्त्राची यातायात कशास हवी ? परंतु भगवान् म्हणतात,

" चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म-विभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्धि..... ॥

मींच चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें आहे. त्याचा कर्ता मीच आहें. चातुर्वर्ण्य मोडण्याचें पातक मी करणार नाहीं.

पांचवा मुद्दाः—भगवद्गीतेंत पाश्चिमात्य नीतिमीमांसेप्रमाणें नीतिमीमांसा मुळींच नसून त्यांत केवल शास्त्रोक्त व वर्णविहित मोक्षमार्ग सांगितला आहे. आतां त्यांतील " समत्व, " " सर्वभूतहिते-रतत्व " सारख्या वचनांतच नीतिमीमांसा येत असल्यास अशीं वचनें अन्य ग्रंथांतून पुष्कळदां आलीं आहेत. मग गीतेसच एवढें नीतिमीमांसेंत अभेसरत्व ररस्यकारांनीं कां दिलें ! त्यांनीं "गीतेंतील नीतिविवेचन " एवढ्याच प्रकरणावर एक गीतेंतील प्रमाणें देऊन प्रबंध लिहावा म्हणजे त्यांच्या वचनांसारखीं शेंकडों वचनें तरी अन्यग्रंथांतून आम्हांस देतां देतील. या रहस्यग्रंथांत जरी एखादें प्रकरण " गीतान्तर्गत नीतिमीमांसा " या नांवाचें असतें तरी आम्हांस या नीतिमीमांसेची कल्पना आली असती. आधिभौतिक सुखवाद प्रकरणांत थोडी नीतिमीमांसेच्या वाऱ्याची झुळुक लागते; परंतु ती फारच थोडी आहे. तेवढीच नीतीची उपपत्ति असल्यास ती हव्या त्या स्मृतींत अगर पुराणांत सांपडूं शकेल. रहस्यकारांनीं आव मात्र घातला आहे मोठा. गीतेसारखा नीतिग्रंथ संस्कृत वाङ्मयांत दुसरा नाहीं अशा तऱ्हेचा अतिभव्य दिसणारा शोध ते मोठ्या डौलानें आपल्या श्रद्धाळू लोकांस सांगत सुटले आहेत; परंतु ही नीतिमीमांसा अन्यग्रंथांत कोठें न केलेली अशी या ग्रंथांत कोठें केली असल्यास तिचें स्वतंत्र विवेचन एक पांच पानें तरी त्यांनीं करावयाचें होतें. सर्व ग्रंथ वाचून मनावर नीतिमीमांसा ठसवावयाची अजब " युक्ति " रहस्यकारांनीं काढली असल्यास तो " योग " आम्हांस साध्य झाला नाहीं हें कष्टानें म्हणावें लागतें. आम्हांस तर ही अपूर्व नीतिमीमांसा अद्यापही या रहस्यग्रंथांत दिसून येत नाहीं.

सहावा मुद्दाः—बरें, क्षणभर ही नीतिमीमांसा भगवद्गीतेंत आहे, असें मानलें तरी ही नीति कोणत्या प्रकारची आहे हें पाहिलें पाहिजे. ॲरिस्टाटल, कांट, स्पेन्सर, मिल्ल, ग्रीन, यांची नीति व्यवहाररत लोकांकरितां आहे. जे लोक द्वंद्वातीत झाले नाहींत, स्थितप्रज्ञ झाले नाहींत, अथवा योगारूढ झाले नाहींत, किंवा समत्व व सर्वांभूतीं एक आमतत्व पाहूं लागले नाहींत अशा लोकांकरितां पाश्चिमात्य नीतिमीमांसा आहे. साधारण मनोविकारांच्या लोकांकरितां केलेलें नीतिशास्त्र व्यवहारांत उपयोगी पडणारच; परंतु आमच्या रहस्यकारांची नीति फारच उच्च दर्जाची आहे. योग पूर्ण साध्य झाल्यावर म्हणजे समत्व आल्यावर व दृश्य जगाच्या बुडाशीं एक आत्मतत्व पाहतां येऊं लागल्यावर मग रहस्यकारांच्या नीतीस सुरुवात होते, तोंपर्यंत होत नाहीं. तेव्हां हें रहस्य-

कारांचें नवें नीतिशास्त्र बहुजनसमाजाच्या खास उपयोगी नाहीं. असल्यास सर्वजन प्रथम ब्रह्मज्ञानी झाले पाहिजेत व तसें झाल्यास सर्वांनाच मोक्षप्राप्ति झाल्यामुळें सृष्टीचें कार्यही तावडतोब संपलेंच म्हणावयाचें. मग नीतिमीमांसेचें कारणच उरलें नाहीं. नवीन शोध लावण्याच्या भरांत रहस्यकार आपलें नीतिशास्त्र कोणाच्या उपयोगीं पडणार या प्रश्नाचा विचार करण्याचें पूर्ण विसरून गेले. आम्ही ह्मणतों, हें रहस्यकारांचें नूतन नीतिशास्त्र ब्रह्मज्ञाननीतिशास्त्र आहे, व्यवहारनीतिशास्त्र नव्हे. असो.

नीतिशास्त्राचा भक्कम पाया आमच्या कर्मविपाकतत्वांत चांगला मजबूत रीतीनें बसत असतां रहस्यकारांना कसें एवढें कोडें पडलें कोण जाणें. असो, एकदांचें नीतिशास्त्र सांपडलें मग तें ब्रह्मज्ञान्याचें कां असेना ! एवढ्यानें तरी आतां आमचा माथा नीतिशास्त्रबाबींत उजळ झाला म्हणावयाचा.

सातवा मुद्दाः—ज्ञानोत्तर कर्मदशेचा. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. आत्मा एकच एक असल्यानें त्याच्या ठिकाणीं कर्ता, कर्म, करण, इत्यादि भेद नाहींत. हे भेद नसल्यानें त्याच्या ठिकाणीं कर्म संभवत नाहीं. शास्त्रीय कर्में चित्तशुद्धीकरितां आहेत. चित्तशुद्धि होऊन आत्मज्ञान झाल्यानंतर पुन्हां कर्मेंच करीत राहणें म्हणजे शिंगें मोडून वासरांत शिरण्यासारखें आहे. कर्माचा आत्मस्वरूपाशीं विरोध असल्यानें आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं कर्म संभवत नाहीं, भेदाशिवाय कर्मास अस्तित्व नाहीं. ज्ञानांत तर भेद मुळींच नाहीं, तेव्हां ज्ञानाशीं कर्माचा मेळ मुळींच बसत नाहीं. सर्व वेदान्तशास्त्राचा अंतिम हेतु असा आहे कीं, संसारत्रस्त जीवानें संसारगत भेद नाहींसे करून भेदरहित अशा आत्मस्वरूपाचें ज्ञान करून घ्यावयाचें. अर्थातच हें भेदरहित ज्ञान झाल्यावर भेदमूलक कर्म करण्याचें त्यास प्रयोजनच रहात नाहीं, हें अगदीं न्यायसिद्ध आहे. आतां ज्ञान्याच्या ठिकाणीं केव्हां केव्हां कर्म दृष्टीस पडतें तें केवल प्रारब्धरूपानें अगर " यावदधिकार " न्यायानें दिसून येत असतें हें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे. हे ज्ञानी लोक विधिनिषेधांचे किंकर असत नाहींत. परंतु रहस्यकारांच्या कर्मशास्त्रानें मात्र ते विधिनिषेधांच्या कचाट्यांत सांपडले, ही गोष्ट अगदीं शास्त्रविरुद्ध आहे याबद्दल तिलप्राय संशय नाहीं. आचार्यांनीं ज्ञान व कर्म यांचा अत्यंत विरोध ठिकठिकाणीं ढळढळीत दाखविलेला आहे, तो रहस्यकारांनीं सप्रमाण नाहींसा केला पाहिजे. त्याशिवाय ज्ञान व कर्म यांचा समुच्चय त्यांना उपदेशितां येणार नाहीं. प्रकाश व तम या दोहींचा समुच्चय होणें जितकें अशक्य तितकेंच ज्ञान व कर्म यांचा समुच्चय होणें अशक्य आहे.

आठवा मुद्दाः—बरें क्षणभर असें मानलें कीं, ज्ञानोत्तर कर्म ज्याअर्थीं कांहीं ज्ञानी लोकांत दिसून येतें, त्याअर्थीं तें प्रशस्त मानून त्याचें अनुकरण इतर ज्ञानी लोकांनीं करावें, कारण या ज्ञानोत्तर कर्मांत सृष्टिधारणा होऊन लोकसंग्रहही

साधतो, तेव्हां अशा दुहेरी लाभासारखा लाभ ज्ञानी लोकांनीं कां सोडावा ! परंतु ह्या प्रापंचिक दूरदर्शीपणा ज्ञानी लोकांस काय उपयोगी आहे ! सृष्टिधारणेची ज्ञान्यास पर्वा काय ! सृष्टि मिथ्या आहे हें ज्ञान पूर्ण बाणल्यावर त्या खोट्या सृष्टीची धारणा करण्याचें आमिष ज्ञान्यास कसा मोह पाडूं शकेल ! अथवा रहस्यकारांच्या लोकसंग्रहाच्या मिष्ट पक्वान्नानें ज्ञान्याच्या तोंडास कसें पाणी सुटेल ! बरें ह्या दोन्ही गोष्टी बाजूस ठेवल्या तरी श्रीकृष्ण स्वतः कर्में करितात तेव्हां त्यांच्याकडे पाहून तरी जीवांनीं कर्में करावींत असें मानलें तरी असें करूं लागल्यास मोक्षाची अपेक्षा जीवांनीं करण्याचें कारण रहाणार नाहीं; कारण मोक्ष मिळाल्यास पुनर्जन्म नाहीं व पुनर्जन्म न मिळाल्यास रहस्यकारांची लाडकी सृष्टिधारणा त्यांच्या हातून होणार नाहीं, हें अगदीं उघड आहे. तसेंच लोकसंग्रहासारख्या खेळण्यांनीं अशा ज्ञानीलोकांचें मनरंजन होणार नाहीं हेंही उघड आहे. आतां या एकाच जन्मांत ज्ञान्यांनीं ज्ञानोत्तर कर्में करावींत असें मानलें तर अशा थोडया लोकांच्या अवाशेष राहिलेल्या आयुष्यांतील कर्मांनीं रहस्यकारांच्या लोकरंजनाचें काम कितीसें होईल ! कोणत्याही बाजूनें पाहिलें तरी ज्ञानोत्तर कर्म शास्त्रतः व युक्तितः पूर्ण असंबद्ध व अशक्य ठरत आहे.

नववा मुद्दा:—सर्व उपनिषदें हीं निवृत्तिपर असून गीताही निवृत्तिपर आहे. त्यांतून प्रवृत्तिपर जीं वचनें आढळतात तीं सर्व निवृत्तिमार्गास पोषक अशींच आहेत. संसाराची अत्यंत निवृत्ति हेंच उपनिषदांचें व गीतेचें तात्पर्य आहे. उपनिषदांतून गीता निराळी काढण्यांत अथवा गीता हें एक प्रवृत्तिपर उपनिषद् मानण्यांत रहस्यकारांनीं प्रचंड चूक केली आहे, व असें करण्यांत आजपर्यंतच्या शिष्टसंमत भावनेस त्यांनीं मोठ्या जोराचा धक्का दिला आहे. भगवंतांनीं प्रागतिक गीता (उपनिषद्) उत्पन्न केली अशी त्यांची स्वतःची समज असती तरी त्यांनीं ती आपल्या व्याख्यानांत कोठें तरी व्यक्त केली असती; कारण असा क्रान्तिकारक ग्रंथ निर्माण करण्यापूर्वी भगवंतांनीं निवृत्तिपर मार्गाचा पूर्वपक्ष करून आपल्या प्रागतिक मताचा स्पष्टपणें उल्लेख केला असता, व पुढें आपला प्रवृत्तिपर सिद्धान्त सप्रमाण मांडला असता; परंतु असें कांहींच न करितां वारंवार आपलें कर्मसंन्यास-पक्षपातित्व स्पष्ट शब्दांनीं सांगण्याचा भगवंतांना मोह पडत आहे हें आम्हीं गीतेंतील वचनें देऊन दाखविलेंच आहे. शिवाय आजपर्यंतचा समज असा आहे कीं " दशोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः " या समजाच्या विरुद्ध तशीं सबळ प्रमाणें असल्याखेरीज कोणास जातां येणार नाहीं. आतां उपनिषदें निवृत्तिपर आहेत हें दासविण्यास स्वतंत्र अनेक प्रबंध लागतील. ते होईपर्यंत वाचकांनीं स्वतः उपनिषदें व त्यांचीं (मोक्षमुल्लरचीं कां होईना) भाषांतरें वाचावीं व त्यांतून त्यांना प्रवृत्ति अगर निवृत्ति ह्या दोन मार्गांपैकीं कोणता मार्ग स्वीकारण्याबद्दल उपदेश आहे तें पहावें. उपनिषदांस अरण्यकें असें

म्हणत असतात. हीं अरण्यकें घरीं वाचावयाचीं नसून तीं अरण्यांत वाचावयाचीं आहेत. संहिता, ब्राह्मण वगैरे ग्रंथ झाल्यावर मग हीं उपनिषदें वाचावयाचीं, असा परिपाठ आहे. असो.

दहावा मुद्दा:—भगवद्गीतेंत निवृत्तिपर वचनें आहेत त्याची वाट अन्यथा लावतांच येणार नाहीं. " तस्य कार्यं न विद्यते " " एकाकी " " अपरिग्रहः " " समः शत्रौ च मित्रे च " " सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते " इत्यादि वचनें केवल निवृत्तिपर असून भगवंतासुद्धां अखेरचें तेंच ध्येय आहे असें सांगावयाचें आहे, परंतु अर्जुनासारख्या कृतारंभास व अनधिकाऱ्यास कर्मत्याग उचित नाहीं अथवा प्रारब्धपरित्याग इष्ट नाहीं एवढेंच भगवान् सांगत आहेत. परंतु असें सांगतांना भगवान् आपला निवृत्तिस्नेह वारंवार व्यक्त करीत आहेत हें स्थूल बुद्धीस सुद्धां समजण्याजोगें आहे. गीता केवल प्रवृत्तिपर मानिल्यास हा अधिकारभेदानें घालतां येण्याजोगा मेळ त्यापक्षीं घालतां येत नाहीं, व केवल प्रवृत्तिमंथनाकरितां श्रीकृष्णाच्या माथीं असंबद्धता व अनेक विरोधी सिद्धान्त मारावे लागतात; इतकेंच नव्हे तर श्रुतिस्मृतींत व व्यासाच्यासुद्धांतही रणें माजवून देवण्याचा दोष पदरीं घ्यावा लागतो. पण हें सर्व कशासाठीं ? गीतेंत कर्मयोग-शास्त्रच केवल सांगितलें आहे ह्या सिद्धान्ताच्या स्थापनासाठीं ! मग हाच हट्ट सोडून दिल्यास सर्व कांहीं ठीक नाहीं का होणार ?

अकरावा मुद्दा:—"लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा" या श्लोकांत भगवानांनीं केवल ब्रह्मज्ञानी लोकांच्या दोन निष्ठा सांगितल्या आहेत असें म्हणण्यांत रहस्यकारांनीं फारच मोठी चूक केली आहे. या निष्ठा शब्दावरील रहस्यकारांनीं केलेलें भाष्य मोठ्या मजेचें आहे व तें त्यांच्या भक्तिमार्ग प्रकरणांत पहावयास सांपडेल. लोकांत म्हणजे रहस्यकारांच्या मतें "ब्रह्मज्ञानीलोकांत" "लोकेऽस्मिन् " म्हणजे "ह्या ब्रह्म-ज्ञानी लोकांत" " द्विविधा निष्ठा " म्हणजे " दोन प्रकारची निष्ठा " आहे. तेव्हां रहस्यकारांच्या विचारसरणीनें हा सर्व गीतोपदेश भगवंतानीं ब्रह्मज्ञान्यास केला असून तो इतरांस नाहीं इतकेंच नव्हे तर अर्जुनासही नव्हे असें सहजच होत आहे; कारण अर्जुनास " अज्ञानी " असें भगवान् वारंवार संबोधित आहेत, तेव्हां ही केवढी अनुपपत्ति होत आहे पहा. ब्रह्मज्ञानी लोकांस उपदेश ! वाहवा सांसं आहे वेदान्तशास्त्र ! " ब्रह्मज्ञानी लोकांकरितां गीताशास्त्र " ह्या शब्दसमुच्चयास आमचे जुने वेदान्ती हंसतील. परंतु अत्यन्त विद्वान गणलेले असे आधुनिक धर्मानाभिज्ञ पंडित या शब्दसमुच्चयास आपल्या माना तुकावीत आहेत. धन्य त्या " अहोरूपं " म्हणणारांची व धन्य त्या " अहोध्वनिः " म्हणणारांची ! आम्हीं तर साफ म्हणतों कीं, ब्रह्मज्ञान्यास भगवद्गीताचशी काय पण प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण सुद्धां कःपदार्थ आहेत. वाचकहो, घाबरे होऊं नका. वेदान्तशास्त्राच्याच आधारानें आम्ही हें सांगत आहों.

बारावा मुद्दाः—ही कर्मयोगचर्पटपंजरी जर ब्रह्मज्ञान्यांकरितां आहे तर या ग्रंथाचें एवढें प्रयोजन काय होतें ? दहा पांच ब्रह्मज्ञान्यांकरितां एवढा अट्टाहास अथवा एवढे भगीरथ प्रयत्न तरी कशास हवे होते ? कारण हा ग्रंथ ब्रह्मज्ञानी लोकांपैकीं कांहींच्या हातांत पडला तरी ते तो वाचतीलच अशी काय खात्री ? बरं त्यांना हा ग्रंथ वाचणे भाग तरी कोणत्या कायद्यानें पाडावयाचें ? रहस्यकारांची नीति पाहावी तीहि ज्ञानोत्तरदशेंतील; कर्मयोग पाहावा तोहि ज्ञानोत्तर दशेंतील ! ! ग्रंथरचना पाहावी तर ती मात्र सामान्य जनाकरितां केलेला दिसते. सामान्य जनासही ब्रह्मज्ञान झालेलें असतें असें रहस्यकार धरून चालत असतील तर ती गोष्ट निराळी कारण हाही सिद्धान्त खरा आहे म्हणणारे शिरोमणी रहस्यभक्तांत अद्याप निघतील. नाहीं असें नाहीं. असो.

तेरावा मुद्दाः—भगवद्गीतेंत "योग" शब्दाचें लक्षण " समत्वं योग उच्यते " हें असून " योगः कर्मसु कौशलम् " हें योगाच्या अनेक गुणांपैकीं एकाचें कथन आहे हें सप्रमाण एका स्वतंत्र योगांत सिद्ध केलें आहे. परंतु रहस्यकार हेंच दुसरें लक्षण म्हणून सररहा वापरीत आहेत ही चूक आहे. दोन्हीही लक्षणेंच आहेत असें मानणें चुकीचें आहे; कारण दोहींत कांहींच साम्य नाहीं.

चवदावा मुद्दाः—गीतासंकल्पावरूनही "योगशास्त्रे" म्हणजे 'युक्तिशास्त्रे' असा अर्थ सिद्ध होत नसून " चित्तसमत्वशास्त्रे " अथवा " पातंजलशास्त्रे " असाच अर्थ निष्पन्न होत आहे.

पंधरावा मुद्दाः— " योगशास्त्रे " म्हणजे " कर्मयोगशास्त्रे " असें मानिल्यास " कर्मयोगशास्त्रे कर्मयोगोनाम " अथवा " कर्मयोगशास्त्रे सांख्ययोगो नाम अथवा कर्मसंन्यासयोगो नाम" असा संकल्प वेडगळ होईल हें निराळें सांगणें नको.

सोळावा मुद्दाः—भक्ति हा मार्ग रहस्यकारांच्या कर्मयोगमीमांसेनें कर्मच होत असतां " निष्ठा " शब्दाची " मार्ग " शब्दापासून युक्तीनें व्यावृत्ति दाखवून भक्तांस निष्ठेंतून अर्धचंद्र देण्याचें बिलकुल कारण नव्हतें. ह्या भक्तियोगास दोन निष्ठेंतून काढून लावण्यांत रहस्यकारांनीं फार गोंधळ केला आहे हें आमचा भक्तियोग वाचणाराचे सहज लक्षांत येईल.

सतरावा मुद्दाः—सुखदुःखविवेचन करण्यांतही रहस्यकार व्यासाच्या विरुद्ध गेले आहेत. भगवद्गीतेंत " विहाय कामान् यः सर्वान् " " प्रजहाति यदा कामान् सर्वान् " असें म्हटलेलें असतां रहस्यकार दर्पयुक्तवाणीनें भगवान् सर्व इच्छा सोडण्यास कोठेंही सांगत नाहींत असें लिहितात याला काय म्हणावें ? वासना, मग ती लीन असो अथवा आविर्भूत असो, हीच सुखदुःखास कारण होत असते असा वेदान्ताचा निश्चय आहे. तिचा अंशतः नव्हे तर सर्वथैव त्याग केला पाहिजे तरच मनुष्य मोक्षास पात्र होतो. रहस्यकारांचा वासनानियम हा गृहस्थाश्रमास विहित आहे. मोक्षप्रकरणांत त्याचा कांहीं उपयोग नाहीं.

सारांश, तृष्णा अगर असंतोष हेंच प्रपंचाचें बीज होय, दुंदुचें मूळ होय, व सर्व यातायातींचें उगमस्थान होय; तेव्हां या वासनेचा सर्वथैव त्याग झाल्याविना मोक्ष संभवत नाहीं.

अठरावा मुद्दा:—जीवास कर्तृत्व आहे. 'स्वातंत्र्य' हें जीवाचें आहे. म्हणजे जोंपर्यंत अहंकारयुक्त जीव मी, माझे इत्यादि अभिमानपूर्वक सहज होत असलेल्या गोष्टिबद्दल भावना ठेवीत आहे तोंपर्यंत जीवस्वातंत्र्य खरेंच आहे. ज्या दिवशीं हा अहंकार निमेल त्या दिवशीं स्वातंत्र्य, कर्मविपाक इत्यादि गोष्टी त्या जीवास मिथ्या दिसूं लागतात, व तो जीव कर्मविपाकांच्या फेऱ्यांतून सुटतो. प्रकृतीच्या जगड्व्याळ तांडवांत वास्तविक पाहतां जीवाचें स्वातंत्र्य, कर्तृत्व काडीमात्र नसतां प्रकृतीच्याच अहंकारगुणामुळें जीव कर्तृत्व बळेंच आपल्याकडे ओढून घेऊन सुखी व दुःखी होत असतो. जीव ही संज्ञा सुद्धां या अहंकारामुळेंच आल्यास आली आहे. आत्मा वस्तुतः कांहीं करीत नाहीं. काय करतो अथवा केलेलें भोगतो तो अहंकारयुक्त जीव होय. हें तत्व पूर्ण न समजल्यामुळें रहस्यकारांनीं जीवस्वातंत्र्य खरें मानलें आहे. भगवद्गीतेस आत्मस्वातंत्र्य मान्य नाहीं. हें आम्हीं स्पष्ट वचनें देऊन मागें दाखविलेंच आहे.

एकोणिसावा मुद्दा:—भगवद्गीतेंत वारंवार "तस्माद्युध्यस्व भारत" हें पालोपद असल्यामुळें रहस्यकारांना शंका आली कीं, भगवद्गीता हें शास्त्र कर्मयोगपर आहे असें असतां संन्यासमार्गीयांनीं तिला निवृत्तिपर स्वरूप हटवादीपणानें दिलेलें आहे. ही शंका रहस्यकारांना इतकी बाधली कीं, त्यायोगें हा मोठा प्रचंड ग्रंथ निर्माण झाला व रहस्यकारांना वाटूं लागलें कीं, हा आपण मोठा अपूर्व शोध केला व श्रीशंकराचार्यादि अवतारिक महापुरुषांच्या हें " तस्माद्युध्यस्व " चें रहस्य लक्षांत आलें नव्हतें तें लहानपणींच आपल्या लक्षांत आलें. परंतु " तस्माद्युध्यस्व भारत " ह्या पालोपदावरून वास्तविक गीताशास्त्र हें युद्धशास्त्र आहे अशी कां रहस्यकारांना शंका आली नाहीं कोण जाणें ! कारण फिरून फिरून " युद्ध कर " असें भगवान् अर्जुनास सांगत आहेत इतकेंच नव्हे तर मोठमोठ्या गहन तत्वज्ञानाच्या व्याख्यानाच्या आधीं, मध्यें, शेवटीं " तस्माद्युध्यस्व " असेंच सांगत सुटले आहेत तेव्हां वस्तुतः हें सर्व युद्धशास्त्र असलें पाहिजे अशी शंका घेणें गैर झालें नसतें व ह्या शास्त्राचा या चालू महायुद्धांत बराच खप झाला असता. आम्हीं मागें सांगितलेंच आहे कीं, जगांत असा एक वर्ग आहे कीं, त्या वर्गास उद्योग मुळींच नको असतो. वेदान्ताच्या म्हणजे अद्वैतशास्त्राच्या कोठें केव्हां ऐकलेल्या गप्पा माराव्यात व शास्त्रीय कर्मे गौण म्हणून तीं मुळींच करूं नयेत अशा तऱ्हेच्या प्रवृत्तीचीं माणसें सर्वकाल जगांत असलींच पाहिजेत. अशा वेदान्ताच्या नुसत्या गप्पा मारणाऱ्या व रुतींत अज्ञानी लोकांसारखें वर्तन करणाऱ्या इसमाकरितां (" अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ") अर्जुनास निमित्त

करून भगवंतांनीं सन्या सनातन धर्माचा उपदेश केला आहे व निवृत्ति हें प्रधान साध्य असून तें शास्त्रविहित प्रवृत्तिमार्गानें कसें साध्य करून घ्यावें व शेवटीं निवृत्तीनेंच कसा मोक्ष प्राप्त होतो इत्यादि मार्गाचें सोपपत्तिक विवेचन या ग्रंथांत केलेलें आहे. " तस्माद्युध्यस्व " ही भगवानानीं वारंवार दिलेली सूचना आहे. तुला युद्ध केलेंच पाहिजे, तूं तें आधींच प्रारंभिलें आहेस. ज्ञानी असलास तरी तें आतां तुला सोडतां येणार नाहीं. तूं तर अज्ञानी आहेस. तुझा अधिकार कर्माचा आहे. ज्ञानाचा नाहीं. हें इतकें विषद असतां रहस्यकारांना तें दिसत नाहीं. निरुपाय आहे.

विसावा मुद्दाः—रहस्यकारांना खरें वेदान्तशास्त्राचें मर्म कळलें नाहीं. याचें आणखी एक उदाहरण म्हटलें म्हणजे त्यांनीं पाश्चिमात्य तत्वज्ञानास दिलेलें महत्व हें होय. रहस्यकार जेव्हां ज्ञानोत्तर कर्म करावें कीं नाहीं या विचाराकरितां पाश्चिमात्य तत्ववेत्त्यांचे आधार देण्यास सरसावूं लागतात तेव्हां तर अगदीं हंसूं कोसळतें, व वेदान्तशास्त्रासारख्या अनुभवयुक्त ज्ञानहिऱ्याच्या जोडीला अनुमानगम्य पाश्चिमात्य ज्ञानकोळसा आणून ठेवल्याबद्दल रहस्यकारांची अत्यंत कींव येते.

एकविसावा मुद्दाः—शेवटीं परंतु महत्वानें अगदीं अव्वलीस असलेला मुद्दा म्हणजे अधिकार विचाराचा. कोणी कांहीं म्हणोत, आम्ही तर म्हणतों, ज्यानें आजन्म वेदधर्मयुक्त तपश्चर्या करून, ईश्वरी प्रसाद मिळवून, गुरुकृपा संपादन करून, सगुण निर्गुण परमात्म्याचा अपरोक्ष साक्षात्कार करून घेतला आहे अशालाच या धर्मबाबतींत अधिकारयुक्तवाणीनें बोलण्याचें सामर्थ्य आहे. इतरांना तें नाहीं. या अधिकाराभावामुळेंच " गीतारहस्य " म्हणजे केवळ एक " प्रचंड सावळा गोंधळ " होऊन गेला आहे हें वरील सर्व विवेचनावरून पूर्ण लक्षांत आलेंच पाहिजे अशी आमची प्रतिज्ञा आहे. आतां प्रथमपासूनच आपण प्रेमांध झालां असल्यास निरुपाय आहे.

येथें कोणी सहजच विचारील कीं, हा एवढा अधिकार आपणास तरी आहे काय ? आम्ही म्हणतों ' नाहीं. ' परंतु आम्हीं या ' गीताधर्मांत ' कोठें ' नवीन ' ' अजब ' ' अपूर्व ' असा धर्मशोध करीत नाहीं, किंवा पूर्वाचार्यांच्या विरुद्ध असें एखादें मत स्थापूं पहात नाहीं. तेव्हां पूर्वाचार्यांच्या तपोबलयुक्त वाणीचा नुसता आम्हीं अनुवाद केला तर त्यांत आमचा अधिकार पाहाण्याचें कोणास प्रयोजन नाहीं. तेव्हां सर्व सद्धर्मीयांना एवढी करद्वय जोडून विनंति आहे कीं, " हा गीतारहस्य" ग्रंथ धर्मग्रंथ म्हणून आपण वाचूं नये तर केवल वाङ्मयात्मक प्रबंध या दृष्टीनें वाचावा, कारण या ग्रंथकर्त्यास वेदान्तशास्त्राचें व सनातन वैदिक धर्माचें यथाशास्त्र व गुरुशिष्यपरंपरागत अनुभवयुक्त ज्ञान नाहीं. " याही उप्पर हा ग्रंथ धर्मादर्श म्हणूनच वाचण्याचा आपण हट्ट धरीत असाल तर कलियुगाचे आपण कलिदेवच म्हणावयाचे. सदरहु ग्रंथ अत्यंत परिश्रमानें व दीर्घकालीन अभ्यासानें

लिहिला गेल्यानें ग्रंथकर्त्याच्या अतुल बुद्धिसामर्थ्याचा व लोकसंग्रहकर्तृत्वाचा तो एक आदर्शच होऊन बसला आहे म्हणून वाङ्मयात्मक ग्रंथ या दृष्टीनें आमच्या मराठी ग्रंथसमूहांत या एकाच ग्रंथानें फार मोठी भर पडली यांत शंका नाहीं. असा स्वतंत्र विचारयुक्त व गहन तत्वज्ञानप्रचुर प्रचंड ग्रंथ मराठी वाङ्मयांत झाला नाहीं व पुढें कधीं लवकर होईल असाही संभव दिसत नाहीं. या दृष्टीनें या ग्रंथाची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. परंतु धर्मग्रंथ या दृष्टीनें हा ग्रंथ अगदीं अशास्त्रमय व अज्ञानमय अतएव अत्यंत अनादरणीय आहे हें आम्ही अगदीं निक्षून सांगतों. असो.

हा अल्पसा खंडनयत्न समाप्त करण्यापूर्वी प्राकृतिक प्रागतिकांना म्हणजे (दृश्य तेवढेंच खरें व यांतील म्हणजे दृश्यांतील सुखसाधनांचें अर्जन हाच पुरुषार्थ मानणाऱ्या लोकांनां) अत्यंत नम्रपणानें एवढी विज्ञप्ति करितों कीं, आपली देशाभिमानज्योति कितीही प्रज्वलित असली, अथवा देशकालवर्तमानाप्रमाणें धर्मबंधनें मोडण्याची अवश्यकता आपणास कितीही जरूरीची भासत असली, किंवा धर्माज्ञा व ब्रह्मज्ञान हीं आपणास कितीही वेडगळपणाचीं दिसत असलीं तथापि आपण आपल्या प्रगतीच्या झपाट्यानें क्रमीत असलेल्या मार्गावर आमच्या पवित्र निवृत्तिमार्गी ग्रंथांना बळेंच भलतेंच रूप देऊन उचलतांगडी करून नेऊं नका. आपला मार्ग पडला दक्षिणध्रुवाकडील. धर्ममार्ग अथवा मोक्षमार्ग पडला उत्तरध्रुवाकडील. तेव्हां हीं परस्परविरुद्ध टोकें एकत्र आणण्याचा वृथा खटाटोप आपण करूं नका. काळ आपल्यास अत्यंत अनुकूल आहे. तो आपला मार्ग अत्यंत सुलभ व निष्कंटक करून स्वतःच ठेवीत आहे, तेव्हां या "धर्म" रूपी वृद्ध आजोबास जागच्या जागीं तरी स्वस्थ खोकत पडूं द्या, म्हणजे आपलें कर्तव्य आपण केलेंसें होईल.

प्रस्तुत ग्रंथ वाचतांना Ernst Haeckel च्या the Riddle of the universe नामक ग्रंथामधील एकोणिसाव्या Our Monistic Ethics नांवाच्या भागांतील विचारांची आठवण झाल्याविना रहात नाहीं. ग्रंथकर्त्याच्या मनांत हे विचार बरेच घोळत असले पाहिजेत असें दिसतें. येशूख्रिस्ताच्या मळमळीत धर्मपंथावरील उपरिनिर्दिष्ट ग्रंथकाराची झोड व रहस्यकारांची निवृत्तिपंथी लोकांवरील झोड अगदीं एका तोडीचीं आहेत असें सहजीं लक्षांत येतें. असो.

खंडनवृत्तीची ही आमची पहिली उसाळी येथें संपली; परंतु ती निमाली असें मात्र कोणी समजूं नये. मूळ ग्रंथाच्या अनेकविधतेप्रमाणें खंडनही अनेकविधच पाहिजे आहे व ज्या जगदीशप्रेरणेनें व प्रसादानें ह्या वृत्तीस मूर्त स्वरूप आलें त्याच प्रेरणेनें व प्रसादानें ही वृत्ति आपलें पवित्र खंडनकार्य पूर्ण केल्याविना मूलस्वरूपीं लीन होणार नाहीं हें उघड आहे व अशीच आमची भावना आहे.

या नूतन ग्रंथाचे आम्हावरील उपकार म्हटले म्हणजे सद्धर्माची चर्चा करण्याची पवित्र संधि या ग्रंथानें आम्हांस दिली हें होय.

शेवटीं अनंतकोटिब्रह्माण्डनायक विश्वात्म्याच्या पदकमलांचें सहस्रदलकमलावरील तेजोमंडलांत अत्यंत श्रद्धायुक्त ध्यान करून व या सर्व लेखनसाधनांचा (मेंदू, हस्त, स्नायु इत्यादींचा) स्वामी व प्रेरक तोच विश्वात्मा आहे ही भावना ठेवून हा लेख आटपता घेतों.

